# अन्वयार्थ - २

शरद जोशी

# अन्वयार्थ- २

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

* या पुस्तकातील सर्व लेख दै. लोकमतमधून प्रकाशित झालेले आहेत. संपादकांचे आभार.

TM
जनशक्ती
वाचक
चळवळ

अन्वयार्थ २ । शरद जोशी
Anvayaarth 2 by Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण-४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
सरदार

प्रथमावृत्ती
१६ मार्च २०१०, गुढीपाडवा

**मूल्य रु. २००/-**

# प्रकाशकाचे मनोगत

शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने त्यांचे सर्व लिखाण ग्रंथरूपात आणत आहोत. या उपक्रमातील 'अन्वयार्थ' हे एक पुढचे पाऊल. हे लेख 'दै. लोकमत'मध्ये इ.स. १९९२ – १९९४ व इ.स. २००० – २००१ या कालावधीत 'अन्वयार्थ' सदराखाली प्रसिद्ध झालेले आहेत. शक्य त्या लेखांखाली तारखा आवर्जून टाकल्या आहेत, जेणेकरून काळाचा संदर्भ आवश्यक तेथे स्पष्ट व्हावा. शेतकरी संघटनेचा विचार हा फक्त शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून तो सर्वांचाच आहे. हे वेगळं सांगायची गरज नाही, इतके हे लिखाण स्पष्ट आहे.

कै. हेमंत देशमुख, सौ. शैला देशपांडे, सुरेशचंद्र म्हात्रे, दै. लोकमत औरंगाबादचे वृत्तसंपादक चक्रधर दळवी या सर्वांमुळे हे लेख उपलब्ध झाले. त्यांचे मनःपूर्वक आभार.

'शेतकरी संघटक' या पाक्षिकातील शरद जोशी यांचे लेख 'माझ्या शेतकरी भावांनो– मायबहिणींनो', 'बळिचे राज्य येणार आहे', 'भारता'साठी', 'पोशिंद्यांची लोकशाही', 'चांदवडची शिदोरी' या शीर्षकांखाली प्रकाशित करीत आहोत. ही सर्व पुस्तके अमृत महोत्सवी वर्षात प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे.

'अंगारमळा' या पुस्तकाला नुकतेच महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरविले आहे. शरद जोशी यांच्या लिखाणाची अभ्यासक, विचारवंत योग्य ती दखल घेतील ही आशा आम्ही बाळगतो.

१६ मार्च २०१०
गुढीपाडवा

**श्रीकांत उमरीकर**

# प्रास्ताविक

१९७८ मध्ये शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला सुरुवात झाली. आंदोलनाने वेगवेगळ्या साधनांचे प्रयोग केले. महात्मा गांधींनी घालून दिलेल्या अहिंसा आणि सत्याग्रह या साधनांबरोबरच शेतकरी संघटनेच्या आंदोलनांमध्ये एका आर्थिक हत्याराचीही जोड देण्यात आली. शेतकऱ्याने पिकविलेला माल रोखून धरला, बाजारात नेला नाही; तरच त्याला आपल्या मागण्यांकडे लोकांचे लक्ष वेधून घेता येते. हे लक्षात घेता, आंदोलन करताना ज्या मालाच्या भावाकरिता आंदोलन करायचे त्या मालाची निवड मोठ्या काळजीपूर्वक करण्यात आली. देशातील एकूण कांदाउत्पादनापैकी महाराष्ट्रात ४० टक्के कांदा तयार होतो. त्यापैकी ४० टक्के कांदा केवळ नाशिक आणि पुणे या दोनच जिल्ह्यांत तयार होतो. शेतकरी संघटनेची स्थापना पुणे जिल्ह्यात चाकण येथे झाली. चाकण हे कांद्याच्या बाजारपेठेचे महत्त्वाचे केंद्र आहे. नाशिक भागामध्ये तसे संघटनेचे काही काम नसताना, किंबहुना संघटनेची स्थापनाही तेथे झाली नसताना केवळ चाकण येथील बाजारपेठेच्या आधाराने आंदोलन सुरू करण्यात आले.

यापुढील आंदोलन उसाचे झाले. उसाबद्दलही अशीच परिस्थिती. देशातील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी ४० टक्के साखर महाराष्ट्रात तयार होते. त्यापैकी साखर उत्पादन करणारे महत्त्वाचे जिल्हे म्हणजे नाशिक, नगर, कोल्हापूर आणि सांगली. नाशिक भागात १९७९-८० मध्ये शेतकरी संघटनेची स्थापना झाली. नाशिक जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योगातील काही नेत्यांचाही शेतकरी आंदोलनाला पाठिंबा मिळाला. तेवढ्या आधारावर १९८० सालचे प्रख्यात ऊस आंदोलन झाले आणि ते यशस्वीही झाले.

याबरोबर, नवनवीन कल्पना काढून सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्याचा जसजसा प्रयत्न केला, तसतशी आंदोलनाची नवी हत्यारे तयार करावी लागली. मला स्वत:ला, जेथे आंदोलन जाहीर होईल तेथे जिल्हाबंदी असे होऊ लागल्याने

‘विठोबाला साकडे’ हे एक आंदोलनाचे नवीन हत्यार निघाले. त्यानंतर कापसाच्या भावाकरिता ‘ठिय्या आंदोलन’ झाले. ‘रास्ता रोको’च्या ऐवजी ‘पान-फूल आंदोलन’ करून, ज्यांची गाडी अडवायची त्यांनाच या आंदोलनाविषयी माहिती देणारे पत्रक आणि फूल किंवा पान द्यायचे. असे आंदोलनाचे अनेक प्रयोग शेतकरी संघटनेने केले. शेवटी, एकेका शेतीमालाच्या भावाकरिता आंदोलन करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही, शेतकरी वेगवेगळी बियाणी पेरतो; पण त्या सर्वच शेतकऱ्यांना जे पीक येते ते उदंड कर्जबाजारीपणाचे! हे लक्षात घेता ‘शेतकऱ्यांची सर्व कर्जे बेकायदेशीर आणि अनैतिक आहेत’ असे अर्थशास्त्र सिद्ध करून ‘संपूर्ण कर्जमुक्ती’ची मांडणी शेतकरी संघटनेने केली. याच सुमारास ‘शेतीमालाला भाव मिळू द्यायचा नाही हे सरकारचे धोरण आहे’ या शेतकरी संघटनेच्या सिद्धांताचा भरपूर पाठपुरावा करणारा पुरावा जागतिक व्यापार संघटनेच्या दस्तावेजात मिळाला आणि ‘भारत सरकार शेतकऱ्यांवर जाणीवपूर्वक उणे सबसिडी लादते’ हे सिद्ध करण्यात शेतकरी संघटनेला यश मिळाले. त्याबरोबर शेतकरी संघटनेच्या विचाराचे एक सूत्र निश्चित झाले.

‘शेतकरी संघटना भीक मागत नाही, फक्त घामाचे दाम मागते आणि त्याकरिता शेतीमालाला निदान उत्पादनखर्चावर आधारित भावतरी मिळायला पहिजे,’ अशी मांडणी होऊ लागली. हा भावतरी कोणत्या हक्काने मागायचा याबद्दल शेतकरी संघटनेने तयार केलेला सिद्धांत असा, की आम्ही कोणतीही सब्सिडी मागत नाही, सूट मागत नाही; आमच्या मालाला खुल्या बाजारपेठेमध्ये जो भाव मिळाला असता तो भाव मिळण्याच्या आड शासनाने येऊ नये एवढीच आमची मागणी आहे. चाकण किंवा नाशिक येथील आंदोलनांशी हा विचार सुसंगत होता. कारण ही दोन्ही आंदोलने, सरकारने हस्तक्षेप करून शेतीमालाचे भाव पाडल्यानेच उद्‌भवली होती.

‘शेतकऱ्यांना बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळणे म्हणजेच शेतकऱ्यांच्या समस्येची गुरुकिल्ली होय’ ही कल्पना शेतकरी संघटनेने स्पष्ट केली. साहजिकच, आर्थिक स्वातंत्र्य आणि त्याबरोबरच स्पर्धेचे महत्त्व हे मुद्देही शेतकरी संघटनेने आवर्जून मांडले.

यापलीकडे, तंत्रज्ञान व पर्यावरण यांसंबंधीसुद्धा शेतकरी संघटनेची एक अनोखी भूमिका तयार झाली. माल्थसच्या काळापासून सर्व लोकसंख्येला पुरून उरेल इतके अन्नधान्य निर्माण करण्याचे काम शेतकऱ्यांनी केले आहे आणि माल्थसचे भाकीत खोटे ठरविले आहे. ते काही जमिनीचा आकार वाढल्यामुळे

जमले नाही, तर आहे तेवढ्याच जमिनीवर नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले आणि माल्थसच्या काळानंतर जगाची लोकसंख्या चौपटीपेक्षाही जास्त वाढली असली तरीसुद्धा लोक आज त्या वेळच्यापेक्षाही अधिक चांगल्या तऱ्हेने आणि विविध प्रकारचे खातपीत आहेत. साहजिकच, तंत्रज्ञानविषयक एक तत्त्वज्ञान शेतकरी संघटनेने तयार केले. जगात 'वाईट तंत्रज्ञान' असे काही असत नाही. प्रत्येक तंत्रज्ञानाची एक चांगली बाजू असते, एक वाईट बाजू असते. जेव्हा त्याची चांगली बाजू उजेडात येते तेव्हा त्याचा स्वीकार होतो. काही काळानंतर त्याच गोष्टींचा अतिरेक झाला म्हणजे त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात; परंतु दुष्परिणाम दिसू लागले तरी त्यांना घाबरून मागे वळून जुनाट तंत्रज्ञानाचा किंवा जुनाट शेतीपद्धतींचा आश्रय घेतल्याने हा प्रश्न सुटू शकत नाही. एका तंत्रज्ञानाचे दोष दूर करण्यासाठी काही पुढच्या तंत्रज्ञानाकरिता छलांग मारावी लागते, असे शेतकरी संघटनेने मांडले.

या सर्व आंदोलनांच्या आणि विचारांच्या उत्क्रांतीच्या प्रवाहात माझ्या हातून उदंड लिहिले गेले, ते प्रामुख्याने आंदोलनाच्या प्रचाराकरिता आणि शेतकऱ्यांनी आंदोलनात उतरण्यास उद्युक्त व्हावे यासाठी त्यांचे प्रशिक्षण करण्याकरिता. शेती सोडून इतर विषयांवर फारसे लिखाण मी केलेले नव्हते.

१९९७ मध्ये, भारताच्या स्वातंत्र्याची ५० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने जी काही चर्चा लोकसभेमध्ये किंवा बाहेर झाली, त्यात शेतकरी संघटनेचा प्रमुख 'इंडिया–भारत' सिद्धांत कोठेही मांडला गेला नाही. शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्याच्या ५० वर्षांची या सिद्धांताच्या संदर्भात मांडणी करणे आवश्यक होते. त्याकरिता अमरावती येथे शेतकरी संघटनेने एक 'जनसंसद' बोलावली आणि त्या 'जनसंसदे'मध्ये तीन दिवस अखंड चर्चासत्र करून 'स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशाची प्रगती झाली नाही, स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांची स्वप्ने साकार झाली नाहीत' याचा अन्वयार्थ काढण्याचा मोठा जबरदस्त प्रयत्न झाला. 'स्वातंत्र्यानंतर देश अधोगतीस गेला; परंतु देशाचे स्वातंत्र्यानंतरचे नेतृत्व उज्ज्वल आणि कर्तबगारच होते' एवढेच नव्हे तर, 'स्वातंत्र्य मिळविण्याकरिता जे आंदोलन झाले त्या आंदोलनाचीही परंपरा अत्यंत उज्ज्वल आणि मोठी ऐतिहासिक होती' अशा तऱ्हेची भोंगळ मांडणी शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावर होऊच शकत नव्हती. या निमित्ताने १९९७ मध्ये मी 'स्वातंत्र्य का नासले?' ही पुस्तिका पहिल्यांदा लिहिली. तसा या पुस्तिकेचा संदर्भ शेतीशी आहेच आहे, परंतु त्यापलीकडे जाऊन देशातील इतर वेगवेगळ्या क्षेत्रांतील परिस्थितीचा

आढावा घेऊन त्याविषयीची टिप्पणी या पुस्तकात फार व्यापकपणे करण्यात आली आहे. 'जनसंसद' झाल्यामुळे, कदाचित, तेथे १९७८ मध्ये शेतकरी संघटना आणि शेतकरी आंदोलन यासंबंधाने चालू झालेले विचारमंथन एका तऱ्हेने संपूर्ण साकार आणि सूत्रबद्ध झाले. एक 'पॅराडाईम' तयार झाला.

हा 'पॅराडाईम' झाल्याचा परिणाम म्हणून की काय कोणास ठाऊक, त्यानंतर मला १९९८ सालाच्या शेवटास लागोपाठ दोन वेळा 'सेरेब्रल स्ट्रोक' आले. पहिल्या स्ट्रोककडे मी गंभीरपणे लक्ष दिले नाही. दुसऱ्या स्ट्रोकच्या वेळी दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. त्यामुळे, एकापाठोपाठ एक मोठ्या मोठ्या शस्त्रक्रिया कराव्या लागल्या आणि या आजारपणाच्या काळात जो काही मोकळा वेळ मिळाला किंवा ज्या काळामध्ये मला प्रत्यक्ष आंदोलनात सहभागी होणे शक्य नव्हते त्या काळात मला 'दैनिक लोकमत'करिता देशातील शेतीक्षेत्र सोडून इतर क्षेत्रांमधील वेगवेगळया घटनांचा अर्थ लावणारी लेखमाला लिहिण्याची पुन्हा एकदा विनंती करण्यात आली. ती मी आनंदाने मान्य केली. प्रस्तुतच्या संग्रहात लिहिलेले लेख हे त्या काळच्या, म्हणजे सन १९९८ ते २००० या काळात देशामध्ये विविध क्षेत्रांत घडलेल्या घटनांविषयी मी केलेली टीकाटिप्पणी आहे.

शेतकरी संघटनेची म्हणून जी काही विचारधारा आहे त्या विचारधारेच्या प्रकाशामध्ये अर्थ लावण्याचे लिखाण मी पूर्वी केले नव्हते असे नाही. 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकात शेतकरी संघटनेचा विचार प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या दृष्टीने मांडण्यात आला आहे. त्यानंतर, 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' असे दोन खंडांत एक पुस्तक तयार झाले. त्याखेरीज, 'शेतकरी कामगार पक्ष : एक अवलोकन', 'जातीयवादाचा भस्मासुर', 'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' असे इतर अनेक विषयांवरचे लिखाण मी केले होते; परंतु प्रचलित परिस्थितीवर मराठी नियतकालिकामध्ये सलगपणे लिहिण्याचा हा दुसरा प्रसंग आहे. (याच्या आधी सन १९९३-१९९४ मध्ये याच दैनिकासाठी लिहिलेले अशाच प्रकारचे लेख 'अन्वयार्थ-१' या लेखसंग्रहात समाविष्ट केले आहेत.)

प्रस्तुत संग्रहातील लेख प्रचलित घटनांचा अन्वयार्थ लावण्याकरिता लिहिले गेले असले, तरी त्यांचे स्वरूप हे उघड उघड लघुनिबंधांचेच आहे. आज २०१० मध्ये, देशातील परिस्थिती लक्षात घेतली तर कोणत्या परिस्थितीत कोणता लेख लिहिला गेला त्यासंबंधी काही सूतोवाच करण्याची काही आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. आजही हे लेख वाचले तर ते लघुनिबंधाप्रमाणे वाचता येतात आणि त्यातील मर्म चांगले समजून घेता येते.

‘शेतकरी संघटना म्हणजे फक्त शेतकऱ्यांची संघटना, नोकरदारांच्या चळवळीप्रमाणे शेतकऱ्यांनी आपल्या पदरात काहीतरी पाडून घ्यावे या उद्देशाने केलेली चळवळ’ अशी समजूत अनेकांची पहिल्यापासून झालेली आहे. शेतकरी संघटनेला काही जागतिक ऐतिहासिक आणि दार्शनिक पाया आहे. शेतकरी संघटनेच्या शेतकीच्या अर्थकारणाव्यतिरिक्त इतर विषयांवर एवढे लिखाण होऊनही त्याकडे जावे तसे लक्ष गेलेले नाही. ‘इंडिया–भारत’ ही शब्दप्रणाली आता सर्व देशभर प्रचलित झाली, एवढेच नव्हे तर रूढ झाली आहे. ‘शेतीमालाला रास्त भाव न देण्याचे धोरण सरकारचेच आहे’ हे आता सरकारनेही मान्य केले आहे आणि सर्व नेतेही आता ते मान्य करतात. ‘कर्जमुक्ती’ ही शेतकरी संघटनेची मागणी आता शासनानेही मान्य करून, ती आपल्याच नावाने खपवण्याचा प्रयत्न चालवला आहे. अशा परिस्थितीमध्ये, जे नवनवीन प्रश्न आज उभे राहत आहेत त्या प्रश्नांचाही काही अंदाज शेतकरी संघटनेला दहा वर्षांपूर्वी आला होता, हे या संग्रहातील लेखांवरून दिसून येईल. उदाहरणार्थ, हवामानातील बदल, वातावरणाचे व पर्यावरणाचे प्रदूषण या विषयीसुद्धा शेतकरी संघटनेचा विचार किती सर्वंकष आणि एका धाग्याने विणलेल्या महावस्त्रासारखा आहे, याची जाणीव ज्यांना आतापर्यंत आली नसेल त्यांना या ‘अन्वयार्थ–१’ आणि ‘अन्वयार्थ–२’ या लेखसंग्रहांमुळे ती होईल अशी आशा आहे.

९ फेब्रुवारी २०१० **शरद जोशी**

# लेखानुक्रम


१. व्यापार करा, युद्ध नको ............................................ १५
२. बुझावी क्लिंटन तेंचि लीळा वदावी ................................ २०
३. धार्मिक प्रार्थना ...................................................... २९
४. घटना................................................................. ३२
५. सुखी माणसाचा सदरा ............................................. ३६
६. ससा लागे लांडग्यापाठी ............................................ ४०
७. अनिवासींना गगन ठेंगणे ........................................... ४४
८. शालेय शिक्षणातही हॅन्सी क्रोनिए ................................ ४८
९. आणीबाणी : एक विफल कारावास ................................ ५३
१०. स्वायत्ततेचा बाऊ आणि काश्मीरची भारत समस्या ................ ६०
११. नाजापुत्रम् बलिम् दद्यात ........................................ ६५
१२. करीम अंडेवाल्याचे आधुनिक अवतार ............................. ७०
१३. स्पायरॉसिस साथीचा इशारा ..................................... ७७
१४. फिजीतील भारतीय आणि भारतातील फिजीयन ..................... ८२
१५. हिजबुल, वीरप्पन आणि पर्यावरणातिरेकी ......................... ८६
१६. मानवीय न्याय आणि सामान्य माणूस ............................. ९१
१७. यथा प्रजा तथा राजा ............................................. ९५
१८. खेळ आणि व्यापार: रोमन विरुद्ध ग्रीक परंपरा .................... ९९

१९. ब्रह्मचाऱ्याचा कोपागार अनुनय ........................................ १०३
२०. ससा आणि कासव – २००० ........................................ १०७
२१. खिडकीला दोन दिशा ........................................ ११०
२२. मुरली मनोहरांचे अशिक्षण धोरण ........................................ ११५
२३. गाठ पडली ठका ठका ........................................ १२१
२४. हतो वा प्राप्यसि स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ............... १२५
२५. WTO चे विरोधक आणि त्यांचे धनदांडगे मालक ............... १३०
२६. नाथांच्या घरची उलटी खूण ........................................ १३४
२७. ठाकऱ्यांचा 'ठोक टाळे' उपाय!........................................ १३८
२८. शेतीपुढील जागतिक दर्जाचे आव्हान ........................................ १४२
२९. शेतकरी उपाशी, शेतीशास्त्रज्ञ खाई तुपाशी! ........................ १४६
३०. जागतिकीकरणाचे आव्हान प्रतिभेने पेलणे शक्य ................. १५२
३१. गाऊ त्यांना आरती ........................................ १५६
३२. गुजरात आपत्तीची जबाबदारी कोणावर? ........................... १६१
३३. गुजरात मलब्यातून उठणार नक्की,
सरकारने मोकळीक दिली तर ........................................ १६६
३४. ए.डी.डाचा ........................................ १७०
३५. प्रादेशिक फळे व उत्पादने ........................................ १७५
३६. विकासाची क्षितिजे उलटीपालटी करणारे राजकारण.............. १७९
३७. जग काही फार सुधारलेले नाही!........................................ १८३
३८. नमोऽस्तु ते, जयोऽस्तु ते ........................................ १८७
३९. दहावा अवतार– तंत्रज्ञान ........................................ १९१
४०. असाही एक 'एप्रिल फूल' ........................................ १९५
४१. कोटा राज्य संपले, 'कोटा राज्य' चालूच आहे! .................. १९९
४२. एक दिवस असाही उगवतो ........................................ २०४
४३. जित्याची खोड ........................................ २०९
४४. चाकणचा कांदा आणि क्वेबेकचा दंगा ........................... २१३
४५. बाजारात धांगडधिंगा काय कामाचा ........................... २१७
४६. अवेळी 'एप्रिल फूल'ची मस्करी ........................................ २२१

४७. 'तंत्रज्ञानाचे अग्निदिव्य' ........................................ २२५
४८. लोकमताच्या कौलाची दिशा ........................................ २३०
४९. सीता वनवासीच आहे अजून ........................................ २३३
५०. नेपाळमधील शाही शिरकाणाचा इशारा ........................... २३७
५१. ग्रामोद्धारक – शबनम ते संगणक ................................. २४०
५२. सरकारी आतंकवाद ................................................. २४५
५३. 'बिनपरती' ते 'परिवर्तनीय' ........................................ २५१
५४. नर्मदा आंदोलनाची जलसमाधी ..................................... २५५
५५. केल्याने होत आहे रे ............................................... २६१
५६. 'काळ आई'ला 'सोनेरी प्रणाम' ..................................... २६४
५७. धिस् हॅपन्स् ओन्ली इन इंडिया! ................................. २६८
५८. धर्मांतरातील प्रियाराधण ............................................ २७२
५९. प्रत्येकाच्या मनातील 'बंगारू' ...................................... २७७
६०. पंतप्रधानांच्या घोषणेतील चार मोठी आव्हाने ..................... २८२
६१. अटल बिहारी वाजपेयींची नवी तरुणाई ............................ २८५
६२. घातपाती आणि घायकुती ........................................... २८९
६३. लादेन विरुद्ध दाऊद इब्राहीम ...................................... २९६
६४. तिसरे महायुद्ध – जागतिक यादवी ................................. ३०१
६५. इंडियन सरकारी आतंकवाद ......................................... ३०५
६६. सरहद्दीविरहीत तिसऱ्या महायुद्धाच्या
पहिल्या फेरीत सरशी ओसामाची .................................. ३१२
६७. राष्ट्रवादींच्या वल्गना– बहिष्कारासह खुला व्यापार! ............. ३१६

***

# व्यापार करा, युद्ध नको

अमेरिकेचे राष्ट्रपती भारतात येत आहेत. पहिल्या कार्यक्रमाप्रमाणे ते पाकिस्तानला जाणारच नव्हते, त्यामुळे भारतात एक मोठी विचित्र समाधानाची भावना होती. जगातील सर्वांत मोठा सत्ताधारी भारताला भेट देतो आणि पाकिस्तानला देत नाही याचा अर्थ भारताच्या धोरणांची प्रशंसा आणि पाकिस्तानच्या लष्करी सत्तेची आणि आतंकवादी कारवायांची जाहीर निर्भर्त्सना असा लावला जात होता.

अगदी शेवटच्या क्षणी आपल्या कार्यक्रमात फेरबदल करून प्रेसिडेंट क्लिंटन यांनी पाकिस्तानमध्येही काही काळ थांबण्याचा आपला इरादा जाहिर केला. साहजिकच, हिंदुस्थानातील नेतेमंडळीच्या चेहेऱ्यावर अवकळा आली. भेट किती का छोटी असेना, त्यामुळे पाकिस्तानी कारवायांना प्रोत्साहन मिळेल अशी हाकाटी दिल्लीतील सत्ताधाऱ्यांनी सुरू केली. याउलट, क्लिंटन यांचा पाकिस्तानभेटीचा निर्णय म्हणजे भारताला मिळालेला एक मोठा झटका आहे असा हैदोस पाकिस्तानी करू लागले.

पंडित नेहरूंच्या काळापासून अमेरिकेचे माप पाकिस्तानकडे झुकते राहिले आहे. पंडितजींचे धोरण तटस्थतावादी खरे, पण त्यात एक झुकाव सोव्हियेट युनियनच्या प्रभावाखालील समाजवादी राष्ट्रांच्या गटाकडे होता. पाकिस्तान उघड उघडच आग्नेय आशियाच्या संरक्षण करारात (SEATO) सामील झाल्यामुळे पाकिस्तान आणि अमेरिका यांची विशेष दोस्ती होती. बांगलादेशाच्या युद्धाच्या वेळी अमेरिकेचे राष्ट्रपती निक्सन यांनी उघडउघड पाकिस्तानच्या बाजूने पक्षपाताचे धोरण स्वीकारले. अमेरिकेचे चीनबरोबरचे संबंध सुधारू लागले यातही अमेरिकेचा पाकिस्तानकडील कल स्पष्ट होता. रशियाचे सर्वेसर्वा ब्रेझनेव्ह यांनी अफगाणिस्तानमध्ये फौजा घुसविल्यापासून तर अमेरिका-पाकिस्तान

दोस्ती अधिकच मजबूत झाली. रशियन फौजांविरुद्ध लढणाऱ्या गनिमी टोळयांना शस्त्रास्त्रे आणि साधने यांचा पुरवठा पाकिस्तानमार्फतच होऊ शके, त्यामुळे पाकिस्तानच्या हाती मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे आली. त्या मस्तीत पाकिस्तानने काश्मिरमध्ये आतंकवादी कारवायांना प्रोत्साहन दिले. जगभरच्या आतंकवादाला विरोध करणाऱ्या अमेरिकेने पाकिस्तानच्या या धोरणाकडे दुर्लक्ष केले; सद्दामविरुद्ध किंवा लादेनविरुद्ध जितपत कारवाई केली तितपतसुद्धा पाकिस्तानविरुद्ध केली नाही. थोडक्यात, पाकिस्तान अमेरिकेशी पहिल्यापासून अधिक जवळिक साधून आहे.

प्रेसिडेंट क्लिंटन यांच्या काळात या पक्षपाती धोरणात काही फरक घडून येऊ लागला. भारताने पोखरण येथे अणुचाचण्या केल्या, पाकिस्ताननेही जवाबी चाचण्या केल्या. तेव्हापासून, काश्मिर विवादातून जगाला होरपळून टाकणारा संघर्ष तयार होण्याची भीती निर्माण झाली. अमेरिकेने प्रथमच भारताच्या भूमिकेस पाठिंबा दाखवला आणि पाकिस्तानच्या धोरणाबद्दल काहीशी नापसंती दाखविली. अतिरेक्यांच्या कारवायांना विरोध करण्याबद्दल हिंदुस्थान आणि अमेरिका या दोन्ही देशांतील नेतेमंडळी एकसुरात घोषणा करू लागली. गेले काही महिने अमेरिका पाकिस्तानपेक्षा हिंदुस्थानच्या अधिक जवळची आहे असा भास तयार झाला होता. अमेरिकेच्या अध्यक्षांच्या भारतभेटीमुळेतर भाजपा गटातील मुखंडांना जितं मया, जितं मया झाले होते. भारतभेटीस जोडून क्लिंटन पाकिस्तानातही जाणार या घोषणेमुळे या सगळया विजयोत्सवावर पाणी पडले आहे. राज्यकर्त्या पक्षातील काही जहाल मंडळीतर भारताने आता क्लिंटन यांची भेट, काही मुत्सद्दी कारण सांगून, नाकारावी असेही सुचविले आहे.

क्लिंटन यांच्या पाकिस्तानभेटीत तसे वावगे काही नाही. पाकिस्तााानातील लष्करी हुकूमशहांना काही फायदा मिळेल असे काही करणे अमेरिकेलाही परवडणारे नाही. याउलट, अमेरिकेतील पाकिस्तानी जनता ज्यामुळे दुखावेल असेही काही करणे त्यांना करणे शक्य नाही.

पाकिस्तान आणि भारत यांच्या संयुक्त भेटीमुळे, कोणा मध्यस्थाच्या मदतीने काश्मिरप्रश्नावर वाटाघाटी करण्याची वेळ आली तर क्लिंटन यांची त्या कामाकरिता गुणवत्ता अधिक स्पष्ट होईल.

क्लिंटन यांनी आतापर्यंत आयर्लंड आणि इस्रायल यांच्यातील वादात हस्तक्षेप करून समझौते घडवून आणले आहेत. काश्मिर प्रश्नातही काही तोड काढण्यासाठी प्रयत्न करावेत अशी त्यांची फारा दिवसांची इच्छा आहे. भारताला भेट देताना

पाकिस्तानला संपूर्ण टाळून पाकिस्तानी जनतेला दुखावण्यात त्यांना काहीच स्वारस्य असणार नाही.

राजकीय भूमिकेतून पहाणाऱ्यांना क्लिंटन यांची भेट प्रामुख्याने काश्मिर विवाद आणि अण्वस्त्र चाचण्यांवर बंदी घालण्याचा करार (CTBT) यांवर आहे असे वाटते. या भेटीसंबंधीचे सारे तर्कवितर्क अशाच कल्पनेने केले जात आहेत.

भारत-पाकिस्तान भेटीची क्लिंटन यांची विषयपत्रिका यापेक्षा वेगळी असण्याची शक्यता आहे.

अमेरिकेच्या दृष्टीने सद्यःपरिस्थितीत त्यांचे आर्थिक प्रश्न हे काश्मिर-कारगिलपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत. अमेरिका भांडवलवादी राष्ट्रांचे नेतृत्व करते. सर्व देशांतील व्यापार व अर्थव्यवस्था खुली असावी अशी या गटाची तात्त्विक भूमिका राहिली आहे. अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतरही आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करणे जमत नव्हते; अलिकडे जागतिक व्यापार संस्थे (WTO) संबंधी आंतरराष्ट्रीय करारांमुळे जागतिक बाजारपेठ खुली होण्याची शक्यता तयार झाली आहे. या करारांसंबंधी वाटाघाटी चालू असताना अमेरिकेच्या विचारांत जपान आणि युरोप यांच्या व्यापाराचेच प्रमुख स्थान होते. तिसऱ्या जगातील देशांशी व्यापार खुला केल्याने अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला काही धोका संभवेल अशी जाणीवही अमेरिकेतील नेत्यांना आणि अर्थशास्त्रयांना झाली नव्हती. जागतिक व्यापार संघटने (WTO)च्या करारमदारांवर माराकेश येथे सदस्य राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केल्या, त्या सुमारास खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर मोठा घातक परिणाम होण्याचा धोका त्यांच्या लक्षात आला. तिसऱ्या जगात लोकसंख्या मुबलक आहे, मजूर कार्यकुशल आहेत. त्यांच्या वेतनश्रेणी फारच कमी आहेत, एवढेच नव्हे तर श्रमशक्तीच्या पुरवठ्यासाठी लहान मुलांचा, तसेच वेठबिगार पद्धतीचाही उपयोग केला जातो. आधुनिक तंत्रज्ञान नसले तरी पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करून तिसऱ्या जगातील देश अमेरिकेसारख्या श्रीमंत देशांच्या बाजारपेठांत स्वस्त मालाच्या राशी ओतू शकतात. त्यामुळे तेथील उद्योगधंदे मार खातील आणि तेथे बेकारी पसरेल हा धोका त्या सर्वांनाच जाणवू लागला.

जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. जगदीश भगवती यांनी, क्लिंटन यांच्या भारतभेटीत अटल बिहारी वाजपेयी आणि क्लिंटन यांनी प्रामुख्याने जागतिक व्यापार संघटनेच्या करारमदारांत मजुरी आणि पर्यावरण यासंबंधीची व्यवस्था कशी असावी याची चर्चा करावी असे सुचविले आहे. भारताकडे येणाऱ्या

विमानात बसताना प्रेसिडेंट क्लिंटन यांच्या मनात कारगिल, काश्मीर आणि अणुबाँब यांच्या धोक्यापेक्षा खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अमेरिकेत होऊ शकणाऱ्या संभाव्य उत्पातांचे विचार अधिक घोळत असतील. भारतासारख्या देशात मजुरीचे दर कमी आहेत, निदान अमेरिकेसारख्या देशांच्या तुलनेने तरी कमी आहेत. त्यामुळे, स्वस्त मजुरीच्या उत्पादनाने अमेरिकेच्या व्यापारास धोका पोहोचेल ही शक्यता नाकारता येत नाही. मजुरांची परिस्थिती सुधारली पाहिजे, त्यांना माणसासारखे जगता आले पाहिजे यातही काही वाद नाही. पण, ज्या देशात मजुरीचे दर कमी आहेत त्यांच्या विरुद्ध व्यापारी कारवाई करण्याची तरतूद आंतरराष्ट्रीय व्यापार करारात असणे कितपत योग्य आहे हा मोठा वादाचा मुद्दा आहे.

श्रीमंत देशांतील कामगारांच्या प्रतिनिधींच्या लक्षात एक महत्त्वाची गोष्ट येत नाही. हिंदुस्थानातील बऱ्यापैकी कारखान्यांत कामगारांना दिवसाकाठी जास्तीत जास्त १०० ते २०० रुपये रोज मिळतो. अमेरिकेच्या दृष्टिकोनातून हा रोज, म्हणजे दोन ते चार डॉलर प्रतिदिन, अगदीच अपुरा आहे. अशा अपुऱ्या मजुरीच्या साहाय्याने तयार झालेल्या मालाविरुद्ध अमेरिकन कारखानदारीचे संरक्षण झाले पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. चार डॉलरचा रोज, श्रीमंत राष्ट्रांच्या दृष्टीने, माणसाप्रमाणे जगण्यास अपुरा आहे. पण, हिंदुस्थानसारख्या देशांत २०० रुपये प्रतिदिन हा रोज फारच थोड्या भाग्यवंतांच्या वाट्याला येतो. भारतातील ४ ते ५ टक्के संघटित कामगारांनाच अशा प्रकारच्या वेतनांचा लाभ मिळणे शक्य असते. या उलट, बहुसंख्य असंघटित कामगारांचे वेतन ५० ते ७५ सेंट म्हणजे २० ते २५ रुपये इतपतच असते. संघटित कामगारांची वेतनश्रेणी वाढविली तर असंघटित कामगारांच्या पदरात पडणारे वेतन आणखी खाली जाईल. थोडक्यात, मानवाधिकाराच्या नावाखाली, मजुरांची परिस्थिती सुधारावी याकरिता संघटित कामगारांचे वेतन वाढविले तर त्याचे गंभीर दुष्परिणाम खऱ्याखुऱ्या गरीब व असंघटित कामगारांवर मोठ्या भयानक रीतीने होणार आहेत.

जागतिक व्यापार संघटने (WTO)च्या वाटाघाटी लवकरच सुरू होत आहेत. क्लिंटन आणि वाजपेयी यांच्या भेटीत जर का जागतिक व्यापारासंबंधी करारमदारांत मजुरांची परिस्थिती व पर्यावरणाचे रक्षण यासंबंधी काय तरतुदी असाव्यात याविषयी काही ठोस निर्णय झाले तर ते अण्वस्त्रचाचणीबंदीच्या आणि काश्मीर प्रश्न सोडवणुकीच्या पेक्षाही, जगातील साऱ्या देशांच्या साऱ्या लोकांच्या दृष्टीने, अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. या दृष्टीने पाहिले तर क्लिंटन यांनी जाता जाता

पाकिस्तानलाही भेट देण्याचे ठरवावे याचे महत्त्व लक्षात यावे. भारताला भेट दिली म्हणजे जयजयकार आणि पाकिस्तानला भेट दिली तर निषेध व धिक्कार असल्या उथळ विचारांचे प्रभुत्व दोन्हींपैकी कोणत्याच राष्ट्रात राहिले नाही तर या समझोत्याच्या वातावरणात काश्मीर आणि अणुचाचण्यांसंबंधीचे प्रश्न सुटायलाही मदतच होईल.

*दि. १८/३/२०००*

■■

# बुझावी क्लिंटन तेंचि लीळा वदावी

क्लिंटन, बिल क्लिंटन, विल्यम जेफर्सन क्लिंटन किंवा साधे सुटसुटीत बिल म्हणजे जगातील सर्वांत प्रबळ महासत्तेचे राष्ट्राध्यक्ष; ज्याच्या एका शब्दामुळे जागतिक अर्थकारणाची दिशा बदलू शकते आणि ज्याने आज्ञा दिली तर सद्दामसारख्या हुकुमशहाला दाती तृण धरावे लागते; थोडक्यात, जगातील सर्वांत सामर्थ्यवान पुरुष.

१९ मार्चपासून ते २५ मार्चपर्यंत सात दिवस भारतीय उपखंडात क्लिंटन दौऱ्यासाठी आले होते. सात दिवस सर्व दृक्श्राव्य प्रसारमाध्यमांत सर्वांत गाजणारा विषय म्हणजे क्लिंटनयात्रा. १९ तारखेला पालम विमानतळाच्या तांत्रिकी विभागात अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे एअर फोर्स नं. १ हे विमान उतरले तेव्हापासून त्यांची प्रत्येक बारीकसारीक हालचाल सर्व माध्यमे टिपीत होती आणि त्यावर टीकाटिप्पणीही करीत होती. २५ मार्च रोजी मुंबईच्या विमानतळावरून, विमानांची लपाछपी खेळत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष छोट्याशा जेट विमानातून, इस्लामाबादला गेले आणि तेथून मायदेशी जाण्यासाठी रवाना झाले. सगळ्या उपखंडात एकदम शांत, स्तब्ध वातावरण पसरले. तसे म्हटले तर, विशेष नवे असे काहीच घडले नाही. पण, उपखंडातील दोन्ही देशांत क्लिंटनयात्रेच्या पूर्वीचा कालखंड आणि नंतरचा कालखंड असे दोन सरळ विभाग पाडावे इतका फरक पडून आला आहे.

भारतातील जनसामान्यांना क्लिंटन साहेबांचा व्यक्तिगत परिचय फार तोटका आहे. बिल नावाच्या एका शाळकरी मुलाने योगायोगाने प्रेसिडेंट जॅक केनडी यांच्यासमोर आल्यावर आपले चिमुकले हात हस्तांदोलनाकरिता पुढे केले. राष्ट्राध्यक्षांनी काही काळ ते हात हातात घेतले आणि प्रेमळपणे दाबले आणि छोट्या बिलच्या मनात आपणही राष्ट्राध्यक्ष व्हावे ही महत्त्वाकांक्षा तयार झाली.

गव्हर्नर असताना त्यांनी हाताळलेल्या काही प्रकरणांबाबत संशय आणि आरोप यांचे वादळ उठले. मनुष्य एकूण काही निष्कलंक चारित्र्याचा पुतळा नाही अशी त्यांची प्रतिमा.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची पत्नी नेहमीच अतिविशिष्ट व्यक्ती असते. क्लिंटन यांची पत्नी हिलरी स्वतः विद्यापीठात आणि कार्यक्षेत्रांत गाजलेली. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष आपल्या पत्नीकडे अनेक कामांची स्वतंत्र जबाबदारी सोपवितात. तिला अमेरिकेच्या पहिल्या महिला या पलीकडे कॅबिनेट दर्जाचे स्थान आहे. पुढेमागे सौ. हिलरी स्वतःच अमेरिकेच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्षा बनू शकतील काय याबद्दल चर्चा होत असते.

रुबाबदार व्यक्तिमत्व, चेहऱ्यावर खेळणारे थोडे मिष्किल हसू आणि डोळयात जेम्स् बॉण्डच्या पद्धतीची घायाळ करणारी नजर. टेलिव्हिजनच्या या युगात क्लिंटन यांची लोकप्रियता केवळ त्यांच्या रूपानेसुद्धा साध्य झाली असती.

मध्यंतरी मोनिका लेवेन्स्कीचे प्रकरण निघाले. स्वतः क्लिंटन यांना एका लहान मुलीशी केलेल्या चाळयांचा कबुलीजबाब द्यावा लागला. मी जे केले ते चूक होते असे जगासमोर उभे राहून सांगावे लागले. पण तरीही, त्यांच्याविरुद्धचा बडतर्फीचा ठराव फेटाळला गेला, एवढेच नव्हे तर, या सगळया काळात त्यांच्या अश्लील चाळयांची तपशीलवार वर्णने छापली जात असताना त्यांच्या लोकप्रियतेचा निर्देशांक वाढत राहिला. हे कसे काय झाले? मोठे कोडे आहे!

एका बाजूस आपल्या व्यक्तिगत सहाय्यकांशी अभद्र चाळे करणारा राष्ट्रपती इराकच्या सद्दामची खोड मोडण्याकरिता त्या देशावर क्षेपणास्त्रांचा प्रचंड मारा करण्याचा आदेश देतो आणि ओसामा बिन लादेन यांच्या हस्तकांनी काही घातपाती स्फोट घडवून आणल्यावर त्यांच्या अतिरेकी छावण्यांवर आधुनिक क्षेपणास्त्रांचा मारा करण्याचाही निर्णय देतो.

क्लिंटन यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. आयर्लण्डमधील कॅथॉलिक व प्रोटेस्टंट यांच्यामधील रक्तलांछित संघर्ष वर्षानुवर्षे चालला होता. इस्रायल आणि अरब यांच्यातील खाईतर वर्षानुवर्षे पेटत राहिलेली. या प्रकरणांत क्लिंटन यांचे वेगळेच रूप प्रकट झाले. दोन्ही प्रकरणांत उभय पक्षांच्या नेत्यांबरोबर बसून काही एक समझोत्याचा आराखडा त्यांनी तयार केला आणि तो अमलात आणण्याकरिता अमेरिकेची सर्व ताकद कामास लावली. इस्रायल आणि अमेरिका यांचे फार जुने घनिष्ठ संबंध आहेत. अमेरिकेतील ज्यू नागरिकांचा अमेरिकन राजकारणावर मोठा प्रभाव आहे. त्यावरही मात करून क्लिंटन यांनी इस्रायलच्या

अध्यक्षांना दुराग्रह सोडून देण्यास भाग पाडले.

क्लिंटन यांच्याच कारकिर्दीत व्यापाराच्या जागतिकीकरणाचा कालखंड सुरू झाला आणि गणकयंत्राच्या तंत्रज्ञानाचेही युग झपाट्याने पुढे आले.

हैदराबाद येथे केलेल्या भाषणात क्लिंटन यांनी म्हटले, 'माझ्या लहानपणी चिप म्हणजे बटाट्याचा खाण्याचा पदार्थ होता आणि डिस्क म्हणजे पाठीच्या मणक्याचा एक भाग होता; पण गेल्या काही वर्षांत या सर्व संज्ञांचे अर्थच पालटून गेले.'

सेल्युलर फोनच्या साहाय्याने जगातील कोणतीही व्यक्ती कोठूनही पाहिजे त्या व्यक्तीशी कोठेही ताबडतोब संपर्क साधू लागली ही गोष्ट काही वर्षांपूर्वी अरबी भाषेतील सुरस कथांतील हकिकतींइतकी चमत्कारिक वाटली असती. आता हे प्रत्यक्ष हरदिन डोळ्यासमोर घडते आहे. समाजवादाच्या पाडावानंतर अमेरिका एकमेव महासत्ता राहिली आणि सारे जग व्यापार आणि आधुनिक संचारतंत्रामुळे पहिल्यांदा अगदी छोटे बनले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून क्लिंटन यांच्यावर इतिहासातील एका अत्यंत महत्त्वाच्या कालखंडात मोठी जबाबदारी येऊन पडली.

भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधांत वर्षानुवर्षे अमेरिका आणि पाकिस्तान यांचे विशेष सलोख्याचे संबंध राहिले आहेत. SEATO चे सदस्य राहिलेले पाकिस्तान आणि ऊठसूट रशियाची भलावण करणारा, अगदी रशियाच्या हंगेरी, अफगाणिस्तान यांवरील आक्रमणाचेही समर्थन करणारा भारत अशा परिस्थितीत अमेरिकेचे पाकिस्तानच्या बाजूने झुकते माप काहीसे समजण्यासारखे आहे.

आता रशिया एक दुय्यम महासत्ता बनली; भारततही नेहरू परंपरेतील कवित्वबुद्धीच्या मुत्सद्देगिरीचे युग संपले आणि जसवंतसिंग यांच्यासारख्या परखड परराष्ट्रमंत्र्याच्या हाती निर्णयाची जबाबदारी गेली. तेवढ्यात पोखरणच्या अणुचाचण्या झाल्या; पाकिस्तानने त्याला प्रत्युत्तर दिले. कारगिलवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानचा खोडसाळपणा जगजाहीर झाला; पण त्याचबरोबर, काश्मीर साऱ्या जगाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक ज्वालाग्राही भांडार बनले. दोनही देश अणुचाचण्यांवर बंदी घालण्यास नाराज आणि दोन्ही देशांत अणुबॉम्बचा प्रत्यक्ष उपयोग करण्याइतकी असमंजस नेतृत्वाची मुबलकता. भरीस भर म्हणून तिसऱ्या जगातील हे दोन मोठे देश जगात बहुराष्ट्रीय खुल्या व्यापाराची पद्धती आणण्यास नाराज. अशा परिस्थितीत क्लिंटन यांची उपखंडाची भेट ठरली. एक दिवस बांगला देश, पाच दिवस भारत आणि पाच तास पाकिस्तान. पाकिस्तानची भेट

ठरलीच नसती तर भारतातील नेतेमंडळींना आनंद झाला असता; पाच तासांची भेट ठरल्यानंतर कशी जिरली भारताची अशी काहीशी प्रतिक्रिया पाकिस्तानी पुढाऱ्यांची!

पारिजातकाच्या फुलांवरून सत्यभामा आणि रुक्मिणी यांचे वितुष्ट झाले आणि श्रीकृष्ण दोघींची समजूत काढण्यास अंत:पुराकडे निघाला असा हा प्रसंग. दोघी क्रुद्ध सवतींचे बुझावी हरि तेंचि लीळा वदावी असे वामन पंडिताने सुरस वर्णन केले आहे. श्रीकृष्ण क्लिंटन यांची भारतीय उपखंडाच्या भेटीच्या सात दिवसांतील सर्व कामगिरी या दृष्टिकोनातून समजून घेतली पाहिजे.

क्लिंटन आल्या आल्या बांगला देशला गेले. एका इस्लामिक राष्ट्रातील यशस्वी लोकशाही पद्धतीची त्यांनी वाखाणणी केली. शिक्षण आणि पर्यावरण यांकरिता भरभक्कम देणगी जाहीर केली. बांगलादेशमधील नागरिकांच्या मनांतील एक अभिमानस्थळ त्यांनी नेमके हेरले – लोकशाही यशस्वी करणारे इस्लामिक राष्ट्र आणि साऱ्यांची वाहवा मिळविली.

भारतात आले, राष्ट्रपतींनी केलेल्या स्वागतसमारंभात अतिरेक्यांच्या कारवायांबद्दल आणि पाकिस्तानच्या छुप्या आक्रमणाबद्दल भारताशी सहमती स्पष्ट केली, राजघाटावर जाऊन श्रद्धांजली वाहिली. एव्हाना सारे भारतीय मोनिका लेवेन्स्की प्रकरणातील सारी बदनामी पार विसरून गेले होते. संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढील क्लिंटन यांचे भाषण म्हणजे वर्षानुवर्षे बारकाईने अभ्यास करावा अशी करामत होती. समोर दुसऱ्या देशाचा राष्ट्राध्यक्ष बोलतो आहे, की आपल्याच शासनाची तरफदारी करणारा कोणी वक्ता बोलतो आहे असा संभ्रम पडावा इतके क्लिंटन साहेब अभिनिवेशाने बोलले. पाकिस्तानला थोडे फटकारले. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हिंदुस्थानात येतो, भारताचा पक्ष धरतो, पाकिस्तानला दटावतो म्हणजे भारतीयांच्या अभिमानस्थानाची तार कुशलतेने छेडणेच होते! क्लिंटन यांनी साऱ्या सांसदांवर भूल टाकली असे साऱ्या वर्तमानपत्रांनी म्हटले.

प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी कॅसानोव्हा याची, त्याच्या अनेक स्त्रियांशी असलेल्या प्रकरणांबद्दल मोठी ख्याती होती आणि आहे. अगदी सामान्य रूपाच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या कॅसानोव्हावर इतक्या रूपगर्विता भाळल्या कशा याचे रहस्य स्वत: कॅसानोव्हानेच सांगितले आहे. प्रत्येक स्त्रीचा – अगदी सामान्यातील सामान्य स्त्रीचासुद्धा – एक अहंकारबिंदू असतो. कोणाला आपल्या नाकाचा, कोणाला डोळ्यांचा, कोणाला केसांचा, कोणाला अंगयष्टीचा, कोणाला चालण्याचा, कोणाला हसण्याचा तर कोणाला बोलण्याचा... जितक्या स्त्रिया तितकी

अहंकारस्थळे. ज्याला नेमके अहंकारस्थळ हेरता येते आणि त्याबद्दल अंत:करणपूर्वक प्रशंसा करता येते तो पुरुषोत्तम कोणाही स्त्रीचे मन जिंकू शकतो. क्लिंटन यांची या क्षेत्रातील कर्तबगारी जगप्रसिद्धच आहे. राजस रूप, ओघवती भाषा, प्रभावी वक्तृत्व आणि कॅसानोव्हा तंत्र यांच्या मिलाफामुळे लेवेन्स्की प्रकरणाच्या ऐन चिखलफेकीतूनही ते सुखरूप सुटले. बांगला देश आणि भारतातील सर्व लोकांवर अशीच मोहिनी त्यांनी घातली. राजकारणात मोहिनीतंत्राचा वापर करणारा हा कोणी नुसताच Philanderer आहे की काय अशी संभावना डोकावते न डोकावते तोच क्लिंटन यांची पाकिस्तानयात्रा सुरू झाली. एअर फोर्स नं. १ ने जाण्याऐवजी साध्या विमानातून जाणे, त्यात पाकिस्तान फारशी सुरक्षित भूमी नसल्याचे सूचित करणे आणि नंतर, पाकिस्तानातील लष्करी हुकूमशाही, काश्मिरातील हस्तक्षेप आणि अणुबॉम्बच्या चाचण्या यांच्याबद्दल अगदी परखड शब्दांमध्ये दटावणे हे अगदीच वेगळे रूप एकदम समोर आले.

श्रीकृष्णानेही सत्यभामा आणि रुख्मिणी, दोघींनाही समजावले. खरी बाजू कोणाची, खोटी कोणाची याचा निवाडा करण्याचा त्याने प्रयत्न केला नाही. क्लिंटन यांची करामत त्यापलीकडची. भारतात प्रवास करताना त्यांनी मोहिनीतंत्राचा वापर केला आणि सायबराबादच्या भाषणात भारत जणू काही अमेरिकेच्या तोडीचा गणकतंत्रज्ञानी देश आहे अशी भलावण केली. जिकडे जावे तिकडे त्यांची स्तुती करावी या न्यायाने न वागता पाकिस्तानमध्ये खडीखडी सुनावली. या सर्व लीळा पाहता बिल विल्यम जेफर्सन क्लिंटन हा अनेक गुण आणि कौशल्याने विनटलेला महापुरुष आहे हे स्पष्ट होते. अमेरिकेतील निवडणुका जवळ आल्या आहेत. क्लिंटन यांचे वारसदार निदान क्लिंटन यांच्या इतक्या बहुविध गुणांनी संपन्न असतील, तरच सध्याच्या युगातील एकधुरी तंत्रज्ञानावर झेपावत असलेल्या जगाला काही आशा बाळगता येईल.

*दि. ३०/४/२०००*

■■

# मास्तर ते रिंगमास्टर

जवळ जवळ ६० वर्षांपूर्वीची गोष्ट. बेळगाव येथील ठळकवाडीतल्या एका मराठी माध्यमाच्या शाळेत मी दुसरीत होतो. घरी केसरी यायचा. त्यात महायुद्धाच्या इतस्ततः पसरलेल्या ज्वाळा असा ठळक मथळा असलेला एक स्तंभ असे. त्यातल्या इतस्ततःचा नेमका अर्थ काय तो समजत नसे. त्या वेळी महायुद्ध चालू होते एवढे या आठवणीवरून नक्की!

एका दिवशी सकाळी माझ्या वर्गाचे शिक्षक आमच्या घरी आले. कानडी पद्धतीचे दुटांगी धोतर, नवा असताना गर्द निळ्या रंगाचा असावा असा कोट, सडसडीत बांधा, उंच शरीरयष्टी. आम्ही कोठेतरी उनाडक्या करीत फिरत होतो; आईने हाक मारून घरात येण्याचे फर्मावले. शिक्षक पाहून नवल वाटले; भीती वाटल्याचे काही आठवत नाही. आमच्या शाळेत फक्त हेडमास्तरांचाच काय तो दरारा असे; बाकीचे शिक्षक सारे स्वभावाने गरीब आणि परिस्थितीने गांजलेले. विद्यादानाचे महापुण्य साऱ्या अडचणी सोसून, खऱ्याखुऱ्या निष्ठेने ते चालवीत.

उद्यापासून सकाळी उंडगायला जायचे नाही, पाटकर मास्तर शिकवणीसाठी येणार आहेत, जरा अभ्यासाकडे थोडे लक्ष द्या. तुम्हाला काही वडिलार्जित जमीन मिळायची नाही; अभ्यासात वर आलात तर ठीक, नाही तर भीक मागायची पाळी येईल. आईचा प्रेमळ फतवा!

मी पाचसहा वर्षांचा असेन; पण त्या वेळीही आपल्याला शिकवणी ठेवत आहेत यात काही भयंकर अपमान आहे असे स्पष्ट जाणवल्याचे आठवते आहे. मला शिकवणी कशाला? मी विचारले. हेतू, सुटता आले तर या बेडीतून सुटण्याचा असावा. त्याच वर्षी मी शाळेत जाऊ लागलो होतो. घरी मोठा भाऊ बाळ एक वर्ष वरती; त्याच्या बरोबरीने राहिल्याने त्याचेही धडे पाठ झालेले. त्यामुळे, थोडी परीक्षा घेऊन रजपूत मास्तरांनी मला एकदम दुसरीतच बसवले;

तिसरीतही बसवायला ते तयार होते, पण आमच्या मोठ्या बंधूंनी एकदम निकराचा सूर काढला, शरदला माझ्या वर्गात बसवले तर मी शाळा सोडून देईन. सर्वांचा नाइलाज झाला आणि मी दुसरीत जाऊ लागलो.

दर शनिवारी सप्ताहिक परीक्षा असायची. मास्तर बेरजा-वजाबाक्यांचे आकडे फळयावर लिहून द्यायचे आणि आम्ही उत्तरे पाटीवर लिहायची. बेरजेकरिता मास्तरांचे पाचसहा आकडे फळयावर लिहून होईपर्यंत मी उत्तर लिहून टाकायचो. शिकवणी ही मठ्ठ मुलांकरिता असते अशी त्यावेळची पक्की समजूत होती. मग, मीही निकराचा सूर काढला. आईने म्हटले, शिकवणी बाळकरिता आहे; तुझ्याकरिता नाही. पण, मास्तर एवढे येणार आहेत, शिकवणार आहेत; जरा बसलास शेजारी तर काय बिघडणार आहे? थोडेसे पुढचे शिकलास तर पुढच्या वर्षी तुला एकदम चौथीत बसवू. या लालचीने मी तयार झालो. मास्तरांनी अंगठा तुटलेल्या वहाणा पायांत घातल्या आणि दरवाज्याच्या चौकटीतून लांब लांब पावले टाकीत ते निघून गेले.

आईला मी केलेल्या निषेधाबद्दल थोडी काळजी वाटत असावी. मला बाजूला घेऊन ती म्हणाली, तुला शिकवणीची गरज नाही हे मला कळते, पण मास्तरांना गरज आहे. तुझ्या वडिलांना ४० रुपये पगार आहे तरी आपली किती ओढाताण होते? शाळेमध्ये मास्तरांना महिन्याला ८ रुपये पगार आहे, त्यांनी जगावं कसं? माझी शाळा खासगी. महिन्याला १ रुपया फी द्यावी लागे. बाकीच्या म्युनिसिपालिटीच्या शाळा फुकट असत. अलीकडे इस्त्रीचा स्वच्छ गणवेश घालून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना जसा आपला एक थाट वाटतो तसे काहीसे आम्हालाही वाटत असावे.

परिस्थिती ओढगस्तीची असली तरी त्या काळच्या ब्राह्मण कुटुंबात सर्रास असणारा अभ्यासाचा आग्रह आमच्याकडे थोडा अधिकच असायचा. घरी कायम एकतरी वारकरी मुलगा जेवायला असायचा. अभ्यासात थोडी हयगय झाली तरी आईचे बोलणे ठरलेले, 'तो पाहा, कोणी नाही तरी विद्या संपादन करण्यासाठी किती कष्ट करतो आहे? नाही तर तुम्ही! चारी ठाव खायला मिळते आहे म्हणून मस्ती चढते!' पाठ्यपुस्तकात 'गरीब बिचारा माधुकरी' ही कविता आली त्या वेळी अनवाणी पायाने, डोक्याचा गोटा केलेले आणि सोवळयात ताट ठेवून माधुकरी मागणारे विद्यार्थी इतके असत, की ती कविता वाचताना पोटात गोळा उठे; एवढेच नाही, तर डोळयाला पाणीसुद्धा येई. गरजू विद्यार्थ्याला वार देणे या प्रमाणेच गरजू मास्तरांना मदत व्हावी म्हणून आम्हाला शिकवणी ठेवण्याचा

आईचा मनोदय होता.

'गरीब बिचारे, फक्त १ रुपयामध्ये दररोज एक तास घरी येऊन शिकवणी करणार आहेत आणि बाळबरोबर तूही बसलास तर आपल्याला ती शिकवणी काही फार महाग नाही.'

शिक्षक आणि त्यातल्या त्यात प्राथमिक शिक्षक म्हणजे माझ्या लहानपणी सर्वांच्याच आदराचा आणि करुणेचा विषय असायचा. त्यानंतर १० वर्षांनी मुंबईला असताना प्राथमिक शिक्षकांच्या मागण्यांकरिता प्राचार्य दोन्दे यांनी दीर्घ काळ उपवास केला होता. तोपर्यंत तरी, महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षक ही सालस सज्जनांची जात होती. कारकुनाची नोकरी मिळाली तर शिक्षक मोठ्या आनंदाने नोकरी सोडून जायला तयार असत; पण अशी संधी काही थोड्या भाग्यवंतांनाच लाभायची. सेवा आणि ज्ञानदान या पलीकडे कोणताही अधिकार नसलेली अशी ही मंडळी.

बेळगावच्या आठवणींतील माझा मोठा भाऊ आता बाळासाहेब झाला आहे. दिल्लीजवळ त्याच्या मुलानेही एक कारखाना काढला आहे. कारखाना काढणे आणि चालविणे ही सगळया देशात मोठी कठीण कामगिरी झाली आहे. उत्तरेत तर आपल्यापेक्षा अधिक, कारखाना चालविणाऱ्यांना आसपासच्या गुंडांचा त्रास, युनियनच्या पुढाऱ्यांचा त्रास. कोणत्याही गोष्टीसाठी काहीही परवाना मिळवायचा झाला तर संबंधित अधिकाऱ्याकडे जाऊन किंवा एखाद्या नेत्याकडे जाऊन काही नाकदुऱ्या काढाव्या लागतात; त्यासाठी त्यांना संतुष्ट करावे लागते. एकूणच मोठा मनस्तापाचा मामला. नको ती कारखानदारी आणि नको या उर्मट सत्ताधाऱ्यांपुढे वाकणे असे सगळयांना होऊन जाते.

बाळासाहेबांची सून जवळच्याच एका प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे. फरिदाबादला त्यांच्या घरी मुक्कामाला गेलो म्हणजे आमच्या सूनबाईंची शाळेत निघतानाची तयारी अन् जामानिमा पाहून मी चेष्टाही करत असतो, शाळा आहे का शिक्षिकांची सौंदर्यस्पर्धा आहे? अलीकडे मी तेथे उतरलो तेव्हा एक चिंतेचा विषय निघाला होता. कारखान्यांच्या आसपासची काही मंडळी खोडसाळपणे कारखान्यांत घुसून काही उपद्व्याप करीत होती. आमच्या कुटुंबीय मंडळीत मी असलो, की माझ्याकडे सगळेचजण एका वेगळयाच दृष्टीने पहातात. सर्व संसारतापांतून मुक्त झालेला भाग्यवान अशी काहीशी त्यांची दृष्टी असते. गुंडांच्या उपद्रवाचा आणि बँकेच्या दिरंगाईचा प्रश्न आमचे बंधुराज कसा काय हाताळणार याबद्दल मला कुतुहल वाटतच होते. माझ्या पुतण्यानेच उत्तर पुरविले, आता

आम्हाला असल्या गोष्टींचा काही फारसा त्रास होत नाही. मानसी (शिक्षिका सून) ला सांगितले, की ती सगळे प्रश्न पटकन सोडावते. काम कलेक्टर कचेरीत असो, पोलिस खात्यात असो की आणखी कुठे; शिक्षकांचा निरोप गेला, की एरव्ही दांडगेगिरीकरिता प्रसिद्धी असलेले अधिकारीही अगदी नमून वागतात आणि कामे करून टाकतात. अगदी बालवर्गात प्रवेश मिळवायचा झाला तरी शाळेतल्या शिक्षकांशी ओळख असणे उपयोगी असते. आणि, एरव्हीही मुलांच्या अभ्यासावर देखरेख ठेवणे इत्यादी कामे करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांविषयी आदर आहे, एवढेच नव्हे तर भीती आहे.

कोणीही कितीही मोठा असो, त्याची मुले नाही तर नातवंडे शाळेत असतातच. शिक्षकांनी शब्द टाकला तर पटकन काम होऊन जाते. मला १९४१ सालच्या, तुटक्या अंगठ्याच्या वहाणा पायात सरकविणाऱ्या पाटकर मास्तरांची आठवण झाली; त्यांच्या चरितार्थाला मदत व्हावी म्हणून महिन्याभराची १ रुपयाची शिकवणी ठेवणारी माझी आईही आठवली.

मी सध्या राहतो त्या खेडेगावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांची बदललेली परिस्थिती मला चांगली माहीत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेतही प्राथमिक शिक्षक होणे पैशाच्या दृष्टीने मोठे भाग्याचे मानले जाते. शिक्षण क्षेत्रातील पदव्या किंवा पदविका मिळवून जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक झाले, की स्वर्गाला हात पोहोचले अशी सर्वसाधारण भावना आहे. त्यात एखाद्या शिक्षिकेशी विवाह झाला म्हणजे विचारायलाच नको. मग दोघांनाही जन्मभर, शक्य तो एका जागी राहता येईल अशा बदल्या मिळविणे आणि त्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांची मर्जी राखणे एवढाच काय तो आयुष्यभरचा कार्यक्रम राहतो. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाविषयी विचारायलाच नको! इंग्रजी आणि गणिताचा बट्ट्याबोळ. अलीकडे गावातील एक-दोन मुले एस्.एस्.सी. झाली असे ऐकतो.

स्वातंत्र्यानंतर शेती कनिष्ठ, व्यापार मध्यम आणि नोकरी श्रेष्ठ झाली. त्यामुळे, बेळगावचे पाटकर मास्तर ते आंबेठाणचे मांडेकर गुरुजी एवढे मोठे परिवर्तन झाले. पण, त्यापलीकडे आमच्या फरिदाबादच्या सूनबाई. शाळा सुसज्ज, शिक्षणाचा दर्जाही उत्कृष्ठ आणि त्यांची सामाजिक प्रतिष्ठाही फार मोठी. एवढा मोठा बदल स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांत दुसऱ्या कोणत्या क्षेत्रात काही जाणवला नाही.

*दि. ५/४/२०००*

■■

# धार्मिक प्रार्थना

साऱ्या हिंदुस्थानात कोणत्याही गावी मुक्काम झाला तर सकाळी जाग येते ती कर्ण्यातून कानावर आदळणाऱ्या नमाजाच्या बांगेने किंवा कर्णकर्कश आरत्यांच्या कल्लोळाने. गणेशोत्सवाच्या दहा दिवसात तर आरत्या, भजने, कीर्तने यांच्या कल्लोळाने परीक्षार्थी विद्यार्थी शहर सोडून इतरत्र राहायला जातात आणि अनेक नागरिक गणपती, दुर्गादेवी, दांडिया यांच्या काळात शहरात न राहिलेलेच बरे असे म्हणतात. मध्यंतरी देवळांतील आरत्या हा महाराष्ट्रातील राजकारणात एक महत्त्वाचा वादविषय ठरला होता. गेली वीस वर्षे तरी विविध धर्मांच्या प्रार्थना आणि आरत्या हा वादाचा विषय ठरला आहे. कोणीही खासगी जागेत, बाहेरच्या जगाला तोशीस पोहोचणार नाही अशा तऱ्हेने पूजा, प्रार्थना, धार्मिक विधी केले तर त्याबद्दल काही वाद निर्माण होत नाही; पण आधुनिक उच्चध्वनिक्षेपकांच्या साहाय्याने ईश्वरापर्यंत आपली प्रार्थना पोहोचविणे आणि त्याबद्दल चढाओढीच्या भावनेने अधिकाधिक कल्लोळ माजविणे सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांना बाधा आणते काय? सर्वसाधारण नागरिकांना या प्रार्थनाकल्लोळापासून काही संरक्षण कायद्याने मिळू शकते का? हा भारतात चर्चेचा विषय झाला आहे.

गेल्या आठवड्यात मी अमेरिकेत गेलो होतो. तेथे याच प्रश्नाचे एक वेगळे स्वरूप पहायला मिळाले.

अमेरिकेत फूटबॉल हा मोठा लोकप्रिय खेळ आहे. अगदी विद्यापीठ पातळीच्या सामन्यांनादेखील प्रचंड गर्दी जमते. दोनही संघांचे समर्थक शेकडो तऱ्हांनी आपापल्या संघांना प्रोत्साहन देतात आणि प्रतिस्पर्धी संघाला नाउमेद करण्याचा प्रयत्न करतात. रंगीबेरंगी आकर्षक कपडे परिधान केलेल्या चिअर लीडर्स (Cheer Leaders) मुलींचे ताफेच्या ताफेही आपापल्या संघाला प्रोत्साहन देत असतात.

एके दिवशी अचानक एक नवीनच गोष्ट घडली. सामन्यातील दोन्ही संघांची

बरोबरीची चुरस चालली होती. सामन्याचा वेळ संपत आला होता. उरलेल्या वेळात कोणता संघ आघाडी घेतो याबद्दल मोठे तणावाचे वातावरण तयार झाले होते. प्रोत्साहनाच्या आरोळ्या, त्याबरोबर बॅण्ड, वाद्ये इत्यादींच्या आवाजाने सगळा कोलाहल माजला होता. तेवढ्यात एका संघाचे समर्थक उभे राहिले आणि त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध रीतीने प्रार्थना म्हणण्यास सुरुवात केली. प्रार्थना दोनच मिनिटे चालली असेल; पण त्यामुळे वातावरणात पराकोटीचा बदल घडून आला. प्रोत्साहनासाठी आजपर्यंत वर्षानुवर्षे वापरण्यात आलेले सारे प्रकार मर्कटचेष्टा वाटू लागल्या. ज्यांच्या बाजूने प्रार्थना म्हटली गेली त्या संघाने उरलेल्या वेळात दोन गोल केले आणि सामना जिंकला.

साराच प्रकार मोठा विलक्षण! अमेरिकेत शासन हे निखळ निधार्मिक आहे. न्यायालयाच्या एका निर्णयाप्रमाणे, सरकारी अनुदान मिळणाऱ्या साऱ्या शाळांत आणि महाविद्यालयांत कोणत्याही धर्माची प्रार्थना म्हणता येत नाही. फूटबॉलच्या सामन्यातील प्रार्थनेचा लोकविलक्षण प्रकार घडला आणि एक नवीनच प्रश्न उभा राहिला – सरकारी अनुदान मिळणाऱ्या शाळांच्या सामन्यांत किंवा सरकारने भरविलेल्या क्रीडास्पर्धांत प्रोत्साहनाचे एक साधन म्हणून प्रेक्षकांनी धार्मिक प्रार्थना वापरणे कितपत योग्य आहे?

इंग्रजी अमलाच्या काळात भारतात क्रिकेटचे पंचरंगी सामने खेळले जात. हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, युरोपियन इत्यादी धर्मपंथांचे स्वतंत्र संघ असत आणि त्यांच्यात मोठे अटीतटीचे सामने होत. या सामन्यांच्या वेळी हर हर महादेव, अल्ला हो अकबर अशा धर्तीच्या धार्मिक घोषणा होत. पण, सामन्यांवरून कोठे जातीय दंगल उद्‌भवली नाही. फाळणीच्या आधी जातीय दंगली उफाळून येऊ लागल्या तसे पंचरंगी सामने बंद झाले.

अमेरिकेत असाच प्रश्न उभा केला गेला. आज एका धर्माच्या अनुयायांनी प्रार्थना म्हटली, उद्या दुसऱ्या कोणत्या धर्मीयांनी त्यांची प्रार्थना म्हटली तर थोड्याच दिवसांत फूटबॉलचे मैदान प्रार्थनायुद्धाचे रणक्षेत्र होण्यास वेळ लागणार नाही, जातीय तेढ वाढीस लागेल या भीतीपोटी हे प्रकरण न्यायालयात गेले. सार्वजनीक जागी प्रार्थनेचा उपयोग करणे योग्य आहे का? त्याला शासनाने बंदी घालणे योग्य होईल काय? अशी बंदी घातली तर त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांना बाधा येते काय? असे सारे प्रश्न न्यायालयासमोर उभे केले गेले. मी ज्या दिवशी अमेरिकेत पोहोचलो त्याच दिवशी याविषयी न्यायालयाचा निर्णय जाहीर झाला. सार्वजनिक जागी प्रार्थनांचा उपयोग कोणत्याही एका संघाचे मनोधैर्य

वाढविण्याकरिता करणे अनुचित आहे असा स्पष्ट निर्णय न्यायालयाने दिला.

भारतात सध्यातरी खेळांच्या मैदानांवर हा प्रश्न उभा राहिलेला नाही. भारत आणि पाकिस्तान यांचा एकदिवसीय क्रिकेटचा सामना असला म्हणजे वातावरण मोठे तंग असते. अगदी जिंकू किंवा मरू अशा कसोशीने सामना खेळला जातो. लांबवरून प्रवास करून, महागडी खर्चीक तिकिटे काढून प्रेक्षक जमतात. आपल्या बाजूची सरशी झाली म्हणजे आनंदप्रदर्शनाचा धिंगाणा घालतात आणि दुसऱ्या पक्षाचा पाणउतारा हरेक प्रकारे करतात. पण, सचिन किंवा सौरभने षट्कार मारला म्हणजे 'हर हर महाऽदेव किंवा जय बजरंग बली' अशा घोषणा होत नाहीत किंवा जावेद अख्तरने कोणाची दांडी उडविली म्हणजे 'अल्लाऽ हो अकबर' किंवा 'इल् इलाहिया रसूऽलल्ला' अशा गर्जना होत नाहीत. तशा त्या होऊ लागल्या तर त्यांवर बंदी घालण्यात येईल, हे उघड आहे; पण साऱ्या देशाच्या क्रीडाक्षेत्रात कोणताही सामना चालू नसताना विविध धर्मांच्या प्रार्थनांची, केवळ आवाज चढवून लोकांचे लक्ष वेधून आपले अस्तित्व जाहीर करण्याची सकाळसंध्याकाळ जी स्पर्धा चालू आहे त्याबाबत प्रकरण न्यायालयात जाईल किंवा त्याबाबत काही निर्णय होईल अशी शक्यता काही दिसत नाही. उलट, शाळांमध्ये प्रार्थना म्हटल्या जाव्यात, पाठ्यपुस्तकांत धर्मशिक्षणाचा अधिकाधिक प्रभाव असावा या दृष्टीने फर्माने सुटत आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष क्लिंटन यांच्या भेटीच्या काळात भारत आणि अमेरिका दोघेही लोकतंत्रवादी देश, दोघेही अतिरेकी चळवळींच्या विरोधात, दोघेही आधुनिक युगातील गणकयंत्राच्या तंत्रज्ञानात आघाडीवर अशी मोठी भलावण झाली. दोन्ही देशांत समानता विपुल आहे, त्याचबरोबर दोघांत फरकही आहेत. भविष्यकाळात समान गुण महत्त्वाचे ठरतात का दोघांतील फरकाचे विषय? कोणी सांगावे?

■■

# घटना

१४ एप्रिल म्हणजे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी. बाबासाहेबांचे अनुयायी दरवर्षी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. यंदा उत्साहाला विशेष उधाण आले होते. गावागावात आणि त्याहूनही शहरातील वस्त्यावस्त्यांतून सभा होत होत्या, घोषणा होत होत्या. या वर्षीचा विषय थोडा वेगळा. भारतीय जनता पक्षाने सर्व घटनेची फेरतपासणी करण्यासाठी एक समिती नेमली. त्याला अनेकांचा विरोध झाला. स्वतः राष्ट्रपतींनीही गेल्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस केलेल्या भाषणात घटना कमी पडली यापेक्षा आपण कमी पडतो अशी भूमिका घेतली. राष्ट्रपती सहसा मंत्रिमंडळाने लिहून दिलेले भाषण वाचतात. राष्ट्रपतींनी या वेळेस हा संकेत मोडून शासनाच्या अधिकृत धोरणाविरुद्ध जाहीर भूमिका घेतली. वाजपेयी शासनाने आपली भूमिका सोडली नाही. घटना पुनर्रचना समितीची जुळवाजुळव होऊ लागली.

घटनेची पुनर्रचना करणे म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या शिल्पाकृतीस धक्का लावणे अशी दलित नेत्यांनी त्यांच्या अनुयायांची समज करून दिली आहे आणि तेही बिचारे, सनातनी कर्मठ ब्राह्मणांच्या पोथीनिष्ठ आवेशाने घटनेत शब्दाचादेखील बदल झाला तर तो बाबासाहेबांच्या स्मृतीचा अनादर केल्यासारखे होईल, असे मोठ्या पोटतिडकीने मांडू लागले कालची बाबासाहेबांची पुण्यतिथी या विषयानेच गाजली.

विरोधी पक्षाच्या नेत्या आणि काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनीही १४ एप्रिलचा मुहूर्त साधून नागपूर येथे चैत्यभूमीवर जाहीर मेळावा घेतला. घटनेची पुनर्रचना करण्याच्या योजनेला त्यांनी विरोध केला. योजनेवर कडाडून हल्ला केला, एवढेच नाही तर, बाबासाहेबांचे वारंवार नाव घेऊन, त्यांचा अपमान करण्यासाठीच केवळ घटनेची पुनर्रचना करण्याचे सरकारने

ठरविले आहे असा कांगावा केला. सासूबाई इंदिरा गांधी भाषणात विरोधी पक्षांवर परदेशी हस्तक वगैरे असल्याचे आरोप करीत तेव्हा त्यांच्या आवाजाला खोटेपणा धकवून नेण्याची जी एक धार येई तिचा प्रत्यय सोनिया गांधींच्या भाषणवाचनातही आला. घटनेच्या पुनर्रचनेचा प्रश्न आता विवेकबुद्धीचा राहिला नसून भावनेचा आणि अभिनिवेशाचा झाला आहे.

भारताचे पहिले गणराज्य कोसळले आहे आणि दुसऱ्या गणराज्याची स्थापना होणे निकडीचे झाले आहे असे मी स्पष्टपणे १९८७ मध्येच मांडले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील समाजवादाचा प्रयोग फसला, नियोजनामुळे अर्थव्यवस्था ढासळली, देशात फुटीर प्रवृत्ती बळावू लागल्या आणि जाती व धर्म यांच्या आधाराने मते पदरात पाडून घेणाऱ्यांचा जोर वाढू लागला. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेळच्या परिस्थितीत मोठा फरक पडला, त्यामुळे दुसऱ्या गणराज्याची स्थापना व्हावी असे मी सुचविले होते.

पण, त्याबरोबरच एक मुद्दा स्पष्ट केला होता, की दुसऱ्या गणराज्यासाठी नवीन घटना समितीची आवश्यकता नाही. स्वातंत्र्योत्तर काळात कॉँग्रेस पक्षाच्या शासनाने घटनेला धुडकावून लावून तिची पायमल्ली केली, त्यामुळे देश अधोगतीला गेला. उदाहरणार्थ, भारतीय घटनेत नियोजन मंडळाचा कोठे उल्लेखसुद्धा नाही आणि तरीही नियोजन मंडळ तयार झाले, त्याचा विस्तार झाला, ते फोफावले आणि सर्व अर्थव्यवस्था त्याच्याच कब्जात आली. नियोजन मंडळ दूर करण्यासाठी घटनेत दुरुस्ती करण्याची गरज नाही, घटना कसोशीने अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यानंतर नोकरी श्रेष्ठ झाली, नोकरशहांचा बडेजाव वाढला. लाल फितीचे वर्चस्व दूर करण्याकरिता घटना दुरुस्तीची काहीच आवश्यकता नाही, त्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्तीची तेवढी गरज आहे.

पहिले गणराज्य संपले, दुसरे सुरू होऊन गेले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापर्यंत फ्रान्स देशात पाच गणराज्ये झाली, पाच नवीन घटना तयार झाल्या. आपल्या देशात औपचारिकरीत्या दुसऱ्या गणराज्याची घोषणा झाली नाही; पण समाजवाद कोसळला. एका राजकीय पक्षाचे निर्विवाद बहुमत संसदेत राही ना. आघाड्यांची सरकारे बनू लागली, ती वारंवार कोसळू लागली. तीन वर्षांत तीन वेळा लोकसभेच्या निवडणुका घ्याव्या लागल्या. या सगळ्यांचा अर्थ असा, की १९५१ सालची परिस्थिती राहिलेली नाही. आवश्यक असेल तर, नव्या परिस्थितीस अधिक श्रेयस्कर असे काही बदल घटनेत आवश्यक आहेत काय? याचा विचार करण्यामध्ये बाबासाहेबांच्या स्मृतीचा कोणताही अपमान नाही. बाबासाहेबांचा

अनादर होतो आहे हा त्यांच्या अनुयायांचा आणि काँग्रेस पक्षाचा संधिसाधू कांगावखोरपणा आहे. दलितांकरिता राखीव जागांची तरतूद आहे. तिची मुदतवाढ करण्यात आली तेव्हा कोणाही दलित नेत्याने स्वत: बाबासाहेबांनीच राखीव जागांच्या योजनेस निश्चित कालमर्यादा घालून दिली होती, असा युक्तिवाद केला नाही. या विषयावर काँग्रेसची भूमिका तर इतकी तकलादू आहे, की त्या विषयी बोलण्यालिहिण्यातही तथ्य नाही. भारतीय प्रजासत्ताकाची घोषणा झाल्यानंतर दीड वर्षाच्या आत काँग्रेस पक्षाने तिची मोडतोड चालू केली, खासगी मालमत्तेचा हक्क खलास करून टाकला, शेतकऱ्यांना जमीनविषयक कायद्यांविरुद्ध न्यायालयात दादही मागता येऊ नये अशी तरतूद करणारे ९ वे परिशिष्ट घटनेत घुसडले. एक नाही, दोन नाही, एकोणऐंशी वेळा घटनेत दुरुस्त्या करून घटनेतील निम्म्याअधिक तरतुदी संपविल्या त्या काँग्रेस पक्षाने. एकदा पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली आणि दुसऱ्यांदा सरदार स्वर्णसिंग यांच्या अध्यक्षतेखाली असे दोन वेळा घटनेची सम्यक् पाहणी करणाऱ्या समित्या काँग्रेसनेच नेमल्या. अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयानंतर केवळ खुर्ची टिकविण्यासाठी, अकांडतांडव करून इंदिरा गांधी यांनी घटनेस अक्षरश: पायदळी तुडविले. हा असला इतिहास पहाता, काँग्रेसचे मांजर उंदीर खाऊन खाऊन कंटाळल्यानंतर काशीयात्रेस जाण्यास निघाले, हे उघड आहे.

घटना समितीत भाषण करताना बाबासाहेब आंबेडकर यांनी अमेरिकन घटनेचे एक शिल्पकार जेफर्सन यांचा आधार घेऊन, एक फार महत्त्वाचा मुद्दा मांडला होता. देशाची घटना ही काही सकाळसंध्याकाळ फेरबदल करण्याची गोष्ट नाही. कोणत्याही कायद्यात संशोधन करण्यासाठी ज्या तरतुदी असतात त्यापेक्षा घटनेत बदल करण्यासंबंधीच्या तरतुदी थोड्या अधिक कसोशीच्या असल्या पाहिजेत हे उघड आहे. या दृष्टीने घटना बदलासाठी विशेष बहुमताची गरज, राज्यविधानसभांची मान्यता आणि राष्ट्रपतींची संमती अशी व्यवस्था ठेवलेली आहे. पण, घटनेत बदल करणेच नाही अशी पोथीनिष्ठा तयार झाली तर घटनेच्या आधाराने, मरून गेलेल्या पिढ्यांचे राज्य नवीन पिढ्यांवर चालू राहील. बाबासाहेब आंबेडकरांचे आजचे अनुयायी खुद्द आंबेडकरांचेही लिखाण फारसे वाचत नाहीत, नाही तर घटनेच्या पुनर्पाहणीची योजना म्हणजे बाबासाहेबांचा अपमान आहे असला सनातनी ब्राह्मणी कांगावा त्यांनी केला नसता.

कोणीही व्यक्ती निर्दोष असत नाही आणि कोणताही ग्रंथ सदासर्वकाळ प्रमाण राहू शकत नाही. ग्रंथप्रामाण्य आणि व्यक्तिपूजा यांची कास दलित नेते

धरणार असतील तर ते आंबेडकरांच्या महान कार्यास डांबर फासत आहेत हे उघड आहे.

आंबेडकरी घटनेत काहीच दोष नव्हते असे कोणीही जाणकार म्हणणार नाही. उदाहरणार्थ, मूळ घटनेत पंचायत राज्यासंबंधी काहीही तरतूद नाही. बाबासाहेबांना खेडेगावातील व्यवस्था म्हणजे गटारगंगा वाटे. त्यांच्या गणराज्याचा पाया गाव नव्हता, राज्य होते. हा दोष बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार दूर झाला.

अशी आणखी काही उदाहरणे वाढविता येतील; पण तो मुद्दा महत्त्वाचा नाही. भारतातील निवडणुकीची पद्धत म्हणजे संसदेत आणि विधानसभांत सवर्ण समाजाला लोकासंख्येतील त्याच्या प्रमाणापेक्षा अधिक बहुमत मिळावे अशी व्यवस्था आहे. त्यामुळेच काँग्रेसची मनमानी ५० वर्षे टिकू शकली.

भारतीय जनता पार्टीचे सरकार आल्यानंतर सर्व संदर्भरेषा बदलल्या.

त्यामुळे, त्यांना घटनादुरुस्ती करून स्वत:ची सोय बघण्याची घाई व्हावी हे समजण्यासारखे आहे. दलित नेत्यांचा आक्रोश आणि त्यांचा अनुनय करण्याची काँग्रेसची नीती हेही समजण्यासारखे आहेत.

हा वाद अधिक चिघळण्याआधी कसा मिटविता येईल? स्वतंत्र भारत पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात यासंबंधी एक प्रस्ताव काही वर्षांपूर्वीच मांडण्यात आला. हा प्रस्ताव सर्व संबंधितांना मान्य व्हावा. प्रस्तावाचा सारांश असा :

"भारतीय प्रजासत्ताकाची घोषणा झाल्यानंतर घटनेची मोडतोड करण्यासाठी करण्यात आलेल्या ७९ पैकी ७८ दुरुस्त्या रद्द करण्यात याव्यात; फक्त पंचायत राज्यासंबंधीची दुरुस्ती स्वीकारण्यात यावी. म्हणजे, पंचायत राज्य हा विषय सोडल्यास आंबेडकरी घटनेची पुन:प्रतिस्थापना व्हावी, नियोजन मंडळासारख्या घटनाबाह्य व्यवस्था संपवून टाकाव्यात. भविष्यकाळात आवश्यकतेनुसार सध्याच्या घटनेतील तरतुदींप्रमाणे दुरुस्त्या यथाक्रम घडविल्या जाव्यात. काही विद्वान न्यायाधीशांनी घटनेची मूलभूत चौकट बदलता येणार नाही असे तर्कट रचले होते. आवश्यक ते बहुमत आणि मान्यता मिळाल्यास घटनेत कोणतेही परिवर्तन करता येईल अशी व्यवस्था असावी."

स्वतंत्र भारत पक्षाच्या या प्रस्तावावर जाहीर चर्चा व्हावी म्हणजे विनाकारणी वितंडवाद आणि रक्तपात टाळला जाऊ शकेल.

■■

# सुखी माणसाचा सदरा

शाळेतल्या पाठ्यक्रमाच्या पुस्तकात एक धडा होता – सुखी माणसाचा सदरा. कोण्या एका राजाच्या वैद्याने सुखी माणसाचा सदरा घालावयास मिळाला तर राजाची व्याधी दूर होऊन तो खडखडीत बरा होईल असे निदान केले. राजाची सारी फौज सुखी माणसाच्या शोधात निघाली. पण, कोणीही प्रजाजन आपण सुखी असल्याचे सांगेना. अखेरीस, सकाळपासून कष्ट करून घामाने निथळणारा, थंड सावलीला बसलेला एक लाकूडतोड्या भेटला, 'मी सुखी आहे,' तो म्हणाला. शिपायाने त्याच्याकडे त्याच्या सदऱ्याची मागणी केली; पण त्याच्याकडे अंगात घालायलासुद्धा सदरा नव्हता, राजाला देण्याची गोष्ट दूरच राहिली.

'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' अशी तुकोबांचीही वाणी आहे. सुखाचा आणि संपन्नतेचा काही संबंध नाही अशी आमच्या लहानपणी समजूत होती.

आता ही समजूत बदलत आहे; पैसा हे सुखाचे साधन आहे अशी सार्वत्रिक धारणा आहे. जिकडे जावे तिकडे सारे दुःखीच दिसतात. कोणाकडे पैसा नाही, कोणाला नोकरी नाही, कोणी गुंड आणि दादा यांच्या धमकावण्यांनी भयभीत झाला आहे, तर कोणी भ्रष्टाचारी पुढाऱ्यांच्या पक्षबदलू प्रवृत्तीमुळे सरकारे पडत गेली तर देशाचे कसे होईल याच्या चिंतेत पडला आहे. देशांच्या संपन्नतावार यादीत आपल्या देशाचा क्रमांक शेवटच्या गटात आहे. निरक्षरता वाढते आहे. यंदा तर सर्वदूर दुष्काळ पसरला आहे. प्यायच्या पाण्यासाठी लोक वैराण भटकत आहेत आणि पाण्याची भीक मागत आहेत.

अशा परिस्थितीत भोवताली कोणी आपण 'सुखी' असल्याची द्वाही फिरवीत नाही हे समजण्यासारखे आहे. आजचा एखादा तुकोबाराया सुखदुःखाचे मोजमाप

करायला निघाला तर 'बहुतेक सारे दुःखाने गांजलेले' अशाच निष्कर्षाला आला असता.

विश्वास ठेवा, ठेवू नका; प्रत्यक्ष आकडेवारी याच्या अगदी उलट आहे. बाजारपेठेचा अभ्यास करण्यात तज्ज्ञ मानल्या जाणाऱ्या Roper Starch या कंपनीने गेल्या वर्षी जगी सर्व सुखी असा कोण आहे? याचा जगभर शोध घेतला. त्यांच्या अहवालानुसार, भारतीय पृथ्वीतलावरील सर्वांत सुखी लोकांपैकी प्रमुख आहे; भारतीयांपेक्षा सुखी, थोड्याफार प्रमाणात, फक्त अमेरिकन लोक आहेत; फ्रान्स इंग्लंडमधील नागरिकही भारतीयांपेक्षा कमी सुखी आहेत.

या अहवालामुळे सर्वांत मोठा हलकल्लोळ माजला आहे. दूरदर्शनवर सकाळी नित्यनेमाने प्रवचने सांगणारे बाबा आणि महाराज या अहवालाचा दाखला देऊन आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व भक्तगणाच्या मनावर ठसवू लागले आहेत. भारतीय खरोखरी जगातील सर्व लोकांत सुखी आहेत काय? पाहणी करणाऱ्या कंपनीने अनेकांच्या मुलाखती घेतल्या; तुमच्या कामाबद्दल तुम्ही समाधानी आहात काय? तुमच्या मिळकतीबद्दल तुम्ही खूश आहात काय? तुमच्या कुटुंबातील लोकांशी तुमचे संबंध आनंददायी आहेत काय? धर्म आणि देव यांच्या आयुष्यातील स्थानाबद्दल तुम्हाला संतोष वाटतो का? अशा साऱ्या प्रश्नांची उत्तरे गोळा केली, ती गणकयंत्रात घालून त्यांवर बेरीज, गुणाकार आदी संख्याशास्त्रीय प्रक्रिया केल्या आणि अहवाल तयार झाला.

बहुसंख्य भारतीयांनी आपण सुखी असल्याचे का सांगितले असावे?

एक कारण, आत्मप्रौढी हे असू शकते. भारतीय माणूस घरात खायला दाणा नसला तरी कणगीला 'मोत्यासारख्या ज्वारी'ची पोती लागल्याची प्रौढी चावडीवरील गप्पांत मिरवितो. 'आपल्या दुःखाची जाहिरात करून काय मिळणार आहे? उलट, आपण दुःखी असल्याची कबुली दिली तर औंदा पोरीचं लगीन जमायला वांधे होतील' असा सुज्ञपणाही भारतीयांत भरपूर आहे.

दुसरेही एक कारण असू शकते! 'खाली पाहून चालावे' ही फार जुनी शिकवण आहे. 'बूट नसल्याने मी दुःखी होतो, पण जेव्हा पायच नसलेला माणूस पाहिला तेव्हा त्याच्या तुलनेने आपण कितीतरी बरे याची जाणीव होऊन आनंद वाटला' असे तुलनेने समाधान मानायला भारतीयांना भरपूर वाव आहे. नोकरी नाही, उद्याची शाश्वती नाही अशा माणसालाही झोपडपट्टीतील कंगाल, भणंग, दरिद्री, आजाराने पिडलेल्या माणसांशी तुलना करता 'आपले बरे चालले आहे,' असे समाधान वाटून घेता येते. गरिबी, कंगालपण आणि दुःख जागोजाग

ओसंडत आहे. तेव्हा, 'तुलनेने आपले बरे चालले आहे' असा संतोष मानण्यास येथे भरपूर वाव आहे.अमेरिकेसारख्या श्रीमंत देशात घरचे उरलेसुरले शिळेपाके भीक म्हणून मिळाल्याबद्दल तोंड भरून आशीर्वाद आणि दुवा देणारी प्रजाच फारशी नाही; सर्वसामान्य अमेरिकन नागरिकाने खाली कोणाकडे पाहून संतोष मानावा?

भारतीयांच्या संतोषाला ऐहिक आधार फारसा नाही. मग, भारतीयांचा सुखसंतोष हे त्यांच्या प्राचीन आध्यत्मिक परंपरेचे फळ आहे काय? अहवालावरून तसे दिसत नाही. भारतीय माणूस इंग्लिश किंवा फ्रेंच माणसापेक्षा लौकिक बाबतीत अधिक संतुष्ट असल्याचे सांगतो. याउलट स्थिती कुटुंब आणि धर्मसंस्था यांच्याबद्दल.

अमेरिकेत निम्मे विवाह घटस्फोटाने संपतात; आत्महत्या आणि मादक द्रव्यांचे सेवन यांचे प्रमाण भरपूर आणि तरीदेखील, अहवालाच्या निष्कर्षानुसार अमेरिकन नागरिक आपल्या कुटुंबातील जिव्हाळयाबद्दल भारतीयांपेक्षा अधिक सुखी आहेत. देव आणि धर्म ही तर भारतीयांची मोठी निष्ठेची स्थाने; पण अहवालाचा निष्कर्ष अगदी वेगळा आहे. पाश्चिमात्य जगातील माणूस धर्म आणि परमेश्वर यांना अधिक महत्त्वाचे स्थान देतो. आता, अहवालाच्या या निष्कर्षाचा अन्वयार्थ लावायचा कसा? दरिद्री भारतीय त्याच्या आर्थिक स्थितीविषयी संतुष्ट! आणि कुटुंबातील जिव्हाळयाबद्दल असंतुष्ट! आणि सर्व गोळाबेरीज करता जगातील लोकांत भारतीय दुसऱ्या क्रमांकाने सुखी?

अहवालाच्या निष्कर्षात काही तथ्य असते तर परदेशी दूतावासांच्या समोर तेथे जाऊन स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या भारतीयांच्या झुंबडी दिसल्या नसत्या. पाहणी करणाऱ्या निरीक्षकांना दिलेली तोंडी उत्तरे काहीही असोत, भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता महाराजांनी पटवून दिल्यावर गच्च भरलेल्या मंडपातील श्रोतृवृंद कितीही मोठा टाळयांचा कडकडाट करीत असो; 'आपण सुखी आहोत काय?' या प्रश्नाचे उत्तर भारतीय वाचेने देत नाहीत, हात वर करून देत नाहीत; शक्य होईल तेव्हा, शक्य होईल तेथे देश सोडून निघून जातात – एका अर्थाने भारतीय आपले खरे मत पायाने स्पष्ट करतात.

महात्मा जोतिबा फुले यांनी हिंदू धर्मग्रंथांतील चमत्कारिक घटनांची एका वाक्यात वासलात लावून टाकली – असल्या खल्लड ग्रंथांत तर्कसंगती ती काय शोधायची? ब्रह्मदेवाला चार तोंडे, शरीराच्या प्रत्येक अवयवातून त्याला गर्भधारणा होते आणि आपल्याच मुलीच्या मागे तो कामपिसाट होऊन लागतो. सत्य आणि

शास्त्र शोधायला जाण्यात मतलब काय?

निवडणुकांच्या निकालांविषयी अंदाज बांधणाऱ्या तज्ज्ञांबद्दल काही वर्षांपूर्वी बऱ्यापैकी आदर होता; बिहार विधानसभेच्या गेल्या निवडणुकांनंतर तो पार संपुष्टात आला.

गेली काही वर्षे संयुक्त राष्ट्रसंघातील एक संस्था आर्थिक संपन्नतेच्या कक्षांच्या पलिकडे जाऊन व्यापक मानवी विकासाच्या निर्देशांकांचे आकडे प्रसिद्ध करीत आहे. या विकास-निर्देशांकांमुळे गावोगावच्या अर्ध्याकच्च्या पंडितांचे फार फावले आहे. कोणीही उठावे, संख्याशास्त्राच्या आणि समाजशास्त्राच्या अकटोविकट ज्ञानाच्या आधारे काहीही पाहणी करण्याचा घाट घालावा. असल्या कामांसाठी भरपूर निधी मिळतात, पैशाचा तुटवडा नाही, नावापरी नाव होते, पैसे मिळतात आणि अशा प्रकारे प्रसिद्धी-पुरुष व्हायला मिळते, या लालचीने असले खल्लड उपक्रम हाती घेतले जातात.

या विषयातील विज्ञान शुद्ध आणि स्पष्ट आहे. माणसाच्या कोणत्याच भावनांचे मोजमाप करणे अशक्य आहे; ना सुखाचे, ना दुःखाचे. समाधानाचीसुद्धा गणना करणे शक्य नाही. भुकेल्या माणसाने भाकरीचा एक तुकडा खाल्ला तर त्याला प्रचंड संतोष मिळतो; आणि भूक भागल्यानंतर तो खातच राहिला तर त्याला मिळणाऱ्या समाधानाचे प्रमाण कमी कमी होत जाते. एकाच माणसाच्या वेगवेगळ्या परिस्थितीतील भावनांची तुलना कदाचित् शक्य असेल; पण, पहिला घास खाणाऱ्या 'अ'चे समाधान आणि दहावा घास खाणाऱ्या 'ब'चा संतोष यांची तुलना अशक्य आहे. या सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट गोष्टीमुळे सारे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि समाजवादी नियोजन ढासळून पडले.

विचार आणि भावना व्यक्ती अनुभवते, समूह नाही. समाजवादाच्या पाडावाचा हा धडा तळागाळापर्यन्त पोहोचत नाही म्हणून आनंदाचे, एवढेच काय, आध्यात्मिक उंचीचे मोजमाप घेऊ पाहणारे डॉन क्विग्झोट अनेक झाले, अनेक आहेत आणि अनेक होतील.

*दि. ९/५/२०००*

■■

# ससा लागे लांडग्यापाठी

मागील आठवड्यात वर्तमानपत्रांतले (३ मे २०००) महत्त्वाचे मथळे ओरडून सांगत होते की, शेअर बाजारातील किमती धाडकन कोसळल्या. वित्तमंत्र्यांनी अंदाजपत्रकात ज्या ज्या वस्तूंच्या किंमती वाढविल्या त्या सगळया कमी कराव्या याबद्दल लोकसभेत मोठा धिंगाणा होणार आहे अशी बातमीही ठळकपणे मिरवून गेली. पश्चिम भारतात सर्वत्र पाण्याच्या तुटवड्याने आणि दुष्काळाने रौद्र स्वरूप धारण केले आहे. २१व्या शतकाच्या गोष्टी हरघडी ऐकू येतात. नवीन सहस्रकात भारत कोणती देदीप्यमान शिखरे गाठू शकेल याविषयी बढाया मारल्या जातात. यंदाच्या दुष्काळाने या सगळ्या बढाईखोरांच्या थोबाडीत मारून हिंदुस्थान अजूनही गरीब देश आहे, पावसाने जरा डोळे वटारले तर मरणाची वेळ येऊन जीव कासावीस होतो हे स्पष्ट केले.

या सगळ्या बातम्या मोठ्या महत्त्वाच्या; पण त्यांचा परिणाम फार काळ टिकणारा नाही. शेअर बाजारातील किमती चढतील उतरतील, लोकसभेत धिंगाणे चालू राहतील. पहिला पाऊस आला, की दुष्काळाच्या भयाणतेची आठवणसुद्धा कोणाला रहाणार नाही. एका घटनेचा परिणाम मात्र दीर्घ काळ टिकणारा आणि सगळ्या जगभर जाणवणारा असा होणार आहे. या घटनेसंबंधीची बातमी फारशी कोठे झळकली नाही. पत्रकार कुत्रा माणसाला चावल्याच्या बातम्या देत नाहीत; माणूस कुत्र्याला चावला तर काही जगावेगळे घडले म्हणून बातम्या छापतात. पण, त्यांनीसुद्धा या घटनेकडे दुर्लक्ष केले. घटना माणसाने कुत्र्याला चावण्याची नाही. विक्रमादित्य राजाला राजधानीसाठी जागा शोधता शोधता, एक ससा लांडग्याच्या मागे लागला आहे आणि लांडगा भेदरून पळत सुटला आहे असे दृश्य दिसले. आजची खरी महत्त्वाची घटना सशाने लांडग्याला हुसकावून लावावे अशा प्रकारची आहे, पाकिस्तानातील.

साऱ्या देशांत कडव्या मुल्लांचा प्रभाव पहिल्यापासूनच मोठा जबरदस्त. त्यात अफगाणिस्तानमध्ये रशियन आक्रमणालाही थोपवून मागे सारणाऱ्या तालिबानच्या शौर्यगाथांनी सगळे वातावरण भारून गेले आहे. तालिबान जे जे करतील ते योग्य आणि श्रेष्ठ. तालिबानने बायकांना बुरखा घेण्याची सक्ती केली, त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली. मग काय? आधीच उल्हास, त्यातून फाल्गुन मास!

कथा घडली ती लाहोरच्या विद्यापीठात. एक दिवस अचानक अस्सल अफगाणी ठगांचे सलवारखमीस पेहेनलेले आणि दाढी वाढविलेले जामियाँ–ए–इस्लामचे कार्यकर्ते जिकडे पहावे तिकडे दिसू लागले. कुलगुरू राहिले बाजूला; विद्यापीठ प्रशासनालाही कोणी विचारे ना. जामियाँ–ए–इस्लामचे कार्यकर्ते ठरवतील तोच नियम आणि तोच कायदा असे झाले. सर्व धर्ममार्तंडांचे मुख्य शौर्य काय ते बायकांवर बंधने घालण्यातच दिसते. लाहोरमध्येही तेच घडले. जामियाँ–ए–इस्लामने फर्मान काढले की, विद्यापीठातील मुलींनी बुरखा घेतला पाहिजे, एवढेच नव्हे तर, केससुद्धा मोकळे सोडता कामा नयेत. विद्यापीठाच्या आवारात तीस सार्वजनिक टेलिफोन केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रावर पाटी लागली – विद्यार्थिनींना टेलिफोन केंद्र वापरायची बंदी आहे. (जामियाँ–ए–इस्लामच्या हुकुमावरून) टेलिफोन केंद्र चालविणाऱ्या कोणाचीही हा हुकूम मोडण्याची हिंमत नव्हती. एकाने प्रयत्न केला. त्याच रात्री त्याच्या केंद्राची मोडतोड, नासधूस झाली. त्यानंतर कोणाचीच आपल्या केंद्रावर मुलींना प्रवेश देण्याची हिंमत झाली नाही. विद्यापीठाच्या आवारात कोणाही विद्यार्थिनीने पुरुष विद्यार्थ्याशी बोलता कामा नये असेही फर्मान सुटले. जामियाँ–ए–इस्लामचे कार्यकर्ते हातात कात्र्या घेऊन फिरू लागले. कोणा विद्यार्थिनीने केस मोकळे सोडलेले आहेत असे दिसले, की जामियाँ–ए–इस्लामचे वीर कात्रीने ते कापून विद्रूप करू लागले. हे दाढीवाले कार्यकर्ते दिसले, की मुली घाबरून जवळच्या खोलीचा आसरा घेऊन लपून राहू लागल्या.

आणि एक दिवस सशालाही आपल्यावरच्या जुलुमजबरदस्तीचा वीट आला. झाले असे :–

एक विद्यार्थिनी एका पुरुष विद्यार्थ्याकडून गणितातील एका प्रश्नाची अडचण सोडवून घेत होती. जामियाँ–ए–इस्लामच्या कार्यकर्त्यांनी ते पाहिले आणि त्या विद्यार्थ्याला त्यांनी बेदम बदडले. कितीएक विद्यार्थिनींचे केस कापले तरी चीड न आलेल्या विद्यार्थिनी या प्रकरणाने उसळून उठल्या. विद्यापीठाच्या पूर्ण आवारात

मिरवणुकी काढून त्या घोषणा देऊ लागल्या. एका दिवसात आमची सारी भीती पळून गेली, एका विद्यार्थिनीने सांगितले, आता पाहा, जिकडे तिकडे बुरखा न घेता, आपल्या सर्व केसांचे सौंदर्य खुलविणाऱ्या केशरचना करून आनंदाने विद्यार्थिनी वावरताना दिसतात.

आज ही घटना लहान दिसते; पण या 'ठिणगी'चा 'वणवा' होऊन जगभरच्या सर्व इस्लामी देशांत तो पसरला तर जगाचा इतिहास पालटण्यास सुरुवात होईल. भारतासारख्या देशातही या घटनेचा मोठा परिणाम होईल.

हिंदुस्थानचे आजही दोन विभाग आहेत. उत्तरेत बिहार, ओरिसा इत्यादी राज्यांत गेले तर रस्त्यांवर महिला क्वचितच आढळतात. एखाददुसरी आढळलीच तर मळकेफाटके कपडे घालून, आपला चेहरा पदरात लपवून पायाच्या अंगठ्याकडे पाहत पाहत चालणारी अशी आढळते. तेच, दक्षिणेत केरळ, तामिळनाडू अशा राज्यांत गेले तर तिथे मुली केसांमध्ये सुवासिक फुलांचे गच्च गजरे माळून आनंदाने हसत खेळत, निमज्जाव सर्वत्र वावरताना दिसतात. पुरुष जितका मागासलेला, दरिद्री तितका तो आपल्या स्त्रीला आपल्याहीपेक्षा अधिक अवनत अवस्थेत ढकलण्याचा प्रयत्न करतो – धर्म कोणताही असो.

लाहोर विद्यापीठातील प्रकरण पाकिस्तानसारख्या मुसलमान देशात घडले; पण ते हिंदुस्थानातही घडू शकते. व्हॅलेंटाईन दिनाचा उत्सव साजरा करणाऱ्या मुलांमुलींवर हल्ला करणारे विश्व हिंदू परिषदेचे गुंड आणि लाहोर विद्यापीठातील जामियाँ–ए–इस्लामचे पुंड यांच्यात तसा फरक काहीच नाही.

लाहोरच्या घटनेत आणखी एक मोठा अर्थ लपलेला आहे. समान नागरी कायदा व्हावा अशी सर्व हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि पक्ष यांची मागणी आहे. हिंदू समाज स्त्रियांचा आदर करतो, त्यांना देवतेसमान वागवतो आणि मुसलमान समाजात मात्र त्यांच्यावर अन्यायाचे कडे कोसळत असतात. तस्मात्, समान नागरी कायदा करून मुसलमान स्त्रियांनाही त्यांच्या हिंदू भगिनींच्या बरोबरीने हक्क मिळाले पाहिजेत असा समान नागरी कायद्याच्या पुरस्कर्त्यांचा आव असतो.

प्रत्यक्षात असे दिसते, की समान नागरी कायद्याचा खटाटोप ज्यांच्याकरिता चालतो त्या मुसलमान स्त्रियाच या कायद्याला विरोध करतात. त्यांना स्वातंत्र्य नको आहे असे नाही; पण, समान नागरी कायद्याचा पुरस्कार हिंदुत्ववादी करू लागले, की उघडपणे त्यांच्या सुरात सूर मिसळणे मुसलमान स्त्रीला शक्य राहत नाही.

लाहोरच्या घटनांनी एक सिद्ध केले, की मुसलमान स्त्रियाही माणसे आहेत,

त्यांनाही स्वातंत्र्याची तहान आहे. आवश्यक तर त्या स्वत: उभ्या राहून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करू शकतात. हिंदुत्ववाद्यांच्या अभिनिवेशामुळे त्यांच्या मार्गात अडचणीच काय त्या उभ्या राहतात.

विक्रमादित्याच्या राजधानीच्या जागी ससा लागे लांडग्यापाठी हा चमत्कार घडला, तोच चमत्कार लाहोर विद्यापीठाच्या आवारातही घडतो आहे.

*दि. १६/५/२०००*

■■

# अनिवासींना गगन ठेंगणे

अमेरिकेतील अनिवासी भारतीय मनोज शामलन यांच्या कथेवर आधारित आणि त्यानेच दिग्दर्शित केलेला चित्रपट The Sixth Sense हा ऑस्कर पारितोषकांच्या यादीत आहे. या चित्रपटाने अनेक उच्चांक पार केले आहेत. पटकथेसाठी डिस्ने कंपनीने शामलन याला २५ लाख डॉलर्स (रुपये १० कोटींच्या वर) दिले, एवढेच नव्हे तर त्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारीही त्याच्यावर सोपविली. प्रकाशित होताच चित्रपटाने एक हजार कोटी रुपयांचा गल्ला कमविला. मनोज शामलन, वय वर्षे २९, भारतातून अमेरिकेत जाऊन राहिलेल्या डॉक्टर जोडप्याचा मुलगा; शाळाकॉलेजांत सतत पहिल्या क्रमांकावर राहिलेला. त्याने यशस्वी डॉक्टर व्हावे असे त्याच्या आईवडिलांचे स्वप्न. पारंपरिक शिक्षणक्रम सोडून त्याने एकदम सिनेमा या विषयावरील अभ्यासक्रमच निवडला तेव्हा आईवडील दुःखी झाले, चिंताग्रस्त झाले आणि आज, आपण स्वप्न तर पहात नाही ना असा त्यांना प्रश्न पडत आहे. अमेरिकेतील प्रत्येक अनिवासी भारतीय मनोजच्या चित्रपटास ऑस्कर पारितोषिक मिळावे यासाठी मनोमन प्रार्थना करीत आहे.

अमेरिकेतील प्रत्येक भारतीयाच्या मनात आपल्या बुद्धीने, कर्तृत्वाने वा प्रतिभेने सर्व अमेरिका जिंकावी असे एक स्वप्न उराशी बाळगून जतन केलेले असते. त्या स्वप्नाचे मनोज शामलन एक प्रतीक बनला आहे.

हे काही एकमेव उदाहरण नाही. माझा स्वतःचा पुतण्या अमोल जोशी याने इंटरनेटला बोलते केले आहे. (अधिक माहितीसाठी पाहा www.BVocal.com). गणकयंत्राच्या क्षेत्रात बिल गेट्स्‌नंतरची ही सर्वात मोठी भरारी मानली जाते. आपला प्रकल्प त्याने पुढे मांडला तेव्हा जागच्या जागी त्याला ४.५० कोटी डॉलर्सचे भांडवल लोकांनी उभे करून दिले. कालच या वेबसाइटवरून मी

पाहिले, की त्याला आणखी ४.५० कोटी डॉलर्सचे भांडवल मिळाले आहे. माझा अमेरिकेतील भाऊ हिंदुस्थानात वस्त्रोद्योग क्षेत्रातील इंजिनीअर होता. मी संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्वित्झर्लण्डमधील नोकरीला रामराम ठोकून हिंदुस्थानात परत आलो त्याच सुमारास तो अमेरिकेत गेला. तेथे गेल्यानंतर त्याला अनेक आपत्तींना आणि व्याधींना तोंड द्यावे लागले. त्याची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाल्याचे ठरले. दहा वर्षे तो डायलिसिसवर राहिला. त्यानंतर, म्हणजे दहा वर्षांपूर्वी एका मृत व्यक्तीच्या मूत्रपिंडांचे आरोपण करण्यात आले. औषधांचा प्रचंड मारा झाल्यामुळे कदाचित्, इतर व्याधी उपटल्या. हृदयावरही शस्त्रक्रिया झाली. इतक्या व्याधींच्या आपत्तींनी हिंदुस्थानात कोणीही पार हतबल, निराश झाला असता. त्याची नियमित आणि कसोशीने देखभाल करण्यात माझ्या धाकट्या वहिनीने जे काम केले त्याबद्दल तिची गणना प्रातःस्मरणीय सतींमध्येच करायला पाहिजे. एवढ्या धामधुमीत, अमेरिकेमध्ये वस्त्रोद्योग अभियांत्रिकीला फारसा वाव नाही हे लक्षात येताच माझ्या भावाने गणकयंत्राचा अभ्यास केला. त्या क्षेत्रातही तो झपाट्याने वर चढला. आज तो IBM या विश्वविख्यात कंपनीच्या आशिया खंडातील विकास प्रकल्प विभागाचा प्रमुख आहे. आठवडाभर आज हाँगकाँग, उद्या चीन अशी त्याची भ्रमंती चालू असते. आठवड्यातून एकदोन दिवस, आताकांतारापेक्षा भयाण झालेल्या घरी परतल्यावर सकाळपासून संध्याकाळपर्यंत बागकाम, घरातील दुरुस्त्या, भारतीय संगीताच्या मैफली, नाटकांचे प्रयोग यांत तो गढून गेलेला असतो. स्थानिक समाजातील तरुण मुलांकरिता तो फूटबॉलचा एक संघही चालवितो.

अनिवासी भारतीयांनी अमेरिकेत केलेल्या दिग्विजयाच्या कथा घरोघर ऐकायला मिळतात. गेल्या वर्षभरात अमेरिकेतील TIME साप्ताहिकाने या विषयावर दोन खास अंक काढले आणि शेकडो कर्तबगार भारतीयांची नावे जगासमोर आणली. मातृभूमीत बुद्धीला वाव मिळत नाही म्हणून अमेरिकेत निर्वासित झालेल्या भारतीय शास्त्रज्ञांनी नोबेल पारितोषक जिंकण्याचा विक्रम वारंवार केला आहे. हर गोविंद खुराणा हे एक उदाहरण; अर्थशास्त्रात अमर्त्य सेन हे अगदी अलीकडचे उदाहरण.

निराद चौधरी इंग्लंडमध्ये स्थायिक झालेले बंगाली; जागतिक कीर्तीचे लेखक. त्यांना अनेकजण शेवटचा खराखुरा इंग्रज म्हणतात. भारतातील परिस्थितीबद्दल त्यांनी विपुल लिखाण केले आहे. भारतवर्षाला त्यांनी ग्रीक पुराणातील Continent of Circ सिर्क खंड ची उपमा दिली आहे. या खंडात जो जो प्रवेश करेल त्याचे

त्याचे शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, नैतिक अध:पतन होत जाते आणि अंततोगत्वा विनाश होतो, अशी ग्रीक पुराणातील कथा आहे. भारतवर्ष असाच पछाडलेला भूप्रदेश आहे. दक्षिणेतून द्रविड आले, लय पावले. उत्तरेतून आर्य आले ते संपले. मुसलमानांचा दिग्विजय येथेच थांबला. समुद्रमार्गाने इंग्रज येथे आले आणि त्यांच्या साम्राज्यावर कधीही न मावळणारा सूर्य ढळला.

ऐतिहासिक उदाहरणे सोडून दिली तरी अगदी सर्वसामान्यांच्या आयुष्यातही हा परिणाम दिसून येतो. अद्ययावत् ऐवजी श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची निष्ठा सर्वदूर तयार होते. चांगले चांगले विद्वान पदवीधरही बाबामहाराजांसमोर अंगारेधुपारे करू लागतात. कोणताही नवा प्रकल्प पुढे आला की त्याची अंमलबजावणी करणे किती दुष्कर आहे, किंबहुना, अशक्य आहे हे तावातावाने सांगणाऱ्या मंडळींचे पीक येथे उदंड. आपण फार कर्तबगार, बुद्धिमान पण भोवतालची परिस्थितीच अशी की आपले काही चालत नाही असे रडगाणे जागोजाग विव्हळत असते.

हा काय प्रकार आहे? मायदेशी कर्तबगारीशून्य म्हणून हिणवली गेलेली ही मंडळी अमेरिकेच्या किनाऱ्याचा स्पर्श होताच कायापालट झाल्यासारखी कर्तबगार, बुद्धिमान, धडाडीची म्हणून गाजू कशी लागतात? अगदी अलीकडे अलीकडेपर्यंत इंग्लंड–अमेरिकेत भारतीयांची गणना पाकिस्तानी नागरिकांबरोबर पाकी म्हणून होत असे; त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही जाणवत नव्हते. अमेरिकेत स्थायिक झालेल्या ज्यू समाजाचा तेथे मोठा दबदबा आहे. तेथील आर्थिक आणि राजकीय जीवनावर ज्यूंचा मोठा प्रभाव आहे. इटलीतून येऊन अमेरिकेत स्थायिक झालेली मंडळी माफिया क्षेत्राततरी मोठा दरारा ठेवून आहेत. अरब नागरिकांच्या हाती तेलाचा काही पैसा असला तर त्यांनाही काही मान मिळतो. बाकी सटरफटर समाज नगण्यच मानले जातात. परवापरवापर्यन्त भारतीयांची गणना या सटरफटर वर्गातच होती. आता त्यांचे स्थान ज्यूंच्या आसपासचेतरी झाले आहे.

भारताची ऐतिहासिक परंपरा शतकानुशतके जगज्जेत्यांची अवनती घडवून आणण्याची. अमेरिकेची परंपरा न्यूयार्क येथील, हातात मशाल धरून उभ्या असलेल्या स्वतंत्रतादेवीच्या पुतळ्याच्या चौथऱ्यावरच लिहिलेली आहे – हे, जगातील श्रांत, दु:खी मानवांनो, माझ्या आश्रयाला या. सिर्क खंडाच्या रहिवाशांना एकदम जगज्जेते बनविण्याचा हा चमत्कार उद्भवतो कोठून?

फरक काही भूगोलाचा नाही, हवापाण्याचाही नाही. १९९१ मध्ये समाजवादापासून वेगळे होण्याची प्रक्रिया सुरू झाली त्या वेळी मान्टेकसिंग

अहलुवालिया यांच्या नेतृत्वाखालील एका समितीने अहवाल सादर केला होता. मायदेशी कर्तव्यशून्य दिसणारे परदेशांतील अनिवासी भारतीय धडाडीने आणि कर्तृत्वाने गाजतात याचे कारण साधे आणि सोपे आहे. येथे पूर्वकाळी धार्मिक, सामाजिक बंधनांनी आणि वर्तमानकाळात लायसन्स-परमिट बंधनांनी माणसाला जेरबंद करून टाकलेले आहे. परदेशात येथला माणूस गेला, की त्याला पटकन् फरक जाणवतो तो असा – या नव्या देशात पैसा कमावणे, कर्तबगारी दाखविणे आणि चांगले राहणे हे पाप समजले जात नाही आणि दुसरी गोष्ट, तुमच्या अंगी हिंमत आणि कर्तृत्व असेल तर तुम्हाला कोणीही अटकाव करू शकत नाही. भाकड नैतिकता आणि लायसन्स-परमिट राज यांनी जखडलेला माणूस भारतात निकामी ठरतो. या दोन बंधनांतून मुक्तता झाली म्हणजे पौरुषास अटक राहिली नाही, की त्याला साहजिकच त्याच्या आकांक्षांपुढे गगन ठेंगणे वाटू लागते.

महात्मा गांधींचे एक प्रख्यात वाक्य आहे, त्याचा मथितार्थ असा – गरिबांना मदत करायच्या गप्पा कशाला? त्यांच्या छातीवरून उठा म्हणजे गरिबी आपोआप दूर होते. भारतीयांची कीर्ती उजळून निघावी आणि जगभर पसरावी अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनी प्रोत्साहनाचे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही, हिरमोड करणारी बंधने संपवावीत म्हणजे मग निवासी भारतीयसुद्धा जगभर कर्तबगार म्हणून स्थान मिळवील.

*दि. ७/६/२०००*

■■

# शालेय शिक्षणातही हॅन्सी क्रोनिए

शिकवणीमहर्षि मच्छिंद्र चाटे आणि शिक्षण राज्यमंत्री अनिल देशमुख यांच्यात काय खडाखडी झाली यासंबंधी स्तंभ भरभरून बातम्या आल्या. मी त्यांवर एक नजर टाकण्यापलीकडे लक्ष दिले नाही. कुत्रं माणसाला चावलं तर त्यात काही नवलाई नाही; त्यामुळे त्याचे बातमीमूल्य फारसे नाही. या उलट, कोणी माणूस कुत्र्याला चावला तर ती अजब गोष्ट आहे. म्हणून पत्रकार त्याविषयी विस्ताराने बातम्या छापतात आणि चावा घेणे या विषयातले आपण तज्ज्ञ आहोत अशा आत्मविश्वासाने त्या विषयी अग्रलेखही लिहितात.

अलिकडे कुत्री माणसाला चावतात त्यापेक्षा माणसे कुत्र्याला चावण्याचे प्रकार जास्त. वर्तमानपत्र उघडले, की कुत्रा माणसाला चावला अशी बातमी कोठे दिसली तर ती मी वाचतो, माणूस कुत्र्याला चावल्याच्या बातम्यांवरील फक्त मथळे पाहतो.

शिकवणीमहर्षि राज्यमंत्र्यांना भेटायला मंत्रालयात गेले. काही वादावादी झाली. लवकरच खडाजंगीला सुरुवात झाली. शिक्षणमंत्र्यांनी भेटायला आलेल्या पाहुण्याना बाजूच्या खोलीत कोंडून ठेवले; पुरा अर्धापाऊण तास. वादाचा विषय शिक्षणशास्त्राशी संबंधित नव्हता. नुकत्याच लागलेल्या बारावी परीक्षेच्या निकालात साऱ्या राज्यात सर्वोच्च गुण मिळवून पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराच्या कार्यक्रमात विरोधी पक्षातील अग्रणी गोपीनाथ मुंडे आणि बाळासाहेब ठाकरे यांना सन्मानाने बोलावण्यात आले; शिक्षण खात्याचा राज्यमंत्री असूनही आपणास बोलाविले नाही याबद्दल मंत्रिमहाशयांची नाराजी होती.

प्रकरण वाढले. दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुद्ध पोलिसांत खटले दाखल केले. खुद्द राज्यमंत्र्यांना अटक करण्याची पोलिसखात्याची तयारी चालली आहे असे काही वर्तमानपत्रांत छापून आले आहे.

मराठीतील पहिल्या वर्तमानपत्राचे नाव होते दर्पण. वर्तमानपत्राचे काम आरशाप्रमाणे तटस्थपणे प्रतिबिंब दाखविण्याचे आहे. कुरूपाला सुरूप कर, लठ्ठ माणसाचे सडपातळ प्रतिबिंब दाखव किंवा विरुद्ध पक्षाच्या रुबाबदार माणसालाही कुरूप बनव असले उद्योग सच्च्या पत्रकाराने करायचे नसतात. प्रत्यक्षात आता, सरळ प्रामाणिक प्रतिबिंब दाखविणारे वर्तमानपत्र अपवादानेच सापडेल. जत्रेत एखादा तंबू हरहमेश लागतो. आतून प्रचंड हास्याचे कल्लोळ जत्रेच्या गलबलाटातही ऐकू येत असतात. लोक गर्दी करून तिकीट काढतात आणि आत जातात. आत ओळीने तऱ्हेतऱ्हेचे विकृत आरसे लावलेले असतात. कोणा आरशापुढे उभे राहिले तर रबर ताणून लांबविल्यासारखा माणूस दिसतो; दुसऱ्या एखाद्या आरशासमोर हवा भरून फुगविल्यासारखा दिसतो. आपलेच हे अदृष्टपूर्व विभूतिदर्शन पाहून साऱ्या कुचेष्टेचे विषय झालेली माणसेच खदखदा हसत असतात. आद्य दर्पणाचे वारसदार जत्रेच्या तंबूतील या आरशांप्रमाणे जगाचे प्रतिबिंब दाखवतात.

गेल्या दोनतीन महिन्यांत शेतकरी संघटना, शरद जोशी आणि देशातील यच्चयावत् राजकीय पक्ष यांच्यातील संबंध याबद्दल इतके काही लिहून आले आहे आणि ते इतके परस्परांना छेद देणारे आहे, की पत्रकारितेबद्दल कीव किंवा घृणा तयार व्हावी.

चाटे-देशमुख संघर्षातील सत्य काय? कोर्टापुढील प्रकरणांचा निकाल होईपर्यन्त थांबावे लागेल. 'अ'ला शिक्षा झाली काय किंवा तो निर्दोष सुटला काय, कोर्टाचा निकाल लागेपर्यंत त्यात कुणालाही यत्किंचितही स्वारस्य राहणार नाही. या वादाच्या निमित्ताने एक चर्चा सुरू झाली आहे, त्या चर्चेचा मात्र दूरगामी परिणाम संभवतो.

शालांत परीक्षांचे निकाल लागले, की हल्ली शिकवणीच्या वर्गांच्या मोठमोठ्या जाहिराती झळकतात. गुणवत्तायादीत आलेल्या शंभर विद्यार्थ्यांपैकी पंचवीस-तीस आपल्या शिकवणीवर्गाचे होते असा फोटोसहित दावा करणाऱ्या जाहिराती निदान दहावीस शिकवणीवर्गांचे चालक करतात. गुणवत्तायादीतील विद्यार्थ्यांच्या मुख्य विद्यालयांविषयी दूरदर्शनवर वृत्तांत येतात; वर्तमानपत्रांतही फोटो झळकतात. गुणवत्तायादीतील विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय शिकवणीमहर्षि जाहीररीत्या दवंडी पिटून घेतात, त्याचा इन्कार किंवा विरोध कोणीच करीत नाही. शिकवणीवर्ग फोफावतात. काही वर्षांपूर्वी शहरोशहरी एखादा कष्टाळू शिक्षक फावल्या वेळात शिकवणीचा वर्ग चालवे, विद्यार्थ्यांकडून कसून मेहनत करून घेई. त्यांचे

निकालही चांगले लागत, शिक्षकांना कमाईही घवघवीत होत असे. आताचे शिकवणीचे वर्ग असे 'हातभट्टी' स्वरूपाचे नाहीत. प्रचंड आधुनिक दारूच्या कारखान्यांप्रमाणे ते सर्वदूर पसरले आहेत. काही शिकवणीवर्गांचे कार्यक्षेत्र विद्यापीठांपेक्षाही काही अंशी अधिक विस्तृत आणि व्यापक आहे. अशा शिकवणीच्या वर्गांची वार्षिक फी दरडोई पन्नास हजार रुपयांवर असते. काही वर्गांत प्रश्नपत्रिका फोडून आधी पुरविण्याचा मोबदला फीतच धरला जातो, काही ठिकाणी त्याची रक्कम वेगळी द्यावी लागते असेही ऐकायला मिळते.

क्रिकेटचे खेळाडू हा लोकांच्या कौतुकाचा विषय आहे. आधुनिक काळात तपस्या, व्यासंग, धैर्य यांचे आदर्श राहिले नाहीत. त्यांची जागा क्रिकेटपटूंनी घेतली आहे. आमच्या लहानपणी क्रिकेट हे काही चरितार्थाचे साधन नव्हते. सारखा क्रिकेट खेळशील तर काय भीक मागून पोट भरशील? असे घरोघरी आया कोकलत असत. आता क्रिकेट हा गडगंज पैसे मिळविण्याचा मार्ग झाला आहे. खेळसामानाचे कारखानदारच फक्त नव्हे तर, टूथपेस्ट आणि शक्तिवर्धकांचे कारखानदारही लक्षावधीने रुपये खेळाडूंना देऊ करतात, हे बरीच वर्षे सर्वांना माहीत आहे. पण, मैदानावर सामने कसोशीने चालतात; कोणती बाजू जयपराजयाच्या लाटांवर वरखाली होईल तसतसे कोट्यवधी लोकांच्या जिवाची घालमेल होत असते; आपल्या देशाचा संघ जिंकला म्हणजे लोक हर्षोन्मादाने नाचतात आणि हरला म्हणजे ओक्साबोक्शी रडतात असा हा गंभीर आणि पवित्र विषय आहे.

यात खेळाडूच सट्टेबाजी करीत असतील आणि पैसे घेऊन मॅच हरत असतील अशी शंकाही कधी कोणाच्या मनाला शिवली नव्हती. एका दिवसात हा आदर्शाचा डोलारा कोसळला आणि या भ्रष्टाचारात हात नसलेला कोणी क्रिकेट हीरो असेल असा लोकांचा विश्वास आता दुरापास्त झाला आहे.

चाटे प्रकरणामुळे पवित्रतेचे आणखी एक मंदिर ढासळू लागले आहे.

मॅट्रिकची परीक्षा विद्यापीठ घेत असे तेव्हापासून आणि शालांत परीक्षांची ही मंडळे सुरू झाल्यानंतरही बराच काळ परीक्षेचा निकाल सहा जून रोजी म्हणजे सहा जून रोजीच लागत असे; त्या दिवसाचेच पावित्र्य मानले जात होते. पहिल्या दहा विद्यार्थ्यांची नावे जाहीर होत, त्या यादीत आपले नाव झळकावे ही साऱ्या मेधावी विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा नव्हे, स्वप्न असे. भारताचे माजी वित्तमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी त्या काळी एकूण ७०० पैकी ६०० वर गुण मिळवून पहिला क्रमांक मिळविला होता. त्यानंतर हा उच्चांक मोडणे जवळजवळ

अशक्य मानले जात असे. मॅट्रिकला पहिला येणारा विद्यार्थी असणे आणि जगन्नाथ शंकरशेठ संस्कृत शिष्यवृत्ती मिळविणे म्हणजे पुरुषार्थाची पराकाष्ठा मानली जाई.

हळूहळू या निकालात पॅटर्न येऊ लागले. एकेका विद्यालयाचे किंवा जिल्ह्याचे दहादहा, वीसवीस विद्यार्थी गुणवत्तायादीत झळकू लागले. शिकवण्यांचे बहुतेक सारे वर्ग तर सारे गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी आपल्याच क्लासचे विद्यार्थी असल्याचा दावा मांडू लागले. लोकांच्या मनांत शंका येऊ लागली आहे. पहिला आलेला विद्यार्थी आणि त्याचे पालक यांनी शिकवणीवर्गाला श्रेय द्यावे यासाठी काही हजारांलाखांची देवघेव होत असेल, तर शिकवणीवर्गातीलच विद्यार्थी पहिलादुसरा यावा याकरिता अशीच देवघेव होत नसेल कशावरून?

शालान्त परीक्षेनंतर व्यावसायिक शिक्षणाच्या विद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी आठदहा लाख रुपये द्यावे लागतात, त्यापेक्षा लाख दोन लाख रुपये देऊन मुळातच परीक्षेतील गुण वाढवून घेतले तर सौदा अधिक स्वस्त पडतो!

विषय गंभीर आहे, आरोप उथळपणे करणे योग्य नाही. गेली काही वर्षे गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी मी पाहिले आहेत. त्यांच्या यशाचे रहस्य त्यांची बुद्धी आणि कष्ट यांपेक्षा त्यांच्या पालकांच्या जवळील काळ्या पैशात आहे असे मला बऱ्याच वेळा वाटे. कोणी तक्रार नोंदविली नसेल; पण अमक्या अमक्या डॉक्टरने पैसे भरून आपला मुलगा पहिला आणवला अशी चर्चा, खालच्या आवाजात का होईना, सर्वदूर चालू आहे. क्रिकेटच्या सामन्यांचे निर्णय फिरविण्याकरिता कोटींची देवघेव होत असेल तर शालान्त परीक्षांचे निकाल फिरविण्याकरिता लाखांची देवघेव होत नसेल तरच ते अद्‌भुत म्हणावे लागेल!

चाटे–देशमुख वादंगातून आणखी एक मुद्दा चर्चेला येत आहे. चाटेविरोधी गटाची माणसे हे सारे शिकवणीचे वर्ग बंदच करून टाकावे आणि शिक्षणक्षेत्रातील या 'हातभट्ट्या' संपवून टाकाव्या असे मांडू लागले आहेत.

तसे पाहिले तर शिकवण्यांचे वर्ग हा सगळा खासगी मामला आहे. कागदोपत्री पाहिले तर शालान्त परीक्षांचे उमेदवार कोण्या सरकारी मान्यताप्राप्त विद्यालयाचे विद्यार्थी असतात. परीक्षेस बसण्यासाठी ते फॉर्म भरतात ते त्यांच्या विद्यालयांमार्फत; पण ही विद्यालये अभ्यासाची केंद्रे नाहीत. तेथे प्रवेशाचा धांगडधिंगाच गणपती येईपर्यन्त चालतो. मग गणपती, नवरात्र, दांडिया हे धुडगूस संपता संपता सहामाही परीक्षा आणि दिवाळी येऊन ठेपते. जे काही थोडे दिवस विद्यालये भरतात, त्यात निवडणुका आदी कार्यक्रम होतात. सरकारी मान्यताप्राप्त अधिकृत

विद्यालये म्हणजे नेतागिरी, नाटके, संमेलने, वनभोजने, सहली यांचे नियोजन करणारी यंत्रणा आणि हीरो वा हीरॉईन म्हणून मिरविण्याच्या जागा झाल्या आहेत. या असल्या कार्यक्रमासाठी विद्यालये काढली जातात. सरकारी मान्यता राज्यकर्त्या पक्षाच्या पुठ्ठ्यातील मंडळींनाच मिळते. शिक्षकांचे पगार सरकारने ठरविलेले. भरभक्कम पगार देण्यासाठी सरकारी अनुदाने. शिक्षणक्षेत्र राजकीय वशिलेबाजीने मक्तेदारीचा फायदा लुटणाऱ्यांनी बजबजले आहे.

मग अभ्यास होतो कोठे? अभ्यासाच्या निमित्ताने विद्यार्थी शिकवणीच्या वर्गांत जातात. विद्यालयांत वर्ग बुडविणारी टवाळ पोरेही शिकवणीचा वर्ग कधी चुकवीत नाहीत.

अशा परिस्थितीत शिकवण्यांचे वर्ग बंद केल्याने काय साधणार आहे? प्राप्त परिस्थितीत शिकवण्यांच्या वर्गांनाच परीक्षांसाठी फॉर्म भरण्याची परवानगी देणे अधिक तर्कसंगत होईल. त्यासाठी, मान्यताप्राप्त विद्यालये बंद करण्याची आवश्यकता नाही. त्यांना शिकवणीच्या वर्गांबरोबर स्पर्धेत उतरण्यास भाग पाडले पाहिजे. विद्यालयात जायचे का शिकवणीच्या वर्गात हा विकल्प विद्यार्थी आणि पालक यांच्यासमोर खुला राहावा. सरकारने अनुदान विद्यालयांना देऊ नये आणि शिकवणीवर्गांनाही देऊ नये. विद्यार्थी ज्या प्रमाणात प्रवेश घेतील त्यातून जमेल त्याप्रमाणे शिक्षकांच्या वेतनश्रेणी ठरविण्यात याव्यात. परंपरागत अर्थाने शिक्षणाची पातळी उंचावेल किंवा नाही हे सांगणे कठीण आहे; पण निदान भ्रष्टाचार आणि खोटेपणा यांचा शिक्षणक्षेत्रातील पगडातरी कमी होईल.

*दि. १३/६/२०००*

■■

# आणीबाणी : एक विफल कारावास

२५ जून २०००, इंदिराबाईंनी देशावर लादलेल्या आणीबाणीचा पंचविसावा स्मरणदिन. काही पत्रकारांनी याला रौप्यमहोत्सवही म्हटले; पण रौप्यमहोत्सव सुखद घटनांचा असतो. आणीबाणीबद्दल कुणाचेही काही मत असो, रौप्यमहोत्सव म्हणून उत्साहाने साजरा करण्यासारखी ही घटना आहे असे म्हणणारा कोणीही सुपुत्र, अगदी इंदिरा काँग्रेस पक्षाच्या पठडीतही नाही.

आणीबाणीच्या काळात आणि त्यासंबंधाने महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि निभावणाऱ्या अनेकांनी त्यासंबंधीच्या आठवणी लिहिल्या आहेत. आणीबाणीचा हा साराच कालखंड देशाच्या इतिहासातील एक लज्जास्पद, काळा इतिहास आहे. मूलभूत हक्कांची पायमल्ली, दीडपावणेदोन लाख लोकांचा तुरुंगवास, लॉरेन्स् फर्नांडिस, स्नेहलता रेड्डी यांच्यासारख्यांचा तुरुंगात अनन्वित छळ, पोलिसांची अरेरावी, सक्तीची नसबंदी या असल्या घटनांमध्ये आपला काय सहभाग होता याची कबुली देणारा एकही मायेचा पूत पुढे आलेला नाही.

आणीबाणीच्या कालखंडाचे खरे खलनायक आता कोणी हयात नाहीत. शेषनसाहेब लोकप्रियतेच्या झोतात आहेत. एन. के. सिंग हे आणीबाणीत तुरुंगवास सोसलेल्या पंतप्रधानांचे प्रमुख सचिव आहेत. त्यांपैकी कोणीच लोकांची क्षमा मागितलेली नाही.

काँग्रेस आय्च्या परिवारातील बहुतेकांनी कानांवर हात ठेवून विश्वामित्री पवित्रा घेतला आहे. आम्हाला काही कळलेच नाही हो! २५ जून रोजी सकाळी वर्तमानपत्रे आली नाहीत याचाच काय तो अचंबा वाटला; बी. बी. सी. वरून बातम्या येत त्यांवरून काहीतरी जगावेगळे चालले आहे अशी शंका वाटत होती; पण, इंदिराबाईंनी विरोधी पक्षांची कारस्थाने आणि त्यांना मिळणारे परकीय हस्तकांचे प्रोत्साहन यांसंबंधी इतक्या तारस्वरात आणि इतक्या वारंवार निक्षून

ग्वाही दिली होती, की हा साऱ्या देशाच्या हितशत्रूंचा प्रचार आहे असे वाटत होते... ही असली कोडगी आत्मसमर्थने दिली जात आहेत.

इतिहासात असे घडते. आणीबाणी जाहीर झाली त्याच्या आधी महिनाभर मी पश्चिम जर्मनीत गेलो होतो. पश्चिम जर्मनीत गेले की हिटलरच्या अनुयायांच्या कवायती, विरोधकांना आणि ज्यूधर्मीयांना जेथे अनन्वित छळाला तोंड द्यावे लागले ते तुरुंग ही अजून कुतूहलाची पर्यटनस्थाने होती. बऱ्याचशा जर्मन लोकांशी मी बोललो. हिटलरच्या चढत्या काळात आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्यांनी नेमके काय केले?" या प्रश्नावर बोलणे आले की सगळ्यांची तोंडे चिडीचूप बंद होत. हिटलर असे काही राक्षसी थैमान घालत आहे हे आमच्या कधी लक्षातच आले नाही. पण, घडले ते फार वाईट घडले आणि नवे जर्मन राष्ट्र हा सगळा इतिहास पुसून टाकून खरेखुरे लोकशाही राष्ट्र बनत आहे अशी मखलाशी सर्वत्र ऐकू येई.

यशाचे पितृत्व सांगणारे अनेक उभे राहतात, अपयश नेहमीच पोरके असते अशी एक इंग्रजी म्हण आहे. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास काही वेगळा घडला असता. भयंकर संहाराची अस्त्रे दोस्त राष्ट्रांच्या हाती येण्याऐवजी हिटलर किंवा जपानी टोजो यांच्या हाती असती, दोस्तांचा पराभव झाला असता आणि सर्वत्र शुद्ध आर्य वंशाची हुकूमशाही झाली असती तर आज कानांवर हात ठेवणारे विश्वामित्र कदाचित् नव्या व्यवस्थेत मग्रूर अधिकारी म्हणून दिसले असते.

भारतातील आणीबाणीची कथा त्याहून विचित्र आहे. आणीबाणीचा शेवट निवडणुकीने झाला. आणीबाणीच्या क्रूरकर्मा शिल्पकारांना लोकांनी धूळ चारली. पण, पर्यायी जनता पक्षांच्या नेत्यांचे विदूषकी चाळे पाहिल्यावर दीड वर्षात त्याच बदनाम क्रूरकर्म्यांना जनतेने निवडून दिले हे एक अद्भूतच आहे. १९८१ मध्ये लोकांनीच इंदिरा गांधींना आणि त्यांच्या पक्षाला निवडून दिले म्हणजे विजनवासाची दोन वर्षांची सजा देऊन माफी करून टाकली. अशाही परिस्थितीत संजय गांधींचे जिगरी दोस्त सोडल्यास अजूनही झाले ते योग्यच झाले; तशीही वेळ आली तर पुन्हाही आणीबाणी लादण्यास आम्ही कमी करणार नाही असे कोणी ताठ मानेने बोलत नाही. १९७७ सालच्या निवडणुकांच्या प्रचाराची धामधूम चालू होती तेव्हा त्या वेळचे इंदिराभक्त, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे खजिनदार श्री. शरदचंद्रावजी पवार सांगत होते, की आणीबाणी संपलेली नाही. निवडणुकांत लोकांच्या पसंतीचे शिक्कामोर्तब झाले, की पुन्हा एकदा वरवंटा फिरू लागणार आहे. येरवड्याच्या तुरुंगातून विरोधकांना बाहेर पाठविले आहे ते तुरुंगाची

रंगसफेदी करण्याच्या सोयीसाठी. तेवढे काम उरकले, की सगळयांना पुन्हा तुरुंगात डांबण्यात येईल. त्या वेळी पक्षनिष्ठेची भाषा करणारे आता तोच पक्ष आणि त्याच्या नेत्या यांच्याविरुद्ध मर्दपणे बंड करण्यास ठाकल्याचा आव आणीत आहेत.

आणीबाणीच्या काळात सर्वसामान्य नागरिक आणि छोटे कार्यकर्ते दडपशाहीविरुद्ध बोलत होते, प्रचार करीत होते; पण नामवंत सर्व चुप्पी साधून होते. सरकारी महात्मा विनोबा भावे यांनी आणीबाणीला 'अनुशासनपर्व' असे प्रशस्तिपत्रही देऊन टाकले. महाराष्ट्रात दुर्गाबाई भागवत यांचा अपवाद वगळता दुस–या कोणी ऐन आणीबाणीच्या काळात धैर्य दाखविल्याचे दिसत नाही. निवडणुका जाहीर झाल्यानंतर त्यांना वाचा फुटली; त्यांची रसवंती खुलली आणि आपण जन्मजात स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते व हुकूमशाहीचे कडवे विरोधक असल्याच्या गर्जना ऐकू येऊ लागल्या.

आणीबाणीच्या कालखंडाचा आणि माझा फार किरकोळ संबंध आला; पण तरीही माझ्या काही आठवणी लिहून ठेवतो, ते पुढेमागे कधीकाळी ऐतिहासिक अवलोकनास उपयोग व्हावा म्हणून.

लाल बहादूर शास्त्रींचे ताश्कंद येथे निधन झाले. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. शपथविधीनंतर त्यांचा पहिला सार्वजनिक कार्यक्रम माझ्या दिल्ली येथील कार्यालयात शास्त्रीजींच्या स्मरणार्थ काढलेल्या टपालतिकीटाच्या प्रकाशनानिमित्त झाला. मृत व्यक्तींविषयी अनादराने बोलू नये; पण इंदिराबाई माझ्या आदराचा विषय कधीच नव्हत्या. पैतृक वारशाने अंगावर आलेले प्रचंड जबाबदारीचे ओझे सावरण्याची आपली कुवत आहे किंवा नाही याबद्दल त्यांच्या मनात जबरदस्त शंका आणि त्यातून निघणारी असुरक्षिततेची भावना व त्यातून देशाला मोठा धोका संभवतो याची जाणीव त्यांच्या त्या वेळच्या भाषणातूनच झाली. त्यानंतर लगेचच मी फ्रान्स आणि स्वित्झर्लण्ड येथे गेलो. त्यानंततरच्या निवडणुकांत काँग्रेस पक्षाची झालेली पडझड, भ्रष्टाचाराची प्रकरणे, गुजराथ व बिहार येथील विद्यार्थ्यांची बेकारीविरोधी आंदोलने, रेल्वे कामगारांचा संप हा सगळा आणीबाणीचा पूर्वरंग घडला. त्या काळात मी देशोदेशी फिरून अविकसित देशांतील गरीबीचे कारण शोधीत होतो.

१९७१ मध्ये बांगलादेशचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मुक्तता झाली. पहिल्यांदा बाईंच्या कर्तबगारीबद्दल अभिमान वाटला. खुद्द अटल बिहारीजींनीही त्या वेळी त्यांचे 'दुर्गादेवी' म्हणून कौतुक केले. परदेशांतील बहुराष्ट्रीय समाजात हिंदुस्थानातील

लोक हे गबाळे, बुळे आणि याउलट, पाकिस्तानी म्हणजे शूर, कडवे व लढवय्ये अशी सर्वदूर कल्पना होती. इस्त्रायलने भोवतालच्या अरब फौजांची जशी दाणादाण केली तशीच पाकिस्तानी वायुसेना हिंदुस्थानची आठवड्याभरात करून टाकेल अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. आमच्या कार्यालयातील, एरवी सज्जनपणे वागणारे पाकिस्तानी सहकारीही मिशीला तूप लावून फक्त पाकिस्तान रेडिओवरील 'खबरें' ऐकत होते. भारतीय सैन्याची आगेकूच चालू राहिली तसतसे वातावरण बदलत गेले. भारतीय फौजेविषयी आदराची भावना वाढत गेली. बांगलादेशातील पाकिस्तानी फौजांनी शरणागती स्वीकारली तेव्हा एका वरिष्ठ पाकिस्तानी अधिकाऱ्याने माझ्या कार्यालयीन कक्षात येऊन 'मी काही शरणागती दिली पाहिजे असे नाही' असे म्हणून तणाव सारा संपवून टाकला.

लक्षावधी बांगलादेशी निर्वासित हिंदुस्थानात येत होते. त्यांच्या सचित्र बातम्या सर्व दृक्‌श्राव्य माध्यमांतून प्रसिद्ध होत होत्या. एक इंग्रज अधिकारी मला बोलून गेले, तुमच्या देशात हे सारे घडत असताना तुमच्यासारख्या माणसाला परदेशात ठेवणे तुमच्या सरकारला परवडते कसे? इंग्रजच तो! त्याच्या बोलण्यातला छुपा अर्थ स्पष्ट होता. अशा परिस्थितीत तुम्ही येथे आरामात जगू शकताच कसे?" मनात एक टोच राहिली.

१९७४ मध्ये एक नवी कलाटणी मिळाली. सिक्कीम भारताच्या आधिपत्याखालील एक स्वायत्त संस्थान. १९७४ मध्ये इंदिराबाईंनी सिक्कीम भारतात सामील करून घेतले. सिक्कीम आणि भूतान यांना संयुक्त राष्ट्रसंघात स्वतंत्र मान्यता देण्याचा त्या वेळी विचार चालला होता. सिक्कीमचे सामीलीकरण म्हणजे बांगलादेश लढाईच्या विजयोन्मादात भारताने सुरू केलेला नवा साम्राज्यवाद आहे आणि त्यामागे वारंवार दुर्गादेवी अवतार धारण करून निवडणुका जिंकण्याची इच्छा आहे असे बहुराष्ट्रीय समाजात वाटत होते.

पुढच्याच वर्षी आणीबाणी जाहीर झाली. विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांची धरपकड, देशभर पसरलेले भीतीचे वातावरण आणि वृत्तपत्रस्वातंत्र्याची गळचेपी यासंबंधी विस्तृत बातम्या युरोपमधील वर्तमानपत्रांत येत होत्या. त्यामुळे हुकुमशाहीविरुद्ध लढा करण्यासाठी स्वित्झर्लण्ड सोडून मी हिंदुस्थानात आलो असे म्हणणे धादांत खोटे असेल. माझ्या परत येण्याची कारणे राजकारणाशी नाही, अर्थकारणाशी जोडलेली आहेत; पण हेही इतकेच खरे की, आणीबाणी जाहीर झाली नसती तर स्वदेशी परतण्याचा निर्णय इतक्या सहजपणे मी घेतला नसता. पंडित नेहरूंच्या काळापासून साऱ्या संयुक्त राष्ट्रसंघात भारताची एक आब होती आणि भारतीयांची

एक शान होती. सिक्कीम प्रकरण व आणीबाणी यांमुळे सारे चित्र पालटले आणि भारताची गणना हुकूमशाही राष्ट्रांच्या पंक्तीत होऊ लागली. भारतीय म्हणून ताठ मानेने जगणे इंदिराबाईंच्या आणीबाणीने अशक्य केले.

१ मे १९७६ रोजी आणीबाणीच्या ऐन भरात मी सहकुटुंब मुंबई विमानतळावर उतरलो. टॅक्सी घेऊन दादर स्टेशनवर आलो. तोपर्यन्त, आणीबाणी म्हणजे काही वेगळे असल्याची पुसटशीही जाणीव झाली नाही. आता भारतात आगगाड्या वेळेवर धावतात अशी फुशारकी ऐकली होती; पण आमची पुण्याकडे जाणारी गाडी चांगली अर्धा तास उशिरा आली. अजूनही आणीबाणीची काही गाठभेट नाही. गाडीत चढल्यावर पहिल्या वर्गाच्या डब्यात मात्र वातावरण वेगळे असल्याचे जाणवले. गाडीचा उशीर या विषयावर मी काही शेरा मारताच शेजारच्या प्रवाशाने तोंडावर बोट ठेवून काही न बोलण्याचा इशारा केला. मुंबई–पुणे गाडी म्हणजे सर्व राजकीय घटनांवर तावातावाने वादविवाद करण्याचे हिंदुस्थानातील 'हाईड पार्क मैदान'च! त्या गाडीतील नीरव शांतता लोकांच्या मनांत आणीबाणी आणि पोलिसांची दडपशाही यांचा किती खोलवर धाक पोहोचला आहे याची जाणीव देत होती.

कोणी काही बोलू लागले आणि त्याला पोलिसांनी येऊन अटक केली असे काही कुठे पुण्याला पोहोचल्यानंतरही पाहण्यात आले नाही; पण 'काही बोलले, कोणी ऐकले तर मध्यरात्री दरवाजावर थाप पडेल,' असे 'अ'च्या बाबतीत झाले; 'माझ्या माहितीतल्या 'ब'ची अशी प्रत्यक्ष हकिकत आहे, बिचाऱ्याची बायकापोरे उघडी पडली' अशा वदंता वारंवार ऐकू येत.

जमीन घेऊन मी आंबेठाण येथे शेतीकामाला लागलो. पहिले बटाट्याचे पीक घेतले. बाजारात भाव नसल्यामुळे पिकाची अरण लावून ठेवण्याचे ठरले. त्यासाठी कडुनिंबाच्या डहाळ्या शोधत शेजारच्या गावी गेलो. लोक सैरावैरा धूम पळत होते. जो तो ज्याला त्याला 'गाडी आली आहे' एवढाच निरोप देत होता. गाडी म्हणजे नसबंदीवाल्यांची गाडी. या गाडीने इतका पराक्रम गाजवला की, घोडे पाणी पीत नसेल तर 'पाण्यात संताजीधनाजीप्रमाणे नसबंदीवाले दिसतात की काय?' असे विचारण्याची लोकांवर वेळ आली. एक दिवस दिल्लीच्या गलीच्छवस्ती निर्मूलनाची बातमी छापून आली. गावातल्याच एका माणसाशी मी बोललो. तो पटकन् म्हणाला, म्हणजे ही जुनी राजेशाहीच परत आली म्हणायची?

आणीबाणी संपली. जनता पक्षाच्या स्थानिक उमेदवाराकरिता मी भरपूर धावपळ केली. पण सर्वत्र वातावरण अजून काँग्रेसचेच होते. निकाल लागला,

आमचा उमेदवार पडला. साऱ्या देशभर असेच झाले असणार अशा कल्पनेने उदासवाणेपणाने घरी परतलो. रेडिओवरच्या बातम्यांचा कल तर अगदीच वेगळा होता. त्या रात्री शेवटी इंदिराबाईंचा पराभव झाल्याची बातमी ऐकली आणि जनसामर्थ्याच्या या विराट विश्वरूपदर्शनाने, इतके रोमांच अनुभवले, की पहाटेपर्यन्त डोळ्याला डोळा लागला नाही.

जनता पक्षाचे सरकार आले. आनंदीआनंद जाहला. पण काही महिन्यांतच कांद्याच्या निर्यातीवर बंदी आली. चाकणचे कांदा आंदोलन सुरू झाले. जनता पक्षाचे सरकार आल्याबरोबर शेतकरी आंदोलन उठले तेव्हा, हा शरद जोशी हा कोणी काँग्रेसी हस्तक असावा असा होरा दिग्गज पत्रकारांनी मोठ्या विश्वासपूर्वक मांडला. पुढे इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. आंदोलनाने उग्र स्वरूप घेतले. आपला होरा चुकल्याचा कबुलीजबाब देण्याची प्रथा भारतीय पत्रकारितेत नाही. सत्याग्रहात अटक झाली. लोकांचा संपर्क येऊ नये म्हणून आम्हा पाचदहाजणांना औरंगाबादजवळच्या हर्सूल तुरुंगात नेऊन ठेवले. तुरुंग कसला? इतिहासकालीन घोड्यांच्या पागा आता तुरुंगातील बराकी म्हणून वापरात येत होत्या. भिंतींवर ढेकणांची जत्रा. संडास जुन्या औरंगजेबाच्या काळातील; बसल्यावर खालची टोपली फूटदीडफूट अंतरावर. सारा गलीच्छ प्रकार. जमेची बाजू एवढीच, की बराक मोकळी. ज्याला पाहिजे तेथे त्याने आपली पथारी मांडावी. जेल सुपरिंटेंडेंट सांगत होता, संडासाबद्दल तक्रार करू नका. माझ्या घरी असाच संडास आहे. त्यामुळे बायको माहेरी निघून जाण्याची भाषा सतत बोलत असते. आता काहीच नाही, आणीबाणीच्या काळात तुम्ही पाहायला पाहिजे होते. इतके स्थानबद्ध की एकमेकांना चिकटून झोपायला लागे आणि तरीही संडासच्या पार दरवाजापर्यन्त पथाऱ्या पसरलेल्या रहात. माणसे इतकी, की सकाळी तासाभरात संडास भरून जायचा.

माझ्या अंगावर शहारे आले. हिंदुस्थानभर पावणेदोन लाख लोक बाईने असे गुरांसारखे कोंडून ठेवले; पण त्याची आता कुणाला चीड राहिली नाही, संताप राहिला नाही; सारे कसे शांत शांत! आणीबाणीच्या अठरा महिन्यांत ही सारी अमानुषता सोसणाऱ्यांची सारी तपश्चर्या फुकट गेली.

शेतकरी संघटनेच्या झेंड्याभोवती जमा झालेल्या पाईकांत त्या वेळच्या सामाजिक, आर्थिक चळवळीतील अनेक कार्यकर्ते होते. छात्रयुवा संघर्ष वाहिनी आणि राष्ट्र सेवा दल यांतील कार्यकर्ते जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात भाग घेत होते. अमर हबीब, सुधाकर जाधव, दशरथ सावंत, भीम

बडदे, चंद्रकांत वानखेडे हे शेतकरी संघटनेचे बिनीचे कार्यकर्ते आणीबाणीच्या संपूर्ण काळात तुरुंगात होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा ज्ञानप्रबोधिनी यांची पार्श्वभूमी असलेले विनय हर्डीकर, राम डिंबळे अशा कार्यकर्त्यांनीही आणीबाणीच्या काळात जनजागृती करण्याचे महत्त्वाचे काम केले.

आणीबाणीचा कालखंड संपला. इंदिरा गांधी गेल्या, परत आल्या, परत गेल्या. आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेले नेते आज शासनात अधिकारपदी आहेत. देशातील आजची परिस्थिती ही अनेक बाबतींत आणीबाणीपूर्व परिस्थितीसारखीच आहे. सरकारला बहुमताची खात्री नाही. भ्रष्टाचार बोकाळला आहे. बिहार, गुजराथ यांसारख्या राज्यांत बेबंद अंदाधुंदीच माजली आहे. एक कारगील आटोपले, पण आणखी दोनतीन 'कारगिल' प्रकरणांना लवकरच तोंड द्यावे लागेल असे दिसते आहे. अतिरेक्यांकडून घातपात, बॉम्बस्फोट, खून सर्रास घडत आहेत.

इंदिरा गांधींनी 'मिसा' लावला तो बेबंदशाहीच्या परिस्थितीत, अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय त्यांच्याविरुद्ध गेला म्हणून. आजही केंद्र शासन नवीन घातपातविरोधी कायदा संसदेपुढे आणीत आहे. हा कायदा 'मिसा'ची वाढवून बिघडविलेली आवृत्ती आहे. यात कोणालाही केवळ संशयावरून पकडण्याची तरतूद आहे, जामिनाचा हक्क काढून घेतला आहे आणि न्यायालयाकडे धाव घेण्यावरही निर्बन्ध असणार आहेत. इंदिरा गांधींनी 'मिसा'चा गैरवापर केला तसा आम्ही करणार नाही अशी सध्याच्या राज्यकार्त्यांनी कितीही ग्वाही दिली तरी ती निरर्थक आहे. सुलतानी कायदे तयार झाले, की त्यांचा वापर जितका अमानुष होणे शक्य आहे तितका होतोच. पंजाबमध्ये अतिरेक्यांच्या विरुद्ध केलेल्या तरतुदींचा जाच सामान्य लोकांना किती भयंकर झाला हे अगदी अलीकडचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. शासनातील कोणा प्रमुख नेत्यास बाबरी मस्जिद प्रकरणी कारावासाची शिक्षा झाली तर दुसऱ्या आणीबाणीची घोषणा होण्यासाठी सारी काही तयारी सज्ज आहे.

*दि. ७/६/२०००*

■■

# स्वायत्ततेचा बाऊ आणि काश्मीरची भारत समस्या

१९७१ मध्ये बांगलादेशच्या प्रकरणाची नुकतीच सुरुवात झाली होती, त्या वेळची गोष्ट. पूर्व बंगालचा प्रदेश लहान, परंतु लोकसंख्या मोठी; त्यामुळे सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मुजीबुर रहेमान यांना मिळाले. भुट्टोंना सत्ता इतक्या सहज सोडण्याची इच्छा नव्हती. वातावरण तापू लागले. वाटाघाटी यशस्वी होण्याची चिन्हे दिसेनात. याह्याखानने भुट्टोंची उचलबांगडी करून टाकली आणि मुजीबुर रहेमान यांच्याशी बोलणी चालू केली. त्या वेळी मी संयुक्त राष्ट्रसंघात काम करीत होतो. एक पाकिस्तानी वरिष्ठ अधिकारी बोलण्याच्या ओघात म्हणाले, ''मी याह्याखानच्या जागी असतो तर सरळ म्हटले असते, 'नवीन घटना पाहिजे? पाकिस्तानी झेंडा फक्त ठेवा, बाकी तुमच्या सगळया अटी मान्य' पाकिस्तान अखंड ठेवण्याचा एवढा एकच मार्ग आहे.'' हा सल्ला याह्याखानपर्यन्त पोहोचला नसावा. त्याने लष्करी ताकदीचा मार्ग चोखाळला आणि पाकिस्तान फुटले.

आज या प्रसंगाची आठवण झाली ती काश्मीर विधानसभेने स्वायत्तता समितीचा अहवाल मंजूर केला. त्यानंतर, फारूख अब्दुल्ला आणि काश्मीर विधानसभा यांच्यावर ज्या कडवटपणे टीका होते आहे ती पाहता 'देशातील काही नेते कळत न कळत भारताला याह्याखानच्या मार्गाने तर पाठवणार नाहीत ना?' अशी भीती वाटली म्हणून.

काश्मीर विधानसभेने मंजूर केलेल्या ठरावात काही बाबी अतिरेकी आहेत यात काही शंका नाही. काश्मीरच्या मुख्यमंत्रयांना पंतप्रधान म्हणायचे, की मुख्यमंत्री हा प्रश्न भाषिक आहे; तो सहज सोडविता येईल. शेख अब्दुल्लांनी काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांचा दर्जा पंतप्रधानांच्या बरोबरीचा असेल असे कोठेही आणि कधीही म्हटलेले नाही. १९५३च्या पूर्वीची परिस्थिती पुन्हा प्रस्थापित

करणे हा शब्दप्रयोग पुष्कळसा गोलमाल आहे. त्याचे तपशीलवार स्पष्टीकरण झाले तर तो मुद्दाही काही तंट्याचा राहत नाही. याउलट, सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोग यांचा अधिकार काश्मीरवर नसावा ही मागणी अवास्तव आहे. स्वायत्ततेसंबंधी ठराव जसाच्या तसा मान्य करणे शक्य नव्हते हे उघड आहे.

शासनकर्त्या पक्षांच्या नेत्यांची पहिली प्रतिक्रिया खूपच समंजसपणाची होती – 'या प्रश्नावर चर्चा करून संसदेत निर्णय घेतला जाईल. संघराज्यातील घटक राज्यांना अधिक स्वायत्तता मिळावी असे कलम भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातच आहे. शासन घटक राज्यांना स्वायत्तता देण्यास वचनबद्ध आहे. इत्यादी, इत्यादी.'

एकदोन दिवसांत वातावरण एकदम बदलले. आसामच्या मुख्यमंत्र्यांनी स्वायत्ततेच्या कल्पनेला पाठिंबा दिला. पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांनी काश्मीरच्या स्वायत्ततेच्या कल्पनेला दुजोरा दिला आणि इतर राज्यांनीही अधिक स्वायत्तता मिळण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. इरोड येथे अखिल भारतीय द्र.मु.क.चे अधिवेशन झाले. लाल कृष्ण अडवाणी प्रास्ताविक भाषण करून निघून गेल्यानंतर श्रीलंकेतील तामीळ बंडखोरांना पाठिंबा देण्याचा सूर बळावला; इतक्या पराकोटीचा, की तामीळनाडू आणि श्रीलंकेतील तामीळभाषी प्रदेश एकत्र आणण्याच्याही गोष्टी झाल्या. दोन दिवसांत सर्वच राज्ये घरातल्या घरात वेगळी चूल मांडण्याची भाषा बोलू लागली. जम्मूमध्ये लोकांनी स्वायत्ततेला विरोध करण्यासाठी व्यापक निदर्शने केली आणि स्वायत्ततेच्या उलट दिशेला जाऊन, जम्मू केंद्रशासित प्रदेश करावा अशी मागणी झाली.

मग, एकाएकी देशभक्तीचे पेव फुटले. स्वायत्तता ही देशद्रोही मागणी असल्याचा साक्षात्कार अनेकांना झाला. फारूख अब्दुल्ला यांचे सरकार बरखास्त करावे, एवढेच नव्हे तर त्यांना तुरुंगात टाकावे अशीही आरडाओरड सुरू झाली. आम्ही नुसत्या हिंदुत्वाची गोष्ट केली तर आमचे सरकार पाडणार होते, मग अब्दुल्लाचे सरकार खाली खेचलेच पाहिजे. स्वायत्ततेच्या ठरावाची चर्चादेखील संसदेत होता कामा नये. अशी याह्याखानी भाषा सुरू झाली.

काश्मीरमध्ये आज काय परिस्थिती आहे याची सर्वांना कल्पना आहे. भारत हे तेथे जगातील सर्वांत लोकप्रिय राष्ट्र नाही हे उघड आहे. लष्करी बळाचा प्रयोग केल्याखेरीज तेथे संघराज्याचे आधिपत्य टिकणार नाही हेही सर्वांना माहीत आहे. हुरियतशी परस्पर वाटाघाटी करण्यास भारत सरकार तयार झाले

याबद्दल नॅशनल कॉन्फरन्स्च्या नेत्यांना हर्षाच्या उकळया फुटल्या नाहीत हेही उघड आहे. अशा परिस्थितीत फारूख अब्दुल्ला काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि भविष्यातही तो तसाच राहील; भारतीय राज्यघटनेच्या चौकटीतच काश्मीरचे भविष्य ठरेल असे दोन्ही हात उभारून सांगतात यात भारतीयांना समाधान वाटावे. पाकिस्तानी टेलिव्हिजन आणि वर्तमानपत्रे पाहिली तर फारूख अब्दुल्लांच्या या वक्तव्याबद्दल पाकिस्तानात किती संताप संताप झाला हे कळून येईल. फारूखसाहेबांचे नशीब असे, की भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत ते खलपुरुष ठरले आहेत.

भारतीयांतील दूरदर्शी मुत्सद्दीपणा गेला कोठे? खरे पाहिले तर स्वायत्ततेचा हा प्रश्न संसदेत चर्चेला घेतला गेला असता, हा काश्मीरी ठराव आणि पंजाबसंबंधीचा आनंदपूर साहिब ठराव यांच्यातील काही कलमे गाळून राज्ये आणि पंचायत राज्ये यांना वाढीव अधिकार दिले असते तर ते शहाणपणाचे ठरले असते.

पहिली गोष्ट : काश्मीरसंबंधीची व्यवस्था इतर राज्यांच्या बरोबरीने केल्यामुळे काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याचे आणखी स्पष्ट झाले असते. त्याहूनही महत्त्वाची आणखी एक गोष्ट : खुल्या व्यवस्थेच्या काळात शक्य तितके सारे निर्णय शक्य तितक्या खालच्या विकेंद्रित पातळीवर घेतले जावेत हे मान्यवर तत्त्व आहे. म्हणजे, स्वायत्ततेचा सिद्धांत मान्य करून तपशिलात बदल करून संपूर्ण संघराज्यात ते तत्त्व लागू केले असते तर 'आम के आम, गुठली के दाम' असा सगळा लाभच लाभ झाला असता. परंतु, हा मार्ग आता जवळजवळ बंद झाला आहे. संसदेत स्वायत्ततेचा ठराव चर्चेला येणे आता दुष्कर झाले आहे. सुदैवाने, प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी अजूनही, हा प्रश्न संसदेत चर्चेला यावा या भूमिकेस धरून आहेत.

राज्यघटनेप्रमाणे, भारत हे संघराज्य आहे; तत्त्वतः, सार्वभौमत्व राज्यांकडे आहे आणि राज्यांनी संघ स्थापन केलेला आहे. पण, भारतीय नागरिक आणि नेते – दोघांच्याही मनांत केंद्र शासन जास्तीत जास्त मजबूत असावे ही भावना मोठी तीव्र आहे. अमेरिका हेही संघराज्य आहे. तेथील कोणतेही घटक राज्य फुटून जाण्याची भीती कोणालाही वाटत नाही. उलट, जगातील अनेक देश, शक्यता असती तर अमेरिकेतील एक राज्य होण्यास आनंदाने तयार होतील.

भारत हे काही 'एकमय लोक' या अर्थाने 'राष्ट्र' नाही. साम्राज्यशाहीच्या ऐतिहासिक अपघातामुळे बांधली गेलेली ती एक आवळयांची मोट आहे. खानदान जुने, पण पडत्या अवस्थेत आले म्हणजे सख्खे भाऊभाऊसुद्धा फुटून वेगळे

होऊ पाहतात, वयोवृद्ध वडीलधाऱ्या माणसांचा अधिकार चालेनासा होतो तशी काहीशी परिस्थिती देशात झाली आहे. देश अखंड ठेवायचा असेल तर केंद्र मजबूत पाहिजे आणि कोणी फुटून जाण्याची भाषा केली तर त्याला कठोरपणे धडा शिकवला जाईल ही भूमिका लोकांनाही भावते.

कोणत्याही राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना खऱ्याखुऱ्या अर्थाने विकेंद्रीकृत सत्तेचे संघराज्य बनावे असे मनापासून वाटत नाही. याचे खरे कारण असे, की कोणताही राजकीय पक्ष संघपक्ष नाही. राज्य पातळीवरच्या नेत्यांना हुजऱ्यांपलीकडे फारशी प्रतिष्ठा नाही. 'राष्ट्रीय' म्हणवणाऱ्या पक्षांचे 'अखिल भारतीयत्व' हे बहुतांशी व्यक्तिमत्व, खानदान आणि ऐतिहासिक अपघात यांमुळे अखिल भारतीय स्थान प्राप्त झालेल्या नेत्यांनी लादलेले आहे. खरे म्हणजे, राज्याराज्यांना स्वायत्तता दिली तर त्यामुळे अर्थकारण सुधारेल. देश पडत्या अवस्थेतून वैभवाकडे वाटचाल करू लागला तर फुटून जाण्याची भाषा सोडाच, पण पूर्वी वेगळे झालेले लोकसुद्धा संघराज्यात येण्याची स्वप्ने पाहू लागतील. दुर्दैवाने, अशी दूरदृष्टी भारतीय लोकांत नाही आणि नेत्यांतही नाही.

अशा परिस्थितीतून राजकीय शोकांतिका जन्म घेतात. भारतासमोर काश्मीर ही एक मोठी समस्या आहे असे म्हटले जाते. वास्तविक पाहता, काश्मीरपुढे भारत ही एक मोठी समस्या आहे असे म्हणणे अधिक योग्य होईल. स्वातंत्र्याच्या पहाटेपासून काश्मिरी लोकांनी भारताची साथ केली आहे. त्यांच्या सहयोगाखेरीज भारतीय लष्करालाही तेथे टिकणे शक्य झाले नसते. भारतीय प्रशासनातील भ्रष्टाचार, अन्याय सारा सहन करूनही सर्वसामान्य काश्मिरी पाकिस्तानमध्ये जाऊ इच्छीत नाही, स्वतंत्र होऊ पहातो. काश्मीरची अवस्था, प्रेमाने लग्न करावे आणि नवऱ्यानेच कोणा परपुरुषाशी संबंध असल्याचा आरोप करून छळ करावा अशा अवस्थेतल्या स्त्रीसारखी झाली आहे. भले केंद्रित व्यवस्था अकार्यक्षम, भ्रष्ट, जुलमी असो, भले काश्मीरच्या निमित्ताने विकेंद्रीकरण आणण्याची सुवर्णसंधी मिळत असो – काश्मीरबाबत काही तडजोड होत आहे असा संशय आला तरी 'आम्ही कल्याणाचा मार्ग स्वीकारणार नाही' अशी काहीशी आडमुठी याह्याखानी भूमिका जातीयवादी पक्ष आणि नेते घेत आहेत.

स्वायत्ततेचा प्रश्न राज्यांच्या अधिकारांच्या संबंधात चर्चेला येतो त्यामुळे, साहजिकच, त्या मागणीला फुटीरतेचा वास येऊ लागतो. स्वायत्ततेचा प्रश्न देशाच्या एकात्मतेला स्पर्श न करता चर्चेला घेता येऊ शकेल.

राज्यघटनेप्रमाणे शेती हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय आहे, पण त्यासंबंधी

काही विषय केंद्राच्या कक्षेत येतात. शेतीमालाच्या किमती, शेती तंत्रज्ञान व संशोधन, शेतीमालाची आयातनिर्यात, ग्रामीण विकास, उर्वरके आणि रसायने, पाणी, मालमत्तेचा हक्क असे सारे विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. एकूण सातआठ मंत्रिमंडळांत तरी शेती हा विषय ओरबाडून ओरबाडून टाकण्यात आला आहे. परिणाम असा, की शेतीचे उत्पन्न वाढविण्याचा सारा प्रयास राज्ये करतात, पण श्रेय मात्र केंद्र शासनाला मिळते. याउलट, शेतकऱ्याला ज्या ज्या सुलतानीचा म्हणून त्रास होतो ते सर्व  निर्णय केंद्र शासन घेते आणि दोष मात्र राज्य शासनांच्या माथी पडतो. शेती हा विषय केंद्र शासनाकडून मुळातूनच काढून घ्यावा. तो राज्य शासनाकडे पूर्णांशाने सोपविला तर शेती, शेतकरी आणि देश यांचे भलेच होईल.

राज्यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न मुत्सद्दीपणाच्या अभावाने बाजूस पडला आहे. शेती आणि इतर तदनुषंगिक विषयातील केंद्र शासनाचा हस्तक्षेप कमी करून राज्यांकडे अधिक सत्ता द्यावी असा प्रस्ताव फारूखसाहेबांइतक्या धडाडीने कोणी मांडला तर या सगळ्या वादंगास विधायक स्वरूप येऊ शकेल.

मी संसदेत नाही, कोणत्याही राजकीय पक्षात नाही; तरीही, माझ्या हाती जी काही संधी आणि साधने येतील त्यांचा वापर मी त्या दिशेने करीन, हे नक्की.

*दि. १८/७/२०००*

■■

# नाजापुत्रम् बलिम् दद्यात

एकाच आठवड्यातील दोन घटना.

पहिली घटना. ९ जुलै २०००. भारताचे वित्तमंत्री माननीय यशवंतरावजी सिन्हा गरजले, यापुढे कार्जबुडव्यांची गय केली जाणार नाही. बँकांच्या सर्व अधिकाऱ्यांना तंबी देण्यात आली आहे, की यापुढे कर्जवसुलीचे काम समाधानकारकरीत्या झाले नाही तर त्यांना 'व्यक्तिशः' जबाबदार धरले जाईल. कर्जदारांशी बोलणी करा, परतफेडीची निश्चित योजना बनवा, नाही तर कर्जदारांना कोर्टात खेचा. यापुढे दयामाया म्हणून दाखविली जाणार नाही.

दुसरी घटना. १० जुलै २०००च्या वर्तमानपत्रांत पुण्याच्या कृषि उत्पन्न बाजार समितीने एक सूचना जाहिरात म्हणून छापली आहे. शेतीमालाचे खरेदीविक्रीचे सर्व व्यवहार बाजारपेठेच्या आवारातच होतील; त्या व्यतिरिक्त अन्यत्र खरेदीविक्री कोणासही करता येणार नाही. असा व्यवहार करताना कोणी आढळून आल्यास तो 'शेतीमाल' वाहतुकीच्या वाहनासकट जप्त करण्यात येईल.

शेतीमालाच्या विक्रीवर किती क्रूर बंधने घालण्यात आली आहेत हे या सूचनेने पुन्हा एकदा लक्षात आणून दिले आहे. त्यामुळे, यशवंत सिन्हांच्या क्रोधाचे कारण समजणे थोडे अधिक सुकर होईल.

वित्तमंत्री एवढे उखडले कशाने? कारण असे झाले. लोकसभेतील काही खासदारांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रचंड थकबाकीबद्दल लोकसभेत चर्चा व्हावी असा प्रस्ताव मांडला. वित्तीय तूट ही एक गंभीर समस्या होऊन बसली आहे. त्यातच हजारो कोटी रुपयांची कर्जे बुडीत झाली तर परिस्थिती आणखीनच बिकट होईल अशी त्यांना चिंता वाटते.

या प्रश्नावर अर्थमंत्रालयाने एक टिप्पणी प्रसिद्ध केली आहे. मुद्राराक्षसाचे विनोद, जुळाऱ्यांची पेंग, व्याकरणातील चुका आणि अंकगणितातील गोंधळ हे

सारे बाजूला ठेवले तरी टिप्पणीचा मथितार्थ काढणे सोपे नाही.

प्रश्न थोडक्यात असा. बँका ठेवीदारांकडून व्याजाने पैसे घेतात. दुसऱ्या बाजूस गरजू उद्योजक, व्यापारी, शेतकरी इत्यादींना व्याज घेऊन कर्जे देतात. बँकेच्या व्यवस्थापनाचा खर्च आटोक्यात असला तर मिळणारे व्याज आणि द्यावयाचे व्याज यांची तोंडमिळवणी जमते. व्यवस्थापन उच्च कोटीचे असेल तर ठेवींच्या रकमेपेक्षा दिलेल्या कर्जाची रक्कम अनेक पटींनी अधिक असू शकते. भारतातील बँका ठेवींच्या गुणाकाराच्या खटाटोपात फारशा पडत नाहीत. ठेवीदारांना द्यावयाचे व्याज आणि प्रशासकीय खर्च यांच्या बेरजेपेक्षा कर्जदारांनी व्याजापोटी दिलेली रक्कम जास्त असली, की फायदा झाल्याचा आनंदोत्सव होतो. कर्जदारांनी व्याज बुडविले तर पंचाईतच आणि मुद्दलाची परतफेड करायला काचकूच केली तर बँकांच्या पोटावरच पाय येतो.

अलीकडच्या आकडेवारीप्रमाणे, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी दिलेल्या कर्जांपैकी रु. ५२ हजार कोटी परत मिळण्याची शक्यता नाही. थोडक्यात, ही कर्जे भाकड झाली. सहा महिन्यांच्या वर व्याजापोटी किंवा मुद्दलापोटी काहीच रक्कम भरली गेली नाही म्हणजे ती कर्जे अनुत्पादक किंवा साध्या भाषेत भाकड धरली जातात.

कोणताही खराखुरा बँकर एवढ्या मोठ्या प्रमाणावर कर्जे थकू लागली तर चिंताग्रस्त होऊन जाईल. सरकारी बँकांचे प्रमुख म्हणजे अखेरीस नोकरदार. त्यांना असल्या गोष्टींची चिंता करण्याचे काहीच कारण नाही. सगळे काही आलबेल आहे असे दाखविण्याकरिता ते कागदी घोडे नाचवू लागतात. आजचा दिवस निघाला, पुष्कळ झाले. बँक बुडायची वेळ येईल त्या वेळी जे कोणी खुर्चीवर असतील ते चिंता करतील. बुडीत कर्जांच्या श्रेणी ठरविण्यात आल्या. शंकास्पद कर्जे, असमाधानकारक कर्जे आणि बुडीत कर्जे असे उपप्रकार, कर्जाची परतफेड किती काळ झालेली नाही त्या आधाराने पाडण्यात आले.

खुद्द भाकड कर्जातच वट्ट भाकड कर्जे असा श्लेष काढण्यात आला. कर्जदाराने व्याज भरले; पण अद्याप ते त्याच्या खात्यावर जमा झालेले नाही, काही नुकसानभरपाई ठेवीच्या विम्यातून भरून निघते, शिवाय कर्ज देतानाच यातील काही हिस्सातरी बुडणारच हे लक्षात घेऊन बुडीत कर्जासाठी राखीव निधीची तरतूद करण्यात येते. बुडीत कर्जाच्या एकूण रकमेतून या सगळ्या रकमा वजा केल्या म्हणजे बाकी उरतील ती वट्ट भाकड कर्जे.

एकूण भाकड कर्जांच्या रकमांना फारसे महत्त्व नाही; वट्ट भाकड कर्जांच्या

रकमाच महत्त्वाच्या आहेत असा कांगावा बँकेतील व वित्तमंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सुरू केला आहे. ३१ मार्च १९९९ रोजी भाकड कर्जांची रक्कम होती रु. ५१,७१० कोटी. नोंद न झालेल्या फेडी व इतर तरतुदी वजा जाता वट्ट भाकड कर्जाची रक्कम उरते रु. २४,२१२ कोटी फक्त. बँकांनी ठरविले तर आकड्यांचे खेळ करून वट्ट भाकड कर्जाची रक्कम अगदी शून्यावर आणता आली असती किंवा सढळ हाताने राखीव निधी ठेवल्याने बँकांना प्रत्यक्षात फायदा झाला असादेखील देखावा करता आला असता. एकूण भाकडांपैकी रु. ७,०९५ कोटी शेतकरी कर्जदारांकडे बाकी आहेत. रु. ९,८८८ कोटी छोट्या उद्योजकांकडे बाकी आहे. ते आणि रु.५,६२४ कोटी किरकोळ कर्जदारांकडील सोडले तर बाकी सारे बुडवे कारखानदार आणि व्यापारी आहेत.

शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जात किरकोळ सूट दिली गेली तरी त्याचा गवगवा फार मोठा होतो. कित्येक कारखानदारांना शेकडो कोटी रुपयांची सूट अनेकदा दिली जाते, त्याविषयी कोणी बोलतदेखील नाही. शेतकऱ्यांना कर्ज फेडता आले नाही तर भावी बदनामीला घाबरून बिचारे विष पिऊन जीव देतात. बँकेच्या अधिकाऱ्यांना शेतकी कर्जाच्या वसुलीसाठी अनेक हत्यारे देण्यात आली आहेत. शेतकऱ्यानी माल विकला तर मिळणारी रक्कम धनको ताब्यात घेऊ शकतात, शेतजमिनीचा लिलाव मांडतात, कर्जदाराच्या घरावर धाड घालून छपरावरचे पत्रे, सायकल, एखादा रेडिओ, पंखा उचलून नेतात. कर्ज बाकी राहिले तर शेतकऱ्याला नवीन कर्ज मिळण्याची शक्यता नाही. बिगरशेतकरी कर्जदाराबाबत बँका असे काहीच करू शकत नाहीत; तसे करण्याची त्यांना इच्छाही नसते.

परिस्थितीचे गांभीर्य वित्तमंत्र्यांना पूर्णार्थाने लक्षात आले नसावे. बुडीत कर्जे देशातील अर्थव्यवस्थेच्या दुरिताचे लक्षण आहे. तेथे नुसत्या दमदाटीच्या भाषेने भागणार नाही. रक्षामंत्र्यांनी परदेशी घुसखोरी निर्दयीपणे मोडून काढण्याची भाषा वापरली तर ते समजण्यासारखे आहे. कर्जबाजारी देशबांधवांना असल्या धमक्या देऊन उपयोग काय होणार?

यापुढे बुडीत कर्जांच्या आकडेवारीवर खालपासून वरपर्यन्त कडक निगराणी ठेवली जाईल, कर्जबुडव्यांना नवी कर्जे मिळणार नाहीत अशी व्यवस्था गणकयंत्रांच्या मदतीने करण्यात येईल. सर्व महत्त्वाच्या शहरांत व्यावहारिक तडजोड शोधण्यासाठी यंत्रणा उभी केली जाईल. एवढे करूनही वसुली सुधारली नाही, तर वित्तमंत्र्यांनी आदेश दिला आहे, तोड काढा नाही तर कोर्टात दावे लावा; काही दयामाया नाही.

वित्तमंत्री यशवंत सिन्हा कितीही गरजले तरी कारखानदार व व्यापारी कर्जदारांना जेरबंद करण्याची हिंमत बँका दाखविणार नाहीत हे उघड आहे. वित्तमंत्र्यांच्या नव्या शौर्याचा सारा तडाखा बसणार तो शेतकऱ्यांना. देशात अडीच कोटी शेतकरी कर्जदार आहेत. त्यांच्या एकूण कर्जाची रक्कम ३२,००० कोटी रुपये आहे. यापैकी फक्त ७,०९५ कोटी रुपये भाकड धरता येतील. एकूण भाकडकर्जापैकी शेती कर्जे १५ टक्क्यांपेक्षा कमी आहेत. शेती कर्जापैकीदेखील बुडीत कर्जांची टक्केवारी तेवढीच कमी आहे. शेतीकर्जापैकी वट्ट बुडीत कर्जे किती? याचा वेगळा हिशोब मांडला तर ही टक्केवारी यापेक्षाही कमी भरेल. असे असले तरी जबरी वसुलीचा तडाखा शेतकऱ्यांनाच बसणार. कारण, वाघसिंहांना कोणी बळी देत नाही, बळी देतात तो शेळीमेंढीचाच. अजापुत्रम् बलिम् दद्यात.

शेतीकर्जाबद्दल आणखी एक महत्त्वाचा फरक लक्षात घेतला पाहिजे. शेती हा बुडीत धंदा आहे हे आता सर्वमान्य आहे. शासनाने ग्रामीण संरचनेकडे दुर्लक्ष केले आणि बाजारपेठेत हस्तक्षेप करून शेतीमालाचे भाव जाणीवपूर्वक पाडले हे आता सरकारी कागदोपत्री सिद्ध झाले आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे, की कर्जदार शेतकरी उत्तर ते दक्षिण आणि पूर्व ते पश्चिम विष पिऊन जीव देत आहेत, किडनीसारखे शरीराचे अवयव विकून बँकांची भर करण्यासाठी धडपडत आहेत. प्रश्न असा की, या सर्वमान्य बुडीत शेतीधंद्याला बँकांनी कर्जे दिलीच कशी? कोणताही शहाणा बँकर उघड्या डोळ्यांनी ठेवीदारांचे पैसे मातीत का लोटेल? शेतकऱ्यांना कर्जे देताना बँकेच्या नोकरवर्गाने पुरेशी अक्कलहुशारी दाखविली किंवा नाही याचा तपास होणे आवश्यक आहे. दिलेला कोटा पुरा करण्यासाठी गरजू शेतकऱ्यांकडून टक्केवारी घेऊन कर्जे दिली गेली असतील, तर अशा प्रकरणी कर्ज मंजूर करणाऱ्या नोकरदारांकडून बँकांनी नुकसानभरपाई करून घेतली पाहिजे.

पण, सामोपचाराचे सारे मार्ग अजून काही संपलेले नाहीत. सरकारी हस्तक्षेपामुळे वेगवेगळी पिके पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना किती नुकसान सोसावे लागले याची आकडेवारी सरकारी कागदोपत्री सिद्ध आहे. त्या आधाराने कोणत्याही कर्जदार शेतकऱ्याचे किती नुकसान झाले याचा हिशेब काढणे सहज शक्य आहे. सरकारी धोरणापोटी शेतकरी कर्जदाराने सोसलेले नुकसान म्हणजे उघडउघड त्याने ग्राहक, कारखानदार व इतर नागरिक यांना सरकारच्या वतीने पोहोच केलेली सबसिडी आहे. ही रक्कम त्याच्या कर्जखात्यात जमा केल्यानंतर काही देणे बाकी उरलीच तर मग कठोरपणे वसुली करण्याची भाषा वापरण्यात काही अर्थ

राहील. शेतकऱ्यांचे एकूण कर्ज रुपये ३२ हजार कोटी. सरकारी धोरणापायी १९९६-९७ या एकाच वर्षात शेतकऱ्यांनी सोसलेले नुकसान १ लाख १३ हजार कोटी रुपये आणि तरीही, शेतीतील भाकड कर्जाची रक्कम ७,०९५ कोटी रुपये. ही आकडेवारीच शेतकऱ्यांच्या सचोटीची प्रमाणपत्रे आहेत. वित्तमंत्र्यांना दंडेली दाखविण्याची खुमखुमीच आली असेल तर सर्व बाजूंनी कोंडमारा झालेला शेतकरी उसळून उठल्याखेरीज रहाणार नाही. राज्याराज्यातील शेतकरी संघटनांनी यासंबंधीच्या सूचना शासनाकडे ज्या तत्परतेने पाठवून दिल्या आहेत, ते पाहता दुर्योधनाच्या दर्पोक्तीनंतर धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र अटळ झाले याची आठवण व्हावी.

*दि. ७/६/२०००*

■■

# करीम अंडेवाल्याचे आधुनिक अवतार

सोन्याची अंडी घालणारी कोंबडी, सगळी अंडी एकाच दिवशी पदरात पाडून घेण्याच्या लालचीपोटी कापून टाकणाऱ्या अंडेवाल्याची गोष्ट लहानपणापासून सर्वांनी अनेकदा वाचली आहे, ऐकली आहे. मनुष्य इतका मूर्ख असू शकतो आणि अशा मूर्खपणापोटी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेऊ शकतो यावर विश्वासच बसत नाही. 'फार लोभ करू नये' एवढेच तात्पर्य आपण मनात नोंदवून ठेवतो आणि सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीच्या मालकाची गोष्ट विसरून जातो.

असे मूर्ख लोभी, आज २००० मध्ये पृथ्वीतलावर आहेत, आपल्या देशात आहेत. ते कोठे गल्लीबोळात अंडीकोंबड्यांचा उद्योगधंदा करीत नाहीत, तर लोकांनी निवडून दिलेल्या शासनाचे प्रमुख म्हणून सिंहासनाधिष्ठित आहेत असे म्हटले तर कोणाचा विश्वास बसणार नाही; पण हे खरे आहे. २००० सालातील ही गोष्ट कोण्या करीम अंडेवाल्याची नाही, खुद्द महाराष्ट्र शासनाची आहे. प्रश्न सोन्याच्या अंड्यांचा नाही. दोनपाच सोन्याच्या अंड्यांची किंमत होऊन होऊन अशी किती होणार आहे? त्यापेक्षा लक्षलक्ष पटींनी अधिक मूल्यवान संपत्ती देणारे साधन महाराष्ट्र शासन कापून टाकायला निघाले आहे. होणारे नुकसान काही अंड्यांचे नाही, कोट्यवधी रुपयांचे आहे. करीम अंडेवाल्याला निदान एकदम पदरात अंडी पडावीत असा विचार तरी होता; तिसऱ्या सहस्रकातील त्याच्या वारसदारांना अविवेकासाठी इतपत सज्जडदेखील काही कारण दिसत नाही.

कल्पना करा, सोन्याची अंडी घालणारी कोंबडी कोण्या करीम अंडेवाल्याऐवजी शासनाच्या हाती आली असती तर काय घडले असते?

एकदम सगळी अंडी पदरात पडावी असा खटाटोप शासन करणार नाही,

पण दररोज एकच अंडे घालण्याऐवजी कोंबडीने दोन अंडी घालावीत, ती अंडी इकडेतिकडे घालू नयेत, ठराविक वेळी ठराविक जागीच अंडी घालावी असा कायदा सरकारने केला असता; त्यासाठी कोंबडीने दाणे खावे केव्हा, पाणी प्यावे केव्हा, उठावे केव्हा, बसावे केव्हा याचा तपशीलवार दैनंदिन कार्यक्रम आखून दिला असता; तो कार्यक्रम शासकीय हुकुमानुसार पार पाडला जावा याकरिता कोंबडीच्या पायाला दोरी किंवा साखळी बांधून डांबून ठेवले असते किंवा पिंजऱ्यात ठेवले असते. कोंबडी बिचारी, इकडे तिकडे फिरावे, दाणे टिपावे अशा जगण्याला सरावलेली. अशी सरकारी बंधने तिला कशी झेपणार? तिने वैताग येऊन, सोन्याची काय साधी अंडी घालण्याचेही बंद करून टाकले असते. चालू जमान्यातले 'करीम अंडेवाले' सुरी वापरीत नाहीत, सरकारी अधिनियम वापरतात किंवा कायद्याचा बडगा पाठीत घालतात.

शेतीतील सारे उत्पादन अन्नधान्याचे असो, भाजीपाल्याचे असो की फळफळावळीचे असो त्यासाठी पाणी लागते. एकवेळ जमीन नसली तरी चालेल; पण पाण्याखेरीज जीवन असंभव – प्राणिमात्रांचे तसेच वनस्पतींचे. ज्या भागांत मोठमोठ्या नद्या वाहतात तेथे गाळपेराच्या जमिनीत मानवजातीच्या पहिल्या संस्कृती भरभराटीला आल्या. नद्यांचे पाणी थांबवून, वळवून कालव्याने, पाटाने नेऊन जेथे नद्यांचे पाणी उपलब्ध होत नव्हते तेथे ते माणसाने भगीरथ प्रयत्नाने नेले, शेती वाढवली, उत्पादन वाढवले, वाढत्या लोकसंख्येच्या पोटाला लागणाऱ्या भाकरीची सोय केली.

नद्या प्राकृतिक नकाशाप्रमाणे वाहतात. कालवा आणि पाट काढल्याने पाणी अधिक विस्तृत प्रदेशात नेता येते हे खरे; पण तरीही पाणी सगळीकडे पोहोचत नाही. प्रचंड व्याप्तीच्या प्रदेशात नद्या, कालवे, पाट यांचे पाणी पोहोचत नाही. अशा प्रदेशातील शेतीला पावसाच्या लहरीवर अवलंबून राहावे लागते.

लोकसंख्या वाढत गेली, भुकेची गरज वाढली म्हणजे हरीने घातलेल्या खाटल्यावर निचिंत पडून राहणे शक्य होत नाही, तसा माणसाचा स्वभाव नाही. कोठून दूरच्या प्रदेशातून पाणी आणण्याबरोबर जमिनीच्या पोटात प्रवेश करून तेथून पाणी वर काढावे; पाण्याचा स्वभाव खाली खाली जाण्याचा; पण त्याच्या या स्वभावावर मात करून पाण्याला वर काढण्याचा भीमप्रयत्न एक नाही दोन नाही, लक्षावधी शेतकरी शतकानुशतके करीत आलेत, करीत आहेत. पावसाचे पाणी आकाशातून पडते, समुद्राकडे वाहत जाते; सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्रसरोवरांचे पाणी वाफ होऊन वर जाते, ढग बनते आणि पुन्हा पाऊस

पडतो. असे हे चक्र चालू असते. डोंगरांतून अवखळपणे उतरणारे पाणी समुद्रात पोहोचेपर्यन्त जमिनीतील विवरांत आणि भुयारांत जाते, जमिनीत झिरपत जाते आणि जमिनीच्या पोटातही त्याची प्रचंड सरोवरे साचत राहतात.

आपल्या पिकांना पाणी मिळावे असे स्वप्न सतत पाहणारा शेतकरी जेव्हा कधी शक्य होईल तेव्हा मिळेल त्या साधनाने जमीन खणतो, जमिनीतील पाण्यापर्यन्त पोहोचतो आणि ते पाणी मोट किंवा मोटर लावून वर काढतो. सगळ्या विहिरी काही एका दमात खणून होत नाहीत. एका वर्षात किंवा काही महिन्यांत विहीर खणायची, ती बांधून काढायची हा प्रकार स्वातंत्र्यानंतर आला. पूर्वीच्या काळी विहिरीचे काम वर्षानुवर्षे नव्हे पिढ्यान्‌पिढ्या चाले. शेतीची कामे आटोपली, की घरातील मजुरीची जी काही दोनपाच माणसे, हाती येत ती कुदळी, टिकाव, फावडी, घमेली घेऊन पाण्याच्या शोधात निघत. एखाद्या वर्षी दहाबारा हात व्यासाची विहीर पाचदहा फूट खोल झाली म्हणजे सार्थक झाल्याचा आनंद साऱ्या शेतकरी कुटुंबाला वाटे. एक दिवस पाणी लागले म्हणजे मोठा आनंदोत्सव साजरा होई. पाणी लागावे यासाठी अपार सायास; पण त्याखेरीज नवस, गंडेदोरे, बाबा महाराज या सर्वांचा प्रयोग केला जाई. पाणी विहिरीत साठू लागले, की मोट बांधायची आणि बैलांच्या ताकदीने विहिरीतले पाणी उपसून पाटापाटाने ते पिकांची तहान भागविण्याकरिता न्यायचे. बैलांची मोट, त्यावरील शेतकऱ्याचे गाणे हे शेतकरी संस्कृतीचे शेकडो वर्षे प्रमुख प्रतीक राहिले.

स्वातंत्र्यानंतर चित्र पालटले. लोकसंख्या वाढत गेली. 'अधिक धान्य पिकवा'ची भाऊगर्दी चालू झाली. विहिरी खणण्याच्या कामाला मदत, सबसिडी सुरू झाली. विहिरी खणण्याकरिता बँकांची कर्जे मिळू लागली. आता घरच्या माणसांच्या घामाने खोदल्या जाणाऱ्या विहिरींचा जमाना मागे पडला. एका वेळी शंभरदोनशे मजूर खोदकाम करीत आहेत, सुरुंग उडविले जात आहेत, दगड फोडण्याकरिता यंत्रे वापरली जात आहेत असे चित्र दिसू लागले. थोड्याच काळात, जमिनीला विवर पाडण्याऐवजी सरळ एक छिद्र पाडून पृथ्वीच्या पोटातील तीनतीनशे फूट खोल पाण्यापर्यन्त पोहोचणे सहज शक्य झाले. पाणी सापडले, की त्याचा उपसा करण्यासाठी आता शंभरशंभर अश्वशक्तीच्या मोटारी वापरल्या जाऊ लागल्या. लोखंडी, सिमेंटच्या किंवा प्लॅस्टिकच्या पाइपांनी पाणी दूरवरच्याही शेतात जाऊन पडू लागले. आता शेतकरी संस्कृतीचे प्रतीक विहीर व तिच्यावरील इंजिन किंवा मोटर हे बनले. हिंदुस्थानात जी काही जमीन ओलिताखाली आहे

ती नद्यांमुळे नाही, कालव्यांमुळे नाही; निम्म्यावर ओलीत जमीन शेतकऱ्यांनी जमिनीच्या पोटातून वर काढलेल्या पाण्यामुळे हिरवी झाली आहे. सरकारी धरणे, कालवे हे अति खर्चीक काम आहे. धरणाच्या पाण्याखाली जमीन भिजवायची म्हटली म्हणजे एकरी खर्च मोठा प्रचंड. त्या मानाने शेतकऱ्यांच्या उपसा योजनांचा खर्च किरकोळ, त्यामुळे दर एकरी गुंतवणूक खूपच कमी.

कालव्याचे पाणी शेतात वाहू लागले, की पुन्हा केव्हा पाणी येईल कोणास ठावूक, अशा भावनेने पिकांना आडमाप पाणी दिले जाते, पुष्कळ वाया जाते. उपशाच्या पाण्याबाबत असे सहसा होत नाही. आपल्या विहिरीतील पाणी शेतकरी हिशेबाने, काटकसरीने वापरतो. अर्थात, धरणकालव्यांच्या सिंचनापेक्षा शेतकऱ्यांचे उपशाचे सिंचन कमी खर्चाचे, पाण्याचा हिशेबी वापर करणारे म्हणून अधिक श्रेयस्कर. धरणाचे पाणी कालव्याने मिळाले तर जमिनी खारवतात, कायमच्या बर्बाद होतात. असा उपद्रव उपशाच्या पाण्याचा नाही. हळूहळू वाहत शेतात जाणारे पाणी पुन्हा जमिनीत झिरपत जाते आणि पुन्हा खालच्या प्रदेशातील जमिनीच्या पोटातील साठ्यात जाऊन पडते. जमिनीच्या पोटातील वरच्या भागातील पाणी शेतकरी उपसतो, वापरतो आणि त्यातील नव्वद टक्के पाणी पुन्हा खालच्या भागातील भूगर्भात सोडून देतो.

जगभर उपसा सिंचनाचे श्रेष्ठत्व मान्य झाले आहे. उपशाच्या पाण्यासाठी शेतकरी स्वतः कष्ट करतो, स्वतःचे पैसे गुंतवतो. खोदण्याचे कष्ट केल्यानंतर पाणी लागेलच अशी काही शाश्वती नसते. कधीकधी सारे प्रयत्न विफल होऊन खणलेल्या खड्ड्यात डोळ्याची टिपे गाळण्याची वेळ येते. पृथ्वीच्या पोटातल्या पाण्याचा खजिना मिळविण्याचा हा जुगार शेतकरी जिवाच्या शर्थीने खेळतात.

याउलट, धरणांचे सिंचन महागडे, लाखोंना विस्थापित करणारे आणि जमिनीची बर्बादी करणारे; पण ते पुढाऱ्यांच्या मोठ्या सोयीचे असते. एखाद्या भागात कालव्याचे पाणी आणले, की मग तो मतदारसंघ पक्का झाला असे समजायला हरकत नाही. कालव्याच्या पाण्याबरोबर ऊस आला, कारखाने आले म्हणजे मग राजकारणाचा खेळ चांगलाच रंगतो. साहजिकच, पुढाऱ्यांना विहिरीच्या उपसा पाण्याचा मोठा दुस्वास वाटतो. जगातील इतर देशांत उलटी विचारधारा चालू आहे. कालव्याचे पाणी शेतात सोडूच नये, कालव्यांची वेटोळी होईल तितक्या विस्तृत प्रदेशात फिरवावी, अशा तऱ्हेने पाण्याचा झिरपा वाढवून भूगर्भातील पाणी वाढवावे, उपशाचे पाणी घेणाऱ्या शेतकऱ्याच्या पदरात अधिक पाणी टाकावे, त्या पाण्याचा वापर अधिक टाकटुकीने होत असल्याने साऱ्या देशाचा

त्यात फायदा आहे असा हा नवा विचार आहे.

'अधिक धान्य पिकवा' मोहिमेत अनेक विहिरी खोदल्या गेल्या. त्यांतील कित्येक चोरीला गेल्या तरी पाण्याचा उपसा भरमसाट वाढला. शेतात वापरलेले पाणी ज्या प्रमाणात पुन्हा जिरून भूगर्भात जायला पाहिजे त्या प्रमाणात गेले नाही. परिणामतः जमिनीच्या पोटातील तळी आणि सरोवरे झपाट्याने आटून खाली होऊ लागली. उत्तर गुजराथ आणि सौराष्ट्र येथे भूजलाची पातळी तीनशे फुटांपर्यन्त खाली गेली आहे. नागपूर परिसरात संत्र्यांचे बाग पहिल्यांदा फुलले त्या काळी पाणी तीसचाळीस फुटांवर लागत असे; आता त्याची पातळी खाली जात जात शंभर फुटांपर्यन्त गेली आणि सारी संत्र्याची शेतीच उद्ध्वस्त होत आली.

जमिनीच्या पोटातील पाण्याच्या साठ्याचा प्रश्न काहीसा भूगर्भातील खनिजे, विशेषतः पेट्रोलियम पदार्थ यांच्यासारखाच आहे. साऱ्या उद्योगधंद्यांना डिझेल, पेट्रोल लागते म्हणून मनुष्यप्राणी कोट्यवधी विवरे पाडून जमिनीच्या पोटातील पेट्रोल शोषून घेत आहे. असेच सारे चालू राहिले तर पृथ्वीच्या पोटातील पेट्रोलचा साठा संपून जाईल की काय अशी धास्ती पडली आहे. पेट्रोलचे साठे फार पुरातन काळापासून एका विशेष जैवरासायनिक प्रक्रियेने तयार होत आले. आजही कदाचित् त्यात थोडीफार भर पडतच असेल; पण ती किरकोळ. पेट्रोल साठ्यांचा उपसा प्रचंड होत आहे पण त्यात वाढ जवळजवळ नाही. त्यामुळे साहजिकच, पेट्रोलचा वापर कमी करणे, काटकसरीने करणे, गरजेपुरताच करणे यासाठी प्रयत्न होतात.

शासन आणि प्रशासन यांतील माणसांचा पेट्रोलशी संबंध अधिक, पाण्याबाबत त्यांना फारसे काही कळत नाही. पेट्रोलचे साठे टिकावे म्हणून ज्या धर्तीची उपाययोजना केली जाते तशीच काही पाण्याबद्दल केली पाहिजे अशी या पढीक पंडितांची बुद्धी असावी. पाण्याचे साठे वाढविणे सहज शक्य आहे. त्यासाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' अशी घोषणा दिली होती. पण, असल्या कार्यक्रमांत नोकरशहांना काही लभ्यांश नाही; त्यांनी त्यात काही फारसा रस घेतला नाही. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावतच राहिली. दर वर्षी उन्हाळ्यात पाण्याच्या टँकर्सची धावपळ केल्याशिवाय माणसांना जगविणे मुश्कील झाले आहे.

परिणाम काय? करीम अंडेवाल्याच्या बुद्धीचे सरकार शतकानुशतके सोन्याची अंडी देणारी कोबडी कापून टाकायला निघाले आहे. महाराष्ट्र शासनाने एक

मसुदा विधेयक प्रसृत केले आहे. विधानसभेच्या पुढील अधिवेशनात ते मंजुरीसाठी सभागृहात येईल.

विधेयकाच्या तरतुदीनुसार, यापुढे विहीर खणायची झाली तर शेतकऱ्यांना सरकारची परवानगी घ्यावी लागेल. विहीर खणण्याचे कामही सरकारकडे नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडूनच करवून घ्यावे लागेल. विहिरीत उतरणारे पाणी नदीतून, कालव्यातून उतरत असेल तर ते पाणी सरकारी असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा त्या प्रमाणात मोबदलाही द्यावा लागेल. शेतकरी त्याच्या इच्छेप्रमाणे आणि आवश्यकतेनुसार पिकांना पाणी देऊ शकणार नाही; त्यासाठी सरकारी परवानगी काढावी लागेल. परवानगी मिळण्यासाठी तीन महिने आधी अर्ज करावा लागेल; परवानगी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष वापरात काही फेरफार झाले तर त्यासाठीही वेगळा परवाना मिळवावा लागेल. एखाद्या वेळी सरकारला वाटले, की अमुक एक भागात पाण्याचा तुटवडा आणखी तीव्र होणार आहे तर त्या भागातील विहिरींतील पाण्याच्या वापरावर निर्बंध घालण्याचा किंवा त्या पूर्णतः ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारकडे राहणार आहे आणि या अधिनियमाच्या आधारे होणारी कोणतीही सरकारी कार्यवाही कोण्या शेतकऱ्यास अन्यायकारक वाटली तरी त्याला न्यायालयाचे दार ठोठावण्याची मुभा मिळणार नाही अशी ठोस तरतूदही या अधिनियमातच करण्यात येणार आहे. निर्बन्धांचे पालन न करणाऱ्यांना दंड आणि / किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याचे अधिकारही सरकार या अधिनियमाने आपल्या हाती घेणार आहे.

धरणकालवे बागायतीत आडमाप पाणी वापरले जाते तेथे पाण्याचा पुरवठा मोजमाप करून द्यावा आणि त्यावर योग्य ते शुल्क आकारले जावे अशी योजना गेली अनेक वर्षे तज्ज्ञ सुचवीत आहेत. धरणाच्या पाण्याचा हिशेब ठेवण्याची पद्धतसुद्धा अमलात आणण्यास कांकू करणारे सरकार, स्वतःच्या खर्चाने नुकसानीचा धोका घेऊन विहिरी खणून, त्यांच्या उपशावर बागयत करणाऱ्या शेतकऱ्यांवर मात्र इतकी कठोर रेशनिंग व्यवस्था लादते आहे.

लोकमान्य टिळकांनी म्हटले असते, सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? सुदैवाने, सरकारी विधेयकाच्या प्रस्तावाने शेतकरी खडबडून जागा झाला आहे आणि हातात रुमणे घेऊन रस्त्यात उतरू लागला आहे. पंजाबसारख्या राज्यात मुबलक पाणी आहे. तेथे असला क्रूर कायदा येणार नाही. महाराष्ट्रासारख्या प्रामुख्याने कोरडवाहू राज्यालाच या सुलतानशाहीचा बडगा बसणार आहे. या कारणाने शेतकरी संतप्त झाले आहेत. पाणी विषयातील सर्व जाणकारांनी या

सरकारी योजनेचा धिक्कार केला आहे. ९ ऑगस्टच्या क्रांतिदिनापासून महाराष्ट्रातील शेतकरी राज्यकर्त्या आघाडीच्या आमदारांच्या घरांना घेराव घालून प्रशिक्षणाने आमदारांचे मतपरिवर्तन करण्याचे अभिनव आंदोलन करणार आहेत. या आंदोलनानेतरी सरकारचे डोके ठिकाणावर येईल अशी आशा आहे.

जमिनीच्या पोटातील पाणी कमी होत आहे. परिस्थिती गंभीर आहे. पेट्रोल नसेल तर गाड्या बंद पडतील, पाणी नसेल तर जीवनच अशक्य होईल. कोणाही शहाण्या माणसाची अशा परिस्थितीत भूमिका काय राहील? पेट्रोलचे साठे वाढविता येत नाहीत, पण पावसाचे पााणी अडवून, जिरवून भूगर्भातील पाण्याचे साठे वाढविता येतात. यासाठी काही तंत्रज्ञान उपलब्ध आहे. पण, जमिनीतील पाण्याचे साठे वाढविण्याच्या कल्पनेत नोकरदारांना काहीही स्वारस्य असणार नाही. कारण असल्या कामातून त्याना काही सुटत नाही. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करण्याच्याऐवजी रेशनिंगसारखी व्यवस्था अवाढव्य खर्च करून राबविणे नोकरशहांना अधिक भावते, हा जुना अनुभव आहे. त्याचीच पुनरावृत्ती आता पाण्याच्या बाबतीत होत आहे. जमीन, तिच्या पोटातील खनिजे, नद्या, त्यांचे पाणी ही सर्व राजाची मालमत्ता असते असा एक जुनाट सिद्धांत आहे. शेतजमीन शेतकऱ्याच्या मालकीची नसते. वेगवेगळ्या पद्धतींनी ती शेतकऱ्यांना वापरासाठी कृपावंत होऊन दिलेली असते. जमिनीच्या पोटात शेतकऱ्याला पेट्रोल सापडले, सोने सापडले, एखादा मोहोरांचा हंडा सापडला तर त्याची मालकी सरकारकडे जाते; त्यावर शेतकऱ्याला काही हक्क सांगता येत नाही. याच पुरातन न्यायाने जमिनीतील पाणी राजाच्या किंवा आधुनिक काळातील सरकारच्या मालकीचे होते. आजपर्यन्त आपल्या या संपदेची जाणीव सरकारला झाली नव्हती. आता ती झाली ती संपदा वाढविण्याकरिता, जोपासण्याकरिता नव्हे तर तुटवड्याच्या निमित्ताने लोकांना हैराण करून नोकरदारांना अजून मालेमाल होता यावे या बुद्धीने.

विधेयकातील तरतुदी अत्यंत कठोर आणि मूर्खपणाच्या आहेत. अशा तऱ्हेची योजना पागलखान्याच्या बाहेरील कोणी मांडेल यावर विश्वास ठेवणेही कठीण आहे. सारांश सांगायचा झाला तर सरकारने पाण्यावरही जीवनावश्यक वस्तूंचा कायदा लागू केला आहे आणि राज्यघटनेच्या नवव्या अनुसूचीमध्ये आणखी एका कायद्याची भर घालून न्यायदेवतेचा दरवाजा शेतकऱ्यांच्या दृष्टीने आणखी घट्ट लावून घेतला आहे.

*दि. २६/७/२०००*

■■

# स्पायरॉसिस साथीचा इशारा

मुंबईला अलीकडे एक परिसंवाद झाला. परिसंवादाचा विषय होता 'आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेच्या लवकरच सुरू होणाऱ्या वाटाघाटींत भारताने काय भूमिका घ्यावी?' सुरुवातीची लांबलचक निरर्थक भाषणे होऊन गेली. मंत्री आणि त्यांचे संत्री चहापानानंतर निघून गेले. मग, गंभीर चर्चेला सुरुवात झाली. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा अनेकांनी मांडला, तो थोडक्यात असा :

खुलेपणा, जागतिकीकरण या संज्ञांना आपण फार गंभीरपणे घेतो. आपल्या उद्योजकांना फटका बसत असला तरी आयात व्यापारावरची बंधने उठवितो. इतर देश, विशेषतः अमेरिका व युरोपातील श्रीमंत देश असल्या तत्त्वांची फारशी पत्रास ठेवीत नाहीत. त्यांच्या उद्योजकांना आणि अर्थव्यवस्थेला फायदेशीर असतील तेवढेच निर्बन्ध ते शिथिल करतात. या पलीकडे जाऊन, भारतासारखे देश त्यांच्या देशांत निर्यात करू लागले आणि त्यामुळे त्यांच्या उद्योगधंद्यांना त्रास होऊ लागला तर काहीही निमित्त काढून अशा आयातीवर ते बंदी घालतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानातून येणारी फळे, भाजीपाला पुरेशा स्वच्छ अवस्थेत येत नाहीत, त्यामुळे तेथील सार्वजनिक आरोग्यास धोका संभवतो असा कांगावा करून ते आयात बंद करवतात. थोडक्यात, जागतिकीकरण व खुली बाजारपेठ या संकल्पना खऱ्या अर्थाने घेणे भारताला परवडणारे नाही. म्हणून, आपणही 'येन केन प्रकारेण' परदेशांतून आयात होणाऱ्या मालावरही बंधने घातली पाहिजेत. अगदी बंदीच घालता नाही आली तर, निदान चढ्या दराने त्यांच्यावर आयातशुल्क लावले पाहिजे. इत्यादी, इत्यादी.

श्रीमंत राष्ट्रे त्यांच्या देशात येणारा माल स्वच्छ असावा, त्यात रोगराईचे जंतू येऊ नयेत अशी अपेक्षा ठेवणार यात चूक काय आहे? आपल्याकडील निर्यातदारांनी जागतिक आरोग्य संघटनेचा दर्जा राखून मालाची निर्यात का करू नये?

श्रीमंत राष्ट्रे रोगराईचा खराखुरा धोका संभवतो तेथेच आक्षेप घेतात, बंदी घालतात असे नव्हे. त्यांना जी आयात अडचणीची वाटते तेथे असा रोगराईचा खोटा बागुलबुवा ते उभा करतात. द्राक्षे, आंबे, विशेषतः हापूससारखे आंबे यांत रोगराईचा धोका तो काय असणार? पण, या मालांचे पेटारेच्या पेटारे परत आले आहेत किंवा नष्ट केले गेले आहेत. त्यामुळे दुसरा एक दीर्घकालीन परिणाम होतो. अमक्या देशातील माल आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित नसल्याने नष्ट करण्यात आला अशा बातम्या वर्तमानपत्रांत झळकल्या किंवा अशा अफवा जरी पसरल्या, तरी त्या देशांतील चोखंदळ ग्राहक बदनाम देशातील कोणताही माल घ्यायलाच तयार होत नाहीत. काही काळानंतर वादावादी होऊन बंदी उठली तरी पुन्हा बाजारपेठ काही हाती येत नाही. कारण, तेथील ग्राहकच स्वेच्छेने वृथा बदनाम देशातील मालाचा बहिष्कार करतात.

मुंबईतील या परिसंवादाच्या अध्यक्षमहाराजांनी समारोप केला, युग खुलेपणाचे आले आहे हे निःसंशय. यापुढे आता कोणी म्हटले तरी घड्याळाचे काटे आणि दिनदर्शिकेची पाने उलटी फिरविता येणार नाहीत; स्पर्धेला सामोरे जावेच लागेल. पण, भारताने पावले बेताबेताने, पूर्ण सावधानी घेऊन टाकली पाहिजेत.

म्हणजे नेमके काय करायला पाहिजे? या प्रश्नाचा गुंता मनातल्या मनात सोडवीत मी निघालो. तयार कपड्यांची निर्यात करणाऱ्या कारखानदाराने त्याच्या कचेरीत येण्याचा आग्रह केला, त्याच्याबरोबर गेलो. वाटेत त्या कारखानदारमित्राने परिसंवादाचा सूर चालूच ठेवला, फळे आणि भाजीपाला सोडून द्या हो! आमच्या तयार कपड्याचे पेटारेच्या पेटारे, आरोग्यास विघातक म्हणून परत येतात. आता सांगा, कशी काय स्पर्धा करायची या बदमाश श्रीमंत राष्ट्रांबरोबर?

कारखानदाराच्या कार्यालयात पोहोचलो. साहेबांचा कारभार मोठा. टेबलाभोवतीचे अनेक फोन घणघणू लागले. साहेब फक्त महत्त्वाचे फोन घेत; बाकीचे फोन त्यांचे सचिव, निजी सचिव, अव्वर सचिव वगैरे मंडळी घेत होती. साहेब स्वतः एका दूर देशातील ग्राहकाशी बोलत होते. काही कागदपत्रे पाठविण्यासाठी तिकडून फॅक्स् टोन मागितला गेला असावा. विजेचा पुरवठा खंडित होता; एरव्हीही अनेक वेळा असतो, त्या दिवशी म.रा.वि.मं.च्या संपामुळे खंडित असावा. वीज परत केव्हा येईल याची काहीच शाश्वती नव्हती. साहेबांनी मोठ्या विनम्रपणे परदेशी ग्राहकाला सांगितले, छे, छे! आपल्याला त्रास कशाला? आपण कागद 'फॅक्स्' मशीनमध्ये ठेवा, मी इकडे 'पुल' करून घेतो.

मला आश्चर्य वाटले. ग्राहकाच्या खर्चाने फॅक्स् येत असताना 'पुल' करून

ते ओझे साहेब आपल्या डोक्यावर का घेताहेत! खर्चाची रक्कम एकूण कारभाराचा आवाका पहाता तशी किरकोळ. पण, साहेबाची ख्याती पैशाची टाकटुकी करण्याबद्दल होती. मग, हे काय नवल वर्तले?

साहेबांनी आपणहूनच स्पष्टीकरण दिले, त्यांना काय सांगू? येथे वीज नाही म्हणून सांगू? आपल्याकडे दिवसातून दहा वेळा वीज जाते आणि सार्वजनिक सेवांतील नोकरवर्गही केव्हाही संपावर जातो हे त्यांना मी सांगितले तर ते माझ्याबरोबरचे संबंधच तोडून टाकतील. आम्ही विणकामाचे कपडे तयार करतो. प्रत्येक वेळी वीज बंद पडली, की सारी यंत्रे थंडावतात. पर्यायी व्यवस्था असली तरी मध्ये थोडासा काळ जातोच. त्यामुळे आमच्या विणकामात एक लहानसा दोष राहतो. आम ग्राहकाच्या तो लक्षातही येत नाही, पण जाणकारांच्या नजरेतून तो सुटत नाही. रोगराईच्या धोक्यामुळे माल परत येण्याचे प्रकरण आताच कोठे आटोपते आहे, त्यात ही नवीन भानगड उपटली, तर मग आमचा कारभारच आटोपला.

विदेशी सारे बदमाश आणि आपण मात्र सारे स्वच्छ धुतल्या तांदळासारखे अशी आपली सर्वांची खात्री असते. माझ्या राहत्या जागी परतलो. दूरदर्शनवर, मुंबईतील नव्या गूढ साथीच्या आजाराने २६ माणसे दगावली आणि हजारो माणसे इस्पितळांत तपासणीसाठी भरती होताहेत, अशी बातमी होती.

नुकताच मुंबईत बेसुमार पाऊस झाला. गटारे, नाल्या तुंबल्या. रस्त्यांच्या नद्या झाल्या, लोहमार्ग पाण्याखाली गेले. चांगल्या चांगल्या वस्तींतही पाणी पार बाहेरच्या दाराच्या उंबऱ्यापार्यन्त येऊन पोहोचले. साहजिकच, पाणी उंदीरघुशींच्या बिळांतही घुसले. परिणामी, मुंबईभर वाहणारे पाणी उंदीरघुशींच्या विष्ठेने व मुताने भरलेले होते. हजारो माणसे अशा पाण्यातून चालत राहिली. भायखळ्यासारख्या भाजीबाजारात अशा पाण्यातच बुचकळून भाजीपाला, फळे स्वच्छ करून खरेदीसाठी ठेवण्यात आली. या प्रदूषणाचा काहीही अंश नागरी पुरवठ्यात उतरणे शक्यच नव्हते असे छातीठोकपणे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त साहेबही विश्वासाने सांगू शकणार नाहीत.

मी जे दूरदर्शनवर पाहतो आहे, ऐकतो आहे हे जर आमच्या कपडा निर्यातदार साहेबांच्या विदेशी ग्राहकाने ऐकले, पाहिले तर भारतीय माल घेण्यास तो कितपत उत्सुक राहील असा विचार साहजिकच मनात आला.

मागे सूरत शहरात प्लेगने हैदोस घातला. तिथल्या कारखानदारीवर आणि निर्यात व्यवसायावरही मोठा विपरीत परिणाम झाला. त्या वेळीही हा प्रश्न उभा

राहिला होता. ज्या देशात अजून प्लेगसारखा साथीचा रोग पसरतो त्या देशाने आपण आधुनिक राष्ट्र असण्याची कितीही बतावणी केली तरी विदेशी ग्राहकाच्या मनाचे समाधान होईल काय? त्यानंतर सूरतमध्ये कोणी एक नवीन तरुण कर्तबगार आयुक्त साहेब आले. लोकांच्या सहकार्याने त्यांनी मोठे धूमधडाक्याचे अभियान चालविले आणि थोड्याच दिवसांत सूरत हे आशिया खंडातील सर्वांत स्वच्छ शहर असल्याचा बोलबाला होऊ लागला. प्रत्यक्ष पाहण्यासाठी मी सूरतला गेलो, तेवढ्यात त्या आयुक्तांची बदली कोण्या दुसऱ्या ठिकाणी झाली होती.

मुंबईतील या नव्या रोगाची साथ आटोक्यात आणायची असेल तर काही किमान कार्यक्रम तातडीने पुरा करावा लागेल. मुंबईतील केरकचरा आणि सांडपाणी यांच्या निचऱ्याची व्यवस्था दुपटी तिपटीने मोठी करावी लागेल. मस्जिद बंदर इत्यादी भागांत लोहमार्गाच्या बाजूने एवढ्या मोठ्या आकाराच्या घुशी मनमानी करीत फिरताना दिसतात, की ही छोट्या बांध्याची डुकरांची काही उपजाती तर नव्हे, असा संशय यावा. उंदीर, घुशी संपविण्याची प्रचंड मोहीम हाती घ्यावी लागेल. त्यासाठी मनेकादी पर्यावरणवाद्यांनादेखील मुसक्या बांधून ठेवावे लागेल. अखेरीस, मुंबईचा नागरी प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईत 'जगण्या'साठी येणाऱ्या लोकांचा महापूर थांबवावा लागेल; एवढेच नाही तर उलटवावा लागेल. साथीचा रोग लहानसा; पण त्याचा बंदोबस्त करावयाचा असेल तर गेल्या पन्नास वर्षांतील यच्चयावत् आर्थिक-सामाजिक धोरणांना उलटवावे लागेल. अन्यथा, सभ्य राष्ट्रांच्या पंक्तीत भारताला प्रवेश मिळण्याची शक्यता नाही.

कोणाही मुलीचा बाप किंवा आई मुलगी दाखवायला न्यायची म्हणजे तिच्या गुणांचे यथार्थ आणि अवास्तव गुणगान करतातच; त्याहीपेक्षा, तिचे दोष सहजी दिसून येणार नाहीत असे प्रयत्न करतात. रंग थोडा उजळ दिसावा, डोळ्यातील तिरळेपण लक्षात येऊ नये, उंची थोडी अधिक दिसावी इत्यादी इत्यादी, राम गणेश गडकऱ्यांच्या बाळकरामाने ठकीच्या वधूपरीक्षेत सांगितलेले सर्व उपाय केले जातातच. मुलगी आजारीच असली, क्षयाची किंवा कोड इत्यादीची बाधा असली तर मग विचारायलाच नको!

जागतिकीकरणात भारताची परिस्थिती काहीशी अशीच आहे. आपला माल आपण पसंतीसाठी नेतो तो चांगल्यात चांगला बनवून नेण्याची शर्थ उद्योजक हरप्रकारे करतात. पण, त्यांच्या प्रयत्नांना काही मर्यादा आहेत. घाणीने बरबटलेल्या, उंदीरघुशींचा सुळसुळाट असलेल्या, पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था नसलेल्या,

पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नसलेल्या व दिवसातून दहा वेळा वीज खंडित होणाऱ्या शहरात जागतिक दर्जाचा माल तयार होणे जवळजवळ अशक्य आहे.

आपली ही अशी स्थिती आहे याबद्दल मी झोड उठवू इच्छित नाही. इतिहासाचे वास्तव नाकारण्यात काय हशील आहे? पण या सगळया दोषांवर पांघरूण घालायचे, आमच्यात तसे दोष नाहीतच असा आक्रोश करायचा, उलट विदेशी मंडळीच खोडसाळ आणि बदमाश आहेत असा गिल्ला करायचा आणि त्याहीपेक्षा मोठे पाप म्हणजे, अशा अभिनिवेशापोटी, आत्ता आत्ता साऱ्या जगाचे श्वास मोकळे करू लागलेल्या खुलेपणाला कोलदांडा घालायचा नतद्रष्टपणा राष्ट्रवादाच्या नावाखाली करायचा या प्रवृत्तीबद्दल मला दुःख वाटते. आपले दोष मान्य करून ते दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला तर, कदाचित्, एक दिवस आपण सभ्य आणि स्वच्छ देशांच्या पंक्तीत आपले 'सोवळे' टाकू शकू. अन्यथा, या बोगद्याच्या पलीकडील उजेड आजतरी डोळयास दिसण्यासारखा नाही.

मुंबईच्या 'स्पायरॉसिस' आजाराच्या साथीचा हा निर्वाणीचा इशारा आहे.

*दि. ५/८/२०००*

■■

# फिजीतील भारतीय आणि भारतातील फिजीयन

दुसऱ्या देशात जन्म घेतल्याने त्या देशाचे नागरिकत्व असलेला माणूस भारतीय नागरिकत्व घेतल्यानंतर तरी राष्ट्राची महत्त्वाची अधिकारपदे घेण्यास पात्र असावा काय? या प्रश्नावर चर्चा चालू आहे; एक जवळजवळ सबंध राष्ट्रीय पक्ष केवळ याच मुद्द्यावर उभा राहू पाहतो आहे. जन्म येथला नाही; पण वर्षानुवर्षे भारतात निवास आहे, येथील सार्वजनिक, राजकीय आयुष्यात जनमान्य स्थान आहे अशांनाही देशाचे पंतप्रधानपद मिळू नये असे काही, त्या पदावर आपला हक्क आहे असे मानणारे, सांगत राहतात. राष्ट्र हा एक भौगोलिक स्थावर मालमत्तेचा तुकडा आहे अशी संकुचित कल्पना केली, की मग अशा प्रकारचे गुंतागुंतीचे प्रश्न तयार होतात. आज जेथे पाकिस्तानचा झेंडा फडकत आहे त्या प्रदेशात जन्म झालेले आणि फाळणीच्या काळात निर्वासित म्हणून हिंदुस्थानात आलेले लक्षावधी नागरिक आहेत. त्यांच्यापैकी कोणालाही पंतप्रधान किंवा तत्सम पदावर अधिकार कधीच सांगता येणार नाही? हा प्रश्न केवळ तार्किक नाही. भाजपाचे नेते, पंतप्रधानपदासाठीचे संभाव्य वारसदार श्री. लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म पाकिस्तानी प्रदेशातला. त्यांचा जन्म झाला तेव्हा पाकिस्तान मुळी जन्मालाच आले नव्हते. अर्थातच, ते कधी पाकिस्तानी नागरिक नव्हते. त्यामुळे, त्यांच्याबद्दल असा वाद निर्माण होऊ नये; परंतु पंतप्रधानांच्या खुर्चीवर डोळा ठेवून बसलेला भाजपातील कोणी पुढेमागे असा युक्तिवाद वापरणारच नाही याची खात्री देणे कठीण आहे.

अमेरिकेत निवासी झालेला माझा एक पुतण्या आपल्या बापालाच सांगतो, डॅडी, तुम्ही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होऊ शकत नाही. राष्ट्राध्यक्षपद मिळवण्यास मी निदान पात्र आहे.

भारतातील कोणी नागरिक दुसऱ्या देशात गेला आणि त्याने काही राजकीय

सत्ता मिळवली तर त्यात काही गैरवाजवी घडले असे भारतीयांना वाटत नाही. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या मंत्रिमंडळ-समित्यांत शेती, तंत्रज्ञान, संगणक इत्यादी क्षेत्रांत भारतीय नागरिक महत्त्वाची स्थाने मिळवून आहेत त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. क्लिंटन यांच्या पत्नी हिलरी सर्व दृष्टीने राष्ट्राध्यक्ष होण्यास पात्र आहेत; पण स्त्री असल्यामुळे केवळ, त्या कधीकाळी स्वतःच राष्ट्राध्यक्ष बनतील असा विचार करणेही कठीण आहे. अर्थात्, कोणी अनिवासी भारतीय या शतकाततरी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बनेल ही शक्यता नाही; पण कित्येक वर्षांपूर्वी मळयांवर मजूर म्हणून कंत्राटाने गेलेले भारतीय नागरिक अनेक देशांत स्थायिक झाले आहेत. त्यांचे वंशज आज मानमरातब, धनसंपत्ती एवढेच नव्हे तर राजकीय सत्ताही बाळगून आहेत. मॉरिशसचा पंतप्रधान भारतीय असण्याचे आता काही फारसे कौतुक राहिलेले नाही. इंडोनेशिया, कंबोडिया हे देश तर, कदाचित् पुरातन हिंदू संस्कृतीचे उगमस्थान. तेथील राजकारणाच्या प्रकाशझोतात येणाऱ्या व्यक्तींची नावे संस्कृतप्रचुर आणि अनेकदा ओळखी ओळखीची वाटतात.

फिजी बेटातही भारतीय मुळाचे पंतप्रधान झाले ते सहजासहजी नाही. फिजी बेटसमूहातील बहुसंख्य प्रजा तद्देशीय आदिवासींची. साम्राज्यवादाच्या सुवर्णस्पर्शाने ही बेटे आधुनिक युगात प्रवेश करती झाली. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्याशी असलेल्या व्यापारी संबंधांनी बऱ्यापैकी सुबत्ता आली. या व्यापाराची सारी सूत्रे मूळचे भारतीय असलेल्या व्यापारी समाजाकडे. अशा या परिस्थितीत, राजकारण मोठे ताणतणावाचे असणार हे उघड आहे. दोन विभक्त जमातींच्या राष्ट्राला एकसंध कसे राखावे हा प्रश्न गांधी-जीनांना सोडवता आला नाही, तो महासागरात विखुरलेल्या बेटांच्या या समूहराष्ट्राने सोडवून दाखविला. अल्पसंख्य जमातीचे श्री. चौधरी पंतप्रधान म्हणून निवडून आले, हे तेथील खऱ्याखुऱ्या लोकशाहीचे प्रमाणपत्रच आहे.

या सगळ्या ऐतिहासिक कामगिरीला डाग लावला तो आदिवासी समाजातील, व्यापारउदीमात प्रवेश करून भरभराट साधण्याच्या प्रयत्नांत अयशस्वी झालेल्या एका माणसाने. पाचपंचवीस बंदूकधारी माणसांना घेऊन जॉर्ज स्पाईट लोकसभागृहातच घुसला आणि पंतप्रधान चौधरी यांच्यासकट अनेक महत्त्वाचे नेते त्याने ओलीस धरले. मोठा घटनात्मक पेचप्रसंग तयार झाला. त्याच्या बातम्यांनी वर्तमानपत्रांचे रकाने आणि दूरदर्शनची वार्तापत्रे भरून वाहत होती.

आतंकवाद्यांचा प्रश्न भारताला काही अनोखा नाही. एकट्यादुकट्या व्यक्तींचे

खून करणे, गाववस्त्यांवर हल्ले करून मुडदे पाडणे, प्रवासी गाड्या थांबवून निवडक प्रवाशांना खाली उतरवून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव करणे हे प्रकार अनेक भागांत– पंजाब, आसाम, कश्मीर इत्यादी – दैनंदिन घडत असतात. पण, कोणी खासगी सेना, हत्यारे घेऊन पंतप्रधानांवरच ताबा मिळवेल, त्यांना ओलीस ठेवून देशाची घटनाच बदलण्याचा खेळ खेळू शकेल हे काही संभाव्य दिसत नाही. फिजीसंबंधीच्या बातम्या पाहताना, ऐकताना सर्वांच्या मनात प्रश्न उभा राहत असे, या देशातील लष्कर काय करते आहे? फिजीमधील समस्या तेथील परंपरेप्रमाणे सुटू पाहत आहे; पण, असले अचरट प्रकार हिंदुस्थानात घडूच शकणार नाहीत असे ज्यांना वाटत होते त्यांना मात्र वीरप्पन–राजकुमार प्रकरणाने सपशेल तोंडघशी पाडले आहे.

वीरप्पन हा चंदनाची तस्करी करणारा प्रख्यात दरोडेखोर. तामिळनाडू आणि कर्नाटक यांच्या सरहद्दीवरील शेकडो एकर घनदाट जंगल हा त्याच्या अधिसत्तेचा प्रदेश. कित्येक वर्षे झाली, तामिळनाडू आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांच्या सरकारांनी कोट्यवधी रुपये खर्च केले; पण, वीरप्पन त्यांच्या हाती लागू शकलेला नाही. वीरप्पन श्रीलंकेतील तामिळी वाघांना सामील आहे असे कर्नाटकात सर्रास मानले जाते. त्याचा शेकडो चौरस मैलांचा जंगलप्रदेश तामीळी वाघांकरिता लपण्याचे, विश्रांतीचे, प्रशिक्षणाचे स्थान आहे. श्रीलंकेला यादवी युद्ध जिंकायचे असेल तर वीरप्पनच्या जंगलप्रदेशावर त्यांना बॉम्बहल्ला करावा लागेल.

राजीव गांधी यांच्या खुनाच्या कारस्थानात असलेले अनेकजण या जंगलात आश्रय घेऊन आहेत असे बंगलोरच्या रस्त्यांत उघड बोलले जात असतानासुद्धा कोणत्याही पोलिसदलाची तेथे धाड घालण्याची हिंमत झाली नाही. वीरप्पन म्हणजे काही व्यापारउदीमात दिवाळखोरीला आलेला जॉर्ज स्पाईट नव्हे. राजकुमार हा काही मुख्यमंत्री नाही; पंतप्रधानतर नाहीच नाही. पण, कर्नाटक आणि तामिळनाडू या दोन्ही राज्यांतील सिनेरसिकांच्या हृदयांचा तो बादशहा आहे. दक्षिणेतील नटनट्यांची लोकप्रियता हा काहीएक अजबच प्रकार आहे. महाराष्ट्रात दादा कोंडकेच काय, निळू फुलेदेखील महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होईल अशी कल्पना करणे कठीणच; मग चंद्रकांत आणि अशोक सराफ यांची गोष्ट दूरच राहिली; पण, दक्षिणेत हे सहज शक्य होते. एन. टी. रामाराव तेलगू सम्मानची घोषणा करून नऊ महिन्यांच्या अवधीत मुख्यमंत्री झाले. जयललिता अगदी अलीकडेपर्यन्त दिल्लीचे सरकार पाडण्याची ताकद आणि हिंमत ठेवून होती. तेव्हा राजकुमार यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नसली तरच आश्चर्य. गेली काही वर्षे मधूनमधून, राजकुमार राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या बातम्या झळकतात; कधी तो काँग्रेसमध्ये जाणार अशी आवई उठते, तर कधी तो

स्वत:च नवीन पक्ष स्थापन करणार असे बोलले जाते.

एन. टी. रामारावप्रमाणे राजकुमारच्या सिनेमांच्या कथा आणि त्याच्या भूमिका यांना सामाजिक, राजकीय संदर्भ असतात. निपाणीच्या शेतकरी आंदोलनावर आधारलेल्या एका चित्रपटात त्याने नायकाची भूमिका केली. तो चित्रपट खूप गाजला; त्याला राज्य शासनाचे पारितोषिकही मिळाले. वीरप्पनच्या कथेवर आधारित त्याचा एक अत्यंत गाजलेला चित्रपट आहे. त्यात राजकुमारने चंदनतस्कराचा बीमोड करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे. कथेच्या शेवटी चंदनतस्कर आणि पोलिस इन्स्पेक्टर राजकुमार हे एकाच आईच्या पोटी जन्मलेले सख्खे भाऊ असल्याचे त्यांची आई सांगते. प्रत्यक्षात घडत असलेले नाट्य या चित्रकथेला अगदी समांतर आहे. राजकुमार यांचे निवासस्थान या जंगलाच्या सरहद्दीवर आहे. एरव्ही ही गोष्ट वीरप्पन आणि राजकुमार या दोघांनाही मोठी सोयीची ठरत असली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत राज्य शासनाची तलवार डोक्यावर सतत टांगती राहण्यापेक्षा राज्य शासन आपल्या म्हणण्याबाहेर नसावे अशी इच्छा वीरप्पनचीही असणार. हे साधावे कसे? या देशात मुख्यमंत्र्यांना पळवून नेऊन ओलीस ठेवणे दुरापास्त आहे. त्यांना ओलीस ठेवले तरी त्यातून राजकीय सत्ता हाताशी येणे शक्य नाही. म्हणजे, सगळे डाव फिजीतील जॉर्ज स्पाईटचेच, फक्त डावपेच वेगळे.

फारूख अब्दुल्लासाहेबांनी स्वायत्ततेची घोषणा केली; त्याला तुरंत प्रतिसाद मिळाला तो आसामबरोबर तामिळनाडू व पंजाब या राज्यांतून. करुणानिधींच्या पक्षाच्या अलीकडच्या अधिवेशनात स्वतंत्र तामिळनाडूची भाषा बोलली गेली; तामीळ वाघ नेता प्रभाकरन याचा उदो उदो झाला. तामीळ वाघांबद्दल अनेक तामीळ नागरिकांच्या मनात प्रचंड अभिमान आणि आपुलकी आहे. राजकुमारांच्या या अपहरणाचे नाटक या सर्व घडामोडी लक्षात ठेवून पाहिले पाहिजे.

वीरप्पनने केलेल्या मागण्या मोठ्या बोलक्या आहेत. ५० कोटींची खंडणी आणि गुन्हेगारी खटल्यातून सरसकट माफी या मागण्या त्याने मांडाव्यात यात काही आश्चर्य नाही; पण शेतीमालाला भाव, शेतमजुरांची मजुरी, तामीळ भाषेचे स्थान आणि कर्नाटकातील तामीळ जनतेला मिळणारी वागणूक यासंबंधीच्या मागण्या पाहता हा सारा उघडउघड राजकीय खेळ असावा असे दिसते. तामीळ वाघ, वीरप्पन आणि राजकुमार या त्रिकुटाचे हेतू अजून स्पष्ट नाहीत; पण, त्यांनी रचलेले हे नाटक फिजीतील भारतीय–आदिवासी खेळीपेक्षा फारसे वेगळे नाही.

*दि. ९/८/२०००*

■■

# हिजबूल, वीरप्पन आणि पर्यावरणातिरेकी

काश्मीर राज्याला वाढीव स्वायत्तता देण्याचा फारूख अब्दुल्ला यांचा प्रस्ताव दिल्लीश्वरांनी अजागळपणे बारगळविला. कोणी म्हणतो या प्रश्नावर संसदेत चर्चा झाली पाहिजे, कोणी म्हणतो विचार कारण्याचासुद्धा प्रश्न उद्भवत नाही, कोणी म्हणतो अब्दुल्ला निव्वळ देशद्रोही आहेत, त्यांचे सरकार बरखास्तच करून टाकावे.

अब्दुल्लांना बाजूला सारून शासन हिज्बुलच्या मागे गेले आणि काय परिणाम झाले ते आपण सारे, व्यथित आणि चिंताग्रस्त मनाने पाहत आहोत. या विषयावरच्या माझ्या 'काश्मीरची भारतसमस्या' (लोकमत १५–०७–२०००) या लेखात, भारत याह्याखानसारखा कोंडीत स्वत:ला पकडून घेईल अशी भीती व्यक्त केली होती. दुर्दैवाने, ती खरी ठरत आहे. आता हिज्बुलच्या इस्लामाबादमधील नेत्यांनी वाटाघाटीत पाकिस्तान सामील असल्याखेरीज बोलणी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे स्पष्ट केले; जुजबी शस्त्रबंदी खलास झाल्याचे जाहीर केले आणि शस्त्रबंदी कोणाच्या अधिकाराने झाली होती याबद्‌दल वाद राहू नये; यासाठी शस्त्रबंदी संपताच बॉम्बस्फोट आणि रॉकेटमारा यांचा असा कहर करून दाखवला आहे, की या साऱ्या प्रकरणातून काय निघते असे मोठे प्रश्नचिन्ह तयार झाले आहे. हिज्बुलने पाकिस्तानचा सहभाग वाटाघाटीत असावा असा आग्रह धरला; तस्मात्, हे सारे पाकिस्तानी हस्तक आहेत आणि पाकिस्तानच साऱ्या घातपाताची सूत्रे हलवीत आहे हे फिरून एकदा सिद्ध झाले आहे, असे आपल्याकडील बहुतेक लोक मानतात.

योगायोगाची गोष्ट. कर्नाटकातील चंदनतस्कर वीरप्पन याने लोकप्रियतेच्या शिखरावरील फिल्मी हीरो राजकुमार यांचे अपहरण केले; त्याला पंधरवडा होऊन गेला. या प्रकरणात अपहरणापेक्षा राजकारणच जास्त आहे याबद्दल मी

गेल्याच आठवड्यात फिजीतील भारतीय आणि भारतातील फिजीयन (लोकमत १२-०८-२०००) या लेखात लिहिले आहे. वीरप्पनशी बोलणी करायला गेलेले पत्रकार परत आले. त्यांनी, वीरप्पनने चार नवीन अटी घातल्याचा संदेश आणला आहे. कोणा बलात्कारितेला व्यापक नुकसानभरपाई आणि तुरुंगातील पाचसहा टाडा-कैद्यांची सुटका या मागण्या करून वीरप्पन, आपण कोणी महात्मा आहोत अशी छबी तयार करण्याच्या प्रयत्नात आहोत, एवढेच दाखवितो. त्याची धक्का देणारी नवी मागणी अशी, की कर्नाटक आणि तामीळनाडू या दोन राज्यांतील कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सोपविण्यात यावा. या मागणीने दोन्ही राज्यांची सरकारे चक्रावली आहेत. हा प्रश्न हेग न्यायालयाकडे नेणे शक्य नाही; ते का शक्य नाही हे, बोलणी करण्यासाठी पाठविलेले पत्रकार गोपाल स्पष्ट करतील एवढेच त्यांनी म्हटले आहे. त्याबरोबर, सगळया मागण्या मान्य करण्यासाठी वीरप्पन याने १९ ऑगस्ट ही अखेरची मुदत जाहीर केली आहे. थोडक्यात, पूर्वीच्या सगळया मागण्या - कैद्यांची सुटका, पन्नास कोटी रुपयांची खंडणी, शेतीमालाचे भाव, शेतमजुरांची मजुरी, दहावीपर्यन्त तामीळमधून शिक्षण इत्यादी इत्यादी, यांखेरीज कावेरी पाण्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयात मांडण्याचे शासनाने कबूल केले नाही तर राजकुमार आणि त्यांच्या परिवारातील मंडळी यांच्या जीविताची काही शाश्वती सांगता येत नाही.

वीरप्पन हा काही फुसक्या धमक्या देणारा तृतीय श्रेणीचा गुंड नाही. पूर्वी पोलिस अधिकाऱ्यांच्या एका गटाचे, त्यात एका पोलिस अधिकाऱ्याच्या पत्नीचाही समावेश होता, त्याने अपहरण केले होते. त्या वेळच्या मागण्या सरकारने मान्य केल्या नाहीत तेव्हा त्याने अधिकाऱ्याच्या पत्नीला फक्त सोडून दिले आणि बाकीच्या सर्व ओलिसांना निर्घृणपणे ठार केले. राजकुमार आणि त्यांच्या परिवारातील मंडळी प्रसिद्ध पुरुष आहेत; त्यांची कत्तल करण्याची वीरप्पनची हिंमत होणार नाही असल्या अजागळ कल्पनांत ज्यांना राहायचे असेल त्यांनी राहावे; व्यवहारी नेतृत्व असला धोका घेणार नाही. वीरप्पनचे तामीळ वाघांशी संबंध आहेत; स्वत: प्रभाकरन असली कचदिली दाखवीत नाही, वीरप्पनही नाही हे नजरेआड करून चालणार नाही. राजकुमार आणि परिवाराच्या जीवाला कोणताही अपाय झाला तर दक्षिणेत राजकीय भूकंप होईल आणि त्यातून तामिळी वाघांच्या राजकारणास पोषक परिस्थिती तयार होईल.

धमकी जबरदस्त आहे आणि हा लेख प्रकाशित होईपर्यन्त निर्णयाची मुदत

संपलेलीही असेल. हिज्बुलप्रमाणेच इथेही एक मुद्दा आहे – देशांतर्गत वादात देशाबाहेरील एका संस्थेला हस्तक्षेप करण्यासाठी बोलवावे, अन्यथा हिंसाचार. हिज्बुल पाकिस्तानचा सहभाग मागतात, अन्यथा प्रचंड घातपात घडवून आणण्याची धमकी देतात; वीरप्पन कावेरी पाण्याच्या विवादात हेग न्यायालयाचा हस्तक्षेप मागतो, नाही तर अनन्वित हत्यांची धमकी देतो.

काश्मीरमधील अतिरेक्यांना पाकिस्तानातून मदत मिळते, काश्मिरातील हिंसाचार म्हणजे पाकिस्तान गुप्तहेर संस्थेने परहस्ते चालविलेली लढाईच आहे असे समजले तर भारतीय लष्कर त्याचा बंदोबस्त झटपट करू शकत नाही हे समजण्यासारखे आहे; पण वीरप्पनचा अरण्यप्रदेश कोणत्याही परदेशाच्या मुलुखाशी जोडलेला नाही, भारतीय द्वीपकल्पाच्या मधोमध आहे आणि भारतीय लष्कर व पोलिसदल वीरप्पनचा बंदोबस्त करू शकत नाही. याचा अर्थ, स्वातंत्र्योत्तर राजकारण्यांच्या खेळात देशातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे; एवढेच नव्हे तर ज्यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखायची आणि देशाचे संरक्षण करायचे त्यांचीच कार्यक्षमता पहिल्यासारखी राहिलेली नाही. भारतीय लष्कर पाठविले, की प्रश्न संपला अशी १९६२ सालापर्यंत तरी परंपरा होती. चीनबरोबरच्या संघर्षात ती तुटली. बांगलादेशच्या लढाईनंतर पुन्हा अशीच सामर्थ्याची परंपरा सुरू झाली आहे असे सर्वजण मानतात, त्यातील राष्ट्राभिमान समजण्यासारखा आहे; जवानांच्या हौतात्म्याबद्दलचा आदरही खरा असेल, पण वास्तविकता पूर्णतः तशी नाही.

देशांतर्गत मामल्यात देशाबाहेरील शक्तींचा आधार घेण्याचा कार्यक्रम फक्त हिज्बुल–वीरप्पनच राबवितात असे नाही. देशातील पर्यावरण–आतंकवादी संस्थाही परकीय हस्तक्षेपासाठी कित्येक वर्षे कसोशीने प्रयत्न करीत आहेत. त्यांचे हत्यार हिंसाचाराचे नाही; कायदेभंगाचे आहे, प्रसंगी आत्मघाताच्या धमकीचे आहे, एवढाच काय तो फरक.

नर्मदा धरण गुजराथची भाग्यरेषा आहे, जीवनरेषा आहे. सौराष्ट्र आणि उत्तर गुजराथ येथील दुष्काळी प्रदेशांचा पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी इतर समांतर प्रकल्प उपयोगी ठरण्याची शक्यता कोणी नाकारीत नाही. विस्थापितांना गुजराथ सरकारने देऊ केलेले पुनर्वसन जगातील सर्वोत्तम आहे याबाबतही सर्वमान्यता आहे. या धरणावर सात हजार कोटी रुपये खर्च होऊन अडकून पडले आहेत; एका दिवसाच्या विलंबाचा खर्च काही कोटींचा आहे. अशा परिस्थितीत, धरणविरोधी आंदोलन हिंदुस्थानात चालावे हेच आश्चर्य आहे. यावरून, लष्कराखेरीज

आपल्या राजकीय व्यवस्थेतील इतर कमजोरी स्पष्ट होतात; पण एवढ्याने थांबलेले नाही. युरोपातील वृत्तपत्रे, टेलिव्हिजन, भित्तिपत्रके आणि वेबसाइटस् यांच्यातून नर्मदा धरणविरोधी प्रचाराचा हैदोस चालला आहे. हिंदुस्थानात २० कोटी लोक विस्थापित आहेत, त्यांना मरणाखेरीज गत्यंतर नाही. नर्मदा धरण हा एक मोठा बॉम्ब आहे असला प्रचार नामवंत मंडळी करतात; असे करण्याबद्दल त्यांना प्रोत्साहन मिळते, 'नोबेलला समांतर' पारितोषकेही दिली जातात हेही समजण्यासारखे आहे. या आंदोलकांच्या व्यवस्थापनकौशल्याबद्दल कौतुक वाटले तर त्यातही काही गैर नाही; पण जर्मनीची संसद नर्मदा धरणाचे बांधकाम बंद करा, अन्यथा जर्मनी सर्व आर्थिक मदत थांबवील अशा अर्थाचा ठराव करते; फ्रान्समधील संसदेपुढेही असाच प्रस्ताव येतो; नवे सहस्रक साजरे करण्यासाठी लंडनमध्ये एक मनोरा बांधला आहे त्याच्या सर्वांत उंच मजल्यावर जाऊन पहिल्या घोषणा केल्या जातात त्या नर्मदा धरणविरोधाच्या या गोष्टीही दुर्लक्ष करण्यासारख्या नाहीत. हे पर्यावरण-अतिरेकी जुने समाजवादी, कामगार चळवळींचे काही म्होरके आणि सर्व जागतिकीकरणविरोधक यांची आघाडी बांधीत आहेत, एवढेच नव्हे तर, आता अहिंसक आंदोलनाचा मार्ग त्यांनी सोडून दिला आहे असे दिसते आहे. अमेरिकेत सिएटल येथे जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदेच्या वेळी धुडगूस घालून त्यांनी परिषदेचे काम बंद पाडले. त्यानंतर वॉशिंग्टनमध्ये जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या बैठकांच्या वेळी गनिमी काव्याने हल्ले करून जाळपोळ, लुटालूटही केली. खुल्या व्यवस्थेमुळे नवे माहितीतंत्रज्ञानाचे युग अवतरले, पण वेबसाईटचा सर्वांत जास्त फायदा घेतला तो खुलेपणा आणि तंत्रज्ञान यांच्या दुष्मन असणाऱ्या आतंकवाद्यांनी.

भारतीय शेतकरी वर्षानुवर्षांच्या आर्थिक कोंडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत आहेत. नवनवीन बियाणी, वनस्पती यांच्या लागवडी कराव्यात, परदेशी गुंतवणुकीचा फायदा घेऊन जागतिक बाजारपेठ व तंत्रज्ञान यांच्याशी संपर्क साधावा असा त्यांचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. पण पर्यावरणवादी, शेतकऱ्यांनी लावलेली रोपे उपटून टाकतात, बियाण्यांच्या परीक्षणाच्या प्रायोगिक शेतीवर हल्ले करतात, परदेशी कंपन्यांच्या कार्यालयांवर हल्ले करतात. एरव्ही सर्व आंदोलनांवर कोणत्याही मार्गाने वरवंटा फिरवू पाहणारी शासनव्यवस्था या पर्यावरण-आतंकवाद्यांविरुद्ध साधे खटलेदेखील भरीत नाही.

काश्मिरात हिज्बुल, दक्षिणेत वीरप्पन आणि देशभर पर्यावरण-अतिरेकी व

बंदिस्त व्यवस्थावादी. हिज्बुल-वीरप्पन देशात हिंसाचार करून राष्ट्रीय धोरण बदलू पाहतात, परकीय हस्तक्षेपाचा आग्रह धरतात. तिसरा गट परदेशात धुडगूस घालून परदेशी हस्तक्षेप करवितात आणि राष्ट्रीय धोरण बदलू पाहतात. तिघांतील फरक, असला तर अंशात्मक आहे, गुणात्मक नाही.

*दि. १६/८/२०००*

■■

# मानवीय न्याय आणि सामान्य माणूस

सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन'वर लट्टू नाही, खूश नाही असा माणूस विरळा. प्रत्येक व्यंगचित्रात, सर्वसामान्यांना हरघडी वाटणारी भावना इतक्या चटकदार पद्धतीने व्यक्त करणाऱ्या या पात्राचा जनक खरोखरच महान प्रतिभाशाली असला पाहिजे. दररोज 'टाईम्स'चा अंक हातात घेतला आणि पहिल्याच पानावर You said it! (कसं बोललात!) चित्र पाहिले की, इतकी प्रतिभाशाली पण सहज-कल्पना आपल्याला का सुचली नाही याच्या रागाने स्वत:च्याच तोंडात फटाफट थोबाडीत मारून घ्यावेसे वाटू लागते.

पु. ल. देशपांडे यांच्या 'असा मी असामी'चा नायक हा त्याच प्रकारचा सामान्य माणूस. त्याचे विचार आणि भावना आपल्याशी नेमक्या जुळतात असे हरएक वाचकाला आणि श्रोत्याला वाटत राहते आणि म्हणून खळखळून हसून तो दाद देतो. खरे म्हटले तर 'असा मी असामी'चा नायक बेंबटया हे काही शंभरातील नव्वद घरी आढळणारे पात्र नाही, कोकणातील पोस्टमास्तरच्या घरी जन्मलेला हा सामान्य बुद्धीचा पोरगा. त्याचे चित्रण पु. ल. देशपांडे यांनी अनेकवेळा केले आहे. पेन्शनीत निघेपर्यन्त इमानेइतबारे पोस्ट ऑफिसात नोकरी करायची, सारा जन्म पत्रे, बंग्या आणि डिंक यांच्या संगतीत काढायचा; वाईट वर्तणुकीचा, खोटेपणाचा डाग जरादेखील लागून घ्यायचा नाही आणि पेन्शनीत निघता निघता पोरांच्या लेंढारातील एकालातरी पोस्टात चिकटवून द्यायचे म्हणजे साऱ्या जन्माचे सार्थक झाले अशी भावना बाळगणाऱ्या कित्येक पिढ्या महाराष्ट्रानेच नव्हे, तर सर्व देशाने पाहिल्या आहेत.

पोस्टात चिकटलेले पोरसुद्धा वंशपरंपरेने सिंहासन मिळावे अशा अभिमानाने काम करी. हिशेबात एक पैसा किंवा पैशाचे एक तिकीट कमी पडले तर प्रश्न केवळ तूट भरून देण्याचा नाही. पोस्टातील पिढ्यान्‌पिढ्यांचे इमान डागाळले

जाईल या चिंतेने ते पोरगेही जन्मभर इमानाने नोकरी करी आणि पेन्शनीत निघायच्या आधी आपल्या पोरांनाही, जमले तर, पोस्टात चिकटवून देऊन पैलतीरी जाण्याच्या तयारीला लागे. पोस्टातील या पिढीजात परंपरेविषयी पु. ल. देशपांडे यांनी अगदी अलीकडेपर्यंत लिहिले आणि लोकांना हसवले.

खरे पाहिले तर, पोस्टात इमानेइतबारे नोकरी करून आयुष्य कंठणारा असामी पन्नास वर्षांपूर्वी म्हणजे स्वातंत्र्य आले त्या सुमारास संपला. स्वातंत्र्य आले, समाजवादाच्या आणि हक्काच्या गोष्टी सुरू झाल्या. पोस्टातील नोकराच्या मुलाला पोस्टाच्या नोकरीतच लावून घेणे म्हणजे 'वशिलेबाजी' आहे, सर्वसामान्य माणसांना त्यामुळे सरकारी नोकरी मिळण्याची शक्यता दुरावते असे म्हणून ही पिढीजात वशिलेबाजीची परंपरा संपवण्याचे ठरले. पोस्टातील प्रत्येक रिकामी जागा रोजगार विनिमय केंद्राला कळवण्यात आली पाहिजे, केंद्राने पाठविलेल्या उमेदवारांपैकीच एकाची निवड झाली पाहिजे असे नियम आले. विनिमय केंद्राने पाठवलेल्या उमेदवाराखेरीज इतर कुणाची भरती केली तर भरती करणाऱ्या अधिकाऱ्याच्या नोकरीवर तत्काळ गंडांतर येईल अशी परिस्थिती तयार झाली. पिढीजात परंपरेच्या आधाराने चाललेली टपालसेवा या रिक्रूटभरतीनंतर एकदम कोसळली. टपाल खात्यात महत्त्वाची पत्रे, मौल्यवान वस्तू यांची देवघेव फारसे कागदपत्र न करता, केवळ विश्वासाच्या भरवशाने होत असते. असल्या कामामध्ये बाजारभरती नोकर आले आणि चोऱ्या व फसवेगिरीला एकदम ऊत आला. टपालाच्या पेटीत पत्र टाकले म्हणजे ते पत्त्यावर पोहोचणारच आणि लवकरात लवकर पोहोचणार हा विश्वास भुर्रकन उडून गेला. 'पत्र २० वर्षांनी पोचले', 'लग्नाची पत्रिका मुलाच्या बारशाला मिळाली' असल्या सुरस कथा वारंवार बातमीपत्रात छापून येऊ लागल्या. कोणी टपाल्या बटवडा करायची पत्रे कचऱ्यात फेकून मोकळा झाल्याच्या कथाही वारंवार ऐकू येऊ लागल्या. पोस्टातले पैसे, म्हणजे पोस्टाच्या बचत खात्यात ठेवलेली रक्कम अमेरिकेतील इदूव्हर्दे मध्ये ठेवलेल्या सोन्यापेक्षाही सुरक्षित, हा विश्वास झपाटयाने कोलमडू लागला. टपाल खात्याची कार्यक्षमतेची परंपरा, वंशपरंपरेने भरती करण्याची 'मध्यमयुगीन' पद्धत संपून, आधुनिक पद्धतीची 'मानवी हक्कावर' आधारलेली भरती सुरू झाली तेव्हापासून संपली.

सरकारी नोकरभरती अधिकाधिक मानवी होऊ लागली. भरती करायचा उमेदवार केवळ विनिमय केंद्रातून आलेला असला पाहिजे, एवढेच नव्हे तर, भरायच्या प्रत्येक जागेसाठी निवडायचा उमेदवार कोणत्या जातीचा असला

पाहिजे यासंबंधी कडेकोट नियम झाले. भरती करताना माणूस पारखण्याची संधी मालकाला राहिली नाही, तर त्याचे दिवाळे वाजायला वेळ कितीसा लागणार?

१७ ऑगस्ट २००० रोजी राज्यसभेने एक बिल पास केले. राखीव जागांची तरतूद करूनदेखील मागासवर्गीयांना 'मानवीय न्याय' पुरेसा मिळत नाही अशी तक्रार मागासवर्गीयांचे पुढारी करत. काही किरकोळ क्षेत्रात राखीव जागीच निवडल्या गेलेल्या उमेदवारांची गुणवत्ता बिनराखीव जागेतील उमेदवारांच्या तुलनेने फारशी कमी नसे. राखीव जागांच्या व्यवस्थेची तरफदारी करणारी नेतेमंडळी हा मुद्दा ठासून मांडत. उदा. पुण्याच्या वैद्यकीय महाविद्यालयात सर्वसाधारण गुणवत्तायादीतील सर्वोच्च गुण काही वर्षे राखीव गुणवत्तायादीच्या तुलनेने कमी होते. नोकरभरतीत असे फारसे घडल्याचे ऐकिवात नाही. उलट, राखीव जागांची पद्धत जसजशी काटेकोरपणे अमलात येऊ लागली आणि राखीव भरतीची संख्या वाढू लागली तसतसे किमान पात्रता नसलेल्या उमेदवारांनाही राखीव जागांवर भरती करणे आवश्यक होऊ लागले. किमान गुणवत्ता नसताना भरती करावी किंवा नाही या विषयावर बरेच वादंग माजले. दि. १७ ऑगस्ट २००० रोजी याविषयी शासनाने एक कायदा संमत करून घेतला आणि राखीव जागांचा कोटा भरण्यासाठी किमान गुणवत्तेची अट पाळणे आवश्यक नाही असे स्पष्ट केले.

याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भारतीय प्रशासन सेवा इ. सेवांसाठी होणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षांचा निकाल लागला. निकालाची पाहणी करता एक टिप्पणी झाली ती अशी, की वर्षानुवर्षे नामवंत म्हणून गाजलेल्या महाविद्यालयांच्या बरोबरीनेच अप्रसिद्ध महाविद्यालयांतील विद्यार्थीही या स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होतात व वरचे क्रमांक पटकावतात. या टिप्पणीचा नेमका अर्थ काय? परीक्षेची पद्धत अशी आहे की, बऱ्यावाईटाची पारख फारशी कसोशीने होत नाही, हा एक संभाव्य अर्थ. दुसरे संभाव्य तात्पर्य असे, की तथाकथित नामवंत विद्यालयात खरोखरीच श्रेष्ठ असे काही नसते.

आणखी एक बातमी १९ ऑगस्ट च्या ँ॥ ऊ्र वरील बातम्यांत विस्ताराने सांगितली गेली. मनोज सदाशिवन हा केरळातील विद्यार्थी बुद्धीने तल्लख, अभ्यासू; पण त्याला स्पष्ट बोलता येत नाही. लेखी परीक्षेत तो उत्तीर्ण झाला; पण प्रत्यक्ष मुलाखतीत अनुत्तीर्ण झाला. मनोज सदाशिवन याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आपल्याला आपल्या अपंगतेपोटीप्रशासकीय सेवेत प्रवेश नाकारणे हा आपल्या नागरिकत्वाच्या हक्कांवर घाला आहे असा त्याचा युक्तिवाद आहे.

कोणी सांगावे, न्यायालय कदाचित्, केंद्रीय सेवा आयोगाचा निर्णय बाजूला सारून त्याला सेवेत घेण्यात यावे, असा आदेश देईलही. मानवता मानवता म्हणून जे काय म्हणतात त्या दृष्टीने वेगवेगळया पद्धतीने गळबटांची भरती करणे उचित असेलही. प्रश्न शिल्लक राहतो तो एकच. पु. ल. देशपांडेंच्या बेंबट्यांनी टपालसेवा कार्यक्षम राखली, एक उज्ज्वल परंपरा तयार केली. करुणेपोटी भरती झालेले गळबट ही परंपरा राखू शकले नाहीत, तर आर. के. लक्ष्मण यांच्या 'सामान्य माणसा'ला न्याय देणारी काही मानवतेची फूटपट्टी त्याच्या हाती कोणी देईल काय?

*दि. २३/८/२०००*

■■

# यथा प्रजा, तथा राजा!

हिजबुल मुजाहिदीन संघटनेने २९ ऑगस्टला सकाळी एक घोषणा केली, काश्मीरसंबंधीच्या वाटाघाटीत पाकिस्तानला सहभागी करून घेतले नाही तर घातपातांच्या कारवाया जम्मू-काश्मिरपुरत्या मर्यादित राहणार नाहीत; साऱ्या हिंदुस्थानभर घातपातांची एक प्रचंड लाट सुरू करण्यात येईल अशी त्यांनी धमकी दिली. त्याआधी दोनच दिवसांपूर्वी भारताचे सुरक्षामंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी भारत सरकारचे यासंबंधीचे धोरण जाहीर केले. काश्मिरमधील प्रत्यक्ष ताब्याची रेषा ओलांडून पाकव्याप्त काश्मिरात भारतीय लष्कर जाणार नाही. घातपात्यांचा पाठलाग करीतही जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. हिज्बुल मुजाहिदीनची ताकद ती केवढी? सगळा पाकिस्तान सर्व ताकदीने घातापात्यांच्या मागे उभा आहे. असे म्हटले तरी त्यांची तुलना भारताच्या लष्करी सामर्थ्याशी होऊच शकत नाही. परंपरागत शस्त्रांनी सामना झाला तर पुरे पाकिस्तानही भारतीय लष्कराशी टक्कर देऊ शकणार नाही आणि अणुयुद्ध चालू करण्याचा खुळेपणा दोघांपैकी कोणताही देश करण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत, कमजोर बाजू हिमतीने लढाईचा आवाका वाढवण्याची घोषणा करते आणि प्रत्युत्तर म्हणूनदेखील ताबारेषेच्या पलीकडे पाऊल टाकण्याचा निर्णय, स्वतःला प्रखर हिंदुत्त्ववादी म्हणवणारे भा.ज.पा.चे सरकार घेत नाही, याचा अर्थ काय?

भारताचे शासन कचखाऊ (Soft) आहे काय? या प्रश्नावर दूरदर्शन आणि वर्तमानपत्रे या माध्यमांतून गेले काही दिवस खडाजंगी चालली आहे. चर्चेत सरकारपक्ष "वाजपेयींचे शासन मोठ्या हिमतीने काश्मीर प्रश्नास सामोरे जात आहे." असे मोठ्या आवेशाने मांडतो. विरोधी पक्ष भारतीय शासनाच्या कचखाऊपणाची एकामागोमाग एक उदाहरणे देतात. मुफ्ती मोहम्मद सैद यांच्या कन्येचे अपहरण, कंदाहार येथे घडलेले विमान अपहरणाचे नाट्य,

अगदी अलीकडील IAC विमानाचे काठमांडू येथून अपहरण, हिज्बुल वाटाघाटी प्रकरण आणि ९ ऑगस्ट रोजीचे व्यापक हत्याकांड इ. देशीपरदेशी प्रकरणे; सरकारचे दाऊद इब्राहिमला व त्याच्या साथीदारांना पकडून हिंदुस्थान आणण्यातील अपयश, बोफोर्स उभे करण्यात अपयश आणि सध्या चालू असलेले चंदनतस्कर वीरप्पन याचे प्रकरण हे सर्व देशाच्या शासनात सगळा पुळचटपणा असल्याचे सज्जड पुरावे आहेत.

या विषयावर लोकमताची पाहणी अनेक संस्थांनी केली. सर्वसाधारण जनमतही, भारताचे शासन पुचाट आहे असेच आहे; पण एवढे म्हटल्याने प्रश्न सुटत नाही. 'यथा प्रजा तथा राजा!' देशातील जनता बहाद्दर आणि शासन मात्र पुचाट असे असू शकत नाही. शासन कचखाऊ असेल, तर त्याचा अर्थ 'जनताही पुळचट असली पाहिजे' असा होतो. जनता काही सरकारपेक्षा बहाद्दर नाही हे उघड आहे. काश्मीर प्रश्नावर बोलताना किंवा पाकिस्तानविषयी बोलताना अनेक कडवे हिंदुत्त्वनिष्ठ 'सगळयांना पार साफ करून टाकले पाहिजे' अशा तऱ्हेची वीरश्रीची भाषा वापरतात; पण ती भाषा, साफ करण्याचे जे काही काम असेल ते कोण्या दुसऱ्या घरची पोरे रक्त सांडून करणार आहेत, आपल्याला त्याची काही तोशीस पडणार नाही या खात्रीने वापरली जाते.

IAC विमान काठमांडूहून पळवले. प्रवाशांच्या नातेवाइकांनी दिल्लीत मोर्चे काढले. पंतप्रधानांच्या निषेधाच्या घोषणा केल्या, ''काय वाटेल ते करा; पण आमच्या सगळया सग्यासोयऱ्यांना सोडवा'' असा त्यांचा आक्रोश होता. ''आमच्या लोकांचे प्राण गेले तरी चालेल; पण आतंकवाद्यांचा एकदाचा बंदोबस्त होऊन जाऊ द्या.'' असा सूर एकाच्याही तोंडातून निघाला नाही. वीरप्पनप्रकरणीसुद्धा ''कायद्याची शान राखण्याकरिता चित्रपटातील एका अभिनयपटूचा प्राण गेला तरी हरकत नाही.'' असे कोणी म्हणत नाही. दीडशेवर खून केलेला वीरप्पन आदेश देतो आणि तामिळनाडू आणि कर्नाटक या दोन मोठ्या राज्यांचे मुख्यमंत्री शंभरावर आतंकवाद्यांवरील सारे खटले काढून घेऊन मोकळे करतात आणि लोकांची तक्रार आहे, ती फिल्मी नायकाची मुक्तता होण्यात वेळ लागत आहे त्याबद्दल!

भा.ज.पा. शासनाची भाषा वीरश्रीची व धोरणे कचखाऊ आणि यापूर्वीची सरकारे काही फार कणखर होती असे नाही. शेवटचा लोहपुरुष होऊन गेला तो म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल. पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांची काश्मीर-तिबेट यासंबंधीची धोरणे कचखाऊपणाचे नमुनेच होते. खरे म्हटले तर, भारतीय

सरकारांचा सारा इतिहासच नामर्दपणाचा, कचखाऊपणाचा आहे. एका सम्राट अशोकाने कलिंगाची लढाई पाहिली, त्यातील रक्तपाताने तो इतका उबगला, की एका रात्रीत शांती आणि अहिंसेचा प्रेषित बनून गेला. पृथ्वीराज चौहानने महंमद घोरीला तीन वेळा कैद केले आणि प्रत्येक वेळी त्याची गयावया ऐकून त्याला माफ करून सोडून दिले. याच महंमद घोरीने पृथ्वीराजावर मात करण्याची संधी मिळताच, त्याला कैदी बनवले तेव्हा भूतकाळातील उपकारांचा मुलाहिजा न बाळगता त्याचे हालहाल करून, डोळे काढून त्याला ठार मारले; तेव्हा राजकारणातील पुचाटपणा ही अलीकडची गोष्ट नाही. हा आमचा मोठा पुरातन वारसा आहे! अशा पडखाऊ धोरणाचे उदात्तीकरण मोठेमोठे शब्द वापरून सहजपणे करता येते. कोणी मुत्सद्दीपणाचा आव आणतात, कोणी आपण शांतिअहिंसेचे पुरस्कर्ते असल्याचा टेंभा मिरवतात.

महात्मा गांधींची ऐतिहासिक कामगिरी अशी, की त्यांनी असल्या दीनदुबळ्या भेकड प्रजेतून स्वातंत्र्याचे जनआंदोलन उभे केले. त्यांच्या आंदोलनाला स्वातंत्र्याचे काही श्रेय जाते, हे निर्विवाद. कोणीही जाणकार योद्धा सेनापती महात्मा गांधींच्या लष्करी डावपेचांचे मनोमन कौतुक केल्याशिवाय राहणार नाही; पण या आंदोलनाचा नेता थोर, अनुयायी भारलेले; मधली फळी मात्र- निव्वळ शब्दांचे बुडबुडे सोडणारी, आंदोलन सुरू झाले म्हणजे निमूट तुरुंगात जाऊन बसणारांची आणि बाहेर आल्यानंतर भाबड्या जनतेच्या जयघोषांनी बहरून जाणारांची निघाली. जीनांसारखा एक खणखणीत व्यवहारी राजकीय प्रतिस्पर्धी भेटताच या पुळचट नेतृत्वाने देशाची फाळणी मान्य केली. पंडित नेहरूंच्या जमान्यात तर व्यवहारीपणा (Pragmatism) या संकल्पनेला भलतेच महत्त्व आले. "आपला उभय पक्षांचा अभ्यास आपण मध्यममार्ग स्वीकारतो," हे पंडित नेहरूंचे मूलभूत तत्त्वज्ञान होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात तटस्थता आणि चीनपुढे शरणागती, काश्मीर प्रकरणी सार्वमताला मान्यता देऊन घोंगडे भिजत ठेवणे आणि अर्थकारणात 'ना नियोजन, ना मुक्त व्यवस्था' असा तृतीयपंथी मार्ग ही सारी या ऐतिहासिक पुळचटपणाचीच लक्षणं आहेत.

शेतकरी आंदोलनात या कचखाऊ शासनाचे एक दुसरे रूपही मी पाहिले आहे. रस्त्यावर शांतपणे बसून असलेल्या शेतकरी जमावावर याच शासनाचे शिपाई गोळीबार करतात, एवढेच नव्हे तर पक्की दहशत बसवण्यासाठी आसपासच्या गावांत घुसतात, दरवाजे फोडतात, राहत्या घरावरची कौले-पत्रे काढतात, बायामाणसांना, म्हाताऱ्याकोताऱ्यांना अर्वाच्य शिव्या घालीत झोडपून

काढतात, हे मी पाहिले आहे. सरकारी नोकरवर्ग संपावर गेला, की मात्र सरकारचे कचखाऊ रूप पुन्हा एकदा दिसून येते. परदेशी व्यवहारातदेखील असाच काहीसा प्रकार आहे. सिक्कीमसारखा छोटा देश. लॉर्ड कर्झनच्या दिमाखात एका दिवसात याच पुळचट सरकारने हस्तगत केला. बांगलादेशाच्या लढाईत लष्करीदृष्ट्या वरचढपणा प्रचंड असल्याने थोडीफार तरी हिंमत एका वर्षभराच्या अवधीन का होईना नेत्यांनी जमा केली? थोडक्यात, दांडग्यापुढे शरणागती आणि दीनदुबळ्यांपुढे दादागिरी अशी भारतीय राज्यव्यवस्थेची आणि लोकांचीही प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती कचखाऊपणाची नाही, पुळचटपणाची नाही, अप्रामाणिक भेकडपणाची आहे.

*६ सप्टेंबर २०००*

■■

# खेळ आणि व्यापार : रोमन विरुद्ध ग्रीक परंपरा

श्रीनगर येथील 'गुलाम बक्षी स्टेडियम'वर भारतभरच्या राज्याराज्यांतील पोलिसदलांच्या फूटबॉलच्या सामन्यांतील अंतिम टप्प्याचा सामना चालू होता. अलीकडे श्रीनगरमध्ये सामने वगैरेसाठी फारशी गर्दी जमत नाही. घातपाताच्या धोक्याची टांगती तलवार असल्याने तुरळक म्हणण्यापलीकडे गर्दी जमत नाही; पण या स्पर्धांच्या निर्णायक सामन्यालामात्र वीस हजारांवर प्रेक्षक हजर होते. जणू काही, काश्मिरात काही वणवा पेटलेलाच नाही असे फूटबॉलच्या उत्साहाने जमले होते. सामन्यात काश्मीरचा पोलिस संघ आधीच्याच फेरीत बाद झाला होता. म्हणजे आपल्या ओळखीपाळखीच्या खेळाडूंची क्रीडांगणावरील करामत पाहण्यासाठी म्हणून लोकांचा उत्साह उमाळत नव्हता; निर्णायक सामन्यातील प्रतिस्पर्धी संघ होते सरहद्द संरक्षक पोलिसदल (BSF) आणि कर्नाटक पोलिस. काश्मीरमधील सध्याच्या परिस्थितीत सरहद्द संरक्षक पोलिस (BSF) लोकप्रियतेच्या शिखरावर नसावेत हे उघड आहे. पण, त्यांच्यावरचा राग प्रेक्षकांनी ज्या कल्लोळाने त्यांची हुर्रे उडवून केला तो मोठा अद्‌भूत होता. सरहद्द संरक्षक पोलिस परकीय आक्रमकांचे सैन्य आहे, अशी सर्वसाधारण भावना काश्मीरमध्ये आहे. सामना सुरू होण्याआधीच प्रेक्षकांनी कर्नाटक संघाच्या बाजूने असा काही जयजयकाराचा धोशा लावला, की सरहद्द संरक्षक पोलिस संघाचे मनोधैर्यच खचले असावे. त्यांची पीछेहाटच होऊ लागली तसे प्रेक्षक अधिकाअधिक चेवाने त्यांची हुर्रेवडी करू लागले. 'लोकांना छळता काय? घ्या आता!' अशा अर्थाच्या घोषणा प्रेक्षक देऊ लागले. यात पाकिस्तानधार्जिणेपणा आणि भारतविरोध छपलेला होता असे म्हणणे कठीण आहे. कारण, प्रेक्षक जयजयकार करत होते तो कर्नाटक संघाचा. कर्नाटक नेमका कुठे आहे याची प्रेक्षकांना कितपत खबर होती कोणास ठाऊक? ते जयजयकार करत होते वीरप्पनच्या नावाने! वीरप्पन

आणखी एक गोल कर!, वीरप्पन आणखी एक गोल कर! असा प्रेक्षकांचा घोष चालला होता. कर्नाटक पोलिस, अर्थात् जिंकले. सारे प्रेक्षक खूष झाले व जयजयकार करत पांगले.

सामन्यामध्ये कर्नाटकऐवजी काश्मीर पोलिस संघ असता आणि त्यांची चुरस सरहद्द संरक्षक पोलिस दलाशी (BSF) असती तर प्रेक्षकांनी काय केले असते हे सांगणे कठीण आहे. त्याच श्रीनगरमध्ये, त्याच बक्षी स्टेडियमवर पाकिस्तानमधील एखादा संघ खेळत असता तर काय झाले असते याची कल्पना करणे कठीण आहे म्हणण्यापेक्षा कठीण नाही म्हणणेच जास्त योग्य.

काश्मीर तर सारा पेटलेलाच प्रदेश आहे. खेळाच्या सामन्यालाही असे टोकाचे राजकीय स्वरूप यावे हे समजण्यासारखे आहे; पण काश्मीरबाहेरदेखील सामन्यांचे वातावरण खऱ्याखुऱ्या युद्धासारखेच असते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना असला, की जणू काही जीवनमरणाचा प्रश्न आहे अशा तऱ्हेने मैदानावर उपस्थित असलेले प्रेक्षक घोषणांची धुमश्चक्री करून टाकतात. दूरदर्शनवर सामना पाहणारे प्रेक्षकही चेंडूच्या एका एका फेकीबरोबर उडी मारून उभे राहणे, टाळ्या वाजवणे, जयजयकार करणे, आनंददु:ख व्यक्त करणे अशा लीळा करीत असतात.

जगातील इतर अनेक देशांत अनेक खेळांचे सामने होतात; पराकोटीच्या चुरशीने सामने खेळले जातात. फूटबॉलच्या सामन्यांच्या वेळी गुंडागर्दी करण्यात इंग्रजी प्रेक्षकांनी अलीकडे मोठे नाव कमावले आहे! दक्षिण अमेरिकेत राष्ट्रीय संघ फूटबॉलच्या सामन्यात कमी पडला तर राष्ट्रीय दुखवट्याचे वातावरण तयार होते. खेळ ही त्या देशांत गंभीरपणे घेतली जाणारी गोष्ट आहे. त्यात कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात. खेळाडूंच्या सगळ्या आयुष्याची क्षणाक्षणाने उलाढाल होते; पण खेळ पाहताना उभय संघाच्या गुणवत्तेला सारेचजण दाद देतात.

खेळांच्या प्रेक्षकांचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार ग्रीक परंपरेतला. यात खेळणे, खेळात भाग घेणे महत्त्वाचे मानले जाते; जिंकण्याला फारसे महत्त्व नाही. प्रत्येक खेळाडू अधिक दूर, अधिक उंच, अधिक वेगवान या ध्येयाने उत्तमोत्तम कामगिरी करून दाखवितो. खेळांच्या पूर्वीही आनंदोत्सवाचा जल्लोष होतो; खेळ संपतानाही मोठी भावुक विदाई केली जाते.

खेळांची दुसरी परंपरा इटली देशातील रोमन संस्कृतीची. रोममध्ये प्रचंड क्रीडागारे असत. तेथे हजारोंनी प्रेक्षक जमत. खेळ माणूस विरूद्ध वाघ सिंहासारखे

हिंस्र पशू यांच्यात व्हायचा किंवा दोन शस्त्रसज्ज कुस्तीगिरांची झुंज असायची. सामन्याच्या शेवटी एकच पक्ष सहीसलामत बाहेर पडणार आणि दुसरा मैदानातच देह टाकणार याची जवळजवळ खात्रीच असायची. एक कुस्तीगीर हरू लागला म्हणजे प्रेक्षक हलकल्लोळ करून जिंकणाऱ्या कुस्तीगिरास प्रतिस्पर्ध्यास संपवून टाकण्याकरिता, आरडाओरड करून आग्रह करीत. रोमन खेळात सौहार्दपूर्ण शेवटाची शक्यताच नव्हती.

ग्रीक पद्धतीच्या खेळामध्ये महत्त्व कामगिरीला होते, जिंकण्याहरण्याला नव्हते.

भारत खंडातील प्रेक्षकांची मानसिकता रोमन परंपरेशी अधिक जुळणारी आहे. समोरासमोर ईर्ष्येने संघर्ष करणे त्यांना समजते; जिंको किंवा हरो. अधिकाधिक कोशीश करून उच्चांकांवर उच्चांक गाठणे त्यांच्या प्रकृतीस फारसे जमत नाही.

ग्रीक परंपरेतील अलीकडच्या काळातील सत्ताविसावे ऑलिम्पिक खेळ सिडनी येथे चालू झाले आहेत. साऱ्या जगभरातील यौवनश्रींचा हा महोत्सव. मानवी शरीर जे जे काही करू शकेल त्याची अद्‌भूत प्रात्यक्षिके जगापुढे मांडण्यासाठी हजारो युवकयुवती जमा होतात. एक खर्व जनसंख्येच्या आपल्या खंडप्राय देशाला एखादे सुवर्णपदकदेखील मिळण्याची शक्यता दिसत नाही; एखादे मिळालेच तर धन्य धन्य वाटते. आरामखुर्चीपंडितांची सहजस्फूर्त टिप्पणी – जातात कशाला कुणाला ठाऊक? विदेश पर्यटनाची संधी साधतात खेळाच्या नावाने, खेळाडू आणि पुढारी. याच्या दुसऱ्या टोकाची प्रतिक्रिया – लहानपणापासून होतकरू मुलांना वेगळे काढून, कसोशीने सराव देऊन त्यांना खेळासाठी तयार केले पाहिजे. ऑलिम्पिक खेळांच्या निमित्ताने आपला देश, आपला वंश यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न ज्या ज्या हिटलरांनी केला त्यांची त्यांची फजिती झाली. ज्या देशात सर्वच प्रकारच्या संधी जनसामान्यांनादेखील मुबलकतेने उपलब्ध असतात तेथील खेळाडू अधिकाधिक उंच, अधिकाधिक दूर, अधिकाधिक जलद ध्येय साधतात. रशिया, पूर्व जर्मनी आजपर्यंतच्या खेळात अग्रणी असत. या वेळी त्यांची परिस्थिती मोठी केविलवाणी झालेली दिसते.

ऑलिम्पिक खेळांच्या बाबतीत जे खरे, तेच जागतिक व्यापाराबद्दलही लागू आहे. जागतिक व्यापार म्हणजे अधिकाधिक चांगला माल अधिकाधिक स्वस्त उत्पन्न करून बाजारपेठा जिंकण्याची स्पर्धा आहे. आम्ही फार कच्चे; आम्ही काय परदेशातल्या मालाशी स्पर्धा करणार? नकोच आम्हाला ती जागतिक

स्पर्धा; आमची समुद्रपर्यटनास विरोध करणारी परंपरागत संस्कृतीच भली अशी भूमिका घेऊन जागतिक व्यापार संस्था भरवीत असलेल्या व्यापार ऑलिम्पिकमध्ये भागच घ्यायचा नाही असे म्हटले तर नुकसान जगाचे नाही, ऑलिम्पिकचेही नाही. अशा भूमिकेमुळे गुणवत्तेच्या परिपोषासाठी कसोशीने तपस्या करण्याची संस्कृती मागे पडेल आणि क्रीडाक्षेत्राप्रमाणेच व्यापारक्षेत्रातही आम्ही सदाचे नेबळे बनून जाऊ.

*दि. २९/९/२०००*

■■

# ब्रह्मचाऱ्याचा कोपागार अनुनय

कुटुंबकलहाच्या वेगवेगळ्या पायऱ्या आणि वेगवेगळ्या छटा यांच्याबाबत मराठी साहित्यिकांनी उदंड लिखाण केले आहे. किंबहुना, पती-पत्नीमधील भांडण हा मराठी साहित्यातील एक विशेष अलंकार आहे. साहित्यिक मध्यमवर्गीय, त्यामुळे, वर्णनेही मध्यमवर्गातील कलहांची. आपला जोडीदार नाराज आहे हे कळून येईपर्यन्त या कलहनाट्याचा पहिला अंक संपतो. रागाने तापलेला चेहरा, जोरजोराचा श्वासोच्छ्वास, हालचालींतील सहेतुक जडपणा, आपण काही बोलत नाही म्हणजे जगातील सहनशीलतेचे सारे उच्चांक मोडीत आहोत असा आविर्भाव, भांड्यांची आदळआपट, पोरांना बदडणे इ.इ. प्रवेशांती हा अंक संपतो.

पूर्वीच्या राजेरजवाड्यांना मोठा जनानखाना असे. एवढ्या सगळ्या पत्नीजनांत आज नाराज कोण आहे, हे समजून येणे अशक्य; समजले तरी त्याची फारशी पर्वा करण्याची त्याकाळी पद्धत नव्हती. जिच्या सदनी जाण्याची राजाने इच्छा धरावी तीच रुसलेली असली तरच रुसवा काढण्याचा प्रश्न निर्माण होणार. जाण्याआधी सदनातील रागरंग कसा आहे, हे कळण्याला काहीच मार्ग नाही. त्यासाठी एक सुंदर उपाय योजलेला असे. राजाच्या महालात अनेक सदने आणि आगारे असत. ज्या त्या व्यक्तीला त्याच्या त्याच्या स्थानाप्रमाणे निवासाची व्यवस्था असे. खास प्रियजनांसाठी तर हिवाळ्यातील निवास वेगळा, उन्हाळ्यातील वेगळा, पावसाळ्यातील वेगळा असा थाट असे. या सगळ्या वेगवेगळ्या विभागांत कोपागार म्हणून एक वेगळा स्वतंत्र महाल असे. कोणीही राणी नाराज झाली की तिने उठावे आणि कोपागारात जाऊन बसावे म्हणजे राजेश्वरांना दूताकरवी तातडीने बातमी कळे की, अमूक अमूक राणी रुसली आहे. महत्त्वाचे वाटले तर राजा अशा प्रकरणी लक्ष घाली, अन्यथा कोपागरात राहून राहून विटली म्हणजे ती राणी सुजल्या डोळ्यांनी आपल्या निवासात परते.

एकदा भगवान श्रीकृष्णांना नारदाने पारिजातकाचे फूल दिले. ते भगवंतांनी रुक्मिणीला दिले. त्याच्या सुगंधाने सारी द्वारिका नगरी भरून गेली आणि सर्वत्र चर्चेचा विषय झाला – 'रुक्मिणीच कृष्णाची लाडकी राणी'. चर्चा सत्यभामेच्या कानी गेली आणि तिने मोठा आक्रोश मांडला. कृष्णाने तिची समजूत काढली. या विषयावर वामनपंडितांनी मोठे बहारदार काव्य लिहिले आहे. 'नारदाने फूल अर्पण केले त्याबरोबर पहिला विचार मनांत आला तो हा की, हा वृक्ष आपल्या राजधानीत पाहिजे आणि तोदेखील आपल्या घरीच असावा. त्यातले त्यात प्रिय राणीच्या सदनात असणे उत्तम. रुक्मिणीला मी फूल दिले, पण अख्खा वृक्षच तुझ्या अंगणात लावण्यासाठी आणावा असे मी ठरविले आहे,' अशी कृष्णाने बतावणी केली. भामा रुसली, रागही खोटा आणि समजूतही खोटी. आपल्याला फूलच दिले आणि भामेला पारिजात वृक्ष दिला, हे समजल्यावर रुक्मिणीने काही थैमान घातले किंवा कसे याची काही नोंद महाभारतात नाही.

युग बदलले, काळ बदलला. राजेशाही गेली, लोकशाही आली. निश्चित बहुमताचा आधार असलेले पक्ष आणि पंतप्रधान गेले. मोर्चा आणि आघाड्या यांची सरकारे येऊ लागली आणि 'कोपागारां'चा कार्यक्रम पुन्हा एकदा प्रकट झाला! सत्तावीस पक्षांची आघाडी, अर्धशतकावर मंत्री या सगळ्यांना सांभाळून राज्य करणे म्हणजे सोळा सहस्र नारींच्या अनुराधनापेक्षाही कठीण.

आंतरराष्ट्रीय बाजारातील पेट्रोलच्या किंमती भडकल्या. सरकारी तिजोरीत आधीच खडखडाट. महागात तेल विकत घेऊन ग्राहकांना स्वस्तात देण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' किती दिवस चालावा? पर्याय नाही म्हणून अखेरीस पेट्रोलियम पदार्थांचे भाव वाढविण्याचा निर्णय घ्यावा लागला. पेट्रोलचे भाव वाढवण्याचा निषेध म्हणून तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी फटकन् राजीनामा देऊन टाकला. राजकीय तणाव एकदम वाढला. ताईंनी मोठे आकांडतांडव मांडले. गरीबांना जिणे असह्य करणारी ही भाववाढ आघाडीतील पक्षांशी औपचारिक विचारविनिमयसुद्धा न करता केली. आम्ही आता कोणत्या तोंडाने लोकांसमोर जावे? महागाई भडकावणाऱ्या सरकारमध्ये मंत्री म्हणून राहणे म्हणजे राजकीय आत्महत्याच आहे. नको ही राष्ट्रीय आघाडी, नको ते मंत्रीपद. असा मोठा त्रागा त्यांनी केला.

त्यांच्या राजीनाम्याने किंवा तृणमूल काँग्रेसचा पाठिंबा नाकारल्याने तसा काही धोका नव्हता, पण तरीही घरातल्या घरात रुसवेफुगवे काही बरे नाहीत. मागच्या वेळी जयललिताजी कोपागारात गेल्या; त्यांच्याकडे पंतप्रधानानी लक्ष दिले नाही आणि सारे सरकारच कोसळले. त्यामुळे, या वेळी लक्ष देणे भाग पडले. अलीकडे रुसवेफुगवे इतके की पंतप्रधानांना जातीने अनुनय करणे शक्य नाही. मग, असा अनुनय दूतांकरवी केला जातो. पंतप्रधानांनी दूताहाती संदेश धाडला, तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. लोकांना भाववाढीचा फार त्रास होणार आहे. पण भाव वाढविण्यापलीकडे काही दुसरा मार्गच नाही. तरीपण आम्ही एकूण भाववाढीच्या तिसरा हिस्साच ग्राहकांवर लोटत आहोत, दोन-तृतीयांश बोजा सरकारी तिजोरीवरच पडणार आहे. ममताताई खूश! बंगालमध्ये डाव्या आघाडीवरील मात इतकी हातातोंडाशी आली असताना राज्यकर्त्या आघाडीची कास सोडण्याइतक्या त्या अव्यवहारी नाहीत. भाववाढीला विरोध करण्यासाठी राजीनामा टाकला की, गरीबांचे कैवारी असल्याचा मोठा बोलबाला होतो, त्यासाठी ही सारी धावपळ. पंतप्रधान अविवाहित आहेत, कुटुंबकलह सोडवण्यात त्यांचा अनुभव शून्य. पण तरीही, श्रीकृष्णालाही लाजवील अशा कौशल्याने त्यांचा कोपागार अनुनयाचा कार्यक्रम चालू आहे.

मंत्रीमंडळाचा शपथविधी झाल्यापासून दररोज कोणी ना कोणी कोपागारात जाऊन बसते. कधी सुषमा स्वराज, कधी जॉर्ज फर्नांडीस, कधी राम जेठमलानी तर कधी आणखी कुणी! पंतप्रधानांची चतुरता अशी की, कोपागरात जाऊन दबाव आणण्याचा प्रयत्न त्यांच्या लगेच लक्षात येतो. आणि मग, अनुनय दूरच राहिला, महालातून हकालपट्टी होऊ शकते. राम जेठमलांनीच्या बाबतीत असेच झाले, सत्यनारायण सिंहही असेच फसले.

ज्यांचा अनुनय इष्ट अशी मंडळी कोपागरात जाऊन बसली की अशांत सदनात अटलबिहारींचा हरी येतो आणि युक्तिप्रयुक्तिने रुसवा काढतो. असे हे कोपागाराचे राजकारण आहे.

महाउष्णश्वासे करुनि वदते शुष्क अधरा.
धरापृष्ठीं जोडा न शठ दुसरा या गिरिधरा..
धराया माझा हा कर कपटि कैंचा जलमला.
मला जो निंदूनी कुसुम तिस देऊनि रमला..

सख्या हो मेल्याही शवहि न शिवो हें यदुपति.
पती नानास्त्रींचा पतितजनही ज्यास जपती..
नका येऊ देऊ सदनिं सवतीच्या प्रियकरा.
कराते लावीना मज कपटि ऐसें तुम्ही करा..

वामनपंडितांनी भामाविलासात सत्यभामेच्या केलेल्या अशा त्राग्याचे हे वर्णन ममताप्रकरणासही लागू पडेल.

*दि. १०/१०/२०००*

■■

# ससा आणि कासव - २०००

१९८२ मध्ये दिल्ली येथे आशियाड खेळांच्या स्पर्धा झाल्या. स्पर्धांसाठी येणाऱ्या खेळाडूंचे आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी सारी दिल्ली राजधानी नटूनथटून सज्ज झाली होती. नवी क्रीडांगणे, खेळाडूंसाठी वसतिगृहे, प्रेक्षकांसाठी तारांकित हॉटेले, वाहतूक सुरळीत चालावी म्हणून नवे वाहतूक पूल, नव्या बसगाड्या, स्वच्छ रस्ते, सुंदर क्रीडांगणे सारे काही जादूची कांडी फिरल्यासारखे उभे राहिले. खेळांच्या उद्घाटनाचा कार्यक्रम मोठा शानदार झाला. आशियाड खेळ दिल्लीत घेऊ नयेत, त्यापेक्षा ही साधनसामग्री आर्थिक विकासाच्या कामाकरिता वापरली गेली तर देशाचे आणि गोरगरिबांचे भले होईल. त्यात आणखी पंजाब पेटला आहे. असे रडगाणे गाणाऱ्यांनासुद्धा आपण भारतीय असल्याचा अभिमान उद्घाटनाचा सोहळा पाहताना वाटला. खेळ संपले, परदेशी मंडळी आपापल्या घरी परतली आणि थोडक्याच काळात दिल्लीने आपले कायमचे बकाली स्वरूप धारण केले.

गेल्या महिन्यात सिडनी येथे ऑलिम्पिक खेळांच्या स्पर्धा झाल्या. सिडनीसारखी व्यवस्था आणि नियोजन येत्या वीसपंचवीस वर्षांततरी दिल्लीत होईल असे वाटत नाही.

सिडनी खेळांच्या शेवटी जो उत्सवाचा जल्लोश झाला, आकाश आणि धरती उजळून टाकणारी जी रोषणाई झाली ते दूरदर्शनवर पाहूनच प्रेक्षकांचे डोळे तृप्त झाले. ऑलिम्पिक खेळही संपले. आता सिडनी शहराची काय अवस्था असेल? पुन्हा एकदा कोणत्याही मोठ्या शहराप्रमाणेच सिडनी गबाळ दिसू लागले असेल काय? नक्कीच नाही.

चार वर्षांपूर्वी दक्षिण कोरियातील सेऊल येथे ऑलिम्पिक खेळ झाले होते. त्या वेळी सेऊल नगरी अशीच नटली होती. आज तेथे कोणी प्रवासी पाहुणा

गेला तर वर्षा– दोन वर्षांत सेऊल ऑलिम्पिक खेळांचे यजमानपद स्वीकारण्यास पुन्हा एकदा सज्ज होऊ शकते याची त्याला खात्री पटते. मोठमोठी दुकाने सामानाने खचाखच भरली आहेत, अगदी शाळकरी मुलेसुद्धा सेल्युलर फोनवर एकमेकांशी बोलत आहेत अशा आरामाच्या जागा, सहलीची सारी उपवने माणसांनी तुडुंब भरली आहेत. दक्षिण कोरियासारख्या छोट्या देशाची राजधानी सेऊल वैभवाच्या शिखराला पोहोचली आहे व वैभवाला काही अंत नाही आणि सीमा नाही असे सारे वातावरण आहे.

तीन वर्षांपूर्वी म्हणजे, १९९७ मध्ये दक्षिण कोरियावर आर्थिक मंदीची लाट आली होती. मोठमोठे कारखाने बंद पडले, बँकांची दिवाळी निघाली. खुल्या व्यवस्थेचा फायदा घेऊन प्रचंड वेगाने आर्थिक प्रगती करणाऱ्या आशियायी वाघांपैकी दक्षिण कोरिया हा एक महत्त्वाचा देश आहे. ढाण्या वाघच जाळयात सापडल्यासारखे झाले.

भारतात खुल्या व्यवस्थेला विरोध करणारे अनेक लोक आहेत. लाल बावट्याखाली सारे जग एकत्र झाले नाही आणि खुली व्यवस्था मात्र जगाला एकत्र करीत आहे याबद्दल संतापलेले जुने डावे आणि त्यांचे साथी यांनी दक्षिण कोरियातील मंदीचा मोठा गहजब केला. आम्ही सांगत होतो, बाजारपेठी व्यवस्थेमुळे कधी कोणाचे भले होणे शक्यच नाही. पटले आता? आशियायी वाघांच्या प्रगतीबद्दल मोठा डंका पिटीत होते! कशी खाशी जिरली! शेपूट तुटलेल्या कोल्ह्याला दुसऱ्याचे शेपूट तुटलेले पाहून संतोष वाटावा असा हा प्रकार आहे. त्यांच्यापेक्षा आम्ही बरे. हळूहळू का होई ना, आमची प्रगती चालू आहे. फार उंच पोहोचलो नाही, पण खड्ड्यात तर पडलो नाही ना? असेही आंबट समाधान ही मंडळी मानून घेतात.

१९९७ साल गेले. नंतरही दोन वर्षे पार झाली. दक्षिण कोरिया झपाट्याने प्रगती करीत आहे. मागील वेळी झालेल्या चुका त्यांनी नीट समजावून घेतल्या. नवनवोन्मेषी जातिवंत शिल्पकाराला ग्राहकांची फिकीर नसते. पण, शाडूचे गणपती बनविणाऱ्या मूर्तिकाराला लवकरच स्पर्धेला तोंड द्यावे लागते आणि मंदीची लाट आऽ वासून समोर उभी राहते. तीन वर्षांपूर्वीपर्यन्त आशियायी वाघ पाश्चिमात्य औद्योगिक देशांना लागणाऱ्या फुटकळ सामानांचा पुरवठा करीत. मंदीच्या अनुभवानंतर गेल्या तीन वर्षांत या सर्व देशांनी नवनवीन तंत्रज्ञान शोधण्यावर आणि वापरण्यावर भर दिला आहे म्हणूनच त्यांची पुन्हा एकदा वैभवाच्या शिखराकडे झपाट्याने वाटचाल सुरू आहे.

भारत मात्र स्पर्धेत कधी धावला नाही, कधी पडलाही नाही आणि, आजही भारताची अर्थव्यवस्था कुचंबल्यासारखी सुस्तावली आहे. अर्थमंत्री श्री. यशवंत सिन्हा मात्र पराकाष्ठेच्या तावातावाने सगळे काही आलबेल असल्याचे निक्षून सांगत आहेत.

तसे म्हटले तर ही जुनीच 'ससा आणि कासव' यांच्या शर्यतीची कहाणी आहे. फरक एवढाच, की इसवी सन २००० मधील ससा वाटेत झोपी जात नाही आणि कासव मात्र खड्ड्यात पडून कुचंबून बसते.

*दि. ३१/१०/२०००*

■■

# खिडकीला दोन दिशा

केरळातील कोण्या ॲलेक्झॅण्डरबाईंनी आपल्या तीसचाळीस महिला सहकाऱ्यांबरोबर न्यूयॉर्क शहरात मोर्चा काढला. बाईंची आणि त्यांच्या साथीदारांची तक्रार अशी, की जागतिकीकरणामुळे केरळातील मासेमार कोळयांच्या पोटावर पाय येत आहे; या नव्या स्पर्धेमुळे त्यांना जगणे अशक्य झाले आहे.

परदेशी बाजाराबद्दल हिंदुस्थानात विचित्र विचित्र कल्पना ऐकू येतात. आपल्याकडून हापूस आंब्याची परदेशी निर्यात झाली तर आता सगळे चांगले आंबे परदेशात जाणार आणि आपल्याला ते खायला मिळणार नाहीत अशी तक्रार होते. उलटपक्षी, न्यूझीलंडची उत्तम सफरचंदे अगदी तालुक्याच्या गावापर्यन्त येऊन पोहोचली; त्यावर या परदेशी सफरचंदांपुढे देशी फळांचा काय टिकाव लागणार? मग, देशातील शेतकऱ्यांनी कोणत्या आधारावर जगावे? असेही प्रश्न विचारले जातात. 'ओली पडो की सुकी', नुकसान आपलेच अशी एक पराभूत मनोवृत्ती हिंदुस्थानात सर्वदूर आढळते.

जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींना सुरुवात झाल्यापासून वास्तवातील भीतीपेक्षा या काल्पनिक कथांची भूते लोकांच्या मानगुटीवर बसविली जात आहेत. दिल्लीपासून ते चेन्नईपर्यन्त सगळीकडे गेल्या दोन महिन्यांत एकच अफवा पसरली आहे, की युरोपातून पाचसाडेपाच रुपये किमतीने दूध आयात करून विकले जात आहे. हिंदुस्थानातील दुधाची किंमत सर्वसाधारणपणे १५ रुपये प्रति लिटरच्या आसपास आहे आणि तरीही, गायीम्हशी पाळून कोणी इमले चढविले असे काही ऐकिवात नाही. अशा परिस्थितीत, परदेशी दूध इतके स्वस्त मिळू लागले तर येथील गवळयांना विष पिऊन आत्महत्या करण्यापलीकडे गत्यंतरच नाही असा बोभाटा केला जात आहे. इतक्या जणांनी इतक्या वेळा वेगवेगळया ठिकाणी ही कथा माझ्या कानावर घातली, की थोडीफार तरी चौकशी

करणे आवश्यक झाले आहे. चौकशीअंती ‘साडेपाच रुपये दूध’ म्हणजे ‘पिंपळाच्या झाडावरचा मुंजा अमक्याने पाहिला, तमक्याने पाहिला’ अशा भूतकथांसारखी ठरली. युरोपातील दूध हिंदुस्थानातील दुधापेक्षाही अधिक महाग आहे. डॉ. कुरियन साहेबांच्या ‘दूध महापूर’ योजनेसाठी युरोपातील देशांनी देणगीदाखल दुधाची भुकटी आणि दुधाची चरबी हिंदुस्थानात फुकट आणून टाकली हे खरे. त्या दानात त्यांचा काही डाव असेल. पण, व्यापार म्हणून असला मूर्खपणा केवळ समाजवादी सरकारच करू शकते. अमेरिकेतून ८०० रुपये क्विंटल दराने गहू विकत घ्यायचा, त्यावर दीडदोनशे रुपये जहाज-वाहतुकीचा खर्च करायचा आणि, हिंदुस्थानातील बाजारपेठेत त्याहीपेक्षा चांगला गहू ६०० रुपये प्रति क्विंटल भावाने मिळत असताना आयात गहू ५०० रुपयांनी विकायचा असला अव्यापारेषु व्यापार हिंदुस्थान सरकारच करू शकते; व्यापारी संस्था नाही.

परदेशी व्यापाराशी सर्वसामान्य माणसांचा फारसा काही संबंध येत नाही. ‘इंपोर्टेड’ वस्तू म्हणजे चांगल्याच दर्जाची असते, याकरिता ‘फॉरेन’ वस्तूंचा हव्यास ठेवणे यापलीकडे परदेशी व्यापाराच्या वेगवेगळया अंगांची फार थोडी माहिती जनसामान्यांना असते. साहजिकच, आयात-निर्यातीसंबंधी वेडगळ किंवा विचित्र कथा रस्त्यांवरील गप्पांत सांगितल्या जाव्यात हे समजण्यासारखे आहे. राजकीय स्वार्थापोटी ‘स्वदेशी, स्वदेशी’चा गजर करणे फायद्याचे ठरत असेल तर देशाभिमानाच्या गर्जना करणारे नेते आणि संघटना व मंच संख्येने काही थोडे नाहीत.

पण, हिंदुस्थान सरकारचे वित्तमंत्री यशवंत सिन्हाजी परदेशी व्यापाराबद्दल काही अजाण नाहीत आणि स्वदेशीचा दुराग्रह बाळगण्यात त्यांचा काही राजकीय हेतूही नसावा. निवडणुकीत जिंकून केंद्र शासनात वित्तमंत्री झाल्यापासून तरी यशवंत सिन्हाजी ‘खुल्या व्यवस्थेसंबंधी आपली निष्ठा अव्यभिचारी असल्याचे’ निक्षून सांगत असतात. ‘डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ मध्ये खुलेकरणाचा पहिला कार्यक्रम घोषित केला. तर, खुलेकरण टप्पा-२ आपण अमलात आणीत आहोत’ असे ते अभिमानाने सांगतात. देशातील ‘लायसेन्स् परमिट राज्य’ संपावे आणि शासनाने अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये ही तत्त्वे ते मानतात. खुलिकरणाचा हा पुरस्कर्ता एकदम, जागतिकीकरणाच्या विरुद्ध आणि खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयी काही विरोधी भूमिका घेईल हे असंभाव्य वाटते. पण, प्रत्यक्षात तसे घडले आहे. मागील आठवड्यात सिन्हा साहेबांनी दिल्लीत एक निवेदन केले. जगाबरोबरच्या व्यापाराच्या खिडक्या व दरवाजे उघडताना पूर्ण सावधगिरी बाळगली पाहिजे आणि परदेशी व्यापाराचा

देशी उद्योजकांवर व अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत नाही ना, हे कसोशीने तपासून पाहिले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

कोणत्याही कार्यक्रमाविषयी बोलताना त्या कार्यक्रमाचा काही विपरीत परिणाम आपल्या देशावर होत नाही ना, हे तपासून पाहणे योग्यच आहे. त्यात विशेष आग्रहाने निवेदन करण्यासारखे काहीच नाही. श्री. गुजराल यांच्या सरकारने ऑस्ट्रेलियातून गहू मागविला. गहू खरेदी करण्याची इतकी घाई त्यांच्या सरकारला झाली होती, की गव्हाच्या सर्वसाधारण तपासणीलासुद्धा फाटा देण्यात आला. पोत्यांतील गव्हाबरोबरच काही विषारी वनस्पतींची बियाणी आली; ती सर्वत्र पसरली असती तर गव्हाच्या प्रदेशातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असते. किंबहुना, पंडित नेहरूंच्या काळात गव्हाच्या आयातीबरोबर 'काँग्रेस गवता'चे जे तण घुसले आणि शेतकऱ्यांना त्याने 'दे माय, धरणी ठाय' करून सोडले तसा प्रकार झाला असता. परदेशातून कोणताही माल आला, फार काय, कोणी माणूसही आला तरी त्याच्याबरोबर जंतूंची, रोगराईची आयात होण्याचा धोका संपूर्ण नाकारणे शक्य नाही. जुन्या काळात परदेशात जाऊन आलेल्या कोणाही भारतवासीयास प्रायश्चित्त घ्यावे लागे त्यामागे, कदाचित्, अशाच प्रकारची काही धास्ती असण्याची शक्यता आहे. तरीही, भारतीय परदेशांत जातात, अभिमानाने जातात; प्रायश्चित्त दूरच राहिले, आपल्या देशपर्यटनाची बढाई मारतात. कारण, परदेशाच्या संपर्काने काही धोका निर्माण होत असला तरीही त्यापासून होणारे लाभाचे प्रमाण इतके प्रचंड आहे, की परदेशसंपर्काच्या अपायकारक बाबींकडे आता कोणी फारसे लक्ष देत नाही.

समाजवादी नियोजनाच्या काळात परदेशी चलनाची चणचण होती. त्यामुळे, निर्यात आणि आयातीला पर्याय या दोन गोष्टींना मोठे महत्त्व दिले जात होते. निर्यात करणे म्हणजे परदेशी चलन कमविणे, म्हणजे परदेशातून हव्या त्या वस्तू विकत घेण्याचे सामर्थ्य मिळविणे असे झाले. याउलट, आयात करणे म्हणजे दुर्लभ परकीय चलनाचा अपव्यय करणे झाले. थोडक्यात, निर्यात तेवढी चांगली आणि आयात सर्व विनाशकारक अशी कल्पना दृढ होऊन बसली. या कल्पनेत थोडेफार तथ्य आहे. केन्स् यांच्या अर्थशास्त्राच्या आधारे, निर्यात म्हणजे अधिक उत्पादन, म्हणजे अधिक रोजगार, म्हणजे अधिक भरभराट असे सूत्र मांडता येईल. उलट, आयात म्हणजे उत्पादनात घट, रोजगारात घट आणि, परिणामी, मंदी हे उघडच आहे. या कारणास्तव जो तो देश अधिकाधिक उत्पादन करून आपल्या मालाला बाजारपेठ शोधण्यासाठी

अव्याहत भगीरथ प्रयत्न करीत असे.

पण, आयात म्हणजे वरपासून खालपर्यन्त नुकसानीचीच बाब ही कल्पना खरी नाही. जगाशी व्यापारी संबंध ठेवणे, इतर देशांशी वस्तू वा सेवा यांची देवघेव करणे हे लाभदायक आहे यात काही शंका नाही. जागतिक व्यापारामुळे जो तो देश ज्या वस्तू उत्पादन करण्यात काही नैसर्गिक सोय असेल त्याच वस्तू तयार करतो, जागतिक श्रमविभागणी होते आणि निर्यात करणाऱ्यांचा तर फायदा होतोच होतो; पण आयात करणाऱ्यांचादेखील फायदा होतो.

जगाशी संपर्क तेवढा वाईट ही कल्पना इंग्रजी अमदानीच्या पहिल्या काळात आग्रहाने, राष्ट्रवादी आवेशाने त्या काळचे पुढारी मांडीत. त्याला अपवाद फार थोडे. त्यांतील एक जोतीबा फुले. इंग्रजाचे राज्य आले नसते तर बरे झाले असते. पण, आले आहे हे खरे. ते काही कायम टिकणार आहे असेही नाही. कधीतरी त्यांना या देशावरील सत्ता सोडून द्यावीच लागेल ही काळ्या दगडावरची रेघ आहे. पण, इंग्रजांच्या संपर्काचे काही विलक्षण लाभही समोर वाढून आले आहेत. इंग्रजी राज्यामुळे नवे ज्ञान आले, तंत्रज्ञान आले. शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तो मिळू लागला. अशा परिस्थितीत, इंग्रजांविरुद्ध विद्वेष पसरवून सामाजिक सुधारांखेरीज राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरणे म्हणजे इंग्रजांनंतर पुन्हा एकदा पेशवाईलाच निमंत्रण देणे आहे, असे जोतीबा फुल्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

जगाशी जितका अधिक संपर्क तितकी माणसाची आणि पर्यायाने, देशाची क्षितिजे रुंदावतात हा एकच फायदा 'केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार' ही उक्ती सिद्ध करण्यास पुरेसा आहे.

एका उदाहरणाने ही कल्पना स्पष्ट व्हावी. दक्षिण अमेरिकेतील ब्राझील देश आकारमानाने हिंदुस्थानच्या तुलनेत अगदीच लहान. आज भारतीयांत गणकयंत्राच्या क्षेत्रात आपल्याला काही विशेष बुद्धी आहे अशी एक सार्वत्रिक भावना आहे. ही वल्गना फक्त गणकयंत्राच्या आज्ञावली-भाषेविषयी खरी आहे, गणकयंत्राच्या अभियांत्रिकीविषयी नाही. १९८५ मध्ये ब्राझील देशाने गणकयंत्रांच्या उत्पादनात इतकी मोठी आघाडी मारली, की आता गणकयंत्रे किंवा त्यासाठी लागणारे पुष्कळ सामान आयात करण्याची काहीही गरज नाही अशी तेथील स्वदेशीमंचवाले ओरड करू लागले. त्यांनी जिंकले आणि त्यांच्या सरकारला गणकयंत्रे आणि त्यासाठी आवश्यक सामानाच्या आयातीवर बंदी घालावी लागली. परिणाम असा झाला, की ब्राझीलचा जगाशी संपर्क तुटला; गणकयंत्राच्या क्षेत्रात जे नवेनवे तंत्रज्ञान दिसामासाला उदयाला येत आहे त्याच्याशी त्या देशाचा संबंध

राहिला नाही; उद्योगधंदा घसरत गेला; दहा वर्षांनी म्हणजे १९९५ मध्ये तेथील गणकयंत्रांचे कारखाने बंद पडले आणि आज मजबुरी म्हणून, गणकयंत्रांची आयात पुन्हा सुरू झाली आहे.

प्रत्येक देशातील उद्योगधंद्यांना भौगोलिक कारणानेच एक संरक्षण मिळालेले असते. परदेशातील माल येथील बाजारपेठेत आणून ओतण्यासाठी निदान वाहतूकखर्चतरी करणे भागच असते. भारतीय उद्योजक परदेशी स्पर्धेत टिकत नाहीत याचा अर्थ साऱ्या वाहतुकखर्चाचा फायदा असूनही ते कमी पडतात. अशी परिस्थिती असेल तर शहाण्या शासनाने काय करावे? सर्वसामान्यांची इच्छा अशी दिसते, की 'सरकारने आयात कर लावावेत, परदेशी आयात महाग करून टाकावी म्हणजे देशी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळेल.' या विचारात एक तर्कदुष्टता आहे. आपण करांच्या भिंती उंचावल्या तर परदेशांचे हात काही केळी खायला जात नाहीत! तेही तोडीस तोड म्हणून त्यांच्याकडील आयातकर वाढवू शकतात. म्हणजे, आपण त्यांचे पाय कापायचे आणि त्यांनी आपले! असा सारा व्यापारच बुडविण्याचा हा कार्यक्रम आहे. एवढे समजूनही परदेशी मालावर अवजड कर लादले तर देशावर काय परिणाम होईल? देशातील ग्राहकाला केवळ 'स्वदेशी' म्हणून भिकार माल महागड्या किंमतीत विकत घ्यावा लागेल. असा जुलूम ग्राहाकांनी काय म्हणून स्वीकारावा आणि किती काळ सहन करावा?

देशात खुली व्यवस्था असावी; पण जगभर मात्र प्रत्येक देशाने आपल्या स्वार्थाचाच तेवढा विचार करून आर्थिक धोरणे आखावीत यात परस्परविरोधी तर्कप्रणाली आहे. जगभर खुली व्यवस्था नसेल तर देशाच्या आत खुली व्यवस्था अमलात आणणे आणि टिकविणे केवळ अशक्य होईल.

थोडक्यात, नव्या काळाचे सूत्र असे आहे. साऱ्या भिंती पडू देत, जगभर मोकळे वारे वाहू दे, त्यातच सर्वभूतांचे कल्याण आहे. खिडक्या उघड्या राहू देत, काही वारा बाहेरून आत येईल, काही वारा आतून बाहेर जाईल. एकाच दिशेने वारा वाहू देणारी खिडकी अशक्य आहे.

नुसतीच आयात झाली तरी ती जागतिकीकरणाची एक लाट आहे म्हणून शेवटी, कल्याणप्रदच आहे, एवढी निष्ठा निदान वित्तमंत्र्यांकडून तरी इ.स. २००० मध्ये अपेक्षित करणे चूक नसावे.

*दि. ६/११/२०००*

■■

# मुरली मनोहरांचे अशिक्षण धोरण

दि. १४ नोव्हेंबर रोजी केंद्रातील मनुष्यबळ विकासमंत्री मुरली मनोहर जोशी यांच्या हस्ते शालेय शिक्षणविषयक राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याचे प्रकाशन झाले. श्री. रजपूत अभ्यास गटाने दिलेल्या अहवालानुसार हा आराखडा आधारलेला आहे.

दहावीपूर्वीच्या सर्व परीक्षा रद्द करून त्याऐवजी शालांतर्गत मूल्यमापनाची पद्धती राबवण्यात यावी. मूल्यमापन सातत्याने केले जावे व मूल्यमापनाची पद्धत सर्वंकष असावी, दहावीपर्यंत पास–नापास अशी काही भानगड ठेऊच नये, ही या अहवालातील सर्वांत सनसनाटी शिफारस आहे. गेली अनेक वर्षे शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, वार्षिक परीक्षांत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यांच्या तुलनांचे तक्ते मांडून शिक्षण क्षेत्रात केवढा प्रचंड अपव्यय होत आहे याचे हिशेब मांडण्यात येतात. रजपूत समितीची शिफारस स्वीकारली, की दहावीपर्यंत तरी शिक्षणातील अपव्यय एकदम खलास होणार. पहिलीत जितके विद्यार्थी प्रवेश घेतील ते सारे दहावीपर्यंत बिनधास्त पोहोचणार. यापुढे कुणालाही 'सातवीत नापास झालो आणि शाळा सोडून घरी बसलो' असे म्हणावे लागणार नाही. दहाव्या इयत्तेपर्यंत तरी सारे थेट पोचून जाणार. शाळेतच मूल्यमापन व्हावे, वारंवार व्हावे, सातत्याने व्हावे, सर्वंकष पद्धतीने व्हावे असा कितीही निकराने आग्रह धरला तरी प्रत्यक्षात परिणाम काय होतील, हे स्पष्ट आहे. अर्थात, मुलांना नापास करणे शिक्षकांना आवडत नाही आणि शाळांना परवडत नाही. नापास विद्यार्थ्यांना खालच्या वर्गात राहिले तर वरच्या वर्गातील बाके ओस पडतात आणि शिक्षकांच्या जागा, सरकारी अनुदाने सारेच कापले जातात. नापास झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षकांनी क्रूरपणाने पेपर तपासले असे वाटते. मुले पास व्हावीत याची चिंता विद्यार्थ्यापेक्षा शिक्षकांना अधिक

असते. उत्तरपत्रिका तपासताना विद्यार्थी गुण देण्याची कोठे थोडीफार तरी संधी देत आहे काय, याकडे परीक्षक बारकाईने नजर ठेवून गुणांचे वाटप खिरापतीप्रमाणे करीत असतात. एवढे करूनही नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पास कसे करावे, याचे आटोकाट प्रयत्न पर्यवेक्षक आणि प्राचार्य यांच्या पातळीवर होतात. शेवटी, सगळयांना सरसकट किती गुण दिले तर निदान निम्मे विद्यार्थी उत्तीर्ण होतील याचा हिशेब करून गुणांचा बोनस वाटला जातो. अशा परिस्थितीत, दहावीपर्यंतच्या साऱ्या परीक्षा शालांतर्गत ठेवणे म्हणजे पोस्टातल्या टपालाप्रमाणे प्रत्येक वर्षी शिक्का मारून विद्यार्थ्यांना वर ढकलणे एवढाच होईल. सारे विद्यार्थी दहावीपर्यंत पोचतील, पण 'बे'चा पाढासुद्धा न येणारे विद्यार्थी दहावीपर्यंत पोचले तर शैक्षणिक व्यवस्था संपुष्टात आली असा डांगोरा पिटणे कितपत योग्य होईल?

परीक्षापद्धती गुणवत्ता ठरविण्याकरिता असते, घोकंपट्टीची कसोटी नसते; एक ठरावीक कसोटी लागणार आहे, त्यासाठी आवश्यक ती तयारी करावी लागते. कोणत्याही एका अडचणीला सामोरे जाऊन तिच्यावर मात करण्याची कुवत विद्यार्थ्यांत कितपत आहे याची, खरे तर, परीक्षेत चाचणी होत असते. अनुत्तीर्ण विद्यार्थी तेवढे सारे शैक्षणिक व्यय, असे एकदा मानले तर मग काही समस्या राहतच नाही. दहावीपर्यंत कशाला, सगळ्या मुलांना पदवी परीक्षेपर्यंत पोचवून का देऊ नये?

शैक्षणिक व्यय मोजायचे मानदंड असे खुळे असून चालणार नाही. दहावीच्या इयत्तेपर्यंत विद्यार्थ्यांची कुवत काय असावी? याची अपेक्षा ठरली आणि त्या अपेक्षेच्या तुलनेने प्रत्यक्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांची कुवत कमी ठरली आणि प्रत्यक्ष व अपेक्षित कुवतीच्या तुलनेने शैक्षणिक व्ययाची टक्केवारी काढली तर त्यात काही अर्थ राहील.

साऱ्या पास-नापास श्रेणी बाद केल्याचा काय फायदा होणार आहे? नव्या शालेय शिक्षण धोरणात राष्ट्रभक्ती व धार्मिक मूल्यांवर भर द्यावा अशी शिफारस आहे. अभ्यासक्रमाचा बोजा कमी करावा व सर्व स्तरांवरील शिक्षणात मुलांना राष्ट्रभक्ती, राष्ट्रीयता आणि सर्व धर्मांतील मूल्यांचे धडे देण्यावर केंद्र शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे.

देशातील शालेय शिक्षणात देशभक्तीविषयी उदासीनता निर्माण झाल्याचा निष्कर्ष समितीने काढला आहे. धर्माची खरी शिकवण समजून घेण्यास एकूण समाजालाच वेळ मिळत नाही. त्यामुळे, अभ्यासक्रमात आधारभूत मूल्यांचा समावेश करण्याचे घाटते आहे. शासन भा.ज.पा.चे आहे. हिंदू धर्माच्या सर्वंकष

श्रेष्ठत्वाविषयी अनेक धुरीणांची खात्री आहे. मनुष्यबळविकास मंत्र्यांचे तर याबाबतीत विचार सर्वधर्मसहिष्णुतेलादेखील न मानणारे आहे. अशा परिस्थितीत आधारभूत मूल्याची शिकवण सर्वधर्मसमावेशक असणार आहे, केवळ हिंदू धर्मापुरती मर्यादित नाही, हेच आश्चर्य आहे.

धर्माच्या मूल्यांची शिकवण देणे म्हणजे नेमके अभ्यासक्रमात काय घालण्यात येईल? आजही थोर थोर संतांची वचने पाठ्यपुस्तकांत भरपूर भरण्यात येतात. 'खोटे कधी बोलू नये,' 'आईवडीलांचा आदर करावा' अशा बाळबोध धड्यांपासून ते 'अहिंसा, सत्य, अस्तेय' अशा प्रगल्भ सूत्रांपर्यंत शिकवणींची आजही पाठ्यपुस्तकांत रेलचेल आहे.

राष्ट्रप्रेमाची भावना चेतवण्यासाठीही भरपूर मजकूर पाठ्यपुस्तकांत असतो. राष्ट्राचा इतिहास, त्यातील शूरवीरांच्या आणि थोर पुरुषांच्या जीवनकहाण्या, स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांचे बलिदान, आपल्या समाजाचा अभिमान आणि दुसऱ्या समाजांचा द्वेष हे लहान मुलांच्या कोवळया मनावर दडपण्याचा प्रयत्न आजही चालू आहे. भारत सरकारच्या नवीन शिक्षण धोरणामुळे त्यांत नेमका काय फरक पडणार आहे हे कुठेच स्पष्ट केलेले नाही.

विद्यार्थ्यांच्या मनात कोवळया वयात ज्ञानजिज्ञासा जागृत करणे हे काम शिक्षणसंस्थांचे आहे. हे विश्व काय आहे? त्याची उत्पत्ती काय? त्याच्या चलनवलनाचे नियम कोणते? त्याच्या प्रगतीची दिशा कोणती? असे प्रश्न मुलामुलींच्या मनात उभे करणे आवश्यक आहे; पण, या प्रश्नांची कालौघातील दार्शनिक, प्रेषित, पैगंबर आणि अवतार यांनी दिलेली वेडीबागडी गोलमाल उत्तरे मुलांच्या डोक्यात कोंबून फायदा तो काय होणार?

महाराष्ट्रात अनेक शाळा व संस्था भगवत्‌गीतेतील अध्यायांचे वाचन, पाठांतर नियमाने करून घेत असतात. पहिला, दुसरा, ११वा, १२वा, १३वा आणि १५वा हे भगवद्‌गीतेतील अध्याय मुलांकडून पाठ करून घेण्यासाठी निवडले जातात. मुलेही बिचारी ती पाठ करतात. १२व्या अध्यायाच्या पाठांतरावर खूपच जोर असतो. शिक्षक ज्ञान, कर्म आणि भक्ती यांतील भक्तिमार्गावर विशेष भर देऊ इच्छितात. त्यामुळे, १२वा अध्याय खास लाडका झाला असावा काय? सांख्ययोग, क्षेत्र–क्षेत्रज्ञ विचार हे जाणीवपूर्वक कोपऱ्यात ढकलले जातात काय? का १२वा भक्तिमार्गावरील अध्याय सर्वांत छोटा म्हणून निवडला जातो?

सर्व धर्मांच्या शिकवणी पुस्तकांत घातल्याने धर्मशिक्षण सर्वंकष होते, असे नाही. एकाच धर्मातील वेगळे वेगळे विचार, वेगळे वेगळे पंथ विद्यार्थ्यांना

माहीत होणे आवश्यक आहे. अन्यथा, चार्वाक का शंकर, यांतील निवड करण्याचा अधिकार शिक्षण खात्यातील नोकरशाहीच्या हाती एकवटून जाईल.

धर्म जिज्ञासा जागृत कशी करता येते याचा अनुभव घेण्याचे भाग्य मला काही थोर शिक्षकांमुळे लाभले. मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजात प्राचार्य एस.के. मुरंजन आठवड्यातून एक दिवस आत्मचिंतनचा कार्यक्रम ठेवीत. या कार्यक्रमात त्यांनी विश्वाचे अनंत स्वरूप वेगवेगळया तऱ्हांनी मांडले. ज्ञानेंद्रियांची त्रोटकता समजावून सांगताना आकाशात तारे दिसतात म्हणजे ते आहेत असे नाही, दिसतात याचा अर्थ काही प्रकाशवर्षांपूर्वी ते तारे होते असे त्यांच्या तोंडून ऐकताच डोक्यात झिणझिण्या उठत. 'ईश्वराच्या साक्षात्काराचा अनुभव सेंट पीटरपासून अनेकांनी सांगितला आहे. अशा अनुभवांचा भास आकडी (Epilepsy)च्या आजाराच्या अनुभवाने येऊ शकतो असे मानण्यात धार्मिकांचा काही उपमर्द नाही. काही आजार विश्वाच्या आकलनाचा मार्ग सुलभ करून देतात, एवढेच फारतर तात्पर्य निघते .' एवढी स्पष्ट मांडणी ते करीत. रसेलचा ट्रिस्ट्रॅम सॅण्डी आत्मचरित्र लिहायचे ठरवतो. अगदी बारीकसारीक तपशीलसुद्धा नोंदवायचा निश्चय करतो. एका दिवसाचे चरित्र लिहिण्यासाठी त्याला एक वर्ष लागते. बोला, त्याचे आत्मचरित्र कधी लिहून पुरे होईल? असे त्यांनी विचारताच आम्हा विद्यार्थ्यांच्या मनात उत्तर लगेच तयार – शक्यच नाही. मग प्राचार्यांनी अनंत दिवस = अनंत महिने हे गणिती समीकरण सांगितले आणि कोणत्याही सात कालखंडात अशक्य असणारी ही गोष्ट अनंतात शक्यप्राय होते याची जाणीव होताच आम्ही सारे भांबावलो; पण डोक्यात धर्मजिज्ञासा जागृत झाली. अनंताच्या नेढ्यातून पुढे जाताना जग उलटेपालटे होते आणि लुई कॅरोलच्या आरशापलीकडील जग कथेप्रमाणे सारेच काही अनुभव उलटेपालटे होतात. या भूलभुलैयाने थोर थोर विचारवंत प्रेषित चकले. सांत विश्वातील नियम त्यानी अनंतावर लादले, त्यातून ज्ञानमार्गातील ईश्वराची भाकडकथा तयार झाली. या असल्या, बुद्धी चेतवणाऱ्या जिज्ञासा जागृत करणाऱ्या आत्मचिंतनाच्या प्रशिक्षणाने विद्यार्थ्यांचा फायदा होईल यात काही शंका नाही; पण

**स्वतः प्रमाणम् परतः प्रमाणम् नैको मुनिर्यस्य मतमभिन्नम्**
**धर्मस्य तत्त्वम् निहितम् गुहायः महाजनो येन गतः स पंथः**

या उक्तीप्रमाणे धर्माचे तत्त्व जाणून घेण्याची इच्छा तयार करण्याऐवजी केवळ पाठांतर आणि घोकंपट्टी या प्रशस्त मार्गाने विद्यार्थ्यांना हाकीत नेण्यात आले तर त्याचा विपरीत परिणाम होण्याचा भरपूर धोका आहे. आजच्या जगात

पाऊस पडण्यासाठी यज्ञकर्म जागोजाग होतात, तेथे लोक उत्साहाने जमतात. पण, असल्या कर्मकांडाला बौद्धिक प्रतिष्ठा नाही. गीतेतील 'यज्ञात् भवति पर्जन्य:' हे पाठ करून विद्यार्थ्यांनी नंतर भूगोलाचा आणि हवामानशास्त्राचा अभ्यास करावा कसा? आणि 'संकरो भयावह:' पाठ करून जैविक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बीजसंकराचे काम निष्ठेने करावे कसे? उपनिषदांतील शिकवणुकीचे मर्म ध्यानी आल्यानंतर वेदांचे महत्त्व ते काय? पाण्याचे सरोवर मिळाल्यानंतर परसातील कूपाचे ते काय महत्त्व? वेदांतील कर्मकांडांना भुललेले आणि त्यापलीकडे काही नाही असे बेडकांप्रमाणे ओरडणारे यांच्यावर केलेला भगवद्गीतेतील शेलक्या वचनांचा मारा ऐकून वेद आणि उपनिषदे यांच्यातील संघर्षाचे ज्ञान विद्यार्थ्यांना झाले तर ते शिक्षण खात्याला आणि शासन संस्थेला परवडणार आहे का?

राष्ट्राभिमानाच्या शिकवणुकीतही असेच सारे धोके आहेत. मी मराठी शाळेचा विद्यार्थी. शिवाजी महाराज हे आमचे दैवत. कर्नाटकातील कोणा यल्लम्मा राणीने केलेला शिवाजीचा पराभव आणि केलेली फजिती याची कहाणी ऐकल्यावर राष्ट्र म्हणजे नेमके कोणते हा प्रश्न मनात उठला. शेतकरी संघटनेचे काम सुरू केले त्याआधी 'भारत' आणि 'इंडिया' यांतील द्वंद्व कळले. कोणत्या राष्ट्राची बाजू घेऊन आपण उभे राहायचे आहे हेच कळेनासे झाले आहे. राष्ट्रांचा इतिहास विजेते लिहितात आणि जितांवर तो लादतात. चांगल्या हुशार विद्यार्थ्यांच्या मनातही भारत म्हटले म्हणजे आपापल्या सभोवतालच्या प्रदेशाचेच चित्र येते; आसाम, नागभूमी, लक्षद्वीप यांचा विचार येत नाही. शालेय पाठ्यपुस्तकांत नेमक्या कोणत्या राष्ट्राच्या प्रेमाचे पोवाडे गायिले जाणार आहेत? वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या राष्ट्रांचा अभिमान शिकवला गेला तर त्यातून राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाईल की तिला तडा जाईल?

नाझी जर्मनीत आणि समाजवादी रशियात तसेच बहुतेक सर्व राष्ट्रांत राजकीय सत्ताधाऱ्यांनी आपली सत्ता वर्तमानात तर चालवायचीच; पण ती भविष्यकाळातही दीर्घ काळ चालावी यासाठी लहान विद्यार्थ्यांच्या मेंदूवर बलात्कार करायचे मेंदूसफाई (Brain Washing)चे तंत्र विकसित केले. आपल्या देशातही धर्म, राष्ट्र, इतिहास यांच्या शासनसंमत संकल्पना मुलांच्या डोक्यावर लादण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे राज्य आले, त्यांनी त्यांना अनुकूल असलेल्या व्यक्तींना मोठे केले; त्यांचा विचार प्रभावशाली राहावा यासाठी पाठ्यपुस्तकांच्या आधारे विद्यार्थ्यांची कोवळी मने दडपून टाकली. आता नवा पक्ष सत्तेवर आला

आहे. त्याने आता धर्मभावना आणि राष्ट्रवाद यांची त्यांच्या पक्षाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून दीर्घकाळपर्यन्त आपले मतदारसंघ शाबूत रहातील याची व्यवस्था करण्याचे योजले आहे. हे असले शिक्षणक्रम स्वीकारले गेले तर दहावीपर्यन्तच काय, अगदी शेवटपर्यन्त कोणत्याच परीक्षांचे कोणतेच प्रयोजन राहणार नाही. धर्मभावना आणि राष्ट्रप्रेम शाळेत प्रवेश करण्याआधीही एखाद्या संस्कारित विद्यार्थ्याच्या मनात प्रचंड चेतलेले असतील तर, दहावीपर्यन्त एक दशक धर्मतत्त्वांचे आणि राष्ट्रवादाचे धडे घोकलेल्या विद्यार्थ्याच्या मनात त्यांची शिकवण स्पर्शही करू शकलेली नसेल ही शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, परीक्षांचे काही कामच राहत नाही. शिक्षणच अशिक्षण झाले तर परीक्षा घ्यायचीच कशाची? एका बाजूला पंतप्रधान 'जय विज्ञान' अशी घोषणा करतात आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याच पक्षातील कठमुल्ले विज्ञानविरोधी धोरणे राबवतात, त्याबद्दल पंतप्रधान काहीही करू शकत नाहीत. एवढेच रजपूतप्रणित 'मुरली मनोहर जोशी शिक्षणधोरणा'चे तात्पर्य!

*दि. २३/११/२०००*

■■

# गाठ पडली ठका ठका

लोकसभेचे हिवाळी अधिवेशन २८ नोव्हेंबर २००० रोजी सुरू झाले. सुरवातीच्या काही दिवसांचे कामकाज पाहता हे अधिवेशन म्हणजे जणू काही 'शेतकरी महोत्सव' आहे असे वाटावे!

पक्षाध्यक्षपदाची निवडणूक जिंकल्याचा आनंद अजूनही चेहऱ्यावरून ओसंडून वाहणाऱ्या, विरोधी पक्षनेत्या श्रीमती सोनिया गांधींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणण्याची मागणी करीत स्थगत प्रस्ताव मांडून, या महोत्सवाची पहिली तोफ डागली. नंतर, विरोधी पक्षाने दोन दिवस असा गदारोळ उठवला की लोकसभेत अन्य कोणतेही कामकाज होणे अशक्य होऊन बसले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होणाऱ्या चर्चेवर काहीही बंधन राहणार नाही असे सभापतींनी निःसंदिग्ध अभिवचन दिले असतानाही विरोधी सदस्यांनी लोकसभेत धुडगूस घालून आपला गुंडागर्दीचा 'कोटा' पुरा करून घेतला.

आणि खरेच जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा, साहजिकच उघड झाले, की विरोधी पक्षाच्या आणि मायबाप सरकारच्याही सदस्यांना शेतकऱ्यांबद्दल काही देणेघेणे नव्हते. चर्चेत विरोधी पक्षांपैकी मुलायमसिंगाच्या समाजवादी पक्षाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा राजकीय भुलभुलैया वापरून वर्तमानपत्राच्या मुखपृष्ठावर येण्यासाठी सोनिया गांधींच्या काँग्रेस पक्षाबरोबर चढाओढ केली. जेव्हा चर्चेला परवानगी देण्यात आली तेव्हा विरोधी बाके तयारीअभावी पेचात सापडली.

विरोधी सदस्यांच्या भाषणात सरकारी बाकांकडून होणाऱ्या अडथळ्यांतही ना उत्साह होता, ना अंतःप्रेरणा; विरोधकांच्या हल्ल्याच्या योजनेला ते खासगीत मान्यताच देत होते. 'सरकार शेतकऱ्यांच्या हालाखीबद्दल बेदखल आहे. सरकारने बलाढ्य महासत्तांपुढे गुडघे टेकून राष्ट्रहिताचा बळी दिला आहे आणि शेतकऱ्यांच्या संरक्षणाची काही तजवीज न करताच आयातीवरील संख्यात्मक निर्बंध रद्द

करून परदेशी मालाचा लोंढा बेबंदपणे येऊ दिला आहे.' वक्त्यामागून वक्ते तीच तीच वाक्ये पुन्हा पुन्हा घोकत होते; पाचसहा रूपये लिटरने दुधाची आयात होत असल्याच्या बाजारू वावड्या, खातरजमा न करताच, उडवीत होते. सोनिया गांधींच्या पक्षांचे सदस्य, साहजिकच, हमी देत होते, की 'आम्हाला सत्तेवर येऊ द्या, की मग बघा आम्ही कसे आयातशुल्क वाढवतो आणि देशी बाजारपेठेतून आयात माल महाग बनवून कसे हद्दपार करतो ते.' आयातशुल्क वाढविल्याने देशी बाजारपेठेवर काय परिणाम होतील हे समजणे काही शेलक्या खासदारांच्या मुळातच आवाक्याबाहेरचे आहे. आयातशुल्काच्या भिंती उंचावून 'शेजाऱ्याला भिकारी करा' धोरणामुळे होणाऱ्या गुंत्याचे आकलन त्यांना व्हावे अशी अपेक्षा करणे चुकीचेच आहे. चढ्या आयातशुल्कामुळे ग्राहकांपुढे काय वाढून ठेवले जाईल याची पारख त्यांना व्हावी अशी अपेक्षा करणे दूरच. काही शेलके राजकारणी प्रेक्षक सज्जाला गुंगविण्याच्या कलेत मोठे वाक्‌बगार असतात. कांद्याच्या किंमती वाढायला लागल्या, की ते ग्राहकांचे तारणहार बनतात आणि शेतीमालाच्या किमती पडू लागल्या, की शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी पांढऱ्या घोड्यावर स्वार झालेल्या शिलेदाराचे सोंग वठवायला त्यांना आवडते.

कृषिमंत्री नितीशकुमारांनी चर्चेला दिलेले उत्तर संसदीय वितंडवादाचा उत्कृष्ट नमुनाच ठरावे. मुळातच, शेतकऱ्यांच्या दुरवस्थेला जागतिक व्यापार संघटना आणि जागतिकीकरण कारणीभूत आहेत का? असतील तर असतील! पण, कृपा करून सांगा, ही 'जागतिक व्यापार संघटना' आम्हाला बहाल कोणी केली? मराकेशमध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर या काँग्रेसनेच सह्या केल्या ना? आणि आयातशुल्काच्या अपर्याप्त मर्यादा त्यांनीच आखून घेतल्या ना? या आयातशुल्कांची अंमलबजावणी कोणी सुरू केली? राष्ट्रीय लोकशाही आघाडीने नक्कीच नाही! जे आता नक्राश्रू गाळीत आहेत त्यांच्या काँग्रेसनेच हे सुरू केले ना? विरोधकांच्या युक्तिवादाचा असा धुव्वा उडवल्यानंतर मात्र कृषिमंत्रयांनी स्पष्ट शब्दांत आश्वासन दिले, की एकदोन महिन्यांनी सुरू होणाऱ्या जागतिक व्यापार संघटनेच्या वाटाघाटींत आयातशुल्काची मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव हिंदुस्तान सरकार मांडील." आपण शेतकऱ्यांच्या हिताचा युक्तिवाद मांडीत आहोत असेच ते समजत होते.

हा 'शेतकरी महोत्सव' काही संसद सभागृहाच्या आवारापुरताच मर्यादित नव्हता. संसदेत हे नाटक चालू असतानाच संसद सभागृहापासून हाकेच्या अंतरावर तीन माजी पंतप्रधान – विश्वनाथ प्रताप सिंग, देवेगौडा आणि चंद्रशेखर

हजारभर शेतकऱ्यांच्या जमावापुढे तावातावाने भाषणे करीत होते आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारवर ते शेतकऱ्यांच्या दुरवस्थेकडे लक्ष देत नसल्याबद्दल चौफेर तोंडसुख घेत होते. शेतकऱ्याच्या दुरवस्थेसंबंधात काँग्रेस आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी दोघेही सारखेच दोषी आहेत. शेतकऱ्यांनी आता कोणत्याही पक्षाकडून त्यांना काही मदत होईल अशी आशा धरू नये. विश्वनाथ प्रताप सिंग म्हणाले, 'शेतकऱ्यांनी आता स्वत:च्या झेंड्याखाली आणि आपल्यातीलच नेतृत्वाखाली लढायला सज्ज झाले पाहिजे.' हेच या तीनही माजी पंतप्रधानांच्या भाषणातील पालुपद होते.

मला आठवते त्याप्रमाणे, याच धर्तीचा युक्तिवाद ऐंशीच्या दशकात मी विश्वनाथ प्रताप सिंगांसमोर केला होता. त्यांचे सरकारही कधी शेतकऱ्याच्या बाजूने नव्हते. किंबहुना, त्यांचा दृष्टिकोन त्या काळी नेमका उलट होता. माझा युक्तिवाद ऐकून त्यांनी मला स्थायी कृषिसल्लागार समितीचा अध्यक्ष बनवून माझ्याच गळयात घोंगडे अडकवले आणि राष्ट्रीय कृषिनीतीचा मसुदा बनविण्याची कामगिरी आमच्या समितीवर सोपवली. खुल्या अर्थव्यवस्थेत निर्बंन्धमुक्त शेती कशी असेल याचा पहिलाच आराखडा म्हणता येईल असा मसुदा मी तयार केला. त्या वेळी, पंतप्रधानपदी असलेल्या विश्वनाथ प्रताप सिंगांनी त्यावरून नजर फिरवली आणि स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या आपल्या भाषणात घोषणा केली, की येते दशक 'किसान दशक' म्हणून पाळले जाईल. नंतर त्यांनी टिप्पणी केली, की मी तयार केलेली 'कृषिनीती' अमलात येण्यासाठी 'मंडल' होणे आवश्यक आहे; पण नंतर, त्यांना त्यांच्या खुषमस्कऱ्यांनी आधुनिक बुद्धाची वस्त्रे चढविली आणि आता येती अनेक दशके सत्तेवर राहण्याचा सोनेरी मार्ग आपल्याला गवसला आहे असा त्यांचा पक्का समज झाला असावा.

विश्वनाथ प्रताप सिंगांच्या नेतृत्वाखालील जनता दलाने शेतीक्षेत्राची फेरआखणी करण्याचा हा मसुदा स्वीकारण्याची धमक दाखवली असती तर आज दिल्लीमध्ये किरकोळ जमावापुढे भाषण करण्याची वेळ विश्वनाथ प्रताप सिंगांवर आली नसती; आजही बहुधा ते पंतप्रधानच असते. सध्या श्री. सिंग, गौडा आणि कंपनी वेगवेगळया राज्यांतील शेतकरी चळवळीतून बाहेर पडलेल्या असंतुष्ट घटकांची मोळी बांधण्यात व्यग्र आहेत.

जर शेतकऱ्यांचा कोणत्याच राजकीय पक्षावर भरवसा राहिला नसेल तर, जागतिक व्यापार संघटनेच्याही संदर्भात कोणत्याही सरकारवर त्यांचा भरवसा असणार नाही, हे साहजिकच, उघड आहे. विश्वनाथ प्रताप सिंगांनी म्हटले

की, 'ज्या श्रीमंत राष्ट्रांची सरकारे त्यांच्या शेतकऱ्यांना ३५,५०० कोटी डॉलरची सबसिडी देतात त्यांच्याकडून होणाऱ्या निर्यातीचे आपल्या देशी बाजारपेठेवर आक्रमण होत आहे.' पण मग, हिंदुस्थान सरकारलातरी शेतकऱ्यांना सबसिडी देण्यास कोणी अडवले नव्हते! निदान, हिंदुस्थान सरकारने शेतकऱ्यांवर अवाढव्य उणे सबसिडीतरी लादायला नको होती! सरकार जर वाईट असेल तर खुली बाजारपेठ आणि जागतिकीकरण यांना पर्याय नाही; पण अशी तर्कशुद्धता 'मंडल' मानसिकतेला पचणे अवघडच आहे.

लोकसभेतील स्थगन प्रस्ताव मतदानाने फेटाळला गेला. सत्ताधारी आणि विरोधी – दोन्ही बाजूंच्या खासदारांनी मुद्दे सारखेच मांडले आणि मतदानमात्र आपापल्या पक्षांच्या चाकोरींतून केले. हिंदुस्थानच्या संसदेने शेतकऱ्यांचा पराभव केला? होय, आणि नाहीही!

धोरणे आणि कार्यक्रम यांच्या बाबतीत राजकीय पक्षांमध्ये जवळजवळ एकवाक्यता असणे ही काही चांगली बाब नाही. शेतकऱ्यांना ते घातक आहे. गाठ पडली ठका ठका आणि शेतकऱ्याचा जीव जाई फुका! आयातशुल्क वाढवावे अशी विरोधी पक्षांची मागणी आहे आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचीही तशीच मागणी आहे. खरे तर, राष्ट्रीय लोकशाही आघाडीला आयातशुल्काची मर्यादा आणखी वाढली तर हवेच आहे; पण, एकाही खासदाराने असे म्हटले नाही, की शेतकऱ्याच्या दुरवस्थेचा प्रश्न काही जागतिक व्यापार संघटनेमुळे तयार झाला नाही, ना जागतिकीकरणामुळे, ना संख्यात्मक निर्बंध उठविल्यामुळे. शेतकऱ्यांच्या हालाखीला जबाबदार असणारे खरे गुन्हेगार आहेत– शेतीक्षेत्रामधील सरकारचा बेसुमार हस्तक्षेप, व्यापारावरील अगणित निर्बंध आणि 'ना, ना, करते' सुरूच असलेले लायसन्स–परमिट राज्य. समोर ठाकलेल्या आव्हानाला घाबरून प्रतिक्षिप्तपणे माघार घेणे हा यावरील उपाय नाही. तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण, उत्पादकतेत व उत्पादनात वाढ, देशव्यापी एकमय बाजारपेठेची निर्मिती आणि मालाची प्रतवारी, चाचणी, प्रक्रिया व आवेष्टन यांच्या पद्धती विकसित करण्यास प्रोत्साहन इत्यादी मार्गांचा अवलंब करून जागतिक व्यापार स्पर्धेत उतरण्याचा दृढ संकल्प सोडणे आणि तो पार पाडण्याचा प्रयत्न सुरू करणे हाच यावर उपाय आहे आणि मग, शेतकरी जेव्हा निर्भयपणे देशाची राजकीय सीमा पार करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरेल तेव्हा त्याला हरवल्यासारखे होणार नाही.

*दि. २९/११/२०००*

■■

# हतो वा प्राप्यसि स्वर्गम<br>जित्वा वा भोक्ष्यसे महीम्

यह कैसा सामना है; सामना तो समानवालों में होता है. एक मोटा तगडा पहिलवान और दूसरा भूखा, बीमार ऐसे दोनों में कुश्ती कैसे हो सकती है?, भाषण खणखणीत चालले होते. वक्ते होते पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल. स्थळ चंडीगड. प्रसंग भारतातील सर्वांत मोठ्या आणि मान्यवर शेतकी प्रदर्शनाच्या उद्‌घाटन सोहळयाच्या समारंभाचा.

चंडीगड म्हणजे पंजाब, हरियाना आणि केंद्रशासित चंडीगड या तिघांची राजधानी. पंजाब आणि हरियाना ही दोन राज्ये हिंदुस्थानातील सर्वांत प्रगत शेतीची. उद्‌घाटनप्रसंगी, साहजिकच, हिंदुस्थानच्या शेतीची आजची परिस्थिती काय आणि भविष्यातील आव्हाने काय असा विषय होता.

प्रकाशसिंग बादल यांच्या आधी बोलले चौधरी चौताला – हरियानाचे मुख्यमंत्री.

साऱ्या हिंदुस्थानातील, अगदी हरियानातीलदेखील, शेतकऱ्यांची कशी दुर्दशा दुर्दशा झाली आहे याचे त्यांनी मोठ्या ओघवत्या हिंदीत वर्णन केले. मुळात शेती तोट्याची; भांडवल नाही, शेती परवडत नाही, डोक्यावर कर्जाचा डोंगर, काही वेगळे करायला जावे तर वाटेत पेटंटचा अडथळा, पेटंटच्या विळख्यातून कशीबशी सुटका करून घेतली तर जागतिक व्यापार संस्थे (WTO) चा राक्षस पुढे उभा ठाकलेला. सरकारने आयातीवरील बंदी उठवून टाकली, कारण WTOचे नियम. बंदीच्या ऐवजी आयातकर लावले, ते इतके किरकोळ, की परदेशांतून येणाऱ्या वारेमाप आयातीला त्यांची पुसटशीही झळ लागली नाही. आता करावे काय? शरद जोशी शेतकऱ्यांचे नेते आहेत. त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. आता ते सरकारात जाऊन बसले आहेत. ते काही चमत्कार करून दाखवतात काय तेवढे पाहायचे आहे. हा चौतालांच्या भाषणाचा मथितार्थ.

नंतर सरसावून उठले प्रकाशसिंह बादल. शेतकऱ्यांच्या कैवाराचा आव

आणून भाषणबाजी करण्याची साथ, लोकसभेच्या चालू सत्रात स्थगन प्रस्ताव आणला गेला तेव्हापासून लागली आहे. लोकसभेत खासदार बोलले, लोकसभेच्या बाहेर विश्वनाथ प्रताप सिंग, चंद्रशेखर आणि देवेगौडा! या तीन माजी पंतप्रधानांनी हजारपाचशे शेतकऱ्यांचा मेळावा घेतला आणि एवढ्या अफाट जनसमुदायासमोर सरकार कोणत्याही पक्षाचे असो, शेतकऱ्यांना न्याय मिळणे शक्य नाही. तेव्हा शेतकऱ्यांनी आता आपलाच झेंडा उभारावा आणि स्वतंत्र नेतृत्व उभे करून WTOच्या संकटाला सामोरे जावे, असे आवाहन केले.

चंडीगडच्या कार्यक्रमात प्रकाशसिंग बादल आणि चौताला यांनी हाच तराणा चालू ठेवला. केंद्रातील राज्यकर्त्या आघाडीचा अकाली दल हाही घटकपक्ष आहे आणि हरियाना विकास पार्टी हाही. या दोघांनी विरोधी पक्षांच्या सुरांत सूर मिसळून गळा काढावा हे तसे पाहता तसे विचित्रच राजकारण! पण सद्य:स्थितीत कोण काय राजकीय भूमिका घेईल याचा अंदाज करणे दुरापास्तच आहे.

कुस्तीतील पहिलवान बरोबरीचे असले पाहिजे, असा आग्रह धरणारे पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल अकाली दलाचे म्हणजे शिख पंथाच्या आघाडीचेही नेते आहेत. शिख पंथाचा सारा इतिहास पाहिला तर, सर्व गुरूंच्या काळात लढाया झाल्या त्या जबरदस्त मोगल ताकदीशी. 'मोगल सत्ता केवढी प्रबळ, त्यांच्याशी सामना कसा करावा?' असा प्रश्न कोणा शिख गुरूने केला नाही. 'धर्म आणि सत्य यांकरिता लढायचे आहे; लढता लढता मरण आले तर ते श्रेयस्कर' अशा हौतात्म्याच्या भावनेने शिख लढले. मी तर ससाण्यांच्या विरुद्ध कबुतरे लढाईसाठी पाठवीत आहे अशी गुरू गोविंदसिंग यांची उक्ती प्रसिद्ध आहे. शिख संग्रामाचा सारा देदीप्यमान इतिहास घडला त्या वेळी सध्याच्या अकाली दलाचे नेते नव्हते ही भाग्याची गोष्ट म्हणायची!

शिख लढवय्यांच्या माथी शेवटी हौतात्म्यच अधिक आले. यापुढच्या लढाया जिंकण्याची महात्त्वाकांक्षा ठेवली पाहिजे असा त्यांचा विचार असेल तर त्यांनी रणनीती बदलण्याचा विचार करावा हे योग्य. 'मोगल फौजेशी लढताना सरळ सरळ झुंज देण्याची रणनीती सोडून महाराष्ट्रातील मावळ्यांनी जी गनिमी काव्याची पद्धत वापरली ती स्वीकारावी; पण जुलुमाशी टक्कर जराही कच न खाता द्यावी' असे अकाली नेत्यांनी म्हटले असते तर ते भूषणावह झाले असते. 'सामनेवाला बरोबरीचा द्या' असा लाडीक आग्रह धरणारांना 'अकाली' म्हणावे तरी कसे?

पंजाबच्या मुख्यमंत्र्यांची ही स्थिती. हरियानाचे मुख्यमंत्री चौधरी चौताला यांची परिस्थितीही काही फार वेगळी नाही. चौधरी देवीलाल यांचे ते सुपुत्र.

चौधरी चरणसिंगांच्या शेतकरी आंदोलनातील त्यांचा प्रमुख वारसा. चौ. चरणसिंग, चौ. देवीलाल यांच्या हातांत सत्ता आली त्या वेळी त्यांनी शेतकऱ्यांकरिता काय मोठे करून दाखविले? चौ. चरणसिंगांनी उत्तर प्रदेशात कूळकायद्याची अंमलबजावणी करून तथाकथित दुष्ट जमीनदार मोडून काढले. आता त्यांचे सुपुत्र जमिनीचे तुकडे तुकडे झाले, चारदोन एकरांच्यावर शेती राहिली नाही म्हणून टाहो फोडत आहेत. शेतकऱ्याच्या हाती सत्ता आली पाहिजे, प्रशासकीय सेवेत शेतकऱ्यांची मुले मोठ्या संख्येने गेली पाहिजेत, विदेशी सेवेतही राजदूतासारखी विराजमान झाली पाहिजेत असा चौ. देवीलाल यांचा आग्रह असे. उपपंतप्रधानकीच्या वर्षादीड-वर्षात त्यांनी शेतकऱ्यांकरिता राबविलेला कार्यक्रम म्हणजे एकच – पंचतारांकित हॉटेलांत शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात भोजन मिळण्याची व्यवस्था! पंजाब आणि हरियाना या दोन्ही राज्यांत तेथील शेतकऱ्यांच्या सोबतीने शेतकरी संघटनेने अनेक आंदोलने केली आहेत. तेथील तुरुंगवास मला स्वतःलाही सोसावा लागला आहे. त्याच राज्यांतील मुख्यमंत्री 'आता शेतकऱ्यांचे कसे होणार हो?' म्हणून गळा काढताहेत.

गेल्या ५० वर्षांत शासनाने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला त्याच्या उत्पादनखर्चाइतकाही भाव पदरी पडू दिला नाही. जगभरच्या सरकारांनी नवनवीन क्लृप्त्या काढून त्यांची शेती समृद्ध व्हावी, शेतकरी सधन आणि सुखी व्हावा यासाठी मोठमोठे कार्यक्रम हाती घेतले, अनुदानांची खैरात केली. भारतात शासनाने शेतकऱ्याना लुटले; इतर देशांत शासनांनी शेतकऱ्याचे कोडकौतुक केले. शासन हे असले उद्योग करते ते एका समाजाला चट्टा लावून राजकीयदृष्ट्या अधिक सोयीस्कर समाजाची तुष्टी करण्यासाठी. दोन्हीही प्रकार वाईटच, अंततोगत्वा समाजाला आणि अर्थव्यवस्थेला घातकच.

सरकारी हस्तक्षेपच कमी करावेत या उद्दिष्टाने WTOचे करारमदार झाले. सरकारांनी हस्तक्षेप कमी करावे असे ठरले. अनुदाने कमी करण्याचे वेळापत्रक ठरले. अंमलबजावणीसाठी केलेल्या व्यवस्थेत सगळ्या सदस्य राष्ट्रांचा सारखाच प्रभाव राहील; कोणाचीही दादागिरी चालणार नाही असे नियम घालून घेण्यात आले.

गंमत अशी, की WTO म्हणजे कोणी महाराक्षस आहे आणि तो शेतकऱ्यांना खाऊन टाकेल, देश बुडवून टाकेल अशी प्रचंड कोल्हेकुई चालू झाली आहे. स्वातंत्र्य चांगले की वाईट याचा निर्णय इतिहासाने केव्हाच देऊन टाकला आहे. ज्यांना स्वातंत्र्य पेलत नाही ते गुलामगिरीतील आरामाची आणि सुखोपभोगांची

भलावण करतात.

'सोन्याचा पिंजरा, डाळिंबाचे दाणे हा सुखोपभोग पंख पसरून आकाशात भरारी मारण्यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे, पिंजऱ्याच्या बाहेर पडले तर शिकारी पक्षी जागोजाग टपून बसलेले आहेत, त्यांच्या पुढे टिकाव लागणे शक्य होणार नाही, तस्मात्, हा पिंजराच बरा...' असा हा सारा अपुरुषार्थाचा विचार आहे.

पण, पिंजराही धड आरामाचा नाही, डाळिंबाचे दाणे सोडा, धड पोटभर खायलाही मिळत नाही आणि बाजूला 'फिरति बहुत बोके द्वाड भारी घरी या' अशी परिस्थिती असेल तर कोणताही शहाणा पक्षी पिंजऱ्याचे दार उघडे राहिले तर सुटका करून घेतो; जी ताकद असेल ती वापरून उड्डाण घेतो; बहिरी ससाण्याचे काय करायचे ते ती वेळ आली म्हणजे पाहून घेऊ असा विचार करतो, त्याच्या भीतीपोटी जन्मभर पिंजऱ्यातील गुलामगिरी स्वीकारीत नाही, पिंजऱ्यातून निघून मालकच खरा आपला हितकर्ता असे मानून, त्याच्या खांद्यावर जाऊन बसत नाही.

परदेशांतील शेतकऱ्यांना भरपूर अनुदाने मिळतात तशी अनुदाने देणे हिंदुस्थान सरकारला आज शक्यही नाही आणि तशी त्याची इच्छाही नाही. तेव्हा, दुसऱ्यांच्या घरी शेतकऱ्यांच्या होणाऱ्या कोडकौतुकाप्रमाणे आपल्याकडेही असे कधी होईल अशी आशा बाळगून बसण्यात काही अर्थ नाही. शेतकऱ्यांची कौतुकं आणि छळ दोन्हीही संपवायची असतील तर त्या ऐतिहासिक कामासाठी WTOची पहाट झाली आहे.

भारतात भरपूर सूर्यप्रकाश आहे, मुबलक पाणी आहे कष्टाळू शेतकरी आहे. भारतीय शेतकरी स्पर्धेत कमी पडण्याचे काहीच कारण नाही.

प्रकाशसिंग बादल यांनी चंडीगड येथील भाषणात एक अनुभव सांगितला. अमेरिकेच्या त्यांच्या भेटीत त्यांनी काही नमुनेदार शेती पाहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना आदर्श शेतकऱ्यांची यादी दिली गेली, ती जवळजवळ सारीच पंजाबातून आलेल्या शिख अनिवासी भारतीय शेतकऱ्यांची होती. त्यांनी प्रश्न विचारल्यावर खुलासा झाला, की अमेरिकेतील शेतकरी समाजात प्रामुख्याने शेती करणारे शिखच आहेत. भारतातील शेतकरी दुष्टकर्मा सरकारऐवजी थोडेफार लालनपालन करणाऱ्या सरकारच्या अमलाखाली काय चमत्कार करून दाखवितो याचे हे उदाहरण आहे.

स्पर्धेत उतरायचे आहे, जिंकलो तर उत्तमच, पण नाही जिंकलो तरी निदान सरकारी जुलुमाच्या पिंजऱ्यातून मुक्तता झाल्याचा आनंद काही थोडका नाही.

'युद्धास तयार हो, मेल्यास स्वर्ग मिळेल, जिंकल्यास पृथ्वीचे राज्य मिळेल.' असा उपदेश श्रीकृष्णाने केला होता.

श्रीकृष्णाने भारतीय किसानालाही हाच मंत्र आज दिला असता –

हतो वा प्राप्यसि स्वर्गम्
जित्वा वा भोक्ष्यसे महीम्

*दि. ७/६/२०००*

■■

# WTO चे विरोधक आणि त्यांचे धनदांडगे मालक

आर्थिक सुधार, जागतिकीकरण यासंबंधी देशभर चर्चा चालू आहे. त्यात खुलिकरणाची बाजू हिरीरीने मांडणारी प्रमुख आघाडी शेतकरी संघटनेने सांभाळली आहे. याउलट, स्वदेशी जागरण मंच, राजीव दीक्षित, गुरू मूर्ती अशी मंडळी खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेला कडाडून विरोध करणारी आहेत. त्यांचा देशातील अर्थव्यवस्थेत खुलेपणा आणण्याला विरोध आहेच; पण त्याहीपेक्षा जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) नियंत्रणाखाली व्यापार खुला झाला तर त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाताहत होईल, परदेशी मालाचे लोट भारतात येऊ लागतील, त्यांच्याशी स्पर्धा करणे शेतकऱ्यांना तर सोडाच, भारतीय कारखानदारांनाही शक्य होणार नाही, देशभर मंदीची लाट येईल, बेकारी वाढेल; बौद्धिक संपदेचा हक्क मान्य केला तर देशात शतकानुशतकांच्या परंपरेने निर्माण झालेली वनस्पतींची मौलिक संपदा परदेशी उद्योजक गिळंकृत करतील असे ते आग्रहाने मांडतात. WTO ही जणू काही एक महाराक्षस आहे आणि तिच्या कचाट्यातून भारतीय अर्थव्यवस्थेला वाचविणे हे आपले अवतारकार्य आहे असे मानून ही मंडळी साम्यवादी, संघवादी, गांधीवादी आणि इतर फुटकळ स्वयंसेवी संघटना यांची आघाडी बांधीत आहेत. शेतकरी नेते म्हणविणारी काही मंडळीही त्यांनी हाताशी धरली आहेत आणि आयात झालेला माल बंदरातच नष्ट करून टाकणे, ठिकठिकाणी, खुद्द देशाच्या राजधानीतही मोठमोठे मेळावे, निदर्शने घडवून आणणे असे कार्यक्रम त्यांनी जाहीर केले आहेत.

८ डिसेंबर रोजी बंगळूर येथे देशाच्या यापुढील आर्थिक धोरणासंबंधी एक परिसंवाद होता. शेतीसंबंधीच्या सत्राचे अध्यक्षपद माझ्याकडे होते. उद्घाटनाच्या सत्रात मी उपस्थित राहू शकलो नाही. त्या सत्रात श्री. गुरुमूर्ती, इंदिरा काँग्रेसचे श्री. रमेश जयराम आणि नागालँण्डपासून सौराष्ट्रापर्यंत पसरलेल्या अनेक स्वयंसेवी

संघटनांचे मुखंड यांनी मोठ्या जोरदारपणे सर्वच खुलिकरणाला विरोध केला. विशेषतः, 'WTO म्हणजे तर देशावर आलेले एक परचक्र आहे, या कारस्थानाला भारताने बळी पडू नये' असे त्यांनी प्रतिपादन केले.

दुसरे दिवशी सकाळी, माझे सत्र सुरू होण्यापूर्वी, चहाच्या टेबलावर गुरूमूर्ती मला भेटले, रमेश जयरामही भेटले. औपचारिक शिष्टाचारादाखल नमस्कार–चमत्कार झाले. राष्ट्रीय कृषिवलाचा अध्यक्ष म्हणून मला निमंत्रण असल्यामुळे, साहजिकच, मी शुभ्र पांढऱ्या सुती कपड्यात गेलो होतो. गुरुमूर्तींनी खवचटपणा दाखवला आणि म्हटले, या कपड्यात तुम्ही शेतकऱ्यांपुढे गेलात तर तुमची खुली व्यवस्थावादी मांडणी शेतकऱ्यांना, कदाचित्, अधिक सहजपणे पटेल. चहाच्या प्रसंगी वादंग घालण्याची इच्छा नसल्याने मी फक्त, तर्काने आणि पुराव्याने समजूत पटली नाही, माझ्या कपड्यांमुळे पटली तरीही काही वाईट नाही, एवढेच उत्तर दिले आणि शेतीविषयक सत्राच्या सभागृहाकडे जाऊ लागलो. थोड्याच वेळात गुरुमूर्ती यांनी धावत धावत येऊन मला गाठले आणि मोठे रहस्य सांगत असल्याच्या सुरात म्हटले, ''जोशीजी, एक गोष्ट ध्यानात ठेवा. WTO खलास होणार आहे; आमच्यामुळे नाही, श्रीमंत देशांनाच ती नको आहे म्हणून WTO बुडणार आहे. त्यांच्या शेतकऱ्यांना देण्यात येणारी अनुदाने संपुष्टात आणण्याची गोष्टच सोडा, कमी करायलादेखील अमेरिका, जपान आणि युरोपीय देश तयार होणार नाहीत. WTO च्या वाटाघाटींच्या नव्या फेरी निष्फळ ठरणार आहेत.''

अमेरिकेतील सीएटल येथे मंत्रिपातळीच्या वाटाघाटी डिसेंबर ९९ मध्ये व्हायच्या होत्या. WTOच्या विरोधकांनी तेथेसुद्धा प्रचंड निदर्शने केली आणि वाटाघाटी आटोपत्या घ्याव्या लागल्या. हा इतिहास सर्वांना माहीत आहे. आपल्या संघटित शक्तीविषयी विरोधकांना बराच आत्मविश्वास आलेला दिसतो आहे, असा काहीसा भाव माझ्याही चेहऱ्यावर उमटला असावा. तो हेरून गुरुमूर्ती म्हणाले, आमच्यामुळे नाही, श्रीमंत राष्ट्रांच्या भूमिकेमुळेच WTO संपणार आहे. WTOला विरोध करताना आपण गरीब देशांच्या हितापोटी बोलतो आहोत, असा आव आणणाऱ्यांनी श्रीमंत देशच जागतिकीकरणाच्या व्यवस्थेचा गर्भपात करणार आहेत या शक्यतेबद्दल आनंद मानावा हे मोठे विचित्रच! आपल्या बोलण्यातील दुष्ट विसंगती गुरुमूर्ती यांच्या लक्षात आली नसावी.

मीही, वेळ नसल्यामुळे, थोडक्यात उत्तर दिले, म्हणजे आता तुमचे 'बोलविते धनी' WTO हाणून पाडण्याचे काम जातीने स्वतःच करणार आहेत असे

म्हणायचे.

यापुढे त्याठिकाणी अधिक चर्चा होणे शक्य नव्हते. गुरुमूर्ती आपल्या कामाकडे निघून गेले, मी माझ्या.

'जागतिकीकरणाची WTO-व्यवस्था कोसळली म्हणजे बाजारपेठेच्या अर्थशास्त्राचा समूळ उच्छेद होणार; सोवियट युनियनचे पतन झाल्यानंतर समाजवादी अर्थव्यवस्थेचा ऐतिहासिक जागतिक पराभव झाला, त्याच धर्तीवर येत्या वर्षभरात बाजारपेठी अर्थव्यवस्थेचा पाडाव होणार आहे, होणार आहे' अशी स्वप्ने पाहणारे भले पाहोत, त्यात त्यांचा फक्त अजाणपणा दिसून येतो.

देशादेशांतील भिंती पडाव्यात आणि जगातील देशादेशांत श्रमविभागणी ज्याच्या त्याच्या औकातीप्रमाणे व्हावी यासाठीचे प्रयत्न म्हणजे काही मॅराकेश येथे १९९५ मध्ये तयार झालेला बुडबुडा नाही. दोन महायुद्धांदरम्यानच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार घटत गेला आणि शेवटी महाविद्ध्वंसक जागतिक युद्ध छेडले गेले. अशी चूक पुन्हा होऊ नये यासाठी GATTच्या झेंड्याखाली जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी क्षणाक्षणाने आणि कणाकणाने प्रयत्न केले. त्यातून तयार झालेले WTO हे एक भव्य स्वप्न आहे. WTO च्या करारमदारांत सगळे काही ठीकठाकच आहे, असा आग्रह कोणीच धरत नाही. सरकारी हस्तक्षेपाने अर्थव्यवस्थेचे पाणी गढूळ होऊन जाते. तो हस्तक्षेप किमान कसा करावा; कोणती सरकारी ढवळाढवळ खपवून घेतली जाईल, कोणती नाही यासंबंधीची नियमावली WTOने तयार केली. कोणताही नियम किंवा कायदा म्हटले, की तो मोडणारे, त्याच्याशी लपाछपी करणारे निघतातच. त्यांचा बंदोबस्त कसा करावा? WTO च्या पूर्वी धनदांडगी राष्ट्रे एकतर्फी फर्मानें काढीत. त्यांच्यापुढे मान तुकविण्याखेरीज इतर राष्ट्रांना काही पर्यायच उरत नव्हता. WTO च्या करारामुळे ही परिस्थिती बदलली. सुपर ३०१, स्पेशल ३०१ यांच्या आधारे दादागिरी करणाऱ्या अमेरिकेलादेखील WTO च्या वांधा समितीत इतर सर्व देशांच्या बरोबरीनेच मतदानाचा हक्क घेऊन बसावे लागते. आजपर्यंत अनेक निर्णय त्यांच्या विरुद्धही गेले. काही वर्षांच्या अनुभवांनी अधिकाअधिक संस्कारित व्यवस्था तयार होईल आणि जगाच्या इतिहासात पहिल्यांदा जगातील सारी राष्ट्रे एकमेकांशी वस्तूंची आणि सेवांची देवाणघेवाण करू लागतील अशी शक्यता तयार झाली असता तिची भ्रूणहत्या करण्याचा करंटेपणा काही 'शुभ बोल नाऱ्यां'ना सुचतो आहे हे मानव जातीचे दुर्दैव म्हणायचे.

आपल्या देशापुरतेच बोलायचे झाले तरी, शेतकऱ्यांच्या व्यापारात खुलेपणा

यावा, सरकारी बंधने असू नयेत, मक्तेदारी असू नये, जिल्हाबंदी नको, राज्यबंदी नको, निर्यातबंदी नको, सरकारी आतबट्ट्याची आयात नको याकरिता शेतकरी संघटनांनी २० वर्षांपूर्वी शिंग फुंकले. वर्षानुवर्षांच्या अंधारानंतर सूर्योदयाची पहाट शेतकरी पाहत असताना, उषःकाल होता होता काळरात्र आली असे दुर्दैवाने घडलेच तर, माणूस म्हणून जगण्याच्या हक्कासाठी रस्त्यावर आलेला शेतकरी निराश होत्साता स्वस्थ बसणार नाही. एक WTO बुडले तर WTO–२ उभे करू, तेही बुडले तर WTO-३ उभे करू; पण अखेरीस सरकारी हस्तक्षेपविरहित अर्थव्यवस्था केल्याशिवाय शेतकरी विश्राम घेईल अशी काहीही शक्यता नाही.

जागतिकीकरण हा काही केवळ वस्तू आणि सेवांच्या व्यापाराचा विषय नाही. एकमेकांशी संपर्क साधण्याची व्यवस्था मर्यादित होती तेव्हा गाव, छोटी छोटी राज्ये ही एकके उभी राहिली. संचारक्षमता वाढल्यानंतर राष्ट्रांचा उदय झाला. पण, संचारक्षमता पुरेशी नसल्या कारणाने दूरदेशीच्या समानधर्म्यांशी संपर्क दुष्कर झाल्यामुळे ज्याच्याशी संपर्क साधता येतो तो निकटवासीच समानधर्मा असे मानण्याची मजबुरी मानवाच्या पुत्रावर आली. आता ही परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात काय चालले आहे याची माहिती तत्क्षणीच साऱ्या जगभर प्रत्यक्ष चक्षूंनी पाहता येते. ज्याला काही म्हणायचे असेल त्याला आता अरण्यरुदन करण्याची आवश्यकता नाही; इंटरनेटच्या फळयावर एक चिठ्ठी डकवून दिली, की ती साऱ्या जगासमोर जाते. एखाद्या विषयासंबंधी माहिती हवी असेल तर गणनायकाच्या वाहनाचा नवा अवतार गणकयंत्राचा नवा 'मूषक' तत्काळ ती समोर सादर करतो. एकमेकांशी खुलेपणाने संपर्क साधू शकणारा मानवाचा आजचा पुत्र परस्परांतील संबंध अधिकाअधिक घट्ट करणार आहे. या प्रयत्नाच्या आड कोणी भिंती घालू पाहील तर बर्लिन भिंतीची जी दशा झाली तीच अशा अडथळयांच्या भिंतींची होईल.

जागतिक व्यापार व्यवस्था आता कोसळेल, आता कोसळेल आणि, पुन्हा एकदा स्वयंमन्य शासने आणि नोकरशहा मनमानी करण्यासाठी मोकळे होतील अशी शेखमहंमदी स्वप्ने पाहण्यात ज्यांना आनंद वाटत असेल त्यांनी तो आनंद भले घ्यावा; फक्त, मस्तीत येऊन शेखमहंमदाप्रमाणे मडके फोडू नये, एवढी काळजी घेतली तरी पुरे झाले.

*दि. १३/१२/२०००*

■■

# नाथांच्या घरची उलटी खूण

आपल्या देशातून कोणत्या शेतीमालाची सर्वांत अधिक निर्यात होते? अर्थात्, बासमती तांदळाची. सगळ्या जगात बासमती भाताच्या सुगंधाने सर्वांना मोहून टाकले आहे. बासमती तांदळाची निर्यात करणाऱ्या अनेक कंपन्या भारतात आहेत आणि नवनवीन जन्माला येत आहेत. या सर्वांची येत्या नवीन वर्षांत मोठी निराशा होण्याची धास्ती आहे. अमेरिकेच्या शेतकी खात्याने या विषयावर एक अभ्यास प्रसिद्ध केला आहे. येत्या वर्षात तांदळाचे उत्पादन काहीसे घसरणार आहे; परंतु तांदळाचा जागतिक व्यापार मात्र २३० लाख टनांवर जाईल. भारताच्या गाजलेल्या बासमती तांदळाची निर्यात काहीशी घटणार आहे. बासमती निर्यात करणारे इतर देश, मुख्यतः पाकिस्तान, किमतीत भारताला मागे टाकतात. थोडक्यात, निर्यातीत अग्रेसर असलेला भारतीय बासमती तांदूळ काहीसा मागे हटणार आहे.

माझ्याकडून हे वाक्य आलेले पाहिले, की खुलीकरणाचे सारे विरोधक, बघा, आम्ही सांगत नव्हतो, हे सारे जागतिक व्यापारामुळे आणि WTOमुळे होते? असा गिल्ला करतील. निव्वळ बासमती तांदळापुरतेच बोलायचे झाले तरी या गिल्ल्यात काही तथ्य असणार नाही. खुलीकरणाचे दरवाजे उघडले गेले नसते तर बासमतीची निर्यात इतकी कधी चढलीच नसती.

निर्यातीच्या बाजारात काही गमतीजमती होऊ लागल्या आहेत. संशोधनाच्या शर्यतीत थोड्या अंतराने अमेरिकेने शर्यत जिंकली, त्यामुळे, उद्याच्या जगातील एका महत्त्वाच्या तंत्रज्ञानावर अमेरिकेने, तात्पुरता का होईना, प्रभाव जमवला आहे. हे त्यांचे स्पर्धक, युरोपातील देश, त्यांना सहन कसे व्हावे? युरोपातील पर्यावरणवादी आणि मजूर चळवळी यांनी एकत्र आघाडी बांधली आहे. 'जनुकशास्त्राचा वापर करून तयार केलेला शेतीमाल खाण्यात आल्याने काय

भयानक परिणाम होतील काही सांगता येत नाही' अशी हाकाटी त्यांनी चालू केली आहे; 'असा शेतीमाल खाण्यात आल्याने नेमका कोणता अपाय होणार आहे, त्यातून आताच्या पिढीला धोका काय, पुढच्या पिढीला धोका होण्याचा काय संभव आहे?' यांबाबत निश्चित कोणीच बोलत नाहीत. 'सर्व प्राणिमात्रांच्या जीवनाचे जे रहस्य त्या जनुकांशीच माणसाने ढवळाढवळ चालू केली आहे. त्याचा परिणाम काय होईल कोणी सांगावे? ग्राहकांनी धोका काय म्हणून घ्यावा? जर्मनीत तीसपस्तीस वर्षांपूर्वी थॅलिडोमाईड औषध सेवन केल्यामुळे हजारो बालके अपंग जन्मली. जैविक शास्त्रात ढवळाढवळ करून तयार केलेल्या पदार्थांच्या सेवनाने काय होईल कसे सांगावे?' असा साराच घबराट पसरविणाऱ्या अफवांचा सुळसुळाट! जनुकशास्त्राच्या शर्यतीत मागे पडलेल्या युरोपीय कंपन्यांची या साऱ्या चळवळीला काहीच मदत नसावी हे संभव नाही. मुख्यतः अमेरिकेतून येणाऱ्या साऱ्या जनुक-फेरबदल वस्तूंविरुद्ध एकाच घबराटीने मोठा प्रचार चालू झाला आहे. असे पदार्थ आपल्या देशात आणण्याची परवानगी नसावी अशी मागणी सुरू झाली आणि युरोपीय सरकारांनी त्यापुढे मान तुकवली आहे.

योगायोग असा, की या अमेरिकाविरोधी आंदोलनाचा फायदा भारतातील तेल गाळणाऱ्या उद्योगधंद्याला मिळणार आहे. हिंदुस्थानात उत्पादित होणाऱ्या सोयाबीनमधील प्रथिनांचे प्रमाण जगात सर्वांत जास्त असते. त्यामुळे भारतात तयार होणाऱ्या सोयाबीनच्या पेंडीत प्रथिने जास्त असतात. जनावरांची खाद्ये तयार करण्याकरिता भारतातील सोयापेंडीला लोकप्रिय मागणी होती. गेल्या काही वर्षांत मात्र ही मागणी घसरू लागली. तेल गाळणारे उद्योगधंदे झपाट्याने बंद पडू लागले. तेल गिरण्यांवर मोठे आर्थिक अरिष्ट आले होते. आता सोया तेलगिरण्यांना पुन्हा एकदा चांगले दिवस येणार आहेत. भारतीय सोयापेंडीला झपाट्याने मागणी वाढणार आहे. कारण, एक, भारतात जैविक फेरबदलाचे सोया बियाणे आलेलेच नाही त्यामुळे जैविक फेरबदलाचा बट्टा अद्याप आपल्या पेंडीवर नाही. दुसरे, गायींच्या पागलपणाच्या आजाराने भयभीत झालेला युरोप आता, दुभत्या जनावरांच्या खाण्यात मांसाहारी पदार्थतर येत नाहीत ना याबद्दल मोठा सचेत झाला आहे. हिंदुस्थानातील पेंडीत मांस व हाडांचा चुरा इत्यादी पदार्थ नसणार याबद्दल सगळ्यांची खात्री आहे. म्हणून, भारतीय सोयापेंडीची युरोपमधील मागणी झपाट्याने वाढणार आहे. आपली कार्यक्षमता किती टिकेल आणि भारतीय निर्यातदार वाहतुकीच्या खर्चात किती कसोशीने कपात करू शकतील यावर ही बाजारपेठ किती भरभराटेल हे अवलंबून आहे.

'युरोप – २०००' प्रदर्शनाच्या शेतीविभागात भारतीय मसाल्यांच्या पदार्थांचा एक मोठा स्टॉल ठेवण्यात आला होता. भारतातील मसाल्याचे पदार्थ पूर्वापार प्रसिद्ध आहेत. इंग्लिश, फ्रेंच व्यापारी भारताकडे पहिल्यांदा आले ते मुख्यत: मसाल्याच्या पदार्थांची खरेदी करण्यासाठीच. यातून मोठा इतिहास घडला. त्यातून मसाल्याचे पदार्थ पुरविणारे इतर देश पुढे आले आणि भारत मागे पडला. 'युरोप –२०००' प्रदर्शनात 'भारतातील पदार्थ रासायनिक खतांचा आणि औषधांचा वापर न करता पिकविण्यात आले आहेत' यावर मोठा भर देण्यात आला आहे. युरोपीय देशांतील आणि अगदी अमेरिकेतीलही ग्राहक, जैविक शेतीमाल वापरावा, त्यामुळे आरोग्यसंवर्धन चांगले होते या विचाराने भारले गेले आहेत. जैविक शेतीमालाची मागणी दरवर्षी दहा ते बारा टक्क्यांनी वाढते आहे आणि या मालासाठी पंचवीस ते तीस टक्क्यांपर्यन्त अधिक किंमत देण्यास ग्राहकही आनंदाने तयार होतात. प्रदर्शनातील भारतीय मसाल्यांच्या दालनावर ग्राहकांच्या उड्या पडल्या. येत्या वर्षात मसाल्याच्या पदार्थांची निर्यातही वाढलेली दिसावी. जैविक शेतीचे प्रचारक श्री. श्रीपाद दाभोळकर जैविक प्रश्नावर बोलताना बाजारपेठेचा मोठा रागराग करतात. 'बाजारपेठेत जावेच कशाला? खिशात हात न घालता शेतीचे उत्पादन करावे, शुद्ध सात्त्विक पिकावर मस्त जगावे' असा त्यांचा धोशा असतो. जैविक शेतीची भरभराट जैविक मालाला मिळणाऱ्या वाढीव किमतीमुळे होईल या घटनेने दाभोळकरांना आनंद होईल का दु:ख हे सांगणे कठीण आहे!

भारतीय स्त्रियांची सोशिकता जगप्रसिद्ध आहे. 'एकच प्याला'तील सिंधु हा आदर्श. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या बाया म्हणजे तर 'दीनवाण्या गायाच'. पहाटे झुंजूमुंजू होण्याच्या आधी उठायचे, दिवसभर चूल, मूल, गाय, गोठा, शेती यांची उस्तवारी करायची आणि मध्यरात्री जमिनीला पाठ लागली तर धन्य मानायचे असा या शेतकरी बायांचा दिनक्रम. या दिनक्रमाने शेतकरी मजूर स्त्रियांना एक मोठी देणगी दिली. संकरित वाणाचे बियाणे तयार करण्यासाठी फुलावर आलेल्या पिकात पुंकेसराचे स्त्रीबीजावर आरोपण करायचे असते. मोठे नाजूक काम; मेहनतीचे व कंटाळवाणेही. थोडी चूक झाली तरी सगळे कष्ट फुकट जातात. या असल्या रटाळ कामामध्ये भारतीय शेतमजूर स्त्री जगविलक्षण कौशल्य दाखवते. संकरित वाणांचे संशोधन परदेशी शास्त्रज्ञ करोत, त्या वाणांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यात भारत अग्रेसर राहणार आहे.

बाजारपेठ खुली झाली म्हणजे पिढ्यान्‌पिढ्या दोष समजले गेलेले एकदम

गुण ठरू लागतात. भारतात औषधी आणि सुगंधी वनस्पती विपुल आहेत. त्यांच्यातील औषधी आणि सुगंधी गुण डोंगराळ जंगली भागात जितके दिसून येतात तितके त्याच वनस्पतीच्या शास्त्रशुद्ध शेतीत आढळत नाहीत. दुर्गम प्रदेशात जाऊन वेचलेल्या असल्या वनस्पतींना मोठी मागणी येत आहे.

सगळयात गंमत म्हणजे, वर्षानुवर्षे मोठे कष्ट करून शेतकरी ज्या तणांना नष्ट करण्याच्या खाटाटोपास लागलेला आहे ती हरळी, कुंदा, बावंच्या यांच्यासारखी तणे एकदम मूल्यवान द्रव्ये ठरत आहेत. 'आधुनिक शेतीशास्त्रात आपण मागे राहिलो, आता शास्त्रनिपुण विलायती शेतकऱ्यांसमोर आपण कसे काय टिकू शकणार?' असा भयगंड बाळगणाऱ्या या 'नाथांच्या उलट्या खुणां'त एक संदेश आहे. 'महापुरें झाडें जातीं, तेथे लव्हाळीं वाचतीं.' व्यवस्थेत खुलेपण असले, की कमजोरीचे मुद्देच बलाढ्य ताकद ठरू शकतात.

*दि. २०/१२/२०००*

■■

# ठाकऱ्यांचा 'ठोक टाळे' उपाय!

लोकसभेचे हिवाळी सत्र २२ डिसेंबर २००० रोजी संपले. सत्राच्या सुरुवातीला शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आरडाओरड झाली, त्यानंतर अयोध्येचा प्रश्न आणि बाबरी मस्जिद प्रकरणी कारवाई चालू असलेल्या मंत्र्यांच्या राजीनाम्याचे प्रकरण गाजले. सत्राच्या शेवटच्या भागात महिलांच्या आरक्षणासंबंधीचे विधेयक राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पार्टी यांच्या गदारोळाने मांडणेच शक्य झाले नाही.

शेतकरी प्रश्नावर भाषणे झाली ती अनभ्यस्त. शेतकऱ्यांच्या दुर्दशेतून आपापल्या पक्षाला राजकीय लभ्यांश कसा मिळवता येईल या बुद्धीनेच सारी चर्चा झाली. अयोध्या प्रश्नावर शेवटी उत्तर देताना पंतप्रधानांनी संसदीय चतुराई भरपूर दाखवली, पण त्यांच्या भाषणाने आजपर्यंतच्या संसदपटू कीर्तीवर काही कळस लागला नाही, हे खुद्द त्यांना स्वत:लाही स्पष्ट होते.

लोकसभेत संवाद होत नाही, धुडगूसच होतो; मग, महत्त्वाचे राष्ट्रीय प्रश्न सोडवावे कसे? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईत एक प्रस्ताव मांडला. हिंदुस्तानातील सर्व मुसलमानांचा मतदानाचा हक्कच काढून घ्यावा असा त्यांनी प्रस्ताव मांडला. ठाकरे बोलले, की सगळीकडे मोठा गजहब होतो, त्यांचे मुरलेले भक्त 'वाह वा! वाह वा!' करतात. केंद्रीय उद्योगमंत्री मनोहर जोशी म्हणाले, 'बाळासाहेब कोणाचीही भाडभीड न ठेवता परखडपणे आपले विचार मांडतात.' महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ठाकरेंच्या निवेदनाबद्दल काही कार्यवाही करण्यासंबंधी विचार चालू असल्याचे जाहीर केले आणि सडेतोड गर्जना ठोकणारा वाघ एकदम मांजर बनला. 'मी असे म्हटलेच नव्हते' म्हणून थोरामोठ्यांनी विश्वामित्री पवित्रा घेऊन कानावर हात ठेवला, की पदरी मूळ ध्वनिफिती असलेले पत्रकारही वादविवाद घालू इच्छीत नाहीत. ठाकऱ्यांचा

नवा खुलासा मुसलमानांना मतदानाचा अधिकार नसता तर स्वत:ला 'सेक्यूलर' म्हणवणारे लोक आपला सर्वधर्मसमभाव गुंडाळून ठेवतील, असे आपण म्हणाल्याची मखलाशी करण्याचा आहे. खरे पाहिले तर यात, आपला मताधिकार गेला आहे, मुदतीआधी तो परत मिळण्याची आशा नाही मग, इतरांनाही तो का असावा या भावनेचाच भाग जास्त असावा.

मुसलमानांना मतदानाचा हक्क नसता तर धार्मिक सलोख्याचा आग्रह धरणारे पक्ष बहुसंख्याक जमातीला अधिक रुचतील अशा भूमिका घेऊ लागतील हा काही मोठा प्रतिभेचा आविष्कार नाही. किंबहुना, उलटपक्षी, केवळ अंकगणितच मांडायचे म्हटले तर हिंदूंना – सगळ्या हिंदूंना कशाला, फक्त उच्चवर्णीय हिंदूंना मतदानाचा हक्क नसता तरी अयोध्या, समान नागरी कायदा आणि घटनेचे ३७० वे कलम यांविषयीचे वादच हिंदुत्ववाद्यांनी तयार केले नसते, हे उघड आहे. सर्वधर्मसहिष्णुतेची भूमिका महात्मा गांधींनी मांडली त्या वेळी गांधीजींच्या मनात निवडणुकीच्या मतांचे गणित नव्हते हे उघड आहे; पण इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्याचे आंदोलन उभे करण्याकरिता आवश्यक असलेल्या आघाडीचे अंकगणित त्यांच्या मनात असलेच पाहिजे.

कोणताही एक समाज किंवा जमात काही अडचण निर्माण करू लागली, की ठोकशाही हा सोपा उपाय! आजपर्यंत अनेकांनी चळवळयांच्या विचार– आणि उच्चारस्वातंत्र्यावर बंधने घालण्याचे सज्जड प्रयत्न केले. असे प्रयत्न अगदीच तकलादू ठरतात आणि विचारांचे सामर्थ्य कागदी बंधने आणि कारागृहांच्या दगडी भिंती भेदून जगभर पसरते हे प्रत्येक वेळी स्पष्ट झाले. कोण्या एका समाजाच्या मतदानाचा हक्क हिरावून घेतला म्हणजे त्या समाजाच्या अनुनयाच्या भूमिका घेणे राजकीयदृष्ट्या लाभकारक राहणार नाही; पण म्हणजे, प्रश्न सुटेल असे नाही. लोकशाही व्यवस्थेत कितीही चुका असल्या तरी शेवटी निवडणुकीतील मतदानाच्या दिवशी आपले मत टाकण्याची सर्व प्रौढ नागरिकांना शक्यता असते. त्यामुळे, नागरिक मोठे मोठे अन्याय आणि दु:खे सहन करतात; परमताविषयी थोडीफारतरी सहिष्णुता दाखवितात. मतदानाचा हक्क राहिला नाही तर, जो तो बंदुकीच्या मार्गाकडे झपाट्याने वळू लागेल. मतदानाचा हक्क हिरावून घेतल्यामुळे कोणताही प्रश्न सुटण्यास मदत होण्याची काही शक्यता नाही. याउलट, अंदाधुंदी, बंडखोरी, बेबंदशाही माजविण्यास प्रोत्साहन मिळेल.

ज्यांना फक्त आपल्या परखडपणाचाच अभिमान बाळगायचा आहे, आपल्या प्रतिपादनातील तर्कशुद्धता आणि दूरगामी सर्वंकष परिणाम यांची काहीच दिक्कत

बाळगायची नाही ते अशी विधाने करीत राहतील आणि आपल्या नेत्याच्या अशा बिनधास्त विधानांनी बेहोश होऊन ज्यांच्या मतदानाच्या हक्काला धक्का देण्याचा प्रस्ताव नाही असे अनुयायी त्या बेहोशीत नेत्यांच्या विधानांचे स्वागत करीत राहतील आणि मग, परखडे अधिक चेवाने गरजतील :

• मुसलमानांच्या अनुनयाला आळा घालण्यासाठी मुसलमान समाजाचा मतदानाचा हक्क काढून घ्यावा;

• हिंदुत्वाच्या झेंड्याखाली हिंदुपरंपरेतील व्यापक, सहिष्णू, उदार विचारांचा पराभव करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सर्व हिंदूंचा मतदानाचा हक्क काढून घ्यावा; अशाच तर्काने,

• रोमन कॅथॉलिक चर्चला मानणाऱ्या ख्रिस्ती लोकांचा मतदानाचा अधिकार काढून घ्यावा;

• सर्वच जातीयवादाला पायबंद घालण्यासाठी कोणत्याही रूढ धर्माचे अनुयायी असणाऱ्या सर्वांचा मतदानाचा हक्क काढून घ्यावा;

• शेतकऱ्यांच्या समस्यांसंबंधी सर्वच पक्ष अभ्यास न करता कनवाळूपणा दाखवितात; कारण, शेतकऱ्यांची संख्या. तेव्हा, शेतकऱ्यांचा मतदानाचा हक्क काढून घ्यावा;

• दलित वर्गावर पिढ्या न् पिढ्या अन्याय झाला. त्याच्या परिमार्जनाचा मार्ग सुधरत नाही, त्यामुळे राखीव जागांसारखे हानिकारक मार्ग चोखाळावे लागले. त्यापेक्षा सोपा मार्ग – सर्व दलितांचा मतदानाचा हक्कच काढून घ्यावा;

• देशातील दारिद्र्यरेषेखालील जनतेची संख्या आणि प्रमाण वाढत आहे. इंदिरा गांधींनी 'गरीबी हटाव'ची बेइमान घोषणा करून साऱ्या देशाला फसविले. याची पुनरावृत्ती व्हायची नसेल तर ठाकरे व्याकरणाचा निष्कर्ष – दारिद्र्यरेषेखालील गरीबांना मतदानाचा हक्कच असू नये;

• महिलांच्या आरक्षणाच्या प्रश्नावर गेली काही वर्षे लोकसभेत गोंधळ चालू आहे. खरे म्हटले तर, कोणत्याच पक्षाच्या पुरुषांच्या मनात महिलांसाठी आरक्षण व्हावे अशी बुद्धी नाही; पण उघड बोलले तर आपली प्रतिगाम्यांत गणना होईल या भीतीपोटी सारे पक्ष आणि नेते महिलांसाठी राखीव जागांचे वरदेखले समर्थन करतात. आरक्षणाविरुद्ध बोलले तर बायकांची मते विरुद्ध जातील हीही भीती. याला उपाय ठोकशाहीत एकच – बायकांना मतदानाचा हक्कच ठेवू नये.

याच तर्काने परखडे मांडतील – सरकारी नोकरदारांना मतदानाचा हक्क असू

नये, कामगारांना असू नये, आदिवासींना असू नये... अशी सगळीकडे 'टाळेठोक' केली, की सगळ्या राष्ट्रीय समस्या आपोआपच संपून जातील हा परखड्यांचा ठोकताळा!

हे सगळे मानले तरी मतदारांच्या यादीत बाळासाहेब ठाकरे यांचे नाव लगेच येणे नाही. कारण, कोर्टाच्या हुकुमाने त्यांचा स्वतःचा मतदानाचा हक्क सहा वर्षांपर्यन्त काढून घेण्यात आला आहे. सहा वर्षांनंतर मग, स्वतः ठाकरे, त्यांचे गिनेचुने शिष्य यांचीच काय ती नावे मतदार यादीत राहिली, की महाराष्ट्र विधानसभाच काय, एव्हरेस्ट शिखरावरही ठाकऱ्यांचा झेंडा लागण्यात काहीच अडचण येणार नाही!

*दि. २७/१२/२०००*

■■

# शेतीपुढील जागतिक दर्जाचे आव्हान

भारतीय शेती एका प्रचंड उलथापालथीच्या उंबरठ्यावर उभी आहे.

इंग्रज येण्यापूर्वी देशातील शेती इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत मागास नव्हती, भारतीय शेतकऱ्यांचे कौशल्य आणि ज्ञान पाहता परदेशी तज्ज्ञदेखील चकित होत होते, गावकरी खाऊनपिऊन सुखी होते अशी वर्णने ऐकवली जातात. फारच स्वदेशाभिमानी वक्ता असेल तर देशात दह्यादुधाच्या नद्या वाहत होत्या, देशात समृद्धीची रेलचेल होती, कशाला काही ददात नव्हती अशी वर्णने ऐकवतो.

या वर्णनांत तथ्य किती आणि भाषेचा फुलोरा किती हे शोधणे काही कठीण नाही. फार पुरातन काळापासून देशाच्या वेगवेगळ्या प्रदेशांत पडलेल्या दुष्काळांची विश्वसनीय वर्णने ऐकायला मिळतात. सर्वसाधारणपणे, दर दहा वर्षांतून एकदा तरी मोठा दुष्काळ देशात पडत असावा. महाराष्ट्रात शिवाजीच्या काळी दुर्गादेवीचा दुष्काळ झाला. सतत बारा वर्षे पावसाने दगा दिला. परिणामी झालेल्या दुष्काळात संत तुकाराम महाराजांची 'बाईलही उपासाने मेली', असे पुराव्याने दिसते.

मनुस्मृतीतही, शेतकऱ्यांना घरी तांब्याचा पैसादेखील बाळगण्याची मनाई केलेली आढळते; कोणा कुणब्याने पैसा साठवला तर त्याला कठोर शिक्षा सांगितलेली आहे. म्हणजे, अन्नधान्याचा व्यापार फारसा प्रचलित नसावा. शेतकऱ्याच्या जीवनात सुखाची पराकाष्ठा म्हणजे चांगले पीक येऊन वर्षभर पोटभर खातापिता आले म्हणजे 'गंगेत घोडे न्हाले'!

इंग्रजपूर्व काळातील खेडेगावातील अन्नसौकर्य आणि अन्नसौलभ्य या गोष्टी फारतर उच्चवर्णीय आणि अतिउच्चवर्णीय यांच्यापुरत्याच लागू असाव्या. गावातील गोरगरिब आणि मागास जातीय यांनाही सुखाने पोटभर खाता येईल अशी परिस्थिती इंग्रज येण्यापूर्वी काही शतकेतरी या देशात नांदत असावी, असे मानण्यास

काही आधार नाही.

इंग्रज आले. त्यांनी महसुलाची इंग्रजी व्यवस्था लादली. जमीनदार, सावकार यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे कठोर शोषण सुरू केले. शेतकरी कर्जात बुडू लागला, परागंदा होऊ लागला. या सर्व वाताहतीचा सज्जड पुरावा ज्योतीबा फुल्यांच्या लेखनात सापडतो. 'कच्चा माल मातीच्या भावे, तो पक्का होता चौपटीने घ्यावे,' ही गाडगे महाराजांनी सांगितलेली उक्ती सर्रास अमलात येऊ लागली.

स्वातंत्र्योत्तर काळात गोरे गेले आणि काळे आले, एवढाच काय तो फरक झाला आणि शेतीचे शोषण अधिकच क्रूर बनले. गांधी महात्म्याने स्वराज्यात अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी शेती असेल, गावव्यवस्था असेल आणि सरकारी हस्तक्षेप किमान असेल असे स्वराज्याचे मोहक चित्र पुढे ठेवले होते. नेहरूंच्या समाजवादाने ते धुळीस मिळाले, उद्योगधंद्यांना महत्त्व आले, शहरे भरभराटू लागली, नोकरशाही मातबर बनली, गावातील लक्ष्मी शहरांकडे जाऊ लागली.

पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्याचा परिणाम काय? तर, तोट्यात चालणारी शेती! वर्षानुवर्षे जमिनीची बूज राखली गेली नाही, सुपीकता घटत गेली, जमिनीतील पाणी खोलावत गेले, शेतकऱ्यांच्या गाठी भांडवल म्हणून राहिले नाही. उलट, डोक्यावर कर्जाचा बोजा वाढला.

याच काळात जगात शेतीवर नवनवे प्रयोग होऊ लागले होते. इंग्रजी आमदानीत त्यांतील काही 'ग्यानबा'पर्यन्त पोचले. पण, जगाच्या तुलनेने हिंदुस्थानातील शेती मागास झाली. अमेरिकेसारख्या देशात एक शेतकरी देशातील पन्नास आणि देशाबाहेरील पन्नास असे शंभर माणसांना पुरेसे अन्नधान्य व खाद्यपदार्थ तयार करतो, तर हिंदुस्थानातील शेतकरी स्वत:पुरते किंवा फारतर आणखी एखाद्या लहान मुलापुरते म्हणजे दीड माणसांपुरतेच पिकवतो.

हा सगळा सत्यानाश ज्या समाजवादाच्या नावाखाली घातला गेला, त्या समाजवादाचे कुसूच रशियात मोडून गेले. सामूहिक नियोजनाची कल्पनाच बाष्कळ असल्याचे सिद्ध झाले आणि हिंदुस्थानातही आर्थिक निर्णय कोण्या मोठ्या 'बाबू'च्या हाती देण्याऐवजी मागणीपुरवठ्याच्या आधाराने करण्यात यावे असा मतप्रवाह सुरू झाला.

शेतीची वाताहत होत आहे, ती सरकारी दुष्ट नीतीने होत आहे असे गाऱ्हाणे शेतकरी मांडत होते; पण सिंदबादच्या पाठी बसलेल्या म्हाताऱ्याप्रमाणे सरकार शेतकऱ्याच्या पाठीवर जमलेली बसकण सोडायला तयार नव्हते. डॉ. मनमोहन

सिंग यांच्या काळापासून आर्थिक सुधारणांची दुंदुभी फिरवण्यात आली; पण आर्थिक सुधारणांच्या खुल्या वाऱ्याचा स्पर्शही शेतीला झाला नाही.

देशात अन्नधान्याचा तुटवडा होता तोपर्यन्त निदान धरणे, कालवे अशा प्रकल्पांवर बऱ्यापैकी पैसा खर्च होत होता. हरितक्रांती झाली, देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आणि शेतीकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता कोणत्याही राजकीय पक्षास वाटेनाशी झाली. शेतकऱ्याकडे केवळ हुकमी मतांचा गठ्ठा टाकणारे अजागळ लोक म्हणून पाहिले जाऊ लागले.

सुदैवाने, सारे जग बहुराष्ट्रीय व्यापार खुला करण्यासाठी सज्ज झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारातील श्रीमंत आणि गरीब – दोन्ही प्रकारच्या देशांतील सरकारी हस्तक्षेप संपविण्याच्या दृष्टीने जागतिक व्यापार संस्था (WTO) तयार झाली. त्याबरोबरच, जैविक शास्त्र आणि संगणकशास्त्र यांतील प्रचंड क्रांतीने साऱ्या जगाचे स्वरूपच बदलू लागले. भारतीय शेतीपुढे आता जागतिक दर्जापर्यन्त हनुमान उडी मारण्यापलीकडे काहीही पर्याय उरलेला नाही. कोणी मानो न मानो, शेतीचे तंत्रज्ञान सुधारणे आवश्यक आहे. उत्पादकता वाढविल्याखेरीज गत्यंतर नाही. बाजारपेठेची जुनाट व्यवस्था आमूलाग्र बदलणे जरुरीचे झाले आहे. साठवणूक, प्रक्रिया अशा संरचनांनाही तातडीने जागतिक पातळीवर आणावे लागणार आहे. त्यासाठी फारसा काळही नाही. येत्या पाच वर्षांत हे सगळे घडवून आणायचे आहे.

पण, हे करणार कोण? सरकारी यंत्रणा खिळखिळी झाली आहे, भ्रष्ट झाली आहे. नवीन अर्थव्यवस्थेचे आव्हान सरकारी यंत्रणा पेलू शकेल ही शक्यता मुळातच नाही.

सहकारी यंत्रणेचीही तीच परिस्थिती. सरकारी आधाराने राजकीय पक्षबाजीसाठी पोसण्यात आलेली सहकार यंत्रणा खुल्या व्यवस्थेत टिकण्याची सुतराम शक्यता नाही.

देशातील खासगी भांडवल, आजपर्यन्तचा शेतीचा अनुभव पाहता, शेतीत गुंतविण्याचा धोका घेण्याचे धाडस कोणी करील अशी शक्यता नाही. देशी भांडवलदार शासनाकडून जमीनधारणा, भांडवलगुंतवणूक, महसूल आणि कर यांसंबंधीच्या साऱ्याच नियमांतून मुक्तता मागतात. प्रत्यक्षात, यशस्वी शेती करण्याची कुवत त्यांच्यात आजपर्यन्ततरी दिसली नाही.

परदेशी भांडवल आले तरी ते साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक अशा शेताबाहेरील व्यवसायांपुरतेच येणार; प्रत्यक्ष शेतीत परदेशी कंपन्या उतरण्याची फारशी

शक्यता नाही. देशी काय किंवा विदेशी काय, बाहेरून येणारी कंपनी म्हटले की, शेतकऱ्यांच्या मनात, पूर्वानुभवामुळे, अनेक शंकांच्या सावल्या जमू लागतात. ज्या कंपन्यांनी शेतकऱ्यांशी कच्चा माल घेण्याचे करार केले आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कारखानदारी उभारली त्याबाबत त्यांचा अनुभव फारसा आश्वासक नाही.

वर्षानुवर्षांचे शेतीचे दारिद्र्य दूर होण्याचा शुभमुहूर्ततर आलेला. आव्हान प्रचंड; पण ते पार पाडायचे कोणी असा मोठा विलक्षण तिढा भारतीय शेतीपुढे पडलेला आहे. राजकीय नेते आणि अनभ्यस्त शेतकरी नेते हे खुलीकरणच टाळावे, आपण आपल्या घरी संतोषाने राहावे असा आत्मघातकी कार्यक्रम पुढे ठेवीत आहेत.

शेतीच्या पुनरुत्थानाची जबाबदारी कौशल्याने पार पाडणारी संघटना उभारावी कशी या समस्येचे आव्हान प्रतिभावान, देशप्रेमी आणि शेतकऱ्यांविषयी आपुलकी बाळगणाऱ्या विचारवंतांनी स्वीकारले पाहिजे.

सध्या, शहरातील माणसाने व्यवसाय करायचा झाला तर कंपनी काढावी आणि खेड्यातील माणसाने काही करायचे झाले तर सहकारी संस्था काढायची असा दुटप्पीपणा प्रस्थापित झाला आहे. 'इंडिया'तील लोकांकरिता कंपनी आणि 'भारता'तील लोकांकरिता सहकारी संस्था! नवीन युगाचे आव्हान पेलण्यासाठी कंपनीची कार्यक्षमता आणि उद्योजकता यांबरोबरच सहकारातील सहभागाची भावना एकत्र आणून शेतकऱ्यांना आपली वाटेल अशी कार्यक्षम व्यावसायिक संस्था नव्याने पुढे आणावी लागेल.

जागतिक व्यापार संस्थे(WTO)त राहावे किंवा नाही ही चर्चा निरर्थक आहे. जागतिक व्यापाराचे आव्हान स्वीकारण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली उत्पादने आणि व्यापार यासंबंधीची बांधणी कशी करावी याबद्दल खरीखुरी सखोल चर्चा होणे आवश्यक आहे.

*दि. ३/१/२००१*

■■

# शेतकरी उपाशी, शेतीशास्त्रज्ञ खाई तुपाशी !

३ जानेवारी २००० रोजी अखिल भारतीय विज्ञान परिषदेचे ८८ वे अधिवेशन पुसा इन्स्टिटट्यूट, दिल्ली येथे सुरू झाले. अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. परोडा हे भारतीय शेती विज्ञान संशोधन केंद्राचे (ICAR) प्रमुख; जगभर त्यांच्या कर्तबगारीचा बोलबाला असलेले. देशात शेतीला काही महत्त्वाचे स्थान असो किंवा नसो, विज्ञान परिषदेच्या अध्यक्षांच्या निवडीबाबत मात्र शेती शास्त्रज्ञांना काहीसे झुकते मापच मिळाले आहे. गेल्या महिन्यात डॉ. परोडा यांना भ्रष्टाचारप्रकरणी पदमुक्त करण्यात आले; त्या वेळी मोठा गहजब उठला होता. जवळजवळ दोन हजार शास्त्रज्ञांनी खुद्द पंतप्रधानांकडे या कार्यवाहीबद्दल नाराजी व्यक्त करणारे निवेदन दिले. त्याहीपेक्षा कमाल म्हणजे, शंभरावर खासदारांनी डॉ. परोडा यांना सेवेत रुजू करून घ्यावे अशी मागणी केली. आठदहा खासदार असलेल्या पक्षांचे नेते पंतप्रधानांना दमदाटी करतात आणि जयललिता यांच्यासारखी एखादी व्यक्तीतर सरकार खालीही आणू शकते. या हिशेबाने पाहिले तर, शंभर खासदारांचा पाठिंबा असलेले, रामनिवास मिर्धा यांचे जावई असलेले आणि काँग्रेसचे माजी शेतीमंत्री बलराम जाखड यांच्या जवळच्या नात्यातील डॉ. परोडा संशोधन केंद्रातील आपली जागा परत मिळवण्याचा हव्यास करण्यापेक्षा कृषिमंत्री किंवा पंतप्रधानच बनण्याचा प्रयत्न का करीत नाहीत, अशी हेटाळणीची चर्चाही राजधानीत चालू होती. पंतप्रधानांनी डॉ. परोडांवर कार्यवाही करण्यात मोठी हिंमत दाखवली असे कौतुकाचे स्वरही ऐकू येत होते. तेवढ्यात, डॉ. परोडा यांच्यावरील कार्यवाही मागे घेण्यात आल्याची व त्यांना त्यांच्या पदावर पुन्हा नेमण्यात आल्याची बातमी येऊन थडकली. डॉ. परोडा नियोजित विज्ञान परिषदेचे अध्यक्ष आहेत, त्यांच्या पदच्युतीमुळे आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय वैज्ञानिकांच्या भारत बदनाम होईल या धास्तीपोटी पंतप्रधानांनी आपला निर्णय फिरवला असावा

असा अंदाज वर्तमानपत्रांनी बांधला असावा.

कोणा मातबर माणसाने हट्ट धरला तर सरकारने जाहीर केलेला निर्णयसुद्धा फिरवला जातो याची अनेक उदाहरणे आहेत. ममता बॅनर्जींनी पेट्रोलियमच्या किमती वाढविण्याचा निर्णय फिरवून किमती कमी करून घेतल्या हे त्याचे अलीकडचे उदाहरण. कोणाच्या हट्टापायी निर्णय फिरवल्याने हाती काहीच लागत नाही, त्यामुळे प्रतिष्ठा शासनाची जाते एवढेच काय ते! विज्ञान परिषदेकरिता भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पदावरून दूर झालेल्या डॉ. परोडा यांना पुनर्स्थापित करण्यात आले, त्यापलीकडे जाऊन, विज्ञान परिषदेमध्ये उद्घाटनाचे भाषण स्वत: पंतप्रधानांनीच केले; तरी, 'बूँद से गयी, वो हौद से नहीं आयी.' जगातील सर्वांत ख्यातनाम कृषिशास्त्रज्ञ, हरितक्रांतीचे आंतरराष्ट्रीय जनक डॉ. बोर्लोग परिषदेस उपस्थित राहणार याचा खूप गाजावाजा झाला होता. ऐन वेळी त्यांनी परिषदेस येण्याचे रद्द केले आणि डॉ. परोडा यांच्यावरील कार्यवाहीमुळे आपण दु:खी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बोर्लोग यांचा निर्णय डॉ. परोडा यांच्याशी सल्लामसलत झाल्याखेरीज घेतला गेला असेल अशी काही फारशी शक्यता नाही. सारांश, डॉ. परोडा यांनी बाजी मारली. त्यांनी आपल्यावरील शिस्तीची कार्यवाही रद्द करून घेतली, पद पुन्हा मिळवले. पंतप्रधानांना उद्घाटनास येण्यास भाग पाडले आणि वर, डॉ. बोर्लोग यांना गैरहजर ठेवून शासनाच्या श्रीमुखात चांगलीच चपराक मारली.

उद्घाटनाच्या सत्रानंतर पंतप्रधान परिषदेचे स्थान सोडून गेल्यावर हरियाना, उत्तर प्रदेशातील काही शेतकरी मंचावर चढले. शेतीची गुणवत्ता वाढविण्याचे उद्दिष्ट सांगून भरलेल्या या विज्ञान परिषदेमध्ये शेतकरी कोठे आहे?" असा त्यांनी प्रश्न विचारला. आतंकवाद्यांनी काही अत्याचार केला तर त्यामागील सूत्रधार संघटना कोणती, याबद्दल चर्चा होते; बहुतेक वेळा कोणी ना कोणी संघटना अत्याचार आपण घडवून आणल्याची फुशारकी मारते. विज्ञान परिषदेच्या मंचावर घुसलेले हे निदर्शनकारी कार्यकर्ते आपले असल्याची शेखी शेतकऱ्यांच्या संघटनांपैकी कोणीच मिरवली नाही.

जवळजवळ त्याच सुमारास कर्नाटक राज्यात रयत संघाच्या तीनेक हजार शेतकऱ्यांच्या जमावाने कापसाच्या जैविक बियाण्याच्या सरकारी देखरेखीखालील प्रयोगशेतीवर हल्ला केला, रोपटी उपटून टाकली आणि जाळून टाकली. विज्ञानपरिषदेमध्ये शेतीच्या जागतिकीकरणाला आणि जैविक शास्त्राला पाठिंबा देण्याची भूमिका आजपर्यंत घेतलेली आहे हे पाहता कर्नाटकातील दंगेखोर

आणि विज्ञान परिषदेतील घुसखोर यांच्यातील लागेबांधे समजण्यास अडचण पडू नये.

विज्ञान परिषदेच्या बाजूला शेतीसंबंधी एक विशेष परिसंवाद घडवून आणण्यात आला. बरोबरच एक शेतकी प्रदर्शन ठेवण्यात आले होते. त्यानिमित्ताने शेतीमालाचा व्यापार, निर्यात, प्रक्रिया कारखाने, यंत्रसामग्री यासंबंधी बडीबडी मंडळी कार्यक्रमास हजर होती. परिसंवादाचा विषय होता 'जागतिक श्रेष्ठतेसाठीची धडक मोहीम'. वेगवेगळ्या क्षेत्रांतील मंडळींनी आपापल्या वक्तव्यात अडचणी सांगितल्या आणि स्पर्धेत टिकायचे असेल तर काय तयारी करावी लागेल यासंबंधी सखोल विवेचने केली. सर्वांचा सूरमात्र आत्मविश्वासाचा आणि आशेचा होता. भारतीय शास्त्रज्ञांचा उल्लेख हरवक्ता बिनचूक करत होता. मंचावरील शास्त्रज्ञांच्या लौकिकाविषयी काय बोलावे? भारतातील टेलिव्हिजनच्या दुकानात एकएक संच मांडून ठेवलेला असतो. जपानमध्ये खास दुकानात अशा संचाचे घालून ठेवलेले ढीग पाहिले म्हणजे जसा अचंबा वाटतो तसेच मान्यवर शास्त्रज्ञांच्या कारकिर्दीचा तपशील पाहिला म्हणजे वाटेल. दहावीस आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या सन्मानांखाली कोणीच नव्हते. डॉक्टरेट तर थप्पीने मिळालेल्या – कोणाला पंचवीस तर कोणाला तीस! निवृत्तीवयाच्या आधी पंचवीस ते तीस डॉक्टरेट मिळविण्यासाठी या शास्त्रज्ञांनी नेमके काय केले असावे याबद्दल कुतूहल वाटले. पदव्या देणारी विद्यापीठे काही नागपूरची नव्हती; जगभराच्या वेगवेगळ्या देशांतील नामवंत विद्यापीठांच्या त्या पदव्या होत्या. अन्नधान्याच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी केलेल्या कामगिरीबद्दल जागतिक अन्नधान्य पुरस्कार दिला जातो. आजपर्यंत बारा शास्त्रज्ञांना हा मान मिळाला आहे. त्यात पाच भारतीय आहेत. लागोपाठ पाच भारतीय सुंदऱ्या विश्वविजेत्या ठरल्यावर अभिमान वाटावा तसेच भारतीय शास्त्रज्ञांच्या सन्मानांनीही कोणाही देशप्रेमी भारतीयाचा ऊर भरून यावा हे साहजिक आहे.

डझनांनी पदव्या मिरविणारे आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित शेतीशास्त्रज्ञ मोठ्या संख्येने असलेल्या या देशातील शेतकरीमात्र आज महाअरिष्टात आहे. त्यासंबंधी लोकसभेच्या गेल्याच महिन्यातील सत्रात मोठा धांगडधिंगा झाला. वर्षानुवर्षांच्या दुर्लक्षामुळे जमिनीची सुपीकता घटते आहे, भूगर्भातील पाणी खचते आहे, नवीन भांडवली गुंतवणूक नाही, उलट, असलेली यंत्रसामग्रीही निकामी होत आहे. इकडे शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा इतका असह्य झाला की, 'दारिद्र्यात् मरणं वरम्' असे म्हणून शेकड्यांनी शेतकरी किडींचा

बंदोबस्त करण्यासाठी निरुपयोगी ठरलेली औषधे घशाखाली घालून तडफडत प्राण सोडीत आहेत आणि त्याच वेळी दुसऱ्या देशातील शेतकरी सरकारी सज्जड साहाय्यामुळे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादनाचे उच्चांक मोडीत आहे, उत्पादनखर्च घटवत आहेत आणि जागतिकीकरणाचा झेंडा फडकावीत गाफील देशांच्या बाजारपेठा काबीज करीत आहेत. अशी सारी शेतीची परिस्थिती.

अशा वेळी भारतीय विज्ञान परिषदेत शेतीशास्त्रज्ञांच्या कौतुकाचा गजर व्हावा, हे काय गौडबंगाल आहे?

भारतात हरितक्रांती आली. हरितक्रांतीच्या वाणासंबंधीच्या संशोधनाचे श्रेय प्रामुख्याने डॉ. बोर्लोग यांच्याकडे जाते; डॉ. स्वामिनाथन् यांच्यासारख्या भारतीय शास्त्रज्ञांनाही श्रेयाचा मोठा वाटा दिला जातो. उल्लेखनीय गोष्ट अशी, की मुळातले आंतरराष्ट्रीय संशोधन गहू, तांदूळ अशा धान्यांच्या बियाण्यांवर झाले. त्यांतील काही बियाण्यांवर आणखी पुढे संशोधन भारतीय शास्त्रज्ञांनीही केले; पण त्याचे स्वरूप भूमितीतील प्रमेये (थिअरम) मांडल्यानंतर त्यांचा उपयोग करून उपप्रमेयात्मक उदाहरणे (रायडर्स्) सोडविण्यासारखे आहे. परदेशांत डाळींसंबंधी संशोधन झाले नाही, कारण मांसाहारी प्रजेला प्रथिनांची गरज भागविण्याकरिता डाळींचे तितकेसे महत्त्व राहत नाही. भारतातील हरितक्रांती धान्यांपाशीच थांबली, डाळी किंवा तेलबिया यांच्या क्षेत्रात प्रवेश करू शकली नाही, यातील इंगित हेच आहे. भारतीय शास्त्रज्ञांचे संशोधन परदेशांत संबंधित क्षेत्रात काम झाल्यानंतर मगच उभे राहू लागते.

समाजवादाच्या काळात, अगदी पहिल्या योजनेपासून शेतीतील संशोधनाचे महत्त्व नियोजनकर्त्यांनी अचूक ओळखले होते. संशोधन व्हावे कसे, करावे कोणी या प्रश्नांची उत्तरे 'इंडिया'तील सवर्ण नोकरशाहीला सोयीस्कर अशी देण्यात आली. पंडितजींना भव्य शिल्पे बांधण्याची दांडगी हौस. मुसलमान आमदानीतील शेवटचे बादशाह आणि अशोकासारखे काही सम्राट यांच्याशीच याबाबतीत पंडित नेहरूंची तुलना होऊ शकते!

प्रत्येक क्षेत्रात संशोधन करण्यासाठी राष्ट्रीय प्रयोगशाळा खोलण्यात आल्या. परदेशांतून संशोधनाची साधने, उपकरणे गठ्ठ्याने आणण्यात आली. शास्त्र विभागात एखाददुसरी पदवी मिळालेले स्नातक फटाफट शास्त्रज्ञ Grade I किंवा GradeII वर लागू लागले. सरकारी खाक्या आणि ठरावीक पगार या धबगड्यात प्रतिभावंत शास्त्रज्ञसुद्धा निष्प्रभ झाले असते; येथेतर, किरकोळ अपवाद वगळता, केवळ पोटभरूंचा भरणा झालेला. काहीतरी किडूकमिडूक काम करून नवनवीन पदव्या

पदरी पाडून घेत, देशीपरदेशी संशोधन संस्थांशी संपर्क साधून परिसंवाद, परिषदा आणि दौरे यांसंबंधी उभयतांत समझोता करून ते 'परस्परम् भावयन्ता' परम श्रेय प्राप्तकर्ते झाले!

आपल्या सहकाऱ्यांनी केलेले संशोधन आपल्या पदरी लाटून घ्यावे, दोस्त शास्त्रज्ञांचे कंपू बनवावे आणि प्रकल्प, दौरे, पारितोषके, पदव्या आपल्या कंपूत अधिकाधिक मिळवावेत हे प्रयोगशाळांतील मुख्य काम झाले. काही वर्षांपूर्वी म्हैसूर येथील शेतीमाल प्रक्रियेसंबंधीच्या मोठ्या विख्यात प्रयोगशाळेस भेट देण्याचा योग आला. 'इतर संशोधनशाळांचे जे काही असेल ते असो, ही संशोधन संस्थामात्र सर्वोत्कृष्ट काम करीत आहे', असा निर्वाळा मला अनेकांनी दिला होता. भेटीच्या शेवटी तेथील शास्त्रज्ञांना मी एक प्रश्न विचारला, आतापर्यन्त या संशोधनशाळेतून निष्पन्न झालेला सर्वांत मोठा शोध कोणता? एकमेकांशी विचारविनिमय करून उत्तर देण्यात आले ते असे : जगभर लहान बालकांकरिता खाद्य (Baby Food) बनविताना गायीच्या दुधाचा वापर केला जातो, म्हशीच्या नाही. आपल्या देशात म्हशींची संख्या मोठी आहे; पण त्यांचे दूध बालकांकरिता वापरता येत नसे. आम्ही संशोधनाने त्यातील चरबी (Fat) कमी करून म्हशीच्या दुधातून बालान्न तयार करणे शक्य केले.

हिंदुस्थानातील दूधपित्या बालकांच्या आया या प्रश्नाचे उत्तर केव्हाच काढून बसलेल्या आहेत आणि आजही गायीचे दूध मिळाले नाही तर म्हशीच्या दुधात पाणी मिसळून त्यात थोडी संगजिऱ्याची पूड घालून त्या आपल्या मुलांची गरज भागवितात. अशा संशोधनासाठी कोट्यवधी रुपये खर्चून पंचतारांकित संशोधनसंस्था उभ्या करण्याची आणि चालविण्याची काही आवश्यकता होती काय?

डॉ. श्रीपाद दाभोळकरांनी प्रयोग परिवाराचा कार्यक्रम केला आणि महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत द्राक्ष क्रांती करून दाखविली.

शेतकरी महिला आघाडीच्या 'सीता शेती' योजनेत ग्रामीण भागातील स्त्रियांकडून त्यांच्याच शेतांवर काही संशोधनाचे काम करून घेण्याची कल्पना होती.

या दोनही योजनांत निघालेले निष्कर्ष शेतकऱ्यांकडे पोहोचविण्यात काहीच अडचण आली नाही. भारतातील समाजवादी परंपरेच्या संशोधन शाळांपुढे शेतकऱ्यांपर्यन्त संशोधन पोहोचविण्याची समस्या बिकट होऊन बसली आहे.

संशोधनाचा विषय शेती. शेतीवरील संशोधन करण्यासाठी वेगळी कुंपणे घालून बंदिस्त प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या. कुंपणाआड चाललेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे कसे यासाठी एक वेगळी यंत्रणा सर्वदूर उभारण्यात

आली, पण ती निष्फळ ठरली.

भारतात शास्त्रविषयक अभ्यास केलेल्यांची संख्या जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे असे अभिमानाने सांगितले जाते. आकडेवारीने शास्त्रपदवीधरांची संख्या मोठी आहे असे दाखविता येईल; पण या पदवीधरांत शास्त्रज्ञ बनण्यासाठी आवश्यक असलेली जिज्ञासू वृत्ती आणि तर्कनिष्ठा कितपत बाणली गेली आहे हे पाहिले तर स्नातकांच्या आकडेवारीला काही महत्त्व नाही हे स्पष्ट होते.

देशात सर्व राज्यांत साधू, बाबामहाराज, प्रवचनकार आदी भक्तिपंथियांची मोठी चलती चालू आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर अशा भोंदू महाराजांच्या समोर बसणाऱ्या मंडळीत शास्त्रज्ञ किंवा सहाय्यक शास्त्रज्ञ म्हणून काम करणारांचा भरणा खूप मोठा आहे. आयुष्यात अनिश्चितता आणि पात्रतेपलीकडे यश ही अंधश्रद्धेची कारणे मानली जातात. अंधश्रद्धाळूंच्या गर्दीत शास्त्रज्ञांची रेलचेल असावी हे समजण्यासारखे आहे; पण बरोबरीने विज्ञान परिषदांच्या मंचावरही ही शास्त्रज्ञ मंडळी एवढ्या दिमाखाने मिरवतात हे पाहिले म्हणजे शेतकरी मोठ्या संख्येने जीव का देऊ इच्छितात हे समजू लागते!

*दि. १०/१/२००१*

■■

# जागतिकीकरणाचे आव्हान प्रतिभेने पेलणे शक्य

प्रधानमंत्री श्री. अटल बिहारी वाजपेयी आठवड्याचा व्हिएतनाम, इंडोनेशिया, बाली बेटे यांचा दौरा करून, मकर संक्रांतीच्या दिवशी दिल्लीत परत आले. या दौऱ्याचा मुख्य हेतू हा आशिया परिसरातील देशांतील घनिष्ट आर्थिक संबंध तयार करून या देशांशी असलेला व्यापार वाढविणे हा होता.

दौऱ्यावर निघण्यापूर्वी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जागतिक व्यापार संस्थेच्या आगामी वाटाघाटींसाठी भारतात सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्याआधी, पंतप्रधानांनी जागतिकीकरणाच्या तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा केला आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनसामान्यांपर्यन्त वैश्विकीकरणाचा संदेश पोहोचवावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

एक दिवस वैश्विकीकरणाचा पुरस्कार आणि नंतर आठवडाभर प्रादेशिक व्यापारी संबंध घनिष्ठ बनविण्याची धडपड यात काही विरोधाभास आहे का? जागतिक व्यापार संस्थेच्या करारात प्रादेशिक व्यापारासंबंधीची भूमिका मोठी स्वागताची नाही. पण, खरे पाहिले तर, जागतिक व्यापारवाद्यांनी प्रादेशिक व्यापार व्यवस्थांचा दुस्वास करण्याचे काही कारण नाही. जगाला व्यापणारी व्यापारव्यवस्था तयार होण्यास सर्व राष्ट्रांनी एकछत्री व्यापारव्यवस्था उभी करणे हा खरा मार्ग; पण कोणी देश मधला टप्पा म्हणून आसपासच्या जवळपासच्या समानधर्मा राष्ट्रांशी मर्यादित व्यापार करारमदार करेल तर त्याने जागतिक व्यापारास बाधा येते असे नव्हे.

एकाच भूखंडातील किंवा शेजारी राष्ट्रांत हवामान, सामाजिक परिस्थिती, लोकांची राहणीसाहणी यांत पुष्कळसे साम्य असते. यामुळे अशा समानधर्मी देशांत व्यापार अधिक सुकर होतो. कोणी फार मोठा, कोणी फार गरीब असा भेद नसल्यामुळे परस्परांत वितंडवादांना वाव राहत नाही.

अशा प्रादेशिक व्यवस्थांमुळे आपल्या सरहद्दीआड कोंडून राहिलेल्या देशांना बाहेरचे वारे घरात खेळून देण्यासाठी एक एक खिडकी, दार उघडीत, सराव करीत खुल्या हवेत जाणे शक्य होते; वैश्विकीकरणाचा धक्का बसत नाही. त्यामुळे जागतिक व्यापार झालाच तर सुकरच होतो.

याखेरीज साऱ्या जगाच्या मंचावर एकट्यादुकट्या गरीब राष्ट्रांना आपले प्रस्ताव प्रभावीपणे मांडणे आणि दुसऱ्या देशांकडून मान्य करून घेणे सहज शक्य नसते. प्रादेशिक व्यापारसंस्थांमुळे जवळीक झालेल्या राष्ट्रांनी एकत्र मिळून प्रस्ताव मांडले, सूचना केल्या तर त्या स्वीकारल्या जाण्याची शक्यता अधिक असते.

पंतप्रधान दक्षिण आशियायी दौऱ्यावर बाहेर असताना दिल्लीमध्ये सार्क देशांची एक बैठक संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक विकास कार्यक्रम आणि सार्क संघटना यांच्या वतीने भरविण्यात आली होती. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, बांगला देश या पाचही देशांतील जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींसाठी काम करणारे तज्ज्ञ या बैठकीच्या निमित्ताने एकत्र आले होते. वाटाघाटींसाठी सर्वांनी मिळून एकत्र प्रस्ताव तयार करावेत हा या बैठकीचा उद्देश. बैठकीच्या शेवटी सर्वच जमलेल्या देशांमध्ये बरीच एकवाक्यता आढळली. निर्यातीवरील बंधने काढल्यामुळे गरीब देशांत लोटणाऱ्या आयात मालाच्या महापुरासंबंधी सर्वांनीच चिंता व्यक्त केली. गरीब देशांतील अन्नधान्य पुरवठा आणि किमान जीवनमान शाबूत राखण्यासाठी काही विशेष तरतुदी असाव्यात, श्रीमंत राष्ट्रांनी शेतीवरील अनुदाने कमी करावीत, आरोग्य आणि वनस्पती यांचे संरक्षण करण्यासंबंधीचे नियम हे अधिक वास्तविक असावेत असा सार्वत्रिक सूर होता.

श्रीमंत राष्ट्रांच्या गळयात ही घंटा बांधावी कोणी आणि कशी याबद्दल काहीच चर्चा झाली नाही.

जागतिक व्यापार संस्थेच्या करारांमध्ये आयातीवरील बंधने, अनुदाने कमी करण्यासंबंधी घालून देण्यात आलेल्या फूटपट्ट्या यांच्या अनुषंगाने चर्चा झाली. समानधर्मा शेजारीशेजारी राष्ट्रे एकत्र बसली म्हणजे काही नवीन दिशा दाखवतील असे ज्यांना वाटत होते ते काहीसे निराश झाले.

या बैठकीतून काही काही प्रतिभाणध्ये कल्पना निघू शकल्या असत्या. उदाहरणार्थ :

तामिळी वाघांच्या कारवायांमुळे श्रीलंकेच्या उत्तर भागात अनेक वर्षे

युद्धपरिस्थिती चालू आहे. या कारणाने आयातीवरील बंधने कमी करण्याची सक्ती थोडी ढिली करण्याची परवानगी दिली आहे; पण ही ढील फक्त उत्तरेत पिकणाऱ्या मालापुरतीच मर्यादित आहे. आधुनिक जगातील युद्ध सर्वंकष असते; साऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. तस्मात्, ज्यांच्या भूमीवर प्रत्यक्ष धुमश्चक्री चालू आहे त्या देशाला आयातीसंबंधीचे निर्बन्ध ढिले करण्याची सक्ती बेताबेताने व्हावी अशी सूचना या बैठकीतून पुढे यायला काही हरकत नव्हती.

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांना एकत्र येऊन प्रस्ताव मांडता आला असता. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संस्थेचा करार झाला. व्यापार खुला करण्याच्या आणाभाका घेण्यात आल्या आणि नंतर पोखरण येथील अणुस्फोट व त्यानंतरचे पाकिस्तानातील अणुस्फोट यांचे निमित्त करून बड्या बड्या राष्ट्रांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यावर व्यापारी निर्बंध लादले.

एकदा खुल्या व्यवस्थेच्या आणाभाका घेतल्या की नंतर काहीतरी कुरापत काढून व्यापार मोडू पाहणे घेतलेल्या आणाभाकांना बाधा आणते. जागतिक व्यापार संस्थेच्या सदस्यांनी संस्थेच्या कराराबाहेरील कारणासाठी अशा तऱ्हेची कारवाई करू नये असा प्रस्ताव भारत आणि पाकिस्तान यांना दिल्लीतील या बैठकीत मांडता आला असता.

सारे जग शेतीतंत्रज्ञानात अफाट पुढे गेले आहे. खते, औषधे, सुधारित बियाणे व यंत्रसामग्री यांच्या उपयोगाने श्रीमंत देशांतील उत्पादकता अफाट वाढली आहे. हे प्रगत देश आपला माल गरीब देशांत घुसवत आहेत; त्यापलीकडे जाऊन, गरीब देशांतील शेतीमाल आरोग्यविषयी तरतुदींचा कांगावा करून त्यांच्याकडे येऊ देत नाहीत. याला दक्षिण आशियायी देश प्रतिभाशाली प्रत्युत्तर काढू शकले असते. काही काळपर्यंत तरी, रासायनिक खते आणि औषधे यांचा वापर करून उत्पन्न झालेल्या मालाच्या आयातीवर, किमान त्याची तांत्रिक तपासणी करण्याची व्यवस्था उभी राहीपर्यंत तरी निर्बन्ध लागू करण्याची मुभा गरीब देशांना असावी अशी सूचना करता आली असती.

जागतिक व्यापार संस्थेच्या शेतीविषयक करारामुळे एक मोठी विचित्र घटना घडली आहे. श्रीमंत देशांतील अनुदानांना चटावलेले शेतकरी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला गरीब देशांतील पिडलेनाडलेले शेतकरी व्यापार करण्यासाठी एकत्र येत आहेत. बहुतेक गरीब राष्ट्रांत देशांतर्गत आर्थिक सुधारणा आणि वैश्विकीकरण एकदमच मंचावर आले. अंतर्गत आर्थिक सुधारणांना काही

काळ आणि वाव मिळाला असता तर जागतिकीकरण अधिक सुकर झाले असते. आपापल्या देशातील शेती जागतिक दर्जाची करून मग जगभरच्या खुल्या व्यापारात उतरण्याची उसंत या देशांना मिळालीच नाही. त्यामुळे, जागतिक व्यापार संस्थेविषयी दोन अगदी टोकाच्या भूमिका आढळतात.

एक भूमिका टॉलस्टॉयच्या 'वॉर अँड पीस' कादंबरीतील नायकाची; फ्रेंच राज्यक्रांतीनंतर 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व' यांचा उद्घोष करीत नेपोलियन रशियात येत आहे, त्यामुळे स्वतंत्रतेच्या नव्या युगाची सुरुवात होत आहे असा भाबडा आशावाद बाळगणाऱ्या नायकाची. दुसऱ्या बाजूला वैफल्यग्रस्त समाजवादी, पर्यावरणवादी, गांधीवादी आणि रूढीवादी १९व्या शतकाच्या शेवटी प्लेगला प्रतिबंध व्हावा म्हणून इंग्रज शासन चालवीत असलेल्या स्वच्छता मोहिमेला राष्ट्रवादाचा जयजयकार करीत विरोध करणाऱ्या चळवळयांप्रमाणे भूमिका घेत आहेत.

जागतिक व्यापाराच्या वाटाघाटी आवश्यक तर थोड्या धीम्या करून देशातील शेती जागतिक दर्जाची करण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न नेटाने करून लवकरात लवकर शेतीव्यापाराच्या जागतिकीकरणाची मुहूर्तमेढ रोवण्याची रणनीती दक्षिण आशियायी देशांनी एकत्र येऊन पुढे मांडण्याची गरज होती. एवढे जरी केले तरी दिल्लीच्या बैठकीत काही साधले नसले तरी सार्क देशांच्या बैठकीच्या पुढील फेरीत भरघोस प्रगती होईल.

*दि. १७/१/२००१*

■■

# गाऊ त्यांना आरती

व्यवहाराचा पाश न ठेवता आकाशात उत्तुंग भराऱ्या घेण्याच्या वयात माझे जे ऐतिहासिक आदर्श होते, त्यात श्रीमत् शंकराचार्य यांचे स्थान सर्वोच्च. आयुष्यमान अवघे बत्तीस वर्षांचे. सोळाव्या वर्षी संन्यास. अद्वैत मत म्हणजे नेमके काय याची समज येण्याच्या आधीही, मत काही का असेना, हजारो महापंडितांशी नियम ठरवून वादविवादाला बसायचे आणि वादविवादात ते हरल्याचे त्यांच्याकडून वदवून घ्यायचे हा पराक्रमच मोठा अद्भुत वाटे. 'आपल्या देशात वेगवेगळया विखुरलेल्या प्रदेशात समानता कोणती?' या प्रश्नाचे उत्तर 'श्री शंकराचार्यांचा प्रभाव आणि त्यांची पीठे' हेच होय. वाहतुकीची काहीही साधने नसलेल्या काळात द्वारका, पुरी, बद्रीनाथ, शृंगेरी असे चार दिशांना चार मठ स्थापणाऱ्या श्री शंकराचार्यांबद्दल मनात असीम आदर होता.

गौतम बुद्धाचा जन्म आपल्या देशातला; त्यांचा धर्म आजही जगात अग्रगण्य मानला जातो; पण, तो सारा चीन, जपान पूर्व आशियायी देशांत. आपल्याकडे आंबेडकरांच्या अनुयायांनी उभा केलेला दलितयान पंथ सोडला तर हीनयान व महायान या बौद्ध धर्मातील दोन महत्त्वाच्या पंथांचा येथे मागमूसही नाही.

अलीकडे जगन्नाथपुरीला जाऊन आलो. परत येताना अतिविशिष्ट व्यक्तींत फक्त जपानचे भारतातील राजदूत आणि त्यांचा परिवार होता. इंडियन एअर लाईन्स्चा नोकरवर्ग अतिअतिविशिष्ट व्यक्तींपलीकडे त्यांचे आदरातिथ्य करीत होते. पुरीच्या बौद्ध स्तूपांभोवती प्रचंड देवळे बांधायचे काम जपानी मदतीने होते आहे. साहजिकच, जपानी राजदूतांना तेथे फार मानले जाते. परदेशात काय मान असेल तो असो, हिंदुस्थानातमात्र बौद्ध धर्म फक्त नावालाच शिल्लक राहिला आहे.

हे झाले कसे? बौद्धांकडे राजसत्ता होती, धर्मसत्ता होती; जागोजाग हजारोंच्या

संख्येने भिख्खू ध्यानधारणा करीत होते, शहरोशहरी भिक्षापात्र घेऊन फिरत होते. 'बुद्धाला, धर्माला आणि संघाला' शरण गेल्याच्या प्रार्थनांनी सारी आसमंते गजबजून जात होती. त्या साऱ्या रम्य नगऱ्या, ते चक्रवर्ती बौद्ध सम्राट, त्यांची साम्राज्ये, बौद्ध मठ; सगळे अचानक नाहीसे कसे झाले? बौद्धांचा पराभव शस्त्रास्त्रांच्या मदतीने लढाया मारून झाला नाही; कत्तली झाल्या नाहीत, मठांना आगी लावण्यात आल्या नाहीत. तरीही बौद्ध मत संपले; एवढेच नव्हे तर, कोठेही द्वेषभावना शिल्लक न राहता संपले. हा दिग्विजय एका तरुण संन्याशाने केला. हातात दंड, अंगावर संन्याशाची भगवी वस्त्रे, पुढे अद्वैतवादाची प्रतीकात्मक मशाल घेऊन चालणारा शिष्य. आव्हान देणारा कोणी भेटला, की वादविवादाला सुरुवात!

वादविवादात विषय काय? युक्तिवाद काय? यासंबंधी काही माहिती असण्याचे ते वय नव्हते. मंडन मिश्र या मीमांसक महापंडिताशी झालेल्या वादाच्या वेळी पंच म्हणून मंडन मिश्रांची पत्नीच बसली होती. स्वगृहिणीच पंच असतानाही मंडन मिश्राला पराभव स्वीकारण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. हे सारेच मोठे अद्वितीय वाटे. वादविवादांच्या वक्तृत्व स्पर्धा जिंकण्याचा त्या वेळी मोठा कैफ होता. साहजिकच, शंकराचार्य म्हणजे परमोच्च आदर्शबिंदू वाटे. महापंडिता भारतीने एक प्रश्न विचारला. नेमका प्रश्न काय ते आजही कोणी सांगू शकत नाही. स्त्री आणि पुरुष यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अभिव्यक्तीत 'स्वामित्वाने शरणता' एवढा फरक असेल तर सर्वांभूतीचा आत्मा एकच स्वरूपी कसा काय असू शकेल? असे त्या प्रश्नाचे स्वरूप होते, असे कोठेतरी वाचनात नंतर आले. बाईंनी 'शब्दाचे अवडंबर नको, आत्मप्रचीतीने बोला,' असे रोखठोक सांगितले आणि ब्रह्मचारी शंकराचार्यांच्या अनुभूतिसिद्धांतालाच हात घातला. हजारो स्मृर्तिश्रुतींनी अग्नी थंड आहे, म्हणून सांगितले तरी ते मी मानणार नाही, असे परखडपणे सांगणाऱ्या श्री शंकराचार्यांपुढे धर्मसंकट उभे राहिले. त्यांनी 'परकाया प्रवेश' करून गृहस्थाश्रमाचा अनुभव संपादन केला आणि प्रश्नाचे उत्तर दिले, अशी आख्यायिका आहे. नेमके उत्तर काय दिले हे कोणालाच माहीत नाही. अर्धवट माहितीच्या धुक्याधुक्यातून शंकराचार्य या व्यक्तिमत्त्वाविषयीमात्र प्रचंड आदर आणि काहीशी भक्ती

'वाक्यार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तम् वेदकोटिभिः
ब्रह्म सत्यम् जगन् मिथ्या जीवो ब्रह्मैव ना परः'

या गर्जनेची विस्तृत मांडणी करण्यासाठी बत्तीस वर्षांच्या वयात १५३

ग्रंथांचे कर्तृत्व. सारेच काही अद्‌भूत!

गेल्या वर्षी नर्मदेच्या आंदोलनाकरीता गुजरातमध्ये होतो. नर्मदा मातेच्या स्तवनाचे काव्य शोधत होतो. एकदम हाती पडले, 'नमामि देवी नर्मदे' कोणाची ही काव्यप्रतिभा? गौडपाद स्वामींच्या परंपरेत अमृतानुभवासाठी श्री शंकराचार्यांचे वास्तव होते. नर्मदा हा त्यांचा मोठा भक्तीचा विषय.

'दुरन्तपापतापहारि सर्वजन्तुशर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामिं देवी नर्मदे...'

ओळीओळीला नर्मदेच्या प्रवाहाच्या ध्वनिलहरींची आठवण यावी ही काव्यशक्ती कोणाची? तर, ती होती अद्वैतवाद आणि उपनिषदांच्या प्रसाराकरिता सर्वसंगपरित्याग केलेल्या एका बालब्रह्मचाऱ्याची.

'ॐ सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके
शरण्ये त्रयम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते..
सृर्ष्टिस्थिर्तिविनाशानां शक्तिभूते सनातनि
गुणाश्रये गुणमये नारायणि नमोऽस्तु ते...

धबधब्याच्या प्रवाहाप्रमाणे वाहणारी, नंतरच्या काळात फक्त संत रामदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांना साधलेली काव्यशक्ती सहाव्या शतकातल्या एका संन्याशाने दाखवली.

मागील आठवड्यात केरळ राज्यातील एर्नाकुलमजवळील केलाडी गावी जाण्याचा योग आला. केरळात केवळ वेगळी अशी गावे नाहीतच. सगळी गावे जवळजवळ एकमेकांना लागूनच वसलेली. त्यामुळे केलाडी गाव नेमके सुरू कोठे झाले आणि संपले कोठे, सांगणे कठीण आहे. केलाडी हे शंकराचार्यांचे जन्मगाव. वडील लहानपणी मरून गेलेले. विधवा आईने शंकराचार्यांचा सांभाळ केलेला. विद्याभ्यास झाल्यानंतर ऐन सोळाव्या वयात बाळ शंकर संन्यास घ्यायला निघाला. नवसासायासाने झालेल्या एकुलता मुलग्यास संन्यासाची परवानगी विधवा आईने हृदयावर कोणती शिळा ठेवून द्यावी? गावाला खेटून पूर्णा नदी वाहते. आता तिचे नाव पेरीयार ठेवले गेले आहे. म्हातारी आई दररोज नदीपर्यंत कष्टाने चालत जाते हे शंकरला पाहवले नाही. त्याने तळवा (केल) जमिनीवर ठेवून घोटा (अडी) फिरवला आणि र्साया नदीचा प्रवाह गावाशेजारी आणून ठेवला, म्हणून गावाचे नाव केलाडी. त्याच नदीत मायलेकरे पोहायला गेली. कोणी म्हणतात, बाळ शंकराने आईशी 'लडीवाळ छळ' केले, शंकर एकाएकी ओरडू लागला, 'मगरीने पाय पकडला, मला ओढून नेत आहे, आता

मी जगत नाही. आई, मरण्यापूर्वी मला संन्यास घेण्याची परवानगी दे' संन्यास म्हणजे गृहस्थाश्रमातील मरणच. सोळाव्या वर्षी बाळाला मृत्युयोग असल्याचे भविष्यवेत्त्याने सांगितले होते. संन्यास घेतला तर बाळ कदाचित् वाचेल अशा भावनेने आईने अनुमती दिली. शंकराने पटसंन्यास घेतला आणि मगरीने पाय सोडला. बाळ शंकर संन्यासी म्हणून नदीच्या प्रवाहातून बाहेर आला.

हा मगरीचा घाट लोक आजही दाखवतात. आता त्यात मगरी नाहीत. केलाडीच्या पूर्णेपासून संन्यासी शंकर निघाला, तो थेट मगरींनी भरलेल्या नर्मदा नदीच्या पात्राशेजारी, गौडपादस्वामींच्या शिष्यांच्या आश्रमात. हा एक योगायोगच.

मगरीच्या घाटाशेजारी आई आर्याम्बा यांचे लहानसे वृंदावन आहे. संन्यास घेतल्यावर श्री शंकराने, 'तुझ्या शेवटच्या घटिकांत मी तुझ्याजवळ असेन', असे आश्वासन दिले. आईचा मृत्यूजवळ आला हे त्यांना कसे कळले असेल शिवशंकरच जाणे! मृत्युसमयी आर्याम्बाच्या शेजारी श्री शंकराचार्य हजर होते, हे खरे! आई गेल्यावर अंत्यविधी तर करायला पाहिजे. गावातील नम्बुद्री ब्राह्मण तर महासनातनी, कर्मठ. त्यांचे म्हणणे, 'संन्याशाने कोणताच गृहस्थ विधी करता कामा नये; अगदी जननीच्या अंत्यविधीचाही नाही.' श्री शंकराचार्यांनी आपल्या बाहूंत आईचे कलेवर घेतले. फक्त दोन ब्राह्मण मदतीला आले. एकाने मस्तक सावरले, दुसऱ्याने पाय. अशी अंत्ययात्रा झाली. दहनाच्या जागी छोटेसे वृंदावन आहे. केलाडी गावात ब्राह्मणांची दोनच कुटुंबे टिकून राहिली, बाकीची सारी वंशनाश होऊन संपली, असे गावच्या सरपंचानेच सांगितले.

गावात आज रामकृष्ण परमहंसांचा मठ आहे. अद्वैत मत, उपनिषदे आणि योगाभ्यास यांसाठी पाठशाळा आहे. साम्यवाद्यांना शंकराचार्यांचा अतोनात तिरस्कार. त्यांचे राज्य चालू झाल्यापासून मठवासीयांना अनेक त्रास सोसावे लागले. ख्रिस्त धर्मीयांचाही गावात जागोजागी क्रूसाची प्रतिष्ठापना करण्याचा हव्यास चालू आहे.

शेजारीच कोचिन एर्नाकुलमचा नवा विमानतळ झाला आहे. त्याला शंकराचार्यांचे नाव द्यावे अशी सूचना करण्यात आली. पण, राष्ट्रपती के. आर. नारायणन्, तेही केरळचे सुपुत्र, त्यांनी ती नाकारली. शंकराचार्य आणि विमाने यांचा काय संबंध? असा त्यांनी प्रश्न विचारला, असे सांगतात. मगरघाटाच्या आसपासचा प्रदेश साफ करावा; शंकराचार्यांच्या आयुष्यातील एवढ्या महत्त्वाच्या प्रसंगाचे काही स्मरण होईल, असे एखादे शिल्प उभारले जावे अशी शंकरभक्तांची इच्छा आहे. अयोध्येतील राममंदिराकरिता देश उलटापालटा करू पाहणाऱ्या राज्यकर्त्यांना

अद्वैत मताच्या पताका दिगन्त गाजवणाऱ्या शंकराचार्यांच्या स्मारकाची काही पर्वाच वाटत नसावी.

यवतमाळच्या रावेरी गावी वनवासी सीता आली, लवकुशांना सीतामाईंनी तिथेच जन्म दिला. प्रसूतिश्रमाने क्लांत झालेल्या सीतामाईने गावकऱ्यांकडे पसाभर गव्हाची भीक मागितली, नकाराने व्याकूळ झालेल्या सीतामाईने गावकऱ्यांना शाप दिला. ही केरळातील केलाडीच्या कहाणीप्रमाणेच हृदय हेलावून टाकणारी महाराष्ट्रातील घटना.

श्रीमत् शंकराचार्य संन्यासी, स्वधर्माची पताका दिगंत नेणारे. त्यांच्याही नावे कोठे, ना चिरा, ना पणती आणि अयोद्धेची सम्राज्ञी, ज्याच्या मागोमाग चौदा वर्षे रानोमाळ फिरली त्या पतीने काढून लावल्यावर निराश्रित झालेली भूमिकन्या सीता, तिच्याही आरतीची काही व्यवस्था नाही. विश्वास बसणार नाही इतकी धीरोदात्त भव्य कथानके जेथे घडली, ती स्थाने आजही ओसाडवाणी पडली आहेत आणि भलत्याच कोणा एका देवळाचा अट्टहास चालू आहे. देशातील तरुणांपुढे आदर्श म्हणून नाहीत अशी तक्रार करण्याचा कोणाला काय अधिकार आहे?

*दि. २४/१/२००१*

■■

# गुजरात आपत्तीची जबाबदारी कोणावर?

३० सप्टेंबर १९९३, अनंत चतुर्दशीच्या नंतरचा दिवस होता. मी शेतकरी संघटनेच्या कामाच्या दौऱ्यावर बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे मुक्कामी होतो. पहाटे पहाटे वीज कडकडावी तसा आवाज बराच वेळ येत राहिला. जमीन हादरल्याची काही फारशी जाणीव झाली नाही; पण काहीतरी जगाविपरीत घडले याची जाणीव झाली. आसपास काही अपघात झालेला नाही; तेव्हा, हा दूरवर कोठेतरी झालेल्या भूकंपाचा परिणाम असावा हे जाणवले. बातम्या समजण्यासाठी आकाशवाणीकडे धाव घेतली. संथपणे नेहमीची भक्तिगीते चालू होती. फटफटीत उजाडल्यानंतर पहिल्या बातम्या लागल्या, त्यात लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावी भूकंपाच्या धक्क्याने तीस हजारांवर माणसे ठार झाली असावीत असा अंदाज वर्तवण्यात आला. दोनतीन तासांनंतर प्रसृत झालेल्या वार्तापत्रात मृतांचा आकडा तीस हजारांच्या वर जाईल अशी भीती व्यक्त करण्यात आली. किल्लारी, सास्तूर हा संघटनेच्या आंदोलनाचा महत्त्वाचा टापू. कोणत्याही कार्यकर्त्यांशी संपर्क साधणे शक्य नव्हते. लातूर या जिल्ह्याच्या ठिकाणच्या नेत्यांनी संध्याकाळपर्यंत निरोप दिला : सध्या भूकंपग्रस्त भागात ढिगारे उपसून त्यांतून प्रेते बाहेर काढण्याचे काम करण्याचा अनुभव आणि साधनं असलेल्या कार्यकर्त्यांचं प्रयोजन आहे. अन्यथा, हौशानवशांची इतकी भीड उसळली आहे, की पोलिसांना गर्दी आवरणे हेच मोठे काम होऊन बसले आहे. तीन दिवसांनंतर थोरमोठे पुढारी भेट देऊन गेले. तोपर्यंत मृतांचा आकडा एकदम तीस हजारांवरून दहा हजारांवर उतरला होता.

गेल्या आठवड्यातील गोष्ट. २६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन. मी सध्या दिल्लीतील राष्ट्रपती भवनासमोरील राजपथाच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे इंडिया गेटच्या बाजूला राहतो. गेले दोन महिने मानवंदनेच्या कवायतींचा सराव करणाऱ्या

फलटणी आणि त्यांचे बँड यांच्या आवाजाने पहाटे पहाटे जाग येत होती. सगळ्या दिल्लीवर पोलिसांचा, निमलष्करी दलांचा तळ पडला होता. राजपथाच्या दुसऱ्या टोकाकडील कृषिभवनाच्या कार्यालयात जाण्यासाठी निम्म्या दिल्लीला फेरी घालून जावे लागत होते. जानेवारी महिन्यात सरकारी यंत्रणा पूर्णवेळ प्रजासत्ताक दिनाच्या कवायतींच्या कामात मश्गुल असते.

रात्री आठच्या सुमारास संरक्षण मंत्रालयाकडून विशेष मोटारसायकलस्वार दूत राष्ट्रपतींच्या मानवंदनेची निवेदने घेऊन आला; सोबत, गाडीसाठी पास इ. इ. यंदा काही जुने सहकारी दिल्लीला आले होते; त्यांना मानवंदना पाहण्याची उत्सुकता होती. त्यांची जाण्याची व्यवस्था करून मी घरी राहण्याचे ठरवले. कवायती, क्रिकेट आणि टेनिसचे सामने प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहण्यापेक्षा दूरदर्शनवर अधिक व्यवस्थित पाहता येतात, हा सगळ्यांचा अनुभव आहे. कवायत सुरू होण्याआधी काही मिनिटे दूरदर्शनसमोर जाऊन बसलो. गणतंत्र दिवशी रतिबाने ऐकायची मनोजकुमार देशप्रेम सळसळणाऱ्या गीतांच्या ध्वनिचित्रफिती चालू होत्या. बसल्या बसल्या खालची खुर्ची चांगली सरकल्याचा भास झाला. दोन वर्षांपूर्वीच्या आजारपणापासून काही वेगळे घडले, की पहिला प्रश्न मनात उभा राहतो तो काही नवा झटका येतो आहे काय? तसे काही नाही याची खात्री करून घेतली आणि पुन्हा दुसऱ्यांदा आजूबाजूच्या सगळ्या गोष्टी सेकंदभर हलल्याचा भास झाला. अर्ध्याएक मिनिटाने तिसऱ्यांदा पुन्हा धक्का जाणवला.

किल्लारी भूकंपाच्या वेळी ३०० कि.मी. अंतरावर प्रदीर्घ कडकडाट जाणवला होता. या वेळी फक्त तीन धक्के जाणवले, आवाज काहीच आला नव्हता. तरीपण काही विपरीत घडले आहे याची मनाला खात्री पटली. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या पाहुण्यांना हाका मारून विचारले, भूकंप जाणवला काय? कोणालाच काही जाणवले नाही. मी उठून कामाला लागलो. मग मित्र घरच्या कार्यालयाच्या खोलीत धावत आले आणि मोठ्या गडबडीने सांगू लागले, 'तुमचे म्हणणे खरे होते; भुजमध्ये भूकंप झाला आहे. शंभरएक माणसे मेल्याची बातमी दूरदर्शनवर सांगत आहेत.'

आता बातम्या ऐकण्याचे मुख्य साधन आकाशवाणी नाही, दूरदर्शन झाले आहे. दर अर्ध्या तासाने वार्तापत्रे असतात. आकाशवाणीसारखे तासन्‌तास खोळंबून बसावे लागत नाही. भारताच्या अधिकृत सरकारी दूरदर्शनवर इमाने इतबारे राष्ट्रपतींच्या मानवंदनेचा आणि कवायतींचा कार्यक्रम मोठ्या जल्लोषाने दाखवला

जात होता. खासगी वाहिन्यांवर मृतांचा आकडा शंभरहून दोनशेवर पोचला. किल्लारी भागात प्रलय माजला तो मुख्यतः अगदी छोट्या टापूत. गुजरातमधील भूकंप कच्छच्या एका टोकापासून सौराष्ट्र, उत्तर गुजरात, दक्षिण गुजरातपर्यंत, थेट महाराष्ट्राच्या हद्दीपर्यंत हादरवणारा. त्यामुळे कोठे कोठे काय झाले हे कळायला काही दिवस गेले. दुसरे दिवशी सकाळपर्यंत अहमदाबाद शहरातील अनेक गगनचुंबी इमारती कोसळल्याच्या बातम्या आल्या. २६ जानेवारीच्या रात्री राजधानीतील नियंत्रण कक्षात मी जाऊन आलो. खात्रीची माहिती कुणालाच नव्हती. माझ्या हाती जो कागद दिला त्यावर मृतांचा आकडा दीडशेच्या आसपास दाखवला होता.

२८ जानेवारीला पहिल्यांदा आकडा १० हजारांच्या वर जाईल अशी वाक्ये ऐकू येऊ लागली. २९ जानेवारीला मुख्यमंत्री केशुभाई पटेल यांनी मृतांचा आकडा ३० हजारांवर असावा असा अंदाज व्यक्त केला. शोधकार्य जसजसे पुढे जाईल तसतसे मृतांचे प्रत्यक्ष आकडे आणि अंदाज बदलतच राहतील.

इंटरनेटच्या एका अड्ड्यावर एक वेगळीच चर्चा चालू होती. १९३४ मध्ये बिहारमध्ये भूकंप झाला. तीस हजारांवर माणसे दगावली, सारा देश सुन्न झाला. महात्मा गांधींनी म्हटले, 'हा भूकंप अस्पृश्यतेच्या पापाचे प्रायश्चित्त आहे.' देशापुढे कोणताही राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्न उभा राहिला, की प्रश्न विचारला जातो, 'आज गांधीजी असते तर ते काय म्हणाले असते?' गुजरातमधील भूकंपाचा हाहाःकार महात्माजींचा आत्मा अंतराळातून कोठून पाहत असेल तर 'हे कोण्या पापाचे प्रायश्चित्त आहे', असे म्हणत असेल काय?

गुजरात हा प्राचीन काळापासून भाविकांचा आणि भक्तीचा प्रदेश आहे. अलीकडच्या काळात तर गुजरात, सौराष्ट्रभर बाबामहाराजांचे पेव फुटले आहे. आठवलेशास्त्रींच्या स्वाध्यायापासून ते दूरदर्शनच्या चॅनेलवर तासन्‌तास डोळ्यात मोठी आध्यात्मिकता आणून 'नारायणो हरि'चा जप करणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे साधुसंत गुजरातमध्ये माजले आहेत. स्वामी नारायण पंथाने तर साऱ्या राज्यभर आपले वैभवशाली संस्थान पसरवले आहे. शाळा, वसतिगृहे, दवाखाने, इस्पितळे आणि भजन-कीर्तन-प्रवचनांचे कार्यक्रम यांची मोठी गर्दी उसळली आहे. गुजराती राज्यकर्ते नेतेही स्वामींना नमन केल्याखेरीज पुढे चालू शकत नाहीत. या साऱ्या गजबजाटात भक्तिरसाचे काहीच स्थान नाही. रोमन कॅथॉलिक चर्चच्या अधिपती पोपमहाराजांचे एक संस्थान आहे. 'प्रचंड उलाढालींचे व्यवहार तेथे चालतात. देवाधर्माचा तेथे काहीच संबंध नाही', असे बिगर कॅथॉलिक ख्रिश्चन म्हणतात.

तशीच स्थिती या धनदांडग्या धर्मसंस्थानांची आहे.

गांधीजींचा गर्वी गुजरात आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सगळयांत मोठा पुरस्कर्ता बनला, सरकारी नोकरांना संघात सहभाग घेण्याची अनुमती पाहिजे असा आग्रह धरू लागला, यात या साऱ्या धर्मसत्ताक संस्थानांची मोठी कामगिरी आहे. या साऱ्या प्रकारातील दांभिकता आणि ढोंग उघड आहे, खासगीत गुजराती हे सारे मान्य करतात आणि हजारांच्या संख्येने प्रवचनांना जाऊन बसतात व लाखोंच्या रकमा महाराजांच्या तिजोऱ्यांत नेऊन ओततात. स्वामी नारायण महाराजांना स्त्रीदर्शनाचे वावडे असते. नर्मदा आंदोलनाच्या वेळी एक दुय्यम स्वामी भेटले, प्रमुख नाही. गुजरातमधील संघटनेच्या कार्यकर्त्या इलाबेन माझ्याबरोबर होत्या. त्यांच्या स्त्रीत्वाचा दाह महाराजांना जाणवला असावा. त्यांच्या एका तिय्यम शिष्याने माझ्याजवळ येऊन खांद्याला धरून महाराज आणि इलाबेन यांच्यामध्ये माझा पडदा उभा केला. इतके सारे महाराजांचे कडकडीत वैराग्य आणि ब्रह्मचर्य; पण त्यांचे प्रवचनाचे मंडप भरतात त्यांत निम्म्याहून अधिक उपस्थिती स्त्रीवर्गाचीच असते.

नर्मदेच्या जनआंदोलनाच्या वेळी, हजारो लोकांच्या राहण्याजेवणाची व्यवस्था करण्याचा प्रश्न उभा राहिला होता. स्वामी नारायण संस्थानने आपणहून मोठी जबाबदारी उचलायचे कबूल केले. नंतर, गुजरात सरकार आंदोलनाविरूद्ध उलटले तसे हे सकाळसंध्याकाळ परमेश्वराशी गप्पाटप्पा मारणारे धर्ममार्तंड आंदोलनापासून दूर झाले. नर्मदा धरणाच्या जनआंदोलनाच्या वेळी गांधींजी धरणाच्या बाजूला उभे राहिले असते की मेधा पाटकरना आपली वारसदार ठरवून विरोधात उभे राहिले असते, याबाबत गांधीवाद्यांचही नक्की मत ठरलेच नाही.

आजच्या या भूकंपाच्या आपत्तीबाबत अंतराळातील महात्माजींचा आत्मा १९३४च्याच पोटतिडकीने, 'हे सारे गुजरातेत पसरलेल्या धार्मिक दांभिकतेचे प्रायश्चित्त आहे,' असे म्हणत असेल काय? मला तसे वाटत नाही. गांधीजी मोठे व्यावहारिक होते. सेनानीच्या कुशलतेने परिस्थितीनुसार ते आपली भूमिका आणि दिशा बदलीत. १९३४ मध्ये बिहारच्या भूकंपानंतर, गांधीजींच्या अतिरेकी उद्‌गारांनंतर गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी शांतपणे एका वाक्याचे निवेदन केले, की कोणत्याही भौतिक आपत्तीचे खरेखुरे कारण आसपासच्या भौतिक परिस्थितीतच असते. गांधीजी काय म्हणाले असते हा मुद्दा अलाहिदा; पण गांधीजींचे मान्यवर शिष्य आज गुजरातभर पसरले आहेत. त्यांच्यापैकी कुणीही 'गुजरातेतील भूकंप

कोण्या पापाचे प्रायश्चित्त असल्याचा' सूर काढलेला नाही. विपत्तीच्या भौतिक परिस्थितीची मीमांसा मोठ्या जाणकाराचा आव आणून सारे करत आहेत. गांधी संस्थानाचा तात्त्विक दिवाळखोरपणा भूकंपाच्या धक्क्याने अगदी उघड्यावर पडला आहे.

*दि. ३१/१/२००१*

■■

# गुजरात मलब्यातून उठणार नक्की, सरकारने मोकळीक दिली तर

गुजरातमधील भूकंपाने सारा देश हादरून गेला आहे. दीर्घ काळ चालणाऱ्या लढाईत किंवा दुष्काळात हजारोंनी माणसे मृत्यू पावतात, जखमी होतात; पण, एका दिवशी एका क्षणापर्यंत नित्य नेमाने जीवनव्यवहार चालविणारी माणसे पुढच्या क्षणातच मरून जातात ही कल्पनाच मोठी भयानक आहे. या प्रसंगी आपणही काही केले पाहिजे अशी भावना गुजरातेतील आणि गुजरातबाहेरील सर्व नागरिकांच्या मनात तेवत आहे. सरकार अधिकृत घोषणा करो, ना करो; ही राष्ट्रीय आपत्ती आहे, केवळ गुजरात, भुज, अहमदाबाद यांच्यावर कोसळलेले संकट नाही असे सर्वांनाच वाटते. चीनचे आक्रमण झाले त्या वेळी जसे उत्स्फूर्तपणे सर्व नागरिक मदतीला तयार झाले तसेच याही वेळी मदतीसाठी लागणारी सर्व सामग्री, कपडे, पांघरुणे, खाद्यपदार्थ, पाणी, दूध, औषधे यांचा महापूर गुजरातकडे लोटत आहे. मृत्यूचे असे आकांडतांडव भारतीयांनी पूर्वी कधी पाहिलेले नाही. नैसर्गिक आपत्तीत मदतीची व्यवस्था करण्याची जबाबदारी शेती मंत्रालयाची आहे. या मंत्रालयातील नियंत्रण कक्षाचे एक अधिकारी भूकंपाने उद्ध्वस्त प्रदेशाला भेट देऊन आले. 'मला जन्मात पुन्हा कधी शांत झोप येईल असे वाटत नाही,' अशी त्यांची प्रतिक्रिया होती.

पंतप्रधान झाले तरी शेवटी माणूसच आहेत. एक सारे राज्य असे उद्ध्वस्त झालेले डोळ्यांनी पाहिल्यावर हातचे काही राखून न ठेवता शक्य असेल ते झालेच पाहिजे असे, कोणाही सहृदय माणसाप्रमाणे, त्यांनाही वाटले. स्वतःच्या निधीतून ५०० कोटी रुपयांची रक्कम त्यांनी मदत म्हणून जाहीर करून टाकली. आणि वर, 'पुनर्वसन व पुनर्रचना यांसाठी प्रचंड साधनसामग्री उभी करावी लागेल, त्याच्या खर्चाचा बोजा सर्व नागरिकांना पेलावा लागेल; तस्मात्, येत्या अंदाजपत्रकात यापोटी करवाढ करावी लागेल, त्यासाठी देशाने तयार राहावे',

असा इशाराही त्यांनी देऊन टाकला. पंतप्रधानांच्या गुजरात भेटीच्या आदल्या दिवशीच वित्तमंत्री यशवंत सिन्हा यांनी, काही दिवसांतच सादर होणाऱ्या अंदाजपत्रकात गुजरातमधील खर्चासाठी करवाढ करण्याची आवश्यकता नाही' असा पत्रकारांना निर्वाळा दिला होता. पंतप्रधानांच्या घोषणेनंतर दुसऱ्याच दिवशी, रेल्वेच्या अंदाजपत्रकातही भरकस दरवाढ होण्याची शक्यता असल्याचे भाकीत काही पत्रकारांनी वर्तविले. ममतादिदींनी त्याचा लगेच इन्कार केला. 'पंतप्रधानांना अशी घोषणा करण्याचा अधिकार आहे; पण तरी काही मोठी दरवाढ होण्याची शक्यता नाही,' असे त्यांनी निक्षून सांगितले.

२ फेब्रुवारीच्या वर्तमानपत्रांत ठळक मथळ्याच्या बातम्या आहेत, की सरकारी निर्णय झाला आहे; आयकरावर नवी पट्टी लावून गुजरातवरील खर्चासाठी १३००० कोटी रुपये कररूपाने गोळा करण्याचा निर्णय झाला आहे. २६ जानेवारीच्या भूकंपानंतर ही सगळ्यात मोठी दुर्दैवी घटना आहे. पंतप्रधानांनी नव्या कर्जाच्या बोजासाठी देशाने कंबर कसण्याची आवश्यकता असल्याचे जाहीर केले आणि मुंबई शेअर बाजाराला हादरा बसला. दोन दिवस लागोपाठ शेअर बाजारातील किमती उतरत गेल्या.

गुजरातमधील पुनर्बांधणीच्या एकूण खर्चाचा अंदाज २५००० कोटी रुपयांच्या वर आहे. एवढे प्रचंड पुनर्बांधणीचे काम सरकारी यंत्रणेला पेलणारे नाही. सरकारने पुनर्वसनाच्या कामातला आपला हिस्सा १३०० ते १५०० कोटी रुपयांइतकाच मर्यादित ठेवला तरीदेखील पुनर्वसनाच्या कामात सरकारी हस्तक्षेप हीच एक मोठी राष्ट्रीय आपत्ती ठरेल.

सौराष्ट्र, कच्छ हा सदा आपद्ग्रस्त राहिलेला भूप्रदेश आहे. पूर्वी कधीकाळी श्रीकृष्णाची द्वारका समुद्रात खचली आणि भूकंपाने सौराष्ट्राची भौगोलिक रचना उलट्या बशीप्रमाणे झाली. त्यामुळे सारा प्रदेश पाण्याच्या दुर्भिक्ष्याने ग्रासला गेला. वर्षानुवर्षे पावसाचा थेंबसुद्धा न दिसणाऱ्या या प्रदेशात नर्मदेचे पाणी आले तर भूगर्भातील पाणी वाढण्याची एक शक्यता होती; झारीतील शुक्राचार्यांनी तीही शक्यता संपविली.

पिढ्यान्‌पिढ्या सौराष्ट्र, कच्छमधील माणसे निर्वासित होऊन बाहेर पडत आहेत. निर्वासित समाज महामूर कर्तबगारी गाजवितात असा इतिहास आहे. पाण्याच्या अभावाने निर्वासित झालेली येथली मंडळी अहमदाबाद, सूरतसारख्या जवळच्या प्रदेशात, मुंबई, कोलकत्ता या शहरांत एवढेच नव्हे तर, जगभर पसरली; व्यापारउदीम करून धनाढ्य झाली. तरीही त्या सर्वांच्या मनात आपल्या

मूळच्या प्रदेशाविषयी प्रचंड प्रेम आणि निष्ठा आहे. गेल्या वर्षी सौराष्ट्रावर दुष्काळाचे संकट आले. गावोगावी पाणलोट क्षेत्राचे तंत्र वापरून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी हजारो निर्वासित मायदेशी परतले आणि त्यांनी प्रचंड संख्येने योजना राबविल्या. इतक्या मोठ्या प्रमाणावर भूगर्भातील पाणी वाढविण्याच्या योजना राबविण्यात आल्या, की त्यामुळेच हा भूकंप घडला असे कोणी शहाणा म्हणू न लागो म्हणजे झाले!

भूकंपाच्या धक्क्यानंतर आठपंधरा दिवस दगडामातीच्या ढिगाऱ्यांतून माणसे किंवा प्रेते काढणे आणि जगूनवाचून राहिलेल्यांना अन्न, वस्त्र, औषधे यांचा पुरवठा करणे एवढेच महत्त्वाचे काम असते. ढिगारे उपसण्याचे काम मोठे जिकिरीचे आणि कौशल्याचे आहे. त्यासाठी विशेष साधनसामग्रीही लागते. हे काम अग्निशामक दल, पोलिस किंवा लष्कर आणि लष्करी संघटना यांच्याच आटोक्यातील आहे, ते त्यानांच करू दिले पाहिजे. या पहिल्या काळात ऐऱ्यागैऱ्यांनी आणि हौशा-नवशा-गवशा संघटनांनी आपद्ग्रस्त भागात फारशी लुडबूड करायला जाऊ नये हे योग्य.

पण गुजरातमधून येणाऱ्या बातम्यांवरून आपद्ग्रस्तांच्या मदतीचे काम खासगी संघटनाच कसोशीने करीत आहेत, सरकारी यंत्रणा वेंधळेपणाने काम करते आहे असे दिसते. यापुढील कामही प्रशासनामार्फत चांगले होईल अशी आशा व्यर्थ आहे. भूकंपाच्या धक्क्यातून सावरून जबाबदार नेत्यांनी आता शांतपणे विचार करून गुजरातच्या पुनर्बांधणीची व्यूहरचना करायला पाहिजे.

बांगलादेशच्या युद्धाच्या वेळी निर्वासितांच्या लोंढ्याची व्यवस्था करण्यासाठी इंदिरा गांधींनी टपाल हशिलापासून ते आयकर, मालमत्ता करापर्यंत करवाढ केली, तेव्हापासून चलनवाढीचे भूत भारतीय अर्थव्यवस्थेच्या बोकांडी बसलेले आहे ते अजूनही उतरलेले नाही. करवसुली करून प्रशासनामर्फत गुजरातची पुनर्बांधणी होणे नाही, पाचदहा टक्के करू गेले तरी त्यामुळे साऱ्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल.

गुजरात म्हणजे काही बिहार, बंगाल नाही; हा उद्योजकांचा प्रदेश आहे. काही आठवड्यांतच सौराष्ट्र आणि कच्छमधील मंडळी नव्या उमेदीने आपापल्या पायावर उभे राहण्याच्या प्रयत्नाला लागली. सरकार काही मदत देते काय असे हताशपणे आणि आशाळभूतपणे पाहणारी ही मंडळी नाही. राखेतून उड्डाण करणाऱ्या फिनिक्स् पक्ष्याप्रमाणे या मलब्यातून वर उठण्यासाठी जे जे काही आवश्यक आहे ते सर्व या मंडळींकडे आहे. मुंबई कोलकत्तासारख्या शहरांत

निर्वासित झालेले त्यांचे गावबांधव एकेका गावाच्या, तालुक्याच्या पुनर्बांधणीसाठी धावून येऊ लागले आहेत. परदेशांत निर्वासित होऊन त्यांच्याहीपेक्षा सधन झालेले त्यांचे अनिवासी भारतीय बांधव लवकरच, सरकारचा करवसुलीचा निर्णय पक्का व्हायच्या आधी येथे येऊन पोहोचलेले असतील आणि मलब्यात गाडल्या गेलेल्या आपल्या मायभूमीला नवीन रूपात साकार करण्याच्या कामाला मोठ्या आत्मीयतेने, निष्ठेने आणि भक्तिभावाने लागलेले असतील. नवीन बांधणी करताना ती अगदी सर्वोत्कृष्ट असावी असा त्यांचा आग्रह असणार आहे. त्यांच्या या उपक्रमाने देशाची अर्थव्यवस्था बिघडणार नाही; उलट, मजबूत होणार आहे. परकीय चलन देशात येणार आहे; एवढेच नव्हे तर, सिमेंट, लोखंड इत्यादी जुन्या उद्योगधंद्यांची मागणी वाढल्याने त्यांचीही भरभराट होण्याची शक्यता आहे.

थोड्याच वर्षांत एक नवे आधुनिक सौराष्ट्र आणि कच्छ उभे राहणार आहे. देशातील सर्व राज्यांना गिरविण्याचा कित्ता वाटावा असा नवा सौराष्ट्र आणि कच्छ उदयास येणार आहे.

एका काळी लंडन शहर गल्ल्याबोळ आणि जुनाट इमारतींनी गजबजलेले होते. रोगराई वाढत होती. इतिहासप्रसिद्ध अग्निप्रलयाने लंडन जळून खाक झाले आणि त्या राखेतून आजच्या, वास्तुशास्त्रात आदर्श मानल्या जाणाऱ्या लंडनचा उदय झाला.

सारा गुजरातही अशीच झेप घेण्याची कुवत राखून आहे. कदाचित्, काही वर्षांनी भूकंप ही इष्टापत्ती वाटू लागेल आणि 'भूकंपापूर्वी सारे कसे गचाळ होते आणि आता नवे कसे सुंदर उभे राहिले आहे,' अशी भाषा सुरू होईल. गुजराती समाजाच्या कर्तबगारीवर पुनर्बांधणीचा प्रश्न सोपविण्यात आला तर काम झपाट्याने होईल, चांगले होईल; देशावर बोजा न पडता होईल. वर, अर्थव्यवस्थेची भरभराटही साधेल. याउलट, प्रशासनाने सारे आपल्या हाती घ्यायचे म्हटले तर अर्थव्यवस्था कमजोर होईल, पुनर्बांधणीचे कामही होणार नाही.

फिनिक्स् पक्ष्याप्रमाणे राखेतून उठून उड्डाण करण्याचे सामर्थ्य गुजरातमध्ये आहे. शासनाने दुराग्रह केला नाही, तर गुजरात यापुढे दगडामातीच्या मलब्यातून उठून नवे उड्डाण घेऊ शकतो; सरकारने मोकळीक दिली तर!

*दि. १४/२/२००१*

■■

# ए. डी. डाचा

आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांचा व्यवसाय मोठा भरभराटीला येत आहे. अलीकडेच, अमेरिकेतील अशा एका तज्ज्ञाने सुटी घालविण्याकरिता डोंगरात एक 'झोपडी' बांधली. या झोपडीत झोपायच्या सहा खोल्या आहेत. सर्व अत्याधुनिक सुखसोयींनी सुसज्ज अशी ही झोपडी बांधण्याचा खर्च कोट्यवधी रुपये आहे; झोपडी कसली, महालच तो. आपल्याकडे निवृत्त झालेले सरकारी नोकर पुण्यासारख्या ठिकाणी जाऊन घर बांधतात आणि त्याला 'श्रमसाफल्य' किंवा 'साईकृपा' अशा प्रकारची नावे ठेवून आपली भावना किंवा कृतज्ञता व्यक्त करतात. अमेरिकेतील त्या कायदातज्ज्ञाने त्याच्या झोपडीमहालाचे नाव ठेवले आहे 'ए.डी. डाचा (A.D. Dacha)'.

डाचा शब्द रशियन आहे. समाजवादी रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे मोठे पदाधिकारी किंवा शासनातील सत्ताधारी आठवडाभर देशाचे वाटोळे करण्याचे काम करून आलेला थकवा घालविण्याकरिता, सुटी मौजमजेत घालविण्याकरिता कोठे डोंगरात, जलाशयाच्या काठी घरे बांधीत. सर्वसामान्य समाजवादी नागरिक सरकारी बांधकामाच्या एकदोन खोल्यांच्या खुराड्यात सारे आयुष्य काढी, त्याच्या स्वप्नातही असे सुटीचे घर बांधणे शक्य नव्हते. पण, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आणि सत्ताधाऱ्यांना कशाचीच काही कमतरता नाही. त्यांनी स्वतःकरिता बांधून घेतलेल्या मौजमजेच्या घरांना 'डाचा (Dacha)' म्हणतात. आता एकामागून एक 'डाचा' उद्ध्वस्त होत आहेत. त्यांतून एके काळी मौजमजा मारणाऱ्या हुकूमशहांच्या विकृत रसिकतेचे पुरावे बाहेर पडत आहेत.

एका अमेरिकन वकिलाने 'डाचा' शब्द वापरावा यात एक मग्रुरीचे प्रतीक आहे. अमेरिकेसारख्या खुल्या व्यवस्थेतही अफाट पैसा मिळविला, की समाजवादी रशियातील सत्ताधाऱ्यांप्रमाणेच अनिर्बंध जगता येते. तशा पदी आपण पोहोचलो

आहोत हे जगाला ओरडून सांगण्याची 'डाचा'मालकाची इच्छा स्पष्ट आहे.

'डाचा' शब्दातील मग्रुरीपेक्षाही त्याच्या आधीची उपपदे 'ए.डी.' अधिक महत्त्वाची आहेत. ए.डी. म्हणजे 'ॲण्टी डंपिंग (Anti-Dumping)' काही प्रबल आर्थिक सत्ता दुसऱ्या देशांतील बाजारपेठा काबीज करण्यासाठी एक कारवाई करतात. आपल्या देशात तयार होणारा माल ते दुसऱ्या देशांत, तात्पुरता तोटा का होईना तो सोसून, स्वस्त किमतीत नेऊन ओततात. बळी देशांतील उत्पादकांचे दिवाळे वाजले, की मग सगळी बाजारपेठ ताब्यात घेऊन, अवाच्या सवा किंमती लावून मनमानी करता येईल अशा हिशेबाने ही कारवाई केली जाते. अशा कारवाईला इंग्रजीत डंपिंग (Dumping) म्हणतात.

गॅट (GATT) आणि डब्ल्यूटीओ (WTO) हे शब्द आता कोणालाही अपरिचित राहिलेले नाहीत. डंपिंगला आळा बसण्याकरिता १९४७ सालच्या गॅट करारातील ६व्या कलमात काही तरतुदी आहेत आणि जागतिक व्यापार संस्था (WTO) करारातही या संबंधी तपशीलवार प्रावधाने आहेत. ज्या देशावर असे आर्थिक आक्रमण होत असेल तो त्याबद्दल तक्रार करू शकतो; त्याच्या तक्रारीची सुनावणी होऊ शकते. तक्रार रास्त आहे असा निर्णय झाला तर आक्रमक देशाला दंड होऊ शकतो; तक्रार करणाऱ्या राष्ट्राला भरपाई मिळू शकते, एवढेच नव्हे तर, आक्रमण थोपविण्यासाठी आक्रमक देशाच्या मालावर प्रतिबंधक जकात लावण्याचा पूर्ण अधिकारही मिळू शकतो.

कायदा झाला म्हणजे कायदा मोडणारे नाहीसे होतात असे थोडेच आहे? जागतिक व्यापार संस्थेच्या वांधा समितीकडे डंपिंगविषयक अनेक तक्रारी येतात. उभयपक्षी कोट्यवधी रुपयांची बाब असल्याने दोन्ही बाजू हिरीरीने लढतात. काही श्रीमंत राष्ट्रे सोडल्यास, व्यापार क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कायद्याची जाणकार तज्ज्ञ मंडळी फार थोडी. वांधा समितीपुढे जायचे म्हणजे बड्या देशातील कोण्या वकीलाच्या पुढेच जाऊन बसावे लागते, त्याची मोठी मिनतवारी करायला लागते. वकिलसाहेबांच्या कामांच्या व्यापातून त्यांनी वकीलपत्र घ्यायचे मान्य केले तरी एका एका सुनावणीची फी लाखो डॉलर्स्‌मध्ये मोजावी लागते. दिल्लीमधील सर्वोच्च न्यायालयातील वकील जी बिदागी आकारतात ती पाहता आंतरराष्ट्रीय वकिलांच्या बिदागीचे आकडे आश्चर्यजनक वाटणार नाहीत. या वकिलांचा धंदा जोरदार चालला आहे. जागतिक व्यापार संस्थेच्या प्रकृणातून गरीब देशांचे भले व्हायचे तेव्हा होवो, जागतिक व्यापार वाढायचा तेव्हा वाढो, रोजगाराला बरकत यायची तेव्हा येवो, इतर कोणाचे काही झाले, नाही झाले तरी अगदी

पहिल्या मुहूर्तालाच आंतरराष्ट्रीय कायदातज्ज्ञांचे नशीब फळफळले आहे. 'ए.डी. डाचा' चे मालक त्यांतील फक्त एक.

जे काही घडते आहे त्याला आपल्या देशाच्या इतिहासात एक उदाहरण आहे. इंग्रजांचे राज्य आले आणि त्यांनी देशातील पूर्वापार चालत आलेली 'गावची जमीन, पंचायतीची मालकी, गावाचे कुरण' ही व्यवस्था मोडून गावकीमध्ये होणाऱ्या जुलुमजबरदस्तीला आळा घालण्याचे ठरविले. जमिनीची मालकी सरकारकडे घेतली, पट्टे खासगी नावांनी केले आणि जागोजागी सोयीप्रमाणे जमीनदारही नेमले. खासगी मालकीची ही संकल्पनाच अनोळखी असलेल्या भारतासारख्या देशात मोठा हलकल्लोळ उडाला. केरळातील मोपले सरळ सरळ बंड करून उठले. जिल्ह्यांच्या आणि तालुक्यांच्या कोर्टांतही, जमिनीच्या पट्ट्यावर आपले नाव लागावे म्हणून लाखोंनी कैफियती दाखल झाल्या. जमीनपट्टी भरता न आल्यामुळे सावकारांनी, जमीनदारांनी आणि सरकारने वहिवाटदारांच्या विरुद्ध अनेक खटले लावले. गावोगावच्या वकिलांचे भाग्य फळफळले. महात्मा जोतीबा फुले यांनी वर्णन केलेली परिस्थिती तालुक्यातालुक्यात झाली. 'वादीच्या वकीलाने शेतकऱ्याला न समजणाऱ्या भाषेत कैफियत द्यावी, प्रतिवादीच्या वकीलाने तितक्याच बोजड इंग्रजीत त्याला उत्तर द्यावे; आपल्या नशिबाचा काय फैसला चालला आहे याची गरीब कुणब्याला पुसटशीही कल्पना येऊ नये. खटल्याच्या शेवटी वकिलाने 'तुमची जमीन गेली, पाटील,' असे सांगितले, की तोंडात माती घालीत, आक्रंदत मुलाबाळांत परतायचे' हा प्रकार सर्रास घडू लागला. वकिलांचे फावले. वकिलीसारखा उद्योग नाही अशी स्थिती झाली. मोठ्या घरांतील मुलेसुद्धा शिकून शिकून मामलेदार वकील आणि त्याहून उंच उडी असली तर बॅरिस्टर होण्याची स्वप्ने पाहू लागली. प्रत्यक्षात पॅरिसहून कोणी कपडे धुवून आणीत असेल ही शक्यता नाही; पण तशी वदंता पसरण्याइतकी श्रीमंती वकिलांच्या घरी पाणी भरू लागली; 'ए.डी. डाचा' लाही लाजवितील अशी 'आनंदभवने' देशभर उभी राहू लागली.

जागतिक पातळीवर व्यापार खुला करण्याच्या कार्यक्रमात आज 'आनंदभवन' युग सुरू झाले आहे. नियम किंवा कायदे केले, की 'वांधे' उभे राहणारच. ते निस्तरण्याची काही यंत्रणा पाहिजे, त्या यंत्रणेतील समर्थांची 'दाही बोटे तुपात' असणार; परंतु जमीनसुधारणा करण्याकरिता इंग्रजांनी जी आडदांड पद्धत वापरली त्यात अडाणी शेतकरी भरडून निघावा आणि उच्चभ्रू वर्गाचे भले व्हावे हे अपरिहार्य होते. इंग्रजी राज्यकर्त्यांना या परिणामांची कल्पना आलीच नसावी हे

कसे शक्य आहे? किंबहुना भारतात ‘स्वामीनिष्ठां’चा एक समाज तयार करण्याचा त्यांचा हेतुपूर्वक प्रयत्न असण्याची शक्यता नाकारावी कशी?

जागतिक व्यापार संस्थेत आधीच एक घोडचूक होते आहे. एका देशाने दुसऱ्या देशावर आर्थिक हल्ला करावा हे चूक आहे. सुसंस्कृत समाजात अशा कारवाईला स्थान नाही हे उघड आहे. अशा आक्रमणाचा बंदोबस्त करण्याचे नियम सगळ्यांना समजतील असे सोपे सुटसुटीत असते तर निदान वकीलवर्गाचा माफिया होण्याचे टळू शकले असते.

डंपिंगबद्दल तक्रार करणाऱ्या देशाला आपली बाजू मांडण्यासाठी प्रचंड माहिती आणि आकडेवारी गोळा करावी लागते. आक्रमक देशाला संबंधित मालाच्या खुल्या बाजारपेठेतील सर्वसाधारण किंमती काय आहेत हे शोधावे लागते, किमतींविषयी वाद झाला तर त्या मालाचा उत्पादनखर्च काय आहे याचाही अभ्यास करावा लागतो. सर्वसाधारण किमती म्हणजे काय आणि उत्पादनखर्च कसा काढायचा या प्रश्नांवर आता नियम आणि जुने निवाडे यांचे जंगल उभे राहिले आहे. वादी देशांतही परिस्थिती सोपी नाही. दुसऱ्या देशाच्या आक्रमणामुळे आपले नुकसान होते आहे हे लक्षात आले, की कोणाही उत्पादकाने उठून कैफियत मांडावी, इतके हे सोपे नाही त्या मालाच्या उत्पादकांपैकी निदान चौथा हिस्सा उत्पादकांनी त्यासाठी एकत्र आले पाहिजे, वादी उत्पादकांचे उत्पादन देशाच्या बाजारपेठेत निदान निम्मे असले पाहिजे, आक्रमक देशाच्या घूसखोरीचा माल देशी बाजारपेठेत तीन टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये, तीन टक्क्यांपेक्षा कमी हिस्सा असलेले एकापेक्षा अधिक देश असले तर त्यांच्या हिश्शांची बेरीज सात टक्क्यांपेक्षा जास्त असू नये इ. इ. असे गुंतागुंतीचे आणि क्लिष्ट नियम केले की वकीलांचे फावणारच. गंमत अशी, की जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटी कृण्यासाठी सदस्य राष्ट्रे जे प्रतिनिधी पाठवितात त्यातही कायदेतज्ज्ञांचा भरणा भरपूर असतो. जागतिक व्यापार संस्थेचे नियम सरळसोपे करून आपल्याच पायांवर धोंडा पाडून घेण्यात या विधिज्ञांना काही स्वारस्य असणार नाही हे उघड आहे.

हे असे घडले कसे? व्यापार खुला कृायला निघालेल्या संस्थेच्या हातून हे बांडगूळ उद्भवलेच कसे?

डंपिंग कृणारा देश काही काळ नुकसान सोसून आक्रमणाचे मनसुबे रचीत असतो. एका मर्यादेपलीकडे अशा तऱ्हेची कारस्थाने यशस्वी होऊ शकत नाहीत. खुल्या बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्याच्या ऊर्जांच्या सामर्थ्यावर

निखळ विश्वास असलेला कोणीही खुलेपणाच्या देखरेखीसाठी अगडबंब अजागळ व्यवस्था उभी करण्याचे मनातही आणणार नाही. देखरेख व्यवस्थेतून नियमभंग होण्याचे बंदच झाले असे इतिहासात कधी घडले नाही. जागतिक व्यापार संस्थेत हा चमत्कार घडावा अशी आशा फक्त भाबडेच ठेवतील. ज्या खुलेपणाचा 'उदे उदे' जागतिक व्यापार संस्था करते आहे त्या खुलेपणात किरकोळ कारस्थाने निपटण्याची ताकद नसेल तर तिच्या 'वांधा' निराकरण व्यवस्थेचा' अजागळ स्तनांपेक्षा अधिक उपयोग नाही. ही व्यवस्था फोफावली तर तिचा कॅन्सर होऊ शकतो आणि नवीन उदयाला येऊ पाहणाऱ्या खुल्या व्यवस्थेचा त्यात बळी जाऊ शकतो. अमेरिकन 'ए.डी. डाचा'चा हा धडा आहे.

*दि. २१/२/२००१*

■■

# प्रादेशिक फळे व उत्पादने

क्रिकेटसारख्या सामन्यांकरिता राष्ट्रीय संघात खेळाडूंची निवड होते त्यावेळीदेखील कोणते खेळाडू चांगले आहेत आणि कोणत्या खेळाडूंचा सुसंबद्ध संघ बनेल यापेक्षा कोणत्या राज्याला वा प्रदेशाला किती प्रतिनिधित्व मिळालेले आहे, कोणत्या खेळाडूंचे वरपर्यंत लागेबांधे आहेत याचाच विचार अधिक होतो. एकदा खेळाडूंच्या निवडीतच भ्रष्टाचार घुसला, की तेथून मॅचचे निर्णय विकणे, विकत घेणे फारसे दूर नाही. ज्या खेळाडूंना खुद्द खेळण्यात रस नाही त्यांनी जिवाची करमणूक एरव्ही करून घ्यावी कशी?

पुढारी मंडळी खेळनियंत्रक संघटनांवर हुकूमत गाजवू लागले म्हणजे अशा गोष्टी अपरिहार्य आहेत. सिडनी येथील ऑलिम्पिक खेळांत भाग घेण्यासाठी आपला जो संघ गेला, त्याच्या निवडीतही कोण कसा काय खेळ दाखवील; जागतिक स्पर्धेत किती पदके मिळवील यापेक्षा कोणाची चिठ्ठी आली आहे याचा आधार घेतला गेला. पदक जिंकण्याची काहीही शक्यता नसताना थोरामोठ्यांशी लागेबांधे असलेली मंडळी एवढ्या वरच्या पातळीवरील खेळांत भाग घेता यावा यासाठी का धडपडतात? कुस्ती, बॉक्सिंग अशा उघडउघड टकरीच्या खेळांत बहुधा असे होत नसावे, कारण ऐरागैरा गेला तर जिवावर बेतायची शक्यता; पण धावणे, कसरती नैपुण्य (ॲथेलेटिक्स्) अशा खेळांमध्ये काही जीविताचा धोका नाही. काही पदके मिळाली नाही तरी आपण राष्ट्रीय संघातून खेळात भाग घेतला हेदेखील 'गंगेत घोडे न्हाले' असे कृतकृत्य वाटून, त्याचीच शेखी मिरवीत फिरण्यातही धन्यता मानणारे लोक आहेत; भारतीय प्रशासकीय सेवेच्या परीक्षेला नुसते बसून, काही नाही तरी, लग्नाच्या बाजारात आपला भाव वधारून घेणाऱ्या उपवधू तरुणांप्रमाणेच!

आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या वाटाघाटी होतात. भारतात या वाटाघाटींत

कोणी भाग घ्यावा याचा निर्णयही गुणवत्तेतर निकषांवरच ज्यादा करून होतो. खेळाडूंची निवड चुकीची झाली तर विजय मिळणार नाही, पदक मिळणार नाही, एवढेच; वाटाघाटींत चिठ्ठीची तट्टे गेली, की त्यामुळे देशाचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते; काही औद्योगिक, काही शेतीमालाची उत्पादने उद्‌ध्वस्त होऊ शकतात.

गेल्या महिन्यात, जागतिक व्यापारसंस्थेच्या लवकरच सुरू होणाऱ्या वाटाघाटींसाठी नियुक्ती झालेले तीन मोठ्या देशांचे राजदूत भेटले. जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींसाठी त्यांचे जे काही प्रस्ताव आहेत, त्यांबद्दल इतर देशांत काय विचारप्रवाह चालू आहेत याची चाचपणी करण्याकरिता जगभरच्या देशांतील वेगवेगळ्या विचारधारांशी ते संपर्क साधून आहेत.

जागतिक व्यापार संस्थेचा आवाका इतका प्रचंड आहे, की ही संस्था एक व्यापारी 'संयुक्त राष्ट्र'च बनली आहे. पृथ्वीवरील कोणताही व्यवसाय, व्यवहार संघटनेच्या करारमदारांपासून अलिप्त राहिलेला नाही. नुसत्या शेतीसंबंधी करारांविषयी पहायचे म्हटले तरी त्याचे मोठमोठे ढोबळ भाग डझनांवर आहेत. एका देशाचे राजदूत भेटायला आले ते बरोबरच्या पाचसहा सहकाऱ्यांसोबत. स्वत: राजदूत याच क्षेत्रात गेली पंधरा वर्षे काम करीत आहेत. त्यांचे विशेष ज्ञान आणि अनुभव 'आरोग्याचे आणि वनस्पतींचे संरक्षण' या विषयात.

व्यापारउदीम झाला म्हणजे एका देशातून दुसऱ्या देशात माल येणार जाणार; त्यामुळे जिवाणु, रोगराई पसरून माणसे व जनावरे यांच्या आरोग्याला आणि वनस्पतींनाही धोका तयार होतो. हा धोका टाळण्यासाठी वेगळे करारमदार करण्यात आले आहेत. सन्माननीय राजदूतांचा या कराराबद्दल जागतिक वाटाघाटीतील स्वत:चा अनुभव गेल्या दीड दशकातला. कोणत्या देशातील कोणत्या मालापासून कोणत्या देशाला काय धोका संभवतो यासंबंधीच्या माहितीचा तो एक ज्ञानकोशच! माझ्याशी बोलताना ते फक्त या एका विषयावरच बोलले. दुसरा कोणताही विषय निघाला, की बरोबरच्या सहकाऱ्यांपैकी कोणा एकाला ते बोलायला सांगीत. एखाद्या कुशल संगीतज्ञाने कलाकारांचा एखादा ताफा चालवावा तसा सुसंगत कार्यक्रम चालला होता.

अमेरिकेसारख्या मोठ्या देशात जागतिक व्यापार संस्थेच्या कामासाठी पाच हजारांवर तज्ज्ञांची नियुक्ती झाली आहे. त्यांत शेती, शेतीमाल प्रक्रिया, व्यापार, अर्थशास्त्र यांतील तज्ज्ञ आहेतच; पण विधिज्ञांचाही मोठा भरणा आहे. करारातील एकएक कलम, पोटकलम, त्यांतील खंड, उपखंड, वाक्य, एकएक शब्द बारकाईने तपासून आपल्या देशाच्या हितसंबंधांना जपण्याकरिता हे सारे सैन्य

सज्ज आहे. भारताची स्थिती याउलट आहे.

तज्ज्ञांच्या निवडीत भारत चोखंदळ राहत नाही. वाटाघाटींच्या उरुग्वे फेरीत हे समजण्यासारखे होते. त्या वेळी भारतातील बहुतेक तज्ज्ञांची समजूत अशी होती, की जागतिक व्यापारात आणि देवघेवीच्या ताळेबंदात जोपर्यंत आपण खोटीत आहोत तोपर्यंत कोणतेच नियम आपल्याला लागू पडणार नाहीत. जागतिक व्यापार संस्थेच्या करारावर सही करताना, आयातीवरील बंधने येत्या १ एप्रिलपर्यंत काढून टाकण्याची हमी दिली गेली त्याचे आता गंभीर परिणाम जाणवू लागले आहेत. ही हमी देताना जबाबदार अधिकाऱ्यांची आणि नेत्यांचीही भावना अशी असावी की, 'भारताचा व्यापार कायमचा खोटीतच चालणार आहे. परकीय चलनाची चणचण काही आज उद्या संपण्याची शक्यता नाही. तेव्हा परकीय चलनाच्या संपन्नतेच्या काळात काय करावे लागेल याची चिंता आज कशाला? चलनाची परिस्थिती सुधारली तर इतर परिस्थिती इतकी सुधारेल, की त्या वेळी आयातबंद्या उठविण्याचे फारसे काही महत्त्व राहणार नाही,' अशा अजागळपणे करारमदारांवर सह्या झाल्या. १९९० च्या दशकातील आर्थिक सुधारांमुळे, त्याआधी गंगाजळीतील सोने गहाण टाकायला निघालेला देश परकीय चलनाचे प्रचंड गाठोडे जमवू लागला. परिस्थिती बदलताच लगेच एका देशाने भारताविरुद्ध दावा लावला, की 'आता भारताची परिस्थिती खोटीची नाही. तस्मात् आयातबंदी उठविण्याच्या शर्तींपासून भारताचा अपवाद करता येणार नाही...' दाव्यात भारत हरला. खोटीतून निघाला आणि खोड्यात अडकला!

व्यापार म्हटला म्हणजे आपला माल खपविण्यासाठी काही खोटेपणा येतोच. 'हापूस' आंब्याचे सारेच व्यापारी आपले फळ 'देवगड हापूस' असल्याचे सांगतात. सर्वसाधारण ग्राहकालाही रत्नागिरी, देवगड, बलसाड यातला फरक आंबा कापून खाऊनसुद्धा फारसा समजत नाही. जागतिक व्यापारात हा धोका मोठ्या प्रमाणावर संभवतो. म्हणून 'अगदी शेतीमालाच्या बाबतीतसुद्धा, माल ज्या प्रदेशात तयार होतो त्या प्रादेशिक नावावरून मालाची ख्याती असेल तर ते प्रादेशिक नाव त्या राष्ट्राची आणि प्रदेशाची मालमत्ता आहे, दुसऱ्या कोणी त्या नावाचा उपयोग करून दिशाभूल करू नये,' असा नियम ठरला. 'कोणत्या प्रादेशिक नामाभिधानांना असे संरक्षण दिले पहिजे' याची यादी करायची वेळ आली तेव्हा इंग्लंडने 'स्कॉच व्हिस्की' आणि फ्रान्सने शॅम्पेन प्रांतातील पांढऱ्या बुडबुडणाऱ्या मदिरेची गणना केली. दुधापासून बनणाऱ्या चीज इत्यादी पदार्थांचे शेकडो प्रकार युरोपातील प्रत्येक देशात आहेत. स्वित्झर्लंडमधील ग्रुएर, एमेन्ताल हे चीजचे प्रकार तशी

प्रादेशिक नावेच आहेत; पण त्यांना संरक्षण देण्यास अमेरिकेने कडवा विरोध केला. बुर्गोन्या यासारख्या प्रख्यात मदिरांनाही संरक्षण मिळू शकले नाही. फ्रान्समधील प्रख्यात 'कॅमाम्बेर' चीजतर प्रादेशिक नाहीच, तेव्हा त्याला काही संरक्षण मिळण्याचा प्रश्नच नव्हता. युरोपीय देश आता नव्या वाटाघाटींत, प्रादेशिक असो वा अन्य नामाभिधानाने असो, आपापल्या देशातील नामवंत मालाला संरक्षण मिळावे या दृष्टीने जागतिक व्यापार संस्थेच्या करारात बदल घडवून आणण्यासाठी झटत आहेत.

पिंपळगाव बसवंतच्या शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादन केलेली पांढरी बुडबुडणारी मदिरा 'शॅम्पेन' नावाखाली विकता आली नाही. त्यांना ती 'पिम्पेन' नावाने विकावी लागली आणि तो सारा उद्योगच कोसळला. तांदळाची 'बासमती', 'आंबेमोहोर' ही नावे प्रादेशिक नाहीत. सध्याच्या कराराप्रमाणे त्यांना संरक्षण मिळू शकत नाही. नवीन वाटाघाटीतून त्यांना संरक्षण मिळावे यासाठी भारताने काही प्रस्ताव तयार केलेले नाहीत. 'रत्नागिरी हापूस' आंब्याला संरक्षण देण्याची गरज आहे हे भारतीय शिष्टमंडळातील कोणाच्याच ध्यानात आलेले नाही हे समजण्यासारखे आहे. पण, जागतिक पातळीवर 'दार्जिलिंग चहा' हे नाव वापरता येऊ नये याची तरतूद करणे आवश्यक आहे हेसुद्धा भारतीय प्रतिनिधींना सुचले नाही. परिणाम असा, की जगभरच्या शेकडो कंपन्या 'दार्जिलिंग' हे नाव वापरून आपला माल विकीत आहेत. त्यांचा व्यापार खऱ्या 'दार्जिलिंग चहा'च्या व्यापाराच्या दसपट मोठा आहे आणि पैशाची उलाढाल मूळ मालकापेक्षा चारशे पट जास्त आहे. 'असुनि खास मालक घरचे' दार्जिलिंगचे मळेवाले चोर ठरले आहेत. कारण काय? कारण ''आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळांत 'इंडिया'तील प्रशासकीय सेवेतील 'यॅस् फॅस्'वाल्या भद्र लोकांचाच समावेश होऊ शकतो; तेथे धोतरे शेतकरी, बागवाले, मळेवाले यांना प्रवेश नाही. वेळोवेळी परदेशगमनाची संधी साधण्याकरिता वाटाघाटी घडविल्या जातात अशी भारतीय शासनाची आणि प्रशासनाची समजूत! 'अमक्याअमक्याच्या जावयाला जिनिव्हात जायचे आहे, पाठवा त्याला. अमका अमका अधिकारी, नाही त्याला व्यापाराचा फारसा अभ्यास म्हणून काय झाले? कोणाला काय समजणार आहे?' अशा बेपर्वाईच्या वृत्तीने वाटाघाटींची पूर्वतयारी झाली आणि शिष्टमंडळे निवडली गेली.'

आजपर्यंत हे चालून गेले; या पुढच्या नव्या काळात अशा वशिल्याच्या तट्टांची किंमत मोजणे कोणत्याच देशाला परवडणार नाही; भारतालातर नाहीच नाही.

*दि. २६/२/२००१*

■■

# विकासाची क्षितिजे उलटीपालटी करणारे राजकारण

सरकारी लायसेन्स–परमिटची बंधने तुटली आणि श्वास मोकळे झाले म्हणजे शेतकऱ्यांना शतकाशतकांनंतर माणूस म्हणून जगण्याची संधी मिळेल. नेहमी कोंदट हवेत जगणारा प्राणी एकदम मोकळ्या शुद्ध हवेत गेला म्हणजे त्याचा जीव कासावीस होऊ लागतो; पुन्हा एकदा धुराने, प्रदूषणाने भरलेल्या सवयीच्या हवेत केव्हा एकदा परततो असे त्याला होऊ लागते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय शेतकरी असा गोंधळून गेला आहे, त्याचा राजकीय फायदा उठविण्याकरिता अनेक नवशेगवशे त्याला बागूलबुवा दाखवून आपल्याकडे जिंकून घेऊ पाहत आहेत. स्वतः सत्तेवर असताना ज्यांनी शेतकऱ्यांवर वरवंटा फिरविण्यात थोडीही कसर सोडली नाही ते चंद्रशेखर, विश्वनाथ प्रताप सिंग आता मारे सत्याग्रहांत, निदर्शनांत भाग घेऊन शेतकऱ्यांना आकर्षून घेऊ पाहत आहेत.

स्वातंत्र्याचे चाहते चर्चा करतात, अभ्यास करतात, भाषणे देतात; पण, 'स्वातंत्र्य हवे' असे ठामपणे जगजाहीर करण्यासाठी निदर्शने करीत नाहीत, प्रदर्शने करीत नाहीत; आंदोलने तर दूरच राहिली. २५ फेब्रुवारी २००१ रोजी दिल्ली येथे सोनिया काँग्रेसने शेतकऱ्यांचा मेळावा भरविला. स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत लेव्ही, सक्तीची वसुली, जिल्हाबंदी, राज्यबंदी, झोनबंदी, निर्यातबंदी इत्यादी लादून परदेशांतील महागाचा शेतीमाल आपल्या बाजारपेठेत आणून ओतण्याचे व शेतीमालाचा भाव पाडण्याचे आणि सारी शेती उजाड करून टाकण्याचे पाप नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी मोठ्या निश्चयपूर्वक केले. शेतकऱ्यांच्या अश्रूंनी आणि रक्ताने ज्या घराण्याचे हात बरबटले, त्याच्या वारसदार सोनियांनी या मेळाव्यात इंदिरा गांधींच्या शैलीत आवाज चढवून शेतकऱ्यांच्या संरक्षणाची मागणी, मनामध्ये कोणताही संकोच न ठेवता, मांडली!

शेतीचे आणि शेतकऱ्यांचे भवितव्य मुंबईच्या बंदरात ठरणार नाही किंवा दिल्लीच्या रामलीला मैदानावरही ठरणार नाही. ते देशाच्या सर्वदूर कोन्याकोपऱ्यात पसरलेल्या शेताशेतात, शेतकरी आणि शास्त्रज्ञ मिळून ठरविणार आहेत.

भुज आणि कच्छच्या प्रदेशात असाच एक मोठा क्रांतिप्रवण प्रयोग गेले तीन महिने चालू आहे. मोठ्या आकाराचा शेंगदाणा, त्यात खवट दाण्यांचे प्रमाण अजिबात असू नये असे वाण तयार करण्यासाठी तेथे संशोधन आणि प्रयोग चालले आहेत. असेच प्रयोग ओरिसा, महाराष्ट्रात अकोला, आंध्र प्रदेशात अनंतपूर या ठिकाणीही चालले आहेत. भूकंपाच्या हादऱ्याने भुजमधील प्रयोग काहीसा विस्कळित झाला आहे. शेतीवर काम करणारे मजूर इकडेतिकडे निघून गेले, त्यांची जमवाजमव झाली, की प्रयोगाच्या कामाला पुन्हा एकदा सुरुवात होऊन जाईल.

गुजरातमधील डांग जिल्ह्यात असाच एक नवा प्रयोग चालू आहे. डांग जिल्ह्याची शेती आधुनिक जगाच्या दृष्टीने मागासलेली. पावसाळ्यात पाऊस पडला म्हणजे शंभरसव्वाशे इंच पडतो; पाणी सारे खळखळा वाहून जाते आणि चार महिने गेले, की पिण्याच्या पाण्याचीही वाणवा होते. वरी, नागली, भात ही तेथील महत्त्वाची पिके. आधुनिक शेतीच्या साधनांपैकी वरखते आणि औषधे यांचा फारसा संसर्ग तेथील जमिनीला नाही. खुलिकरणाने डांग जिल्ह्याचे चित्र अकस्मात् पालटणार आहे.

साखर, कापूस, पेंड हे निर्यातीचे महत्त्वाचे शेतीमाल. परदेशांत ते खपविण्यासाठी मोठे निकराचे प्रयत्न करावे लागतात. याउलट आरोग्याविषयी अधिकाधिक जाणीव होत असलेल्या युरोपीय आणि इतर प्रगत देशांत वरीनागलीसारख्या वर्षानुवर्षे कदान्न मानल्या गेलेल्या गरिबांच्या तृणधान्याला मोठी मागणी येऊ लागली आहे. परदेशातील मोठ्या मोठ्या व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी डांग जिल्ह्यात आपली कार्यालये थाटू लागले आहेत. होणारे सगळे उत्पादन विकत घेण्याची त्यांची तयारी आहे. त्या पलीकडे जाऊन, हीच धान्ये वरखते आणि रासायनिक औषधे न वापरता, म्हणजे नैसर्गिक शेतीत तयार होत असली तर त्याकरिता पैशांच्या थैल्या मोजण्याची प्रगत देशांतील ग्राहकांची तयारी आहे.

डांग जिल्हा महाराष्ट्राच्या सरहद्दीच्या जवळचा. वर्षानुवर्षे येथील पुढाऱ्यांनी डांगचा धुळे किंवा सुरत जिल्हा करण्याचे प्रकल्प आणि स्वप्ने लोकांसमोर मांडली आहेत. डोंगरांडोंगरांतून सपाट वावरे तयार करून शेतजमीन तयार करावी, त्यांत फळबागा, विशेषतः द्राक्षबागा आणि ऊस लावावा; डांग जिल्ह्यातच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बाजारपेठा तयार व्हाव्यात अशी स्वप्ने ते

रंगवीत. जागतिकीकरणाच्या धक्क्याने डांगच्या विकासाची सारी क्षितिजेच उलटीपालटी झाली आहेत.

डांग हा गुजरातमधील सगळ्यांत लहान जिल्हा. सगळ्या जिल्ह्यात तालुका एकच. शहरे – शहरे कसली, मोठी खेडीच, दोन – अहवा आणि वघई. गावे तीनशेच्या आसपास. ग्रामपंचायती फक्त सत्तर आणि लोकसंख्या दीड लाखाच्या खाली, म्हणजे आपल्याकडील मोठ्या बाजारपेठेच्या गावाच्या पसाऱ्यापेक्षाही कमी. सारा प्रदेश जंगलांचाच. वस्ती प्रामुख्याने आदिवासींची. एके काळी जंगलतोड कंत्राटदारांनी आदिवासींवरील जुलुमाचा मोठा हैदोस घातला होता. गोदाताई आणि श्यामराव परुळेकरांचे हे कार्यक्षेत्र. कोळशाचा कोटा पुरा झाला नाही तर पेटत्या भट्टीत कामगारांना ढकलून दिल्याच्या वार्ता फार अनोळखी नव्हत्या, अशा वेळी 'गोदाराणी'ने लोकांत माणुसकीची जाणीव आणण्याचा यज्ञ आरंभिला.

वघई गावी, तेथील कृषी विज्ञान केंद्राने एक छोटासा समारंभ स्वागतासाठी केला होता. आमदार सारे शेतकी अधिकारी, जंगल अधिकारी झाडून हजर होते. सभेच्या जागेकडे जाताना राहून राहून वाटत होते, की आपण धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातील भागतच फिरतो आहोत. लोकांची रहाणी, घरांची मांडणी, दुकानांची ठेवण, स्त्रीपुरुषांची वेशभूषा – काही म्हटल्या, काही फरक नाही.

सभेला सुरुवात झाली. अधिकारी बोलले, आमदारसाहेब बोलले, सारे गुजरातीत. कलेक्टरसाहेब महेशकुमारसुद्धा गुजरातीतच बोलले. दिल्लीच्या कार्यालयातील माझे निजी सचिव एरवी सभेत बोलायला तयार होत नाहीत; पण वघईला ते बोलले, कारण प्रशासकीय सेवेत आल्यानंतर पहिल्यांदा कलेक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली होती ती या जिल्ह्यात, जुन्या आठवणी उचंबळून आल्या असाव्यात म्हणून तेही बोलले – गुजरातीतच, माझी बोलायची वेळ आली. मी सुरुवात केली, "कोणत्या भाषेत बोलू? गुजराती मला चांगले येत नाही, हिंदी माझी भाषा नाही, ना तुमची. म्हणून मराठीतच बोलतो." लोक एकसुरात म्हणाले, "आमचीही भाषा कोकणीच आहे." मग पाऊणएक तास मराठी भाषण रंगतच चालले. 'शेती करून कोणाचेही कर्ज फिटल्याचे ऐकिवात नाही,' 'शेती परवडत नाही म्हणून दुधाचा धंदा करण्यासाठी गायीम्हशी ठेवल्या तर पोटच्या पोराच्या तोंडाला दुधाची वाटी लागत नाही, सोसायटीचा चेअरमनमात्र दर वर्षी एकेक माडी वाढवतो' अशा सगळ्या मुद्द्यांना कोचीनपासून अमृतसरपर्यंत सगळ्या शेतकऱ्यांची सारखीच दाद मिळते तशीच डांगच्या शेतकऱ्यांची.

मला पटकन इतिहास आठवला. राज्याराज्यांतील सरहद्दींच्या प्रश्नावर अनेक ठिकाणी उरस्फोड चालू आहे. बेळगाव जिल्ह्याचा प्रश्न चाळीस वर्षे पेटता राहिला आहे. अजून कर्नाटक दोन पावले मागे जायला तयार नाही आणि महाराष्ट्रतर नाहीच नाही. भाषावार राज्यनिर्मितीच्या वेळी वादाचे म्हणून जे प्रदेश होते त्यांतील डांग जिल्हा हा एक. प्रश्न गुजरात आणि महाराष्ट्राने चुटकीसरशी सोडविला. बाळासाहेब खेर आणि मोरारजी देसाई यांनी जिल्ह्याचा संयुक्त दौरा काढला. दोघांनीही भाषणे केली. खेरसाहेबांनी लोकांना मोरारजींची भाषणे अधिक समजत असल्याचा कबुलीजबाब देऊन टाकला आणि डांग गुजरातचा झाला.

आज तेथील लोकही सांगतात, सारे अधिकारीही सांगतात की, येथील लोकांची भाषा कोकणी आहे. त्यांना मराठीच अजूनही अधिक समजते. आता शाळेत गुजरातीच शिकवतात त्यामुळे थोड्या वर्षांत कोकणीचाही स्पर्श संपेल आणि मराठीचाही संपर्क तुटेल; पण चाळीस वर्षांपूर्वी येथील लोकांची भाषा मराठीशी अधिक जुळणारी असणार यात काहीच संशय नसावा. मग बाळासाहेब खेरांनी डांगचे अर्घ्य का देऊन टाकले असावे?

सौजन्याचा गुण पराकोटीला गेला की सुजनतेचाही एक अहंकार तयार होतो आणि त्या अहंकाराचा टेंभा मिरविण्यासाठी आपल्या लोकांवर अन्याय करून परधार्जिणेपणा दाखविण्याची इच्छा तयार होते. बाळासाहेबांनी महात्मेपण मिळविण्यासाठी डांगचा बळी दिला काय?

दुसरेही एक कारण संभवते. गुजराती प्रदेशातून आलेले लाकूड आणि कोळसाव्यापारी यांचा त्या काळच्या डांगच्या अर्थव्यवस्थेवर पुरा ताबा होता. आदिवासींच्या आंदोलनाचा झेंडा गोदाताई आणि शामराव यांच्या नेतृत्वाखाली नक्षलवाद्यांत जाऊन सामील होतो की काय अशी दाट शंका वाटत होती. 'नको ती बला आपल्याकडे,' असे म्हणून डांगचा बळी दिला गेला असेल काय?

चाळीस वर्षांपूर्वी डांग हा मागासलेला जिल्हा होता, वरीनागलीवर गुजराण करणारा. त्याच्याकरता लढण्याची कोणाला फारशी निकड भासली नसावी. लोण्यासाठी नावाजलेल्या बेळगावच्या प्रश्नावर तोंडाला अधिक पाणी सुटत होते म्हणून की काय महाराष्ट्राभिमान्यांची सारी ताकद तिकडे वळली असावी. आता जागतिकीकरणाच्या कांडीने डांग जिल्हा समृद्ध झाला तर बाळासाहेब खेरांचे सौजन्य का मोरारजी देसाईंचा कावेबाजपणा याचे सखोल विश्लेषण चाळीस वर्षांच्या अवधीनंतर करावे लागेल!

*दि. २८/२/२००१*

■■

# जग काही फार सुधारलेले नाही!

भूतकाळाच्या उदरात गडप झालेल्या साम्यवादी सोव्हिएट रशियाच्या महासंघाने अफगाणिस्तानात सैन्य पाठवून आक्रमण केले, त्या वेळचे रशियाचे प्रमुख ब्रेझनेव्ह यांच्या मनात काय हेतू आणि हिशेब होते याचा कोणाला पत्ता लागला नाही. हिंदी महासागराच्या बाजूला आपला एखादा समुद्रकिनारा असावा व त्यावर चांगले बंदर असावे ही रशियाची महत्त्वाकांक्षा जुन्या झार बादशहांच्या कालखंडापासून चालत राहिली होती; समाजवादी रशियाच्या महत्त्वाकांक्षांत काही फरक पडलेला नसावा. एखाद्या साम्राज्यवादी उद्दाम सत्तेप्रमाणे मोठ्या संख्येने सैन्य पाठवून अफगाणिस्तानवर आक्रमण झाले, तेथे मोठे बंड पेटले. अफगाणिस्तान पादाक्रांत करणे, ब्रेझनेव्हसाहेबांना वाटले तितके काही सोपे झाले नाही. अफगाण पठाण मोठा कडवा, स्वातंत्र्याचा भोक्ता म्हणून इतिहासभर गाजला आहे. गावागावात टेकडीटेकडीवर रशियन फौजांना झुंज द्यावी लागली.

व्हिएतनाममध्ये सैन्य पाठवून आपलेच नाक कापून घेतलेल्या अमेरिकेला रशियाची ही फजिती पाहून पोटात गुदगुल्या झाल्या असणार; पण सरळ अफगाणिस्तानमध्ये अमेरिकी फौजा पाठविणे अमेरिकी जनतेला मान्य झाले नसते. अमेरिकेने शेजारच्या पाकिस्तानला प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरविली आणि पाकिस्तानी लष्कर अफगाणिस्तानमध्ये खुले आम मैदानात उतरले. त्या लष्कराच्या हातूनही आक्रमणाचा बीमोड होण्याची लक्षणे दिसेनात तेव्हा इराणच्या सरहद्दीकडील काही कडव्या टोळ्यांना अमेरिकेने शस्त्रे पुरविली आणि त्यातून तालिबानचे लष्कर तयार झाले.

तेवढ्यात रशियन साम्राज्य कोसळले आणि तालिबान टोळीवाल्यांना सारी जमीन मोकळी मिळाली. प्रचंड वेगाने या रानटी टोळ्यांचे रणगाडे गडगडू लागले, विमानविरोधी तोफा दणाणू लागल्या आणि अल्पावधीत अफगाणिस्तानमधील

बहुतेक भूमी टोळीवाल्यांच्या ताब्यात आली. युद्ध जिंकणाऱ्या सर्वच लष्करांना मस्ती चढते तशी या टोळीवाल्यांनाही चढली. जपानी लष्कराने कोरिया, फिलिपाईन्स्‌मध्ये दुसऱ्या महायुद्धात जे अनन्वित प्रकार केले, याह्याखानच्या सैन्याने बांगलादेशात जसे अत्याचार केले त्याच्या पलीकडे पराकोटीला जाऊन तालिबानने आपला दरारा बसविण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या टोळीवाल्यांना इस्लाम म्हणजे काय याची कल्पना असली, तर ती अगदी पुसट. त्यांच्या पद्धती, रीतीरिवाज हे सगळे दुर्गम डोंगरांतील रानटी टोळ्यांचे. इस्लामच्या नावाखाली त्यांनी हातात आलेल्या सगळ्या प्रदेशात आपले रीतीरिवाज बळजबरीने लादण्याला सुरुवात केली. सगळा रोष काय तो बायकांवर. 'मुलींनी गोषा घेतल्याखेरीज फिरू नये', 'शाळेत जाऊ नये', 'असेच कपडे घालावे', 'असे कपडे घालू नये' इत्यादी फर्माने तासातासाने सुटू लागली. साऱ्या जगात स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळी चालू आहेत. सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या देशांतील सरकारे महिलासन्मानाचे जाहीरनामे उच्चरवाने सांगत असतात. संयुक्त राष्ट्रसंघातही महिला हक्काच्या गप्पा यथेच्छ मारल्या जातात. पण, अफगाणिस्तानातील महिलांची तालिबान लष्कर करीत असलेली मुस्कटदाबी मोडून काढण्याचा विचार कोणी तोंडातून काढलासुद्धा नाही. इराकच्या सद्दाम हुसेनने थोडीशी आगळीक केल्याचा भास झाला तरी साऱ्या इराकला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या माऱ्याने भाजून काढण्याचा चंग बांधणारी अमेरिकाही चिडीचूप राहिली, आपलेच दात आणि आपलेच ओठ! 'तालिबानचे भूत आपणच उभे केलेले; ते हाताबाहेर गेले हे सांगता कोणाला?' अशी अमेरिकेची अवघड परिस्थिती झाली.

आपल्याला कोणी ललकारणारे नाही हे पाहिल्यावर तालिबान लष्कर अधिकच बेफाम बनले. अमेरिकेविरुद्ध घातपाताची कृत्ये खुले आम घडवून आणणारा ओस्मा बिन लादेन याने अफगाणिस्तानमध्ये आपले केंद्र उघडले आणि तेथून, अमेरिकेला जेरीस आणण्याची भाषा खुले आम बोलू लागला, तरीसुद्धा अमेरिका काही करू शकली नाही. मग तर तालिबान लष्कर अगदीच उतामातास आले आणि त्यांनी एक नवाच उपद्व्याप आरंभला.

सध्याचे अफगाणिस्तान हे एके काळी बौद्ध संस्कृतीचे एक मोठे केंद्र होते. नित्रधार येथील विद्यापीठात त्या काळचा सर्वांत मोठा ग्रंथसंग्रह होता. गजनीच्या महंमदाने ते सारे वाचनालय उभे जाळून टाकले. तेव्हा त्याच्या समर्थनार्थ तेथील खलिफ ओमार याचा युक्तिवाद साधा आणि सोपा! ही असली रगड पुस्तके घेऊन करायचे काय? या पुस्तकांत आहे तरी काय? कुराणात जे काही

लिहिले आहे त्यापेक्षा वेगळे काही त्यात लिहिले असेल तर ते नष्ट करायलाच पाहिजे. कुराणात जे काही सांगितले आहे तेच त्यांत सांगितले असेल तर अशी द्विरुक्ती करणाऱ्या पुस्तकांचा काय उपयोग?

इतिहासात हे वर्णन वाचले म्हणजे असे कोणी हिरवट धर्मांध असतील यावर विश्वाससुद्धा बसत नाही; पण ही धर्मलंडांची जात संपली नाही आजही ती जगात शिल्लक आहे एवढेच नाही तर आजही त्यांना जवाब मागून त्यांचा बीमोड करणारा कोणी शिल्लक नाही. अफगाणी देशात अनेक लढाया झाल्या, स्वाऱ्या झाल्या; मंदिर, महाल उद्ध्वस्त झाले, देवळे फोडली गेली; तरीही एके काळच्या बौद्ध संस्कृतीचे काही अवशेष आजतागायत टिकून होते. गौतम बुद्धाच्या महाकाय प्रचंड मूर्ती सगळ्या संकटांशी टक्कर देत अजूनही शिल्लक होत्या. 'निवीरम् उर्वितलम्' झालेल्या तालिबानला साऱ्या जगाला धुत्काराने आव्हान देण्याची एक चांगली संधी मिळाली. गौतम बुद्धाच्या या मूर्ती मानवजातीच्या सांस्कृतिक ठेव्यांपैकी मौल्यवान वारसा म्हणून युनेस्कोनेही घोषित केलेल्या आहेत. तालिबान लष्कराने त्या मूर्ती फोडण्याचा आपला निर्णय जाहीर केला. साऱ्या जगाला सांगितले आणि या आठवड्याच्या सुरुवातीला जगाची पर्वा न करता, या मूर्ती फोडण्याचा आपला कार्यक्रम सुरू केला. शिल्पे इतकी महाप्रचंड की ती काही हातोड्याछिन्यांनी फुटण्याजोगी नाहीत. तेव्हा त्यांच्यावर रणगाडे घालण्यात आले, विमानविरोधी तोफा चालविण्यात आल्या आणि हा सारा प्रकार सारे जग निमूटपणे पाहत राहिले. चडफडले अनेक; पण तालिबानला निर्बंध घातला जावा असे काही करण्याचे धाडस कोणालाच झाले नाही.

कोणत्याही पुतळ्याची थोडीफार विटंबना झाली तर दंगली माजविणारे नवबौद्ध त्यांच्या आदर्शाच्या मूर्तींची विटंबना स्वस्थचित्ताने पहात राहिले. भारताच्या पंतप्रधानांनी शाब्दिक निषेध व्यक्त करून आपली हतबलता जाहीर करून टाकली. काही कडवे हिंदुत्वनिष्ठ आपापल्या घरांत सुरक्षितपणे बसून 'तालिबान लष्कराला धडा शिकविण्यासाठी यंव करायला पाहिजे, त्यंव करायला पाहिजे' अश्या वल्गना करू लागले, केले कोणी काहीच नाही. बाबराच्या काळच्या मंदिरध्वंसाच्या प्रतिशोधाचा राजकीय कार्यक्रम बनविणारे मूग गिळून गप्प बसले. इस्रायलसारखी अशा प्रकारच्या प्रसंगांना तोंड देण्याचा अनुभव असलेली राष्ट्रे, जपान-कोरियासारखी बौद्ध धर्माचा प्रसार असलेली राष्ट्रे यांना एकत्र करून तालिबान लष्कराला शतकानुशतके याद राहील अशी कार्यवाही करणे काही अशक्य नव्हते; पण तेवढी मुत्सद्देगिरीची कुवत मवाळ भारतीय शासनाकडे

नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

साऱ्या जगाची ही हताश निष्क्रियता समजण्यासारखी आहे. कोणा माथेफिरूने वासरू मारले म्हणजे शहाण्याने गाय मारावी अशा कार्यक्रमात काही अर्थ नाही. त्यातून जगभर तेढ माजेल आणि आपोआपच तालिबानचा हेतू साध्य होईल असा पोक्त किंवा डरपोक मुत्सद्दीपणाचाही यात विचार असावा. या सर्वांच्या निष्क्रियतेचे आश्चर्य वाटले तरी खेद वाटण्यासारखा नाही. खेद वाटण्यासारखा आहे तो भारतातील स्वत:ला प्रागतिक म्हणविणाऱ्या मुसलमान समाजाच्या नेत्यांच्या उदासीनतेबद्दल. मंदिर–मस्जिद वादात तारस्वराने ओरडा करणारे हे नेते या वेळी काही बोलत नाहीत ही भारतीय मुसलमान समाजाच्या दृष्टीने मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. बनातवाला, शबाना आझमी आदींसारख्या नेत्यांनी निदान घराबाहेर पडून तालिबानच्या मूर्ति–विद्ध्वंसाच्या कार्यक्रमाबद्दल, निषेधाचा नाही तरी, निदान नाराजीचा सूर काढला असता तर कोणत्याही कारणाने कोणत्याही मुसलमानाच्या सभ्यतेबद्दल, राष्ट्रप्रेमाबद्दल आणि सचोटीबद्दल शंका घेण्याचा आपल्याला ईश्वरदत्त अधिकार आहे असा कांगावा करणारे धर्ममार्तंड 'मुसलमान प्रागतिक नेत्यांच्या या चुप्पी साधण्यामुळे तालिबानच्या कृत्याबद्दल या नेत्यांना मनात आनंद होत असल्याचा' आरोप करू लागले तर उत्तर देणे कठीण होईल. शिवाय, भारतातील धर्मांध मुसलमान नेत्यांनी हिंदूमुसलमानांतील तेढ वाढविणारी कुरापतखोर भूमिका घेतली तर त्यांची आणखीनच पंचाईत होईल.

२००१ मध्येसुद्धा जग काही फार सुधारलेले आहे असे नाही. महंमद गजनीपासून आडदांड माथेफिरू आहेत तसेच राहिले आहेत आणि त्यांच्या पुढे बुळेपणाने शरण जाणारी जनताही तितकीच षंढ राहिली आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

*दि. ७/३/२००१*

■■

# नमोऽस्तु ते, जयोऽस्तु ते

२६ जानेवारी २००१ च्या स्वातंत्र्यदिनी देशभरच्या ध्वजवंदनाची तयारी होत असतानाच सौराष्ट्रातील भूकंपाचा धक्का देशभर जाणवला; त्यानंतर गुजराथमधील मृत्यूचे तांडव, अपरिमित हानी, लक्षावधी बेघरांच्या डोळ्यांत पाणी आणणाऱ्या कर्मकथा यांच्याच बातम्या सारख्या येत होत्या. ते सोडून दुसरे काही ऐकावे, पाहावे म्हटले तर काश्मिरातील अतिरेक्यांच्या घातपातांच्या वार्ता. या दीड महिन्यात देशभर रस्त्यांवरचे अपघातदेखील इतके विचित्र आणि भयानक झाले, की त्यांच्या बातम्या आणि छायाचित्रे पाहून विश्वास ठेवणेदेखील कठीण झाले.

११ मार्च रोजी, अचानक महाबळेश्वरच्या एखाद्या पॉइंटवरील दाट धुके क्षणार्धात नाहीसे व्हावे आणि सारे जग सूर्यप्रकाशात न्हाऊन निघाल्यासारखे स्वच्छ दिसावे तसा एकदम आनंदीआनंदाचा दिवस उगवला. आपल्या धकाधकीच्या आयुष्यात तसे पाहिले तर खेळकुदीला फारसे महत्त्व नाही. वर्तमानपत्रांत किंवा आता टेलिव्हिजनवर खेळांच्या स्पर्धा पाहणे एवढाच काय तो खेळाविषयीचा उल्हास; काय उत्साह असायचा तो क्रिकेटबद्दल; पण तोही क्रिकेट सामन्यांच्या सट्टाबाजीच्या घपल्यामुळे डागाळून गेला. लहान मुलेसुद्धा अलीकडे रस्त्यावर रंगात आलेला चेंडूफळीचा खेळ सोडून, दूरदर्शनवर टेस्ट मॅच पाहायला यायला तयार होत नाहीत.

आणि ११ मार्च रोजी हे सगळे एकदम बदलले. ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाच्या बल्लेबाजांविरुद्ध हरभजन सिंगने तीन चेडूंत तीन बळी घेऊन साऱ्या हिंदुस्थानच्या क्रिकेट–इतिहासात पूर्वी कधीही न घडलेली गोष्ट घडविली. कोणी भारतीय असला काही अचाट पराक्रम करू शकतो यावर कोणाचा विश्वासच राहिला नव्हता. हे अद्‌भूत एकदम घडून गेले. आपणही कोणी आहोत, काही

करू शकतो याची, पुसट का होईना, सुखदशी जाणीव निदान विजिगीषु भारताला झाली. 'आपले लोक म्हणजे सारे फालतू' अशी सुरुवात करून 'आपल्याकडे चांगले काही होऊच शकत नाही' असा निर्वाळा प्रत्येक विषयावर बोलताना देणारा रडतोंड्या भारत थोडा मागे पडला.

त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत आणखी एका भारतीयाने अक्षरश: जग पादाक्रांत केले. आंध्र प्रदेशच्या २७ वर्षांच्या गोपीचंदाने इंग्लंडमधील बॅडमिंटनच्या स्पर्धेत विजय मिळविला; तोही साधासुधा नाही, पहिल्या डावात मागे हटल्यानंतर निश्चयाने आणि कसोशीने त्याने बाजू सावरली, तडाखेबंद खेळ खेळणाऱ्या चिनी खेळाडूविरुद्ध मोठा कलाकुसरीचा खेळ करीत त्याने विजय मिळविला.

त्यानंतर लगेचच आणखी एक अद्भूत बातमी कानावर पडली. पाकिस्तानी अडेलतट्टूपणा, तालिबानचा बुद्धमूर्तीचा विद्ध्वंस यांच्याच बातम्या महिनाभर येत होत्या. संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव अफगाणिस्थानात गेले. तालिबान नेत्यांना मूर्तिभंजनाचा विध्वंसक कार्यक्रम थांबविण्याची त्यांनी विनंती केली. अफगाणी नेत्यांनी ती साफ धुडकावून लावली. अतिरेकी धर्मवाद्यांच्या संकटाची कधी नव्हे इतकी स्पष्ट जाणीव अन्नान यांना झाली असावी. तेथून पाकिस्तानात आल्यावर पाकिस्तानच्या लष्करी नेत्यांतही याच धर्मांधतेचे बीज असल्याचे त्यांना जाणवले असावे. काश्मिरातील सार्वमतासंबंधीचा नेहरूंच्या काळात झालेला ठराव उभय पक्षांच्या संमती आणि सहकार्याखेरीज अमलात आणण्याची संयुक्त राष्ट्रसंघात तरतूद नसल्याची घोषणा त्यांनी करून टाकली.

हरभजन सिंग कोलकत्यात ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या दांड्या एकापाठोपाठ एक उडवीत होता त्याच वेळी लोकसभेत एक खासदार हातातील चोपडे उंचावीत सभापतींचे लक्ष वेधून घेत होते. अरुण शौरींचे नाव एक तेजस्वी पत्रकार म्हणून, अभ्यासू लेखक म्हणून आणि आता सरकारी कंपन्यांच्या विसर्जनाचे पुरोहितमंत्री म्हणून सर्वश्रुत आहे. अरुणजींचे पिताजी ग्राहक चळवळीला वाहिलेली 'तुमचे आपले काम (Common Cause)' नावाची संस्था अनेक वर्षे चालवीत आहेत. या क्षेत्रात त्यांनी अनेक लढाया दिल्या आणि जिंकल्या. ग्राहकांना अपेक्षित सेवा न मिळाल्याबद्दल तक्रार गुदरून त्यांनी Air Indiaच्या विमानचालकांनाही दंड करविला होता. दुकानदारांनी धड माल न देणे, फसविणे, कारखानदारांनी भद्दा माल विकणे, बँकेतील कर्मचाऱ्यांनी ठेवीदारांना अडविणे ही मोठी मनस्ताप देणारी प्रकरणे आहेत. ती लढविणाऱ्या ज्येष्ठ शौरीजींनी आता एक नवीन आघाडी उघडली आहे. हजारो नागरिक

त्यांच्या संस्थेकडे पत्रे पाठवितात. आमचे आमदार, खासदार आणि राजकीय नेते यांच्याविषयी आपली घृणेची भावना सगळेच बोलून दाखवितात, काही लिहूनही सांगतात. अशा पत्रांचे एक संकलन त्यांनी प्रकाशित केल्यामुळे मोठा धमाका उडाला आहे. याच संकलनाचे चोपडे ते खासदारमहाशय सभापतींच्या पुढे नाचवीत होते.

एवढ्या शुभदिनी घडलेल्या एवढ्या धमाक्यांतून, कोणी सांगावे, कदाचित् काही परिवर्तनही दिसू लागेल.

माझ्या मते हरभजन सिंग, गोपीचंद, अन्नान आणि शौरी यांच्या या बातम्यांपेक्षासुद्धा आणखी एक वेगळीच बातमी आपल्या देशाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे.

जर्मनीतील हरित पक्षाकडे शेतीमंत्रालय गेले. आजपर्यंतच्या जगभरच्या पर्यावरणवाद्यांप्रमाणे त्यांचे जर्मनीतील भाईबंदही 'थोडा शहाणपणा; पण त्यापेक्षा आचरटपणा अधिक' असले कार्यक्रम मांडीत. 'पर्यावरण टिकविण्याचे कार्यक्रम राबविण्याची जवाबदारी सरकारने घेतली पाहिजे' असा त्यांचाही आग्रह होता. पार्यवरणवादी सारे सरकारवादी असतातच, प्रत्यक्ष सत्तेत आले ते फक्त जर्मनीत. सत्ताधारी आघाडीत काही वर्षे 'हरित पक्ष' आहे; पण त्यांच्याकडे कोणी अजून पर्यावरणी कार्यक्रमाशी संबंधित खाती देत नव्हते. आता शेती खाते त्यांच्याकडे आले आहे आणि काही करून दाखविण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

युरोप खंडात मोठे वादळ चालू आहे. इंग्लंडमधील गायींच्या खाद्यात मांसाहार मिसळल्याने मज्जाव्यवस्थेवर परिणाम करणारा रोग त्या गायींत पसरला. त्यांचे मांस खाणाऱ्या मनुष्यप्राण्यांतही त्या रोगाचा प्रादुर्भाव होऊ लागला. सध्या सगळीकडे लाळ्या आणि खुरकुत्या रोग पसरला आहे. त्यामुळे, बहुतांशी मांसाहारी असलेल्या नागरिकांत एक भीतीची लाट उसळली आहे. माणसाला निर्भेळ अन्न खाण्याचा अधिकार असल्याची जाणीव होऊ लागली आहे आणि त्यांचा रोष एकूणच मांसाहार व कृत्रिम पद्धतीने तयार केलेल्या अन्नाच्या सर्वच उत्पादनांवर वळला आहे.

हरित पक्षाच्या शेतीमंत्रालयाने जर्मनी अधिकृतरीत्या 'नैसर्गिक शेती' स्वीकारणार असल्याचे जाहीर करून टाकले. 'नैसर्गिक शेती' ही संकल्पना मुळात हिंदुस्थानातीलच आहे. आजही नैसर्गिक शेतीचा प्रयोग करणारे हजारो लोक आपल्या देशात आहेत. त्यांच्यांतील काहींच्या भोंदूगिरीमुळे सारी नैसर्गिक शेतीची चळवळ हिंदुस्थानात मागे पडली. कोणी शंभर टक्के शुद्ध सोवळ्या

नैसर्गिक खतांचा आणि औषधांचा आग्रह धरतो, कोणी हे निमित्त साधून म्हशीपेक्षा गायीचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करू पाहतो; कोणी आता शेतीची गरजच राहिली नाही, गच्चीवरही मुबलक अन्न पिकू शकते अशा आरोळ्या देतो, तर कोणी त्यापलीकडे उडी मारून चलन आणि बाजारपेठच बंद करण्याची स्वप्ने पाहतो.

खरे पाहता नैसर्गिक शेती भारताच्या दृष्टीने मोठी लाभदायक ठरू शकते; विशेषत: जागतिकीकरणाच्या संदर्भात. आमची शेती मागास आहे म्हणजे काय? जमिनीचे तुकडे तुकडे झाले आहेत, तिची सुपीकता कमी झाली आहे, इतर देशांच्या तुलनेने आम्ही रासायनिक खते-औषधे कमी वापरतो. देशात अजून हजारो एकर शेतजमीन अशी आहे, की तिला रासायनिक खते किंवा औषधे यांचा स्पर्शही झालेला नाही.

जगभरच्या बाजारपेठेत आज अशा जमिनीत तयार झालेल्या नैसर्गिक खाद्यान्नांना मोठी मागणी आहे. डांगसारख्या मागास भागात नैसर्गिक पद्धतीने पिकविलेली वरी, नागली खरेदी करण्याकरिता परदेशी कंपन्या ठाण मांडायला येत आहेत. यासंबंधी मी पूर्वी लिहिले आहे. या जमिनी आणि त्यांत तयार होणारा शेतीमाल विशुद्ध नैसर्गिक आहे यासंबंधी जगाला मान्य होईल अशी प्रमाणपत्रे देण्याची व्यवस्था झाली तर भारतीय शेतकरी गोपीचंदाचा पराक्रम करू शकतो. एवढे नाही झाले तरी आपल्या जमिनीच्या लहानशा तुकड्यावर स्वावलंबनाने स्वत:च्या पोटापुरते पिकविण्याची शक्यता शेतकऱ्यांच्या हाती आली तर जागतिक बाजारपेठेच्या जिवघेण्या स्पर्धेपासून त्याला काही आडोसा आणि निवारा मिळू शकेल. वेदशास्त्रपुराणोक्त नैसर्गिक शेतीची चळवळ जर्मन पुढाकाराने अद्ययावत् नैसर्गिक शेतीकडे वळली तर जयजयकाराच्या या दिवशीच्या सार्‍या घटनांत जर्मन शेतीमंत्र्यांची घोषणाच सर्वांत अधिक फलदायी आणि ऐतिहासिक ठरू शकते.

*दि. १४/३/२००१*

■■

# दहावा अवतार– तंत्रज्ञान

२००० सालच्या मे महिन्यात क्रिकेटचे सामने विकण्याखरीदण्याची भानगड प्रकाशात आली; वर्षभर ती गाजली. लहानपणापासून ज्यांना चरित्रनायक चरित्रनायक म्हणून पोरेटोरेसुद्धा मानायची, ते सारे क्रिकेटपटू एकामागोमाग एक भ्रष्ट ठरले. क्रिकेटच्या क्षेत्रातून त्यांची हकालपट्टी झाली. आणि, हे शक्य झाले कारण दिल्लीतील काही ध्येयवादी तरुणांच्या लहानशा गटाने भ्रष्टाचार समूळ निपटून काढण्याचे ठरविले; एखाद्या फिल्मी हिरोप्रमाणे 'ढिश्यॉंव ढिश्यॉंव' करून नाही, पिस्तूल घेऊन नाही तर हातात एक छुपा कॅमेरा घेऊन. या कॅमेऱ्याच्या साहाय्याने त्यांनी संबंधित व्यक्तींच्या बोलण्याचे चित्रण केले आणि एवढे 'चक्षुर्वैसत्यम्' झाल्यानंतर मग भ्रष्टाचाराचे भांडे फुटणे अटळच होते.

त्यानंतर फक्त दहाच महिन्यांत या वादळी गटाने आणखी एक हल्ला चढविला. क्रिकेट खेळाडूंच्या प्रकरणी त्यांची कामगिरी मोठी; पण त्यांनी तो भ्रष्टाचार उजेडात आणल्यानंतर लोकांना धक्का बसला तो आपली एवढी मोठी फसवणूक झाली याचा. क्रिकेटचे सामने म्हणजे हिंदुस्थानातील लोकांचे एक वेड. ज्या खेळाने आपण बेहोश होऊन जातो ते सारे खोटे, बनावट होते याचा तो धक्का होता.

१३ मार्च २००१ रोजी या वादळी टोळीने हल्ला केला तो भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष बंगारू लक्ष्मण, समता पक्षाच्या अध्यक्षा जया जेटली, संरक्षण मंत्रालयातील बडे अधिकारी आणि प्रत्यक्ष लष्करातील काही मोठे अधिकारी यांच्यावर. लष्करी सामुग्रीच्या खरेदीप्रकरणी या मंडळींनी लाच घेण्याचे मान्य केले. लाच देणारी एक लुटुपुटीची कंपनी तयार करण्यात आली. प्रत्यक्ष लाच स्वीकारण्याचे फीतचित्रण करण्यात आले आणि त्याच्या प्रदर्शनाने दिल्लीत वादळ म्हणजे वादळच उठले.

आपल्या देशात पवित्र मानावीत अशी आता फारशी स्थाने राहिलेली नाहीत.

पण त्यातल्या त्यात भारतातील जवान आणि लष्कर हे आदराचे विषय आहेत. देशाच्या संरक्षणासाठी सरहद्दीवर लढणारा जवान आणि त्याचे हौतात्म्य याने कोणत्याही भारतीयाचे मन हेलावून जाते. लतादीदींचे 'ऐ मेरे वतन के लोगों' इतकी वर्षे कानावर पडत असूनही अजूनही लोकांच्या डोळ्यांत पाणी उभे करते याचे कारण लोकांची जवानांविषयीची असीम आदराची भावना. जवानाला सरहद्दीवर लढायला पाठविताना त्याला कोणी कमी दर्जाच्या बंदुका, चलनवलनाची साधनसामग्री किंवा खाणेपिणे पुरवत आहे असे कळले तर लोकांचा तिळपापड होतो. जवानाच्या शौर्याचा पाठपुरावा करण्याची ज्यांची जवाबदारी, ती मंडळी साधनसामग्रीचे निर्णय लाच खाऊन करतात हे काही नवीन ब्रह्मज्ञान नाही. निदान बोफोर्स प्रकरणापासून याची सर्वांना जाणीव आहे. पण तरीही दिल्लीतील 'तहलका गटा'ने मोठा धुमाकूळ घातला याचा एक भयानक परिणाम होऊ शकतो. सरहद्दीचे संरक्षण करण्यासाठी इंच इंच जागा लढविण्याची लोकांची इच्छा कमजोर होऊन जाणार आहे.

जाळ्यात सापडलेले लोक दोषी ठरतील, शिक्षा भोगतील किंवा सुटूनही जातील; सरकार कदाचित् पडेल, कदाचित् टिकूनही राहील. या प्रकरणी काय निष्पन्न होते त्यापेक्षा छुपा कॅमेरा बाळगणाऱ्या मंडळींच्या हाती जी प्रचंड ताकद निर्माण झाली आहे त्याचा खोलात जाऊन विचार करणे आवश्यक झाले आहे.

जुन्या काळापासून लहान मुलांच्या मनांवर चित्रगुप्ताची भाकडकथा बिंबवली जात असे. देवाच्या दरबारी कोणी चित्रगुप्त नावाचा हिशेबनीस असतो. तो बारकाईने प्रत्येक माणसाची अगदी बरीकसारीक कर्मेही टिपून ठेवतो. माणसाने स्वतःच्या मनाला फसवले तरी तो चित्रगुप्ताला फसवू शकणार नाही. मेल्यानंतर देवाच्या दरबारात उभे राहून चित्रगुप्ताने मांडलेल्या पापपुण्याच्या ताळेबंदासमोर झाडा द्यावा लागतो, ही कल्पना, माझ्या पिढीततरी, लहान मुलांच्या मनावर इतकी ठसलेली होती, की त्यामुळे काही वेळातरी काही अनिष्ट गोष्टी हातून घडण्याचे टळत असे.

आता देवाचेच कोणाला फारसे भय राहिलेले नाही. मेल्यानंतर पाप्यांना यमदूत काय यातना देतात त्याची चित्रे एखाद्या जुन्या देवळाच्या भिंतीवर पाहून अंगाला थरकाप सुटायचा. आता लहान बाळेसुद्धा असल्या भाकडकथांना भीक घालीत नाहीत. देव नाही, त्याचा दरबार नाही आणि चित्रगुप्तही नाही; तेव्हा देखरेख ठेवणारे कोणीच नाही. लहानपणी आईबाप आणि मोठेपणी पोलिस यांची नजर चुकवून काहीही करायला हरकत नाही अशी 'मनःपूतम् समाचरेत्'

ही सार्वत्रिक धारणा सर्वदूर पसरली. सामान्य माणसाची ही स्थिती तर सत्ताधाऱ्यांचे काय विचारावे? सत्ता म्हणजे भ्रष्टाचार, अनिर्बंध सत्ता म्हणजे अनिर्बंध भ्रष्टाचार हे लॉर्ड अॅक्टनचे वाक्य सर्वमान्यच आहे. हा भ्रष्टाचार करताना सत्तेची सर्व साधने वापरावी, सहकाराचा स्वाहाकार करावा, सरकारही विक्रीस काढावे आणि त्यातून उभा झालेला पैसा वापरून निवडणुका जिंकाव्यात व पुन्हा एकदा सत्ता जिंकावी असे सत्ता आणि मत्ता यांचे दुष्टचक्र गतिमान झाले.

सत्तासंपत्ती आणि भ्रष्टाचार हे द्वंद्व मोडण्याकरिता समाजवाद्यांनी एक नवीन तत्त्वज्ञान काढले. 'ज्याने त्याने समाजाला आपल्या कुवतीप्रमाणे द्यावे आणि समाजाकडून गरजेपुरतेच घ्यावे' या पायावर सारी समाजव्यवस्था आधारली म्हणजे भ्रष्टाचाराचे नावच राहणार नाही, अशी त्यांची कल्पना; पण ती पूर्णतः फसली. समाजवादाच्या माहेरघरीसुद्धा 'कमीत कमी द्यावे आणि जास्तीत जास्त उकळावे' अशीच समाजरीती रूढ झाली.

गांधीजींनी हाच प्रश्न सोडविण्यासाठी विश्वस्ताची कल्पना मांडली. सत्तासंपत्ती असलेल्यांनी आपल्याकडे ती केवळ ठेव म्हणून असल्याचे मानावे म्हणजे त्याचा उपभोग स्वार्थासाठी होणार नाही अशी त्यांची कल्पना. गांधीजींचा खटाटोपही व्यर्थ झाला. त्यांचे इतिहासप्रसिद्ध अंत्येवासी भ्रष्टाचारात आकंठ बुडून गेले.

चित्रगुप्ताची जागा आता स्पर्धा घेईल या आशेवर स्वतंत्रतावादी खुल्या बाजारपेठेचा पुरस्कार करीत होते. स्पर्धेचे जाते देवाच्या गिरणीप्रमाणे पीठ चांगले दळते; पण फार मंद गतीने दळते. खलनायकांच्या पापांचे सर्व घडे भरले म्हणजे त्यांना आपोआप सजा मिळेल असे गृहीत धरले तरी इतका वेळ सारे सोसणे कोणालाही अशक्य होते.

यातूनच बॉलिवूडच्या चित्रपटांत दिसणारा 'ढिश्यॉंव ढिश्यॉंव' नायक उभा राहिला; पण असली स्टंटबाजी सामान्यांना जमणारी नाही आणि त्यातील रक्तपात सदभिरुचीस धरून नाही. मग, सदाचाराचा पाठीराखा कोण? या प्रश्नाने समाजाला ग्रासले.

सामान्य माणसाचा आधार इतिहासात एकच दिसून येतो. त्याचे जे काही भले झाले ते तंत्रज्ञानामुळे. भारतापुरताच आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या कालखंडाचाच विचार करायचा म्हटले तरी हे स्पष्ट होते. स्वातंत्र्यानंतर भारत अन्नधान्याच्या उत्पादनात स्वावलंबी झाला, गोरगरिब खाऊ लागली याचे कारण कोणी नेहरू नाही, कोणी समाजवादी नियोजन नाही; हा चमत्कार घडला तो संकरित वाणांच्या हरितक्रांतीने.

पूर्वी पुरुष आणि बायाही ऐन तरुण वयात पटापट मरून जायच्या. आता साठसत्तर वर्षे वय झाले तरी मरायचे नाव कुणी घेत नाही. लोक खातातपितात व्यवस्थित त्यामुळे रोगराई कमी झाली; पण, मुख्य श्रेय द्यावे लागेल ते वैद्यक शास्त्रातील नवनवीन शोधांना. विषमज्वर, देवी, कॉलरा हे सारे एके काळचे महाभयानक यमदूत. प्रतिजैविकां (अँटिबायोटिक्स) पुढे सारे निष्प्रभ होऊन संपले.

भ्रष्ट सत्ताधाऱ्यांनी गांजून गेलेल्या जनतेच्या मदतीला पुन्हा एकदा तंत्रज्ञानच सरसावून पुढे आले आहे. राजकारणात अशा तंत्रज्ञानाचा वापर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी पहिल्यांदा केला आणि बदनामी होऊन, त्यांना राजीनामा द्यावा लागला. सत्ताधाऱ्यांनीच तंत्रज्ञानाचे नवीन हत्यार आपल्या हाती घेणे लोकांना रुचले नाही, पण सामान्य माणसांनी तंत्रज्ञानाचा वापर करून भल्याभल्यांना उघडे पाडावे यातील रोमांचकता लोकांना सहज भावते.

फ्रँकफुर्टच्या विमानतळावर एका जागी जेम्स् बाँड पद्धतीच्या साधनांची माहिती मिळते. अंगठीतील कॅमेरा, कोटाच्या बटनातील ध्वनिमुद्रक, भिंतीपलीकडचेसुद्धा स्पष्ट पाहणारे कॅमेरे — सारेच मोठे अद्‌भूत. या साधनांचा वापर काही सच्छील धाडसी तरूण मंडळी करू लागली तर येत्या काही वर्षांत धनदांडगे आणि सत्तदांडगे यांना 'दे माय धरणी ठाय' होऊन जाणार आहे. प्रत्येक नवीन तंत्रज्ञान काही प्रश्न सोडवते आणि काही नवेच प्रश्न तयार करते. दिवाभीत घुबडे वाईट परिणामांचा बागूलबुवा करून तंत्रज्ञानाच्या प्रगतीसच विरोध करू पाहतात; तर आशावादी उद्यमशील त्या दोषांचे निराकरण करण्यासाठी आणखी नव्या तंत्रज्ञानाचा शोध करण्याची कास धरतात. नवीन तंत्रज्ञानाने भ्रष्टाचारी उघड्यावर पडतील; पण त्याबरोबरच सामान्य माणसाच्या जीवनातील खासगी जगण्याचा हक्क छिनावला जाईल काय? आपल्या घरी शांतपणे जीवन कंठणाऱ्या नागरिकांना 'भिंतीपलीकडून कोणी Piping Tom आपल्यावर नजर ठेवून तर नाही ना?' अशी धाकधूक वाटत राहिली तर काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर पाचदहा वर्षांत नव्याने उभे रहाणारे तंत्रज्ञान देईल. तोपर्यंत

'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय'

नवीन तंत्रज्ञान अवतार घेऊन आले आहे याचा आनंदीआनंदच होणार आहे.

*दि. २२/३/२००१*

■■

# असाही एक ‘एप्रिल फूल’

हा एक योगायोगच म्हणायचा, की त्यामागे काही संख्याशास्त्रीय नियम आहे, कळत नाही. येणार येणार, होणार होणार म्हणून गाजत असलेल्या घटना प्रत्यक्षात येतात तेव्हा अगदीच किरकोळ वाटतात आणि घडून गेल्यानंतर काही विशेष घडले असा काही मागमूसही राहत नाही. धूमकेतूचे आकाशात दिसणे असो का अष्टग्रहीसारख्या भयानक आपाताची वार्ता असो का उल्कांच्या वर्षावाचे भाकीत असो; येण्याआधी त्यांची जाहिरात जास्त, प्रत्यक्षात ‘डोंगर पोखरून उंदीरच निघावा’ असा अनुभव. हे काही फक्त आकाशस्थ ग्रहताऱ्यांनाच लागू पडते असे नाही. २००० साल उगवले तेव्हा Y2K समस्येने साऱ्या गणकयंत्रांत मोठा उत्पात घडून येईल अशी मोठी धास्ती सगळीकडे पसरली होती; प्रत्यक्षात ‘अगा, जे मुळातच नाही’ असा अनुभव आला.

उद्या १ एप्रिल २००१. १ एप्रिल हा एकमेकांना गमतीखातर फसवून मूर्ख बनविण्याचा दिवस. खरे म्हटले तर, ‘व्हॅलेंटाईन डे’इतकाच हा परकीय. व्हॅलेंटाईन दिवशी एकमेकांवरचे प्रेम व्यक्त करायचे असते ते भेटवस्तूंनी, पत्रांनी. एक एप्रिल रोजीही हेतू तोच, कार्यक्रम वेगळा. अगदीच अनोळखी माणसाबरोबर कोणी १ एप्रिल खेळायचा प्रयत्न करीत नाही, दणके बसायची शक्यता जास्त. आपुलकीच्या माणसांची चेष्टमस्करी करायचा हा दिवस. जगाला वर्षभर मूर्ख बनविणारे कोणी शहाणे १ एप्रिलच्या कार्यक्रमाविरुद्ध बोलू लागलेले नाहीत; चेष्टामस्करीचा हा कार्यक्रम बिनखर्चाने चालतो, त्याचा काही मोठा उद्योगव्यवसाय बनलेला नाही; त्यामुळेच खंडणीवाल्यांनाही या कार्यक्रमात फारसे स्वारस्य वाटत नसावे.

उद्याचा १ एप्रिल येणार येणार म्हणून दोन वर्षे गाजतो आहे. उद्या काय होणार आहे? साध्या शब्दांत सांगायचे झाले तर आयातीवरील सारे निर्बंध

उद्यापासून रद्द होणार आहेत. आयातीवरील बंदी आणि निर्बंध समाजवादी नियोजनाच्या काळात घातले गेले. परकीय चलन दुर्मिळ, त्याचा वारेमाप उधळपट्टीने खर्च होऊ नये हा वर वर सांगायचा हेतू. प्रत्यक्षात 'इंपोर्टेड' मालाची 'क्रेझ' असलेल्या या देशात आयात मालाच्या व्यापाराचा फायदा फक्त आपल्या पुठ्ठ्यातील लोकांनाच व्हावा अशा पद्धतीने या बंधनाची अंमलबजावणी झाली. आयात म्हणायला तेवढी सारी बंद; पण ज्यांचे काही लागेबांधे असतील तर त्यांना लायसेन्स् मिळू शके. काही वेळा लायसेन्स्‌चा उपयोग करून ही मंडळी स्वतःच आयात करीत; पण बहुतेक वेळा इतकी यातायात कशाला म्हणून लायसेन्स् काळ्या बाजारात विकून टाकून गडगंज पैसा कमवीत.

जागतिक व्यापार संस्थेने देशादेशांतील व्यापार खुला करण्यासाठी जे नियम घातले त्यांतला सर्वांत पहिला नियम हा, की आयातींवरचे असले निर्बंध संपूर्णपणे संपले पाहिजेत. निर्बंध ठेवा; पण ते पारदर्शी असावेत, सर्व देशांना समान लेखणारे असावेत आणि देशातील सगळ्या नागरिकांना आयात करण्याबद्दल सारखाच अधिकार असला पाहिजे. निर्बंध काढा आणि त्याऐवजी त्यांचा परिणाम साधण्यासाठी आयातीवर योग्य त्या प्रमाणात आयात शुल्क लावा असा हा साधा नियम आहे. आयात शुल्क किती लावायचे याचा नियम ज्या त्या देशाने करावयाचा आहे. वेगवेगळ्या मालासाठी किती आयात शुल्क लावणे आपल्याला आवश्यक वाटते याची नोंद ज्या त्या देशानेच करावयाची आहे. एकदा तशी हमी दिली म्हणजे त्या मर्यादेत आयात शुल्काचे धोरण राहिले पाहिजे, एवढेच. हा नियमसुद्धा एवढा कठोर नाही. एखाद्या मालाची फारच आयात होते आहे किंवा एखाद्या मालाची आयात राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून धोक्याची आहे असे सांगूनही यातून पळवाट काढता येते. थोडक्यात, आयातीवरील निर्बंध दूर होणे हे काही संकट नाही, गुढ्या तोरणे उभारून साजरा करावा असा हा सर्वसामान्यांसाठी उत्सवाचा मंगलप्रसंग आहे.

हा असला 'बहुजन सुखाय' कार्यक्रम हिंदुस्थानच्या सरकारने कबूल केलाच कसा हे मोठे कोडेच आहे. त्याचा इतिहास असा. आयातींवरील निर्बंध हटविण्याच्या या नियमाला एक अपवाद आहे. ज्या देशांचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि देवाणघेवाण आंतबट्ट्याचे आहेत त्यांना हा नियम लागू नाही. जागतिक व्यापारसंस्थेच्या वाटाघाटी चालू होत्या तेव्हा हिंदुस्थानचा जगाबरोबरचा ताळेबंद आंतबट्ट्याचा होता. कधीकाळी निर्यात वाढेल, परकीय चलन मुबलक होईल अशी शक्यता शासनात कोणाला वाटत नव्हती. त्यामुळे, 'जागतिक ताळेबंद

सुधारला म्हणजे आयातीवरील निर्बंध उठवायचे, एवढेच ना? असे कधी व्हायचे नाही आणि निर्बंध उठविण्याची वेळ यायचीच नाही' अशा कल्पनेने हा कार्यक्रम हिंदुस्थानने स्वीकारला.

सुदैवाने म्हणा की दुर्दैवाने म्हणा, आर्थिक खुलिकरणानंतर, त्याआधी सोने गहाण ठेवणारा देश चांगली भरभक्कम गंगाजळी गाठोड्यात मारून बसला. 'अशा देशाला काही आंतबट्ट्याचा ताळेबंद असलेला देश म्हणता येणार नाही. तेव्हा, आता हिंदुस्थानने आयातीवरील निर्बंध उठविले पाहिजेत' अशी मागणी युरोपीय देशांनी केली, अमेरिकेने केली. हिंदुस्थान सरकारने सारे काही करून पाहिले; आकांडतांडव केले, युक्तिवाद केले पण काही जमले नाही. शेवटी, दोन वर्षांच्या अवधीत आयातीवरील सारे निर्बंध संपविण्याचे सरकारला कबूल करावे लागले. त्या मितीस १४३० वस्तूंच्या आयातीवर निर्बंध होते. १ एप्रिल २००० रोजी त्यांतील ७१५ संपविण्यात आले. उरलेले ७१५ उद्या १ एप्रिल २००१ रोजी संपायचे आहेत आणि हे सारे संपले तर आयात मालाचा महापूर देशात येईल, सारे उद्योगधंदे – अगदी शेतीसुद्धा त्यात वाहून जाईल अशी आरडाओरड चालू आहे. कोणी न्यूझीलंडहून येणाऱ्या सफरचंदांविषयी बोलतो, कोणी युरोपातून स्वस्त दुधाचा महापूर येथे येईल अशी अफवा पिकवितो. चीनमधून येणाऱ्या औद्योगिक मालाबद्दल तर कुतूहल आणि गहजब टोकाचा आहे. १ एप्रिलबद्दल पोल्ट्रीवालेही मोठ्या चिंतेत आहेत. अमेरिकेतील लोक प्रचंड प्रमाणावर कोंबड्या खातात; पण तंगड्या खात नाहीत; त्यांत हानीकारक चरबी असते हे कारण. हिंदुस्थानात मात्र याच तंगड्या लोक मोठ्या षौकाने खातात. अमेरिकेत मागणी नसलेल्या कोंबड्यांच्या तंगड्या येथे ढिगाने येऊन पडतील आणि ग्राहकाला १८ रुपये किलोने त्या उपलब्ध होतील याची कुक्कुटपालकांना मोठी चिंता पडली आहे.

गंमत अशी, की या ग्राहकांचा आवाज कोणीच उठवत नाही. 'स्वदेशी'चा अभिमान कोणाला नसतो? पण आपले आपले म्हणून गचाळ माल रांगा लावून महागड्या किंमतीत घेतला तर त्यामुळे देशाचे काही भले होते असे, ॲम्बॅसडर आणि फियाट गाड्यांच्या उदाहरणावरूनतरी काही दिसत नाही. उद्योजक हलकल्लोळ करतात; पण 'थोडा वेळ द्या, आम्ही जगाच्या तोडीस तोड माल पडतळीच्या किमतीत देऊ' असा कोणी चकार शब्दसुद्धा काढीत नाही.

उद्या १ एप्रिल रोजी आभाळ कोसळणार आहे का? गेल्या वर्षभराच्या अनुभवावरून असे काही दिसत नाही. गेल्या १ एप्रिल रोजी ७१५ वस्तूंवरील

आयात निर्बंध उठले, कोणते आकाश कोसळले? त्यापैकी कोणत्याच मालाच्या आयातीत लक्षणीय वाढ झालेली दिसत नाही. त्यांतील २०० वस्तूंचीतर आयातच झालेली नाही. मोठी वाढ झाली ती सुपारी, तेंदुपत्ती, कुलुपे, लेखण्या, काचसामान, खेळणी, बॅटरी सेल्स्, सफरचंद इत्यादींच्या आयातीत. पण, त्यांच्या आयातीमुळे आयातीतील एकूण वाढ १० कोटी रुपयांच्या वर नाही. हे झाले गेल्या वर्षीचे. पुढील वर्षी काय होईल? आयातीचा महापूर येऊन कोसळेल का? हिंदुस्थानातील उत्पादन अकार्यक्षम राहिले, किमती महागड्या राहिल्या तर परदेशातील माल आपल्या बाजारपेठेत उतरेल यात काहीच शंका नाही. तो तसा उतरावा हाच मुळी व्यापार खुला करण्याचा हेतू आहे. पण, आयात प्रमाणाबाहेर होऊ लागली तर त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडे अनेक साधने आणि उपाययोजना आहेत. त्यांचा शहाणपणाने वापर झाला तर आपल्याकडील उत्पादक आणि उद्योजक यांना जागतिक दर्जाची कार्यक्षमता संपादण्याइतकी उसंत आणि अवधी निश्चित मिळू शकेल.

मग, उद्याच्या १ एप्रिल रोजी जणू काही नवा भूकंप व्हायचा आहे अशा अफवा कोण पसरवीत आहेत? यादी करणे काही कठीण नाही. लायसेन्स्-परमिट व्यवस्था संपल्यामुळे दुःखी होणारे नेते, परमिटचा फायदा घेणारे तस्कर व काळाबाजारवाले आणि हुकुमी बाजारपेठ ताब्यात ठेवून गचाळ माल ग्राहकाच्या गळी उतरवून चंगळ साधण्याची सवय झालेले उद्योजक या यादीच्या अग्रभागी राहतील. उद्या १ एप्रिल रोजी काहीच संकट अकस्मात कोसळणार नाही; एक परिवर्तन होईल आणि त्यातून देशाची मोठी प्रगती होईल. आयातीवरील बंधने उठविण्यामुळे उत्पात होणार आहे अशा अफवा हा जनतेला 'एप्रिल फूल' बनविण्याच्या नेतातस्करादींच्या कार्यक्रमाचा भाग आहे असे समजून शहाण्यांनी आपल्या आपल्या कामात राहावे हे भले!

*दि. २८/३/२००१*

■■

# कोटा राज्य संपले, 'कोटा राज्य चालूच आहे!'

१ एप्रिल २००१ हा दिवस नेहमीप्रमाणे उगवला, नेहमीप्रमाणे मावळला; कोठे धरणीकंप झाला नाही, कोठे जगबूड आली नाही. सकाळ संपता संपता दिल्ली येथील विज्ञानभवनात व्यापारउद्योगमंत्री श्री. मुरासोली मारन त्यांच्या दोन राज्यमंत्र्यांसह आले आणि आयातनिर्यातविषयक नवे धोरण जाहीर करण्यासाठी भाषण करायला उभे राहिले.

त्या दिवशी देशात उत्पात झाला, वावटळ उठली; पण त्याचा संबंध व्यापारमंत्र्यांच्या निवेदनाशी नव्हता, जागतिक व्यापारसंस्थेशी तर नाहीच नाही. मुंबईच्या शेअर बाजारात केतन पारेखच्या रूपाने नवा हर्षद मेहता उभा राहिला की काय? शेअर बाजारातील किमतीची घसरण कोणत्या पायरीपर्यंत गडगडणार? छोट्या मोठ्या गुतवणुकदारांना किती हजार कोटी रुपयांचा फटका बसणार? या साऱ्या प्रश्नचिन्हांनी अनेकांच्या पोटात गोळा उभा राहिला होता. सकाळी सकाळी कस्टम खात्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या घरावर आयकर अधिकाऱ्यांनी धाड घातली आणि वित्तमंत्र्यांनी महसुलासंबंधी सर्वांत मातबर अधिकाऱ्याला लगेच निलंबित केले यामुळेही प्रचंड खळबळ माजली. भ्रष्टाचार आणि भानगडी यांचा सर्वसामान्य नागरिकांच्या मनावर आता फारसा परिणाम होत नाही; एक प्रकारची बधिरता आली आहे. इकडचा जॉर्ज गेला, तिकडचा जॉर्ज चालला. आता, दररोज कोण कोण जातो आणि कोण कोण राहतो ते, शक्य तो डोके शांत ठेवून, पाहणे व ऐकणे याखेरीज आपल्या हाती काय आहे अशी 'दुःखेषु अनुद्विग्नमनाः' स्थितप्रज्ञ वृत्ती भल्याभल्यांनीसुद्धा धारण केली आहे.

याउलट १ एप्रिल रोजी समाजवादाच्या काळापासून चालत आलेल्या लायसन्स्–परमिट–कोटा राज्यातील लायसन्स् राज्य संपणार याचा आधी खूपच गाजावाजा झाला होता. आयातीवरील निर्बंध उठले म्हणजे सर्व प्रकारचा माल

परदेशांतून आपल्याकडे महापुरासारखा घोंघावत येईल आणि त्यात भारतातील उद्योगधंदे आणि शेतीसुद्धा वाहून जाईल, नष्ट होईल अशी सगळीकडे धाकधूक पसरली होती.

विज्ञानभवनात व्यापारउद्योगमंत्री उठले, त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. अर्थमंत्री दरवर्षी लोकसभेत अंदाजपत्रक सादर करतात. दोन तासांच्या त्यांच्या भाषणाच्या कालावधीत हिंदुस्थानभरच्या साऱ्या प्रसिद्धिमाध्यमांचे डोळे त्यांच्यावर खिळलेले असतात. त्यांचे भाषण शब्दशः जनतेपर्यंत पोहोचवले जाते. भाषण चालू असतानाच दूरदर्शनच्या आणि इतर वाहिन्यांच्या केंद्राकेंद्रांत अर्थशास्त्रज्ञ, कारखानदार, व्यापारी अशी जाणकार मातबर मंडळी चर्चेकरिता जमवली जातात. वित्तमंत्र्यांच्या तोंडून एखादा प्रस्ताव बाहेर पडताच किंवा पडण्याच्याही आधी प्रश्नोत्तरांच्या, चर्चांच्या फैरी झडतात. उद्योगमंत्र्यांच्या भाषणाच्या वेळी असा काहीच झगमगाट विज्ञानभवनात नव्हता. मंत्रिमहाशयांच्या मनात याची जाणीव कुठेतरी सलत असावी; परंतु अपेक्षेप्रमाणे सभेला गर्दी जमली नाही तरीदेखील आपले नियोजित भाषण पूर्ण करण्याऱ्या पुढाऱ्याप्रमाणे त्यांनी आपले भाषण पुरे केले. वित्तमंत्र्यांच्या थाटानेच, आपली प्रत्येक घोषणा प्रचंड महत्त्वाची आहे याची लोकांनी नोंद घ्यावी असा त्यांचा मोठा प्रयत्न चालू होता.

तसे पाहिले तर व्यापारमंत्र्यांनी लोकसभेत आयात-निर्यात धोरण जाहीर करावे अशी प्रथा पाडणे योग्य ठरेल. अर्थव्यवस्थेचे दोन भाग आहेत - देशांतर्गत आणि परदेशी व्यापार. वित्तमंत्र्याच्या अंदाजपत्रकाचा प्रभाव दोन्ही भागांवर पडतो तसेच व्यापारमंत्रालयाचे आयात-निर्यात धोरणसुद्धा आंतरराष्ट्रीय व्यापाराखेरीज देशातील आर्थिक चलनवलनावर मोठा प्रभाव पाडते. आयात-निर्यात धोरण दरवर्षी जाहीर होत नाही; एक पंचवर्षीय धोरण ठरते आणि त्यात आवश्यक वाटणारे बदल दरवर्षी 'एप्रिल फूल'च्या दिवशी जाहीर करण्यात येतात.

चालू पंचवर्षीय आयात-निर्यात धोरणाचे शेवटचे वर्ष चालू झाले आहे, त्यात काही फार मोठा बदल घडेल अशी कोणाची अपेक्षा नव्हतीच. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत भारताच्या निर्यात व्यापारात, जगातील एकूण व्यापार ज्या गतीने वाढला त्याच्या दुप्पट गतीने वाढ झाली. तेव्हा काही ऱ्हस्वदीर्घाचे बदल आणि काही किरकोळ फेरफार सोडल्यास काही विशेष ऐकायला मिळेल किंवा घडेल ही शक्यताच नव्हती.

विज्ञानभवनात जमलेल्या साऱ्यांचे लक्ष लागले होते ते मंत्रिमहाशय आयातनिर्बंधासंबंधी काय घोषणा करतात याकडे. शेवटचे ७१५ आयातनिर्बंध इतिहासजमा करण्याचे काम व्यापारमंत्री पार पाडतात का काही रडकीफुसकी कारणे सांगून काही चालढकल करतात की काय, 'राष्ट्रीय सुरक्षा', 'गरीबांना संरक्षण' असली काही रडगाणी गातात की काय यावरच सगळ्यांचे लक्ष होते. व्यापारमंत्र्यांनी आयातनिर्बंधांचा मुद्दा चतुर मुत्सद्द्याप्रमाणे भाषणाच्या शेवटापर्यंत टांगून ठेवला आणि शेवटी थोडक्यात सांगून टाकले 'कोटा'राज संपले आहे. अर्थशास्त्रात आपण अगदीच अनभिज्ञ नाहीत याची स्वतःलाच खात्री पटवून देण्याकरिता त्यांनी जगदीश भगवती आणि क्रुजेर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांची अवतरणे देऊन आयातीवरील निर्बंधांमुळे देशाचे कसे नुकसान होते, साऱ्या जगातील व्यवस्थेची कशी हानी होते हे पटवून दिले. 'कोटा' राज्य बुडाल्याची ऐतिहासिक जवाबदारी एकट्या आपल्यावरच पडू नये याकरिता, "१९९६ सालापासून १०२०२ निर्बंध टप्प्याटप्प्याने कमी करीत, गेल्या वर्षी ७१४ निर्बंध संपल्यानंतर आता फक्त ७१५ शिल्लक आहेत. माझे काम फक्त उंटाच्या पाठीवर शेवटची काडी टाकण्याचे आहे. उंटाचे काही बरे वाईट झाल्यास आपल्या कानी सात खडे," अशा आविर्भावात, "गेल्या वर्षी ७१४ निर्बंध उठले त्याचा कोणताही भयानक परिणाम दिसून आला नाही हे अहवालांवरून स्पष्ट होते. तेव्हा शेवटच्या ७१५ आयातनिर्बंधांचे विसर्जन करताना, खरे म्हटले तर काही नवीन देखरेखीची, संरक्षणाची व्यवस्था उभी करण्याची काही आवश्यकता नव्हती. जगात आता बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका आणि ट्युनिशिया हे देश सोडल्यास कोणत्याही देशात आयातीवरील निर्बंध शिल्लक नाहीत. भारताने आता असल्या राष्ट्रांची साथसंगत सोडून भद्र राष्ट्रांची सोबत धरावी," हेही त्यानी ठासून सांगितले.

पण त्याबरोबरच 'हात दाखवून अवलक्षण' कशाला? आपली तयारी असावी म्हणून त्यांनी काही विशेष आर्थिक संरक्षणाच्या नव्या व्यवस्था मांडल्या.

१. गहू, तांदूळ, मका, पेट्रोल, डीझेल, युरिया इत्यादी माल आयात करण्याचा अधिकार फक्त सरकारने नेमलेल्या संस्थांनाच राहील. अशा संस्थांनी आयातीचा कारभार पूर्णतः व्यापारी तत्त्वाने करावयाचा आहे, म्हणजे सरकारी आदेशाप्रमाणे नाही.

२. वनस्पतिजन्य आणि प्राणिजन्य पदार्थांच्या आयातीसाठी 'कोटा' नाही पण, परमिट लागेल. हे परमिट कृषिमंत्रालयातील संबंधित विभागाने द्यायचे आहे.

३. आडगिऱ्हायकी मोटारगाड्या आयात करण्यासाठी काही कडक अटी घालण्यात आल्या आहेत आणि

४. आयातनिर्बंध उठल्यानंतर काही संकट तर ओढवत नाही ना यावर डोळ्यात तेल घालून निगराणी ठेवण्यासाठी एक 'युद्धनियंत्रण कक्ष' तयार करण्यात आला आहे.

व्यापारमंत्र्यांनी कागदोपत्री का होईना 'कोटा'राज्य संपवले याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. 'कोटा'राज्य संपवताना, नवीन सुरक्षाव्यवस्था उभी करण्याची देशाच्या हिताच्या दृष्टीने काही आवश्यकता होती असे दिसत नाही. पण, 'अधिकस्य अधिकम् फलम्' या उक्तीप्रमाणे ज्यादा बंदोबस्त ठेवण्यात काही चूक नाही, जाणती राजकारणी माणसे हे करणारच!

अन्नधान्य आणि युरिया यांची आयात अधिकृत यंत्रणेमार्फतच करता येईल ही तरतूद मात्र न समजण्यासारखी आहे. गॅट करारातील १७ व्या कलमानुसार अशी तरतूद करता येते हे खरे, पण आपल्या देशात अशी तरतूद करावी लागली याची कारणे व्यापारसंबंधी काही 'संस्थानां'ची जबरदस्त ताकद हे एक आणि रासायनिक खतांसंबंधी शासनाला अजूनही खंबीरपणे धोरण ठरविता आले नाही हे दुसरे.

'कोटा' राज्य संपलेले नाही, आयातीतील 'कोटा' राज्य संपले आहे. शेतीमालाच्या निर्यातीवरील सर्व बंधने जशीच्या तशी कायम आहेत; निर्यात 'कोटा' आहे, निर्यात मालाच्या किमान किमतीसंबंधी नियम आहेत, अधिकृत निर्यातयंत्रणांची मक्तेदारी आहे, सर्व काही तसेच आहे. थोडक्यात, जागतिक व्यापार संस्थेच्या कराराचे जोखड मानेवर पडले म्हणून शेतकऱ्यांच्या गळ्यामधील फासाचा एक तिढा सुटला आहे. जागतिक व्यापार संस्थेचा करार निर्यातीवरील बंधने काढा असे सांगत नाही; उलट, निर्यातीला अनुदाने देऊ नका असे सांगतो. कारण, कोणत्याही देशाचे शासन आपल्या शेतीमालाची निर्यात अडवू पाहण्याइतके खुळे असेल याची त्यांना कल्पना नसावी!

आपल्याकडे, अतोनात पिकले म्हणजेच फक्त निर्यातीचा विचार करायचा असे शासनाचे धोरण राहिले आहे. आपण तुडुंब खाल्ले म्हणजे उरलेले अन्न जगाला द्यायला हरकत नाही अशी आमच्या विद्वानांची कल्पना. 'आम्हाला सरत नाही तेव्हा इतर देशांनी आमचा माल घेतला पाहिजे' या तत्त्वावर सारे निर्यातधोरण वर्षानुवर्षे चालले आहे. असे केले नाही तर देशातील बाजारपेठेत किमती भडकतील आणि ग्राहक कोपायमान होईल याची धास्ती नियोजकांना

सतत पडलेली असते. साहजिकच शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीचा निर्यातबंदीचा फास १ एप्रिलनंतरही कायम राहिला आहे.

व्यापारमंत्र्यांनी 'राज्यशासनांनी निर्यातीला उत्तेजन देणारी विशेष सवलतींची क्षेत्रे जागोजाग उभी करावी' असे 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' ठेवून दिले आहे. त्यासाठी राज्यशासनांनी पैसा आणावा कोठून? आणि 'निर्यातबंदी आता आहे, आता नाही' असा छापापाणीचा खेळ चालू राहिला तर अशा योजना राबवूनही काय फायदा होणार?

'कोटा' राज्य संपले; 'मोले घातले रडाया' म्हणून संपले, खुल्या व्यवस्थेच्या निष्ठेने नाही. निर्यातीवरील निर्बंध हटायचे असतील तर शेतकऱ्यांनी रुमणे घेऊन बाहेर पडल्याखेरीज गत्यंतर नाही.

■■

# एक दिवस असाही उगवतो

एखादा दिवस असा उगवतो आणि एखादी घटना अशी घडते, की मनात गुपचूप दडून राहणारा, एरव्ही कोणालाही न जाणवणारा अहंकार पार उन्मळून पडावा.

६ एप्रिल २००१ रोजी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर 'किसान कुंभ' भरविण्यात आला होता. हे स्टेडियम एशियाड खेळांच्या उद्‌घाटनासाठी बांधण्यात आले. लाखावर प्रेक्षक आरामात बसू शकतील अशी तेथील व्यवस्था आहे. एरव्ही ती जागा सभामेळाव्यांसाठी दिली जात नाही; खेळ विभागाच्या मंत्री उमा भारती यांनी मोठ्या सौजन्याने किसान समन्वय समितीच्या 'किसान कुंभा'साठी ही जागा देण्याचे मान्य केले; एक दिवसाचे भाडे, प्रसंगानुसार साडेतीन ते साडेसहा लाख रुपये आहे, गरीब शेतकरी संघटनेच्या खिशाला परवडेल इतक्या कमी दरात ती देऊ केली. आठवडाभर आधी जाऊन पाहिले, आनंदीआनंद वाटला.

शेतकऱ्यांचा मेळावा म्हणजे बांबू, फळ्या वापरून उभा केलेला एक मंच, लाऊड स्पीकरची जेमतेम व्यवस्था आणि समोर शक्य तितक्या साफसूफ केलेल्या मैदानावर गच्च दाटीवाटीने बसलेली, कोणत्याही गैरसोयीबद्दल 'ब्र'सुद्धा न काढणारी आणि सारे प्राण कानांत आणून एकतानतेने भाषणे ऐकणारी शेतकरी स्त्रीपुरुष मंडळी. ६ एप्रिलचा 'किसान कुंभ' असा होणार नव्हता. सर्वांना बसायला खुर्च्या, नाही तर निदान बाक मिळणार होते. एवढ्या बाबीत का होई ना, शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या संघटनेच्या परिस्थितीत फरक झाला आहे या जाणिवेने खूप बरे वाटले.

शेतकरी संघटनेच्या मेळाव्यांना मिळणाऱ्या प्रतिसादाचा उत्स्फूर्तपणा गळा दाटून आणणारा असतो. ४ एप्रिलच्या संध्याकाळीच दिल्लीमध्ये महाराष्ट्रातले 'ग्यानबा' आणि त्यांच्या 'लक्षुम्या' दिसू लागल्या. अनवाणी पाय, गाठीगाठीची

लुगडी, डोक्यावर भाकरीपासून सरपणापर्यंत प्रवासात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे गाठोडे अशा अवतारातील शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी दिसू लागल्या. १९८० सालापासून असे महामेळावे वीसपंचवीस झाले. प्रत्येक वेळी ही सारी मंडळी कोणत्या भावनेने पेटून चूल बंद करून घराला कुलूप लावून शेतकरी संघटनेच्या सभांना यायला निघतात, शेकडो किलोमीटरचा प्रवास आगगाडीच्या डब्यात दाटीवाटीने बसून सारे काही सोसत करतात? हे मला अजून उमगलेले नाही; पण हे होते, प्रत्येक वेळी होते, न चुकता होते. संघटनेच्या प्रेमापोटी लोक हे करतात असे कोणी म्हटले तरी धन्य धन्य वाटते. ४ एप्रिलच्या रात्रीपासून टेलिफोनवर निरोप येऊ लागले – खांडव्यापासून ते आग्र्यामथुरेपर्यंत सर्व रेल्वे स्टेशनांचे फलाट लाल बिल्लावाल्या स्त्रीपुरुषांनी लगडून भरले आहेत; मंडळी थोडीफार तीर्थयात्रा करीत, प्रेक्षणीय स्थळे पाहत 'किसान कुंभा'साठी दिल्लीकडे निघाली आहेत. आकाशाला दोन बोटेसुद्धा पुरती न राहिल्याचा भास झाला.

६ एप्रिल उजाडला; मेळावा दुपारी एक वाजता सुरू व्हायचा होता. सकाळी उठून, पुंडलिकाच्या दर्शनाला आलेल्या या विठोबारखमायांचे दर्शन घेण्याकरिता मी स्टेडियमकडे गेलो. केवढे प्रचंड आवार ते! दोन फेऱ्या पुऱ्या घालणेसुद्धा आता प्रकृतीला झेपणे शक्य नाही. भोवतालचा हिरवळीचा सारा भाग लोकांनी फुलून गेला होता. सकाळच्या चहापाण्याच्या तयारीत सारे होते. कोठे न्याहरीसाठी दशम्या सुटत होत्या, कोठे कोठे लाकडे पेटवून चूल करण्याचा प्रयत्न चालू होता. स्टेडियम खेळांच्या सामन्यांसाठी आहे, त्यामुळे शेकडोंनी स्वच्छतागृहे आहेत – चांगली पांढऱ्या स्वच्छ फरशीची, भरपूर पाण्याचा पुरवठा असलेली. या व्यवस्थेचेच अनेकजण कौतुक करीत होते. सार्वजनिक स्वच्छतागृहात जाण्याच्या कल्पनेनेही माझ्या अंगावर काटा येतो. या साध्याभोळ्या जीवांची सुखाची माफक कल्पना पाहूनही डोळे ओलावले. समोरून एक, चिंध्यांचे पागोटे घातलेला म्हातारा माझ्याकडे धावत येऊ लागला; लोक त्याला अडवीत होते. 'मला भेटायचंय, भेटायचंय', असे ओरडत तो माझ्याजवळ येऊन पोहोचला; अक्षरशः गळ्यात मिठी घालून ओक्साबोक्शी रडू लागला. "साहेब, भाई धारिया गेले; सुभाष जोशी आता आपल्यातले राहिले नाहीत, पण त्यांना निरोप देऊन निपाणी भागातून मी एकटा आलो." काहीसा अभिमान, काही आक्रोश आणि प्रचंड आनंद अशा मिश्र स्वरात तो बोलत होता. १९८० मध्ये विडीतंबाखूच्या भावासाठी निपाणीच्या रस्त्यावर आम्ही चाळीस हजार शेतकरी २३ दिवस रस्ता रोखून बसलो होतो. २३व्या दिवशी दसरा होता, तो

आंदोलननगरातच गुढ्या उभारून साजरा करण्यात आला आणि २४व्या दिवशी याच ६ एप्रिलला पहाटे एस.आर.पी.चे लोक आले होते. मला पकडून दूर नेल्यानंतर त्यांनी बेछूट गोळीबार केला होता. त्यात बारा शेतकरी जागीच ठार झाले होते. त्या घनघोर आंदोलनात या म्हाताऱ्याने मला पाहिले असणार, कधीतरी भाकरी वाटून खाल्ली असणार, एकत्र पेज प्यायली असणार; या सगळ्या आठवणींनी त्याचे प्राण फुटू पाहत होते.

पंचवीस वर्षांपूर्वी स्वित्झर्लंडमधील जीवनाला रामराम ठोकून मी परत आलो. त्यानंतर किती सभा, किती बैठका; किती हजार मैलांचे प्रवास, किती तुरुंग आणि मनाला घरे पाडणारे कितीतरी अनुभव. या साऱ्यांच्या वेदना, लोकांचे हे प्रेम पाहिले म्हणजे बुजून जातात. कोण हे शेतकरी? कोण मी? मी ना यांच्या जातीचा, ना रक्ताचा. आजपर्यंत थोड्या का धुरीणांनी शेतकऱ्यांच्या कामासाठी जीव ओवाळून टाकले? पण त्यांतील बहुतेक 'नाही चिरा नाही पणती' असे उपेक्षेत इहलोक सोडून गेले. इतर दुर्भाग्य काही असो, लोकांचे प्रेम मिळण्याबाबतमात्र आपल्याला लॉटरी लागली आहे याची जाणीव झाली. लॉटरी लागण्याचा अभिमान तो काय असायचा? पण, मनात अहंकार अंकुरला, हे खरे!

दुपारी बरोबर एक वाजता सभेला सुरुवात झाली. दिल्ली म्हणजे प्रचंड अंतरांचे शहर. येथे कोठूनही काहीही जवळ अंतरावर म्हणून नाही. पन्नासशंभर किलोमीटरमध्ये फारशी शेतीही नाही. शेतकरी मेळाव्यांत निम्मीअधिक गर्दी शंभर किलोमीटरच्या अंतरावरून येणाऱ्या शेतकऱ्यांचीच असते; येथे असे फारसे कोणी नाहीच. हरियानामध्ये गव्हाची कापणी चालू झालेली, त्यात पुष्कळ लोक अडकलेले. चौधरी देवीलाल अपोलो इस्पितळात शेवटच्या घटका मोजीत असल्याची बातमी पसरली, त्याचाही हरियानाच्या उपस्थितीवर परिणाम झालाच. मुख्य गर्दी आली ती महाराष्ट्र आणि गुजराथेतून. दोनतृतीयांश महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत. आदल्या दिवशी नागपूर भागात गारांचा पाऊस झाला. गुजराथवरही एकामागून एक संकटे कोसळत आहेत; पण या दोन राज्यांतील शेतकऱ्यांनी मैदान सारे भरून टाकले.

राज्याराज्यांतील मान्यवर नेत्यांची भाषणे झाली. 'किसान कुंभा'त जमलेल्या साऱ्या संघटना या पहिल्यापासून खुल्या व्यवस्थेचा पाठपुरावा करणाऱ्या. 'एका दाण्यातून शंभर दाणे तयार करणारा शेतकरी स्वतः दरिद्री राहतो, कारण सरकारी व्यवस्थेची बाजारपेठेतील लुडबूड' हा त्यांचा मूलभूत सिद्धांत;

'शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे धोरण', 'सूट सबसिडीचे नाही काम, आम्ही घेऊ घामाचे दाम' या त्यांच्या घोषणा. जागतिक व्यापार संस्थेच्या विवादाचे रान चारी बाजूस पेटले आहे. बहुतेक मातबर मंडळी 'WTOमुळे आता शेतकऱ्यांचे वाटोळे होणार' म्हणून गळा काढीत आहेत. 'किसान कुंभा'त जमलेल्या ५५ संघटनांची भूमिका अगदी वेगळी. 'सरकारी व्यवस्थेच्या दंडबेड्या आमच्या हातापायांतून निघू द्या; आम्ही जगाशी सामना करून दाखवितो' अशा निर्धाराने ते एकत्र आलेले. 'संरक्षण कसले देता, हत्यार द्या' ही त्यांची मागणी. साऱ्या नेत्यांनी शेतकऱ्याच्या उगवणाऱ्या स्वातंत्र्याच्या पहाटेचे स्वागत केले, वेगवेगळ्या बहकाव्यांखाली येऊन WTOला अपशकुन करणाऱ्या घुबडांचा निषेध केला आणि शरद जोशी सांगतील तो कार्यक्रम अमलात आणू अशा शपथा निक्षून घेतल्या.

कार्यक्रम काय देणार? सोपाच दिला. जवान सरहद्दीवर लढतो, किसान देशाची ही लढाई शेतात लढायला सज्ज झाला आहे. कारगिलमध्ये लढणाऱ्या जवानाच्या घरी, वीजबिल भरले नाही किंवा कर्जफेड केली नाही म्हणून अधिकारी जाऊन त्रास देऊ लागले तर जवानाची हिंमत टिकावी कशी? देणे देता येत नाही म्हणून शेतकऱ्यावर विष खाऊन आत्महत्या करण्याची पाळी येत असेल तर किसानांनी जागतिक व्यापारपेठेशी लढाई लढावी कशी? कोणतीच देणी न देण्याचा कार्यक्रम ठरला, साऱ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. कुंभ संपला, पत्रकार परिषदा झाल्या, मुलाखती झाल्या. संघटनेच्या सभेत डझनावर TV कॅमेरे आजपर्यंत पाहिले नव्हते. खात्री पटली – नागपुरात मेळावे झाले, सांगलीला झाले, नांदेडमध्ये झाले, औरंगाबादला झाले; महाराष्ट्राबाहेर बातम्या फारशा गेल्या नाहीत– आता असे होणे शक्य नाही; मेळावा खुद्द राजधानी दिल्लीत भरला आहे, झाडून सारे पत्रकार हजर आहेत तेव्हा 'भारतातील शेतकरी स्वातंत्र्याला घाबरत नाहीत, जगाशी टक्कर द्यायला सज्ज आहेत' ही घोषणा जगभर पोहोचेल याची खात्री वाटली.

कधी नव्हे ते कुंभात झालेले विचारमंथन मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषांत छापून पत्रकारांच्या हाती दिले होते. फुलून भरलेले स्टेडियम लोकांच्या उत्साहाचा सज्जड पुरावा देत होते. आता काही गफलत होण्याची शक्यताच राहिली नव्हती. संध्याकाळी चौधरी देवीलाल यांच्या मृत्युची बातमी आली, कुंभाची बातमी TVवर थोडी मागे सरकली.

कृतकृत्य वाटत ६ एप्रिलच्या रात्री झोपायला गेलो. ७ एप्रिल रोजी सकाळच्या

वर्तमानपत्रांचा ढीग आला. पहिल्या पानावरील महत्त्वाची जागा चौधरींसाठी गेली. आतल्या पानावर, इंग्रजी वर्तमानपत्रांत, अगदी गुलाबी कागदावर छापल्या जाणाऱ्या अर्थशास्त्रीय वर्तमानपत्रांतही कुंभाचा मुख्य गोषवारा व्यवस्थित दिला होता. जमलेल्या गर्दीचे आणि मंचाचेही चांगले मोठे फोटो छापून आले होते. कुतूहलाने फोटोखालील ठळक टाईपातील मजकूर वाचला आणि टंच फुगलेल्या फुग्याला टाचणी लागावी तशी अवस्था झाली. विश्वसनीयतेकरिता विख्यात असलेल्या वर्तमानपत्रांतही फोटोखाली 'किसान कुंभ खुलिकरणाला आणि WTOला विरोध करण्याकरिता भरला होता' असे चक्क छापले होते. काय म्हणावे या कर्माला? कपाळाला हात लावून बसलो. हे असे घडलेच कसे? खुलासा देणारे पत्रक काढले, टेलिफोनवर वेगवेगळ्या वर्तमानपत्रांशी संपर्क साधला. तथ्य निघाले ते एवढेच, की असोसिएटेड प्रेसचा कोणी कॅमेरावाला कुंभाच्या वेळी हजर होता, त्याने फोटो काढले. आपलाआपला स्वतंत्र फोटोग्राफर प्रत्येक ठिकाणी पाठविण्याऐवजी अशा व्यावसायिक छायाचित्रकाराने काढलेला फोटो बहुतेक वर्तमानपत्रे विकत घेतात. कॅमेरावाले भाषण कसले ऐकतात आणि दिलेल्या पुस्तिका कसल्या वाचतात! शेतकरी जमले म्हणजे ते WTOचा विरोध करण्याकरिताच असणार अशी त्यांची त्यांच्या डाव्या बुद्धीतून झालेली खात्री. त्यांनी फोटोंच्या मागे 'WTO विरोधी मेळावा' असल्याचे लिहून टाकले आणि हजारो कार्यकर्त्यांच्या दिवसांच्या नव्हे, वर्षानुवर्षांच्या परिश्रमाला तडा पाडला.

दुःखात सुखाची गोष्ट बरी, की महाराष्ट्रातील बहुतेक वर्तमानपत्रांनी कोणताही गोंधळ घातला नाही. हिंदी वर्तमानपत्रांतील बातम्याही व्यवस्थित आहेत. तोंडघशी पडली ती फक्त उच्चभ्रू, गुलाबी पृष्ठांची इंग्रजी वृत्तपत्रे आणि त्यांचे वाचक.

एक दिवस असा उगवतो, एक घटना अशी घडते, की साऱ्या अहंकाराचा फुगा फुटावा. घटना लहानशी; पण साऱ्या आयुष्याच्या परिश्रमाविषयी प्रश्नचिह्न उभे करणारी!

*दि. २१/४/२००१*

■■

# जित्याची खोड...

पहिले महायुद्ध संपलेय देशात परतलेल्या वैफल्यग्रस्त रशियन सैनिकांनी बंड केले. आपले पगार मिळावे यापलीकडे त्यांची काही फारशी मागणी नव्हती; पण त्यांच्या उठावाची परिणती झारशाही उखडून टाकण्यात झाली. बोल्शेविकांनी कामगार क्रांतीची घोषणा केली तेथपासून ते बर्लिनची भिंत कोसळेपर्यंत जगावर समाजवादी साम्यवादी विचारांचे प्रभुत्व होते.

'फायद्याच्या बुद्धीतून व्यक्तीव्यक्तींनी केलेले निर्णय देशाच्या हिताचे असू शकत नाहीत. खुल्या व्यवस्थेत प्रगती होईल; पण ती फार काळ टिकू शकणार नाही. समाजाच्या सर्वंकष आणि टिकावू विकासासाठी सर्वंकष नियोजनच हवे. खासगी मालमत्ता समूळ नष्ट झाली पाहिजे आणि देशातील प्रत्येक नागरिक सरकारी यंत्राणेचा पगारी किंवा रोजीचा नोकर राहील अशी ही मांडणी.

आज थोडक्यात तिचा सारांश सांगायचा म्हटले तरी इतक्या पागल विचारांच्या पिशाच्च्यांनी साऱ्या जगाला ७० वर्षे पछाडले होते. यावर विश्वाससुध्दा बसत नाही. इतक्या तुटपुंज्या अर्थशास्त्राच्या पायावर एका सम्यक् तत्त्वज्ञानाचा डोलारा उभारला गेला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात – प्रश्न स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा असो, शेतकऱ्यांचा असो, दलितांचा असो – मार्क्सप्रणीत सिद्धांताचेच अधिराज्य चालू झाले. बुद्धिमंतांत तर एक बलदंड माफिया तयार झाला. मार्क्सच्या सिद्धांतापलीकडे जो कोणी काही बोलेल किंवा काही मांडेल तो अशास्त्राीय खोटा, कामगारविरोधी, अमेरिकन साम्राज्यशाहीचा कुत्रा असल्या निवडक नामाभिधानांनी त्याची संभावना होऊ लागली.

इतिहास आणि विज्ञान असल्या बाष्कळपणाला थोडीच दाद देणार आहेत? त्यांचा प्रवाह अव्याहतपणे चालूच राहिला. साम्यवाद्यांचा बौद्धिक अहंकार इतका बलदंड, की त्यांनी इतिहासच काय विज्ञानही वाकवायला सुरुवात

केली. इतिहासातील सर्व घटनांनी मार्क्स्‌च्या आज्ञेप्रमाणे कवायतीसाठी उभे राहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह. काही घटनाप्रसंग कवायतीत बसत नसतील तर मार्क्स्‌वादी शब्दांचे अवडंबर माजवून काही वेगळाच घटनाक्रम ते मांडीत किंवा काही वेगळाच अन्वयार्थ सांगत. स्टॅलिनने स्वत:च जीवशास्त्र आणि उत्क्रांती यासंबंधी खोटा पुरावा उभा करून एक नव्या सिद्धांतांचे कुभांड रचले. समाजवादी नियोजनाने आपला अभ्युदय होईल ही भावना प्रत्येक देशातील प्रतिभाहीन धडाडीशून्य पराजितांना मोठी सोयीस्कर होती. एकामागून एका देशातील सत्ता कोसळत गेल्या आणि तेथे लोकांच्या लोकशाही राज्याची Peoples Democracy सरकारांची स्थापना झाली. लोकांचे सरकार म्हणजे कम्युनिस्ट पक्षाची निरंकुश हुकूमशाही. लोकांचे सैन्य म्हणजे देशातील विरोधकांना मोडून काढणारे लष्कर. जे लोकांच्या लोकशाहीत नाही तेवढे सारे भांडवलशाही, साम्राज्यवादी रक्तपिपासू राक्षस असे व्याकरण चालू झाले.

या सगळया डोलाऱ्याची आर्थिक पायाभरणीच इतकी कच्ची होती, की एक दिवस सारे पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळून सपाट झाले. सोवियट युनियनचे विसर्जन झाले. संघराज्यातील राज्ये स्वतंत्र झाली. प्रत्येक राष्ट्र नियोजनाचा रस्ता सोडून खुलेपणाच्या रस्त्याने चालू लागले.

जगाच्या इतिहासात समाजवादी साम्राज्याच्या पतनाला दुसरी तोड नाहीण रोमन साम्राज्य कोसळले त्याला निदान रानटी टोळ्यांच्या हल्ल्याचे निमित्त झाले. ब्रिटिश साम्राज्य कोसळले त्याला दुसरे महायुद्ध आणि वसाहतींतील उठाव कारणीभूत ठरले. रशियन साम्राज्य आपणहूनच कोसळले. एवढेच नव्हे तर सामूहिक नियोजन ही कल्पनाच बाष्कळ आहे याचा एका बाजूला गणिती सिद्धांत तयार झाला आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे सर्वसामान्यांच्या अंतर्मनात खुल्या व्यवस्थेच्या कार्यक्षमतेची ग्वाही रुजली.

समाजवाद उलथला तो प्रतीक्रांतीने नाही. याचा एक परिणाम असा झाला की समाजवादाचे सारे विक्रेते आपापल्या जागी जिवंत राहिले. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा गेली, राजकीय प्रतिष्ठा धुळीस मिळाली; पण समाजवादाच्या काळात त्यांनी विरोधकांचे जसे शिरकाण केले किंवा जशा शिरकाणाचे समर्थन केले तसे काहीच घडले नाही. खुल्या विचारवंतांच्या मनाला तशी कल्पनाही शिवली नाही. जुन्या समाजवाद्यांपैकी ज्यांच्याकडे काही कर्तबगारी होती ते नव्या व्यवस्थेत घुसून गेले आणि आपणच खुल्या विचाराचे आद्य समर्थक असल्याच्या आविर्भावात मिरवू लागले; पण असे थोडे बहुतेक जुने डावे पुन्हा एकदा इतिहास कलाटणी

घेणार आहे, पुन्हा एकदा आपले सोन्याचे दिवस येणार आहेत ही आशा मनात ठेवून जागोजाग दबा धरून आहेत. समाजवादाच्या काळात बांधल्या गेलेल्या मोठ्या धरणांचे तोंड फाटेपर्यंत कौतुक करणारे तद्दन मोठ्या धरणांच्या मागे साम्राज्यशाही कट असल्याचा शोध सांगत आहेत. जगभर एकसंध लाल साम्राज्य तयार करण्याचा आंतरराष्ट्रवाद मांडणारे आणि राष्ट्र या संकल्पनेचीच कुचेष्टा करणारे कॉम्रेड आता जागतिकीकरण आणि WTO यांचा निषेध करण्यासाठी गांधीवादी आणि भगवी स्वदेशीवाले यांच्याशी मेतकूट जमवून आहेत. खुलेपणात साऱ्या ऐतखाऊंचे पितळ उघडे पडणार, युनियनच्या ताकदीवर भरमसाट फायदे उपटलेले कामगार जागतिक स्पर्धेसाठी कार्यक्षमता दाखवणे भाग पडले तर नाराज होणार. त्या असंतोषातून पुन्हा एकदा समाजवादी क्रांतीचा पुनर्भव होणार अशी स्वप्ने पाहत आहेत.

याच्या उलट घडले असते तर काय चित्र दिसले असते? १९८५ च्या सुमारास बिगर समाजवादी देशांत मोठी आर्थिक मंदी येऊ घातली होती. मंदीची लाट प्रत्यक्षात येऊन कोसळली असती आणि परिणामतः नियोजनविरहित अर्थव्यवस्थेची सारी राष्ट्रे गुडघे टेकून समाजवादी रशियाकडे 'दे, हाता शरणागता,' म्हणून गेली असती तर स्वतंत्रतावादी विचारवंतांना कार्यकर्त्यांना लपण्यापुरता तरी आडोसा राहिला असता काय? इतिहास असे सांगतो, की उन्मत्त समाजवाद्यांनी विजयाच्या बेहोशीत लक्षावधी लोकांच्या कत्तली करून टाकल्या. व्यक्तीचे स्वातंत्र्य, बाजारपेठेची कार्यक्षमता आणि गुणवत्ता हे शब्ददेखील शब्दकोषातून हुकूमशहांनी काढून टाकले असते.

जागतिक व्यापारसंस्था आणि खुला व्यापार यात कर्तृत्वहीन नादान लोकांचे नेतृत्व करून, पुन्हा एकदा इतिहास उलटा फिरवण्याचा प्रयत्न कॉम्रेड करताहेत. त्यांची काय ती वासलात इतिहास लावेलच. आपल्याला कोणत्याही Stalag (युद्धकैद्यांच्या छावणी) मध्ये कुजावे लागणार नाही आणि बंदुकीच्या फैरींना सामोरे जावे लागणार नाही याची मनात खात्री पटल्यामुळे असली ठोकशाहीच समजू शकणारे आता अधिकाधिक धीट बनू लागले आहेत आणि हाती सत्ता नसतानादेखील इतिहास, विज्ञान आणि अर्थशास्त्र उलटेपालटे करू पाहताहेत. ही महंमद घोरी आणि पृथ्वीराज यांच्या इतिहासाची पुनरावृत्ती आहे. पृथ्वीराजाकडून तीन वेळा जीवदान मिळालेला घोरी एकदा पृथ्वीराज हाती लागल्यावर त्याचे अनन्वित हाल करण्यास डोळे काढण्यास सरसावला.

१० एप्रिल २००१ रोजी हैदराबाद येथे कम्युनिस्ट पक्षाने 'जनशक्ती' या

नावाने कामगार संघटनांची एक परिषद भरवली. शेतकरी चळवळीने सर्वप्रथम डाव्यांना शेतीक्षेत्रातून काढून लावले. आज जमिनीचे फेरवाटप, सामूहिक शेती, शेतीचे राष्ट्रीयकरण असला कार्यक्रम घेऊन कोणतीही कम्युनिस्ट शेतकरी संघटना काम करू शकत नाही. ज्या काही किरकोळ शेतकरी संघटना कम्युनिस्ट पक्षाशी नाते सांगतात त्या जातिवंत समाजवाद्याच्या तळपायाची आग मस्तकाला पोचवणाऱ्या 'शेतीमालाच्या रास्त भाव' याच कार्यक्रमावर. हैदराबादच्या परिषदेत भाषणे काय झाली? 'खुलेपणा म्हणजे गुलामी, जागतिकीकरण म्हणजे साम्राज्यवाद!' थोडक्यात उरफाटे समाजवादी शब्दकोश पुन्हा एकदा प्रचलित करण्याइतकी आशा, नव्या व्यवस्थेच्या शिडकाव्याने गारवा झाल्याबरोबर बिळातून बाहेर पडलेल्या भाई लोकांना वाटू लागली आहे. खुली व्यवस्था टाळायची असेल तर शेतीक्रांती झाली पाहीजे असाही सिद्धांत कौशिक कोलकाटा यांनी मांडला. डाव्यांच्या शब्दकोषात कृषिक्रांती याचा अर्थ उत्पादनात वाढ नाही, उत्पादकतेत वाढ नाही, तंत्राज्ञानाचा विकास नाही, बाजारपेठेत उपभोग्य वस्तूंची रेलचेल नाही, कृषिक्रांतीचा डाव्या शब्दकोषातील अर्थ जमिनीचे राष्ट्रीयीकरण समान वाटप किंवा सामूहिकीकरण, हे असे काही घडले तर खुल्या व्यवस्थेकडे जाणारा कालप्रवाह काही काळ खुंटल्यासारखा वाटेलही; परंतु मनुष्य आणि मानवी समाज यांचा अखंड वाढत्या स्वातंत्र्याचा शोध थांबवणे कोणाही हुकूमशहाला आजपर्यंत जमले नाही. यापुढेही जमणार नाही. समाजवादी पुन्हा एकदा नादान कर्तृत्वहीनांच्या असंतोषाचा फायदा घेऊन सत्तेवर येतीलही; पण त्यांचे राज्य टिकणार नाही, समाजवादाचा दुसरा अवतार ७० महिनेही टिकणार नाही. ७० वर्षांच्या समाजवादी साम्राज्याची सारी पापे जनतेने पोटात घातली. दुसऱ्या पतनाच्या वेळी इतकी क्षमाशीलता दुष्कर होईल. खऱ्या स्वातंत्रतावाद्यांना असला प्रतिशोध रुचणारा नाही; पण समूहवादाच्या विषवल्लीचे समूळ उच्चाटन इतिहासात व्हायचे असेल तर त्यासाठी परिणामकारक साधन इतिहासच ठरवेल.

*दि. १८/४/२००१*

■■

# चाकणचा कांदा आणि क्वेबेकचा दंगा

काहीसा भाग योगायोगाचा. १९ एप्रिल २००१च्या वर्तमानपत्रांत आतल्या पानांवर ठळक मथळ्याची; पण छोटीशी बातमी झळकली. सर्वसामान्य वाचकांचे त्या बातमीकडे लक्षही गेले नसेल. बातमीचा मथळा होता ''शासन कांदा, साखर इत्यादी नऊ शेतीमालांच्या निर्यातीवरील बंदी उठविणार.'' 'लोकमत'च्या मागील आठवड्यातील माझ्या लेखात 'आयातीवरील बंधने उठली, निर्यातीवरील बंधनांचे काय?' असा मुद्दा मी मांडला होता. बातमीचा तपशील जवळजवळ त्या लेखातील मजकुरासारखाच आहे.

योगायोगाचा भाग तो असा : १९८० मध्ये चाकण येथे कांद्याचे आंदोलन झाले. शेतकऱ्यांनी कांदा थांबवला, राज्य महामार्ग अडवला, तुरुंगवास पत्करला, मी स्वत: १३ दिवस उपोषण केले तेव्हा कोठे ५० पैसे किलो भावाने शासनामार्फत खरेदी चालू झाली होती. त्या मोसमातील कांद्याचा तिसरा भाग बाजारात येऊन गेला आणि शेतकऱ्यांची ताकद संपली असे मानून सरकारने पुन्हा खरेदी बंद केली. आम्ही पुन्हा आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न केला तेव्हा चुटपूट खरेदी झाली आणि पुन्हा बंद पडली. सहा महिन्यांत मी तिसऱ्या वेळेला उपोषणाला बसलो. मला अटक करून ससून हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. अजित निंबाळकर तेव्हा पुण्याचे कलेक्टर होते. बाकी कोणाच्या नाही; पण त्यांच्या जिवाची मोठी घालमेल होत होती. शेवटी एकदाच्या दिल्लीहून कांदा खरेदीच्या सूचना आल्या तेव्हा माझे तिसरे उपोषण संपले. त्यानंतर २१ वर्षांनी कांद्याचा प्रश्न अखेरचा सुटला असे दिसते.

१९७८ मध्ये जनता पक्षाचे सरकार असताना कांदा निर्यातबंदीच्या लपाछपीच्या खेळाला सुरुवात झाली. कांद्याचे पीक शेतकऱ्याच्या हाती आले, की निर्यातीवर बंदी घालायची आणि पडत्या भावात व्यापाऱ्यांची खरेदी संपली, की निर्यातबंदी

उठायची हा प्रकार लागोपाठ तीन वर्षे चालला. १९८० मध्ये 'आयातनिर्यात धोरण काही असो, शेतकऱ्यांना काही किमान भाव मिळाला पाहिजे' हे तत्त्व मान्य झाले; पण तरीही, निदान दर वर्षाआड, 'कांद्याचा भाव कधी वाढला म्हणून ग्राहकांची ओरड आणि कधी पडला म्हणून शेतकऱ्यांची तळमळ' हे चालूच राहिले. एका वर्षी महाराष्ट्र शासनाने १ रुपया किलो भावाने कांद्याची खरेदी केली आणि तो कांदा ३० पैशांनीही खपेना तेव्हा महाराष्ट्रभर सडत पडला; साऱ्या राज्यभर महिनाभर कुबट कांद्याचा वासच घवघवत होता.

सरकारी कांदाखरेदीने शेतकऱ्यांच्या असंतोषाला तोंड फुटले एवढेच; मूळ प्रश्नाचा गाभा तसाच राहिला. शेतकरी संघटनेने आपली भूमिका अधिक व्यापक केली; 'शासनाने आर्थिक उलाढालीत हात घालूच नये' असा खुल्या अर्थव्यवस्थेचा कार्यक्रम खुलेआम मांडला.

तीन वर्षांपूर्वी आणखी काही अघटितच घडले. कांद्याचा भाव भडकला, भडकला म्हणजे ६० रुपये किलोपर्यंत गेला. १९८० मध्ये चाकणचे कांदा आदोलन झाल्यानंतर इंदिरा गांधींनी तेव्हा येऊ घातलेल्या निवडणुकीना 'कांद्याच्या निवडणुका' असे नामाभिधान दिले होते; पण, खऱ्या अर्थाने 'कांद्याच्या निवडणुका' तीन वर्षांपूर्वी झाल्या. कांद्याचे भाव भडकल्यामुळे भारतीय जनता पक्षाची त्या निवडणुकांत सहा राज्यांत पीछेहाट झाली. या दणक्याचा धसका घेऊन शासनाची कांदानिर्यात खुली करण्याची हिंमत होत नव्हती, ती अखेरीस २१ वर्षांनंतर झाली. कांद्याच्या आंदोलनात पिंपळगाव बसवंत, खेरवाडी, टेहरे (जि. नाशिक), कजगाव (जि. जळगाव), पानगाव (जि. बीड) इत्यादी गावांतील जे शेतकरी हुतात्मा झाले त्यांच्या स्मृतीला सर्वांनी वंदन करावे असा हा प्रसंग आहे. २३ वर्षांच्या धरसोडीच्या सरकारी धोरणामुळे शेतकरी प्राणास मुकले, कर्जबाजारी झाले, देशोधडीला लागले याबद्दल शासनाने माफी मागावी ही अपेक्षाही आज शक्य नाही. या साऱ्या काळात ज्या पक्षाची सत्ता प्रामुख्याने राहिली त्या पक्षाच्या अध्यक्षाच आपण किसानांच्या मसिहा असल्याची द्वाही फिरवत आहेत, बाकीच्या पक्षांचे विचारायलाच नको!

शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा एक महत्त्वाचा टप्पा या विजयाने समाप्त होतो ना होतो तोच आणखी एक, विरोधाभास वाटण्यासारखा, प्रसंग पृथ्वीच्या उलट्या टोकाला घडला. कॅनडातील क्वेबेक येथे अमेरिकेतील ३४ राष्ट्रांची नवा अमेरिकन व्यापारी संघ तयार करण्यासाठी बैठक भरणार होती. या बैठकीविरुद्ध आठशे ते हजारच्याच जमावाने निदर्शने केली; पण मोठी विक्राळ,

हिंसक स्वरूपाची केली. आंदोलकांत प्रामुख्याने वीस हजार डॉलरच्या वर मिळकत असलेले कामगार दूरदूरहून आपापल्या मोटारगाड्यांतून आलेले. म्हणजे, १९९९च्या डिसेंबरमध्ये सिएटल येथे जागतिक व्यापार संस्थेच्या मंत्रिस्तरावरील परिषदेला विरोध करण्यासाठी कामगार, पर्यावरणवादी आणि स्वदेशी कारखानदारांची तरफदारी करणारे यांची भाऊगर्दी उसळली होती, तसाच हा प्रकार.

जागतिक व्यापार संस्थेच्या करारांची, विशेषत: शेतीविषयक करारांची अमेरिकी शासनाला मोठी अडचण वाटू लागली आहे. व्यापार खुला करण्यासाठी शेतकऱ्यांना द्यायची अनुदाने कमी करणे राजकीय दृष्टीने महाग पडेल याची जाणीव सर्वांनाच झाली आहे. अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष बुश यांनी अनुदानकपात करण्याला उघडच विरोध केला आहे.

एका बाजूला जागतिक व्यापार संस्थेच्या नव्या वाटाघाटी सुरू होताहेत आणि त्याच वेळी त्यांना बगल देऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात आपल्या हक्काचा एक राखीव प्रदेश, निदान अमेरिका खंडाततरी, असावा असा अमेरिकेचा प्रयत्न चालू आहे. त्या दृष्टीनेच क्वेबेक येथील परिषद बोलावण्यात आली होती. निदर्शकांच्या दंग्याधोप्यांमुळे प्रादेशिक व्यापारतरी खुला होण्याचा कार्यक्रम पुढे ढकलला जाईल असे दिसते.

खुल्या व्यापाराला विरोध झाला, तो कोणीही केला, कोणत्याही आडदांड मार्गाने केला तरी आनंदाच्या उकळ्या फुटणारे आपल्या देशात अनेक आहेत. एरव्ही साधनशुचितेच्या गप्पा मारणाऱ्यांना क्वेबेक आंदोलनातील जाळपोळीचा धूर फारसा त्रास देत नाही; ही निदर्शने प्रभावी झाली हे पाहून 'जितं मया, जितं मया' अशा आरोळ्या ठोकण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.

एका बाजूला शेतकऱ्यांनी स्वातंत्र्याची लढाई जिंकली, दुसऱ्या बाजूला आर्थिक स्वातंत्र्याची पीछेहाट होते आहे काय आणि तीदेखील आर्थिक स्वातंत्र्याची परंपरा असलेल्या देशात, हा प्रश्न स्वातंत्र्याकरिता धडपडणाऱ्या शेतकऱ्यांना सतावीत असेल.

यात मला काही गोष्टी स्पष्ट दिसतात त्या सांगून ठेवतो.

प्रादेशिक व्यापार संघटना यशस्वी होवोत न होवोत; शेवटी, मार्गात कितीही व्यवधाने आली तरी, खुला व्यापार आणि अर्थव्यवस्था यांचे युग येणार आहे. कारण, भिंती ओलांडणे ही मनुष्यजातीची सनातन प्रेरणा आहे.

दुसरी गोष्ट, व्यापार खुला झाला म्हणजे तो सर्वार्थाने अमेरिका-कॅनडासारख्या

देशांच्या फायद्याचा आणि इतर सगळ्यांच्या तोट्याचा हा प्रचार बिनबुडाचा आहे हे क्वेबेक दंग्याधोप्यांनी सिद्ध झाले. व्यापार खुला केल्याने अमेरिका–कॅनडासारख्या सधन राष्ट्रांनाही, निदान परिवर्तनाच्या काळात, मंदी आणि बेकारी यांना तोंड द्यावे लागते हे लक्षात घेऊनही तेथील सरकारे सैद्धांतिक निष्ठेपोटी खुल्या व्यापाराचा पाठपुरावा करीत आहेत.

तिसरी आणि महत्त्वाची गोष्ट ही, की क्वेबेकमधील निदर्शने ही एका अर्थाने भारतासारख्या देशात खुलीकरणाला विरोध करणारे जे गट आहेत त्यांच्या विरुद्धची निदर्शने आहेत. 'व्यापार खुला झाला म्हणजे आमचे कसे होणार?' असे धाय मोकलणाऱ्यांना क्वेबेक निदर्शकांनी दाखवून दिले आहे, की त्यांचीही चिंता तीच आहे. खुलीकरणाचे क्वेबेकमधील विरोधक आणि भारतातील विरोधक यांच्या भूमिका समान नाहीत, परस्परविरोधी आहेत.

या एकाच आठवड्यात स्वातंत्र्येच्छुक शेतकऱ्यांनी एक विजय मिळविला आहे आणि दुसऱ्या लढाईची तुतारी वाजते आहे.

*दि. २५/४/२००१*

■■

# बाजारात धांगडधिंगा काय कामाचा?

शेतकऱ्यांचे पुढारी, कामगारांचे नेते, मोठे कारखानदार, छोटे कारखानदार साऱ्यांचा एकच थयथयाट चालू आहे – 'आता बाजार खुला होणार, दुसऱ्या देशांचा माल गिऱ्हाइकापुढे वाढून येणार, आता आमच्या मालाला कोण विचारणार? विष खाऊन जीव देण्यापलीकडे काही गत्यंतरच उरले नाही.'

एरव्हीही सर्व दुःखे, संकटे, पराभव यांचा दोष दुसऱ्या कोणाच्यातरी माथी मारून आपण स्वतः मात्र सदगुणांनी परिपूर्ण आहोत असा टेंभा मिरविण्याचा आमचा राष्ट्रीय स्वभाव आहे. दोष कायमचा परकीयांचा असतो, ISI चा असतो, CIA चा असतो, भांडवलशहांचा असतो त्यामुळे आम्ही संकटात येतो, नाही तर आमच्यामध्ये काहीच उणे नाही ही आत्मप्रौढीची परंपरा निदान विष्णुशास्त्री चिपळुणकरांइतकी जुनी आहे. इंग्रज साम्राज्य आले, स्वराज्य बुडाले. भारतीय समाजव्यवस्थेचा चौफेर पाडाव झाला. तरीही, 'आम्ही आणि आमची संस्कृती श्रेष्ठच आहे. इतिहासाच्या कालचक्रात चक्रनेमिक्रमाने एक रहाटगाडगे वर जायचे, एक खाली यायचे हे असे चालायचेच. सध्या आमच्यावर पाळी खाली जायची आली आहे, पण लवकरच यथावकाश आमचे गाडगेही आपोआपच वर चढेल.' हा चिपळुणकरी युक्तिवाद प्रत्येक पराभवाच्या क्षणी हिंदुस्थानी लोकांनी वापरला आहे.

एवढ्या लांबच्या वैराण प्रदेशातून मुसलमानांच्या झुंडी आल्या, दुर्लंघ्य पर्वतांवरून त्यांनी तोफा वाहून आणल्या आणि सारा देश पादाक्रांत केला यात आमच्या काही उणिवा जबाबदार आहेत याची कोणालाही फारशी जाणीव झालेली दिसत नाही. 'हे दुष्ट यवन आमच्या श्रेष्ठ संस्कृतीचा उच्छेद करीत आहेत. त्यांचे पारिपत्य यथावकाश होईलच; तोपर्यंत परकीयांविरुद्ध द्वेष धुमसत ठेवणे एवढेच काय ते कर्तव्य,' असे समाजधुरीणांनीही मानले. तोफा ओतण्याचे

काम आम्ही आत्मसात केले नाही; समाजातील सर्व जातिवर्गांना बंधुभावाने एकत्र आणण्याचा विचारही आम्हाला शिवला नाही; आर्थिक सामर्थ्य आणि हत्यारे यांचे संपादन करण्याचा ध्यास आम्ही घेतला नाही.

एवढे इंग्रजी साम्राज्य आले, त्यांच्या अंमलापासून आणि इंग्रजी विद्येपासून जो काय लाभ मिळवायचा तो काही मूठभर शहरी सवर्णांपुरताच मर्यादित ठेवावा, बहुजन समाजापर्यंत त्याचा संपर्कही पोहोचू देऊ नये असा 'आंधळा' राष्ट्रवाद फोफावला. जोतीबा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी कसोशीने प्रतिवाद केला; पण तो निष्फळ ठरला.

पन्नास वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले, आपले भाग्य ठरविण्याचे सर्व अधिकार आपल्या हाती आले आणि पन्नास वर्षांत आम्ही सारे वाटोळे करून बसलो; कोण्या राजबिंड्या पुढाऱ्यांच्या सत्तापिपासेपोटी समाजवादाच्या कुंपणात स्वतःला कोंडून घेतले; स्वातंत्र्यात आपले आपल्यालाच कुंपण घालून घेतले.

इतिहासाने जगाशी संपर्क साधण्याची आणखी एक संधी नव्या अर्थव्यवस्थेच्या निमित्ताने आपल्यापुढे आणून ठेवली. लगोलग साऱ्या मुखंडांनी तिचा दुःस्वास चालू केला. डावे असोत, उजवे असोत; पंख उभारून उड्डाण घेण्यास साऱ्यांचा कडवा विरोध आहे. विरोधी पक्षातील राजकारण्यांनी आकांडतांडवाचा कावा करून सत्तास्वार्थ साधण्याचा प्रयत्न करावा हे समजण्यासारखे आहे; पण सत्ताधारी पक्षाच्या नात्यागोत्यातील आणि 'आजोळ'च्या मान्यवर नेत्यांनीही त्यांच्या स्वतःच्या सरकारचे अस्तित्व धोक्यात यावे इतक्या टोकापर्यंत जाऊन नव्या व्यवस्थेला विरोध करण्याची मोठी जबरदस्त आघाडी उघडली आहे. सर्वांची हाकाटी एकच– 'आम्हाला वाचवा. परदेशी उत्पादकांना त्यांचे सरकार मदत करते, त्यांचे कामगार गुलामासारखे राबतात, कुशलता जोपासतात त्यांच्याशी आम्ही टक्कर ती काय देणार? एवं च, सरकारने स्वदेशी उत्पादकांना निवारा द्यावा, परदेशी चांगला माल स्वस्त भावात येऊ देऊ नये, त्यावर कर लावून तो महागडा करावा; असे संरक्षण देणे सरकारचे कर्तव्य आहे, इत्यादी, इत्यादी.

जगात अनेक देश आहेत; सगळे काही सारखे नाहीत. काही देशांत खनिजांची प्रचंड संपत्ती आहे; कोठे निसर्गाची अनुकूलता, कोठे सृष्टी डोळे वटारून आहे. असे फरक आहेत म्हणून तर व्यापाराची आवश्यकता तयार होते; 'मला जमते ते मी करेन, तुला बरे जमते ते तू कर, आपण एकमेकांत देवघेव करू,' असा 'सर्वहितेषु व्यापार' करण्याचा विचार केला जातो.

एखाद्या कालखंडात एखादा देश उत्पादनात बलाढ्य झाला, तुलनेने शेजारचा

देश मागे पडला तर अशा परिस्थितीत तोडगा काय काढायचा? दोघांनी एकमेकांविरुद्ध आर्थिक लढाईच चालू करायची म्हटली, तर त्याचा फायदा कोणालाच होत नाही; शेवटी प्रकरण हातघाईवर येते हे दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळातील इतिहास दाखवितो. व्यापारातील संतुलन बिघडले तर ते दुरुस्त करण्यासाठी अर्थशास्त्रीय उपाय सांगितले आहेत किंवा नाहीत? व्यापार आणि अर्थकारण ही गाजराची पुंगी आहे का, वाजली तर वाजली, नाही तर खाऊन टाकायची?

मान्यवर अर्थशास्त्राचा या प्रश्नावरील तोडगा साधा आणि सोपा आहे. 'बाजारपेठेतील दोष बाजारपेठ आपोआपच दूर करते' हा सिद्धांत काहीसा निसर्गोपचारासारखा आहे. वेडेवाकडे खाल्लेप्यायले नाही, औषध म्हणून विष प्राशन केले नाही तर शरीर सर्व दुखण्यांवर मात करते तसेच अर्थकारणातही आहे. बाजारपेठ आजारी पडली तर त्याला बिनबाजारी हस्तक्षेपाचा तोडगा घातक ठरतो.

सध्याचीच परिस्थिती पाहू. चीनने मोठा चमत्कार करून दाखविला आहे. चारपाच भारतीयांच्या तोडीचे काम एकटा चिनी कामगार करतो, त्यामुळे भारतीय बाजारपेठेत चिनी वस्तूंचा महापूर आला तर हिंदुस्थानने काय करावे? अर्थशास्त्राने सांगितलेला उपाय असा : चिनी मालाची मागणी वाढली, की चिनी चलनाची मागणी वाढते, रुपयाची किंमत घसरते. असे झाले की आपोआपच चिनी माल अधिकाधिक अनाकर्षक होऊ लागतो. या परिस्थितीत चंग बांधला तर भारतीय उत्पादक आपली कमजोरी दूर करून पुन्हा एकदा बरोबरीचा सामना करण्यास उभे ठाकू शकतात. चलनाच्या विनिमयाचा दर व्यापारातील असंतुलन दूर करण्याचे काम करतो. हिंदुस्थानी कामगार अकुशल असेल, अकार्यक्षम असेल तर त्याला वाचविण्याचे काम करण्यासाठी रुपयाला 'उतरावे' लागते. रुपयाची किंमत कमी झाली की आयात महाग होते, निर्यात अधिक सक्षम होते. दुबळ्या देशांनी आपले नाणे आपल्यासारखेच ठेवावे यात त्यांचे भले आहे!

प्रत्यक्षात आपल्या देशात काही विपरीतच घडत आहे. रुपयाला मागणी नाही, त्यामुळे तो खाली घसरत आहे. रुपया घसरल्याने स्पर्धेत उतरू इच्छिणाऱ्या उद्योजकांचे भले होणार आहे तरी गडगडणाऱ्या रुपयाला सावरण्यासाठी सरकार अब्जावधी रुपये खर्चून बाजारात उतरत आहे. खऱ्या अर्थाने रुपया मोकळा झाला तर त्याचा विनिमयाचा जो दर ठरेल त्या दरावर व्यापारातील हिंदुस्थानची पडती बाजू सावरली जाऊ शकेल, इतर कोणत्याच दांडगेशाहीच्या संरक्षणाची

गरज पडणार नाही.

सरकारशाहीने देश कमकुवत ठेवला, त्यातून बाहेर पडण्याचा जो एक मार्ग शास्त्रशुद्ध आहे तो सरकारनेच रोखून ठेवला आहे आणि सर्व अशास्त्रीय उपाय सांगणारे डॉक्टर, वैदू देशभर धिंगाणा घालीत आहेत. वस्तुबाजारातील अडचणी चलनबाजार सावरून घेतो; पण दोन्ही बाजारांत केवळ अरेरावीच करण्याचे धोरण आपल्या इतिहासाशी सुसंगत आहे देशाचे भले करणारे नाही.

*दि. १/५/२००१*

■■

# अवेळी 'एप्रिलफूल'ची मस्करी

भारतीय संस्कृतीत सभ्य समाजाला आपल्या मनात साचलेले गरळ ओकण्यासाठी शिमग्याच्या दिवशी मुभा असते. त्याचप्रमाणे पाश्चिमात्य परंपरेत १ एप्रिल रोजी एकमेकांना मूर्ख बनविण्याचा महोत्सव साजरा केला जातो. त्या दिवशी कोणी काही थट्टामस्करी केली तरी ती मनावर घ्यायची नसते, थट्टामस्करीच्या बळीनेसुद्धा सार्वत्रिक हास्यकल्लोळात सामील होऊन जायचे असते. आजकाल भारतीय समाजात विशेषेकरून नेहरूप्रणित समाजवादी नियोजन व्यवस्थेत प्रस्थापित समाजात एकमेकांच्या नावाने शिमगा करायला आणि सर्वसामान्य जनतेला मूर्ख बनवायला ठराविक दिवसाचे बंधन राहिलेले नाही.

मग 'एप्रिलफूल' च्या बळीने थट्टामस्करी मनावर न घेता, त्यामुळे तयार झालेल्या हास्यकल्लोळात सामील व्हावे हा नियम सर्वकाळ लागू धरावा काय? त्या पलिकडे जाऊन हा नियम चळवळी, आंदोलने, संप किंवा बंद यांनाही लागू धरावा काय? कोणी संप केला, बंद पाळला त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली, नुकसान झाले तरी राग गिळून टाकून त्यानेही असली थट्टामस्करी माफ करून ह्या कल्लोळात सामील व्हावे काय?

२५ एप्रिलच्या महाराष्ट्र बंदचे आयोजन करणाऱ्या डाव्या मजूर संघटना होत्या, काही मध्यममार्गी पक्षही होते, पण बंद यशस्वी झाला तो शिवसैनिकांच्या धाकाने याबद्दल सर्वांचे एकमत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळूनही सर्वसामान्य नागरिकांच्या अवरुद्ध राहिलेला मार्ग खुला करणाऱ्या खुल्या व्यवस्थेला विरोध करण्यासाठी पाळलेला हा बंद म्हणजे सर्वसामान्यांच्या थट्टामस्करीचाच भाग होता. व्हलेंटाईन दिवसासारख्या आपुलकी व्यक्त करणाऱ्या सणालादेखील तो पाश्चिमात्य आहे म्हणून ज्यांचा कडवा विरोध आहे ते शिवसैनिक नागरिकांना अवेळी 'एप्रिलफूल' करणारा महाराष्ट्र बंदचा कार्यक्रम, हा काही थट्टामस्करीचा

राज्यव्यापी कार्यक्रम निषिद्ध मानत नाहीत. खोडी करणारानेच ती विनोदबुद्धीने केली नसेल तरी त्याचा फटका घेणाऱ्यांनी त्याकडे विनोदाने बघावे, त्यामुळे होणाऱ्या हास्यकल्लोळात सामील व्हावे हे कसे शक्य आहे? एप्रिलफूलचे विदूषकसुद्धा जीवघेणी चेष्टा करीत नाहीत, मस्करीची कुस्करी होऊ देत नाहीत.

२५ एप्रिलचा महाराष्ट्र बंद चांगला यशस्वी झाला याबद्दल काही दुमत नाही. मुंबई बंद पडली एवढेच नाही तर सुनसान झाली, पुणे थंड पडले, अगदी नासिक, मालेगाव, औरंगाबादपर्यंत जनजीवन सुनसान झाले; नागपूर, वर्धा, परभणी, नांदेडपर्यंत सारा विस्कळीतपणा आला.

एवढा मोठा यशस्वी बंद हा चमत्कार घडवला कोणी? बंदचा आदेश देणाऱ्या डाव्या कामगार संघटना. त्यांच्याबरोबर भारतीय जनता पक्षाच्या परिवारातील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत कामगार संघ यांची मूळ प्रेरणा, त्यात शिवसेनेने हातभार लावला. सर्वांनी मिळून केंद्र शासनाच्या आर्थिक धोरणांचा आणि कार्यक्रमाचा निषेध करण्यासाठी एकत्र यायचे ठरवले. कामगार संघाच्या प्रणेत्यांना सत्ता फारशी मानवत नाही. आपलाच पक्ष सत्तेत असला तरी खुर्चीचे पाय कापण्याची त्यांची खोड जात नाही. शिवसेना प्रमुखांनाही आपल्या हातातील 'रिमोट' मधूनमधून चालवीत आपल्या प्रभावाची प्रचिती दाखविण्याची आवड आहे. या कार्यक्रमात कामगार युनियन आणि शिवसेना एकत्र आल्या कशा? शिवसेनेच्या उदयास्ताविषयी जेव्हा चिकित्सेने इतिहास लिहिला जाईल त्यावेळी, 'सत्तादांडग्या कामगार नेत्यांनी चालविलेल्या अरेरावीस शह घालण्याचे काम शिवसेनेने केले' याची नोंद होईल. 'या कामगिरीत त्यांना दोन वसंतांची 'घबाड' मदत मिळाली' हेही नोंदले जाईल. सापमुंगसाचे नाते असलेले हे दोन 'पक्ष' या बंदच्या प्रसंगी एकत्रा कसे आले?

कोणी फारसे तात्त्विक विवेचन केले नाही. ''खुली अर्थव्यवस्था आल्याने स्पर्धा येत आहे. त्यात भारतीय टिकू शकत नाहीत. त्यामुळे मंदी आणि बेकारी पसरत आहे. तेव्हा शासनाने खुलेपणा सोडून पुन्हा एकदा जुन्या लायसन्स-परमिट व्यवस्थेकडे जावे, प्रश्न शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या जीवनमरणाचा आहे, त्यामुळे आम्हीही त्यात सामील झालो'' असे या बंदमध्ये सामील होणाऱ्या सर्वांनी म्हटले. अर्धवट ठेचलेल्या कामगार युनियनच्या सापाला शिवशंकराने गळ्याभोवती घेण्याचे ठरवले!

आपला बंद यशस्वी झाला आणि लायसन्स-परमिट व्यवस्थेत मेहता-सामंत प्रणित युनियनशाही पुन्हा माजली तर काय करावे याची शुद्धबुद्ध राहू

नये इतका कडवा स्वतंत्रतेचा विरोध बंदवाल्यांच्या मनात होता. हा रोष समजण्यासारखा आहे. पाण्यात उतरल्याखेरीज पोहायला शिकता येत नाही तसे स्पर्धेसाठी उतरल्याखेरीज स्पर्धेत टिकण्याचे सामर्थ्य येणार नाही हे सारे मानले तरी नवशिक्याच्या नाकातोंडात पाणी जाऊ लागले आणि जीव घाबरा होऊ लागला की तो उरलेल्या ताकदीनिशी जीव बचावण्याची धडपड करणार, आरडाओरड करणार, वाचवायला कोणी आलेच तर त्याच्याच गळ्याला मिठी मारून आपल्याबरोबर त्यालाही ओढायचा प्रयत्न करणार हे सारे समजण्यासारखे आहे. पुढच्या निवडणुकीच्या पलिकडे ज्यांची दृष्टी जात नाही त्या पुढारी मंडळींना तर 'शेतकरी आणि कामगार यांची दुर्दशा' म्हणजे मोठी लॉटरी लागल्यासारखे झाले आहे. शोषितांच्या आक्रोशाचा लाभ उठवून आपण एक निवडणूक जिंकली की मग पुढचे पुढे बघता येईल अशा धुंदीत साध्यसाधनविवेकाचा आक्रोश करणारे गांधीवादी, साध्यसाधनविवेकाचा पुरस्कार करणारे डावे आणि या साऱ्या भाऊगर्दीत साधते काय याचाच शोध घेणारे 'गवसे' सारे एकत्र झाले आहेत.

समाजवादी नियोजनपद्धती रशियात कोसळली, एका महासत्तेचा अंत झाला. तेथील जनसामान्यांच्याच काय, सत्ताधुरंधरांच्या वेदनांना काही पार नव्हता. एके काळी लष्करात आधिपत्य गाजवलेले सेनानी आपले जुने गणवेश ठाकठिक करीत बाजारात उभे राहिले, पौंडभर पाव मिळावा म्हणून रांगा लागल्या. एकदा तर सारे सरकारच उलथवले गेले; पण नवीन सरकारनेही खुल्या व्यापार व्यवस्थेला पर्याय नसल्याचा निर्वाळा दिला. त्यानंतर रशियन जनता निश्चय करून उठली. महासत्तेचे स्थान गेलेले, साम्राज्याचे तुकडे-तुकडे झालेले, रूबल सतत घसरत आलेला, उत्पादन थंडावलेले बेकारी माजलेली अशाही परिस्थितीत रशियन जनतेने शुद्धबुद्ध सोडली नाही, औषधालाच आजार म्हटले नाही, सात दशके ज्यांचा अभिमान उराशी बाळगला त्यांचे पुतळे खाली खेचले आणि नव्या मार्गाने वाटचाल करण्याचा निश्चय केला.

रशियन जनतेने हा ऐतिहासिक निर्णय केला नसता तर आज रशियाचे जे काही, निदान दुय्यम स्थान राहिले आहे तेही टिकले नसते आणि पावाच्या तुकड्यासाठी रांगा चालूच राहिल्या असत्या.

चीनमधील साम्यवादी नेत्यांनी समाजवादाच्या उन्मादात लक्षावधींचे शिरकाण केले; पण त्यातील वैयर्थ्य लक्षात आल्यावर समाजवादी अनुशासन आणि तैवान, सिंगापूर व इतर परदेशात नाव कमावलेल्या चीनी नागरिकांची कार्यकुशलता

यांचा संगम घडवून आणला, हाँगकाँगच्या खिडकीचा चातुर्याने उपयोग केला. परिणाम असा की, चीन एक आर्थिक ताकद बनत आहे. 'मधल्या काळात माओ-त्से-तुंग आला नसता तर आमचा चीन आजपावेतो जगातील प्रथम क्रमांकाची महासत्ता बनला असता,' असे तेथील जाणकार म्हणतात.

दोन देश, दोन संस्कृती, संकटाचा सामना करण्याच्या दोन पद्धती इंडिया वेगळा देश, वेगळी पद्धती. औषध देणाऱ्याच्याच हाताला चावण्याचा कार्यक्रम येथे मोठा लोकप्रिय होत आहे. सध्याची स्थिती जर पाहिली तर आगामी निवडणुकीत लायसन्स-परमिटवादी सत्तेला हात घालतील अशी लक्षणे दिसतात.

फुटकळ कामगार नेते, दत्तोपंत ठेंगडी आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या हाती सर्वंकष सत्ता आली तरी लायसन्स-परमिट धोरणे त्यांना राबविता येतील हे काही शक्य नाही; देवेगौडा, यशवंत सिन्हा यांनी सत्ता हाती येताच हृदयपरिवर्तन करून घेतले तसेच यांचेही होईल. सत्ता हाती आल्यानंतरही 'सुधबुध खोयी' अवस्था संपली नाही आणि सरकारशाहीचा हेका कायम ठेवला तर देशावरील आर्थिक अरिष्ट टळणार नाही; परिवर्तनाचा कालखंड आणि त्यातील वेदना अधिक कठोर व दीर्घकालीन होतील एवढेच. जुन्या अर्थव्यवस्थेला 'झटका' द्यायचा की 'हलाल' करायचे एवढाच विकल्प वास्तविक पुढे आहे.

शेतकरी कामगारांच्या करूणेचा पुतळा दाखवणारे या समाजाच्या वेदना दीर्घकाळ लांबवतील आणि जीवघेण्या करतील ही या 'अवेळी एप्रिलफूल' ची मस्करी आहे. जे या मस्करीच्या हास्यकल्लोळात सामील होताहेत त्यांच्याबद्दल काय लिहावे? ख्रिस्तवचन त्यांना चालायचे नाही पण, 'प्रभो, त्यांना क्षमा कर, ते काय करीत आहेत हे त्यांनाच समजत नाही,' एवढेच म्हणता येईल.

*दि. ३/५/२००१*

■■

# ‘तंत्रज्ञानाचे अग्निदिव्य’

११ मे २००१ रोजी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या आदेशप्रमाणे ‘तंत्रज्ञान दिवस’ साजरा व्हायचे ठरले होते. प्रत्यक्षात कोठे एखादा किरकोळ सभा-समारंभ झाला असेल. माझ्या तो नजरेत आला नाही; इतर कोणाच्याही तो आला नसावा. त्या दिवशी सकाळच्या वर्तमानपत्रांत भली पानभर जाहिरात मात्र नजरेत भरली. एक पानी जाहिरात म्हणजे कित्येक लाखांचा खर्च; पण कोणत्याही केंद्रीय मंत्रालयाला असल्या खर्चाची फारशी फिकीर वाटत नाही. नागरिकांत उत्साह असल्याखेरीज कोणतेही कार्यक्रम यशस्वी होत नाहीत; जाहिरात दिल्याने खुर्चीत बसल्या बसल्या काम होऊन जाते.

जाहिरातीच्या अग्रभागी उपराष्ट्रपती व स्वतः पंतप्रधान यांचे फोटो आणि त्याच्या बरोबरच मानवसंसाधन विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान व सागरी विकास मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी आणि शेवटी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे राज्यमंत्री बाची सिंग रावत यांचे फोटो आणि संदेश.

• झपाट्याने एक होणाऱ्या जगात तंत्रज्ञानातील सामर्थ्य जोपासायचे असेल तर आपल्या नीतिमूल्यांची सातत्याने तपासणी करावी लागेल.

– कृष्णकांत, उपराष्ट्रपती

• नवीन शतकात विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, व्यापार, समाज, शासन आणि पर्यावरण यांचा संगम महत्त्वाचा ठरणार आहे.

– अटल बिहारी वाजपेयी, प्रधानमंत्री

• भविष्यातील ज्ञान हे सामाजिक गरजांशी निगडित असले पाहिजे, त्यात माणुसकीची जोपासना पाहिजे आणि त्यातून टिकाऊ तंत्रज्ञान उपजले पाहिजे.

– मुरली मनोहर जोशी,
मानवसंसाधन विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान व सागरी विकास मंत्री

• आज सतत विकसनशील, प्रसरणशील आणि परिवर्तनशील अशा विविध व सयुक्तिक तंत्रज्ञानांची जोपासना ही तातडीची गरज आहे.

– बाची सिंग रावत, विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री

फोटोंच्या खालोखाल संस्कृतातील एक वैदिक प्रार्थना. नुसते 'शांतिः शांतिः शांतिः' असे नेहमीप्रमाणे न म्हणता आकाश, अंतरिक्ष, पृथ्वी, पाणी, औषधी वनस्पती इत्यादी इत्यादी अशी मोठी यादी जोडली आहे आणि या सर्वांना 'शांती असो' अशी ही प्रार्थना.

'तंत्रज्ञान दिवस' साजरा करायचा तर त्यासाठी 'तमसो मा ज्योतिर्गमय.' अशी गतिशील प्रार्थना अधिक उचित झाली असती. शासकीय तंत्रज्ञानाच्या नेतृत्वाला प्रगतीपेक्षा शांतीची आस अधिक असावी. जाहिरातीतील वेगवेगळ्या मथळ्यांत तंत्रज्ञान कसे असले पाहिजे यासंबंधी काही घोषणावाक्ये आहेत. उदाहरणार्थ,

- 'तंत्रज्ञान शोषणविरहित असले पाहिजे.'
- 'तंत्रज्ञान पर्यावरणसुष्ट असले पाहिजे.'
- 'पर्यावरण नवनवोन्मेषशाली असले पाहिजे.'
- 'पर्यावरण सर्वार्थाने उचित पाहिजे.'

सारी एकूण प्रसिद्धी पाहिली की, हा सारा खटाटोप तंत्रज्ञानाचे सामर्थ्य आणि माहात्म्य सांगण्याकरिता आहे की त्याला जेरबंद करण्याकरिता आहे यासंबंधी मनात संभ्रम तयार व्हावा.

सारे जग जैविक तंत्रज्ञानाच्या नव्या क्षेत्रात प्रवेश करते आहे. चीन–ब्राझीलसारख्या देशांतही काही पिकांखालील निम्म्यांवर जमीन जैविक बियाण्यांखाली गेली आहे. या तंत्रज्ञानाच्या आधाराने तयार झालेल्या स्वस्त वरचढ मालाशी स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना अशक्यप्राय झाले आहे याचा या प्रसिद्धीत कोठे उल्लेखही नाही.

अनेकांच्या मनांत 'तंत्रज्ञान' हा अभद्र शब्द झाला आहे. ठेंगू लोकांच्या देशात गलिव्हर खलाशी शिरल्यावर या अजस्र माणसाला शक्यतो निष्प्रभ कसे करता येईल याची चिंता साऱ्या ठेंगूंना पडली तद्वत्, काय वेगवेगळ्या प्रकारांनी धडपड करावी म्हणजे आपल्या संकल्पनांची इस्त्री बिघडणार नाही याचीच प्रमुख चिंता तंत्रज्ञानविरोधी भारतीयांना वाटत आहे. जबाबदार नेत्यांची वर दिलेली अवतरणे हीच बुद्धी दाखवितात.

तंत्रज्ञानाचा असा दुस्वास का?

प्रतिभेच्या स्पर्शाला वंचित राहिलेल्या सामान्यजनांना आणि धडाडीविषयी दडस असलेल्या जनसामान्यांना प्रतिभेचा उन्मेष आणि पराक्रम यांच्याविषयी नेहमीच छुपा दुस्वास वाटतो. संशोधक, यशस्वी कारखानदार, व्यापारी यांच्याविषयी काहीतरी खोडी शोधून त्यांना दुषणे देण्याची आपली परंपरा फार जुनी आहे.

'तंत्रज्ञान चांगले हो; पण गरिबांचे काय? निसर्गाचे काय?' असे प्रश्न ते विचारतात आणि यच्चयावत् प्रतिभाशून्यांचे आवडते जीवनमूल्य 'विषमतानिर्मूलन' याचा आधार घेऊन ते आघाडीवर जाणाऱ्यांचे पाय ओढू पाहतात.

तंत्रज्ञानाचे विरोधक सर्वत्र आढळतात. ते जेट विमानांतून प्रवास करतात; इंटरनेट, ईमेलवर एकमेकांशी संपर्क साधतात; हातातील मोबईल फोन एखाद्या निशाणाप्रमाणे फडकावतात; अत्याधुनिक सुसज्ज रुग्णालयात औषधोपचार घेतात; आणि तेथील उपचाराने जीव वाचवत असताना आधुनिक उपचारव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांच्यावर नि:संकोचपणे दुगाण्या झाडीत असतात. तंत्रज्ञानाचे विरोधक तंत्रज्ञानाच्या रसाळ फळांचा निग्रहाने त्याग करून विरक्त बुद्धीने जगणारे साधूसंन्याशी नाहीत, ज्या हाताने भरविले त्यालाच चावणारी ही जमात आहे.

'माल्थस्'पासून ते 'रोम क्लब'च्या अर्थशास्त्रज्ञांपर्यंत अनेकांनी 'पृथ्वीला आता माणसांचा भार असह्य होतो आहे' अशी हाकाटी दिली आणि मोठ्या उत्पाताचे इशारे दिले. प्रत्यक्षात, लोकसंख्या प्रचंड वाढली असली तरी इतिहासातील कोणत्याही कालखंडापेक्षा आज, अगदी सामान्यजनसुद्धा अधिक चांगले खातात, पितात आणि जगतात. केवळ पस्तीस वर्षांपूर्वी हिंदुस्थान अन्नधान्याच्या भिकेवर जगत होता. पाचदहा वर्षांत तो स्वयंपूर्ण झाला याला कारण कोणी सरकार नाही, तर हरित क्रांतीचे तंत्रज्ञान आहे. पूर्वी माणसे भर विशीतिशीत आजाराने, साथीच्या रोगाने मरून जायची; आज आयुष्यमान दुप्पट झाले याचा वरदाता वैद्यक तंत्रज्ञान आहे, कोणतीही सरकारी योजना नाही.

हिंदुस्थानातील बहुसंख्य स्त्रियांचे पुरे आयुष्य पाणी भरण्यात आणि सरपण जमा करण्यात जाते. स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत या मायबहिणींच्या आयुष्यात काही थोडा दिलासा आला असेल तर तो तंत्रज्ञानाने बहाल केलेल्या शिवणयंत्राने, पिठाच्या गिरणीने आणि इंजिन किंवा मोटार यावर चालणाऱ्या पाण्याच्या पंपाने अशा 'सर्वहितेषु' तंत्रज्ञानाचा इतका व्यापक रागराग का होतो?

पोपट गोड बोलतो, त्याच्या नशिबी पिंजरा येतो; स्त्रिया प्रजनन करतात, त्यांना दुय्यम स्थानी ठेवले जाते; शेतकरी एका दाण्याचे शंभर दाणे करतात, त्यांना वेठीस धरले जाते. या सर्वांप्रमाणेच तंत्रज्ञान गुणकारी असते, कदाचित्

याच कारणाने त्याचा द्वेष सारे अनुत्पादक वर्ग करीत असतात.

सूर्योदयाला विरोध करणारी ही जात काही नवीन नाही. आदिमानवाने चाकाचा शोध लावला त्या वेळीही 'या चाकाने प्रचंड गती येईल, मनुष्यजातीचा विनाश ओढवेल' असा आरडाओरडा करणारे आजच्या पर्यावरणवाद्यांचे पूर्वज त्याही वेळी नक्की असतील. वाफेचे इंजिन झुकझुक करीत रूळांवर धावू लागले तेव्हातर पर्यावरणाच्या नावाखाली तंत्रज्ञानाच्या विरोधकांनी हैदोस घातला. जैविक तंत्रज्ञान उदयाला येत असताना त्याला विरोध करणारे हे प्रमुखतः गतिविरोधी परंपरेतील आहेत. इतिहासाने यांना प्रत्येक पायरीला खोटे ठरविले आणि माणसाच्या प्रगतीची दिशा नवनवोन्मेषशाली विज्ञानात आहे हे दाखवून दिले; पण हे पठ्ठे काही नवे शिकायलाच तयार नाहीत.

सर्व मानवजातीच्या कल्याणाकरिता कामी आलेली एकमेव गोष्ट म्हणजे तंत्रज्ञान. जानकीच्या विशुद्धतेविषयी संशय घेऊन तिला अग्निदिव्य करायला लावणाऱ्यांची जमात आजही तंत्रज्ञांच्या भूमिकन्येस तिच्यावर भलतेसलते आळ घेऊन अग्निदिव्यास सामोरे जाण्यास भाग पाडीत आहेत. याला आघाडीवरील वैज्ञानिक काही प्रमाणावर तरी जबाबदार आहेतच. त्यांना ती जबाबदारी नाकारता येणार नाही.

संशोधनाच्या प्रचंड शर्यतीत एकजण जिंकतो, बाकी सारे अनामिक होऊन जातात, अयशस्वी प्रेमवीराप्रमाणे त्यांतील अनेक प्रियवस्तूंचा घात करायला तयार होतात. जैविक तंत्रज्ञानाला युरोपीय देशांत कडवा विरोध होतो. जर या तंत्रज्ञानातील महत्त्वाचे श्रेय अमेरिकेतील शास्त्रज्ञांऐवजी युरोपीयन शास्त्रज्ञांना मिळाले असते तर हा विरोध उपजलाच नसता.

एका काळी तंत्रज्ञानाच्या आघाडीवर असलेले, नवीन तंत्रज्ञान आले म्हणजे जीवाच्या आकांताने त्याला विरोध करतात. हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाच्या काळात ज्यांनी रासायनिक खते व औषधे या उद्योगधंद्यांत अफाट पैसा कमावला, ते जैविक तंत्रज्ञानाने आपल्या पोटावर पाय येतो अशी भीती वाटताच सारा पैसा जैविक तंत्रज्ञानाच्या विरोधकांच्या पाठिंब्यासाठी खर्चू लागले.

मागे पडलेले आणि कालबाह्य झालेले शास्त्रज्ञ शास्त्रच उद्ध्वस्त करायला निघालेल्यांशी हातमिळवणी करायला निघतात हे दुर्दैव खरे; पण त्याही पलीकडे, यशस्वी शास्त्रज्ञांनीही विज्ञानयुगास आवश्यक अशी कामगिरी बजावण्यात कुचराई केली आहे. अगदी गेल्या शतकापर्यंतच्या मोठ्या शास्त्रज्ञांचे लिखाण वाचले तर त्यांनी, त्यांच्या कामगिरीच्या संदर्भात का होईना, एक विश्वदर्शन उभे करण्यासाठी

चिंतन केलेले दिसते, समाजव्यवस्थेविषयी काही निष्कर्ष काढलेले दिसतात. काही अपवाद सोडल्यास नवनवीन विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या दार्शनिक निष्कर्षांचा शोध बाजूस पडला आहे. नव्या शास्त्रज्ञांना, कदाचित् असल्या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी सवड नसावी; पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्य आणि विज्ञानदृष्टी प्राणपणाने जपणे व त्यासाठी, आवश्यक तर सामाजिक, राजकीय संघटन आणि संघर्ष अपरिहार्य आहे.

ही सामाजिक जबाबदारी वैज्ञानिकांनी पेलली नाही आणि ते केवळ नवनवे संशोधनच करीत राहिले तर त्यांची स्थिती उत्तमोत्तम बियाणे तयार करून जमिनीच्या मशागतीची काळजी न करणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणे होईल. तंत्रज्ञानाविषयी समाजात दुस्वास आहेच; तो असाच वाढू दिला तर सध्या जैविक बियाण्यांच्या प्रायोगिक शेतीवर हल्ले होतात, उद्या प्रतिभाशून्यांच्या झुंडी साऱ्या विज्ञानशाळांना नष्ट करण्यासाठी घोंघावू लागतील. शेवटी सीतेप्रमाणेच तंत्रज्ञानालाही 'भूमि माते, मला तुझ्या पोटात घे' म्हणण्याची वेळ न येवो!

*दि. १६/५/२००१*

■■

# लोकमताच्या कौलाची दिशा

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालांमुळे राजकीय जाणकार अचंब्यात पडले आहेत. वेगवेगळ्या राज्यांतील लोकमताच्या कौलाचा काही अर्थ एका सूत्रात गोवणे दुरापास्त झाले आहे.

भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली शिक्षा झालेल्या आणि ज्याचा उमेदवारी अर्ज त्या कारणाने फेटाळण्यात आला त्या तामिळनाडूतील जयललिता यांचा पक्ष विजयी झाला आहे. त्या तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्या एवढेच नव्हे तर त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक खाते स्वत:कडे ठेवले आहे. हा लेख प्रकाशित होईपर्यंत, कदाचित्, करूणानिधींविरुद्ध पोलिसी शुक्लकाष्ठ लागलेलेही असेल. केंद्रातील आघाडीचे सरकार एकदा पाडून साऱ्या न्यायालयांचे निर्णय विरोधात जाऊनही जयललिता डगमगल्या नाहीत. विजयश्रीची माळ मतदारांनी त्यांच्या गळ्यात घातली. अलीकडच्या काळातील राजकीय इतिहासात ही एक मोठी पराक्रमगाथाच म्हटली पाहिजे! इंदिरा गांधी सर्वथा पराभूत झाल्या असतानाही लोकांनी त्यांना पुन्हा सत्तेवर आणले, त्याच तोडीचा हा विजय आहे.

जयललितांच्या या विजयावरून, केंद्रातील शासनास फटकारणाऱ्यांना लोकांनी निवडून दिले असे म्हणावे तर पश्चिम बंगालमधील 'भारतीय राजकारणामधील उगवता तारा' समजल्या जाणाऱ्या ममता दीदींची अगदीच त्रेधातिरपीट झाली. निवडणुकांच्या आधी, दीदी बंगालच्या मुख्यमंत्री होणार असे सर्वांनाच वाटत होते. ऐनवेळी राष्ट्रीय आघाडीचा हात सोडून त्यानी सोनियाबाईंची साथ धरली. त्यांच्या तृणमूल पक्षाची आता शुष्कतृण परिस्थिती झाली आहे. सौराष्ट्रातील भूकंपानंतर, पडलेल्या घरांच्या दगडामातीच्या ढिगाऱ्यात कपाळाला हात लावून 'हे कसे काय घडले' याचा अचंबा करीत बसलेल्या लोकांप्रमाणेच दीदींची परिस्थिती आहे. भरतीओहोटीचा अंदाज घेण्यात त्या चुकल्या हे त्यांनाही

कळून चुकले आहे. तेथील कम्युनिस्ट आघाडीच्या यशाचे पुरे विश्लेषण करण्यास काही अवधी लागेल; पण ज्योती बसू निवृत्त झाल्यानंतर त्यांचे वारस बुद्धदेव भट्टाचार्य यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत सौजन्य, सौहार्द न सोडता विजय मिळविला. जयललिता आणि ममता यांची वादळी रणनीती काही वेळा फलदायी ठरत असली तरी पारंपरिक राजकीय सभ्यतेची अजूनही काही दाद मिळू शकते हे या आघाडीच्या यशाने सिद्ध झाले.

केंद्रातील प्रमुख सत्ताधारी पक्षाला केरळ विधानसभेत एकही जागा मिळाली नाही आणि आसाम गण परिषदेशी त्यांनी केलेली युतीही वांझोटी ठरली.

एकूण निकाल केंद्रातील राज्यकर्त्या पक्षास काही भूषणावह नाहीत. केंद्रातील त्यांच्या सत्तेस आज धोका नाही कारण संसदेतील बेरजेचे राजकारण अजून उलटलेले नाही हे खरे; परंतु या विधानसभा निवडणुकांच्या बरोबरीने देशभर सार्वत्रिक निवडणुका झाल्या असत्या तर त्यातून निघणारे राजकीय चित्र सध्याच्या परिस्थितीपेक्षाही अधिक विस्कळित निघाले असते. नेते दिशाहीन आहेत आणि मतदारांनाही रस्ता सुचत नाही. त्यामुळे सत्तेवर असलेल्यांना पाडावे, बदल करून पहावा आणि व्यक्तिगत करिष्म्याच्या आधाराने सत्तापालट घडवून आणावा असा मतदारांचा कौल दिसतो.

विधानसभा निवडणुकीतील दोन राज्यांचे निकाल दूरगामी, धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत – केरळ आणि बंगाल. केरळमध्ये डाव्या आघाडीचा पराभव झाला आणि काँग्रेस आघाडीचा दोन तृतीयांश बहुमताने विजय झाला. कम्युनिस्टांची सत्ता प्रथमतः ज्या राज्यात आली तेथून त्यांची हकालपट्टी झाली आणि बंगालमधील लाल तटबंदी शाबूत राहिली हे एक मोठे प्रमेय आहे.

डाव्या शासनाच्या कालावधीत खुळचट मार्क्स्वादी अर्थशास्त्रीय कल्पनांपोटी सर्व शेतकरी आणि मळेवाले यांच्या विरुद्ध आसूड उगारला गेला. जमिनीचे फेरवाटप आणि त्याबरोबरच शेतकरी मजुरांना द्यावयाच्या सोयीसवलतींची लांबलचक जंत्री यामुळे केरळातील शेतमजुरी अत्यंत महागडी झाली. रबर, कॉफी, नारळ या महत्त्वाच्या उत्पादनांत जागतिक बाजारपेठ विरुद्ध गेली. त्यामुळे जागतिक व्यापार संस्था आणि व्यापाराचे खुलीकरण याविरुद्ध केरळातील मोठ्या भागात असंतोष होता. याउलट मसाल्याचे पदार्थ आणि कॉफी पिकविणाऱ्या मळेवाल्यांना डाव्या पक्षाचे सरकार सत्तेवर आले आणि त्यांनी पुन्हा समाजवादी धोरणे चालू ठेवली तर साऱ्या मळेवाल्यांचे दिवाळे वाजणे अटळ होईल हे समजून चुकले होते. तेव्हा, केरळातील कम्युनिस्टांचा पाडाव हा त्याच्या शेतीविषयक स्टॅलीनी

धोरणाचा पराभव होता.

याउलट परिस्थिती बंगालमध्ये होती. डाव्यांची आघाडी तेथे सहाव्यांदा निवडून आली आहे. त्यांच्या पहिल्या तीन शासनांत जमिनीचे फेरवाटप, सामूहिकीकरण असल्या समाजवादी योजनांची अंमलबजावणी झाली. जमिनीचे इतके तुकडे तुकडे झाले की चेष्टेने, 'जमिनीचे माप एकरगुंठ्यांत न करता काडेपेटीत करावे' असे म्हटले जाऊ लागले. देशात इतरत्र पिकणारे अन्नधान्य व भात यांवर बंगाल जगू लागला. पंधरा वर्षांपूर्वी ज्योती बसूंनी बंगालच्या शेतीधोरणास नवी कलाटणी दिली. त्यामुळे तेथील उत्पादन वाढले आणि शेतकऱ्यांच्या मनात सरकारविषयी एक विश्वास तयार झाला. बंगालमधील कम्युनिस्टांचा विजय हा खोलवर जाऊन पाहिले तर, ज्योती बसूंच्या शेतीधोरणावर मतदारांनी केलेले शिक्कामोर्तब आहे.

वरवर पहाता गोधळवून टाकणाऱ्या या निवडणूक निकालांच्या मागे एक महत्त्वाचे सूत्र आहे. शेतीसंबंधीचे धोरण यापुढे निवडणुकांचा कल ठरविण्यात प्रमुख रहाणार आहे. विरोधी पक्षनेत्या सोनिया गांधी यांनी या मुद्द्यावर नेमके बोट ठेवले. केंद्रातील राज्यकर्त्या पक्षाची कुचंबणा शेतीच्या प्रश्नावर होत आहे हे त्यांनी प्रकाशझोतात आणले.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका केव्हाही होऊ शकतात/ लोकसभेच्याही निवडणुका काही फार दूर नाहीत. पाच राज्यांतील या निवडणुकांचा अभ्यास आणि त्यावर चिंतन करून राजकीय पक्ष आपापली निश्चित धोरणे ठरविण्याच्या कामास लागतील तर काही निभाव लागेल. पिढ्यान्‌पिढ्यांच्या शोषणाने गांजलेला, कर्जाच्या बोजापोटी निराशेने आत्महत्या करण्यास तयार झालेला शेतकरी मतदार पुढील निवडणुकांवर प्रभाव पाडेल; पण शेतीची परिस्थिती ठोकळेबाज भाषणांनी समजण्यासारखी नाही, सुधारण्यासारखी नाही. त्यासाठी खोलवर आणि दूरवर अभ्यास करून धाडशी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अशी ताकद आणि गुणवत्ता निवडणुकीत उतरणाऱ्या आजच्या कोणत्याच पक्षाकडे दिसत नाही हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आणि त्याबरोबरच देशाचेही.

*दि. २३/५/२००१*

■■

# सीता वनवासीच आहे अजून

मराठी दुसरीत असताना वडिलांची बदली बेळगावहून नाशिक येथे झाली. गुरुजींना सांगितले, 'मी शाळा सोडणार' त्यात आनंद किंवा अभिमान वाटण्याचे काय कारण? पण वाटला एवढे खरे. गुरुजींनीच विचारले, 'कोठे जाणार?' बेळगावातल्या बेळगावात दुसऱ्या शाळेत जात नाही हे कळून त्यांना समाधान वाटलेसे दिसले. 'नाशिकला जाणार का? मग, तुम्हाला आता द्राक्षे टोपलीटोपलीने खायला मिळणार!' ते म्हणाले. बेळगावात आंबे, फणस, काजू इत्यादी फळांची अगदी रेलचेल असे. पण, द्राक्षाची मोठी नवलाई होती. माझ्या तोंडालाही मेव्याच्या कल्पनेने पाणी सुटले. शाळूमित्रांना मोठा हेवा वाटला.

घरी आल्यावर आईने सांगितले, 'राम जेथे वनवासात गेला होता त्या गावी आपण चाललो आहोत. तेथे रामाची मोठी मंदिरे आहेत, सीतेचे जेथून रावणाने अपहरण केले ती गुंफा आहे. रामदासांनी तेथेच जपतप केले.' एवढी सगळी प्रवासी माहिती सांगण्याचे कारण, 'तेथे गेल्यावर बेळगावसारखी दंगामस्ती चालणार नाही, रामलक्ष्मणासारखे वागावे लागेल' हा इशारा.

त्या काळचे जुने नाशिक आणि त्यातल्या त्यात पंचवटीचा भाग खरोखरीच राममय होता. वर्गाची सहल पंचवटीला गेली. सीतागुंफा पाहिली. एकाखाली एक तीन मजल्यांची भुयारे, त्यात एखाद्या उंदरासारखे राम, सीता, लक्ष्मण रहात होते याचा मोठा अचंबा वाटला. तीन टप्पे बोळकांडांची ती भुयारे आठवली म्हणजे आजही जीव गुदमरल्यासारखे होते. वनवासी रघुनंदन खरंच या पर्णकुटीत राहिले असतील, या समोरच्या पायऱ्यांवर त्यांचा पदस्पर्श झाला असेल या कल्पनेनेही मोठे अद्‌भूत वाटायचे.

पुढे नाशिक सोडले. वेगवेगळ्या निमित्तांनी गोदावरीचा प्रदेश पाहिला. दंडकारण्य नेमके कोठे असावे याची कोठे निश्चिती दिसली नाही. विंध्य

पर्वतरांगांच्या दक्षिणेला दंडकारण्य हे नक्की; पण त्याची भौगोलिक नकाशातील नेमकी जागा निश्चित नाही. आंध्र प्रदेशात दोनचार जागी वनवासी राम येथेच राहिले असे छातीवर हात ठेऊन सांगतात. अगदी अलीकडे गुजरातमध्ये घातलेल्या डांग जिल्ह्यात 'डांग' हा 'दंड'चाच अपभ्रंश असल्याचे स्थानिक लोक निश्चितीने सांगतात.

तीस वर्षांपूर्वी बँकॉकला जाण्याचा योग आला. तेथे पाचूच्या बुद्धाच्या मंदिरात भोवतालच्या कोटावर सुंदर सुंदर चित्रकथा रंगविलेली होती. 'ही रामायणाची कथा आहे', वाटाड्याने सांगितले. चाळीस पन्नास चित्रांच्या मालिकेत रामायणाच्या कथानकाशी मिळतेजुळते एकही चित्र दिसेना. एक एक चित्र समजावून घेतले. सारी कथा रामापेक्षा रावणासंबंधीची. महापराक्रमी महातपस्वी सम्राट रावण; पण त्याची नियत बिघडली. तेव्हा त्याचा भाऊ बिभीषण याने उठाव घडवून आणला, रावणाचा वध केला. या साऱ्या कामगिरीत त्याला राम आणि त्याची वानरसेना यांचीही मोठी मदत झाली. या माहितीच्या धक्क्यातून सावरातो, न सावरतो तो वाटाड्याने सांगितले, "हेच खरे रामायण आहे. इंडियात लोक मानतात ते 'वाल्मिकी रामायण.' रामाचा जन्मदेखील हिंदुस्थानातील नाही, थायलंडमधला!" आता काय बोलता, कपाळ? मग मुद्दाम थायलंडची जुनी राजधानी अयोद्ध्या येथे जाऊन आलो. 'सा रम्या नगरी' असावी याची खात्री वाटावी इतपत भव्य वास्तू गतवैभवाची साक्ष देत अजूनही उभ्या आहेत. थाई राजघराण्यात रामाचे नाव परंपरेने चालते हे कळल्यावर भारतातील रामचरितासंबंधीच्या सर्वच अवशेषांविषयी मनात मोठा गोंधळ माजला.

काही काळाने वाचनात आले की, भारततही एकच एक वाल्मिकी रामायण प्रचलित नाही; अनेक रामायणे आहेत. वाल्मिकीचा राम पुरुषोत्तम, धीरोदात्त नायक आहे. तुळशीदासाचा राम 'प्रभु रामचंद्र' आहे. दक्षिणेत आणि जैन रामायणात तर मोठी विचित्र विचित्र कथानके प्रचलित आहेत. द्रविड चळवळीच्या साहित्यात रावणनिष्ठा भरपूर आहे आणि आजकालचे DMKचे नेते रामाची भरपूर निर्भत्सनाही करतात.

स्त्रियांच्या लोकगीतांत रामाचे अग्रस्थान रहाते, लक्ष्मणचे बंधुप्रेमही मानले जाते; पण त्यांच्या गीतांतील खरी कथा सीतेच्या त्यागाची, सोशिकतेची आणि शांत, गंभीर, सोज्वळ बलिदानाची आहे.

रामायणाचा विषय मनातही नसताना यवतमाळ जिल्ह्यात लक्ष्मीमुक्तीच्या कामासाठी गेलो. या कार्यक्रमाचा फारसा गवगवा झाला नाही; पण शेतकरी

महिला आघाडीने दोन लाख स्त्रियांना त्यांच्या पतीच्या जमिनीतील एका भागाची मालकी मिळवून दिली आणि दानपत्राचा कार्यक्रम दोनशेवर गावांनी गावभर सडारांगोळ्या घालून, रोषणाई करून, ढोल लेझीम लावून मिरवणुका काढून साजरा केला ही मोठी लोकविलक्षण गोष्ट आहे. या आंदोलनाला विनोबाजींच्या व्यक्तिमत्वाची कोणी स्त्री–अग्रणी मिळाली असती तर साऱ्या देशात मोठी क्रांती घडून आली असती. अशी अग्रणी मिळेपर्यंत लक्ष्मीमुक्तीची ज्योत तेवत ठेवण्याचे काम मी जमेल तसे करीत होतो.

यवतमाळ जिल्ह्याच्या रावेरी गावी लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम झाला. मोठी सभा झाली. सभेत 'स्त्रियांच्या मालमत्तेचा हक्क' हा प्रश्न मांडताना मी, रामामागोमाग वनवासात गेलेल्या सीतेची महाराणी बनल्यानंतर रामाने घरातून काढून लावल्यानंतर काय दैना झाली याचे वर्णन केले.

सभा झाल्यानंतर गावकरी म्हणाले, "साहेब, तुम्ही कथा सांगितली ती आमच्या गावचीच. वनवासी सीता जंगले तुडवीत तुडवीत आमच्या गावी आली. तिची बाळंतपणाची वेळ झाली होती. लवकुशांना तिने जन्म दिला तो याच गावी."

माझ्या मनात पुन्हा गोंधळ. रामराज्य सिनेमामुळे, टी.व्ही. वरील रामायणामुळे, परित्यक्ता सीता वल्मिकी ऋषींच्या आश्रमात कालक्रमणा करीत होती, तेथेच लवकुशांचा जन्म झाला आणि वाल्मिकीने त्या दोन बाळांना मोठे केले अशी समजूत पक्की झाली होती. पंजाबातील अमृतसरजवळ एका गावातही 'लवकुशांचा जन्म येथेच झाला' असे आख्यान ऐकले होते.

रावेरीकर मंडळींना मी विचारले, "काय पुरावा आहे?"

गावाबाहेर आजही प्रसूतीस्थानी मंदिर आहे. मंदिर हेमाडपंथी आहे, त्यामुळे ते फारसे प्राचीन नसावे. शेजारी लवकुशांनी बांधून घातलेल्या भीमकाय हनुमानाची मूर्ती आहे. अशी निर्वीर्य हनुमानाची मूर्ती हिंदुस्थानात इतर कोठेही नाही.

माझ्या चेहेऱ्यावरची संशयाची भावना गावच्या देशमुखांनी ओळखली. "दगडाची देवळे आणि मूर्ती हा काही पुरावा नाही; पण सांगतो ऐका. गावात आणि आसपासच्या प्रदेशात मौखिक परंपरेने चालत आलेली ही कथा आहे. प्रसूतिश्रमांनी क्लांत झालेल्या सीतेने थोडी लापशी करून पिता यावी म्हणून गावकऱ्यांकडे मूठभर गहू मागितले. गावात उपऱ्या आलेल्या या बाईची या लोकांनी हेटाळणी केली; एवढीशी भीक घालण्यालाही नकार दिला आणि अद्‌भूत घडले. नवजात मुलांना दूधही मिळणार नाही या कल्पनेने सुशांता, संयमधना

जानकी छाव्यांच्या संरक्षणाकरीता सरसावणाऱ्या सिंहीणीच्या त्वेषाने गावकऱ्यांवर तुटून पडली. साऱ्या गावाला तिने शाप दिला, 'या परिसरात गहू कधीच उगवणार नाही.' "

गावकरी मोठ्या अपराधी भावनेने सांगत होते, " खरंच साहेब, गहू कधी येथे उगवलाच नाही; गावकऱ्यांनी लावायचा कधी प्रयत्नही केला नाही. अलीकडे पंजाबमधून हायब्रीड गहू आला तेव्हा लोक तो लावू लागले."

साऱ्या गावाने आपल्या पूर्वजांच्या अपराधाचा इतक्या निखळ प्रामाणिकपणाने जवाब द्यावा ही बाब कोणत्याही शीलाखंडापेक्षा मला अधिक विश्वसनीय वाटते.

सीतामातेच्या या दिव्याचे काही स्मारक व्हायला पाहिजे असे वाटले. त्या काळी निवडणुकांच्या राजकारणासाठी अयोद्धेतील मशिद पाडून तेथे राममंदिर बांधण्याचा मोठा अट्टाहास चालू होता. कोट्यवधी रुपये त्या कामासाठी खर्च होत होते. अयोद्ध्या मंदिराचे काही होवो, राममंदिरांचा देशात काही तोटा नाही. राम पुरुषोत्तम कितपत होता यासंबंधी शंबूकवादी संशय उभा करतात, पण जनककन्येच्या दिव्यत्वाबद्दल कोठे चकार शंकासुद्धा घेतली जात नाही.

तेव्हापासून रावेरीचे गावकरी आणि शेतकरी महिला आघाडी एकत्र होऊन रावेरी गावी सीतेचे काही स्मारक असावे, साधने जुटविता आल्यास परित्यक्ता निराधार स्त्रियांना तेथे आतातरी लापशीसाठी पसाभर गहू मिळण्याची सोय व्हावी अशी योजना आखीत आहेत. गावकऱ्यांनी जमीन देऊ केली आहे, श्रमदानाची तयारी ठेवली आहे. पण यथोचित स्मारक म्हणजे मोठी खर्चाची बाब आहे. ज्या संघटनेचे त्यातले त्यात बरे कार्यकर्ते मोटारसायकलीत रॉकेल घालून प्रचाराचे काम करतात ती या कामासाठी पैसा कोठून उभा करणार? दहा वर्षे झाली, काम रखडले आहे. देशभर त्या अवधीत कित्येक स्वामीमहाराजांची वैभवशाली मंदिरे उभी राहिली. वनवासी सीतेचे रावेरीतील मंदिर अजूनही भग्नावस्थेत आहे; सीता अजूनही वनवासीच राहिली आहे.

*दि. १०/१/२००१*

■■

# नेपाळमधील शाही शिरकाणाचा इशारा

दररोजच्या वर्तमानपत्रांत देशविदेशच्या बातम्या असतात. हिंदुस्थानातील बातम्या म्हणजे पक्षापक्षातील भांडणे, आयाराम गयाराम यांच्या कारवाया, भ्रष्टाचाराची नवनवीन प्रकरणे, पुढाऱ्यांची भाषणे, न्यायालयांचे निकाल आणि लोकांची पिण्याच्या पाण्यासारख्या साध्या गोष्टींबद्दलही होणारी दैना; त्याखेरीज काश्मीरमध्ये आतंकवाद्यांनी केलेल्या हत्या, टोळीवाल्यांच्या मारामाऱ्या आणि पोलिसांबरोबरच्या त्यांच्या चकमकी, टेंपो-जीपची टक्कर, इतके ठार, इतके जखमी यांत सारे काही येऊन जाते. शहरी सुशिक्षितांकरिता पाहिजे तर क्रिकेट-टेनिसच्या परदेशी स्पर्धा आणि मुंबई शेअर बाजारातील चढउतार यांची थोडी पुरवणी.

परदेशांतील, म्हणजे प्रामुख्याने इंग्लंड, युरोप आणि अमेरिका इत्यादी देशांतील वर्तमानपत्रांतील बातम्या म्हणजे आर्थिक तेजीमंदी, निवडणुका, लोकसभांतील भाषणे, तेथील पुढाऱ्यांचे गरीब देशांतील दौरे आणि गरीब देशांतील पुढाऱ्यांच्या श्रीमंत देशांतील वाऱ्या; महत्त्वाच्या बातम्या म्हणजे फुटबॉल, बेसबॉल, नट्या आणि पुढारी यांच्या भानगडी.

बातम्यांच्या ठराविक साच्यातून नेपाळने सगळ्या जगाला हादरवून वेगळे केले. ब्रह्मदेशातील अतिरेक्यांनी पन्नास वर्षांपूर्वी सरळ लोकसभेत घुसून पंतप्रधान आँग सॉन यांच्यासहित सारी लोकसभाच गारद करून टाकली. त्यानंतर, हत्याकांडामुळे सारे सरकारच नाहीसे झाल्याची घटना घडली नव्हती. काठमांडूच्या बातम्या वाचल्या की, आपण वर्तमानपत्र वाचतो आहोत का नाथ माधवांची 'वीरधवल' सारखी कादंबरी वाचतो आहोत यांची भ्रांती वाटते.

नित्यनेमाप्रमाणे आठवड्याच्या पारिवारिक भोजनाकरिता सारे शाही कुटुंब एकत्र येते, त्या सगळ्यांची हत्या होते, हत्यारा स्वतः अभिषिक्त युवराजच

असतो; आईबापांना प्रेयसी पसंत नसल्यामुळे हा सारा आकांत घडला हे काही २००१ सालात घडले असे वाटत नाही. त्यानंतर खुद्द राजपुत्राचाच मृत्यु, त्याच्या चुलत्याचा राज्याभिषेक. या साऱ्या घटना पहाता आपल्या सरहद्दीवर असलेला छोटासा देश काही वेगळ्याच कालखंडात जगत असावा हे स्पष्ट होते.

नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र. त्याला समुद्रकिनारा नाही; वाहतूक, संचार जे काही व्हायचे ते भारताच्या माध्यमातून. भारतीय परंपरेप्रमाणे तेथील राज्यव्यवस्था वर्षानुवर्षे चालत असे; म्हणजे नामधारी राजा व त्यांचा राणा पेशवा. नेपाळ कॉँग्रेसच्या नेतेमंडळींचे भारतीय कॉँग्रेसच्या नेते मंडळींशी घनिष्ठ संबंध. लोकसभा, निवडणुका वगैरे नेपाळात आल्या त्या कॉँग्रेसच्या चळवळीमुळे. राजेशाहीचे तेथे पुनरुत्थान झाले हेही सध्याच्या काळात अद्‌भूतच म्हटले पाहिजे. एका बाजूने हिमालय आणि दुसऱ्या बाजूला हिंदुस्थान अशा भौगोलिक परिस्थितीतील हे हिंदूराष्ट्र; पण हिंदुस्थानशी संबंध जिव्हाळ्याचे नाहीत. नेपाळातील पुरुष गुरखा, चौकीदार म्हणून किंवा सैन्यात जगभर पसरले आणि नेपाळच्या मुली कोलकता-मुंबईसारख्या शहरांच्या कुंटणखान्यांत. काही किरकोळ उद्योगधंदे चालले ते भारतातील लायसेंन्स्-परमिट राज्याचा फायदा उठविण्याकरिता - तस्करीच्या स्वरूपाचे. गेली कित्येक वर्षे नेपाळी लोकांच्या मनात भारताविषयी एक पक्की अढी बसली आहे.

हिप्पी लोकांच्या कालखंडात त्यांनी काठमांडूचे तीर्थस्थानच बनविले होते. त्यामुळे साहजिकच तेथे मादक द्रव्यांचा व्यापार आणि सेवन फळफळले. अफगाणिस्तानापासून ते नेपाळपर्यंत साराच प्रदेश मादक द्रव्यांच्या वाहतुकीचा टापू म्हणून ओळखला जाऊ लागला. तामिळ वाघ असोत, तालिबानवाले असोत की खलिस्तानवाले असोत; मादक द्रव्यांची तस्करी करायची म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था ही त्यांच्यासाठी मोठी ब्यादच होते. या तस्करांना प्रस्थापित सरकारी व्यवस्था निष्प्रभ होईल अशी काही कारवाई करीत रहाणे आवश्यकच होते. एखाद्या स्थानिक अहंकाराला गोंजारून स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राची मागणी करणे हे सगळ्यात सोयीस्कर. नेपाळमध्येही या तस्करांचा धुमाकूळ कित्येक वर्षे चालत आला आहे. भरीस भर म्हणून माओवादी बंडखोरांनीही सशस्त्र उठाव करून तेथील मुलुखाची चांगलीच लांडगेतोड चालविली होती.

आपल्या परसदारात असलेल्या या देशात काय धुमसते आहे याची पर्वा हिंदुस्थानच्या परराष्ट्रसंबंधांची जबाबदारी शिरावर बाळगणाऱ्यांना नसावी. त्यांच्या

दृष्टीने जग म्हणजे पश्चिमेकडील श्रीमंत देश! आशियातील जवळचे देश तर सोडाच, पण मांडीला मांडी लावून बसलेल्या नेपाळ-भूतानसारख्या देशांशीही आमची जवळीक नाममात्रच.

नेपाळमध्ये जे घडले ते म्हणजे साऱ्या शाही कुटुंबाचे शिरकाण, दिल्लीच्या परराष्ट्र खात्याला बी.बी.सी.च्या बातम्यांवरूनच कळले. खरे म्हटले तर, नेपाळमध्ये कोणता ना कोणता उत्पात होऊ घातला आहे याची जाणीव नेपाळच्या सरहद्दीवरील चोरट्या व्यापारावरूनच मुत्सद्द्यांना यायला पाहिजे होती.

झाले गेले होऊन गेले; पुढे काय? नेपाळात पुढे काय होईल? साऱ्या हत्याकांडात कोण गुन्हेगार ठरेल? नवे राजे किती दिवस टिकून राहतील? नव्याने कोणत्या प्रकारची सत्ता प्रस्थापित होईल? या उलथापालथीच्या काळात नेपाळमधील भारतविरोधी तत्त्वे चीन आणि पाकिस्तानची मदत घेऊन आपली ठाणी मजबूत करतील काय? थोडक्यात, नेपाळ भारतविरोधी कारवायांचा अड्डा बनेल काय? हे सारे प्रश्न हाताळण्याइतके सामर्थ्य आमच्यात नाही; तेव्हा जे काय होईल ते पहावे, ऐकावे, त्यावर मनोरंजक कथा सांगाव्यात, ऐकाव्यात एवढेच काय ते उरते!

आजपर्यंत, भारताच्या हितविरोधी म्हणजे औद्योगिकदृष्ट्या प्रगत, सामाजिक, राजकीय संबंधांत उन्नत, धनधान्यांनी समृद्ध आणि शस्त्रास्त्रांनी सुसज्ज राष्ट्रे असतील त्यांच्यावर पिचकाऱ्या टाकीत बोलणे हा आमच्याकडील हौशी राजकारण्यांचा आवडता छंद!

पाकिस्तान हे तसे किरकोळ राष्ट्र; पण चांगल्या विशाल महिलाउंदराची भीती बाळगतात तद्वत् पाकिस्तानविषयीच्या भयगंडाने बहुतेक भारतीयांना ग्रासले आहे. 'सीॲटी'च्या काळात पाकिस्तानच्या मागे दुष्ट साम्राज्यवादी अमेरिका उभी आहे आणि आता केवळ भारताच्या आकसापोटी चीन पाकिस्तानला मदत करीत आहे असे म्हटले, की भयगंडाच्या वावदूकपणावर काहीसे पांघरूण पडते!

नेपाळी राजघराण्यातील हत्याकांडानंतर एक नवीच समस्या उभी राहिली आहे. सरहद्दीला लागून कोणा सामर्थ्यवान लोकांचे राष्ट्र असावे ही आम्ही चिंतेची बाब मानीत आलो; नेपाळ प्रकरणाने दाखवून दिले की, शेजारी बलदंड राष्ट्र असण्यापेक्षा कमजोर, दुर्बळ, मध्ययुगीन परंपरांचा देश असणे अधिक धोक्याचे ठरू शकते.

*दि. १३/६/२००१*

■■

# ग्रामोद्धारक– शबनम ते संगणक

तेवीस वर्षांपूर्वी मी परदेशातून परत आलो. भारतात परतल्यावर काय करायचे याचा कच्चा आराखडातरी ठरलेला होता. समजून उमजून कोरडवाहू जमिनीच्या शोधात निघालो. जगभरच्या गरीब देशांच्या गरीबीचा उगम शेतीत असल्याचे वेगवेगळ्या देशांच्या दौऱ्यात जाणवले होते. राजधानीचे शहर सारे झकपक; श्रीमंत देशांच्या राजधान्यांच्या तुलनेत फारसे कुठे कमी नाही. पण तेवढे शहर सोडून पंचवीसतीस मैल बाहेर गेले की डोळ्यासमोर येणाऱ्या खेड्यांची भणंगता शतकानुशतके लवमात्रही बदललेली नसते हे लक्षात आले होते.

परदेशांत असताना पाण्याची आणि बिगरपाण्याची शेती यांत काही मोठा फरक जाणवला नव्हता. भारतात परतल्यावर मात्र बागायती आणि कोरडवाहू म्हणजे जमीनअस्मानाचा फरक असल्याचे प्रवाद जागोजागी, क्षणाक्षणाला कानावर आदळू लागले. बागायतदार म्हणजे ऊसशेतकरी म्हणजे माजलेला, धनदांडगा अशी शहरवस्तीत सगळ्यांची खातरजमा झालेली. गरिबीचे मूळ कारण शोधून काढायला निघालेला मी धनदांडग्या शेतीत जाऊन काय करणार, कपाळ सार्वत्रिक प्रवादाचा माझ्यावर परिणाम झाला आणि शेतीच्या प्रयोगासाठी जमीन घ्यायची ती कोरडवाहूच, असा मी आग्रह धरला.

त्या काळी रावसाहेब शेंबेकर म्हणजे मोठी मातब्बर बागायतदार आसामी समजली जात असे. कोठूनतरी कर्णोपकर्णी त्यांच्या कानावर बातमी गेली की, स्वित्झर्लंडमधून परत आलेला कोणी वेडा पीर शेतीच्या प्रयोगासाठी कोरडवाहू जमिनीच्या शोधात आहे. भला माणूस आपणहून मला पुण्यात भेटायला आला. बागायती शेतीतूनसुद्धा गरीबीच निघते असे तऱ्हेतऱ्हेने ते मला पटवून देऊ लागले. पहिला प्रयोग म्हणून तरी मी बागायतीच शेती करून पहावी, त्यासाठी

जमीन विकत घेण्यात पैसे हकनाक घालवू नयेत असा त्यांनी प्रेमळ सल्ला दिला. एवढेच नव्हे तर, त्यांनी आपल्याकडील जमिनीचा एक तुकडा बिन मोबदल्याचा देऊ केला.

मी मनात म्हटले, 'बागायतदार मोठा लबाड दिसतो आहे. मी कोरडवाहू शेतीचा अभ्यास केला तर निघणारे निष्कर्ष धनाढ्य बागायतदारांना न सोसणारे निघतील म्हणून सारी कारवाई चालली आहे.' शक्य तितक्या सौजन्याने शेंबेकर रावसाहेबांना काढून लावले. आंबेठाणच्या कोरडवाहू कातळात पाणी शोधण्याच्या आणि शेती फुलवण्याच्या कामात लागून गेलो. शेंबेकरांच्या मनात किती सच्चाई आणि कळकळ होती ते कळायला दहा वर्षे लागली. त्यांचा तेवढा एक अपवाद सोडला तर शेतीच्या प्रयोगात सल्ला देण्याचा किंवा मी काय करतो आहे ते समजून घेण्याचा उपद्व्याप करणारे कोणीच आले नाहीत.

सल्लागारांचा लोंढा कोसळला तो तीनचार वर्षांनी; चाकणचे कांदा आंदोलन झाले आणि शेतीमालाच्या अपुऱ्या भावाचा, आता भक्कम झालेला सिद्धांत मी जाहीररित्या मांडू लागलो तेव्हा.

त्या काळी गावोगाव ग्रामोद्धारकांची पेवे फुटली होती. कुणी डॉक्टर, फादर डेमियनच्या थाटात, शहरात चालणारी प्रॅक्टिस सोडून गावांत वैद्यकीय सेवा देत होते. वैद्यकीबरोबर साहजिकच थोडी नाट्यकलोपासना आणि पुष्कळसे राजकारण. डॉ. राजनीकांत आरोळ्यांना मेगॅसेसे पारितोषक मिळाले तेव्हापासून तर त्यांच्या मागोमाग आपलाच नंबर अशा थाटात ही मंडळी वावरायची. कोणी गावोगावी गोबर गॅसच्या टाक्या बांधून त्या एककलमी कार्यक्रमातूनच गावातील ऊर्जेचा आणि गरिबीचा, दोन्ही प्रश्न हमखास सुटणार असल्याचे आकांताने सांगत असत. कोणी, सुबाभूळ हाच कल्पतरु असल्याचा जणू 'डायरेक्ट' वरून साक्षात्कार झाल्यासारखा, विश्वासाने सुबाभळीच्या बिया लोकांना विकत होते. कोणी सुधारित चूल काढून त्यामुळेच साऱ्या शेतकऱ्यांचे कल्याण होणार आहे असे मांडत आपले आश्रम थाटून बसले होते.

कोणी गावकऱ्यांना संडास देण्याचे व्रत घेतले होते कोणी शोषखड्ड्यांचा प्रचार करीत होते. गावाच्या परिसरात पडणारे पाणी साठवून, वापरून शेती सुधारण्याचे काम म्हैसाळचे देवल करीत होते. अशा मंडळींची जत्रा झाली ती अण्णा हजाऱ्यांना मान्यता मिळाल्यानंतर. या सर्वांविषयी मी थोड्या उपहासाच्या सुरात लिहीत आहे. खरे म्हटले तर ते योग्य नाही. आपापल्या मगदुराप्रमाणे त्यांनी गावच्या हरपलेल्या लक्ष्मीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; काही रुटूखुटू

काम करून काही लाभदायक परिणाम दाखवूनही दिले होते. त्यांच्या कार्यक्रमामुळे अगदीच कोणाचे काहीच कल्याण झाले नाही असे म्हणता येणार नाही.

या साऱ्या मंडळींचा इंग्रजीतील रेप्लिकेशन (Replication) हा शब्द मोठा आवडता असे. 'आपण दोनचार घरट्यांपुरते काम केले; असेच अजून पाचपन्नास कार्यकर्ते भेटले तर साऱ्या गावाचे भले होऊन जाईल; आणि आपल्यासारखे कळकळीचे व व्यवस्थापनकुशल लाख, दोन लाख कार्यकर्ते मिळाले की साऱ्या हिंदुस्थानच्या गरिबीचा प्रश्नच संपून जाईल.' अशी त्यांची धारणा होती. विश्वाचे कोडे गवसल्याचा कांगावा करणारे बाबा चेहऱ्यावर ज्या प्रकारचा धीरगंभीर भाव बाळगतात त्याच कोटीतील यांचा चेहरा. कोणाला न सुटलेले गरीबीचे कोडे आपण सोडवल्याची धुंदी त्यांच्या शब्दाशब्दात जाणवे.

शेतकरी संघटनेची लाट साऱ्या महाराष्ट्रात पसरली आणि पोरेटोरेदेखील, ग्रामोद्धाराचे कंकण हाती बांधलेल्या महात्म्यांना गरिबीच्या अंकगणितातील प्रश्न टाकू लागले. एक एक करीत ही सारी मंडळी मागे हटली, कोणाला त्यांची फारशी आठवणही अलीकडे होत नाही.

ग्रामोद्धारकांची ही उज्ज्वल परंपरा संपली, की काय असा प्रश्न पडू लागला आणि गेल्या आठवड्यात एकदम लक्षात आले, की ही जमात संपलेली नाही, जमिनीत खोल मुळे रुजवून बसलेली आहे. काळाच्या ओघाबरोबर त्यांचा जुना 'सर्वोदयी थाट' संपला आहे आणि नेहरूशर्ट, पायजमा व शबनम कालबाह्य झाले आहेत. कार्यक्रम सर्वोदयी तोंडवळ्याचे राहिलेले नाहीत. आधुनिकातील आधुनिक तंत्रज्ञाने या जमातीने आता हाताळायला सुरुवात केली आहे आणि त्यातूनच पुन्हा साऱ्या गावच्या गरिबीच्या दैत्याचा नायनाट करण्यासाठी पृथ्वीतलावर आपण संप्रती नवा अवतार धारण केला असल्याच्या थाटात ग्रामोद्धारकांची ही नवी पिढी पोसते आहे.

शहरांत गणकयंत्रे आता घरोघरी झाली आहेत. अगदी शाळकरी मुलेसुद्धा त्यांना रस वाटणारी काही 'जानकारी' इंटरनेटवर मिळते काय हे शोधत तासच्या तास घालवतात.

याउलट, खेडेगावात टेलिव्हिजन पोहोचला तरी कॉम्प्युटर फारसा पोहोचलेला नाही. तालुक्याच्या किंवा बाजारपेठेच्या गावात तो येऊन थांबला आहे. जेथे वीज नाही आणि टेलिफोनची तार आपल्या लहरीप्रमाणे काम करते तेथे कॉम्प्युटरने जावे कसे?

एका सज्जन गृहस्थांची गाठ पडली. परदेशात अनेक वर्षे काम करून,

धंद्याव्यवसायात बऱ्यापैकी पैसा कमवून गृहस्थ हिंदुस्थानात आले होते. 'गावागावांत कॉम्प्युटर न्यावा, शेतकऱ्यांचे हात इंटरनेटपर्यंत पोहोचवावेत; त्यातून त्यांना शेतीमालाची बाजारपेठ, वधु-वर संशोधन आणि तलाठ्याच्या कचेरीत होणाऱ्या कारभाराचा काही अंदाज आला तर त्यामुळे तरुणांचा आत्मविश्वास वाढेल, तरुणींचा त्याहूनही वाढेल आणि साऱ्या गावावरची अवकळा दूर होईल.' असे हे सद्‌गृहस्थ मोठ्या आत्मविश्वासाने अमेरिकी उच्चारातील फर्ड्या इंग्रजीत सांगत होते. त्यांनी आग्रह केला, त्यांच्या प्रयोगाखाली आलेली दोनतीन गावे पहायला यावे अशा आग्रहाला मी बळी पडलो. एके दिवशी सकाळी आगगाडीने त्यांच्या गावाकडे निघालो. माझ्या जागेवर बसताच साहेबांनी गुळगुळीत कागदांच्या, आकर्षक रंगीबेरंगी छपाईच्या एका साप्ताहिकाचे काही अंक माझ्यापुढे ठेवले. मुखपृष्ठावरच दूरदर्शनवरील मालिकेत चालून गेल्या असत्या अशा दोनतीन मुलींचा छान फोटो होता. गावातील कोणी शेवंता, शोभा, कल्पना असावी तसेच चेहरे, फारसा काही फरक नाही. फक्त एकीने डोक्यावर कौंटी घातली होती; दुसरीने जीन्स पँट आणि शर्ट. ग्रामउद्धारक उत्साहाने सांगत होते, 'ही कॅथी, ही लिली वगैरे वगैरे. फार चांगले काम करतात तिघी; पण या प्रसिद्धीने त्यांच्या डोक्यात वारं न शिरो म्हणजे झाले!' हे म्हणताना, 'आपल्याला स्वतःला अफाट प्रसिद्धी मिळाली असली तरी आपणमात्र डोक्यात वारे शिरू दिलेले नाही' याचा मात्र बऱ्यापैकी दर्प जाणवला.

गावात येताच, सगळीकडे हमखास दिसणारी Power Point माहितीपत्रके हाती ठेवण्यात आली. एका सभागृहात नेण्यात आले. कार्यालयाची बांधणी महागडी असूनही साधी दिसावी असा आटोकाट प्रयत्न केल्याचे जाणवत होते. पुन्हा एकदा Power Pointच्या सहाय्याने Retro-Projecter वापरून ग्रामविकासाबद्दलच्या संस्थेच्या आद्य कुलगुरूंच्या विचारांविषयी माहिती सांगण्यात आली. गावात गणकयंत्र येताच सारे कसे आमूलाग्र पालटून जाईल याचे रसभरित पण गद्य वर्णन. हा सगळा सोपस्कार आटोपल्यावर पहिले इंटरनेट केंद्र पहायला गेलो. दोनचार मुलेमुली तेथे बसली होती; कॉम्प्युटरवर काही खेळ खेळत होती. आम्ही आल्यावर चपापून उठून बसली. संस्थेने तयार केलेले पोर्टल आम्हाला दाखविण्याची आज्ञा झाली. 'पण, साहेब, डिश चालू नाही.' ग्रामोद्धारकांचा चेहरा पहाण्यासारखा झाला. 'हे सरकारी धोरणामुळे सारे होते आहे.' उद्धारकांनी सांगायला सुरुवात केली. 'डिशचा कारभार पहाणाऱ्या कंपनीकडे सरकारने १०० कोटी रुपये अनामत म्हणून मागितले होते. कोठून द्यावे त्यांनी?' म्हणजे,

डिश चालू नाही हा काही आजचा प्रकार नाही; निदान दोनचार महिनेतरी इंटरनेट बंद असणार.

दुसऱ्या केंद्रावर गेलो. तेथे डिश नव्हती, टेलिफोनच्या तारेवर इंटरनेट चालवायचे होते; पण टेलिफोनही बंदच, टेलिफोनच्या तारांची ही सदाच अशी अवस्था.', उद्धारक म्हणाले. पहाता पहाता एका केंद्रावर भगीरथ प्रयत्नांनी उघडल्या गेलेल्या इंटरनेटवर आलेली माहिती पाहिली. बाजारपेठेचे भाव तीन दिवसांचे जुने होते. 'ही गोष्ट आमच्या लक्षात आली आहे,' महात्मा म्हणाले, 'सध्या ही माहिती टेलिफोनवरून घेतो आणि इथेच भरून टाकतो,' आता पुढे बोलण्यात काहीच अर्थ राहिला नव्हता.

परतीच्या वाटेवर महात्म्याने आपण केवढे त्याग करून, पैसा खर्चून, झीज सोसून हे काम केले याचे वर्णन केले. 'थोड्या अडचणी आहेत; कोणत्याही कामात सुरुवातीला अडचणी असणारच. तेवढ्या किरकोळ दोन-तीन बाबी नीट केल्या की आमच्या प्रयोगाने मोठा चमत्कारच घडणार आहे! पहालच तुम्ही!' महात्मा पुढे म्हणाले, 'तुमच्या मंत्रालयाच्या NGOच्या यादीत तेवढे आमच्या संस्थेचे नाव घालून टाका म्हणजे काम करण्यास आम्हाला मोठा उत्साह वाटेल.'

कोण्या एके काळी गांधीजींच्या शब्दाखातर गावांत जाऊन, अत्यंत साधी रहाणी ठेवून जमेल तितकी गावाची सेवा गाजावाजा न करता आयुष्यभर केलेली एक पिढी होऊन गेली तिचे हे वारसदार! काही लोकांना उद्धारकत्वाची चटक लागते; त्यांच्या हातून उद्धार करून घेण्याची कोणाला गरज वाटते किंवा नाही, उद्धाराच्या कार्यातून कोणाचे काही भले होण्याची शक्यता आहे किंवा नाही याला काही महत्त्व नाही. आम्हाला 'उद्धारक' व्हायचे आहे तेव्हा जगाने आमचे कोडकौतुक पुरवलेच पाहिजे असा या आजच्या गावउद्धारकांचा आग्रह आहे.

गावे बिचारी खचत आहेत. कर्जबाजारी झालेले शेतकरी विष पिऊन जीव देत आहेत. अशा गावांत कॉम्प्युटरची स्थापना करून 'गावची लक्ष्मी' परत आणण्याचा हा कार्यक्रम म्हणजे पार कळा गेलेल्या म्हातारीला, पु. ल. देशपांड्यांच्या शब्दांत, 'सिगरेट पाकिटातील चांदी लावून शोभा आणण्याचा' प्रकार आहे.

शोषखड्डे आणि बिनधुराच्या चुली यांच्याऐवजी उद्धारकांच्या हाती गणकयंत्र आले एवढीतरी गरीबी हटलीच की नाही?

*दि. २०/६/२००१*

■■

# सरकारी आतंकवाद

पंजाबमध्ये खलिस्तानवादी अतिरेकी धुमाकूळ घालीत होते त्याच्या बंदोबस्तासाठी पोलिस आणि लष्कर यांनी जे कार्यक्रम हाती घेतले त्याला 'सरकारी आतंकवाद' असे नामाभिधान मिळाले होते. आतंकवादामुळे तयार झालेल्या असाधारण परिस्थितीत सरकारने वेगवेगळे कायदेकानून, अधिनियम बनवून पोलिसांच्या हाती सुलतानशाही सत्ता दिली होती. या सत्तेचा उपयोग काही प्रमाणात आतंकवाद्यांविरुद्ध झाला असेल हे नाकारता येत नाही; पण अशी अनिर्बंध सत्ता हाती आली, की तिचा गैरफायदा घेण्याचा मोह सरकारी यंत्रणेला कधी आवरत नाही.

मोटारसायकलवर बसून कोणीही दोघे जात असले तर त्यांना थांबवायचे, आतंकवादी असल्याचा संशय असल्याचे सांगून त्यांना बेदम मारपीट करायची आणि 'इतके इतके लाख रुपये आणून द्या, नाही तर एकाला गोळी घालून ठार करू' अशी धमकी द्यायची; आणि वर, 'आमच्या हाती सत्ता आहे, तुम्हाला मारून टाकले तर आम्हाला कोणी विचारणारसुद्धा नाही', अशी शेखी मिरवायची हे प्रकार त्या काळी पंजाबमध्ये सर्रास घडत.

थोडेफार सुखवस्तू खानदानी कुटुंब असले, की त्याचा गुरुद्वारांशी, निदान तेथील लंगर चालविणाऱ्या व्यवस्थापनाशी संबंध असायचाच. अतिरेकीही अशा कुटुंबाकडून खंडणी गोळा करण्यासाठी त्यांना धाकदपटशा दाखवीत. अशा एखाद्या संपर्काचा पत्ता लागला, की पोलिस अशा कुटुंबातील तरुण माणसास पकडून आणीत, कोठडीत ठेवून त्याचे अनन्वित हाल करीत आणि शेवटी कुटुंबीयांनी येऊन दादापुता केले म्हणजे पोटभर खंडणी घेऊन सोडून देत.

पंजाबातील सरकारी आतंकवादाची पुढची आवृत्ती आज काश्मीरमध्येही चालू आहे आणि ईशान्येतील राज्यांतील बंडखोरांच्या बंदोबस्ताच्या आधारानेही

वाढत आहे.

आतंकवाद्यांनी भयग्रस्त करून टाकलेल्या प्रदेशात 'सरकारी आतंकवाद' निपजावा आणि जोपासला जावा हे समजण्यासारखे आहे. कायद्याने प्रस्थापित झालेल्या शासनाविरुद्ध जे उघडउघड शस्त्र हाती घेऊन बंड करून उभे राहतात त्यांनी सरकारी सत्तेचा थयथयाट चालू झाला म्हणजे असे प्रकार होतील हे अपेक्षित धरायला पाहिजे आणि त्याबद्दल काहीशी तयारीही ठेवायला पाहिजे.

पण, सर्वसामान्य काळात शांततेच्या परिस्थितीत सरकारी अधिकाराच्या जागी आणि मंत्रिपदावर असलेल्यांनी स्वत:च गुंडगिरी करावी किंवा गुंडगिरीला उत्तेजन द्यावे असे आजपर्यंत कधी फारसे घडले नाही. शासनयंत्रणेनेही आजपर्यंत ही 'लक्ष्मणरेषा' पाळली. यापुढे ही शिस्त फारशी पाळली जाणार नाही असे दिसते आहे.

लोकसभेमध्ये राज्यकर्त्या पक्षाला हुकुमी बहुमताची शाश्वती नाही. दहा-वीस खासदारांचा पाठिंबा असलेला कोणी पुढारी राज्यकर्त्या आघाडीतून फुटला तर सारे सरकार कोसळण्याची टांगती तलवार. सत्ता गेल्यानंतर मानमरातब जाणार, सोयीसवलती जाणार; एवढेच नव्हे तर, नव्याने सत्तेवर आलेले विरोधी पक्ष आपल्यामागे पोलिसी चौकशांचा ससेमिरा लावून जगणे अशक्य करून टाकतील; प्रसंगी तुरुंगातही जावे लागेल अशा भीतीच्या छायेखाली मंत्रिगण वावरत आहेत आणि संकटातून सुटका करून घेण्यासाठी ते साध्यसाधनविवेक सोडून एका वेगळ्याच आतंकवादाचा मार्ग अवलंबीत आहेत.

सरकारची स्थिरता डामाडोल आणि नेमके याच वेळी जागतिक व्यापार संस्था (WTO), आर्थिक सुधार आणि जैविक तसेच माहिती-तंत्रज्ञान यांसंबंधीचे मोठे बिकट प्रश्न सरकारपुढे उभे ठाकत आहेत. खुलेपणात, शेवटी, देशाचे सर्वश्रेष्ठ हित आहे हे कोणीच नाकारीत नाही; पण, आपापल्या अकार्यक्षमतेचा सांभाळ करू इच्छिणारे उद्योजक, आपल्या अनर्जित भाग्याचा बचाव करण्यासाठी युद्धाच्या आरोळ्या ठोकणारे कामगार आणि नोकरदार यांच्या आक्रोशामुळे 'किम् कर्तव्यम्, किम् कर्तव्यम्' अशा अवस्थेत आलेले नेतृत्व विवेकभ्रष्ट झाल्यासारखे बेनसनदशीर मार्गांचा आतंकवाद अंगीकारू लागले आहे.

जागतिक व्यापार संस्थेच्या करारासंबंधीची बोलणी डिसेंबर २०००मध्ये अमेरिकेतील सिएटल येथे व्हायची होती. जागतिकीकरणाचे समर्थक निष्क्रिय राहिले; विरोधकांनी योजनाबद्ध निदर्शने केली, मोडतोड केली, जाळपोळ केली आणि परिणामत: तेथील मंत्रिपरिषद तहकूब करावी लागली.

वॉशिंग्टन येथे अमेरिकन राष्ट्रांच्या व्यापारी वाटाघाटीसंबंधीची परिषद खुलेपणाला विरोध करणाऱ्या आतंकवाद्यांनी अशीच बारगळविली.

युरोपीय राष्ट्रांची स्वीडनमधील स्टॉकहोम येथे होणारी बैठक कामकाज पुरे करू शकली नाही, कारण राजधानीतील रस्त्यारस्त्यात पर्यावरणवादी आणि बंदिस्त व्यवस्थावादी यांनी घातलेला धुमाकूळ.

पोटार्थी आणि मानपिपासी स्वयंसेवी संघटनांनी आतंकवादाचा अवलंब करावा, त्यासाठी सर्व आधुनिक व्यवस्थापनशास्त्रे आणि तंत्रज्ञाने यांचा वापर करून साऱ्या जगास वेठीस धरावे हे समजण्यासारखे आहे. पण, भारत सरकारच्या व्यापारमंत्र्यांनी 'येत्या काही महिन्यांत दोहा येथे होणाऱ्या पषिदेचे कामकाज 'सिएटल' पद्धतीची निदर्शने करून बंद पाडावे लागेल' अशी जाहीर धमकी देणे हा प्रकार अफलातूनच आहे!

वादाचा विषय थोडक्यात असा आहे. 'गॅट'च्या उरुग्वे वाटाघाटींनंतर नव्या जागतिक व्यापार संस्थेच्या कार्यक्षेत्रातील करारांचा मसुदा 'डंकेल प्रस्ताव' या नावाने प्रसृत करण्यात आला. त्यावर चर्चेचे गुऱ्हाळ लांबत गेले. या काळात काही श्रीमंत देशांच्या, वाटाघाटींच्या मामल्यात त्यांच्या अंगावर उलटण्यासारख्या काही तरतुदी होत्या त्या, लक्षात येऊ लागल्या. श्रीमंत देशांतील कामगार चळवळींनी 'व्यापार खुला झाल्यास मंदीची लाट येईल बेकारी माजेल' असा आरडाओरडा चालू केला आणि गरीब देशांत मजुरी स्वस्त आहे, बालमजुरांनाही कामाला लावले जाते, कामगारविषयक कायदे अनुदार आहेत; गरीब देशांतील कारखानदारी पर्यावरणाचा नाश करणारी असते. याउलट, श्रीमंत देशांत मजुरांची स्थिती, वेतन आणि सवलती अधिक चांगल्या असतात, कारखानदारांना पर्यावरणाची काळजी घेणे कायद्याने भाग पडते. तस्मात्, ही स्पर्धा विषम होईल,' असा हंगामा त्यांनी सुरू केला आणि त्यांच्या सरकारांनी 'गरीब देशांनी मजुरीसंबंधीचे कायदे न सुधारल्यास आणि पर्यावरणासंबंधी योग्य तरतुदी न केल्यास त्यांच्याविरुद्ध व्यापारी निर्बंध लादावेत,' असे प्रस्ताव मांडण्यात आले.

'मजुरांचे कल्याण आणि पर्यावरणाचे संरक्षण या विषयांवर काम करणाऱ्या स्वतंत्र जागतिक संघटना आहेत; त्यांच्या कार्यक्षेत्रात जागतिक व्यापार संस्थेने लुडबूड करू नये व कोणत्याही परिस्थितीत कामगार व पर्यावरण या विषयांसाठी व्यापारी निर्बंधांची तरतूद नसावी,' अशी मांडणी गरीब राष्ट्रांनी केली आहे.

पण, या विषयावर सर्व गरीब राष्ट्रांचे एकमत नाही. अनेक गरीब राष्ट्रांना

याच प्रश्नांवर त्यांच्याच देशांतील कामगारांना आणि पर्यावरणवादी संघटनांना तोंड देणे कठीण जात आहे. दोहा येथील मंत्रिपरिषदेत या विषयावर चर्चा झाली तर थोड्याफार फरकाने गरीब देशांना त्यांच्या कामगार आणि पर्यावरण या विषयी कायद्यांत काही प्रमाणात सुधारणा करण्याचे मान्य करावे लागेल असे दिसते.

हिंदुस्थानचे व्यापारमंत्री मुरासोली मारन यामुळे मोठे खवळून गेलेले दिसतात. 'श्रीमंत देशांनी जागतिक व्यापार संघटनेच्या कामकाजात सामाजिक सुधारणांचा प्रश्न घुसडण्याचे सोडले नाही तर तेथे 'सिएटल' पद्धतीने हस्तक्षेप करावा लागेल,' अशी धमकी त्यांनी दिली आहे.

हिंदुस्थान 'गॅट'च्या संस्थापक सदस्यांपैकी एक आहे. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीतही जागतिक करारमदार न तोडण्याबद्दल हिंदुस्थानची एक जागतिक कीर्ती आहे; काश्मीरमधील सार्वमत आणि अलीकडील एन्रॉन प्रकरण एवढेच काय ते अपवाद. अशा परिस्थितीत एका जबाबदार मंत्र्याने जागतिक व्यापार संस्थेची मंत्रिपरिषद उधळून लावण्याची भाषा करावी हा पर्यावरण-अतिरेकी आणि खुलीकरणविरोधी आतंकवाद यांच्या चढत्या श्रेणीचा पुरावा आहे.

पर्यावरण मंत्रालयाच्या अशा घातपाती प्रवृत्तीचे आणखी एक उदाहरण गेल्याच आठवड्यात घडले. साऱ्या जगात जैविक अभियांत्रिकीने निर्माण करण्यात आलेल्या बियाण्यांचा प्रसार झपाट्याने झाला आहे. या बियाण्याने उत्पादन वाढते आणि कीटकनाशकांचा वापर खूपच कमी करता येतो हे सर्वमान्य झाले आहे. या नवीन तंत्रज्ञानापासून वंचित राहिल्यामुळे भारतातील कापूस उत्पादक शेतकरी संकटात आला आहे. कारण, जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणे त्याला अशक्य झाले आहे. या बियाण्याचा वापर करण्याची हिंदुस्थानात सुरुवातही झालेली नाही.

या बियाण्याच्या वापराने पर्यावरणावर आणि कापसाच्या इतर जातींवर विपरीत परिणाम होणार असल्याची योजनाबद्ध आवई उठविण्यात आली आहे आणि सरकारी लाल फितीत कापसाचे नवे वाण अडकून पडले आहे. गेल्या वर्षी काही चाचण्या करण्याची परवानगी पर्यावरण मंत्रालयाने दिली होती. त्या चाचण्यांच्या निष्कर्षांच्या आधाराने बियाण्यांचे प्रगुणन करण्याची परवानगी देण्यात येईल आणि पुढच्या वर्षापासून भारतातील शेतकरी नवीन बियाण्याची पेरणी करू लागेल अशी आशा होती; पण प्रत्यक्षात घडले ते विपरीतच. गेल्या

वर्षी बियाणेउत्पादकांना प्रयोगाची परवानगी देण्यात आली, तसेच ICAR या सरकारी संशोधन संस्थेसही परवानगी देण्यात आली. सर्व प्रयोग पर्यावरण मंत्रालय, शेतकी मंत्रालय यांच्या देखरेखीखाली पार पडले. पर्यावरणावर दुष्परिणाम होत नसल्याचा निर्वाळा मिळाला; पण तरीही, पर्यावरण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी 'प्रयोगांची आणखी एक फेरी झाली पाहिजे,' असा निर्णय घेतला.

गेल्या वर्षीचा प्रयोगांना परवानगी देण्याचा निर्णय, सरकारी पद्धतीप्रमाणे, पावसाळा सुरू झाल्यानंतर घेण्यात आला. त्या वेळेपर्यंत महाराष्ट्र, गुजराथ राज्यांतील कपाशीची पेरणी होऊन गेली होती. त्यामुळे, प्रयोग फक्त कर्नाटक, आंध्र प्रदेश अशा दक्षिणेतील राज्यांतच घेण्यात आले. निर्णय झाल्यावर शक्य तितक्या तत्परतेने तेथे पेरणी करण्यात आली, पण काहीसा उशीर झालाच.

'सगळ्या राज्यांत प्रयोग झाले नाहीत. जेथे झाले तेथे पेरणी उशिरा झाल्याने किडींचा खरा तडाखा अभ्यासला गेला नाही. तस्मात्, प्रयोगाची आणखी एक फेरी घेण्यात यावी,' असे ठरविण्यात आले. तसेच, या वाणांच्या सरकीचे तेल आणि पेंड माणसे आणि जनावरे यांच्या खाण्यात आली तर काही दुष्परिणाम होतील काय याचाही अभ्यास करण्याची; शिवाय, आसपासच्या वनस्पती आणि बोंडअळीखेरीजच्या किडी यांच्यावर काही परिणाम होतो का याचाही अभ्यास करण्याची शिफारस करण्यात आली आहे. साहजिकच, प्रगुणनाची परवानगी यंदाही मिळणार नाही. म्हणजे भारतात २००३ सालच्या खरिपापर्यंत तंत्रज्ञानाची सारी प्रगती ठप्प राहील. या दोन वर्षांत या क्षेत्रात इतर देश किती आगेकूच करतील आणि आपण किती मागासले जाऊ याची कल्पनादेखील भयकारी आहे.

गेल्या वर्षी पर्यावरण मंत्रालयाने योग्य वेळी निर्णय घेतला असता तर व्यापक प्रदेशात योग्य ते प्रयोग झाले असते. प्रयोगांवर देखरेख ठेवणाऱ्या सरकारी यंत्रणांनी आजपर्यंत काहीही आक्षेप घेतले नव्हते. प्रयोगांच्या विषयांची व्याप्ती गेल्या वर्षीच सुनिश्चित करता आली असती, ती तशी करण्यात आली नाही. या सरकारी गलथानपणाची भयानक किंमत भारतातील शेतकऱ्यांना द्यावी लागणार आहे.

हे गलथानपणाने घडले, की हा नव्या सरकारी आतंकवादाचा भाग आहे हा विषय महत्त्वाचा. सर्व आधार तुटल्यामुळे व्याकूळ झालेल्या पर्यावरणवादी संघटनांचा रेटा एवढेच कारण या घातपातामागे आहे की संबंधितांचे काही हितसंबंध यात गुंतले आहेत हे सांगणे कठीण आहे.

सरकारी घातपाताचे अनेक नमुने पुढे येत आहेत. खेड्यापाड्यात इंटरनेट (Internet) पोहोचावा यासाठी चेन्नई येथील I. I. T. चे प्रा. झुनझुनवाला यांनी एक नवी तंत्रज्ञानप्रणाली विकसित केली आहे. त्या प्रणालीला अमेरिकेत मान्यता मिळाली आहे; इतरही आठ देशांत तिचे चाचणीप्रयोग चालू आहेत. पण, भारतातील संचार मंत्रालयमात्र झुनझुनवाला यांच्या बिनतारी प्रणालीला जागोजाग अडवून धरीत आहे.

अशी उदाहरणे अनेक आहेत. या साऱ्या सरकारी आतंकवादाचे बळी ग्रामीण जनता व शेतकरी समाजच आहे. हा शुद्ध योगायोगच असेल तर तेही अद्भूतच मानावे लागेल!

*दि. २७/६/२००१*

■■

# 'बिनपरती' ते 'परिवर्तनीय'

मी भारतात परतलो ते शेती करण्यासाठी. जगभरच्या देशांत शेती व गावे तेवढी सारी गरीब आणि शहरे मात्र वैभवाने लखलखणारी; असे का याचा शोध घेण्याच्या वेडाने मला पछाडले होते.

शेतकरी व्हायचे म्हटल्याने शेतकरी थोडेच होता येते? शोध घेऊ लागल्यानंतर कळले, की जे जन्माने शेतकरी नाहीत त्यांना शेतकरी बनण्यासाठी, शेतजमीन विकत घेण्यासाठी सरकारची परवानगी लागते!

ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १०,००० (१९७७ सालचे) पेक्षा जास्त आहे त्यांना शेतकरी बनण्याची परवानगी नाही. 'खेड्याकडे चला' असा आदेश गांधीजींनी दिला त्याचा उद्देश सुशिक्षित संपन्न लोकांनीही गावाकडे जावे, शेतीचा विकास करावा, शेतकरी समाजाला वाचा द्यावी असा होता. रु. १०,००० च्या वर उत्पन्न असलेला नागरिक शेतकरी बनला तर शेतकऱ्याचे आणि देशाचे बिघडण्याचे काहीच कारण नव्हते. पण, पुढाऱ्यांना मात्र, कोणी बाहेरून येईल आणि शेतकऱ्यांना शहाणे करेल याची मोठी जबरदस्त धास्ती वाटत असावी.

मी सरकारी नोकरीत असताना रिझर्व्ह बँकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांची ओळख झाली होती. त्यांचे चिरंजीव I.A.S. पास होऊन प्रांत म्हणून काम बघत होते. त्यांच्या मदतीने रु. १०,००० च्या मिळकतीच्या अटीतून सुटण्याचा मार्ग सापडला.

माझ्यासारख्याने जमीन घ्यायची तर ती चांगली भरपूर पाण्याच्या बागायतीची असावी असा सल्ला साऱ्या तज्ज्ञांनी दिला. त्या काळात बागायतदार शेतकरी म्हणजे तर सगळ्यांच्या संतापाचा विषय. कोणा एका साखर कारखानदाराने मुलाच्या लग्नात लक्षभोजन घातले आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत बर्फाच्या लाद्या टाकल्या. एवढ्या कथेच्या आधारावर तद्दन ऊसशेतकरी बदनाम झालेला होता.

गरिबीचे मूळ शोधायचे म्हणजे तर संपत्तीचा महापूर देणाऱ्या बागायती आणि उसाच्या शेतीत जाऊन काय कामाचे? अशा भागात गेलोच तर साखरसम्राट सुखाने जगूतरी देतील की नाही याचीही शाश्वती नाही. ही मंडळी कोणाचाही दिवसाढवळ्या जीव घ्यायलाही कमी करणार नाहीत अशी त्यांची दहशत होती.

मी मिळाली ती कोरडवाहू शेती घेतली आणि गरिबीचे प्रयोग सुरू झाले. त्यातून चाकण – भामनेर रस्ता पक्का करण्यासाठी मोर्चा निघाला, १९७८ ते ८० चे कांदा आंदोलन झाले आणि 'शेतकरी संघटना' उभी राहिली.

कांद्याची खरेदी सरकारने सुरू केली; पण प्रश्न सुटला असे समाधान काही वाटेना. या पुढील कांद्याचे आंदोलन अधिक जबरदस्त व्हावे त्यासाठी पुणे जिल्ह्यातील कांदाउत्पादकांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीही सहभागी व्हावे या हेतूने मी नाशिक जिल्ह्यात गेलो आणि सुरुवातीस ज्यांची सावलीदेखील टाळली त्या ऊसशेतकऱ्यांशी घनिष्ठ संबंध आला. इतका की, माझे नाव ऊसशेतकऱ्यांच्या आंदोलनामुळेच सर्वदूर गाजले. या संपर्कातून, ऊसउत्पादक शेतकऱ्याविरुद्ध किती पद्धतशीर अपप्रचार शहरी पांढरपेशी मंडळी चालवीत आहेत हे लक्षात आले.

बहुश: ऊसशेतकरी बडा शेतकरी नसतो, एकदोनच एकरांचा मालक असतो. त्या काळी उसाला मिळणाऱ्या सव्वाशे-दीडशे रुपये भावात कोणत्याही लक्ष्मीचा महापूर वाहणे अशक्य आहे हे लक्षात आले.

नगर जिल्ह्यात साखर कारखाने सगळ्यात जास्त. तेथे सर्वांत जास्त संपन्नता असायला हवी. त्याऐवजी सर्व महाराष्ट्रात तेथेच कर्जाचा बोजा अधिक याचेही नवल वाटले.

महाराष्ट्राच्या सहकारी साखर चळवळीने अनेक मोठे मोठे नेते पार शिखरापर्यंत पोहोचविले. ही मंडळी चारित्र्याने कशीही असोत; पण ऊस आणि साखर या विषयांत प्रकांड जाणकारी राखणारी असतात असा मोठा बोलबाला होता. ऊसकरी शेतकऱ्यांच्या पोरांनी व्यवस्थापनकौशल्याचे मोठे थक्क करण्यासारखे सामर्थ्य दाखविले असाही मोठा दबदबा होता. महाराष्ट्राची साखरचळवळ साऱ्या देशात अग्रेसर अशी ग्वाही पुढारी मंडळी, एकही संधी न चुकविता, देत असत.

हे सर्व थोतांड आहे हे लक्षात यायला फारसा वेळ लागला नाही.

सहकारी कारखान्यात तयार होणाऱ्या साखरेपैकी साठ टक्के साखर सरकार सक्तीने घेऊन जात असे. आज हे प्रमाण कमी झाले असले तरी त्यासाठी खुल्या बाजाराच्या निम्म्यानेही किंमत सरकार आजही देत नाही; वसूल केलेली साखर

कारखान्यालाच आपल्या खर्चाने साठवून ठेवावी लागते.

देशात वेगवेगळ्या राज्यांत या सक्तीच्या वसुलीच्या साखरेची किंमत वेगवेगळी असते. महाराष्ट्रात ती सर्वांत कमी आहे.

नियम असे की, एखाद्या वर्षी खुल्या बाजारात जास्त भाव मिळाला तर पुढच्या वर्षी लेव्ही साखरेचा भाव आपोआप कमी होणार. सरकारी नियंत्रणांमुळे कारखान्याची मिळकत अपुरी राही; परिणामी, शेतकऱ्यांना ऊस पिकवायला लागणारा खर्चसुद्धा भरून निघण्याइतकी किंमत मिळत नसे. त्यामुळे, वर्षानुवर्षे तो खचत चालला होता.

सहकारी व्यवस्थेत शेतकरी कारखान्याचा भागधारक मालक असतो, तो कारखान्याला ऊस गाळायला देतो, विकीत नाही हे अगदी मूलभूत तत्त्व; तरीही सरकार उसावर १५% खरेदीकर वसूल करे.

ऊसशेतकऱ्याला जी काही अपुरी किंमत मिळायची त्यातूनही कारखानदार मंडळी कुठली शाळा, कुठला प्रकल्प, मुख्यमंत्रीनिधी, साखरसम्राटांचे काही विश्वस्तनिधी याकरिता भरभक्कम कपाती करीत. शेतकऱ्यांच्या हाती जे काही उरे ते पाहता डोळ्यांत टिपे आणण्याखेरीज ऊसशेतकऱ्याला काही गत्यंतर राहत नसे.

या सगळ्या कपातीत एक मोठी अजब क्लृप्ती म्हणजे 'बिनपरतीची ठेव'! कारखान्याला भांडवलपुरवठा व्हावा यासाठी 'बिनपरतीची ठेव' शेतकऱ्यांकडून सक्तीने वसूल केली जात असे. ठेव म्हटली, की ती कधीतरी परत करायला हवी. पण साखर कारखानदारांच्या साम्राज्यातील ही ठेव 'बिन परतीची'! काही वर्षांत शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपये कारखान्यांकडे जमा झाले. कर्जापोटी ज्यांच्या घरांवर बँका जप्ती आणीत त्या शेतकऱ्यांच्या नावे कारखान्यांत जमा असलेली बिन परतीच्या ठेवीची रक्कम वळवून घेणे कायद्यात बसत नसे.

या अजब प्रकाराविषयी कित्येक वर्षे मी बोललो, लिहिले; आंदोलने झाली. स्वत:ला शेतकऱ्यांचे मोठे नेते म्हणवून घेणारे मुख्यमंत्री असतानाही ऊसक्षेत्रातील खरेदीकर आणि बिनपरतीच्या ठेवी ही प्रकरणे चालूच राहिली.

अलीकडे हे प्रकरण पुन्हा एकदा उजेडात येऊ लागले आहे. ग्राहक मंचाच्या एका जिल्हा न्यायालयाने 'साखर कारखान्यांनी या ठेवी व्याजासकट सभासद शेतकऱ्यांना परत दिल्या पाहिजेत' असा निर्णय दिला. त्याच सुमारास आयकर विभागानेही बिन परतीच्या ठेवी वट्ट फायद्यात मोजण्याचे ठरवून कारखान्यांवर आयकरापोटी भरभक्कम रकमांच्या वसुलीच्या कारवाया चालू केल्या. सारे साखरक्षेत्र हडबडून गेले. काही कारखान्यांनी प्रामाणिकपणे शेतकऱ्यांच्या ठेवी परत देण्याची

तयारी सुरू केली. पण ‘अट्टल साखर कारखानदार’ अशाने थोडेच डगमगणार?

सहकारी कारखान्यात सहकार असा काहीच नसतो, सर्वसाधारण सभेतही दंगामस्तीच होते, प्रसंगी पोलिस बोलावून लाठीहल्लाही केला जातो हे सगळ्यांना माहीत आहे. सहकारी संस्थांची खरी सत्ता सहकार क्षेत्रातील रजिस्ट्रार, साखर आयुक्त यांच्या हाती असते. शेतकऱ्यांच्या ठेवींसंबंधी, मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून साखर आयुक्तांनी साऱ्या कारखान्यांना हुकूम सोडले, बिनपरतीच्या ठेवी हा शब्दसुद्धा वापरू नका, त्या ऐवजी त्यांना ‘परिवर्तनीय ठेवी’ म्हणा.''

झाले. सारा शब्दांचा खेळ. कपात करताना जी ठेव ‘बिनपरती’च्या नावाने घेण्यात आली होती ती एका झटक्यात ‘परिवर्तनीय’ झाली. त्यासाठी, प्रत्येक सभासद शेतकऱ्याची वैयक्तिक संमती घेणे कायद्याच्या तत्त्वानुसार आवश्यक आहे; पण साखर साम्राज्यात असल्या गोष्टींना कोण धूप घालतो? कारखान्या-कारखान्यात सर्वसाधारण सभा झाल्या, सभासदांनी निषेध केला, आरडाओरड केली, सभा बंद पाडल्या, मांडव मोडले; तरी, पोलिस दल बोलावून सभा चालविण्यात आल्या आणि दोन मिनिटांत ‘बिनपरती’च्या ठेवी ‘परिवर्तनीय’ ठेवी झाल्या.

‘परिवर्तनीय’ म्हणजे या ठेवी भागभांडवलात रूपांतर करता येतील अशा स्वरूपाच्या झाल्या.

सरकारने पुढला आदेश काढला. भागांची रक्कम ३००० वरून ५००० रुपये करण्यात यावी; त्यासाठी सभासदांच्या वैयक्तिक संमतीची गरज नाही; बिनपरतीच्या ठेवींची रक्कम वळवून घ्यावी आणि भांडवल वाढवावे व रक्कम उरली तर तीही परिवर्तनीय ठेव म्हणून ‘बंदिस्त’च ठेवावी. कोणा सदस्याने ठेवीचे भांडवलात रूपांतर करण्यास नकार दिला तर त्याचे सभासदत्वच रद्द करून टाकावे.

या आदेशाचे बोट धरून एका कारखान्यात लेखणीच्या एका फटकाऱ्याने ७००० सभासदांना कारखान्यातून काढून टाकण्यात आले.

उसाची अपुरी किंमत, त्यातून अनेक कपाती, उरलेल्या रकमेतून ‘बिनपरती’ची ठेव म्हणून जमा केलेली रक्कम सरकारी आदेशाने कारखान्याच्या भांडवलात जमा झाली. सरकारी आयकरही बुडाला, साखर पुढारी मस्तीत फिरताहेत आणि वर्षानुवर्षे धनदांडगा म्हणून बदनाम झालेला, जगणे मुश्कील झालेला ऊसशेतकरी ‘आता कोठे जावे?’ अशा चिंतेने व्याकूळ झाला आहे.

*दि. ५/७/२००१*

■■

# नर्मदा आंदोलनाची जलसमाधी

सामाजिक चळवळींच्या इतिहासातील एक कालखंड ७ जुलै २००१ रोजी आटोपला. नर्मदा नदीवरील धरणामागील सरदार सरोवराच्या पाण्यात बुडणाऱ्या एका गावच्या आदिवासी शेतकऱ्यांनी चौदा वर्षे त्यांच्या मनाची अनभिषिक्त राणी म्हणून गाजलेल्या मेधा पाटकर यांच्या विरुद्धनिदर्शने करून त्यांना आपल्या गावातून काढून लावले.

पत्रकार मंडळी क्वचित्‌च प्रसंगाचे औचित्य समजतात आणि पाळतात. 'काय! अलीकडे तुमची चळवळ थंडावलेली दिसते!', असे, अगदी शिखरावर असलेल्या चळवळींच्या नेत्यांना सोडून, बाकी साऱ्यांना सुनावणारी पत्रकार मंडळी या वेळी मोठ्या औचित्याने वागली. दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर दोनदोन मिनिटांच्या चित्रफिती दाखविल्या गेल्या. चौदा वर्षे, 'सरोवराच्या पाण्यात गाव बुडू लागले तर त्याबरोबर आपणही बुडून जाऊ' अशा निर्धाराच्या घोषणा करणारे शेतकरी नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्यांना काढून लावताहेत आणि 'नर्मदा बांध झालाच पाहिजे' अशा घोषणा देत आहेत असे त्या चित्रफितींत दिसत होते.

हे असे एक दिवस होणार आहे हे माहीत असूनही प्रत्यक्ष ही चित्रे पाहत असताना एक विषण्णता आली. 'नर्मदा बचाओ'चे हे असे झाल्यावर, छापील वृत्तपत्रांत इतके दिवस त्या आंदोलनाचा 'उदे उदे' करणारी आणि त्याच्या प्रकाशझोतात उजळून घेण्यास धडपडणारी मंडळी टोप्या फिरवून आता काय लिहू लागतील याची मोठी चिंता वाटली. प्रत्यक्षात असे काही झाले नाही. आजपर्यंततरी मराठी वर्तमानपत्रांत या नव्या कलाटणीसंबंधी कोठे छोटीशी बातमीही छापून आलेली दिसली नाही. संपादकीयाच्या बाजूचे सारे पान ऐसपैस लेखांनी भरून टाकणारी 'झोलाधारी' मंडळी सध्यातरी निपचित पडून असावीत.

'हे सारे अकस्मात झाले कसे?' या धक्क्यातून ही 'भगत' मंडळी अजून सावरली नसावी, त्यामुळे सध्यातरी मौन साधून असावी. थोड्या दिवसांनी मौन संपेल, लेखण्या चालू लागतील तेव्हा ही 'भगत मंडळी' निम्म्या संख्येने, "आंदोलन संपलेले नाही, ते शेवटपर्यंत चालणारच आहे" अशा आरोळ्या ठोकतील. उरलेली निम्मी मंडळी, "हे असे होणारच आहे हे आपण फार दिवस सांगतच होतो; खुद्द मेधाताईंनाही आपण हे 'स्पष्ट' सांगितले होते" अशी बतावणी करू लागतील.

कदाचित्, अजूनही एखाद्या गावातील मंडळी पुन्हा एकदा निर्धाराने लढा देण्याची घोषणा करतीलही; पण मेधा पाटकरांचे आंदोलन संपले आहे हे नाकारण्यात काही अर्थ उरला नाही.

डांग जिल्ह्यात गोदाताई परुळेकर आणि शामराव यांनी पन्नास वर्षांपूर्वी, जंगलतोड कंत्राटदार आदिवासी शेतकऱ्यांवर भयानक अन्याय-अत्याचार करीत त्याविरुद्ध आंदोलन उभे केले होते. सारे आदिवासी गोदाताईंना 'गोदाराणी'च म्हणत. त्यांचा शब्द साऱ्या गावांत प्रमाण होता. गोदाताईंनंतर एवढी प्रचंड लोकप्रियता 'नर्मदा बचाव' कार्यकर्त्यांनाच मिळाली.

गोदाताईंचे आंदोलन डांग जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिले. महाराष्ट्रात गोदाताईंची वाहवा झाली; गुजराथमध्ये त्यांच्याविषयी फारसे कोणी चांगले बोलत नव्हते.

सरदार सरोवराच्या पाण्यात बुडणाऱ्या, देशोधडी लागण्याच्या संकटात आलेल्या लोकांच्या मदतीला जाण्याच्या माणुसकीच्या गहिवरातून 'नर्मदा बचाव आंदोलना'चा उगम झाला. पुनर्वसनाचा हेतू दोनतीन वर्षांतच सिद्ध झाला; पण पुढारीपण चालू ठेवण्याकरिता साऱ्या मोठ्या धरणांना विरोध करण्याची पर्यावरणवादी भूमिका नेत्यांनी घेतली आणि ते जाळ्यात अडकले. बांधाला विरोध करण्यासाठी मग साध्यसाधनाचा काहीही विवेक न ठेवता सुखाने पुनर्वसन झालेल्या लोकांनाही उचकणे, प्रसंगी अधिकाऱ्यांना मारहाण करणे, जंगलतोड करणे असे कार्यक्रम राबवीत आंदोलन वाढले. पाटकरांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीमुळे सरकारही आंदोलकांना सांभाळून सांभाळूनच घेत होते, त्यामुळे कार्यकर्ते अधिकच वाहवले.

'नर्मदा बचाव आंदोलन' महाराष्ट्रात खूप गाजले. नर्मदा नदीला जीवनरेखा मानणाऱ्या गुजराथमध्येही जागोजागी या आंदोलनाचे चाहते पसरले होते. धरण बांधावे, साठलेले पाणी लोकांपर्यंत न्यावे, त्यातून शेती पिकवावी या साऱ्या भांडवलदारी कल्पना आहेत; त्यापेक्षा, जागोजाग 'पाणी अडवा, पाणी जिरवा'

योजना राबवून पाण्याची गरज भागविता येईल असे आग्रहाने मांडणारी मंडळी सर्वत्र आढळत; मेधा पाटकर महात्मा गांधींनंतर गांधींचा विचार आणि भाषा चालवीत आहेत असे ठाम विश्वासाने ते सांगत असत. गांधीपरंपरेतील सारे आश्रम नर्मदा घाटी जळत असल्याची गाणी प्रार्थनेबरोबर नित्यनेमाने गात होते.

विचार गांधींचा; विचार मांडणाऱ्या कार्यकर्त्यांची राहणी बिनभपक्याची; पण आंदोलनाने तंत्रज्ञानाचा विरोध करीत करीत आधुनिक व्यवस्थापानशास्त्रातील सर्व तंत्रे आणि साधने प्रभावीपणे वापरली. इंटरनेटवर या मंडळींचे मोठे प्रभुत्व होते. अलीकडच्या काळात सभासंमेलने घेणे जवळजवळ अशक्य झाल्यानंतर यांची सारी धावपळ इंटरनेटवरच चालत होती.

'या आंदोलनाने राष्ट्रांच्या विकासासंबंधी एक नवा निकष दिला आहे आणि विकासाचे एक नवे तत्त्वज्ञान व कार्यक्रम दिला आहे,' असा पर्यावरणवादी समाजवादाचा उद्घोष इंटरनेटवर चालला होता.

आता हे सारे संपले; सर्वोच्च न्यायालयाने धरणाची उंची वाढविण्याची परवानगी दिली, त्याच दिवशी खरेतर ते संपले होते, घरघर फक्त चालू राहिली होती, तीही आता संपली.

सहसा कोणतीही व्यवस्था इतकी भुईसपाट होत नाही. मोठमोठी साम्राज्ये कोसळतात; पण कोसळण्यापूर्वी काही क्षणिक कारणे घडतात. रोमवर ते कोसळण्याआधी रानवट टोळ्यांनी हल्ले केले. काही साम्राज्ये नैसर्गिक उत्पातात संपतात. मात्र, रशियाचे समाजवादी साम्राज्य जसे काहीही निमित्त न घडता कोसळले तसेच नर्मदा बचाव आंदोलनाचे झाले. ज्यांच्या नावाने सारे आंदोलन चालले त्यांनीच आंदोलनाच्या पायाखालची फळी काढून घेतली.

इंटरनेटसारख्या आधुनिक साधनांचा वापर याखेरीज या आंदोलनाने अनेक नवीन गोष्टी करून दाखविल्या.

धरण, त्याचे फायदे, त्याचे तोटे हा विषय अभियांत्रिकीचा, तसा किचकट. पण, आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी गुजराथ सरकार, केंद्र शासन यांच्याकडील सारे अहवाल, कागदपत्रे मिळवली, वाचून काढली आणि ते गावोगावी 'माधवराव चितळ्यांना धरणाच्या कामात काय कळते?' असे वादंग घालीत फिरू लागले. धरणाला विरोधाची भूमिका वादग्रस्त, पण विरोधाची भूमिका मांडणाऱ्या वकिलांनी सारी कागदपत्रे जोखण्यात काही कसूर सोडली नाही.

आजपर्यंत भारतातील कोणतीही चळवळ 'जागतिक बँक', 'आंतरराष्ट्रीय जल आयोग' यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांपर्यंत पोहोचून त्यांचे दरवाजे

ठोठावायला गेली नव्हती. नर्मदा बचाव आंदोलनाने ते करून दाखविले आणि जागतिक बँकेतीलच काही तज्ज्ञांचा पाठिंबा मिळवून धरणाचे सारे काम थांबवून ठेवले. सारे आंदोलन सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या आधाराने चालले होते. कार्यकर्त्यांच्या मनात न्यायालय आपल्याविरुद्ध जाणार नाही याची पक्की खात्री होती. न्यायालयासमोर त्यांनी केलेली मांडणी असा विश्वास बाळगण्याइतकी मजबूत होती हेही खरे.

आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य. अनेक भल्याभल्यांनी आंदोलनाच्या वाहत्या नर्मदेत हात धुऊन घेण्याचे प्रयत्न केले. 'लोकआंदोलन तयार आहे, आपण तेथे गेलो म्हणजे ताईंना कोण विचारतो? लोक आपल्यालाच नेता मानतील.' अशा थाटात तेथे अनेक गेले. स्वामी अग्निवेश, मनेका गांधी, बाबा आमटे – साऱ्यासाऱ्यांनी प्रयत्न केले. डाळ कोणाचीच शिजली नाही; आंदोलनाचे नेतृत्व मेधा पाटकरांकडेच राहिले.

याचा एक परिणाम असा झाला, की दुसऱ्या आंदोलनांच्या सेनापतींच्या फौजा नर्मदा बचाव आंदोलनात सामील झाल्या नाहीत; फक्त पुढारी मंडळी आली आणि संपली. नर्मदा बचाव आंदोलनाचे नेतृत्व मिळण्याऐवजी हातातले आंदोलनही गेले अशी त्यांची स्थिती झाली. याला अपवाद फक्त बुकर पारितोषकविजेत्या अरुंधती रॉय यांचा. कादंबरीकारबाई आंदोलनात कशा आणि का घुसल्या, कोणालाच समजले नाही; पण थोड्याच दिवसांत जगभरच्या सुशिक्षित चाहत्यांच्या तोंडी लेखिकाबाईंची वाक्ये ऐकू येऊ लागली. एक महत्त्वाचा खांब ढासळला.

आपल्या वाटेवर येणाऱ्या एकट्यादुकट्या आंदोलक नेत्याला गाठून संपविण्याच्या प्रकारापलीकडे जाऊन पाटकरांनी हिंदुस्थानभरच्या स्वयंसेवी संघटनांची आघाडी बांधण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने, फक्त हौशे, नवशे, गवशेच गेले; राष्ट्रीय आघाडीची कल्पना बरगळली, राजकीय पक्ष तयार करण्याच्या कल्पना विरून गेल्या, निवडणूक जिंकण्याची बात तर दूरच राहिली.

आंदोलकांची कैफियत सर्वोच्च न्यायालयापुढे रेंगाळत राहिली, वर्षानुवर्षे चालू राहिली. काम थांबल्याच्या प्रत्येक दिवशी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत होते तरी सर्वोच्च न्यायालय काही हालताना दिसेना. न्यायालयातील दिरंगाईने आंदोलकांचा सारा डोलारा खिळखिळा करून टाकला. शेवटच्या कालखंडाला सुरुवात झाली ती उत्तर गुजराथ आणि सौराष्ट्र या प्रदेशांत दोनतीन वर्षे सतत पडलेल्या दुष्काळामुळे आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे.

अपुऱ्या उंचीच्या बांधामुळे सरदार सरोवर तुडुंब भरून बांधावरून पाण्याचे लोटच्या लोट ओसंडून वाहून जात आहेत आणि समुद्रात जाऊन पडत आहेत; त्याच राज्यात जनावरे आणि माणसे पाण्यासाठी तडफडत आहेत आणि पाण्याविना प्राण सोडत आहेत असे मोठे विचित्र चित्र उभे राहिले. गुजराथेत सरदार पटेलांपासूनची परंपरा असलेल्या 'खेडूत समाजा'ने सरोवराचे पाणी समुद्रात वाहू देण्यापेक्षा प्रकल्पाच्या तयार कालव्यात सोडावे आणि सौराष्ट्राची तहान भागवावी असे 'कारसेवा' आंदोलन केले.

गुजराथ सरकारने प्रचंड पोलिसबळ वापरून 'खेडूत समाजा'ची कारसेवा मोडून टाकण्याचा चंग बांधला. दहावीस खेडूत नेते धरणापर्यंत कसेबसे पोहोचले, बाकी साऱ्यांना पोलिसांनी जागोजाग तटवले. गुजराथचे मुख्यमंत्री केशुभाई पटेल आपल्या बाजूला आले यात आपली काहीतरी चूक आहे हे नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्यांना उमगले नाही. 'खेडूत समाजा'ने पाटकरांना सुवर्णसंधी मिळवून दिली होती. नर्मदा धरणविरोधी आंदोलनाला थोडी सुटी देऊन पाटकरांनी तहानेलेल्यांना पाणी देण्याच्या कार्यक्रमात हातभार लावला असता तर साऱ्या गुजराथमध्ये 'मेधायुग' सुरू झाले असते. हातची संधी गेली आणि सर्वोच्च न्यायालयाखेरीज आंदोलनाला काही आधारच राहिला नाही.

साऱ्या दुष्ट व्यवस्थेत एक न्यायसंस्थाच काय ती उज्ज्वल राहील ही कल्पना भाबडी आहे; पण न्यायालयात लागोपाठ, जुजबी का होईना, विजय मिळत गेल्याने नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्यांनी न्यायव्यवस्थेची भलावणी मोठी उच्चरवाने केली, तेथेच त्यांचा घात झाला. जनआंदोलनाचे सारे भवितव्य निवडणुका किंवा न्यायालय यांच्या मर्जीवर सोपविणे घातक असते. निकाल बाजूने लागला तर आंदोलन जिंकले, नाही तर साफ झाले अशा खिंडीत चतुर नेत्यांनी आंदोलनास कधी नेऊ नये. कधी न्यावे लागलेच तर खिंडीतून आपली फौज लवकरात लवकर काढून घ्यावी. याला मोठी कुशलता लागते.

जास्तीत जास्त हजार दोन हजार विस्थापित शेतकऱ्यांच्या पाठिंब्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत स्वयंसेवी संघटनांच्या आंतरराष्ट्रीय यंत्रणेचा उपयोग करून आणि स्वदेशी आंदोलनांना गिळत गिळत पाटकर मोठ्या झाल्या. आंदोलन हरले; पण मोठे जबरदस्त झाले. कोणाही अलबत्यागलबत्याने त्याविषयी अनुदार उद्‌गार काढावे यात काही अर्थ नाही.

त्यापेक्षा, पत्रकारांनी कळत न कळत साधलेली चुप्पी अधिक औचित्यपूर्ण आहे.

कविवर्य तांब्यांच्या शब्दांत (थोडा बदल करून), नर्मदा बचाव आंदोलन कोसळल्यानंतर एवढेच म्हणता येईल :

रे हिंदबांधवा,
थांब या स्थळी
अश्रु दोन ढाळी
ही पराक्रमाची ज्योत मालवे
इथे डोमखेडी.

*दि. ११/७/२००१*

■■

# केल्याने होत आहे रे

१९८० मध्ये शेतीच्या प्रश्नाच्या अभ्यासाची माझी तपस्या सुरू झाली. ज्या प्रश्नाला अगदी सुरुवातीला हात लावला त्याला या महिन्यात अनपेक्षित यश मिळाले त्या आनंदात मी हे लिहीत आहे.

गुजराथमधील भुज जिल्ह्यात नखत्राना तालुक्यात शेतकऱ्यांनी खवटपणाचा अंशही नसलेले  भुईमुगाचे बियाणे तयार केले. त्याच्या गुणवत्तेबद्दल सर्वोत्तम प्रयोगशाळांनीही प्रमाणपत्रे दिली आहेत. या प्रयोगाच्या काळातच प्रचंड भूकंप झाला. पण, शेतकऱ्यांनी मोठ्या हिमतीने आणि चिकाटीने काम चालू ठेवले, त्याला डॉ. बसू यांचे मार्गदर्शन लाभले आणि तयार झालेल्या भुईमुगात आंतरराष्ट्रीय मानकापेक्षा ९० टक्के कमी खवटपणा आढळला.

आपण ज्याला खवट दाणा म्हणतो त्यात अफ्लाटॉक्सिन् नावाचे विष असते. शंकर हलाहल प्याला तसे भारतीय हे विष पिढ्यान्‌पिढ्या पचवून बसले आहेत. पण, इतर देशांत या खवटपणाने पोटाचे, यकृताचे कॅन्सर होतात असे निःसंशय निदान झाले आहे. भुईमुगाच्या उन्हाळा पिकात या विषाचा फारसा प्रादुर्भाव होत नाही. खरीप आणि रब्बी हंगामांतमात्र भारतीय भुईमुगात हे विष आंतरराष्ट्रीय मानकापेक्षा ५ ते १० पट जास्त असते. त्यामुळे, त्या भुईमुगाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे दुरापास्त झाले आहे.

मी जेथे शेती सुरू केली त्या आंबेठाण गावाच्या परिसरात भुईमूग हे एक प्रमुख पीक आहे; कांदा हे दुसरे. त्यामुळे, चाकणच्या आसपास तेलाच्या गिरण्या अनेक वर्षांपासून उभ्या आहेत. भुईमुगाला भाव नाही हा प्रश्न तेथील शेतकऱ्यांना मोठा भेडसावीत होता. किर्लोस्कर ट्रॅक्टरच्या कामाच्या संबंधाने मी अल्जेरियात गेलो होतो. तेथून परतताना जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी स्वित्झर्लंडमध्ये गेलो. त्या देशात ग्राहक भांडारांची अनेक जाळी आहेत. त्यांपैकी

एकदोघांना जाऊन भेटलो. जुन्या स्वित्झर्लंडच्या वासामुळे थोडी सलगी जमली. मी भारतात जाऊन काय खटाटोप करतोय याचे त्यांना कौतुक वाटले. मी मदतीसाठी हात फैलावत नाही तर, निवडक (Hand-picked) भुईमुगाला बाजारपेठ शोधत आहे हे समजल्यावर स्वीस माणसे अधिक आस्थेने व आदराने बोलली.

मी चौकशी सुरू केलेली पहिलीच बाजारपेठ दरवर्षी ३०० कोटी रुपयांची निवडक शेंगदाण्याची आयात करते. टेलिव्हिजनसमोर बसल्या बसल्या तोंडात टाकण्याचे अनेक पदार्थ पाश्चिमात्य देशांत मोठे लोकप्रिय आहेत. त्यामुळे, शेंगदाणा, मका आणि बटाटे यंचा खप भरपूर आहे. त्या वेळी त्यांची खरेदी प्रामुख्याने इस्रायल आणि दक्षिण आफ्रिका या देशांतून होत असे.

मोठ्या उदारतेने सारी मागणी हिंदुस्थानकडे वळविण्याचे त्यांनी कबूल केले; पण लगेच नाही. या बाजारपेठेचे तीन वर्षांचे आगाऊ करार झालेले होते. १९८२ सालापासून हिंदुस्थानकडून खरेदी करण्याचे त्यांनी मान्य केले. कागदपत्र तयार करण्यासाठी एक अधिकारी समोर आला. त्याने सहज प्रश्न विचारला, ‘‘ज्या भागात तुम्ही काम करता आहात तो हिंदुस्थानात नेमका कोठे आहे?''

त्याला हिंदुस्थानच्या भूगोलाची कितपत माहिती असणार म्हणून मी म्हटले, "मुंबईच्या जवळ."

"म्हणजे नेमके कोठे?"

"पुण्याजवळ."

"पुण्याच्या कोणत्या बाजूला?"

आता मी जरा सावध झालो. याला महाराष्ट्राची काहीशी माहिती दिसते.

"पुणे–नाशिक रस्त्यावर."

"म्हणजे खेड – मंचरच्या बाजूला?"

आता मला धक्का बसला. आंबेठाण–चाकण येथे आपण जाऊन राहिलो म्हणजे भारतातील कोण्या दुर्गम खेड्यात जाऊन राहिलो हा दंभ गळून पडला. पण, आपला भाग या गोऱ्याला माहीत आहे म्हटल्यावर आनंदही वाटला आणि मी "हो", म्हटले. त्यावर त्याचा आणखी एक धक्का; ‘‘मग तुम्हाला अफ्लाटॉक्सिन् काढणे शक्य होणार नाही,'' त्याने आत्मविश्वासपूर्वक निर्वाळा दिला.

मीही आव्हान स्वीकारले आणि अफ्लाटॉक्सिन्विरहित व खवटपणाचा अंशही नसलेले भुईमुगाचे नमुने दोन वर्षांत मी पाठवावेत आणि त्यानंतर दोन वर्षांनी खरेदीचा करार सुरू व्हावा असे ठरले.

हिंदुस्थानात परतल्यावर मी चंग बांधून कामाला लागलो. त्या क्षेत्रातील

तज्ज्ञांचा सल्ला घेतला. मुबईच्या भाभा अणुऊर्जा संशोधन केंद्राने तयार केलेले उत्सर्जनप्रक्रियेचे बियाणे मिळवले. मोठे छान पीक आले. पण, खवटपणा काही कमी करता आला नव्हता. शेंगेतील आर्द्रता झपाट्याने कमी करायला हवी यासाठी अनेक प्रयोग करून पाहिले. शेंगेतील आर्द्रता कमी होईना तेव्हा फोलकट काढून दाण्यातील आर्द्रता कमी करून ठेवली. प्रत्येक दाणा एका बदामाच्या वजनाचा, चांगला कुरकुरीत झालेला. माझ्या घरी येणारे पाहुणे बरेच महिने त्याची प्रशंसा करीत त्याचा आस्वाद घेत होते.

तेवढ्यात, चाकणचे कांदा आंदोलन सुरू झाले. उपवास, तुरुंगवास यांत हे सगळे प्रकरण मगे पडून गेले. चटकमटक खाद्य म्हणून दाणे उत्तम, पण आठदहा पोती दाणे घरी थोडेच संपणार? चाकणच्या बाजारात त्याला गिऱ्हाईक भेटेना. तेथील सारे खरीददार तेल गाळण्याकरीता मिळेल तसला भुईमूग खरेदी करणारे; त्यांना असल्या मालाची काय कदर? शेवटी साध्या खवट भुईमुगापेक्षाही कमी किमतीने ती पोती विकून मोकळे व्हावे लागले!

शेतीमालाच्या भावाच्या आंदोलनाआधी, शेतीमालाच्या संबंधी सरकारच्या कूटनीतीचे पूर्ण आकलन होण्याआधी तथाकथित विधायक मार्गाचे मी जे प्रयोग केले, त्यांतील हा पहिला. त्यानंतर बटाटा, कांदा यांच्या प्रक्रियेचे प्रयोग झाले. बरीच रक्कम आणि कष्ट अक्कलखाती जमा झाले.

वीस वर्षांहून अधिक काळ मधे गेला; पण, शुद्ध दाणा आपल्याला करता आला नाही याची बोच राहिली होती. जागतिक व्यापार संस्थेसंबंधीच्या टास्क फोर्सचे अध्यक्षपद घेतल्यानंतर पहिला प्रश्न उभा राहिला तो खाद्यतेलासंबंधी. हिंदुस्थानातील खाद्यतेलाचे संकट पेट्रोलियमच्या दुर्भिक्ष्यापेक्षाही अधिक कठीण. तेलबिया आणि खाद्यतेल यांचे देशातील उत्पादन वाढविण्याकरिता विचार सुरू झाला. मी काही सरकारात नाही, एका विषयापुरता सल्लागार आहे; तरीही हाती असलेल्या पदाचा वापर करून सौराष्ट्र, आंध्र प्रदेश, ओरिसा आणि महाराष्ट्र या राज्यांत भुईमुगाचे उत्तम बियाणे तयार करण्याचे प्रकल्प सुरू केले; त्याचे मुख्य श्रेय डॉ. बसू यांना आहे. डॉ. मुक्तिसाधन बसू हे त्यांचे नाव. भुईमुगाच्या शेतकऱ्यांच्या मुक्तीचे ते खरोखरच साधन बनले आहेत.

या प्रयोगातील यशामुळे मनातील एक जुनी रुखरुख गेली आणि बाजारपेठेची मोकळीक मिळाल्यास भारतीय शेती जागतिक दर्जाची होऊ शकते याबद्दलचा आत्मविश्वास दृढ झाला.

*दि. १८/७/२००१*

■■

# ‘काळया आई’ला ‘सोनेरी प्रणाम’

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश श्री. चंद्रचूड आमच्या खेड तालुक्यातील कन्हेरसर गावचे. गाव केवळ इतिहासप्रसिद्धच नव्हे तर, पुराणप्रसिद्ध आणि रामायणप्रसिद्धही. दशरथाच्या रथाच्या चाकाचा कणा मोडला आणि कैकेयीने आपल्या हाताच्या कोपऱ्याने रथ सावरला ते स्थान हे; म्हणून नाव कन्हेरसर अशी लोकआख्यायिका आहे.

निवृत्त होण्याआधी चंद्रचूडसाहेब गावाला भेट देण्याकरिता आले; निवृत्तीनंतर मूळ गावच्या आसपास राहावे किंवा त्या प्रदेशात काही लोकोपयोगी काम करावे अशा बुद्धीने नजर टाकण्यासाठी ते आले असावेत. सुदैवाने त्यांच्याबरोबर गाडीत दोनतीन तास प्रवास करण्याचा योग आला. गप्पांमधे दोन आख्यायिकाही समजल्या.

मावळ भागात वतनदार देशमुख रामोशी व इतर आदिवासी आणि दारोडेखोरांच्या टोळ्या सांभाळून असत. दरोडेखोर दरोडे घालत आणि लुटलेली चीजवस्तू वतनदाराच्या वाड्याच्या जवळ पुरलेल्या रांजणात आणून टाकत. कधीकाळी ते पकडले गेले, फाशी गेले तरी त्यांच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविण्याची जवाबदारी ही वतनदार कुटुंबे सांभाळत असत.

एकदा एका शेतकऱ्याच्या घरी दरोडा पडला. शेतकरीण बाई आकांत करीत चंद्रचूडसाहेबांच्या आजोबा-पणजोबंकडे धाय मोकलीत आली. ‘सगळे दागिने नेले ते नेऊ द्यात, माझे सौभाग्याचे लेणे, नथतरी मला परत मिळाली पाहिजे.’ बाईंनी फारच आकांत केला, तो वतनदारांच्या कानी गेला. त्यांनी बाईंना बोलावले; रांजणात चारसहा नथी पडल्या होत्या त्या तिच्या समोर ठेवल्या. ‘यातली तुझी कोणती ते ओळखून घे,’ म्हणाले.

आमच्या भागात सर्वच महत्त्वाच्या गावांत प्रमुख पाटलांच्याकडे अशीच

व्यवस्था असे. इंग्रजी राज्य आले, न्यायव्यवस्था आली, ठगीचा बंदोबस्त झाला, दरोडेखोरी संपली आणि सगळे जमीनदार वतनदार अधोगतीला लागले. खानदानी जमीन मोठ्या आकाराची; पण गुजराण आणि मिजास; शानशौक चालत ते त्या वरच्या कमाईवर.

पुढे स्वातंत्र्य आले, कूळ कायदा आला, कुळांना किरकोळ मोबदल्यात जमिनी मिळाल्या. काही कुळांना तेवढी रक्कम भरणेही शक्य झाले नाही. "आमच्या वडिलांनी पाच हजारांवर एकर जमिनींचा मोबदला कुळांना माफ करून टाकला त्या या साऱ्या जमिनी", साहेबांनी सभोवतालच्या प्रदेशाकडे हात करून सांगितले. पूर्वजांच्या औदार्याचा काहीसा अभिमान त्यांच्या शब्दांत असणे साहजिकच होते.

माझ्याच्याने कुठले राहवते? मी म्हटले, "साहेब, तुम्ही नशीबवान. जमिनी कुळांना देऊन टाकून मोकळे झालात, शहरात गेलात, तुमची भरभराट झाली. तुमच्या जमिनीचे दान मिळालेली ही 'भाग्यवान' कुळे कर्जात आकंठ बुडून गेली आहेत."

माझ्या वाक्यातील वक्रोक्ती नीट लपली नसावी. चंद्रचूडसाहेबांनी पटकन उत्तर दिले, "शहरात गेलेले सारेच काही देशाचे मुख्य न्यायाधीश बनत नाहीत."

मी शांतपणे उत्तर दिले, "शेतावरून शहरात जाऊन पानाची गादी चालविलेल्यांचीसुद्धा परिस्थिती जमीनमालकापेक्षा कितीतरी पट चांगली राहते."

दुसरा काही विषय निघाला आणि चर्चा तेथेच थांबली.

शेतावर दिवसरात्र उन्हापावसात अपार मेहनत करणारे सारे कुटुंबच्या कुटुंब गरिबी आणि कर्जाच्या खाईत रुतत जाते. याउलट, साऱ्या कुटुंबामध्ये एकटा एक नोकरमान्या असला तरी सारेजण, टाकटुकीने का होईना, व्यवस्थित जगतात याची उदाहरणे अनेक आहेत.

घरची जमीन तीसचाळीस एकरांची, सारी पोरे शेतावर राबतात; पण घर चालते ते त्यातील एखाद्या शिक्षकाच्या पगारावर हा अनुभव हरघडी हरजागी येतो.

मराठी ग्रामीण साहित्यातील नायकांनी " 'काळ्या आई'ला अंतर कसे देऊ?" अशी मोठी आर्त किंकाळी मारली तरी त्यात साहित्यिकाचे ग्रामीण अर्थकारणाचे अज्ञानच दिसून येते. ज्या ज्या तरुणांना शहरात निसटून जाण्याची संधी मिळते ते ते, क्षणमात्र विचार न करता, 'काळ्या आई'चे प्रेम वगैरे सारे बाजूला ठेवून शहरात निघून जातात.

सेनापती बापटांनी मुळशीच्या धरणाला विरोध केला, जमिनी पाण्यात बुडून

शेतकरी निर्वासित होऊ नये या हेतूने. बहुतेकांनी, जी काही थातुरमातुर नुकसानभरपाई मिळाली ती घेऊन मुंबईकडे कूच केले. "धरणाच्या पाण्याने आता बागायती फुलेल, लक्ष्मी सोन्याच्या पावलांनी घरी येईल" अशा आशेने जे शेतीला चिकटून राहिले ते बर्बाद झाले. धरणग्रस्त निर्वासितांची कुटुंबे मुंबईत सांताक्रूझ-विलेपार्लेच्या आसपास सुखाने नांदताना आढळतात. मुळशी तालुक्यातील गावांची नावे '...कर' प्रत्ययासकट तेथे मोठ्या संख्येने सापडतात.

'शेतजमीन हे वरदान नाही, तो भयानक शाप आहे' हे जमीनसुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या 'कॉम्रेड' अर्थशास्त्रज्ञांनाच काय ते उमगले नाही!

'जमिनीचा शाप' ही कल्पना आता मोठ्यामोठ्या श्रीमंत देशांतही मानली जाऊ लागली आहे. कारखानदारीने श्रीमंत झालेल्या या राष्ट्रांत शेती सोडून लोक इतर व्यवसायांकडे वळतात. शेतीचा पसारा हजारो एकरांचा, यंत्रसामग्री भरपूर. ही शेती मोठी प्रक्रियाकारखानदारी जोपासून समृद्ध झालेली... आणि तरीही, शेतकऱ्याचे राहणीमान इतरांच्या तुलनेने फारच कनिष्ठ राहते. शहरातील मुली शेतकऱ्यांच्या मुलांबरोबर 'डेटिंग' म्हणून एक संध्याकाळ घालवायलासुद्धा राजी होत नाहीत.

हिंदुस्थानात असे कित्येक वर्षे चालले आहे. त्याची ना कुणाला खंत, ना कुणाला खेद! पण, या श्रीमंत देशांत अशी परिस्थिती नाही. समाजात भेदभाव राहू नये आणि केवळ अन्नधान्याकरिता नव्हे, पर्यावरणासाठीही शेती अबाधित चालू राहावी याकरिता अमेरिका, युरोप, जपान यांसारखे देश शेतकऱ्यांना महाप्रचंड प्रमाणांवर अनुदाने देत असतात. पीक काढले तर त्याला भरघोस किंमत मिळेल, नको असलेले पीक घेतले नाही तर ते न घेण्याबद्दल भरपाई मिळेल, मिळकतीची हमी मिळेल व अनेक सेवा उपलब्ध होतील असा अनुदानांचा वर्षाव तेथे केला जातो.

ओईसीडी (Organisation for Economic Cooperation and Development) मधील देशांतील शेतकऱ्यांना, अलीकडच्या आकड्यांप्रमाणे, २८३ अब्ज डॉलर एका वर्षी पोहोचवले जातात. एकट्या अमरिकेतील अशा अनुदानांची रक्कम वर्षाला ३०० अब्ज डॉलर इतकी होते. म्हणजे या दोन गटांतच प्रत्येकी चौदा ते पंधरा लाख हजार कोटी रुपये अनुदान शेतकऱ्यांना दिले जाते.

हिंदुस्थानातील शेतीची परिस्थिती तुलनेने कितीतरी अधिक भयानक. आमच्याकडे एका वर्षात एक लाख तेरा हजार कोटी रुपायांची 'उलटी पट्टी'

शेतकऱ्यांवर पडते.

जागतिक व्यापार संस्था, अशा दोन ध्रुवांवरच्या देशांना एकत्र आणून त्यांच्या मध्ये सूत्रबद्ध व्यापार व्हावा यासाठी प्रयत्न करते. श्रीमंत देशांनी त्यांच्याकडील शेतीची अनुदाने कमी करावीत असा जागतिक व्यापार संस्थेचा आग्रह आहे. तसे झाले तर जागतिक व्यापारात आपल्यालाही स्थान मिळेल अशा आशेने गरीब राष्ट्रेही त्यात भाग घेऊ इच्छितात.

जागतिक व्यापार संस्थेतील पहिले करार १९९५ मध्ये झाले. पाच वर्षांचा इतिहास पाहता श्रीमंत राष्ट्रांनी अनुदाने कमी केल्याचे काही फारसे लक्षण दिसत नाही. मग, हा तिढा सुटणार कसा? का जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटीच कोसळून पडणार?

या तिढ्यातून सुटण्याकरिता आता श्रीमंत देशांत एक नवीन कल्पना पुढे मांडण्यात येत आहे. शहरातील कारखान्यांतील नोकरवर्ग किंवा सरकारी नोकरदार यांना आपखुशीने आकर्षक सेवानिवृत्तीच्या शक्यता देण्यात येतात. अशा योजनांना 'सोनेरी हस्तांदोलन (Golden Shake-hand)' असा शब्द आहे.

'अधिक अनुदाने म्हणजे अधिक उत्पादन, म्हणजे कमी किमती, म्हणजे आणखी वरचढ अनुदाने' अशा दुष्टचक्रात सापडलेले कॅनडासारखे देश शेतकऱ्यांनादेखील शेतीच्या विळख्यातून सुटता यावे यासाठी 'सोनेरी हस्तांदोलना'च्या योजना मांडत आहेत. एकरकमी किंमत देऊन शेतकऱ्यांना शेतीतून सोडवले तर शेतकऱ्यांची भरभराट तर होतेच; पण, त्याशिवाय, सरकारी तिजोरीवरील आणि सर्वसाधारण करदात्यावरील, शेतीला दिल्या जाणाऱ्या अनुदानापोटी येणारा बोजाही दिवसेंदिवस अधिकाधिक हलका होत जातो. मिळालेले पैसे शेतकऱ्यांनी सुरक्षित ठेवीच्या योजनांत जमा केले तरी त्यांची भरभराट होते; अधिक चांगल्या मार्गाने गुंतवणूक केली तर मग विचारायलाच नको.

एवढी कडेलोटाची परिस्थिती आल्यानंतर तरी शेतीच्या तुरुंगातून सुटण्याची आणि श्वास मोकळे करण्याची संधी तेथील शेतकऱ्यांपुढे येत आहे. जागतिकीकरणाचे नवे पर्व चालू होताना भारतातील शेतकऱ्यांनाही 'काळ्या आई'चा 'सोनेरी प्रणामा'ने निरोप घेता येईल हे आज स्वप्न वाटते; पण ते अपेक्षेपेक्षा लवकर अवतरणार आहे.

*दि. ११/८/२००१*

■■

# थिस् हॅपन्स् ओन्ली इन इंडिया!

मनेका गांधी कोणत्या ना कोणत्या विचाराने भारून गेलेल्या असतात. पर्यावरण खात्याच्या मंत्री झाल्यानंतर त्यांनी स्वत:ची अशी एक प्रतिमा बनवली. प्रदूषण कमी व्हावे या दृष्टीने अनेक कारखान्यांवर टाच आणली. एखाददुसरा कारखाना प्रदूषण नियमांचा भंग केल्याबद्दल बंदही करावा लागला असेल. पण, बहुतेक प्रकरणे सामोपचाराने मिटलेली दिसतात.

प्राणिदया हा, सध्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण खात्याच्या केंद्रीय मंत्रिपदावर असलेल्या मनेका गांधींचा विशेष आवडीचा विषय. प्राणिजीवनावर त्यांनी अभ्यासपूर्वक बरीच पुस्तके लिहिली आहेत. शाकाहाराचा त्या आग्रह धरू लागल्या आहेत. मध्यंतरी, 'दूध हे रक्तच असते' असे म्हणून त्यांनी दूध पिण्यावर आक्षेप घेतला होता.

शेतकरी गोठ्यातील जनावरांना आणि वाडीवर राहणाऱ्या कुत्र्यामांजरांनाही जीव लावतात. पशुपालन म्हटले, की त्यात काही क्रूरता अपरिहार्य असते. दुभती जनावरे म्हातारी झाली म्हणजे त्यांना काढून टाकताना शेतकऱ्याच्या साऱ्या कुटुंबात मोठी उदासीनता येते; सुतकाची कळा येते. कालपर्यंत आपल्या गोठ्यात असलेले मुके जनावर आज कोठे चालले असेल, त्याचे काय होत असेल या कल्पनेनेही शेतकऱ्याच्या कुटुंबीयांच्या पोटात गलबलून जाते.

मनेकाबाईंनी, कसाईखान्याकडे जाणारी जनावरे मैलच्या मैल चालवत नेली जातात याबद्दल तक्रार केली; शेतकरी मनाला ती पटली. जनावर कापण्यापूर्वी आणि कापताना त्याचे विनाकारण हाल करू नयेत अशी त्यांची भावना.

दुधाचा धंदा करायचा म्हणजे त्यात संवर्धन आले, पालन आले आणि त्याबरोबर भाकड जनावरे काढून टाकणेही आले. घरातील चालतीबोलती माणसे जड होऊ लागली म्हणजे मनावर दगड ठेवून शेतकरी मुलगा त्यांना वारीसाठी

किंवा काशीयात्रेला पाठवतो. वर्षानुवर्षे आपल्या मुलांबाळांचे पोषण करणाऱ्या जनावरास काढून टाकणे ही मोठी दुःखद गोष्ट आहे. पण, पशुहत्येला विरोध करणारी मंडळी भाकड वयात जनावरांच्या होणाऱ्या खाण्यापिण्याच्या खर्चाचा बोजा काही उचलायला तयार होत नाहीत ही शेतकरी संघटनेची पशुहत्याविरोधकांबद्दलची तक्रार आहे.

प्राणिदयेचा विषय फक्त गोठ्यातील जनावरांपुरता मर्यादित राहत नाही. सर्वांभूती आत्मा आहे, गाय तेहेतीस कोटी देवांचे निवासस्थान असेल; पण वाघासारख्या हिंस्र प्राण्यालाही जीव आहे. प्राणिदयेची व्याप्ती जंगली पशूंपर्यंत गेली, त्यात हरणे, वाघ यांचाही समावेश झाला म्हणजे शेतकऱ्याच्या समोर अडचण उभी राहते. अशा प्राण्यांकरिता राखून ठेवलेल्या अभयारण्यांच्या आसपासच्या शेतकऱ्यांना या प्राण्यांचा मोठा उपद्रव होतो. हरणांचे कळप शेते फस्त नाही तरी उद्ध्वस्त करून जातात आणि वाघबिबटे शेतातील प्राण्यांवरही हल्ला करतात, माणसांना सतत भीतीच्या छायेखाली वावरावे लागते – वाघांच्या आणि त्यांच्याहीपेक्षा जास्त कायद्याच्या. शेतकरी कायद्याच्या यंत्रणेतून पळवाट काढून वाघांना विष घालून मारतो हे काही गुपित नाही.

मनेकाबाईंचा प्राणिदयेचा विषय कुतूहल निर्माण करी; आजवर त्यामुळे कधी खळबळ माजली नाही. गेल्या आठवड्यात बाईंनी फर्मान काढले. घोड्यांच्या शर्यतीत स्वार त्याचा घोडा वेगाने धावावा म्हणून चाबकाचा उपयोग करतो. एक फतवा काढून बाईंनी त्यावर बंदी घातली; चाबकाच्या ऐवजी हवेचे चाबूक, इतर देशांप्रमाणे येथेही वापरावेत असे सांगितले आणि एकच हलकल्लोळ माजला. घोड्यांच्या शर्यती हा अब्जावधीचा धंदा आहे. शर्यतींचे पागलही लाखोंच्या संख्येने आहेत. पुण्याच्या शर्यतीच्या दिवशी मुंबईकडून गाड्या भरभरून येतात, जातात आणि मुबईत शर्यत असली म्हणजेही उलट्या दिशेने भरगच्च भरून धावतात. शर्यतीत घोडे धावणारे कोणते, त्यांचे आईबाप कोण, त्यांचे खानदान काय; शर्यतीत धावण्याचा प्रत्येकाचा इतिहास काय याचा मोठा बारकाईने अभ्यास होतो. घोड्यांपेक्षाही जास्त अभ्यास घोडेस्वाराच्या कारकिर्दीचा केला जातो.

घोडेस्वार आणि चाबूक हे शब्द एकमेकांशी जुळलेलेच आहेत. केवळ टाच मारून तुफान घोडदौड इतिहासातील राणा प्रतापसिंहासारख्या गाजलेल्या वीरांनाही शक्य झाली नसावी. घोडा आणि त्याचा मालक यांच्या वैयक्तिक प्रेमसंबंधांतील चाबूक हे एक साधनच समजले जाईल. वर्षानुवर्षे चाबूक वापरलेल्या घोडेस्वारांना

हवेच्या चाबकाने घोडा दौडवता येईल असा विश्वास वाटेना. कोट्यवधींच्या शर्यतींच्या धंद्यात मोठा आकांत उडाला. परदेशांतील रेसिंग व्यवसायातही या करुणेच्या भावनेने अनेकांची मने हलली.

मनेकाबाईंनी शेतकरी शेतात नांगर चालवताना किंवा बैलगाडी हाकताना पाहिला नसावा. चाबूकच काय, अणकुचीदार पराणीचाही प्रयोग सर्रास केला जातो. शेतकऱ्यांनी शेतात काम करताना बैलांवर चाबकाचा प्रयोग करू नये असा फतवा निघाला तर मोठी कठीण अवस्था येणार आहे. बैल न वापरता ट्रॅक्टरच वापरायचे म्हटले तर तेथेही अडचण! कारण शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे पर्यावरणात प्रदूषण माजते; पण पोटच्या पोरांना दाटावे, आईमाईवरून शिव्या घालाव्या या संस्कृतीत बैलाच्या पाठीवरील चाबकाचे फटकारे कोणाला फारसे रुतत नाहीत.

योगायोग असा, की ज्या आठवड्यात मनेकाबाईंनी हवेच्या चाबकाचा फतवा काढला त्याच आठवड्यात तामिळनाडूमधील येरवाडीचे जळीत प्रकरण झाले. येरवाडी येथे एक दर्गा आहे. या दर्ग्यात मिन्नत मागितल्याने अगदी ठार वेडेसुद्धा बरे होतात अशी पूर्वापारची श्रद्धा आहे. हिंदुस्थानात मानसिक रुग्णांच्या उपचारांची सोय जवळजवळ नाही. मनाचे संतुलन गेलेली माणसे आजारी आहेत असे कोणाला वाटतच नाही. तिन्ही त्रिकाळ चाऱ्ही ठाव हादडणारा माणूस आजारी असेलच कसा, अशीच सरसकट भावना आहे. कुटुंबातून त्याला काढून लावण्याचे अनेक मार्ग आहेत. गर्दीच्या ठिकाणी, यात्रेत त्यांना गुपचूप सोडून देतात. वेडेचार करीत, कोणी पोटाला घातले तर ते खात जगता येईल तितके दिवस ते जगतात. हाल हाल होतात. वेडे माणूस बाई असली म्हणजे मग तर काय अनन्वित छळ होत असेल याची कल्पनाही कठीण. यातील काही माणसे चमत्कारिक योगायोगांमुळे अवलिया मानले जातात आणि भक्तीचा विषयही बनतात.

महाराष्ट्रात नरसोबाच्या वाडीला देवळात वेड्यांचा उपचार होतो म्हणजे खांबाला बांधून त्यांना निर्दयपणे झोडपले जाते. प्रत्यक्ष रुग्णांना या उपचारांचा किती उपयोग होतो ते सांगणे कठीण आहे. त्यात अनेकांचे प्राणही जातात; पण कोणी थोडेफार वेडेचाळे करू लागला तर नरसोबाच्या वाडीला नेण्याच्या धमकीने, कदाचित, तो आटोक्यात राहत असेल तेवढाच काय तो या उपचाराचा उपयोग.

मनोरुग्णांतील अनेक लैंगिक कोंडमारीत असतात. कामविश्वात चाबकाचे दैवत करणारे समाज अनेक पाश्चिमात्य देशांत भरपूर पसरले आहेत. त्यांच्या

साहित्यांत चाबकाच्या माऱ्यामुळे लैंगिक कोंडमारा कमी होतो असे आग्रहाने प्रतिपादन केले जाते. नरसोबाच्या वाडीच्या उपचारामागे कदाचित असेही काही शास्त्र असू शकेल.

येरवाडीच्या दर्ग्यात मिन्नत मागण्यासाठी हजारोंनी गर्दी उसळते. सगळ्यांना तातडीने दर्शन शक्य नाही, काही दिवस मुक्काम करावा तरच नंबर लागतो. साहजिकच, तेथे वेडे आणि त्यांचे नातेवाईक यांच्या निवासाची सोय करण्याचा मोठा व्यवसाय तयार झाला. नातेवाईक खोल्यांत राहतात, वेड्यांची सोय वेगळी – गोठ्यांत, तबेल्यांत. नातेवाईक म्हणजे कामाची माणसे, ती नंबर लागेपर्यंत कशी काय थांबणार? एकदोन दिवसांत ती आपल्या कामी लागतात; वेड्यांना दर्ग्यात नेऊन आणण्याची जवाबदारी, तीर्थक्षेत्रांतील भिक्षुकांप्रमाणे, वेड्यांच्या आसऱ्यांचे व्यवस्थापक घेतात. एकेका कोठीत शंभर शंभर वेडे ठेवतात. त्यांच्या खाण्यापिण्याची, शौचमार्जनाची व्यवस्था कोण करतो? हे पळून गेले नाही म्हणजे पुरे. तेवढ्यासाठी आणि त्यांनी दंगाधोपा करू नये म्हणून त्यांना साखळीने बांधून ठेवले जाते.

शर्यतींच्या घोड्यांवर चाबकाचा प्रयोग होऊ नये असा फतवा निघाला त्याच्या तिसऱ्याच दिवशी येरवाडीतील वेड्यांच्या एका गोठ्याला आग लागली. साखळीने बांधलेले वेडे जागच्या जागी होरपळून मेले. येरवाडीत असे पाचपन्नास गोठे आहेत. साऱ्या देशभरात असे 'दर्गे' किती, 'वाड्या' किती आणि गोठे किती असतील याची खानेसुमारीच नाही.

म्हाताऱ्या आईबापांना पोसता येत नाही म्हणून त्यांना उघड्या डोळ्यांनी काशीमरणाला पाठवावे, बोजा होतो म्हणून मनोरुग्णांना जनावरांसारखे बांधून घालावे हे ज्या देशात होते तेथेच घोडे आणि कुत्रे यांचे कौतुक मानवतावाद आणि भूतदया म्हणून वाखाणले जाते. धिस् हॅपन्स् ओन्ली इन इंडिया!

*दि. १८/८/२००१*

■■

# धर्मांतरातील प्रियाराधन

लोकसभेचे सत्र चालू असले म्हणजे प्रत्येक खासदाराच्या मुक्कामी सकाळसंध्याकाळ हजार-दोन हजार पानांचे लोकसभेतील कामकाजासंबंधीचे कागदपत्र येऊन पोहोचतात. सकाळी अकरा वाजता संसदेचे कामकाज सुरू होईपर्यंत त्या सगळ्या कागदपत्रांवर उडती नजर फेकणेही अशक्य असते. संसदेच्या समित्या, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे, निगम इत्यादींचे अहवाल लोकसभेपुढे यायचे असले म्हणजे आवश्यक वाचनाची व्याप्ती खूपच वाढते.

कागदपत्रे मिळाल्यानंतर एकदोन दिवसांचा तरी अवधी मिळाला पाहिजे असा आग्रह कोणी धरीत नाही. कारण, एकदा सत्र चालू झाले, की दिवसभर कामकाज चालूच राहते आणि त्यानंतर पुन्हा नवीन कागदपत्रांचा ढिगारा येऊन पडतो.

मग, संसदेत चर्चा करतो कोण? काही खासदारांनी काही विशेष विषयांत त्यांच्या अभ्यासामुळे आणि अनुभवामुळे आपले एक स्थान तयार केले आहे. ही अभ्यासू मंडळी त्यांच्या विषयासंबंधी काही चर्चा होणार असली तर संबंधित कागदपत्र वाचून जातात; चर्चेत भाग घेतात. सर्वसाधारण खासदार मंडळी कागदपत्रे बघायच्या आधी सकाळच्या वर्तमानपत्रांतील ठळक मथळ्यांवर नजर टाकतात. बहुधा त्यांत काहीतरी सनसनाटी मिळतेच. तेवढाच विषय घेऊन प्रश्नोत्तरांचा तास सुरू झाल्यापासून धुमाकूळ घालता येतो; जमले तर, सत्र तहकूबही करून घेता येते अशा हिशेबाने आरडाओरडीस सबब मिळेल एवढी बातमी, फारशा तपशिलात न जाता, वाचून वर्तमानपत्र घेऊन ते संसदेकडे जायला निघतात.

युनिट ट्रस्टसारखा एखादा विषय कित्येक दिवस पुरू शकतो आणि आघाडीचे शासन असले म्हणजे त्यातील कोणत्या ना कोणत्या पक्षाचा कोणी ना कोणी

मुखंड काहीतरी तारे तोडून लोकसभेत गदारोळ घालायला सबब तयार करून देतो.

सोमवार दिनांक २० ऑगस्ट २००१. सकाळच्या वर्तमानपत्रांत सरकारला धारेवर धरता येईल असे काहीच नव्हते. त्यामुळे, लोकसभेतले कामकाज कसे काय चालणार यासंबंधी कुतूहल वाटत होते; पण सोमवारच्या अंकात नसले म्हणून काय झाले? रविवारच्या अंकात पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी श्रीकृष्णाविषयीच्या एका पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या निवासस्थानीच केले त्याची बातमी होती. असे कार्यक्रम एकामागोमाग एक घडतच असतात; पण या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक सुदर्शनजीही हजर होते. संघाचे स्वयंसेवक वेगवेगळ्या राज्यांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराविषयी नाराज आहेत. त्यांच्या विरोधाचा परिणाम जागोजागी हिंसाचारातही होतो. संसदेतील विरोधी पक्षनेत्या सोनिया गांधी जन्माने ख्रिश्चन कॅथॉलिक पंथाच्या आहेत; तेव्हा, अटल बिहारी यांनी ख्रिस्ती धर्मप्रचाराविरुद्ध खंबीर भूमिका घ्यावी अशी संघस्वयंसेवकांची फार जुनी मागणी आहे. बहुधा सुदर्शनजींना खूश करण्याकरिता, पंतप्रधानांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कामाविषयी नाराजी व्यक्त केली. ख्रिस्ती धर्मप्रसारक गोरगरिबांची कळकळीने सेवा करतात; इतर कोणीही जेथे पोहोचत नाहीत तेथे ते जातात याबद्दल पंतप्रधानांनी त्यांची प्रशंसा केली. पण, या सगळ्या भल्या कामगिरीमागे ख्रिस्ती धर्माचा प्रचार करून लोकांना तो धर्म स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याची जी बुद्धी आहे, ती मात्र दुर्दैवी असल्याची टिप्पणीही पंतप्रधानांनी केली.

श्रीकृष्णाविषयीच्या पुस्तकाचे प्रकाशन, त्यातून धर्मांतराचा विषय कसा काय निघाला असेल? भगवद्‌गीतेत श्रीकृष्णाने 'स्वधर्मे निधनं श्रेयः, परधर्मो भयावहः' असे निक्षून सांगितले आहे. त्यातील 'धर्म' शब्दाचा अर्थ 'व्यक्तिमात्राची प्रकृती' असा आहे; सार्वजनिक संघटित धर्मांना उद्देशून हे वाक्य म्हटलेले नाही; पण हिंदुत्वनिष्ठांत इतक्या दार्शनिक तपशिलात जाण्याची परंपरा नाही.

धर्मांतर ही काही भयानक गोष्ट आहे अशी हिंदुस्थानातील अनेकांची ठाम समजूत आहे. मुसलमान बादशहांनी 'इस्लाम स्वीकारलास तर तुला जिवदान देतो, अन्यथा हाल हाल होऊन मरशील' अशी धमकी दिल्यावर निग्रहाने 'स्वधर्म' सोडण्यास नकार देणाऱ्या वीरांच्या बाणेदार कथा घोळवून घोळवून सांगितल्या जातात. त्यामुळे, आपला धर्म सोडण्यापेक्षा मृत्यू श्रेयस्कर अशी सर्वसाधारण भावना आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अगदी जवळचा सहकारी नेताजी पालकर अशाच दडपणाखाली नाइलाजाने मुसलमान झाला. शिवाजी महाराजांनी त्याचे पुन्हा शुद्धीकरण करून घेतले. या ऐतिहासिक दाखल्यानेही धर्मांतराविषयीच्या एकूण कडवट भावनेत फारसा फरक पडलेला नाही.

हिंदुस्थानात फार मोठ्या प्रमाणावर हिंदू प्रजेने धर्मांतर केले. मुसलमानी अमलात जातिभेद नसलेल्या, प्रार्थनास्थळांत सर्वांना प्रवेश देणाऱ्या नवीन धर्माचे आकर्षण अनेक शूद्रातिशूद्रांना वाटले. महात्मा जोतीबा फुल्यांच्या शब्दांत, 'त्यांनी महंमदाच्या जहांमर्द शिष्यांचे स्वागत केले.' बलुतेदारांना, कारागिरांना, कलावंतांना दरबारचा आश्रय हवा असेल तर बादशहाचा धर्म स्वीकारण्यात काही सोयही होती. एवढे मात्र खरे, की कुराणाच्या 'कलमा' देशी लोकांना समजतील अशा भाषेत पोहोचवून त्यांची शिकवण लोकांच्या गळी उतरवण्याचे प्रयत्न फारसे झाले नाहीत.

इंग्रजी आमदनीत ख्रिस्ती धर्मप्रसारक आले. त्यांना राजश्रय होता, साधनसंपत्तीही भरपूर होती. डोंगरखोऱ्यांत, रानावनांत, आदिवासी प्रदेशांत त्यांनी आपला शिरकाव केला. त्याबरोबरच, वारंवार दुष्काळग्रस्त होणाऱ्या इलाख्यांतही त्यांनी ठाण मांडले. एक चांगल्यापैकी दवाखाना किंवा इस्पितळ, एखादी शाळा आणि वर, लोकांना उदरनिर्वाहाकरिता काही आधार देऊ केला की दीनदुःखी लोक हजारोंच्या संख्येने त्यांच्याकडे आपोआप येत. सत्तेखालील काही अपवाद सोडल्यास, ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेसारख्या दुष्ट प्रथा आणि, उलटपक्षी, ख्रिस्ताची करुणामयी शिकवण यांवर भर दिला. रेव्हरंड टिळकांसारखी मंडळी ख्रिस्ती बनली. केवळ धर्माची शिकवणच ख्रिस्ती धर्मप्रसारक देत राहिले असते आणि बरोबरीने भुकेलेल्यांना जेवू घातले नसते, आजाऱ्यांची शुश्रूषा केली नसती तर लोक ख्रिस्ती झाले असते किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. पण, रेव्हरंड टिळकांसारख्या अनेकांना जडजंबाल कर्मठ धर्मापेक्षा करुणा शिकविणारा आणि अमलात आणणारा धर्म भारून टाकणारा वाटला यात काही शंका नाही.

हिंदुस्थानात, धर्म हा एक विषय सोडला तर बाकी सर्व विषयांत प्रत्येकाने आपापले मत मांडावे, आपल्यापेक्षा वेगळी मते असणाऱ्यांना आपला विचार पटवून द्यावा, आपल्या मताचा प्रचार करणे हा मनुष्यमात्राचा अधिकार आहे असे मानले जाते. धर्मांतराबाबतही दुसरे धर्म सोडून कोणी हिंदू धर्माचा स्वीकार केला तर हिंदुत्ववाद्यांना त्यात आक्षेपार्ह असे काहीच वाटत नाही; उलट,

आपले पितर स्वर्गात गेल्याचा आनंद होतो. आद्य शंकराचार्यांनी हातात मशाल घेऊन बौद्धधर्मीयांना वादविवादाचे आव्हान दिले आणि हिंदुस्थानातील बौद्ध धर्म संपवून टाकला अशी एक निराधार आख्यायिका सर्वदूर पसरली आहे. शंकराचार्यांनी काही वाईट कृत्य केले असे कोणी मानीत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लाखो दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्याबद्दलही अनेक हिंदुत्ववाद्यांच्या मनात खुपते; पण त्याबद्दल क्रोध उफाळून येत नाही.

पंजाबमध्ये शिख आणि हिंदू समाजांतील सरहद्दीची रेघ इतकी धूसर आहे की कोण हिंदू, कोण शिख हा प्रश्नसुद्धा फारसा उभा राहत नाही.

मतप्रचाराच्या स्वातंत्र्याला हिंदू मानसिकतेत धर्मांतर हा एकच अपवाद, तोसुद्धा शीख किंवा बौद्ध अशा दोस्त धर्मांबद्दल नाही. थोडक्यात, धर्मांतराविषयीचा सारा आक्रोश हा हिंदुंनी मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याविषयी आहे.

हिंदु समाजाने ज्यांना माणूस म्हणूनदेखील वागवले नाही त्यांनी दुसऱ्या धर्माच्या समाजात प्रवेश केला तर त्यात दुःख मानण्याचे ते काय कारण? याला हिंदुत्ववाद्यांचा युक्तिवाद असा, की मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्यांची राष्ट्रभावना मंदावते आणि ख्रिस्ती व मुसलमान यांच्याप्रमाणे त्यांचे डोळे देशाबाहेरील धर्मसत्तेकडे किंवा धर्मबांधवांकडे लागून राहतात. याहीपेक्षा खरे कारण असे, की कालपर्यंत ज्याला अस्पृश्य मानले तो मुसलमान किंवा ख्रिस्ती झाला, की रावसाहेब किंवा खानसाहेब म्हणून पार चावडीपर्यंत येतो, त्याला कोणतीच कमीपणाची भावना राहत नाही. धर्मांतराने जातिव्यवस्थेला बाध येतो हे हिंदू समाजाचे मोठे दुःख आहे.

धर्मांतरित मुसलमान आणि ख्रिस्ती समाजांतही जुने जातिभेद चालूच राहतात, ब्राह्मण ख्रिश्चन इतर जातींतून आलेल्या ख्रिश्चनांना बरोबरीचे मानीत नाहीत आणि मुसलमान झाले तरी हीन जातीचा बाट काही संपत नाही हे खरे; परंतु हिंदू समाजाशी त्यांचा जेथे जेथे संपर्क यईल तेवढ्यापुरतीतरी जातीमुळे आलेली हीनता फारशी राहत नाही.

मार्क्स्‌वाद्यांना आपला विचार लोकांना पटवून सांगण्याचा आणि त्याना मार्क्स्‌वादी बनविण्याचा अधिकार असेल तर कोणत्याही धर्माच्या पाइकास आपल्या धर्मातील तत्त्वे श्रेष्ठ आहेत हे दुसऱ्यास पटवून देण्याचा प्रयत्न करण्याचा अधिकार आहे. ज्याला ते पटेल त्याला आपला धर्म बदलून दुसरा धर्म स्वीकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्यघटनेने दिलेल्या धर्मस्वातंत्र्याचा अर्थ 'धर्मांतराचे स्वातंत्र्य' असाही होतो.

राहता राहिला एक किरकोळ प्रश्न. सेवासोयींची लालूच दाखवून धर्मांतराला प्रवृत्त करणे कितपत योग्य आहे? कोणाचे प्रेम संपादन करायचे असले तर त्याला वारंवार भेटावे, त्याच्या संगे बोलावे चालावे, त्याला भेटवस्तू द्याव्यात असे पूर्वसूरींनी सांगून ठेवले आहे. प्रणयाराधनाच्या काळात प्रिय व्यक्तीला भेटवस्तू देणे अयोग्य आहे असे कोणी म्हणत नाही. मग, तहानलेल्यांना पाणी पाजणे, भुकेलेल्यांना खाऊ घालणे, ज्ञानाचा हक्क नाकारलेल्यांना लिहायवाचायला शिकविणे आणि रोगपीडितांची शुश्रूषा करणे यांत आक्षेपार्ह ते काय? माणसाच्या दुःखांकडे कठोरतेने दुर्लक्ष करणाऱ्या स्वधर्मलंडांपेक्षा या वेगळ्या प्रकारच्या माणसांचा विचार काय, हेतू काय, त्यांच्या प्रेरणा कोणत्या याविषयी कुतूहल निर्माण झाले आणि त्यातून कोणी आपला, जन्माच्या अपघाताने मिळालेला, धर्म सोडून देण्यास तयार झाला तर त्याचे कौतुक झाले पाहिजे. जन्माच्या अपघाताने मिळालेल्या धर्माचा जो अभिमान बाळगतो त्याचा तो अभिमान अभिनिवेशाचा आहे; जाणीवपूर्वक ज्याने धर्म स्वीकारला त्याचा धर्माभिमान नव्या 'मुल्ले'पणाचा काळ संपल्यानंतर तरी अधिक गंभीर आणि गाढ असणार.

*दि. २५/८/२००१*

■■

# प्रत्येकाच्या मनातील 'बंगारू'

मार्च महिन्यात तहलका डॉट कॉमच्या पत्रकारांनी भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष आणि समता पक्षाचे नेते यांना सापळ्यात पकडले; लष्कराकरिता लागणाऱ्या साधनसामग्रीचे विक्रेते असल्याचे त्यांनी नाटक केले आणि सरकारी कंत्राटे मिळवण्याची आहेत असे भासवून भल्याभल्यांच्या तोंडून कबुलीजवाब काढले; काहींच्या हाती नोटांच्या चवडी ठेवल्या आणि सर्वांत वर कडी म्हणजे, हे सगळे त्यांनी दृक्श्राव्य कॅमेऱ्यांनी टिपले. तहलकाने तहलका माजला. संरक्षण मंत्र्यांना पदावरून दूर व्हावे लागले. राज्यकर्त्या पक्षाच्या अध्यक्षांना राजीनामा द्यावा लागला. लोकसभेत 'न भूतो, न भविष्यति' असा आरडाओरडा झाला. चौकशी समिती नेमली गेली. समितीच्या निर्णयाप्रमाणे अपराध्यांना शासन करण्यात येईल असे पंतप्रधानांनी आश्वासन दिले आणि प्रकरण मिटले नाही, तरी थंडावत चालले असे वाटत होते. पंडित नेहरूंचे जिवलग साथी व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या काळातील जीपखरेदीच्या प्रकरणापासून ते राजीव गांधींच्या बोफोर्स प्रकरणापर्यंत ल्ष्करासाठी खरेदी करण्याच्या सामुग्रीविषयी भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उभी राहिली आणि यथावकाश मिटली. कोणत्याच पक्षाला युद्धसामुग्रीच्या खरेदीतील भ्रष्टाचार संपविणे मनापासून नको आहे; त्यामुळे असली प्रकरणे उभी राहतात, मावळून जातात. जुन्या प्रकरणांच्या थप्पीच्या थप्पी वेगवेगळ्या मंत्रालयांत पडून आहेत.

पण तहलका पत्रकार शांत झालेले नाहीत. लष्करातील काही अधिकाऱ्यांना अशाच काही संबंधांत त्यांनी गाठले; त्या अधिकाऱ्यांना खूश करण्यासाठी पंचतारांकित हॉटेलातील त्यांच्या खोलीत मुली पुरविल्या; एवढेच नव्हे तर, छुप्या कॅमेऱ्याच्या साहाय्याने त्यांच्या कामक्रीडांचे तपशीलवार चित्रीकरण केले. मग, तहलकाचा आणखी एक धमाका उडाला. पण या वेळी, ज्या लष्करी

अधिकाऱ्यांनी सेवा मागितल्या आणि घेतल्या त्यांच्याविरुद्ध फारसे कोणी बोलले नाही. लोकसभेत गदारोळ झाला; पण तो लष्करी अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध विरोधी पक्षांनी केला नाही; या वेळी भारतीय जनता पक्षाचेच खासदार अध्यक्षांसमोर उतरले आणि तहलका पत्रकारांनी अनैतिक आणि बेकायदेशीर मार्गाचा वापर केला त्याबद्दल त्यांच्याविरुद्ध कारवाई झाली पाहिजे अशी त्यांनी मागणी केली.

पत्रकारांनी आवश्यक ती माहिती गोळा करण्याकरिता काय साधने वापरावीत, त्यांतील कोणती उचित, कोणती अनुचित या विषयावर भरपूर चर्चा झाली. 'पत्रकार वेगवेगळ्या तऱ्हांची साधने, प्रलोभने वापरतात. आपल्या वर्तमानपत्रात किंवा लेखात तुमच्या कामाला भरपूर प्रसिद्धी देऊन, फोटोसकट विस्तृत बातमीपत्र देऊत येथपासून ते तुमच्या विरोधकांविरुद्ध प्रचाराची आघाडी चालविण्यात आम्ही तुमच्या बाजूने आहोत; माहिती गोळा करण्याकरिता काही खर्च करायचा असेल तर तो आम्ही सांभाळू; तुमची परदेशातील एखादी सहल आमच्या खर्चाने होऊ शकेल अशा किरकोळ प्रलोभनांपासून ते प्रत्यक्ष रोख पैसे किंवा ज्याचा बकरा बनवायचे त्याला ज्या गोष्टीत स्वारस्य असेल त्या वस्तू किंवा सेवा पुरविण्याच्याही गोष्टी होऊ शकतात. हे सारे सर्रास चालते. बडी नेते मंडळी अशा साधनांचा वापर करून पत्रकार ताब्यात ठेवतात. पत्रकारांना वेसण घालण्याचे हमखास साधन म्हणून त्यांना राहण्यासाठी फ्लॅट पुरविणे, सामिष ओल्यासुक्या मेजवान्यांना बोलाविणे हेही सर्रासच चालते.' अशी मांडणीही या चर्चेत करण्यात आली.

पत्रकारांनी हीच साधने पुढारी किंवा अधिकारी यांच्या विरुद्ध वापरली तर त्यात पत्रकारांनी काही मोठी गुन्हेगारी केली असे म्हणणे कठीण आहे.

लष्करी अधिकाऱ्यांना आणि परदेशी दूतावासांतील अधिकाऱ्यांना पेयांचा फारसा तुटवडा नसतो; त्यांच्यासाठी वेगळी प्रलोभने वापरली जातात. जगातील बहुतेक गुप्तहेर संस्थांत अशा कामासाठी वारयोषितांची पथके कायमची सांभाळलेली असतात. भारतातील किती अधिकारी गुप्तहेर संस्थांच्या माषुकांच्या सापळ्यात सापडले असतील याची शिरगणतीसुद्धा करणे कठीण आहे.

तहलका प्रकरणातील माषुकांचा वापर ही प्रलोभनातील एक नवी कडी आहे. पण, त्यामुळे होणारा फरक फक्त अंशात्मक आहे. तहलकाच्या पत्रकारांनी जे काही केले ते कायद्याखाली गुन्हा आहे किंवा नाही हा प्रश्न वकील आणि कायदेतज्ज्ञ यांच्या अखत्यारीतील आहे; तो काही चर्चेचा विषय नाही. कायद्याच्या तरतुदीनुसार तो गुन्हा असेल तर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई झाली

पाहिजे यातही काही मतभेद असण्याचे कारण नाही.

मार्च महिन्यातील प्रकरणात आरडाओरडा झाला तो बंगारू लक्ष्मण, जैन, जया जेटली आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्या विरुद्ध; लष्करी सामग्री विकण्यात स्वारस्य असलेल्या कंपनीचे नाटक उभे करणे आणि बळेबळेच नोटांच्या थप्पी देऊ करणे हा प्रकार पत्रकारांच्या साधनशुचितेत बसतो किंवा नाही याविषयी त्या वेळी फारसे बोलेले गेले नाही. याउलट, ऑगस्ट महिन्यात भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांबद्दल कोणीच फारसे बोलले नाही; सारी चर्चा झाली ती पत्रकारांनी अवलंबलेल्या मार्गाच्या शुद्धाशुद्धतेची. पैशाचे प्रलोभन आणि माषुकांचा वापर यांत केवळ अंशात्मकच फरक असेल तर सर्वसाधारण प्रतिक्रियेतमात्र एवढा 'घूम जाव' बदल कसा घडला?

हे नवे प्रकरण उद्‌भवले तेव्हा मला १९५४-५५ सालच्या टी. टी. कृष्णम्माचारींच्या आयुर्विमा प्रकरणाची आठवण झाली. त्या वेळी मी मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये शिकत होतो. 'आशियातील सर्वप्रथम वाणिज्य महाविद्यालय; येथील विद्यार्थ्यांचे पालक देशात जमा होणाऱ्या आयकरापैकी निम्मा भरतात,' अशी माहिती तत्कालीन अर्थमंत्री चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख यांनी कॉलेजच्या वार्षिक संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना दिली होती. अर्थशास्त्राच्या विशेष अभ्यासासाठी वाणिज्य शाखेकडे वळलेली आम्ही मराठी भाषीक नोकरदारांची पोरे साऱ्या महाविद्यालयात फारतर डझनभर; मुख्य भरणा बडेबडे व्यापारी, कारखानदार यांच्या पाल्यांचा. बहुतेक सर्व भांडवलदार घराण्यांतील नावे माझ्या वर्गाच्या हजेरीपटावर होती. कृष्णम्माचारी प्रकरणात न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी लोकसभेत जाहीर केले. तासादोन तासांच्या मधल्या वेळात या विषयावर विद्यार्थ्यांत चर्चा चालू होती. असल्या चर्चा समाजवाद, नियोजन, तुटीची अर्थव्यवस्था इत्यादी विषयांवर चालत असल्या तर त्यांत बहुसंख्येने आम्ही घाटी विद्यार्थीच भाग घ्यायचो; पण या प्रकरणात जीवन बिमा निगम आणि अनेक मोठ्या संस्था गुंतलेल्या, त्यामुळे चर्चेत पोद्दार, तुराखिया अशी मंडळीही उत्साहाने सामील झाली होती.

बराच वेळ चर्चा झाल्यानंतर मी म्हटले, "एवढ्या सगळ्या अंधःकारात भाग्याची गोष्ट अशी, की आपल्याकडील न्यायव्यवस्थातरी अजून स्वच्छ राहिली आहे. त्यामुळे, निदान, न्यायालयीन चौकशीच्या आधारेतरी सत्य बाहेर येऊ शकते." कोणा शेठियाचा पाल्य विद्यार्थी फटकन म्हणाला की, "घाटी लोकांची भाषा सोडून द्या. हिंदुस्थानातील बड्याबड्या न्यायाधीशांना, निर्णय आपल्या

बाजूने करून घ्यायचा असेल तर काय काय पुरवायला लागते ते मला विचारून घ्या." त्याने डोळे असे मिचकावले होते की पुरवठा वस्तूंचा नाही हे उघड व्हावे.

भ्रष्टाचार हा काही पैशानेच होत नाही. त्यासाठी भ्रष्टाचाराच्या विषयाच्या व्यक्तीची जीवनशैली काय आहे याचा अभ्यास करावा लागतो. तहलकाच्या पत्रकारांनी माषुके वापरली ती असा अभ्यास करूनच वापरली असणार. या प्रकरणातून शेवटी निघणारे निष्कर्ष सर्व देशाच्या दृष्टीने इतके महत्त्वाचे आहेत, की त्यासाठी साधनशुचितेची एवढी तडजोड करण्यात अनैतिक असे काही नाही अशी मनाची खात्री करूनच त्यांनी सारा डाव रचला असला पाहिजे. मग, लोकांची अशी उलटी प्रतिक्रिया का असावी? वाघाच्या ऐवजी जनमत शिकाऱ्याविरुद्धच का वळले?

भ्रष्टाचाराच्या प्रकरणात जनसामान्यांचीही एक मानसिकता असते. विश्वनाथ प्रताप सिंगांबरोबर पाटना येथील एका सभेत मी गेलो होतो. त्या वेळचा ज्वलंत प्रश्न बोफोर्स प्रकरणाचा. विश्वनाथ प्रताप सिंगांनी ६८ कोटीच्या भ्रष्टाचाराची कहाणी घासूनघासून सांगितली. मंचावर बसल्या बसल्या माझ्या लक्षात आले, की सारी कथा ऐकून लोकांच्या मनात पाहिजे तशी चीड आणि क्रोध दिसत नाही. हा काय चमत्कार आहे? नंतर ही गोष्ट सिंगसाहेबांच्याही लक्षात आणून दिली. 'शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नाबद्दल शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर जशी चीड दिसते तशी बोफोर्स प्रकरणाबद्दल सर्वसाधारण जनतेच्या चेहऱ्यावर दिसत नाही.' त्यांनाही आश्चर्य वाटले. त्यानंतर कितीतरी दिवसांनी मला हे गूढ समजले. ज्याला भ्रष्टाचाराचा एवढाही डाग लागला नाही असे फारसे कोणी राहिलेलेच नाही. दरवाजावरचा पट्टेवाला चिरीमिरी घेतो, इन्स्पेक्टर हप्ते घेतो, अधिकारी आणि पुढारी कमिशन घेतात. एक फॅक्टरी इन्स्पेक्टर जर दररोज दहावीस हजार रुपये घरी घेऊन जात असेल तर बोफोर्सची कथा ऐकल्यानंतर त्याच्या मनात विचार येतो तो साध्या त्रैराशिकाचा – 'मी साधा इन्स्पेक्टर, इतके इतके पैसे घेतो, तर पंतप्रधानांनी ६८ कोटी घ्यावेत यात काही फारसे वावगे नाही.' भ्रष्टचाराच्या प्रकरणी माणूस, या प्रकरणात आपण गोवलेलो असतो तर काय झाले असते याचे चित्र उभे करतो आणि आपली भूमिका ठरवतो.

माणसाच्या बुद्धीची ही सहजप्रवृत्ती आहे. कोणी रस्त्यावर पडलेला जखमी माणूस दिसला, की त्याच्या जागी आपण असतो तर कसे झाले असते असा

परकायाप्रवेशाचा विचार मनुष्य सहज करतो. माणूस केवळ स्वार्थी नाही, त्याच्यात एक दुसऱ्याची जाणीव ठेवण्याची नैतिकता असते. या नैतिकतेचा उगम या परकायाप्रवेश प्रवृत्तीत आहे असे अ‍ॅडम स्मिथने मांडले (Theory of Modern Sentiments) तहलकाच्या वेगवेगळ्या प्रलोभनांना सामान्यजनांची प्रतिक्रिया वेगवेगळी होते याचे कारण हा परकायाप्रवेश आहे. आपण त्या जागी असतो तर काय केले असते या प्रश्नाचे जो तो उत्तर शोधतो आणि आपल्या मनातील 'बंगारू लक्ष्मण' ला विचारून आपली भूमिका ठरवतो.

सर्वसामान्य मनुष्य लष्करी सामग्रीची कंत्राटे देत नाही. असल्या प्रकरणी भ्रष्टाचार झाला तर देशाची सुरक्षा आणि जवानांचा जीव धोक्यात येतो या जाणिवेने तो बंगारू लक्ष्मण इत्यादींच्या विरुद्ध संतापाने उठतो. बंगारू लक्ष्मणांच्या जागी आपण असतो तर लाखाचे बंडल आपण नक्कीच नाकारले असते अशी मनात खात्री पटली, की तो बंगारूसाहेबांच्या विरुद्ध बोलतो; पत्रकारांच्या विरुद्ध नाही. याउलट, आशीक लष्करी अधिकाऱ्यांच्या जागी आपण असलो, पंचतारांकित हॉटेलच्या आपल्या खोलीत कोणी माषुक पाठवले गेले तर त्या मोहाला बळी पडण्याचे आपण टाळू शकू किंवा नाही याची ग्वाही तो स्वतःच्या मनालाच देऊ शकत नाही. साहजिकच, या विषयावरील त्याची भूमिका उलट्या टोकाची होते.

नोटांची सूटकेस आणि माषुक यांच्यात प्रलोभने म्हणून फरक अंशात्मक आहे; लोकांच्या प्रतिक्रियेत जे 'घूम जाव' होते ते लोकांच्या मनातील सदसद्विवेकबुद्धी अजून थोडीतरी जिवंत आहे या कारणाने.

*दि. १/९/२००१*

■■

# पंतप्रधानांच्या घोषणेतील चार मोठी आव्हाने

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी काश्मीर, पाकिस्तानशी संबंध असे प्रश्न सोडल्यास इतर विषयांवर बोलताना फारशी जहाल भाषा वापरीत नाहीत आणि कार्यक्रमांच्या घोषणाही नेमस्तपणे करतात. राज्यकर्त्या लोकशाही आघाडीत आणि संघपरिवारातील संस्थांत त्यांची नेमस्तपणाची प्रतिमा आहे. ते कसलेले वाक्पटू सांसद असल्यामुळे भाषण करताना ते फारसे हातवारे करीत नाहीत, आवाजात चढउतार करीत नाहीत; इंग्रजी वक्त्यांच्या आदर्शाप्रमाणे, जवळजवळ, त्यांच्या फक्त खालच्या ओठांचीच हालचाल दिसते.

पंतप्रधानांच्या बोलण्याचालण्याच्या शैलीमुळे त्यांच्याविषयी अनेक गैरसमज होतात. वाजपेयीजी आता वृद्ध झाले, प्रकृतीही फारशी साथ देत नाही, पक्षात पर्यायी नेतृत्व तयार झालेले नसल्यामुळे ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीची चोवीस पक्षांची मोट कशीबशी सांभाळत एकएक दिवस मोजीत काढीत आहेत अशी अनेकजण समजूत करून घेतात. पाकिस्तानच्या संबंधांतही, वाजपेयीजी आता महात्मा गांधींसारखीच भूमिका घेत आहेत अशी टीका, ‘गांधीजी मुसलमानांचा अनुनय करीत होते’ असे वर्षानुवर्षे आग्रहाने प्रतिपादणारे एक हिंदुत्ववादी नेते करीत असताना एकदा ऐकायला मिळाले.

गेल्या १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशाच्या एकूण परिस्थितीचा अहवाल पंतप्रधानांनी, अगदी साध्यासरळ पद्धतीने द्यावा तसा, दिला होता. त्यानंतर १५ दिवसांत पंतप्रधान काही तडकाफडकी महत्त्वाची कार्यवाही करतील अशी कोणाची अपेक्षा नव्हती. अनपेक्षित ते पंतप्रधानांनी पुन्हा एकदा करून दाखविले.

दिवस १ सप्टेंबर २००१. सकाळी राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत पंतप्रधानांनी आर्थिक सुधारणांसंबंधी एक कार्यक्रमपत्रिका देशासमोर ठेवली.

देशात १० कलमी कार्यक्रम, १२ कलमी कार्यक्रम, ५ कलमी कार्यक्रम असे अनेक कार्यक्रम मांडले गेले, गाजले आणि विरून गेले. पंतप्रधानांनी मांडलेली १३ सूत्रांची विषयपत्रिका, जर बऱ्यापैकी अंमलबजावणी झाली, तर हिंदुस्थानच्या साऱ्या आर्थिक इतिहासाला एक नवी कलाटणी देऊन जाईल. हा १३ सूत्री कार्यक्रम वाचताना पंतप्रधानांच्या धाडसीपणाचे आणि अर्थकारणातील अभ्यासाचे वारंवार कौतुक वाटत होते.

पंतप्रधानांनी सर्वांत प्रथम शिवधनुष्य पेलले ते सरकारी खर्चाचे. पहिले सूत्र – सरकारी अनुत्पादक व अनावश्यक खर्चाची काटछाट करणे. त्याबरोबर, साऱ्या शासनव्यवस्थेचा पसारा आटोक्यात आणणे, फालतू अनुदानांना काट देणे यांचाही आवर्जून उल्लेख आहे. सगळ्यांत कडी म्हणजे, शासनव्यवस्थेचा लोकांना होणारा जाच, लाल फीत आणि भ्रष्टाचार दूर करणे यांचा उल्लेख शासनप्रमुखाने करावा हे विशेष आहे.

खरे म्हटले तर, सरकारी खर्चाची काटछाट आणि त्याबरोबर करांचा बोजा कमी करणे किंवा सार्वजनिक कर्जांची परतफेड एवढा एकच एकसूत्री कार्यक्रम शासनाने राबविला तरी अर्थव्यवस्थेवर मोठा चांगला परिणाम दिसून येईल.

सरकारी बोंगा सावरण्यापलीकडे आणखी एका प्रश्नाला हात घातला आहे. या प्रश्नाला हात घालण्याची अद्यापपावेतो फारशी हिम्मत कोणी केली नव्हती. समाजवादाच्या काळात नोकरशहा आणि पगारदार यांचे प्रचंड स्तोम माजले होते. सामूहिक वाटाघाटींच्या तत्त्वाचा घोष करावा, मन मानेल त्याप्रमाणे संप करावे आणि आपले तनखे, भत्ते वाढवून घ्यावे आणि त्यापलीकडे जाऊन, कामाच्या जागीचे वातावरण इतके बेशिस्त करून टाकावे, की त्यामुळे उत्पादकता हा विषयच राहू नये.

समाजवादाची सद्दी संपल्यानंतर नोकरदार आणि कामगार यांच्यासंबंधीचे कायदे बदलणे हेही असेच अवघड काम होऊन बसले होते. जो कोणी कामगारविषयक कायदे बदलील त्याला लोकक्षोभाला सामोरे जावे लागेल आणि निवडणुकीत मार खावा लागेल या धास्तीने या विषयाला कोणी हातच लावीत नव्हते. पंतप्रधानांनी याही शिवधनुष्याला प्रत्यंचा चढविण्याचा निर्धार जाहीर केला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारपेठेवर चीनच्या प्रवेशाने जबरदस्त परिणाम झाला आहे. परवापरवापर्यंत कम्युनिस्ट अर्थव्यवस्था असलेला चीन आपली उत्पादकता आणि कार्यक्षमता इतक्या झपाट्याने कशी वाढवू शकला याचे सर्वत्र मोठे कुतूहल आहे. चीनला प्रत्यक्ष भेट देऊन आलेले एक खासदार

सांगत होते, की एका चिनी कामगाराची बरोबरी आपल्याकडचे पाच कामगारसुद्धा करू शकत नाहीत; चीनमधल्या कामगारांची शिस्त हिंदुस्थानातील कारखान्यांत आणण्यासाठी सगळी व्यवस्था आमूलाग्र बदलावी लागेल. आर्थिक सुधारणेच्या एकूण कार्यक्रमातील नोकरशाहीच्या काटछाटीबरोबर कामगारांत शिस्त हा तितकाच महत्त्वाचा विषय आहे.

पंतप्रधानांनी विजेच्या उत्पादनाची पुनर्रचना करण्यावर भर दिला आणि त्याबरोबरच, वित्तीय व्यवस्थेतील वारंवार घडणाऱ्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे हादरला गेलेला सामान्य गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा उभा करण्यासाठी पावले उचलण्याचे जाहीर केले आहे. पंतप्रधानांनी एवढी पाचच कलमे जाहीर केली असती तर त्यांच्या घोषणेचा परिणाम अधिक सज्जड झाला असता. पण, वेगवेगळ्या मंत्रालयांच्या वेगवेगळ्या विचारांचा आणि वेगवेगळ्या राज्यांतील परिस्थितीचा परामर्श घेणे राजकीय दृष्ट्या आवश्यक असावे. त्यामुळे, न्यायव्यवस्थेतील सुधार, अवर्षण व महापूर अशी संकटे टाळण्याकरिता उपाययोजना, लोकसंख्येला आळा घालणे, पंचायत राज्यव्यवस्था सुदृढ करणे इत्यादी कलमेही जोडलेली दिसतात.

शेतकी मंत्रालयाचा पंतप्रधानांच्या दरबारी फारसा दबदबा नाही. त्यामुळे, अन्नधान्यांच्या उत्पादनाच्या वाढीसाठी नवीन व्यूहरचना करणे एवढे एकच कलम त्यांच्या या नवीन कार्यक्रमात शेतीसंबंधी आहे. वर्षानुवर्षांच्या शोषणाने डळमळीत झालेली शेतीव्यवस्था आणि कंगाल झालेला शेतकरी जागतिक व्यापार व जैविक तंत्रज्ञान यांच्या आव्हानांना सामोरा जात आहे. केवळ अन्नधान्याच्या उत्पादनवाढीने शेतीची समस्या सुटण्यास काहीच मदत होणार नाही. वर्षानुवर्षे चाललेल्या शोषणाची भरपाई करून नवीन कालखंडातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पंतप्रधानांना एक स्वतंत्र घोषणा करावी लागेल.

सर्वसाधारण आर्थिक व्यवस्थेसाठी सरकारी यंत्रणेची काटछाट, कामगारविषयक कायद्यांत सुधारणा, ऊर्जेविषयी नवीन धोरण आणि वित्तव्यवस्थेतील आमूलाग्र परिवर्तन एवढी चार प्रचंड आव्हाने एकाच वेळी स्वीकारणाऱ्या पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना शेती समस्यांचे आव्हान स्वीकारणे आणि पेलणे मुश्कील नाही; पण त्यासाठी आवश्यक ती चेतना शेती किंवा त्यासंबंधीच्या डझनावर मंत्रालयांतून येणार नाही; त्यासाठी स्वतः पंतप्रधानांनाच पुढाकार घ्यावा लागेल.

*दि. ८/९/२००१*

■■

# अटल बिहारी वाजपेयींची नवी तरुणाई

गेल्याच आठवड्याच्या लेखात मी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या आर्थिक सुधारणेसंबंधीच्या धाडसी घोषणांचे स्वागत केले होते. 'सत्तरीच्या उतरणीवर लागलेले पंतप्रधान, त्यात गुडघ्याच्या दुखण्याने ठाणबंद झालेले. कशीतरी पंतप्रधानकीची चालू मुदतीची उरलेली दोन वर्षे पुरी करतील आणि पुढील निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि तिचे मित्रपक्ष यांना निवडून येण्यासारखी परिस्थिती निर्माण करतील; एवढे जमले तरी अटल बिहारी वाजपेयींच्या कारकिर्दीचा कळस झाला असे मानावे; यापरते आता काही नवे व्हायचे नाही; वाजपेयीजींचा वारस कोण? अडवाणी का जसवंत सिंग का आणखी कोणी?' अशी चर्चा चालू झाली होती. एका ख्यातनाम इंग्रजी वर्तमानपत्राने 'वाजपेयींनंतर सोनिया गांधींना पर्याय नाही. Sonia Is The Alternative – SITA; धोक्यापोटी अटल बिहारींची कारकीर्द चालू राहील आणि पुढील निवडणूक ते जिंकतील,' अशी मांडणी केली होती.

१ सप्टेंबर २००१ रोजी पंतप्रधानांमध्ये काही नवीन चैतन्याचा संचार झाला. त्या दिवशी सकाळी राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत त्यांनी आर्थिक सुधारणांचा नवा कार्यक्रम जाहीर केला. सरकारी प्रशासनाची काटछाट, मजूरविषयक कायद्यांची फेरतपासणी, वीजउत्पादन आणि इतर संरचनांच्या विकासासाठी धडक कार्यक्रम त्यांनी आपल्या भाषणात मांडला.

त्याच दिवशी संध्याकाळी साडेसहा वाजता अटलजींनी त्यांच्या मंत्रिमंडळाची व्यापक पुनर्रचना केली. खासगीकरण मंत्री अरुण शौरी यांच्यावर विरोधी पक्ष चौफेर हल्ले चढवीत होते. त्यांना राज्यमंत्रिपदापासून मंत्रिपदापर्यंत बढती दिली. समाजवादी तबेल्यातील शरद यादव व पासवान यांना, वरवर दिसायला किरकोळ, पण जिव्हारी लागणारा धक्का दिला. वरवर दिसणाऱ्या राखेखाली वाजपेयींची

धगधगती ओजस्विता शिल्लक असल्याचा प्रत्यय आला. या दर्शनाचे मी स्वागत केले होते. या आठवड्यात, पंतप्रधानांच्या चालीचा अर्थ मी बरोबर लावला होता याची खात्री पटविणाऱ्या, निदान दोन घटना घडल्या.

१ सप्टेंबर रोजी मांडलेल्या आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमाचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला आणि त्याबरोबर, आर्थिक मंदीची लाट थोपविण्याचा, सार्वजनिक गुंतवणुकीचा एक व्यापक आणि महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर केला. खुलीकरणाच्या दिशेने जाताना सार्वजनिक गुंतवणुकीच्या आधाराने गरीबांना आधार, बेकारांना रोजगार आणि अर्थव्यवस्थेकरिता संरचना अशी ही संतुलित आर्थिक आघाडीची मांडणी त्यांनी केली.

समाजवादी तबेल्यातील मंत्रिगणांनी आपल्या अवनतीबद्दल केलेल्या तक्रारी त्यांनी फेटाळून लावल्या. दिल्लीतील भा. ज. प. च्या दोनचार खासदारांनी केलेल्या बंडाचीही थोडक्यात वासलात लावून टाकली.

सगळ्यात मोठा धक्का इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्राला दिलेल्या विशेष मुलाखतीत जाहीर केला.

'आतापर्यंतच्या कारकिर्दीत सरकार पडू नये, राजकीय स्थैर्य राहावे याला आपण प्रमाणाबाहेर महत्त्व दिले' अशी त्यांनी कबुली दिली. मी संपलेलो नाही, स्थैर्याची या काळात आवश्यकताही होती, आता गुडघ्याचे दुखणेही बरे झाले आहे, उरलेल्या दोन वर्षांत काही करून दाखविण्याचा मनोदय असल्याचे त्यांनी या मुलाखतीत जाहीर केले.

ग्रीष्माच्या उन्हाळ्यात थंड वाऱ्याची झुळूक यावी तसे, पंतप्रधानांचे हे निवेदन वाचताना वाटले. भरघोस बहुमताने निवडून येऊन सत्ता हाती आल्यानंतर त्या सत्तेचा चांगला वापर करण्याऐवजी पुढच्या निवडणुकीतही सत्ता कायम कशी राहील या चिंतेचा धोशा घेतल्याने भल्याभल्या राजकारणी नेत्यांचे पानिपत झाले आहे.

बांगलादेशाच्या लढाईनंतर साक्षात दुर्गादेवी मानल्या गेलेल्या इंदिरा गांधींनी पुढच्या निवडणुकीत २०० टक्के खात्री मिळविण्याकरिता जी काही धोरणे आखली त्याने देशाचे आणि अर्थकारणाचे नुकसान झालेच; शिवाय त्यातून आणीबाणी लादण्याची गरज तयार झाली आणि अखेरीस, निवडणुकीत त्यांना जनता पक्षाकडून पराभव पत्करावा लागला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांची तशीच गत झाली. निवडणुकीत जिंकण्याची शाश्वती मिळविण्यासाठी त्यांनी विरोधी पक्षावर टेहळणी करण्याचे कारस्थान

रचले, त्यातून 'वॉटर गेट' प्रकरण निघाले आणि निवडणुकीच्या आधीच राष्ट्राध्यक्षांची हकालपट्टी झाली.

इंदिरा गांधीजींचे सुपुत्र राजीव गांधी यांनातर आईच्या हत्येचा प्रत्यक्ष राजकीय फायदा मिळाला. सर्व उच्चांक मोडणारे बहुमत घेऊन अत्यंत तरुण वयात पंतप्रधानकीचे पद त्यांच्याकडे चालून आले. देशाच्या भल्याकरिता काहीतरी सज्जड करून दाखविण्याची अशी संधी तोपर्यंत कोणाला मिळाली नव्हती, यापुढेही कोणाला मिळण्याची शक्यता दिसत नाही.

दुर्दैवाने, त्यांनी आपल्या शाळकरी दोस्तांचे टोळके जमा केले.

राजीवजींनी कृत्रिम धाग्यांच्या वस्त्रांना उत्तेजन देणारे धोरण आखले, शहाबानोप्रकरणी अल्पसंख्याकांचा अनुनय केला आणि, शेवटी, बोफोर्स प्रकरणात सापडून पाच वर्षांच्या मुदतीत ते निवडणूक साफ हरले.

एकदा निवडून आलेले सत्ताधारी मिळालेल्या मुदतीत काहीतरी करून दाखविण्याचा विडा न उचलता, लोकाराधनेच्या स्वस्त साधनांकडे का वळतात हे मला न उमगलेले कोडे आहे.

महाराष्ट्रात काँग्रेसची सद्दी संपली, भाजपा – शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. त्यानंतर पहिल्या भेटीत त्याचे अभिनंदन केले. कधी काळी पूर्वी शिवाजी पार्कच्या सभेत बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते, "आम्ही शरद जोशींना आमचे मुख्यमंत्री करू!" त्याचा उल्लेख करून सदाविनयशील मनोहरराव म्हणाले, "तुम्ही हे पद नाकारले म्हणून मी मुख्यमंत्री झालो." मी युतीच्या सरकारचे प्रमुखपद स्वीकारण्याची काहीच शक्यता नव्हती; पण, त्याचा उल्लेख मनोहर जोशींनी करावा हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. तितक्याच विनम्र भावाने त्यांनी मला विचारले, "शासन चालविण्याविषयी तुम्ही मला काय सल्ला द्याल?"

मी म्हटले, "प्रत्येक मुद्द्यावर आणि धोरणावर सल्ला देण्याचा अजागळपणा मी करणार नाही; पण, एका वाक्यात सांगतो – देशाकरिता आणि महाराष्ट्राकरिता जे जे करणे योग्य आहे ते करण्याच्या कार्यक्रमाला बेधडकपणे लागा; पुढच्या निवडणुकीचा विचारही करू नका. चांगले काम केले तर लोक त्याला दाद देणार नाहीत असा संशयही मनात आणू नका." मनोहरपंतांना माझा सल्ला पटला असे दिसले; अमलात आणणे शक्य झाले नसावे. परिणामी, आता पुन्हा युतीचा पराभव झाला.

अटल बिहारी वाजपेयी या वेळी पंतप्रधान झाले त्यानंतर लगेचच त्यांनी

घोषणा करून टाकली होती, ''माझी ही पंतप्रधानकीची शेवटची पाळी आहे.'' त्याही वेळी त्यांच्या त्या निवेदनाने आनंद वाटला होता. तीन वर्षांच्या अवधीत वाजपेयीजींना आपण राजकीय स्थैर्याला अवास्तव महत्त्व दिले असा कबुलीजवाब देण्याची वेळ आली. हे का घडले याचा काही तपशील वाजपेयीजींनी मनमोकळेपणाने जाहीर केला तर युतीच्या राजकारणाच्या सध्याच्या राजकीय अस्थिरतेच्या वातावरणात त्यांच्या राजकीय वारसदारांना त्याचा मोठा फायदा होईल.

सत्तेचे आपले असे एक व्याकरण असते. सत्तेच्या पदावर कोणी, फारशी कोरी पाटी घेऊन पोहोचू शकूच नये अशी साऱ्या सामाजिक-राजकीय-आर्थिक व्यवस्थेत काही रचना असते. सत्ता मिळविण्याच्या प्रयत्नांतच तडजोडी करीत करीतच हातपाय बांधलेल्या एका तडफदार नेत्याचे गाठोडे सत्तास्थानी येऊन पडते. त्यानंतर, सत्तासंपादनाच्या प्रयत्नांत अंगावर चढलेली पुटे आणि बंधने झटकून काढून टाकण्याचे धाडस क्वचितच कोणाला होते. उलट, पावलोपावली, 'खुर्ची टिकली तर पुढची सारी बात' अशी मनाची समजूत करीत करीत भलेभले अध:पाताच्या मार्गाला लागतात.

अटल बिहारी वाजपेयी, त्यांच्या कारकिर्दीची शेवटची दोन वर्षे राहिली असताना खडबडून जागे झाले आणि आपली विचारधारा स्पष्ट करण्याइतकी आणि मोहीम उघडणाऱ्या संघपरिवारातील बड्या प्रस्थांनाही तंबी देण्याची हिंमत त्यांनी दाखविली हे देशाच्या दृष्टीने मोठे शुभचिन्ह आहे.

*दि. १५/९/२००१*

■■

# घातपाती आणि घायकुती

छप्पन वर्षांपूर्वी दुसऱ्या महायुद्धाचे लांबत चाललेले शेपूट झटकन संपविण्याकरिता अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी हिरोशिमा आणि नागासाकी या जपानी शहरांवर अणुबाँबचा हल्ला करण्याचा आदेश दिला. बाँबहल्ला झाला आणि अणुशक्तीच्या प्रचंड उत्पाताने सारे जग विस्मित आणि भयभीत होऊन गेले. माणसाच्या हाती एवढे संहारक हत्यार आले म्हणजे आता जगाचा विनाश अटळ आहे आणि फारसा दूर नाही अशी धास्ती जगभरच्या सामान्य माणसांनाही वाटू लागली. जगामधील तंटे, वादविवाद त्या काळापर्यंत चर्चेने, वाटाघाटींनी सोडवण्याचा प्रयत्न केला जाई; ते नच जमले तर आर्थिक हत्यारे वापरून प्रतिपक्षास जेर करण्याचा प्रयत्न होई. तेही जमले नाही तर अखेरचा पर्याय म्हणून सशस्त्र लढाईचा मार्ग चोखाळला जाई. दारूगोळ्याचा शोध लागेपर्यंत तलवारी– धनुष्यबाणांच्या लढाया, लढणाऱ्या सैनिकांच्या यातनांनी मोजमाप केले तर, सर्वांत भयानक होत्या. ज्या काळी शस्त्रक्रियेचे शास्त्र आणि तंत्र अगदीच मागासलेले होते, भूल देण्याचे तंत्रही अवगत नव्हते, प्रतिजैविकांचा (Anti-biotics) शोध लागला नव्हता अशा काळात जखमी झालेल्या सैनिकांना काय वेदना सोसाव्या लागत असतील याची कल्पनाही करणे कठीण आहे. दारूगोळ्याचा वापर होऊ लागला त्यामुळे जखमी सैनिकांच्या वेदना कमी झाल्या, पण युद्धात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या भूमितीश्रेणीने वाढली.

जपानवर अणुबाँब पडण्याच्या आधी रणगाडे वापरले जात होते, विमानांतून बाँबवर्षाव होत होता, युद्धात देशच्या देश बेचिराख होत होते, हजारोंनी माणसे मरत होती; पण युद्धामुळे साऱ्या पृथ्वीचाच विनाश ओढवू शकेल अशी काही परिस्थिती नव्हती. हिरोशिमावरील अणुबाँबच्या हल्ल्याने माणसामाणसातील आणि देशादेशातील तंटेबखेडे कसे सोडवायचे यासंबंधीच्या साऱ्या विचारांना

एक नवी कलाटणी मिळाली.

अणुबाँबच्या प्रचंड संहारक शक्तीमुळे अमेरिका व रशिया या महासत्तांनीसुद्धा समग्र युद्धाची शक्यता टाळली आणि कडेलोटच झाला तर, कोरिया, व्हिएतनाम यांसारख्या मर्यादित युद्धांपलीकडे मजल जाऊ दिली नाही. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या साऱ्या लढाया अण्वस्त्रे हाती असूनसुद्धा पारंपरिक शस्त्रास्त्रांनीच लढल्या गेल्या. दोन्ही महासत्तांच्या हाती सारे जग हजार वेळा उद्ध्वस्त करण्याची ताकद असूनही त्यांच्या नेत्यांनी वेळोवेळी सुज्ञपणा दाखवला आणि प्रलय टाळला. समाजवादी रशिया बुडाला; तरीदेखील आपल्याबरोबर जगही बुडविण्याची बुद्धी कम्युनिस्ट नेत्यांनीसुद्धा दाखविली नाही.

अणुशक्तीच्या धाकाने जगात शांती नांदण्याच्या या परिस्थितीचे काही महत्त्वाचे परिणाम झाले.

पहिला परिणाम म्हणजे अणुशक्ती वापरण्याकरिता लागणारा सुज्ञपणा ज्यांच्याकडे नाही त्यांच्या हाती अणुशक्ती जाऊ नये असे प्रयत्न अणुशक्तिधारी महासत्तांनी चालविले; तथापी अनेक छोट्यामोठ्या देशांनी अणुबाँबस्फोटासाठी लागणारी तांत्रिक आणि आर्थिक क्षमता तयार केली.

वाटाघाटी किंवा चर्चा यांचे गुऱ्हाळ संयुक्त राष्ट्रसंघात किंवा इतरत्र वाटेल तितके लांबत ठेवता येते आणि निर्णायक युद्ध होऊच शकत नाही अशा कोंडीच्या परिस्थितीत जागोजागी असंतुष्ट समाजात आतंकवादाचा उगम १९७० सालानंतर झाला. विमाने पळविणे, बाँबस्फोट घडवून आणणे आणि टपालाने स्फोटके पाठविणे आणि मानवी बाँब अशी वेगळीवेगळी साधने अतिरेकी चळवळीने वापरण्यास सुरुवात केली. मादक द्रव्यांच्या जागतिक व्यापाराचा या अतिरेक्यांना चांगला आधार मिळाला.

काही देशांच्या राज्यकर्त्यांनी राष्ट्रीय सशस्त्र दलांचा वापर करण्याऐवजी या अतिरेकी टोळ्यांचाच वापर राष्ट्रीय उद्दिष्टांसाठी किंवा निदान शत्रूस जेरीस आणण्याकरिता केला.

हिरोशिमावरील अणुस्फोटानंतर ११ सप्टेंबर २००१ रोजी इतिहासात एक अशी घटना घडली, की ज्यामुळे माणसामाणसातील आणि देशादेशातील तंटे कसे सोडवावे या विषयावरील सर्व विचार आमूलाग्र तपासून पाहण्याची गरज तयार झाली.

अणुबाँबची संहारक शक्ती पाचदहा देशांपेक्षा जास्त देशांकडे जाण्याची शक्यता नाही. अणुबाँबचे तंत्रज्ञान हस्तगत झाले तरी शस्त्र म्हणून वापरण्याच्या

पद्धतीचा बॉंब तयार करणे हे मोठे महागडे काम आहे. शत्रूवर अणुबॉंबचा वर्षाव करण्याकरिता लागणारी विमाने, क्षेपणास्त्रे किंवा गुप्तहेरांची जाळी फारच थोड्या राष्ट्रांच्या आवाक्यातली आहेत.

गेल्या ११ सप्टेंबर रोजी एका नवीन हत्याराचा जन्म झाला. त्याकरिता काही संशोधन लागले नाही, फारसा खर्चही आला नाही; पण परिणामी होणारा विध्वंस, महत्त्वाच्या उद्दिष्टांपुरता, अणुबॉंबइतकाच विध्वंसक; पण त्यातून प्रलयाचा फारसा संभव नाही. हे हत्यार वापरण्याकरिता फौजांचीही आवश्यकता नाही.

१९७० सालापासून विमानांच्या चाचेगिरीचे शास्त्र अतिरेक्यांनी चांगलेच अंगी बाणले आहे. विमानतळावरील सुरक्षा व्यवस्थेस झुकांडी देऊन शत्रुराष्ट्राच्या नागरी विमानात प्रवेश मिळवायचा, विमानाने उड्डाण केले म्हणजे हाती असलेल्या किंवा नसलेल्या शस्त्रांचा धाक दाखवून आपल्याला सोयीस्कर विमानतळावर विमान उतरवून घ्यायचे, प्रवाशांना ओलीस धरून अतिरेक्यांनी आपल्या मागण्या मनवून घ्यायच्या, खंडणी पदरात पाडून घ्यायची आणि स्वत:चीही सुटका करून घ्यायची असे हे साधे; पण भयानक तंत्र. काही प्रसंगी प्रत्यक्षात विमाने पेटवून देण्यात आली. प्रवासी हताहत झाले. प्रवाशांनी त्याचीही सवय करून घेतली. विमानप्रवास आणि वाहतूक कमी होण्याऐवजी भूमिती श्रेणीने वाढत गेले. टोलेजंग आकाराची विमाने इंधनाचा प्रचंड साठा घेऊन शेकडो प्रवाशांसह जगभरच्या आकाशात फिरू लागली.

११ सप्टेंबर २००१ रोजी विमानाच्या चाचेगिरीच्याच तंत्राचा एक नवा अध्याय सुरू झाला, ज्याने जगाचा इतिहास बदलणार आहे. नव्या हत्याराचे तंत्र सोपे आहे. विमानाच्या चाच्यांनी आपला जीव वाचविण्याची कल्पना सोडून द्यायची आणि भरले विमान ताब्यात घेऊन ते शत्रूचे सर्वाधिक नुकसान होईल अशा जागी नेऊन आपटायचे. ११ सप्टेंबर रोजी एकाच दिवशी, एकाच तासात चार जंगी विमाने पळविली गेली; त्यांतील दोन न्यूयॉर्क शहरातील मॅनहॅटनच्या, जगातील सर्वात उंच, जागतिक व्यापार केंद्राच्या दोन मनोऱ्यांवर जाऊन आदळली. त्यामुळे झालेल्या आगडोंबाची उष्णता इतकी मोठी, की इमारतीतील सिमेंटच्या बांधकामातील लोखंडी गज वाकून दोन्ही मनोरे कोसळले. हल्ल्याच्या वेळी तेथे पन्नास हजारावर माणसे काम करीत होती. किती जगली, किती दगावली याचा हिशेब आजही लागलेला नाही. हे मनोरे म्हणजे अमेरिकेतील वित्तीय कारभाराचे आणि माहिती व्यवस्थेचे प्रतीक आणि केंद्रस्थान होते. फक्त बारा लोकांनी

हौतात्म्य पत्करून अमेरिकन राष्ट्रावर असा मर्मस्थानी प्रहार केला, की मागील दोनही महायुद्धांत कधी अनुभवास न आलेला विध्वंस अमेरिकेस सोसावा लागला.

तिसरे एक विमान तर अमेरिकन सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यालयाच्या जगप्रसिद्ध पंचकोनी 'पेंटॅगॉन' इमारतीवर जाऊन आदळले.

जगभरात वेगवेगळ्या देशांत असंतुष्ट आत्मे आणि समाज अनेक आहेत. आपल्यावर असहनीय अन्याय होत आहे आणि तो दूर करण्याकरिता, आवश्यक तर प्राण पणाला लावण्याची तयारी शंभर-दोनशेतरी तरुणांत असणारे अनेक समाज आहेत. असे समाज अतिरेकी हत्याकांडाचे साधन गेली ३० वर्षेतरी वेगवेगळ्या पद्धतींनी वापरीत आहेत. आपल्या देशातही पंजाब, ईशान्य प्रदेश, काश्मीर येथील आतंकवादी आणि नक्षलवादी यांच्या अतिरेकी कारवायांचा अनुभव आला आहे. असंतोषाच्या या प्रदेशात विमाने पळविण्याचे प्रकार वारंवार घडले आहेत. विमानाच्या चाचेगिरीस कधीमधी मान्यवर राजकीय पक्षांनीही पाठिंबा दिला आहे; पण विमानाची चाचेगिरी म्हणजे केवळ खंडणी गोळा करण्याचे आणि काही साथीदारांची सुटका करून घेण्याचे साधन न राहता आक्रमक लढाईचे हत्यार म्हणून वापरले गेले तर काय हाहा:कार माजेल याच्या कल्पनेनेच थरकाप होतो.

अतिरेक्यांनी हे नवीन हत्यार हाती घेतले आहे आणि तेदेखील अमेरिकेसारख्या आर्थिक आणि लष्करी महासत्तेविरुद्ध. तेव्हा या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून काहीतरी करणे अमेरिकेतील आणि जगातील इतर राज्यकर्त्यांना आवश्यकच होते.

११ सप्टेंबरनंतर सशस्त्र दलांची आयुधांची मक्तेदारी संपुष्टात आली आहे. एके काळी सर्वसामान्य माणसाच्या हाती आणि घरी हत्यारे असत. आवश्यकतेप्रमाणे तो ती स्वसंरक्षणार्थ वापरू शकत असे. तशीच परिस्थिती पुन्हा तयार होत आहे. पारंपरिक शस्त्रे आणि अण्वस्त्रे किचकट आणि महागडी म्हणून कालबाह्य ठरत आहेत. शस्त्रास्त्रांचे खासगीकरण झाले आहे आणि जिवाच्या निर्धाराने निघालेला कोणीही थोड्याफार तयारीने प्रचंड उत्पात घडवून आणू शकतो अशी परिस्थिती तयार होत आहे.

शस्त्रास्त्रांची आपली मक्तेदारी संपुष्टात येत आहे हे पाहता जगभरच्या सरकारांनी आतंकवादाविरुद्ध गिल्ला करावा हे समजण्यासारखे आहे. गेली काही दशके ज्यांनी आतंकवादाचा अप्रच्छन्न आणि छुपा वापर केला तीही

मंडळी, आपण त्या गावचेच नाही असा संभावितपणाचा आव आणून, आपला आतंकवादाला विरोध अहमहमिकेने गर्जून सांगत आहेत. पाकिस्तानदेखील आपण सतत अतिरेक्यांना विरोध केला आहे असे गर्जून सांगू लागला, तर भारताला तर आतंकवादाच्या विरोधातील आपले प्रयत्न सफल होण्याची संधीच चालून आली आहे असे वाटावे यात काय आश्चर्य?

मॅनहॅटनमधील जागतिक व्यापार केंद्राचे मनोरे कोसळले, पेंटॅगॉनवर हल्ला झाला. ही घातपाती कृत्ये करणाऱ्यांना जबर शिक्षा करण्याच्या घोषणा झाल्या. पण, हा घातपात नेमका घडवला कोणी याबाबत फारशी स्पष्टता नाही. अफगाणिस्तानात मुक्काम ठोकून असलेल्या ओसामा बिन लादेन याच्याबद्दल अमेरिकन नेते आणि लोक यांच्या मनात अनेक वर्षे पराकोटीचा दुस्वास आहे. सहा वर्षांपूर्वी ओक्लहामा येथील विस्फोटानंतर हे लादेनचेच कृत्य असल्याचे घोषित झाले; नंतर मात्र, घातपाताचे सारेच प्रकरण 'स्वदेशी' असल्याचे निष्पन्न झाले. या वेळीही, ११ सप्टेंबरच्या हल्ल्यात आपला काही हात नाही असा निर्वाळा साऱ्या पॅलेस्टिनी घातपाती संघटनांनी दिला, लादेन यानेही दिला. एवढ्या प्रचंड कर्तृत्वाचे जनकत्व ज्या नेत्याने विश्वामित्री पवित्र्याने नाकारले. जपानमधील 'लाल सैन्या'ने हा घातपात आपण घडवून आणला असल्याची घोषणा केली, तिकडे कोणी लक्ष दिले नाही. साक्षीपुरावा फारसा न पाहता लादेन हाच गुन्हेगार असल्याचे अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी जाहीर करून टाकले. अफगाणिस्तानवर हल्ला करण्याची सर्व तयारी झपाट्याने होत आहे आणि परवापरवापर्यंत ज्या पाकिस्तानला आतंकवादी राष्ट्र म्हणून जाहीर करण्याची मागणी होत होती, त्या पाकिस्तानलाच आतंकवादविरोधाच्या चढाईत अग्रमानाच्या दोस्ताचे स्थान मिळाले आहे.

या हल्ल्याबद्दल हिंदुस्थानात सर्वसाधारणपणे संतोषाची भावना आहे. मुसलमानी वर्चस्वाचे पारिपत्य आपल्या हातून होत नाही, तर परस्पर अमेरिकेसारख्या महासत्तेकडून ते होत आहे याचे एक नपुंसक समाधान हिंदुत्ववाद्यांना वाटत आहे.

अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी अफगाणिस्तानवर हल्ला करण्याचा निर्णय आधीच केलेला आहे. 'चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा (Barking up the wrong tree) तर हा प्रकार नाही ना?' असे विचारल्यावर, 'आम्ही पुष्कळ संन्यासी धरले आहेत,' हे उत्तर शाब्दिक कोटी म्हणून ठीक आहे; पण त्याचा अर्थ महागंभीर आहे. पहिल्यांदा अमेरिका ठरवेल त्या देशावर हल्ला करायचा; सारा

विध्वंस झाल्यानंतर मग साक्षीपुरावा तपासायला लागायचे या पद्धतीने धाक (Gunboat Diplomacy) बसविण्याचे उद्दिष्ट साध्य होईल, पण हिरोशिमाच्या अणुस्फोटानंतर गेली ५६ वर्षे जिवाच्या आकांताने तंटणाऱ्या देशांनी आणि पुढाऱ्यांनी जो सुज्ञ मुत्सद्दीपणा दाखविला त्याचा या नवीन कालखंडात उंबरठ्यावरच बळी पडतो आहे. विमान नेऊन आदळण्याचे प्रकार यापुढेही होणार आहेत. प्रत्येक वेळी जर पोलिसी खाक्याने कारभार सुरू झाला तर जगाचे भवितव्य मोठे धोक्यात आहे.

बिन लादेन याला विनाचौकशी दोषी ठरविण्यात इस्रायल आणि इतर मुसलमानविरोधी तत्त्वांनी चालविलेल्या प्रचाराच्या धोशाचा मोठा भाग आहे. वैमानिकांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची आपली क्षमता नाही हे लादेन आणि तालीबान यांनी आवर्जून सांगितले आहे. आजच्या क्षणी असा घातपात घडविण्यात मुसलमान मूलतत्त्ववाद्यांना काही खास स्वारस्य दिसत नाही.

याउलट, जपानी 'लाल सैन्या'कडे अशा घातपातासाठी लागणारी क्षमता पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे; ५६ वर्षे उलटून गेली तरी दर वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात जपानमध्ये हिरोशिमा-नागासाकीवरील अणुबाँबच्या प्रसंगामुळे झालेल्या जखमा भळभळून येतात. या गोष्टी लक्षात घेता संशयाचा काटा फक्त अफगाणिस्तानकडेच झुकण्याचे काहीच कारण नव्हते.

आतंकवादाच्या या नव्या अध्यायात सर्वांत नवीन आतंकवादी गटाकडे कोणाचेच लक्ष गेलेले नाही. जागतिकीकरणाला विरोध करणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांनी सिएटलपासून ते जिनोआपर्यंत चढत्या श्रेणीने धुडगूस घालण्याची क्षमता दाखवून दिली आहे. हिंसाचाराचे त्यांना वावडे नाही. माहितीतंत्रज्ञानाचा उपयोग करून त्यांनी जगभर जे संघटनेचे जाळे विणले आहे त्याचा वापर ११ सप्टेंबरच्या घातपातासारखा प्रकार घडवून आणण्यासाठी शक्य आहे. दोहा येथील आगामी वाटाघाटींस अपशकून करण्यासाठी या नव्या आतंकवाद्यांना काहीतरी मोठा उत्पात करून दाखविण्याची गरज वाटत होती. जागतिक व्यापार संस्थेला विरोध करणाऱ्या या अतिरेकी संघटनांनी जागतिक व्यापार केंद्राच्या मनोऱ्यांनाच आपल्या हल्ल्याचे उद्दिष्ट ठरविले असेल तर तेदेखील मोठे सूचक आहे. या मनोऱ्यांवर हल्ला करून हल्लेखोरांनी आपली निशाणीच हल्ल्याच्या जागी ठेवली आहे. आश्चर्य म्हणजे सिएटल-आतंकवाद्यांबद्दल संशय कोणी बोलूनही दाखविला नाही.

तालिबानने गेली कित्येक वर्षे रशियाच्या अफगाणिस्तानातील आक्रमणास

नाकाम ठरवले, यामुळे अनेक तथाकथित प्रागतिकांचा त्यांच्यावर रोष आहेच. अलीकडे बुद्धाच्या मूर्ती पाडण्याचे रानवट काम तालिबानने, कोणाचीही पर्वा न करता, पुरे केले याबद्दलही त्यांच्यावर राग आहे. 'विनाश काले' सर्व रावणदुर्योधनांना स्त्रीजातीची छेड काढण्याची दुर्बुद्धी होते; तसेच तालिबानने स्त्रियांना गोशात ढकलून त्यांच्यावर जाचक निर्बंध लादण्याचा जो कार्यक्रम चालविला आहे, त्यामुळेही असेल.

मॅनहॅटनमधील मनोरे कोसळताना हा घातपात कोणी केला यासंबंधी जवळजवळ सगळ्यांची मनोमन खात्रीच पटली. अफगाणिस्तानात काय व्हायचे ते होवो, लादेन यालाही काय शिक्षा व्हायची ती होवो; ११ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या इतिहासातील नव्या कालखंडात जागतिक स्तरावर सुबुद्ध न्यायव्यवस्था तयार झाली नाही तर पळवलेल्या विमानाचे हत्यार अण्वस्त्रापेक्षाही जगाच्या भवितव्यासाठी घातक ठरेल.

■■

# लादेन विरुद्ध दाऊद इब्राहीम

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेत सकाळी नऊ वाजण्याच्या आसपास मॅनहॅटनमधील, जागतिक व्यापार केंद्राच्या दोन मनोऱ्यांवर चाच्यांनी पळविलेली दोन वेगळी वेगळी विमाने आदळण्यात आली. माहिती आणि संचार तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे हिंदुस्थानातही अनेकांना CNN वाहिनीवर दुसरे विमान प्रत्यक्ष आदळतानाचे दृश्य पाहायला मिळाले; काही वेळानंतर, एकामागोमाग एक दोनही मनोरे उभेच्या उभे खचतानादेखील पाहता आले. साऱ्या अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आणि मानबिंदू असलेल्या या ठिकाणी हल्ल्याच्या वेळी पन्नास हजारांवर माणसे काम करीत असण्याचा अंदाज वर्तविण्यात आला; तेव्हा आतंकवाद्यांचा हा हल्ला किती भयानक होता या जाणिवेनेच सारे शहारून गेले. मृतांकरिता, साहजिकच, सर्वांच्याच मनात दु:ख आणि त्यांच्या संबंधींकरिता सहानुभूती उफाळून आली. 'पर्ल हार्बर'शी तुलना करण्यासारखा हा हल्ला अमेरिकेच्या मर्मस्थानी झाला, तेव्हा आता अतिरेक्यांचे पारिपत्य केल्याखेरीज अमेरिकेसारखी महासत्ता राहणार नाही हीही जाणीव सर्वांना झाली.

भारतातील जाणत्या नेत्यांना आणि जनसामान्यांनाही, एवढ्या भीषण परिस्थितीतही थोडे दु:खात सुख वाटले. ही प्रतिक्रिया मोठी विशेष होती.

हिंदुस्थानात अतिरेक्यांनी कित्येक वर्षे थैमान घातले आहे. ईशान्येकडील प्रदेशात तेथील आदिवासी परकीय धर्माच्या आणि राजसत्तांच्या पाठिंब्याने कित्येक दशके हैदोस घालीत आहेत. पंजाबमधील खलिस्तानवादी अतिरेकी वर्षानुवर्षे हत्याकांड चालवीत होते. पंजाब सीमेवरील पाकिस्तानची सरहद्द मजबूत करण्यात आली, त्यानंतरच खलिस्तानवादी अतिरेक्यांचा बीमोड करता आला. जम्मू आणि काश्मीरमध्ये आजही अतिरेक्यांचा धुमाकुळ चालू असल्याच्या बातम्या दररोज येत असतात. तेथेतर काश्मिरी अतिरेकी नाहीतच; सारे अतिरेकी पाकिस्तानी,

तालिबानी किंवा पाकिस्तानप्रेरित किंवा प्रेषित आहेत असा प्रचार सर्व माध्यमांतून निनादत असतो. हिंदू अतिरेक्यांनी बाबरी मशिद पाडली आणि त्यानंतर मुंबईत नियोजितपणे बॉम्बस्फोट झाले. त्यात शेकडो निरपराध नागरिक प्राणास मुकले. या बॉम्बस्फोटांचा नियोजक दाऊद इब्राहीम हिंदुस्थानतून निसटून गेला. कोणी म्हणतात तो दुबईत राहत असे आणि तेथून हिंदुस्थानातील अर्थकारण, चित्रपटसृष्टी आणि राजकारण यांचे खेळ खेळत असे. अलीकडे तो पाकिस्तानात स्थायिक झाला आहे अशी बातमी होती. त्याला हिंदुस्थानच्या हवाली करावे अशी मागणी, आग्रा शिखर परिषदेच्या वेळी, पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष मुशर्रफ यांच्याकडे केली. पण, मुशर्रफ यांनी सपशेल कानावर हात ठेवले. दाऊद पाकिस्तानात नाहीच असे त्यांनी निक्षून सांगितले. त्यानंतर काही दिवसांतच एका पाकिस्तानी वृत्तपत्राने दाऊदच्या पाकिस्तानातील निवासाचा आणि कार्यालयाचा तपशील देऊन तो तेथे काय राजेशाही थाटात राहतो याचे रसभरित वर्णनही दिले.

या सगळ्या प्रकारांमुळे, हिंदुस्थान हा आतंकवादाने पिडलेला देश आहे अशी सर्व देशवासीयांची बालंबाल खात्री पटली आहे. तामिळी वाघ हिंदुस्थानच्या आधाराने श्रीलंकेत काय धुमाकूळ घालीत आहेत याचा बहुतेक हिंदुस्थानींना, आतंकवादाचा विषय निघाला म्हणजे सोयीस्कर विसर पडतो.

पाकिस्तानला आतंकवादी देश म्हणून घोषित करावे यासाठी हिंदुस्थान अनेक वर्षे प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांत थोडासा दिलासा वाटेल अशी निवेदने अमेरिकन शासनाच्या काही नेत्यांनी केली; पण, उघडउघड 'आतंकवादी' असा शिक्का पाकिस्तानवर ११ सप्टेंबरपर्यंत मारण्यात आला नव्हता. आम्ही इतकी वर्षे ज्या घातपाती कारवायांमुळे त्रस्त झालो आहोत त्याचा अनुभव आता खुद्द अमेरिकेसारख्या महासत्तेला आला. आता या विषयावर 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति' अशी ढिलीढाली भूमिका घेऊन चालणार नाही. आतंकवादाला सगळ्यांत जास्त विरोध करणाऱ्या, संयुक्त राष्ट्रसंघात त्यासंबंधी वारंवार प्रस्ताव आणणाऱ्या हिंदुस्थानचे आंतरराष्ट्रीय अतिरेक्यांच्या विरोधात कोणत्याही कारवाईत बिनीचे स्थान असायला पाहिजे आणि असणार अशी सर्व भारतीयांची खात्री होती. या नव्या संघर्षात अमेरिका आणि हिंदुस्थान यांच्या नेतृत्वाखाली अतिरेक्यांविरुद्ध – हिंदुत्ववाद्यांच्या लेखी मुसलमान देशांविरुद्ध – प्रचंड संघर्ष छेडला जाईल आणि अमेरिकेच्या मदतीने हिंदूंच्या ऐतिहासिक शत्रूंचा नि:पात होईल अशी शेख महंमदी स्वप्ने हिंदुत्ववादी पाहू लागले.

या लोकांचा 'नोस्ट्राडॅमसची भाकीते' हा मोठा आवडता संदर्भग्रंथ आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला प्रचंड धर्मयुद्ध होऊन त्यात हिंदूंची पताका जगभर मिरवणार आहे असा नोस्ट्राडॅमसच्या भाकिताचा सोयीस्कर अर्थ काही लावतात. ११ सप्टेंबरला मॅनहॅटनमध्ये मनोरे कोसळले आणि हिंदूदिग्विजयाचा कालखंड सुरू झाला, आता पाकिस्तानला कोणी विचारणार नाही; आता अमेरिका आणि हिंदुस्थान प्रमुख दोस्त राष्ट्रे बनतील अशी त्यांना खात्री वाटत होती.

प्रत्यक्षात घडले ते काही विपरीतच. अमेरिकेने ओसामा बिन लादेन आणि त्याची संघटना यांच्यावरच आपल्या प्रतिक्रियेचा रोख वळवला आणि आपली आघाडी मुसलमान देशांविरुद्ध नाही असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी, अगदी अल्लाचे नाव घेऊन सांगितले. लादेन अफगाणीस्तानात लपून आहे, त्याला बिळातून बाहेर काढण्यासाठी अफगाणिस्तानवर व्यापक मोहीम बांधली जाऊ लागली. अफगाणिस्तानवर खुष्कीच्या मार्गाने हल्ला करायचा तर सरहद्दीवर असलेले प्रदेश – कझागीस्तान, इराण, पाकिस्तान यांचीच मदत घ्यावी लागणार. लष्करी तळाकरिताच नव्हे तर वायुदळाच्या हल्ल्याकरिता या शेजारच्या देशांत तळ असणे लष्करी हालचालींच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

अफगाणीस्तानातील तालिबान राज्यकर्ते इतिहासात अवतरले ते सोव्हिएत युनियनने अफगाणीस्तानवर केलेल्या हल्ल्याचा विरोध करण्यासाठी. तालिबानला सर्व प्रकारची मदत पाकिस्तानमार्फत अमेरिकेने पुरविली होती. आजही इतर कोणत्याही देशापेक्षा तालिबानचे संबंध पाकिस्तानशीच घनिष्ट आहेत. अफगाणीस्तानवर हल्ला होणार अशी लक्षणे दिसताच लक्षावधी अफगाणी सरहद्द ओलांडून क्वेट्टा आणि पेशावर येथे दाखल झाले. अफगाणीस्तानविरुद्धच्या मोहिमेत अमेरिका व नाटो देश यांच्या खालोखाल सर्वांत जास्त महत्त्व पाकिस्तानला मिळाले.

अमेरिका–हिंदुस्थान दोस्तीची स्वप्ने पाहाणाऱ्या भारतीय नेत्यांनी आपणहून सर्व प्रकारची लष्करी मदत – तळ, गुप्तहेरी माहिती– देऊ केली, तिच्याकडे फारसे कोणी लक्षही दिले नाही. उलटपक्षी ही कठीण परिस्थिती हाताळण्यात पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष मुशर्रफ चांगलीच वाकबगारी दाखवीत आहेत.

आग्रा शिखर संमेलनापर्यंत आंतरराष्ट्रीय आतंकवादाविषयी चर्चासुद्धा करायला तयार नसणारे राष्ट्र एका रात्रीत पाकिस्तानच आंतरराष्ट्रीय आतंकवादाचा शिकार झाल्याची बतावणी करू लागले आणि त्याने अतिरेक्यांच्या बीमोडाच्या आंतरराष्ट्रीय मोहिमेस आपला सर्वतोपरी पाठिंबा असल्याचे जाहीर करून टाकले. मोबदल्यात

अमेरिकेने काश्मीर प्रश्नात काही हस्तक्षेप करावा अशा अटी घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला; पण त्याला फळं येण्याची काही शक्यता न दिसल्याने अटींचा आग्रह धरला नाही. उत्तर पाकिस्तानात तालिबानचा संपर्क आलेल्या पाकिस्तानच्या जनतेत लादेनबद्दल एक मोठे तेजोवलय आहे; हा एकटा 'खुदा का बंदा' अमेरिकेसारख्या महासत्तेला 'त्राहि भगवन' करून टाकतो याबद्दल एक बढाईखोर कौतुकही आहे. पाकिस्तानने अमेरिकेला मदत केली तर तालिबान आक्रमणाला तोंड द्यावे लागेल या धमकीकडे पाकिस्तान राष्ट्राध्यक्षांनी दुर्लक्ष केले. देशभर मुस्लिम कठमुल्लांनी हिंसक निदर्शने घडवून आणली, त्यालाही पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांनी भीक घातली नाही. अमेरिकेला मदत करण्याखेरीज दुसरा व्यावहारिक पर्याय नाही हे त्यांनी अचूक ओळखले. जुनी सारी आतंकवादाने गिचमिडलेली पाटी साफ पुसून मोठ्या संभावितपणाचा आव आणून पाकिस्तान भद्र राष्ट्रांच्या बरोबरीने उजळ माथ्याने मिरविण्याची धडपड करीत आहे.

पाकिस्तानचा जन्मच आतंकवादाच्या पापात आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाची अहिंसक लढाई चालू असताना बॅरिस्टर महंमद अली जीना यांनी 'डायरेक्ट ॲक्शन'चा आदेश दिला आणि कोलकत्त्यापासून कराचीपर्यंत भोसकाभोसकी, जाळपोळ, बलात्कार यांचे थैमान सुरू झाले. १९४७ नंतरचाही पाकिस्तानचा इतिहास अशा घातपाती कृत्यांनी चितारलेला आहे. जगासमोर पाकिस्तानचे हे ढोंग 'बेनकाब' करण्यात हिंदुस्थानी मुत्सद्द्यांना प्रचंड अपयश आले आहे. अमेरिका पकिस्तानच्या मदतीने अफगाणिस्तानच्या मोहिमा आखीत असताना पाकिस्तानातील अंतर्गत दुफळीचा फायदा घेण्याचा हिंदुस्थानचा इरादा नाही असा निर्वाळा परराष्ट्रमंत्र्यांनी जाहीररीत्या देऊन टाकला.

'११ सप्टेंबरच्या मॅनहॅटन व पेंटॅगॉन हल्ल्याची तुलना मुबईतील बॉम्बस्फोट मालिकेशी करून ११ सप्टेंबरच्या घातपाताचा कर्ता जसा बिन लादेन तसाच मुंबईतील बॉम्बस्फोटांचा कर्ता दाऊद इब्राहिम; लादेन अफगाणिस्तानात लपला आहे म्हणून अमेरिका अफगाणिस्तानवर आक्रमण करू इच्छीत असली तर त्याच न्यायाने दाऊद इब्राहिमला पकडण्यासाठी पाकिस्तानवर मोहीम करणेही आवश्यक आहे,' हा मुद्दा हिंदुस्थानी मुत्सद्द्यांनी फारसा उठविलाही नाही. हिंदुस्थानी मुत्सद्द्यांचे सारे डोळे जम्मू आणि काश्मीर प्रकरणी पाकिस्तानला आतंकवादी देश म्हणून ठरविण्याकडे इतके लागले आहेत, की इतर कोणत्याही शक्यतांकडे ते फारसे ढुंकून पाहत नाहीत.

जम्मू-काश्मीर प्रकरणी इतिहास काहीही असला तरी शेवटचा निर्णय तेथील

जनतेच्या इच्छेला अनुसरून झाला पाहिजे अशी इच्छा अमेरिकेने व्यक्त केल्याने हिंदुस्थानी मुत्सद्द्यांच्या या प्रयत्नांस फारसे यश येत नाही. दाऊद इब्राहिमच्या छोट्या प्रकरणात पाकिस्तानला जगाच्या न्यायालयापुढे आतंकवादी म्हणून शाबीत करून देणे सध्याच्या परिस्थितीत सहज शक्य होते. तसा प्रयत्न हिंदुस्थानने केला नाही. अमेरिका–हिंदुस्थानप्रणीत आतंकवादविरोधी दोस्तफळीची संभावना विरघळून गेली आहे. आतंकवादविरोधी लष्करी कारवाई आतंकवादविरोधी कारवाईच्या अग्रभागी वर्षानुवर्षे जगभर धुडगूस घालणारी अमेरिका आणि आतंकवादात जन्मलेला आणि वाढलेला पाकिस्तान या दोन देशांच्या झेंड्यांखाली होईल असे दिसते आहे.

*दि. २९/९/२००१*

■■

# तिसरे महायुद्ध - जागतिक यादवी

बारा आणि तेरा ऑक्टोबर रोजी युरोप खंडातील जवळजवळ सर्व प्रमुख देशांत अमेरिकाविरोधी प्रचंड निदर्शने झाली. अमेरिकेने आतंकवाद्यांचा म्होरक्या ओसामा बिन लादेन यास 'जिवंत किंवा मृत' पकडण्यासाठी अफगाणिस्तानवर प्रचंड बाँबहल्ले चालू केले, त्या हल्ल्यांचा विरोध करण्यासाठी इंग्लंड, जर्मनी व फ्रान्समधील लोक हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरावेत याचा अर्थ स्पष्ट आहे. आंतरराष्ट्रीय आतंकवाद्यांना विशेष निष्ठा अशी कोणतीच नसते. अनेक तस्करीचे उद्योग करताना ते कोणतातरी जनाधार शोधतात आणि माफिया टोळ्यांचे दादा एकमेकांत सहकार्य करतात, त्याचप्रमाणे अगदी भिन्नभिन्न विचारसरणीचे आतंकवादीही, प्रसंगोपात्, हातमिळवणी करू शकतात. गेली दोन वर्षे जगातील खुल्या व्यापारास विरोध करण्यासाठी निदर्शनांचे आणि प्रदर्शनांचे तसेच घातपाताचे ज्यांनी सिएटलपासून जिनोआपर्यंत थैमान घातले ती पर्यावरणावादी, डावी आणि संरक्षणवादी मंडळी आता उघडपणे ओसामा बिन लादेनच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरली आहेत.

अफगाणिस्तानातील युद्ध कित्येक वर्षे चालेल असे स्वत: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षच म्हणतात. तसे खरेच घडले आणि ओसामा बिन लादेन व त्याची टोळी महिन्या दोन महिन्यांत हातात आली नाही आणि युद्ध लांबत चालले तर जगात काय चित्र उभे राहील ते हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे.

अमेरिकन विमानदलाने अफगाणिस्तानच्या आकाशाचा पूर्ण ताबा घेतला आहे. बाँबवर्षावात सातआठशे पठाण मारले गेले, संयुक्त राष्ट्रसंघाचे चार अधिकारीही ठार झाले; पण अद्याप, अमेरिकन लष्कराचा कोणीही सैनिक पिशवीतून मायदेशी परतला नाही. व्हिएटनामचे युद्ध आणि अफगाणिस्तानातील युद्ध यातील हा मोठा फरक आहे. अमेरिकन बाँबर विमानांनी सारा व्हिएटनाम उभा होरपळून

काढला; पण त्याबरोबरच त्यांचे पायदळ सैन्यही लाखांच्या संख्येने तेथे उतरले हाते. व्हिएटनामच्या 'गनिमी' काव्यापुढे अमेरिकेच्या 'औरंगजेबी' लष्करी दलाचे फारसे काही चालेना. अमेरिकन सैनिक हजारोंच्या संख्येने मरू लागले, त्यांचे मृतदेह पिशवीत भरून मायदेशी पोहोचू लागले तेव्हा अमेरिकन लष्कराला स्वयंसेवक मिळेनासे झाले. व्हिएटनाम युद्धाविरुद्ध खुद्द अमेरिकेत प्रचंड निदर्शने होऊ लागली व युद्ध, काय वाटेल ती किंमत पडली तरी, चालविण्याची जॉन केनेडी यांची निर्धाराची भूमिका त्यांच्या वारसदारांना निभावणे अशक्य झाले आणि अमेरिका व्हिएटनाममधून पाय काढून घेण्याच्या सन्माननीय पर्यायांचा शोध करू लागली. तसा पाय काढता घेण्याची संधीही व्हिएटनामी नेत्यांनी मिळू दिली नाही. लढाईत सपशेल पराभव पत्करून अमेरिकेस पाय काढून घ्यावा लागला.

अमेरिकन लोकांवर त्यांच्या भूमीवर आधुनिक युद्ध पाहण्याचा कधी प्रसंग आला नाही. एकविसाव्या शतकातील पहिल्याच लढाईची सुरुवात जागतिक व्यापार केंद्राचे मनोरे कोसळवून आणि खुद्द अमेरिकन लष्कराचे प्रमुख केंद्र उद्ध्वस्त होऊन झाली. अमेरिकन नागरिक या हल्ल्याने चांगलेच हादरले आहेत. अफगाणिस्तान युद्धात मारले गेलेले अमेरिकन जवानांचे मृतदेह मोठ्या संख्येने विमाने भरभरून मायदेशी येऊ लागले तर व्हिएटनाममधून काढता पाय घेणारी अमेरिका ओसामा बिन लादेनसारख्या डोंगरी उंदराच्या शोधात प्राणपणाने लढाई चालवील ही शक्यता फार कमी आहे.

लढाईच्या आघाडीवरून मृतदेह परतू लागलेले नाहीत, परंतु अँथ्रक्स् रोगाच्या जंतूंच्या प्रसाराने अमेरिकन मनोधैर्य खचविण्याचे काम सुरू केले आहे. पहिल्यांदा खासगी कंपन्यांची कार्यालये, मग काही पत्रकार आणि, शेवटच्या बातमीप्रमाणे, अमेरिकन सीनेटच्या कार्यालयातही अँथ्रक्स्च्या जंतूंची दूषित पाकिटे पोहोचू लागल्याने अमेरिकेची सारी महासत्ता, कानात मुंगी शिरलेल्या मातबर हत्तीप्रमाणे, सैरभैर झाली आहे.

युरोपीय देशांतील अर्थकारणास पर्यावरणवादी आणि जागतिक व्यापार संस्थाविरोधी घटकांचा मोठा आधार आहे. जागतिक व्यापार संस्थाविरोधी आतंकवाद्यांनी युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर निषेधाचे आंदोलन चालविले तर युरोपीय सरकारे त्यांच्यापुढे लवकरच हात टेकल्याखेरीज राहाणार नाहीत. हे असे चित्र येत्या काही महिन्यांतच उभे राहिले तर तिसरे जागतिक युद्ध महासत्तांमधील लठ्ठालठ्ठी न होता सर्वदूर आणि इत:स्तत: पसरलेले यादवी युद्ध

म्हणून समोर येईल.

इतिहासाची पूर्ण पुनरावृत्ती कधीच होत नाही; पण, दुसऱ्या महायुद्धापूर्वीची १९३७–३८ सालातील आणि आजची परिस्थिती यांत विलक्षण साधर्म्य आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला, स्पॅनिश यादवी युद्धापासून पंडित नेहरूंनी लोकसत्ताक राष्ट्रांचा पाठपुरावा करण्याची भूमिका घेतली. हिंदुस्थानवर ब्रिटिश साम्राज्याची सत्ता असल्याने अशी भूमिका घेणे सोयीचेही होते. पहिल्या महायुद्धाच्या अनुभवानंतर दोस्त राष्ट्रे हरणे अशक्य आहे; विशेषतः, अमेरिकेच्या आर्थिक आणि लष्करी ताकदीपुढे कोणीही टिकू शकणार नाही अशी सर्वसाधारण भावना होती. 'ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी लोकशाहीच्या फार बाता मारू नयेत; त्याआधी वसाहतींचा स्वातंत्र्याचा हक्क मान्य करावा,' अशी लटपटपंची काँग्रेस नेत्यांनी चालविली होती.

जपानने पर्ल हर्बरवर हल्ला केला आणि फॅसिस्ट फळी मजबूत केली. कमालीच्या जलदीने जपानने सारा आशिया पादाक्रांत केला. ब्रह्मदेशावर हल्ले चालू झाले आणि हिंदुस्थानच्या दरवाजावर त्यांची थाप ऐकू येऊ लागली. कोलकत्ता व मद्रास येथे बाँबहल्ले झाले तेव्हा ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानचे संरक्षण करू शकेल किंवा नाही याची खात्री वाटेना. ज्या साम्राज्यशाही सत्तेविरुद्ध काँग्रेसने लढा चालविला होता तीच सत्ता जपानी आक्रमण आणि क्रौर्य यांचा बागूलबुवा दाखवून जपानविरुद्ध लढण्यासाठी हिंदुस्थानी जनतेचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करीत होती.

थोडक्यात, ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे अधिवेशन भरले त्या वेळी देशापुढे जी परिस्थिती होती तशीच परिस्थिती पुन्हा एकदा देशातील गोरगरीब आणि कष्टकरी यांच्या प्रागतिक चळवळीपुढे येत्या महिन्या- दोन महिन्यांत उभी ठाकणार आहे. एका बाजूला मुस्लिम मूलतत्त्ववादी आणि संरक्षणावादी अतिरेकी यांची फळी, तर दुसऱ्या बाजूला साऱ्या जगाची अर्थव्यवस्था एकसूत्री करू पाहणाऱ्या लोकशाही राष्ट्रांची आघाडी.

केंद्रात भारतीय जनता पार्टीचे शासन असल्याने आणि अमेरिकन चढाईचा पहिला रोख, प्रत्यक्षात तरी, मुसलमानविरोधी असल्याने आजतरी हिंदुस्थानची औपचारिक सहानुभूती दोस्त राष्ट्रांना आहे. युद्धाच्या आघाडीवरील परिस्थिती बदलत जाईल तसे हिंदुस्थानातही सारे डावे, पर्यावरणवादी, स्वदेशीवाले, गांधीवादी अधिकाधिक आक्रमकपणे राष्ट्रवादी भूमिका घेऊ लागतील आणि कोणत्याही पक्षाचे शासन असे ना, त्यांना या तथाकथित 'राष्ट्रवादी' आंदोलनाशी

तडजोड करावी लागेल.

शासनव्यवस्थेचा हस्तक्षेप संपवून मुक्त अर्थव्यवस्था आज येईल, उद्या येईल म्हणून वर्षानुवर्षे वाट पाहणाऱ्या कष्टकऱ्यांच्या चळवळीला राष्ट्रवादी पुन्हा एकदा बगल देण्याचा प्रयत्न करतील. शेतकरी, कामगार, दलित आणि महिला यांची आंदोलने अशा परिस्थितीत जो काही कार्यक्रम ठरवतील त्यामुळे ऐतिहासिक उलथापालथ होईल हे नक्की.

*दि. २०/१०/२००१*

■■

# इंडियन सरकारी आतंकवाद

आंतरराष्ट्रीय आतंकवादाचा विषय सध्या रणभूमीवर, एवढेच नव्हे तर घराघरात पेटता आहे. मॅनहॅटनमधील जागतिक व्यापार केंद्रावरील ११ सप्टेंबरच्या विमान आदळण्याच्या प्रकाराने एका क्षणात 'देशाचे लष्कर' या संकल्पनेलाच जबरदस्त धक्का दिला आहे. जिवावर उदार होऊन उठलेली एखादी लहान टोळीही जागतिक महासत्तांना कुंठित करू शकते असे, मुंगीने हत्तीच्या कानात शिरून त्याला नामोहरम करण्याचे, एक नवे युग सुरू झाले आहे.

११ सप्टेंबरच्या आधी आतंकवादाविषयी चर्चा होई तेव्हा त्यात 'सरकारी आतंकवाद' असाही एक शब्दप्रयोग केला जाई.

पंजाबमध्ये खलिस्तानी अतिरेक्यांनी जागोजाग बॉंबस्फोट केले, बसगाड्यांमधून माणसांना उतरवून गोळ्यांच्या वर्षावात त्यांना ठार केले ही सारी आतंकवादाची उदाहरणे. असा आतंकवाद शमविण्याकरिता पोलिस, निमलष्करी दले यांनी जो हैदोस घातला त्या प्रकाराला 'सरकारी आतंवाद' असे म्हटले जाई.

कायद्याचा काहीही आधार नसताना, साक्षीपुराव्याची फारशी पर्वा न करता, अरेरावीने, पुष्कळदा खासगी द्वेषापोटी कोणालाही पकडून आणणे, पोलिस चौकीत त्याचा अनन्वित छळ करणे आणि, प्रसंगविशेषी, त्याने पलायन केल्याचे नाटक करून त्याला गोळी घालून ठार करणे ही सारी 'सरकारी आतंकवादा'ची लक्षणे.

११ सप्टेंबरनंतर 'राष्ट्रीय लष्कर' या संस्थेचा संदर्भ बदलला. जगभर आता, इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात रानटी जमातींच्या टोळ्या एकमेकांशी लढत असत, तशीच परिस्थिती, इतिहासाने पुन्हा एकदा उभी केली आहे. ईशान्येकडील नागा टोळ्या, दक्षिणेतील तामिळ वाघ, काश्मिरातील आतंकवाद्यांच्या अनेक संघटना यांच्या बरोबरीने लढणारी 'राष्ट्रीय लष्करे'ही अशा टोळ्यांपैकीच

एक बनून गेली आहेत.

यापूर्वी सरकारी ताकद ही देशाचे संविधान, कायदा, न्याय आणि सुव्यवस्था यांसाठी लढणारी संस्था होती; आता, 'सब कुछ चलता है' अशा थाटात सरकारे वागूही लागली आहेत आणि त्यांच्या शस्त्रबलाचा उपयोगही करू लागली आहेत.

दुर्दैवाने, 'इंडिया' सरकारच्या आतंकवादाचा पहिला बळी भारतीय शेतकरी होणार आहे. गुजराथमधील सारे पोलिस दल बोंडअळीपासून बचावलेले कापसाचे उभे पीक उखडून टाकून जाळण्याच्या कामासाठी सज्ज झाले आहे. याबाबतीत कोणालाही दयामाया दाखविली जाणार नाही अशी मोठी उर्मट भाषा केंद्रीय कृषिमंत्री श्री. अजित सिंग यांनी दूरदर्शनवरील एका मुलाखतीत वापरली.

यंदा गुजराथमध्ये कापसाच्या पिकावर बोंडअळीचा प्रचंड हल्ला झाला; बहुतेक सारे पीक नष्ट झाले; मात्र वेगवेगळ्या जिल्ह्यांत विखुरलेले दहा हजार एकरांवरचे पीक शाबूत राहिले आहे याचे सर्वांना नवल वाटले, एवढेच नव्हे तर या वावरांत बोंडअळीचा त्रास नाही आणि पीकमात्र भरघोस हे असे कसे झाले म्हणून चौकशी सुरू झाली. दिल्लीच्या पर्यावरण आणि जंगल मंत्रालयाने दोन शास्त्रज्ञांची समिती तपासणीसाठी पाठविली. एक सदस्य नागपूर येथील कापूस संशोधन संस्थेचे डॉ. सी. डी. मायी आणि दुसरे, दिल्ली येथील जैविक तंत्रज्ञान विभागातील अधिकारी डॉ. टी. व्ही. रामनय्या.

समितीने गुजराथमधील गांधीनगर जिल्ह्यात, विशेषतः दहेगाम तालुक्यात भरभरून आलेल्या पिकांची पाहणी केली आणि निष्कर्ष काढला की, बोंडअळीशी टक्कर देऊन तरारून उभ्या असलेल्या, गुजराथमधील पिकात CRY1A या जनुकाचा अंश आहे.

जैविक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने जगभरच्या शेतीत अनेक पिकांच्या बाबतीत प्रचंड क्रांती घडून आली आहे. या सगळ्या संशोधनात मानाचे स्थान कापसाच्या जैविक बियाण्याचे आहे. कापसाच्या या बियाण्यात बोंडअळीला घातक असे, एरव्ही जमिनीत सापडणारे एक (CRY1A) जनुक घालण्यात आले आणि त्यामुळे, या Bt बियाण्याचे पीक बोंडअळी आणि इतर काही किडींचा, कोणत्याही औषधाचा फवारा केल्याखेरीज, नायनाट करू लागले.

कापसाचे हे वाण आता जगभर झपाट्याने पसरले आहे. अमेरिकेत कापसाखालील जवळजवळ निम्मे पीक या वाणाचे निघते. गेल्या काही वर्षांत चीनमध्ये या वाणाची पेरणी ३५ पटींनी वाढली आहे. या वाणाचा प्रयोग

करणाऱ्या देशांतील शास्त्रज्ञ आणि सरकारे काही झोपी गेलेले नाहीत. या वाणाला परवानगी देण्याआधी त्यांनी त्याच्या परिणामांची कसून तपासणी केली. बोंडअळीचा खरोखरच बंदोबस्त होतो काय, पिकात वाढ कितपत होते, शेजारच्या पिकांवर काही परिणाम होतो काय, या नव्या कपाशीची सरकी खाण्यामुळे जनावरांना काही अपाय होतो काय, यातील जनुकाचा काही अंश दुधात किंवा प्राण्याच्या मांसात सापडतो काय, असे प्राणिज पदार्थ खाण्यात आल्याने माणसावर काही विपरीत परिणाम होतो काय अशा सगळ्या प्रश्नांचा कसोशीने अभ्यास करून वेगवेगळ्या देशांत या वाणाच्या वापरास परवानगी देण्यात आली.

हिंदुस्थानातमात्र या वाणाच्या वापरास परवानगी नाही, एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांना त्याची प्रयोगादाखल लागवड करण्यासही बंदी आहे.

जैविक तंत्रज्ञानाचा वापर हिंदुस्थानात होऊ नये यासाठी गैरशासकीय संघटनांची एक भरभक्कम आघाडी उघडण्यात आली आहे. जैविक तंत्रज्ञान वाढले तर रासायनिक खते आणि औषधे यांचा वापर घटेल या भीतीने रसायनाची सारी कारखानदारी भयभीत झाली आहे. हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानात संकरित वाणाचे बियाणे आणि त्याबरोबर, रासायनिक खते व औषधे यांच्या भरपूर मात्रा यांचा प्रयोग होतो. त्यामुळे, गेल्या पस्तीस वर्षांत रासायनिक खते आणि औषधे यांच्या उत्पादनाची भरपूर वाढ झाली आहे. रसायनांच्या उद्योगधंद्याचे प्रमुख केंद्र युरोप खंडात आहे. त्यामुळे, जैविक तंत्रज्ञानाला विरोध करण्यासाठी भारत-युरोप अशी तथाकथित पर्यावरणवादी आघाडी उभी राहिली आहे. या आघाडीने काही फुटकळ शास्त्रज्ञांना जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ ठरविले आहे आणि फुटकळ शेतकरी पुढाऱ्यांना भारतीय शेतकऱ्यांचे प्रातिनिधिक नेते म्हणून, साऱ्या प्रसारमाध्यमांचा उपयोग करून, जगापुढे मिरविले आहे.

देशातील कायद्याप्रमाणे, नवीन वाणाच्या वापराची परवानगी सरकारने द्यावी लागते. पण, सरकारी यंत्रणा इतकी गबाळग्रंथी, की देशात वापरल्या जाणाऱ्या बियाण्यापैकी सत्तर टक्के बियाणे सरकारी मान्यताविरहित आहे. गंमत अशी, की ही असली अजागळ सरकारी यंत्रणा जैविक तंत्रज्ञानाच्या प्रश्नावरमात्र खडबडून जागी झाली आणि सजगतेने कारभार पाहू लागली. परवानगी देण्यासाठी पर्यावरण खात्याची GEAC नामाभिधानाची एक समिती आहे. या समितीबरोबर इतरही अनेक विभाग, खाती या कामात गुंतलेली आहेत. एका बाजूला अब्जावधी डॉलर्स खर्च करून नवीन वाण तयार करणाऱ्या, मोन्सँटोसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि दुसऱ्या बाजूला पर्यावरणाच्या हिरव्या निशाणाखाली रासायनिक

खते आणि औषधे यांचे कारखानदार आणि पूर्वाश्रमीचे लालभाई असे समोरासमोर उभे ठाकल्यानंतर अशी सोन्याची अंडी देणारी परवानगीरूपी कोंबडी कोणता मूर्ख नोकरशहा कापून टाकेल? हे घोंगडे भिजत ठेवण्याचा डाव रचला गेला आणि गेली सात वर्षेतरी हिंदुस्थानात वेळोवेळी चाचणीप्रयोग झाले. त्यांतील एकाचाही निष्कर्ष वाणाच्या वापराविरुद्ध गेलेला नाही आणि, तरीही, दरवर्षी नवनवीन चाचणीप्रयोग करण्याचे आदेश देऊन हे घोंगडे भिजत ठेवण्याचे सरकारी षडयंत्र चालले आहे.

२००० मध्ये या विषयावर निर्णय घेण्याकरिता GEACची बैठक झाली ती जून महिन्याच्या शेवटी, म्हणजे पावसाळ्याचा विहित समय सुरू झाल्यानंतर. काही नवीन चाचणीप्रयोग करण्याचे आदेश दिल्लीहून निघेपर्यंत जुलै महिना निम्मा संपला. त्यामुळे, महाराष्ट्र, गुजराथ, हरियाना, पंजाब या प्रमुख कापूसउत्पादक राज्यांत चाचणीप्रयोगाची वावरे घेता आली नाहीत. कारण, तेथील कापूसपेरणीचा हंगाम तोपर्यंत संपून गेला होता. प्रयोगाच्या पेरण्या झाल्या त्या कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या दोनच राज्यांत.

पर्यावरणवादी गटाने मोठा हलकल्लोळ केला. कर्नाटकाततर प्रायोगिक वावरांतील वाणांची रोपे नष्ट करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. तेवीस दिवस निपाणीच्या रस्त्यावर शांतपणे बसलेल्या शेतकऱ्यांवर गोळीबार करून तेराजणांचे प्राण घेणारे कर्नाटक सरकार पर्यावरणवाद्यांपुढे मात्र एकदम निष्प्रभ झाले; त्यांच्या पुढाऱ्यांना प्रतिबंधक अटकसुद्धा करण्यात आली नाही.

अशा परिस्थितीत, चाचणीप्रयोग पार पडले. या प्रयोगांवर सर्व संबंधित सरकारी संशोधन संस्था आणि विभाग यांची देखरेख राहिली. साऱ्यांचे अहवाल अत्यंत समाधानकारक आले.

हे समाधानकारक अहवाल पाहता, २००१ सालच्या हंगामात भारतातही कापसाच्या जैविक वाणास सरकारी हिरवा कंदील मिळेल अशी आशा होती.

या विषयावर निर्णय घेण्याकरिता GEACची बैठक ठरली, पण केव्हा? २९ जून २००१ रोजी. त्या वेळी मी दिल्लीत होतो. समितीच्या अध्यक्षांना मी बोलावून घेतले आणि त्यांच्या लक्षात आणून दिले, की गेल्या वर्षीचीच चूक पुन्हा होते आहे. २९ जून रोजीच्या बैठकीत, नव्या वाणाला परवानगी देण्याचा निर्णय झाला तरी त्याची अंमलबजावणी होईपर्यंत उत्तरेकडील राज्यांतील पेरणीचा हंगाम संपलेला असेल. मोठ्या मेटाकुटीने समितीचे अध्यक्ष श्री. गोखले यांनी बैठक दहा दिवस अलीकडे ओढण्याचे कबूल केले. १९ जूनच्या आधी मात्र

बैठक घेणे शक्य होणार नाही असे त्यांनी निक्षून सांगितले. कारणे अनेक! त्यांनी दिलेल्या कारणांपैकी सर्वांत महत्त्वाचे कारण असे की, '१८ जून रोजी समितीने युरोप खंडातील ग्रीन पीस (Green Peace) या पर्यावरणवादी संघटनेस जैविक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल चर्चा करण्यासाठी बोलावले होते, ती तारीख बदलणे आता शक्य नव्हते आणि त्यांच्याशी बोलणी केल्याखेरीज GEACने बैठक घेऊन निर्णय जाहीर करणे आंतरराष्ट्रीय टीकेचा विषय झाला असता.' याला काय उत्तर देणार? युरोप खंडातील पर्यावरणवाद्यांशी सल्लामसलत करण्याची एवढी तळमळ, मग भारतातील शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना विचारविनिमयासाठी का बोलावले जात नाही? मग, गोखलेसाहेबांनी मी सुचविलेल्या चारपाच शेतकरी नेत्यांना १८ जूनच्या Green Peaceच्या बैठकीस हजर राहण्याचे निमंत्रण दिले.

अठरा जूनची बैठक झाली. 'गेल्या वर्षीच्या साऱ्या चाचणीप्रयोगांचे निष्कर्ष समाधानकारक असल्याने उद्याच्या बैठकीत जैविक वाणाला परवानगी देणे ही आता केवळ औपचारिकता राहिली आहे,' असे विधान अध्यक्ष गोखले यांनी संध्याकाळी पत्रकारांसमोर बोलताना केले.

बैठकीसाठी आलेले शेतकरी नेते खुशीत दिसले. कित्येक वर्षे भिजत पडलेले हे घोंगडे शेवटी एकदाचे उघड्यावर वाळत टाकले जाईल अशी आशा वाटू लागली; पण 'हाऽ, हन्त, हन्त! नलिनिम् गज उज्जहार.'

अठरा जूनच्या रात्री काही विशेष घडामोडी घडल्या असल्या पाहिजेत. कोणी म्हणे, खुद्द पंतप्रधानांच्या कार्यालयानेच आदेश दिले; कोणी म्हणे, कृषिमंत्र्यांनी हस्तक्षेप केला; तर कोणी म्हणे, या बैठकीत सदस्य म्हणून हजर राहण्याचा अधिकार नसलेले दोन अधिकारी मुद्दाम पाठविण्यात आले आणि त्यांनी सारा चमत्कार घडविला.

एकोणीस जूनच्या बैठकीचा निर्णय जाहीर झाला. चाचणीप्रयोगाची आणखी एक फेरी घेण्याचा निर्णय समितीने घेतला. मात्र, हे नवीन चाचणीप्रयोग समाधानकारक झाल्यास २००२ मध्ये बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी बीजाच्या प्रगुणनाला म्हणजे उत्पादन करण्यास परवानगी देण्यात आली नाही. हा सारा प्रकारच सरकारी अरेरावीच्या दंडेलशाहीचा आणि आतंकवादाचा आविष्कार होता. या निर्णयामागे कोणा नोकरशहाचे किंवा पुढाऱ्याचे हितसंबंध गुंतलेले असोत, या निर्णयाने कोणा भारतीय पारंपरिक शेतीच्या अभिमान्याचा अहंकार सुखावला असो; पण हा निर्णय देशभरातील कापूसउत्पादक शेतकऱ्यांसाठी

मोठा घातक होता.

'हा निर्णय म्हणजे कारगिलमधील भारतीय जवानांच्या हाती .३०३ रायफल देऊन त्यांना स्वयंचलित मशिनगनसज्ज शत्रूला सामोरे पाठविण्यासारखे आहे,' अशी टिप्पणी मी त्या वेळी केली होती.

या निर्णयाविरुद्ध दाद मागण्याचा प्रयत्न करण्यात आला; पण सरकारतर्फे स्पष्ट सांगण्यात आले, की अजून काही वर्षेतरी जैविक वाणाचा प्रयोग करू देण्याचा सरकारचा इरादा नाही.

नवीन चाचणीप्रयोगांची अंमलबजावणी, पुन्हा एकदा सरकारी दिरंगाईमुळे, फक्त दक्षिणेकडील राज्यातच होणार आहे. थोडक्यात, आणखी काही वर्षे हिंदुस्थानी कापूसउत्पादक शेतकरी जगामध्ये चमत्कार घडवून आणणाऱ्या क्रांतीचा मासलादेखील पाहू शकणार नाही अशी स्थिती झाली.

एवढ्यात, गुजराथचा चमत्कार झाला. अहमदाबाद येथील एका कंपनीने काही वर्षांपूर्वीच जैविक वाणाचे बियाणे अनधिकृतरीत्या हिंदुस्थानात आणले होते; सरकारी परवानगी वगैरे घेण्याचा भानगडीत ते पडले नव्हते. गुजराथेतील शेतकऱ्यांना ते बियाणे विकायला या कंपनीने सुरुवात केली. यंदाच्या तिसऱ्या वर्षी बोंडअळीने बाकी साऱ्या बियाण्यांची पिके फस्त केल्याने हा प्रकार उघडकीस आला. गुजराथमधील शेतकरी यंदाच्या अनुभवाने शहाणा होऊन जैविक वाणाखेरीज दुसरे कोणतेच वाण वापरण्यास तयार होणार नाही असे बोलू लागल्यावर अजैविक वाणांच्या उत्पादकांनी जोर केला. सर्व संबंधितांना जाबजवाबासाठी दिल्लीला बोलविण्यात आले. गांधीनगर जिल्ह्यातील दहेगाम तालुक्यातील सहा शेतकऱ्यांना त्यांनी पिके नष्ट करून टाकावी, असे फर्मान सोडण्यात आले. त्यानंतर, गुजराथ सरकारनेच लक्षात आणून दिले, की या वाणाची लागवड गांधीनगर जिल्ह्यापुरतीच नसून गुजराथभर सुमारे दहा हजार एकरांवर झाली आहे.

आणि येथे सरकारी आतंकवाद जागा झाला. जेथे जेथे कापसाचे निरोगी पीक बहरताना दिसेल तेथेतेथे जाऊन रोपे उखडून जाळून टाकण्याचा आदेश पोलिस दलांना देण्यात आला आहे.

खरे म्हटले तर, यात कापूसउत्पादक शेतकऱ्यांचा काहीही दोष नाही. शेतातल्या पेरणीकरिता शेतकरी अनेक मार्गांनी बियाणे मिळवितो; पुष्कळदा शेजाऱ्यापाजाऱ्याकडून उसने किंवा विकतही घेतो. यंदाच्या लागवडीचे बियाणे मुख्यत: गेल्या दोन वर्षांत जैविक वाणाचे पीक घेतलेल्या शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांना

पुरविले आहे. या वाणावर सरकारी बंदी आहे याचे ज्ञान लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना असण्याचे काहीच कारण नाही. त्यांचा गुन्हा काहीच नाही. शिक्षा, हिंदुस्थानात हे वाण तस्करीने आणणाऱ्यांना करणे योग्य होईल. परंतु, उभी पिके नष्ट करण्याचा नतद्रष्टपणा कारण्याचा सरकारला काय अधिकार? पीक उखडून टाकल्याने अनेक शेतकऱ्यांचे सबंध वर्ष भाकड जाणार आहे. त्यांना, निदान, अपेक्षित पिकाच्या किमतीइतकी नुकसानभरपाईतरी देऊ करायला पाहिजे.

देशभरच्या शेतकऱ्यांच्या संघटनांनी या सरकारी जुलुमाविरुद्ध दंड थोपटले आहेत. राज्याराज्यातील शेतकरी संघटना पिकांच्या संरक्षणासाठी सज्ज होत आहेत आणि सरकारी पोलिस व निमलष्करी दले उभी पिके उखडून जाळून टाकण्यासाठी चालून येत आहेत. जगभरच्या आतंकवादाचे आपण वीस वर्षे बळी झालो आहोत असा टाहो फोडणाऱ्या पंतप्रधानांनी भारतीय शेतकऱ्याविरुद्धच्या इंडियन सरकारी आतंकवादाची नोंदतरी घेतली आहे का?

*दि. २७/१०/२००१*

■■

# सरहद्दीविरहित तिसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या फेरीत सरशी ओसामाची

अमेरिकेने अफगाणिस्तानवर बॉम्बहल्ले करायला सुरुवात केली तेव्हापासून पाच आठवडे होऊन गेले. युद्धात जो शेवटी जिंकतो त्यालाच विजेता म्हणतात. कोणत्याही मध्यंतरात कोण किती जिंकतो, कोण किती हारतो याची पाहणी करण्यात तसा काही फारसा अर्थ नसतो; युद्धपरिस्थितीस कधी कलाटणी मिळेल आणि कोणाचे पारडे कधी झुकेल काही सांगता येत नाही. तरीही कुतूहल किंवा मनोरंजन म्हणून का होईना, गेल्या पस्तीस दिवसांच्या लढाईचा आढावा घेतला तर, या पहिल्या फेरीत ओसामा बिन लादेनची सरशी झाली आहे असे उघड दिसते. याचा अर्थ ही सरशी टिकून राहील, वाढत जाईल असा नाही. मुष्टियुद्धाच्या सामन्यात प्रत्येक फेरीला गुण दिले जातात. सामना एक प्रतिस्पर्धी भुईसपाट होऊनही संपू शकतो. तसे नच झाल्यास वेगवेगळ्या फेऱ्यांच्या गुणांची बेरीज केली जाते किंवा कोणत्या प्रतिस्पर्ध्याने किती फेऱ्या जिंकल्या या आधाराने सामन्याचा निर्णय केला जातो. या अर्थाने अमेरिका – अफगाणिस्तान लढाईतील पहिली फेरी ओसामा बिन लादेनने जिंकली हे निःसंशय.

अमेरिकेला, दऱ्याखोऱ्यांत दडून राहिलेल्या ओसामा बिन लादेनला 'जिवंत वा मृत' पकडणे सोपे नाही, आंतरराष्ट्रीय आतंकवादाचा बंदोबस्त करणे त्याहून कठीण. तालिबानचे सरकार उलथवून त्या जागी अफगाणिस्तानातील सर्व वंशीयांचे प्रातिनिधिक सरकार स्थापन करणे हे मर्यादित राजकीय उद्दिष्टदेखील तसे वेळखाऊच. अमेरिकेच्या या तीन उद्दिष्टांपैकी एकही पहिल्या फेरीपर्यंत दृष्टिपथात आलेले नाही. लढाऊ विमानांनी अफगाणिस्तानातील सर्व महत्त्वाची ठिकाणे उद्ध्वस्त केली; लक्षावधी लोक, अर्धपोटीच नाही तर, भुकेलेले आहेत; हजारोंच्या सख्येने पठाण निर्वासित होऊन मिळेल त्या साधनाने शेजारच्या देशांकडे धावत आहेत.

एवढे असूनही ओसामाला मुसक्या बांधून अमेरिकन 'बादशहा' समोर हजर करण्याची तालिबान सरकारची यत्किंचितही तयारी दिसत नाही. उभा अफगाणिस्तान जाळून काढला तरी ओसामा कोठे लपला आहे याची फारशी स्पष्ट कल्पना अमेरिकेला आलेली नाही.

तालिबान सरकार पडण्याची काहीच लक्षणे नाहीत. याउलट, सध्याचे युद्ध फक्त आंतरराष्ट्रीय आतंकवादाविरुद्ध आहे, इस्लामविरोधी नाही असे अमेरिकी राष्ट्रपती आणि त्यांच्या वतीने इतरांनी कितीही गर्जून सांगितले तरी देशोदेशीच्या मुसलमान समाजात हे युद्ध प्रत्यक्षात आंतरराष्ट्रीय इस्लामविरुद्ध आहे याची खात्री पटली आहे. ज्या मुसलमान देशांच्या सरकारांनी अमेरिकन कारवाईस अप्रच्छन्न पाठिंबा दिला त्यांना देशांतर्गत रोषास इतक्या बिकटपणे सामोरे जावे लागले आहे, की त्यांच्या स्थैर्याची काहीच शाश्वती राहिली नाही.

तालिबानला पर्याय काय? रशियन पाठिंब्याच्या, उत्तरेकडील 'दोस्ताना' गटाला अमेरिकेची चढाई म्हणजे मोठे वरदानच वाटले. प्रत्यक्षात मात्र त्यांना तालिबानच्या अडचणींचा फायदा घेऊन एक शहरही काबीज करता आले नाही. अमेरिकेनेही वास्तवाचे भान ठेवून 'उत्तरी मोर्चा'स पर्यायी सरकार म्हणून मानण्याचा विचार तहकूब केला आहे.

आधुनिकात आधुनिक बॉम्ब आणि क्षेपणास्त्रे यांचा वर्षाव होऊनही तालिबान सरकारविषयी कणमात्र सहानुभूती नसलेल्या अफगाणांच्या मनातही काही भयभीती तयार झाल्याचे दिसत नाही. हजारोंच्या संख्येने अफगाण निर्वासित पाकिस्तानी सरहद्दीकडे आले; पाकिस्तान सरकारने बंदी केल्यावरही सुरक्षादलाला न जुमानता, तारांची कुंपणे मोडून या निर्वासितांनी इस्लामचा जयजयकार करीत पाकिस्तानात प्रवेश केला. या युद्धाच्या निमित्ताने इराण आणि पाकिस्तानमध्ये हजारो अफगाण निर्वासित जाऊन उतरले आहेत. युद्धभूमी बदलली तर हे निर्वासित अफगाणिस्तानची आघाडीची फौज म्हणून उपयोगी येतील यात काही शंका नाही. आधुनिकातील आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर करूनही अमेरिकेचे घोडे काही पुढे सरकलेले दिसत नाही. याउलट, ओसामा बिन लादेनची गेल्या चाळीसपंचेचाळीस दिवसांतील कमाई मोठी सज्जड आहे.

१. वर सांगितल्याप्रमाणे पाकिस्तान व इराण या देशांत त्यांनी तळ मिळवला आहे. त्यामुळे, मुशर्रफसाहेब आणि इराणी सरकार यांना मोठी चिंता वाटू लागली आहे.

२. पाकिस्तान, इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स् यांसारख्या देशांत

स्थानिक मुसलमानांनी अमेरिकाविरोधी प्रचंड निदर्शने करून हे युद्ध साऱ्या इस्लामविरुद्ध 'जिहाद' आहे हे स्पष्ट केले आहे.

३. तशी, युद्धभूमी फक्त अफगाणिस्तानात आहे; पण सगळ्यांत जास्त घबराट अमेरिका आणि युरोपियन देश येथेच माजली आहे. जागतिक व्यापार केंद्राचे मनोरे जमीनदोस्त झाले, खुद्द पेंटॅगॉनवरच हल्ला झाला त्यामुळे, सतत सुरक्षेच्या वातावरणात जगणारे अमेरिकी नागरिक हवालदिल झाले आहेत. विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड घटली आहे. काही विमान कंपन्यांची दिवाळे निघत आहे.

४. तीस लाख डॉलर किमतीचे एकएक क्षेपणास्त्र अमेरिकेने अफगाणिस्तानवर सोडले तरी तेथील प्रजेचे मनोधैर्य अजिबात खचलेले नाही. उलट, एक डॉलर टपाल हशील भरून अॅन्थ्रक्स् रोगाचे जंतू पसरवण्याच्या अजब हत्याराने अमेरिका पक्षाघात झाल्यासारखी झाली आहे. सीनेट आणि कॉँग्रेसची कार्यालयेही बंद करावी लागली आहेत. टपाल खात्याचे चार कर्मचारी रोगाची लागण होऊन मृत्यू पावल्याने टपालव्यवस्थाही डळमळू लागली आहे.

५. ओसामा बिन लादेनचा सर्वांत मोठा विजय, मानसिक पातळीवर, प्रसिद्धिमाध्यमांच्या क्षेत्रात आहे. सर्व माध्यमांनी त्याला प्रचंड प्रसिद्धी दिली, त्याचे फोटो झळकवले. पण, हिटलर किंवा टोजो यांच्याप्रमाणे ओसामा, छायाचित्रांवरूनतरी, कोणी क्रूरकर्मा वाटत नाही. एखादा शांत, गंभीर प्रेषित असावा असे त्याचे सारे बोलणे, चालणे, वागणे वाटते. अमेरिकन सरकारच्या साऱ्या अधिकृत निवेदनांबद्दल प्रसारमाध्यमे संशय व्यक्त करतात; उलट, अफगाणिस्तान टेलिव्हिजनवर जे सांगितले जाईल, ते सारे प्रथमदर्शनी तरी, सत्य असल्याचे गृहीत धरतात.

तालिबानने अमेरिकेचे हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा केला. अमेरिकन वायुसेनेने हे हेलिकॉप्टर अपघाताने ग्रस्त झाले आणि पाकिस्तानातील एका विमानतळावर कोसळले असे सांगितले. लगेच, तालिबानने कंदाहारजवळ पडलेल्या हेलिकॉप्टरच्या अवशेषांचे फोटो प्रसिद्ध केले. हेरात शहरातील शंभर खाटांच्या इस्पितळावर अमेरिकी बॉम्ब पडल्याचे वृत्त अमेरिकेने नाकारले, पण खुद्द संयुक्त राष्ट्रसंघानेच ते सत्य असल्याचा निर्वाळा दिला. अमेरिकन नागरिकांचाच त्यांच्या सरकारच्या सुरक्षा कार्यक्षमतेवर विश्वास उरला नाही आणि त्यांच्या सरकारच्या विश्वासार्हतेलाही तडा गेला आहे.

६. कोणत्याही पारंपरिक लष्करशहाप्रमाणे, अमेरिकन सेनापती झालेल्या

हानीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कसोशीने प्रयत्न करतात

जागतिक व्यापार केंद्रावर हल्ला झाला, विमानतळावर बंदोबस्त कडेकोट झाला. सर्व महत्त्वाच्या इमारतींभोवती असा पहारा बसवण्यात आला, की कोणते प्रवासी विमान त्यांवर आदळण्याकरिता जात आहे असे दिसले तर ते विमान, प्रवाशांच्या प्राणांची पर्वा न करता, पाडून टाकण्याची व्यवस्था झाली. ॲन्थ्रॅक्स् जंतूंची पाकिटे येऊ लागल्यानंतर, रोगराईचा फैलाव होऊ नये यासाठी जंगजंग तयारी चालू आहे. आम्ही शक्यतो सारे प्रयत्न करीत आहोत असे अमेरिकन सरकार छाती फुगवून सांगत असले तरी अमेरिकन नागरिकांना चिंता पडली आहे ती, विमाने आदळणे किंवा जंतुग्रस्त पाकिटे यानंतर आता कोणती नवीन अजब क्लृप्ती ओसामा बिन लादेन काढेल, याची.

बायबलच्या कथांतील डेव्हिड आणि गोलायत यांच्या संघर्षाप्रमाणेच ओसामा बिन लादेन आणि अमेरिका यांची लढाई पराकोटीची विषम आहे आणि तरीदेखील, पहिल्या पाच आठवड्यांनंतर सरशी झाली आहे ती ओसामाची, हे निःसंशय.

हिवाळा जवळ येत आहे. रमझानचा उपवासाचा महिनाही जवळ येत आहे. अमेरिकेची चढाई काही काळातच थांबवावी लागणार आहे किंवा थंडावणार आहे. याउलट, ओसामाच्या कारवाया बिनदिक्कत चालू राहणार आहेत. या युद्धात आघाड्या नाहीत, सरहद्दी नाहीत. या जागतिक यादवी युद्धात बंडखोरांची बाजू वरचढ ठरली आहे. आणखी महिन्या-दोन महिन्यांत युद्ध आटोपते घेण्याची मजबुरी झाली तर त्या मध्यंतरात अमेरिकेच्या हाती काही फारसे आले असेल असे दिसत नाही.

*दि. ४/११/२००१*

■■

# राष्ट्रवादींच्या वल्गना– बहिष्कारासह खुला व्यापार!

दोहा परिषदेची ९ नोव्हेंबर तारीख जसजशी जवळ येत आहे तसतसे जागतिक व्यापारासंबंधी जबाबदार माणसेही वाढत्या बेतालपणे बोलू लागली होती. एका अखिल भारतीय पक्षाने, जागतिक व्यापार संस्थेत राहावे; पण शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी परदेशी मालावर सार्वत्रिक बहिष्कार घालावा अशी अफलातून कल्पना मांडली आहे!

दोहा वाटाघाटींचा आवाका किती असावा? श्रीमंत देशांचा प्रस्ताव आहे की, या साऱ्या करारमदारांचे क्षेत्र अधिक व्यापक करावे. याउलट, गरीब देशांचा आग्रह आहे, की वाटाघाटींच्या गेल्या फेरीत जे काही समझोते झाले, त्यांची अंमलबजावणी किती झाली याचे व्यापक सर्वेक्षण करून, जुन्या करारांची अंमलबजावणी समाधानकारक झाली असेल तरच करारांची व्याप्ती पुढे वाढविण्याचा विचार करावा.

गेल्या वाटाघाटींच्या वेळी गरीब देशांची प्रतिनिधीमंडळे गोंधळून गेली होती. जागतिक व्यापार खुला करण्यात काय काय विषयांचा मागोवा घेणे आवश्यक आहे, याची त्यांना फारशी कल्पनाच नव्हती. याचा परिणाम असा झाला, की श्रीमंत देशांना लाभदायक अशा गोष्टी गरीब देश कबूल करून बसले.

शेतीमालाच्या व्यापारासंबंधी कराराबद्दल बोलायचे झाले तर श्रीमंत देश त्यांच्या शेतकऱ्यांना कोणकोणत्या पद्धतींनी अनुदाने पोहोचवितात याची भारतीय मुत्सद्द्यांना फारशी कल्पनाही नव्हती. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानांचे मोजमाप करताना श्रीमंत देशांतील प्रचलित अनुदानपद्धती वगळण्याची कलमे आणि परिशिष्टे गाळण्यात आली. काय चालले आहे याचा गरीब देशांना पत्ताही लागला नाही.

भौगोलिक नावाखाली मिळणारे संरक्षण स्कॉच व्हिस्कीला मिळाले, फ्रेंच

मद्यांना मिळाले; पण दार्जिलिंग चहा आणि रत्नागिरी हापूस यांना मिळाले नाही.

उरुग्वे वाटाघाटींच्या शेवटी डंकेल साहेबांचा जो मसुदा प्रसृत करण्यात आला त्यावरील चर्चेचे गुऱ्हाळ लांबत गेले. मसुद्यावर माराकेश येथे १९९४ मध्ये सह्या होण्याअगोदर श्रीमंत देशांच्या लक्षात आले, की सारे करारमदार त्यांच्या लाभाकडे झुकत असूनही श्रीमंत देशांना नव्या खुल्या व्यापारात एक मोठा धोका संभवतो.

गरीब देशांत मजुरी स्वस्त आहे आणि निसर्ग अजूनही पुष्कळसा अप्रदूषित आहे. त्यामुळे, मजुरांचे शोषण करून आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून गरीब देश आपला उत्पादनखर्च कमी करू शकतात आणि श्रीमंत देशांतील, महागडी मजुरी व पर्यावरणसंरक्षणाचा जबरदस्त खर्च यांमुळे उत्पादनखर्च वाढलेल्या मालाला आव्हान देऊ शकतात.

माराकेश येथील स्वाक्षरी समारंभाआधी श्रीमंत देशांनी प्रस्ताव मांडला, की कोणी देश मजूर आणि पर्यावरण यांसंबंधीचे आंतरराष्ट्रीय नियम पाळीत नसती तर त्यांच्या मालाविरुद्ध संरक्षक तटबंदी उभारण्याची इतर देशांना मुभा असली पाहिजे. पाच वर्षांपूर्वीच हे प्रस्ताव मंजूर व्हायचे; पण गरीब देशांनी एकजूट करून ते बाजूला ठेवण्यात यश मिळविले तरीही प्रस्ताव विषयपत्रिकेवर राहिले आणि त्यासंबंधी चर्चा दोहा येथील मंत्रिस्तरावरील परिषदेत व्हावी किंवा नाही हा वादाचा विषय झाला.

श्रीमंत देशांनी माराकेश करारांच्या अंमलबजावणीत चालढकल केली, काहीशी लुच्चेगिरीही केली आहे हे खरे; परंतु गरीब देशांनी उत्पादनासंबंधीच्या सामाजिक शर्ती मान्य केल्याखेरीज अंमलबजावणी सुधारणे दुरापास्त आहे असा त्यांचा युक्तिवाद आहे.

दोहा परिषदेच्या उंबरठ्यावरील चित्र थोडक्यात असे : मूळ करारमदार श्रीमंत देशांना अनुकूल, ते अधिक अनुकूल व्हावे असा त्यांचा खटाटोप; तर जे काही 'वादे' पाच वर्षांपूर्वी ठरले त्यांची प्रथम अंमलबजावणी करून गरीब देशांना श्वास घेण्यास फुरसत द्यावी असा त्यांचा आग्रह.

शेतीमालाच्या व्यापारासंबंधी बोलायचे झाले तर, श्रीमंत देशांनी प्रथम आयात अधिक खुली करावी, निर्यातीवरील अनुदाने कमी करावीत आणि शेतकऱ्यांची अनुदानेही पातळ करावीत आणि मगच, सामाजिक अटींविषयी बोलावे अशी गरीब देशांची इच्छा आहे.

सामना मोठा अटीतटीचा आहे. जगभर मंदीची लाट उसळत आहे. जर्मनी–

जपानसारखे देशदेखील वाढत्या बेरोजगारीने त्रस्त झाले आहेत. मंदीची अर्थव्यवस्था गोठवून टाकू लागली की कोठे ना कोठे दुसऱ्या देशाच्या भूमीवर लढाई सुरू करणे हे हुकमी आर्थिक हत्यार आहे. अमेरिकेने त्याचा उपयोग अफगाणिस्तानवर 'येन केन निमित्तेन' हल्ला करून अंतर्गत मंदी थोपविण्याचा प्रयत्न केला आहे; पण तो काही फारसा सफल होताना दिसत नाही.

दोहा परिषदेत जागतिक व्यापारावर सामाजिक शर्तींची बंधने घालण्याचा आग्रह श्रीमंत देश सहजासहजी सोडतील असे वाटत नाही. मुळात, माराकेश येथील करारच दीडदांडीचे; ते अधिकच असंतुलित करण्याचे प्रयत्न दोहा येथे होणार. मुरासोली मारन यांनी जुन्या करारांच्या अंमलबजावणीची तपासणी झाल्याखेरीज नव्या करारांची चर्चा होणार नाही असे निक्षून सांगितले आहे. पण, या मुद्द्यावर वाटाघाटी मोडण्याची वेळ आली तर गरीब देश एकसंध राहतील ही शक्यता नाही. जागतिक व्यापार संस्थेचे नवे करार पहिल्यापेक्षाही अधिकच जाचक असतील हे स्पष्ट आहे. या परिस्थितीला तोंड कसे द्यावे याबद्दलमात्र फारशी स्पष्टता नाही.

जागतिक व्यापार संस्थेतून बाहेर पडून काहीच साधायचे नाही; उलट, ते अंगावर उतेल याची बहुतेकांना जाणीव आहे.

त्याबरोबरच, भारतातील शेतकरी आणि इतर उत्पादक जगाच्या तोडीस, आजमितीसतरी, उतरणे दुरापास्त आहे याचीही स्पष्ट कल्पना सर्वांना आहे.

शेतीमालाच्या व्यापारासंबंधीच्या कराराबाबत बोलायचे झाले तर, हिंदुस्थानी शेतीची कमजोरी कोणीही अमान्य करीत नाही. शेतीचे तुकडेतुकडे झाले आहेत, जमिनीचा कस उतरत आहे, भूगर्भातील पाणी आटत आहे, भांडवल घसरत आहे, शेतीला लागणारी संरचना मोडकळीस आली आहे, कर्ज व इतर देणी यांनी शेतकऱ्याचा जीव कासावीस झाला आहे... या परिस्थितीबद्दलही दुमत नाही. भारतीय शेतीचे दैन्य सरकारच्या शेतकरीद्वेषी धोरणांमुळे उपजले आहे. शेतीची सरकारी कचाट्यातून लवकरात लवकर सुटका करून तिला तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचे स्वातंत्र्य बहाल करावे हा एक भाग; याउलट, शेतकरीद्वेषी धोरणे ज्यांनी राबविली ते पक्ष आणि पुढारीमात्र खुलेपणा शेतीला सोसवणार नाही, तेव्हा सरकारी आश्रयाच्या उबेनेच शेतीने विकास साधावा असा समाजवादी सल्ला देत आहेत.

आश्चर्य म्हणजे, शेतीविषयात जाणकार समजले जाणारे नेतेही या विषयावरील गोंधळात भर घालीत आहेत.

जगापासून आणि जागतिक व्यापारापासून विभक्त होणे शक्य नाही, तेव्हा जागतिक व्यापार संस्थेशी संलग्न राहावे; परंतु करारमदार संतुलित होईपर्यंत परदेशी मालावर बहिष्कार घालून शेतीव्यवसायाची स्थिती सुधारावी असा सल्ला ही मंडळी देत आहे. थोडक्यात, जागतिक व्यापार संस्थेत राहून तिला आतून सुरुंग लावावा असा त्यांचा मनसुबा आहे.

विरोधी पक्षाच्या नेत्यांना बटाटे जमिनीत लागतात की जमिनीच्या वर एवढेसुद्धा कळत नाही, अशी वेळीअवेळी नालस्ती करणाऱ्या पुढाऱ्यांनी असा प्रस्ताव जाहीररीत्या मांडावा याचा अर्थ शेतीविषयात त्यांना बटाटा जमिनीत लागतो का वर लागतो एवढेच समजते, त्यापलीकडे फारसे नाही हे उघड आहे.

जागतिक व्यापार संस्थेच्या कोणत्याही सदस्य देशाने परदेशी मालावर बहिष्काराचे हत्यार उपसले, तर बहिष्कृत देश काही हात चोळीत स्वस्थ बसणार बसतील हे संभवत नाही. बहिष्कार हा व्यापारविरहित अडथळ्यांचा (Non-Trade Barriers) प्रकार आहे असा दावा ते संस्थेच्या पुढे मांडतील आणि, त्यापलीकडे जाऊन, वेगवेगळ्या तऱ्हांचे व्यापारविरहित अडथळे उभारून चोख प्रत्युत्तरही देण्यास ते कमी करणार नाहीत. असली हत्यारे वापरणे सशक्तांना परवडते, दुर्बलांना नाही.

खुलेपणाखेरीज विकास नाही आणि विकासाखेरीज खुलेपणा नाही अशा दुष्टचक्रात अडकलेल्या गरीब देशांनी अकडम् तिकडम् घोषणाबाजीला बळी न पडता, निश्चयाने आणि संयमाने जगाबरोबर राहून, जमेल तितका विकास साधत जाण्याचा मार्गच स्वीकारला पाहिजे. या विकासाच्या मार्गात इतर देशांनी उभे केलेले अडथळे दूर करू लागण्याआधी आपल्याच राष्ट्रीय सरकारने रचलेली शेतकरीविरोधी मोर्चाबंदी मोडून काढणे महत्त्वाचे आहे.

पण, शेतकऱ्यांच्या लुटीची धोरणे राबवून नाव कमावलेले पुढारी आत्मलक्ष्यी होणार नाहीत, दुसऱ्या देशांविरुद्ध आरोळ्या ठोकून लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न करणार हे उघड आहे.

*दि. १०/११/२००१*

■■

शेतकरी संघटनेला जागतिक, ऐतिहासिक आणि दार्शनिक पाया आहे. शेतकरी संघटनेच्या शेतकीच्या अर्थकारणाव्यतिरिक्त इतर विषयांवर एवढे लिखाण होऊनही त्याकडे जावे तसे लक्ष गेलेले नाही. 'इंडिया-भारत' ही शब्दप्रणाली आता सर्व देशभर प्रचलित झाली एवढेच नव्हे, तर रूढ झाली आहे. 'शेतीमालाला रास्त भाव न देण्याचे धोरण सरकारचेच आहे,' हे आता सरकारनेही मान्य केले आहे आणि सर्व नेतेही आता ते मान्य करतात. 'कर्जमुक्ती' ही शेतकरी संघटनेची मागणी आता शासनानेही मान्य करून ती आपल्याच नावाने खपवण्याचा प्रयत्न चालवला आहे. अशा परिस्थितीमध्ये, जे नवनवीन प्रश्न आज उभे राहत आहेत त्या प्रश्नांचाही काही अंदाज शेतकरी संघटनेला दहा वर्षांपूर्वी आला होता हे या संग्रहातील लेखांवरून दिसून येईल. शेतकरी संघटनेचा विचार किती सर्वंकष आणि एका धाग्याने विणलेल्या महावस्त्रासारखा आहे याची जाणीव ज्यांना आतापर्यंत आली नसेल त्यांना या लेखसंग्रहांमुळे होईल अशी आशा आहे.

जनशक्ती वाचक चळवळ
किंमत : रु. २००/-